म.ग्रं.सं. ठाणे
विषय :....नि.ट.ह....
सं. क्र. : १५८८

REFBK-0013098

# प्रचलित शैक्षणिक समस्या

## ( शिक्षणांतील वाद, शोध व बोध )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम 3८3६८ वि: निबंध
क्रमांक १५७८ नों. दि. २३.३.६५

: लेखकद्वय :

**प्रा. सौ. लीला पाटील,**
बी. ए. (ऑ.), एम्. इड्., कोल्हापूर.

**प्रा. श्री. ह. शहाणे,**
बी. ए., एम्. इड्., ए. एम्., अकोला

73080
REFBK-0013098
REFBK-0013098

प्रकाशक :

**ठाकूर आणि कंपनी लिमिटेड, अमरावती.**

१ ९ ६ ३

सर्व हक्क प्रकाशकाधीन

प्रकाशन १५ डिसेंबर १९६३

प्रथमावृत्ति

कागद १८ पौं. डेमी

आकार डेमी ऑक्टोव्ह

१२ पॉईंट मोनो टाईप

मजबूत खर्डा बांधणी

प्रकाशक : द. ना. ठाकूर
प्रधान संचालक, ठाकूर आणि कंपनी लि. अमरावती

मुद्रक :
प. वि. बेलवलकर,
व्यवस्थापक,
हरिहरेश्वर मुद्रणालय, महाल,
ना ग पू र.

---

या पुस्तकांतील उतारे-भाषांतर व अन्य अधिकार
सौ. मनोरमाबाई फडके सहकारनिवास, मुंबई २८ व सौ. मालती शहाणे
रामदासपेठ अकोला, यांचे स्वाधीन आहेत.

---

मूल्य आठ रुपये

## लेखकांचे चार शब्द :

★

'प्रचलित शैक्षणिक समस्या' हा विषय नागपूर, औरंगाबाद व पुणें विद्यापीठांच्या बी. ईड्. च्या अभ्यासक्रमांत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत दिसून येतो. मात्र या विषयाची संकलित व सुबोध माहिती देणारीं पुस्तकें फारच कमी आहेत. त्यामुळे बी. ईड्. चा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना नक्की काय वाचावें तें समजत नाही. एकाद्या प्रश्नाचें उत्तर म्हणून वाचलेल्या अनेक अहवालांच्या कित्येक पानांपैकी काय लिहावें तें उमगत नाही. अकोला येथील बी. टी. कॉलेज-मध्ये या विषयाचा प्राध्यापक अगर नागपूर विद्यापीठाचा या विषयाचा परीक्षक म्हणून काम करीत असतां बी. ईड्. च्या विद्यार्थ्यांची वरील अडचण आमच्यापैकी श्रीमती पाटील यांच्या लक्षांत आली; व त्यांतूनच हें पुस्तक लिहिण्याची कल्पना स्फुरली.

हें पुस्तक मराठींतून लिहिण्याचें कारण असें की कनिष्ठ माध्यमिक शाळांत अगर प्राथमिक शाळांत काम करणाऱ्या शिक्षकांचीहि प्रचलित शैक्षणिक समस्यांशी तोंडओळख हवी. तेव्हां एस्. टी. सी., टी. डी. अगर बुनियादी प्रशिक्षण विद्यालयांतील विद्यार्थीवर्गाच्या कक्षेंत हें पुस्तक सहजतेने यावें म्हणून मराठींतून पुस्तक लिहिण्याचें ठरविलें. शिवाय आज अनेक सुविद्य पालकांच्या मनांत शैक्षणिक बाबींविषयीं अनेक प्रश्नचिन्हें असतात. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन या पुस्तकांत तळटीपा दिलेल्या इंग्रजी अवतरणांचाहि स्वैर अनुवाद वरील भागांत मराठींत दिला आहे व भाषा शक्यतों सुबोध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

शिक्षणक्षेत्रांत ज्यांनी धडाडीने प्रयोग केले व ज्यांची विचारपद्धति मौलिक आहे अशा कोणत्यातरी ज्येष्ठ व्यक्तीने या पुस्तकाबाबत चार शब्द लिहावे अशी इच्छा होती. या दृष्टीने विचार करतां अकोला येथील बी. टी. कॉलेजचे प्राचार्य व नागपूर विद्यापीठाच्या शिक्षण शाखेचे मुख्याधिकारी (Dean) यांचें नांव आमच्यासमोर उभें राहिलें. त्यांनी याबाबतची आमची विनंती आनंदाने मान्य केली याबद्दल आम्हाला धन्यता वाटते !

या पुस्तकाच्या मुद्रणाची जबाबदारी स्वीकारून फार कमी कालावधींत सुबक रीतीने हें पुस्तक मुद्रित केल्याबद्दल आम्ही ठाकूर आणि कंपनी लि. चे चालक **श्री. बाळासाहेब ठाकूर** यांचे आभारी आहोत.

या पुस्तकाचे स्वागत आमचे सर्व विद्यार्थी मित्र व शिक्षणक्षेत्रांत रस घेणारी इतर मंडळी करतील अशी आशा व्यक्त करून हे चार शब्द संपवितों !

**लेखकद्वय**

# प्रस्तावना

★

सर्वसामान्य शिक्षकाला भारत व आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत प्रचलित शैक्षणिक विचारप्रवाह व समस्या काय आहेत व प्रगत देशांत त्या सोडविण्याच्या प्रयत्नांत दृष्टिकोण कसा असतो याची थोडीतरी कल्पना असणें आवश्यक आहे असें वाटल्यावरून नागपूर विश्वविद्यालयाने हा विषय नवीन अभ्यासक्रमानुसार बी. एड्. या परीक्षेला नेमला आहे. विषय सोपा असला तरी त्याला अनुसरून लागणारी बिनचूक व अद्ययावत् माहिती कुठेंहि एकत्रित आलेली सांपडत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना या विषयाचा अभ्यास करण्यांत अडचणी उत्पन्न होतात. विशेषतः मराठी भाषेंत यासंबंधीं अद्ययावत् माहिती उपलब्ध करून देणारें साहित्यहि दुर्मिळच आहे. विद्यार्थ्यांची ही अडचण जाणून लेखकद्वयांनी बरेच परिश्रम घेऊन आवश्यक माहिती या पुस्तकांत संकलित केली आहे. संदर्भ-ग्रंथांच्या याद्यांवरून त्यांनी केलेल्या व्यासंगाची व्यापकता सहजच डोळयांत भरते. सोबत ठिकठिकाणीं त्यांनी अनुभवसिद्ध मतेंहि विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनाकरिता प्रदर्शित केलीं आहेत. एम्. एड्. परीक्षेला दोघांचाहि "कंपॅरेटिव्ह एज्युकेशन" हा विषय होता व दोघांनाहि तो बी. एड्. च्या विद्यार्थ्यांना शिकविण्याची संधि मिळाली. शिवाय दोघांनाहि व्यापक वाचनाची आवड. या सर्व सामग्रीमुळे त्यांना एवढी माहिती एकत्र आणणें शक्य झालें. हें पुस्तक विशेषतः माराठी माध्यमांतून अभ्यास करणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांच्या दृष्टीने फार उपयुक्त ठरेल.

रा. ह. मुंजे
प्राचार्य,
गव्हर्मेंट कॉलेज ऑफ एज्युकेशन,
अकोला (विदर्भ)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों. दि: ........................

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या स्मृतीस—

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... दि: ....................
क्रमांक .................... नोंद दि: ....................

# -- अनुक्रमणिका --

☆


| | | |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक समस्यांची पार्श्वभूमि .. .. | १ |
| २ | माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना .. .. | १० |
| ३ | परीक्षा-पद्धति .. .. .. | ३६ |
| ४ | शिक्षकांचें प्रशिक्षण .. .. .. | ६१ |
| ५ | स्त्री-शिक्षण .. .. .. | ९१ |
| ६ | विद्यार्थी व शिस्त .. .. .. | ११७ |
| ७ | धार्मिक व नैतिक शिक्षण .. .. | १४० |
| ८ | प्राथमिक शिक्षण .. .. .. | १६८ |
| ९ | व्यावसायिक शिक्षण .. .. .. | १९८ |
| १० | भाषिक समस्या .. .. .. | २१० |
| ११ | जीवन शिक्षण .. .. .. | २४३ |
| १२ | समाज शिक्षण .. .. .. | २५२ |
| १३ | -- आणि इतर प्रश्न | |
| | (अ) सैनिकी शाळा .. .. .. | २७८ |
| | (आ) राष्ट्रीय अनुशासन योजना .. .. | २७९ |
| | (इ) शाळेंतील मधल्या वेळचा आहार .. .. | २८१ |
| | (ई) कांही शैक्षणिक प्रयोग .. .. | २८७ |
| १ | गुरुकुल (कांगडी) .. .. .. | २८८ |
| २ | विश्वभारती .. .. .. | २९१ |
| ३ | वनस्थली विद्यापीठ .. .. .. | २९४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७३०९८

# शैक्षणिक समस्यांची पार्श्वभूमि : १ :

अश्मयुगापासून तो अणुयुगापर्यंत इतिहासांतील कोणत्याहि कालखंडाकडे नजर टाकली तर ज्या काळांत समाजापुढे कोणत्याहि प्रकारची समस्या नाही असा कालखंड दिसत नाही याचें एक कारण म्हणजे समाज गतिमान असतो हें होय. समाजाची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिति कालप्रवाहाबरोबर बदलत असते. साहाजिकच आजच्या समस्यांचें म्हणून शोधून काढलेलें उत्तर त्रिकालाबाधित सत्य म्हणून टिकूं शकत नाही. किंबहुना असेंहि म्हणतां येईल की आजच्या समस्यांना उत्तर म्हणून जो उपाय आपण अमलांत आणतो, त्यांतच अन्य प्रश्नांचीं बीजें लपलेलीं असतात. आता हेंच पाहाना ! समाजाची आर्थिक प्रगति साधण्यासाठीं औद्योगीकरणाच्या चक्राला गति दिली गेली. त्यामुळे मोठमोठे कारखाने, अजस्र यंत्रें व मोठमोठीं शहरें यांची उभारणी झाली. परंतु या उभारणीबरोबरच कामगारांचे विविध प्रश्न व संघ, स्त्रीपुरुषांना कामानिमित्त बाहेर पडावें लागल्यामुळे गृहजीवनांत निर्माण होणारे प्रश्न, वाढत्या संपत्तीमुळे वाढत जाणारी मानवाची अमर्याद भोगेच्छा, नव्या सामाजिक जीवनामुळे निर्माण होणारे नीतिविषियक नवीन प्रश्न, धकाधकीच्या व अत्यंत गुंतागुंतीच्या जीवनामुळे माणसाच्या मनावर सतत पडणारा ताण व त्यांतून निर्माण होणारे मानसिक प्रश्न, देशांतील वाढते दंगेधोपे, वाढता असंतोष--अशा कित्येक समस्यांचीहि उभारणी होते. देशांतील या परिस्थितीपासून शिक्षण अलग राहूं शकत नाही. देशाच्या औद्योगिक विकासाला मदत करूं शकणारें उद्योगाभिमुख शिक्षण असावें लागतें. त्या प्रकारच्या बहुमुखी अगर विविध उद्योगांबाबत विशेष शिक्षण देणाऱ्या शाळा काढाव्या लागतात. अभ्यासक्रमाची रचना वेगळ्या तत्त्वांवर करावी लागते. इंग्रजी-मराठी वाङ्मयाइतकाच लोहारकाम हा विषय महत्त्वाचा आहे असें मानावें लागतें. विविध विषयांची सोय करण्यासाठी विविध विषय शिकविणाऱ्या शिक्षकांची नेमणूक करावी लागते. जागेच्या अभावी कधी दुवक्त पद्धति सुरु करावी लागते आणि त्यामुळे प्रत्यक्ष शाळा चालविण्याच्या व्यवहारांत ज्या अडचणी येतात त्या निवाराव्या लागतात. अस्थिर गृहजीवनामुळे बालकाला मानसिक सुरक्षिततेचा जो अभाव जाणवतो त्यासाठी क्रेशेस् (creches), बालोद्यानें, बालमंदिरें इत्यादि काढावीं लागतात. देशांतील वाढत्या असंतोषाचा आणि असमा-

घातकारक गृहजीवनामुळे निर्माण होणाऱ्या विद्यार्थ्यांतील स्फोटक वृत्तींना आळा घालण्याचा विचार करावा लागतो. केवळ ऐहिक सुखाच्या भाषेंत जीवनाचा विचार करणाऱ्या मुलांमध्ये मौलिक जीवन मूल्यांबद्दल आदर निर्माण करावा लागतो. विशिष्ट परिस्थितीमुळें शिक्षणाच्या आशयांत (content) व पद्धतींत कराव्या लागणाऱ्या बदलाचीं अशीं आणखी कितीतरी उदाहरणें देतां येतील.

## अर्थव्यवस्था आणि शिक्षण :

देशांतील आर्थिक परिस्थितीचा मोठा परिणाम त्या देशाच्या शिक्षण-पद्धतीवर झालेला असतो हें केवळ वरवर पाहून लक्षांत येत नाही. उदाहरण द्यावयाचें झाल्यास शैक्षणिक समान संधीच्या तत्त्वाचें देतां येईल. ध्येय म्हणून हें तत्त्व सर्वमान्यच आहे. लोकशाहीच्या पुरस्कर्त्याला हें ध्येय राजकीय स्वरूपाचें वाटणें सहाजिक आहे; परंतु त्याची प्रत्यक्षांतील अंमलबजावणी राष्ट्राच्या आर्थिक क्षमतेवर अवलंबून आहे. भारतीय घटनेने ६ ते १४ वयांतील प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत असावें असें ठरविलेलें आहे. परंतु ६ ते ११ वयांतील प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करण्याचें मर्यादित ध्येयहि ठरलेल्या मुदतींत पूर्ण करणें आर्थिक कारणांमुळे अशक्य आहे असें दिसून आलें. याचीं इतरहि कांही सामाजिक कारणें आहेत; तथापि तृतीय पंचवार्षिक योजनेनंतरहि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची व्याप्ति साठ टक्क्यांपेक्षा अधिक होऊं शकणार नाही असा अधिकृत अंदाज व्यक्तविण्यात आला आहे व त्याचें कारण प्रामुख्याने आर्थिक आहे. आपल्या देशाच्या सध्याच्या परिस्थितींत तांत्रिक शिक्षणांत प्रचंड वाढ होणें आवश्यक आहे; कारण देशाच्या औद्योगीकरणाच्या गतीशीं त्याची सुसंबद्धता असली पाहिजे. रोज नवे नवे कारखाने, नवे उद्योग सुरु करण्यांत येत आहेत; परंतु तंत्रज्ञांची संख्या पुरेशी नाही. म्हणून जिल्हानिहाय पॉलिटेक्निक् किंवा व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या इतर संस्था निर्माण केल्या जात आहेत. अर्थव्यवस्थेचा शिक्षणावर केवढा प्रभाव असतो हें पाहावयाचें झाल्यास लोकशाहीचा संपूर्ण स्वीकार केलेल्या, पण भिन्न स्वरूपाच्या आर्थिक पायावर उभारलेल्या राष्ट्रांकडे नजर टाकावी. त्यांचे शैक्षणिक प्रश्न कितीतरी भिन्न असतात! तें राष्ट्र शेती-प्रधान असेल तर त्यांतील नागरिकांचें जीवन तुलनेने अधिक स्वतंत्र व स्वावलंबी असतें व शिक्षणहि त्या दृष्टीने वाटचाल करीत असतें. उलट, जर तें राष्ट्र उद्योगप्रधान असेल तर वर सांगितल्याप्रमाणे मोठमोठ्या शहरांचे, कारखान्यांचे, वर्गकलहाचे बिकट प्रश्न उभे राहतात व त्यांचें प्रतिबिंब शिक्षणांतहि उमटतें. पहिल्या प्रकारांत स्वावलंबी व्यक्तित्वाचा प्रकर्ष झालेला दिसतो, तर दुसऱ्यांत केवळ वैयक्तिक उन्नतीऐवजी सामूहिक व्यवस्था व सहकार्य हीं प्रमुख शालेय

उद्दिष्टें बनतात. शेतीप्रधान राष्ट्रापेक्षा औद्योगिक राष्ट्रांत शिक्षणाची जास्त कदर केली जाते. शेतीच्या व्यवसायांत अपार शारीरिक कष्ट व कामाचे अधिक तास यांची जरूरी असते. त्यामुळें शाळेंत हजर राहाणें मुलांना व नागरिकांना वेळेच्या अभावीं अशक्य होतें. शेतीचें उत्पन्न अनिश्चित असतें व त्यामुळे मोकळा वेळहि शैक्षणिक वा सांस्कृतिक स्वरूपाच्या अनुत्पादक गोष्टींत दवडतां येत नाही. अलीकडे शेतींत यंत्रांचा उपयोग होऊं लागल्यामुळे ही स्थिति थोडीफार पालटली आहे. पण जगाच्या इतिहासांत शेती करणाऱ्या समाजाकडून कलेंत वा शास्त्रांत फार मोठी भर पडल्याचें आढळत नाही. या संदर्भांत डेन्मार्क किंवा हॉलंड व इंग्लंड यांचीं उदाहरणें लक्षांत घेण्यासारखीं आहेत. डेन्मार्क व हॉलंड हीं छोटीं राष्ट्रें आहेत व दोन्ही शेतीप्रधान आहेत. त्यामुळें तेथील शिक्षणाचा भर शेती, पशुपालन, कोंबडया-बदकें पाळणें, कुरणांची जोपासना करणें, मच्छीमारी इत्यादि व्यवसायांवर आहे. उलट, इंग्लंड हें उद्योगप्रधान, बलशाली राष्ट्र असल्याने यंत्रांचें उत्पादन, व्यापार, नाविक सामर्थ्य, खाणी इत्यादि यांत्रिक व तदनुषंगिक व्यवसायांचें शिक्षण तेथे महत्त्व पावलें आहे. या विविध व्यवसायांतील प्रगतीसाठी विशेषज्ञ निर्मिणें हें तेथील शिक्षणांचें महत्त्वाचें उद्दिष्ट आहे.

अर्थशास्त्राच्या दृष्टीने विचार केल्यास शैक्षणिक प्रगति ही जादा उत्पादनावर व त्या अनुषंगाने शिक्षणासाठी मिळणाऱ्या मोकळ्या वेळावर अवलंबून असते असें दिसून येईल. गिरणींत आठ तास काम करणारा मजूर आपल्या मुलाला नियमितपणें शाळेंत पाठवूं शकतो, पण खेडयांतील शेतकरी मात्र शिक्षण मोफत असूनहि मुलाला शाळेंत पाठवितांना खळखळ करतो. कारण मूल तेवढया वेळांत गुरांना रानांत चरावयास नेऊं शकतें, शेताची राखण करूं शकतें, शेतीचीं लहान-सहान कामें करतें व अशा रीतीने कुटुंबाला आर्थिक हातभार लावूं शकतें.

जगांत सध्या दोन प्रमुख अर्थशास्त्रीय विचारप्रणाली किंवा दृष्टिकोन प्रचलित आहेत. निर्माण झालेल्या संपत्तीचा व मोकळ्या वेळाचा बराच मोठा भाग कांही थोडया मूठभर भाग्यवंतांसाठी राखून ठेवणारी भांडवलशाही अर्थ-व्यवस्था हा एक प्रकार होय. आर्थिकदृष्टया मागासलेल्यांसाठी शैक्षणिक व इतर संधि उपलब्ध करून देणें हा या लोकांच्या दृष्टीने केवळ दयाबुद्धीचा भाग होय; तें कांही त्यांचें कर्तव्य किंवा जबाबदारी नव्हे. त्यांच्यामतें समाजाची विभागणी श्रीमंत व गरीब या दोन वर्गांत अपरिहार्यपणें झालेली असते. याच्या उलट दुसरी समाजवादी अर्थव्यवस्था श्रमाला प्रतिष्ठा देणारी कामकरी शेतकरी वर्गाचें महत्त्व जाणणारी आहे व ती उत्पादित संपत्तीचा व रिकाम्या वेळेचा योग्य वांटा मजुरांना मिळाला पाहिजे असा आग्रह धरते. या दोन्ही दृष्टिकोनांतील भिन्नतेमुळे शिक्षण-क्षेत्रांतहि तसाच भेद दिसून येतो व भिन्न प्रकारच्या शैक्षणिक समस्या निर्माण

होतात. पहिल्या प्रकारांत व्यवसायिक शिक्षणापेक्षा सांस्कृतिक अंगाला उठाव देण्यांत येतो; तर दुसऱ्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेंत व्यावसायिक व सांस्कृतिक अथवा उदार (liberal) शिक्षणांतील भिन्नता आणि अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला जातो व दोन्ही प्रकारचें शिक्षण सरकारी खर्चानें सर्वांना उपलब्ध केलें जातें. येथे आपली चर्चा अर्थकारण व राजकारण यांच्या सीमारेषेवर पोंचल्याचें दिसून येईल. म्हणून राजकारणामुळे शिक्षणावर होणारे परिणाम व त्यांतून उद्भवणाऱ्या समस्या यांचा थोडक्यांत विचार करूं.

## राजकारण आणि शिक्षण :

देशाने स्वीकारलेल्या राजकीय तत्वप्रणालीचाहि शिक्षणावर फार तीव्रतेने परिणाम होतो ही गोष्ट वरील विवेचनाच्या ओघांत स्पष्ट झालीच आहे. राजकीय सुस्थिरता व सुरक्षितता यासाठी शिक्षण हें एक प्रभावी साधन आहे हें जाणून फ्रान्सचा बादशाह नेपोलियन याने शिक्षणविषयक सर्व सत्ता आपल्या हातांत ठेविली होती. नेपोलियनने एके ठिकाणीं लिहिलें आहे की, सर्व राजकीय प्रश्नांत शिक्षणाचा प्रश्न हा सर्वांत महत्त्वाचा आहे. निश्चित मान्यता पावलेल्या तत्त्वांचा प्रचार करणारी शिक्षणयंत्रणा असल्याशिवाय सुस्थिर राजकीय शासनसंस्था अस्तित्वांत राहूं शकणार नाही. बालपणापासून मुलांमध्ये निश्चित स्वरूपाचीं तत्त्वें बिंबविलीं नाहींत तर अस्थिरता, विघटना आणि अराजक यांचा कायमचा धोका सरकारला पत्करावा लागेल. *

नाझी राजवटींत जर्मनींतहि राज्यकर्त्यांच्या मान्यतेचें शिक्कामोर्तब नसलेल्या अन्य सर्व विचारांची अशीच मुस्कटदाबी करण्यांत आली होती. नाझी राजवटींतील प्रचारखात्याचा प्रमुख डॉ. गोबेल्स याने एके ठिकाणीं म्हटलें आहे की "आम्ही नॅशनल सोशॅलिस्ट लोकच बरोबर आहोंत अशी आमची खात्री असल्याने नॅशनल

---

* "Of all political questions that of education is perhaps the most important. There cannot be a firmly established political state unless there is a teaching body with definitely recognized principles. If the child is not taught from infancy that he ought to be a republican or a monarchist, a catholic or a free thinker, the state will not constitute a nation, it will rest on uncertain and shifting foundations and it will be constantly exposed to disorder and change."

Quoted by I. L. Kandel in his "Comparative Education"— Page 49.

... संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम........................ वि: ......
क्रमांक ........................ नों. दि: ...



सोशॅलिस्ट नसणारे लोक बरोबर असूं शकत नाहींत असे आम्ही मानतों."* त्या काळच्या जर्मनींतील शाळांचें प्रमुख ध्येय म्हणजे तरुणांना सरकार व राष्ट्र याची नॅशनल सोशॅलिस्ट तत्त्वप्रणालीनुसार सेवा करण्यासाठी प्रशिक्षित करणें हें आहे असें मानलें जाई.† इ. स. १९१७ च्या राज्यक्रांतीनंतर रशियांत जे नव्या विचारप्रणालीचे पुरस्कर्ते अधिकारारूढ झाले, त्यांनीहि शिक्षणविषयक सर्व सत्ता अपल्या हातीं ठेविली आहे. एवढेंच नव्हे, तर ज्या ज्या मार्गांनी मानवी मन काबीज करतां येईल व काबूंत ठेवतां येईल तीं सर्व साधनें सरकारच्या ताब्यांत ठेविलीं आहेत. सोव्हिएट रशियांत सत्ताधाऱ्यांच्या हुकुमांना व विचारांना कोणत्याहि तऱ्हेचा विरोध न करतां शांतपणें मान तुकविणाऱ्या माणसांची निर्मिति करण्यासाठी शिक्षणाचा उपयोग केला जातो.‡ परंतु शिक्षणविषयक सर्व सत्ता शासनसंस्थेच्या हातीं ठेवण्याचें तत्त्व इंग्लंडच्या लोकशाहीप्रिय भूमींत कधींच मूळ धरूं शकलें नाही. सरकारच्या हातीं शिक्षणाचीं सर्व सूत्रें दिलीं तर शिक्षणांतील प्रयोगशीलतेला पायबंद बसेल असें तेथील लोकांना वाटतें. खाजगी शैक्षणिक संस्थांना संपूर्ण स्वातंत्र्य देणें अगर शिक्षण सर्वस्वी सरकारच्या हातीं ठेवणें या दोन परस्परविरुद्ध विचारसरणींतील सुवर्णमध्य इंग्लंडने स्वीकारलेला आहे. यामुळेच इंग्लंडमध्ये संपूर्ण खाजगी पब्लिक स्कूल्स, खाजगी पण सरकारी अनुदान मिळणाऱ्या शाळा, विशिष्ट धर्मपंथांच्या शाळा, तसेंच कोणत्याहि धर्मपंथाला बांधून न घेणाऱ्या शाळा एकाच राष्ट्रीय शिक्षणयंत्रणेच्या शासनाखाली येऊं शकतात. $

---

* Since we National Socialists are convinced that we are right, we cannot tolerate anybody who contends that he is right. For, if he too is right, he must be a National Socialist, or if he is not a National Socialist then he simply is not right."
—Page 28, The New Era in Education—I. L. Kandel.

† "The highest task of the school is the training of youth for service to nation and state in the National Socialist spirit."—Page 229, Comparative Education (1933)—Hans.

‡ "It (education) is wed to condition the individual so that he willingly acquiesces in and submits to the dictates of those in authority"—Page 36, 'The New Era in Education'—I. L. Kandel.

$ याविषयी विचार करतांना जॉन् स्टुअर्ट मिल्चें पुढील वचन उद्बोधक वाटेल: "That the whole or any large part of education of the people should be in state hands, I go so far as anyone in

(पुढे चालू)

अमेरिकेंत राष्ट्रासंबंधीं सर्वसामान्य आदरभावे व निष्ठा बाळगल्यास व्यक्तिविषयक विचारांना व आचारांना संपूर्ण स्वातंत्र्य दिलें जातें. देशाच्या सुस्थिरतेसाठी ठराविक विचारांच्या जुलूमजबरदस्तीचा मार्ग सोपा असला तरी अंतिम हिताचा नाही. कोणत्याहि गोष्टीसाठी जनतेची राजीखुषीची संमति हाच खरा मार्ग आहे. म्हणूनच शैक्षणिक बाबतींत लवचिकपणा, विविध अभ्यासक्रम, व्यक्तींतील विविध गुणांना विकासाची समान संधि, विभागवार विद्यापीठें व त्यांचे विभिन्न अभ्यासक्रम इत्यादि गोष्टी आपणांला अमेरिकेंत दिसून येतात.*

## सामाजिक प्रगति आणि शिक्षण :

आर्थिक परिस्थिति व राजकारण यांप्रमाणेच शिक्षणावर प्रभाव पाडणारी तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सामाजिक प्रगति ही होय. समाजाच्या कोणत्याहि प्रकारच्या व्यवस्थेंत परस्परविरोधी विचारांचे अनेक अंतःप्रवाह असतात व ते आपापल्या परीने त्या व्यवस्थेवर प्रभाव पाडीत असतात. अशा रस्सीखेचींतून समाजाला एक प्रकारची स्थिर अवस्था प्राप्त होते. तिलाच समाजाची स्थायी

---

deprecating. All that has been said of the importance of individuality of character and diversity in opinions and modes of conduct, involves, as of the same unspeakable importance, diversity of education. A general state education is a mere contrivance for moulding people to be exactly like one another, and as the mould in which it casts them is that which pleases the predominant power in the government, whether this be a monarch, a priesthood, an aristocracy or the majority of the existing generation, it establishes a despotism over the mind. "—Page 52, Comparative Education—I. L. Kandel.

* याबाबतचा अमेरिकेचा दृष्टिकोन स्पष्ट होण्याच्या दृष्टीने अमेरिकेच्या धोरणविषयक मंडळाचे पुढील विचार चिंतनीय आहेत : "Education can help to clarify the nature and goals of democracy. .. It can focus the searchlight of free and constructive enquiry on those economic and social problems, which, if allowed to remain unsolved, threaten to disintegrate democracy from within. . . .It can provide opportunities to live democracy in the school and the home, in the workshop and the market place. . . .Slogans, rituals and appeals to emotion are not enough knowledge, reflection and the master teacher, experience are essential to moral defence"—Page 36, The New Era in Education—I. L. Kandel.

वा प्रचलित स्थिति ( Status quo ) असें म्हणतात. या स्थितींत एक तऱ्हेचा समतोल साधला जातो व समाज विघटित होत नाही. पण हा तोलहि बहुधा परिवर्तनशील असतो कारण समाजांतील जुने अंतःप्रवाह कित्येकदा कमजोर बनतात किंवा नव्या परिस्थितींत पोचट ठरतात; तर कधी नवीन विचारधारा प्रमाणाने अधिक प्रभावी बनतात. त्यामुळे सामाजिक परिवर्तन घडून येतें. ही गतिमानता किंवा परिवर्तनशीलता ज्या समाजांत नसेल त्याची प्रगति होणें अशक्य आहे. किंबहुना जडत्व प्राप्त झाल्यामुळे त्या समाजाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होतो.

सर्वसामान्य माणसाची प्रकृति प्रचलित समाजस्थिति शिरोधार्य मानण्याची असते. प्रगति हवी, पण ती प्रचलित व्यवस्था तोडून किंवा तिला जबरदस्त धक्का देऊन नको; तिच्यांतच अंतर्भूत होऊं शकेल अशी प्रगति बहुतेकांना हवी असते. थोडक्यांत, उत्क्रांति सर्वसामान्याला पचते व रुचते; पण क्रांति मात्र मानवत नाही व सोसवतहि नाही. जी गोष्ट व्यक्तीची, तीच समाजाची व राष्ट्राची. ज्या राष्ट्राला प्राचीन परंपरा असतात, त्याला प्रचलितांपैकीं एखाद्या गोष्टीचा त्याग करणें मोठें कठिण वाटतें. इंग्लंड हें प्रथम दर्जाचें एक बलाढ्य राष्ट्र आहे. आधुनिक विज्ञानयुगांत भारताप्रमाणे मागे न राहतां इंग्लिश लोकांनी आपली भरपूर प्रगति करून घेतली व तें एक अणु-राष्ट्र बनलें; पण प्राचीन परंपरांचा त्याग करणें मात्र इंग्लिश लोकांना जमत नाही. आवश्यक त्या नव्याचा स्वीकार करण्यास ते केव्हांहि तयार असतात. पण राजेशाहीची परंपरा, राज्याभिषेकाचे जुने सोहाळे, राजपुरुषांचे कित्येक हात लांबीचे जमिनीवर लोंबणारे व अनेकांनी उचलून धरलेले भरजरी झगे, पोपची सत्ता झुगारून दिल्यावरहि व साम्राज्यसत्ता नष्टप्राय झाल्यावरहि लावण्यांत येणारीं धर्मसंरक्षक ( Defender of the faith) आणि साता समुद्रांपलीकडील प्रदेशाचे सम्राट् इत्यादि शाही बिरुदें वगैरेंचा त्याग करण्याची गोष्ट काढतांच इंग्लिश मनुष्य भडकतो. आबालवृद्धांना प्राणप्रिय असणारा तरुण इंग्लिश सम्राट् परंपरेच्या विरुद्ध जाऊन सामान्य कुलांतील घटस्फोटित युवतीशीं लग्न करूं पाहातांच तीच इंग्लिश माणसें त्याला राजपदावरून हुसकून लावतात. इंग्रजांचा राष्ट्रीय स्वभावच असा परंपरावादी बनला आहे. अगदी याच्या उलट अमेरिकनांची स्थिति आहे. अमेरिकन लोक हे मूळचे इंग्रजच; पण नव्या जगांत नव्या परिस्थितीशीं झगडून त्यांनी नवें राष्ट्र निर्मिलें. अनेक संस्कृतींच्या प्रवाहांचें मिश्रण होऊन अमेरिकन संस्कृतीचा उदय झाला. तिच्यांत अनेक विचारसरणींचें, वागणुकींचें मिश्रण झालेलें आहे. अमेरिकेंतील परवलीचा शब्द म्हणजे नाविन्य हा आहे. त्यांना जुन्याचा फार लवकर कंटाळा येतो. नवतेचा जगावेगळा हव्यास, नव्हे ध्यास त्यांना लागला आहे.

अशा वेगवेगळ्या स्वभावाच्या राष्ट्रांत दिलें जाणारें शिक्षण वेगवेगळ्या प्रकारचें असेल यांत काय संशय ?

तात्पर्य, सामाजिक प्रगतीसंबंधीं शिक्षणाची भूमिका कोणती असावी याचा विचार करतांना दोन प्रमुख विचारधारा आढळून येतात. कांही शिक्षणतज्ज्ञ व इतर विचारवंत प्रामाणिकपणें असें प्रतिपादन करतात की शिक्षणाने प्रचलित स्थिति ( status quo ) कायम ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे, त्यासाठी शिक्षकांनी हेतुपूर्वक पद्धतशीर प्रचार ( indocrination ) केला पाहिजे. शिक्षकास जें कांही स्वातंत्र्य असेल तें, आहे ती स्थिति चिरस्थायी करण्याच्या या प्रयत्नांशीं सुसंगत असलें पाहिजे. दुसऱ्या मताचे शिक्षणशास्त्रज्ञ असें प्रतिपादितात की सामाजिक प्रगति हा शैक्षणिक कार्याचा व उद्दिष्टाचा एक भागच आहे. शिक्षकाला परंपरागत ठराविक सांच्यांतून बाहेर पडण्याचा अधिकार व स्वातंत्र्य आहे या दोन मतांखेरीज क्रांतिवाद्यांची आणखी एक विचारप्रणाली आढळते. सामाजिक क्रांति झपाट्याने व जरूर तर जबरदस्तीने करावी अशी त्यांची धारणा असते. त्यांच्या मतें शिक्षणाची कांहीशी मंद वाटचाल म्हणजे होऊं घातलेली क्रांति यशस्वी करण्याची पूर्वयोजनाच होय. या वेगवेगळ्या मतप्रणालींमुळे शिक्षणाचें स्वरूप त्या त्या परिस्थितींत वेगवेगळें बनतें व भिन्नभिन्न शैक्षणिक प्रश्न निर्माण होतात.

आर्थिक, राजकीय व सामाजिक परिस्थितीचा शिक्षणावर कसा प्रभाव पडतो व त्यांमुळे निरनिराळ्या शैक्षणिक समस्यांचा प्रादुर्भाव कसा होतो याचें थोडक्यांत विवेचन वर केलें आहे. तें जरी वेगवेगळ्या मथळ्याखाली केलें असलें तरी तें केवळ विवेचनाच्या सोयीसाठी ! एखाद्या राष्ट्रांत त्यांतील दोन्ही किंवा तीन्ही कारणांमुळेंहि शैक्षणिक समस्या निर्माण झालेल्या असतात. भारताच्याच उदाहरणावरून हें स्पष्ट होईल. मुख्यतः आर्थिक कारणांमुळे व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाचे प्रश्न, सामाजिक परिस्थितीमुळे स्त्रीशिक्षण, धार्मिक शिक्षण इत्यादि प्रश्न, तसेंच, राजकीय कारणांमुळे एकात्मता, भाषा, इ. प्रश्न निर्माण झाले आहेत. पण तसें पाहिल्यास या प्रत्येकांत अनेक कारणांची गुंतागुंत झाल्याचें दिसून येईल. चिनी आक्रमणामुळे सक्तीचें लष्करी शिक्षण, सार्वत्रिक शारीरिक-शिक्षण इ. समस्या नव्या स्वरूपांत आपणांपुढे तीव्रतेने उभ्या राहिल्या आहेत. त्यापैकी कांही अत्यंत जटिल आहेत व कांही अद्यापि समाधानकारक उपाययोजना न सापडल्याने अनुत्तरित आहेत. म्हणून त्या सर्वांचा पूर्वग्रहविरहित व बुद्धिनिष्ठ विचार होणें जरूर आहे. जगांतील पुढारलेल्या सुसंस्कृत राष्ट्रांनाहि अशा प्रश्नांना तोंड द्यावें लागलें आहे. त्यांनी केलेल्या उपाययोजना आपणांला जशाच्या तशा उपयोगी पडतील असें समजणें योग्य नव्हे, परंतु त्यांना लाभलेल्या यशापयशाच्या

संदर्भांत आपणांलाहि आपण योजित असलेल्या उपायांचा व अवलंबिलेल्या मार्गांचा विचार करतां येईल. * या दृष्टीने पुढील प्रकरणांतून शैक्षणिक प्रश्नांच्या कारणमीमांसा व उपाययोजना यांबरोबरच इतर देशांतील तत्सम परिस्थितीचें जरूर तेवढें परिशीलन आढळेल. कोणताहि प्रश्न म्हटला की त्याला दोन बाजू असतातच. दोन्ही पक्षांतर्फे जोरदार युक्तिवाद करण्यांत येतो व युक्तिवादाच्या तुल्यबलतेमुळेच त्यांना समस्या असें म्हणावयाचें ! म्हणून वर सांगितल्याप्रमाणे पूर्वग्रहविरहित व बुद्धिनिष्ठ विचारांतींच योग्य निर्णय करतां येणें शक्य आहे. कविकुलगुरु कालिदासाने या बाबतींत स्पष्ट मार्गदर्शनच केलें आहे.

पुराणमित्येव न साधु सर्वम् ।
न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ॥
सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते ।
मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ॥

अधिक अभ्यासासाठी संदर्भग्रंथ :


(1) Report of the Secondary Education Commission.
(2) The New Era in Education—I. L. Kandel.
(3) Education in New India—Humayun Kabir.
(4) Modern Philosophies of Ed.—I. S. Brubacher.
(5) Problem of Educational Reconstruction —K. G. Saiyidain.


* "Educational systems are uniquely national, but the problems that confront them today are very much the same in many other countries. There is no country today where the question of post-elementary or secondary Education is not a serious issue. The answers however, are being determined by political, social and economic forces as well as by the tradition of education itself."
—Page 8, Chap. I., The New Era in Education—I. L. Kandel.

# माध्यमिक शिक्षणाची पुनर्रचना : २ :

••• १ •••

भारतांत इंग्रजी अंमल सुरु होण्यापूर्वी जुन्या पद्धतीने दुय्यम शिक्षण दिलें जात होतें. अव्वल इंग्रजींत पाश्चात्य विद्येचें नव्या पद्धतीने शिक्षण देणाऱ्या दुय्यम शाळा अस्तित्वांत आल्या. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळांत दुय्यम शिक्षणांत बरीच वाढ झाली. सुरुवातीचें इंग्रजी माध्यम हळूहळू कमी होऊन मातृभाषेचा किंवा प्रदेशिक भाषेचा माध्यम म्हणून सर्रास वापर करण्यांत येऊं लागला व त्या त्या भाषांतील क्रमिक पुस्तकेंहि पुरेशा प्रमाणांत उपलब्ध झालीं. इतक्या सुधारणा होऊनहि स्वातंत्र्योत्तर काळांत माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेची आवश्यकता तीव्रतेने भासूं लागली. या पुनर्रचनेच्या प्रमुख कारणांपैकी कांही कारणें स्वातंत्र्योत्तर कालांत निर्माण झालेल्या राष्ट्रीय गरजा व त्या संदर्भांत प्रचलित शिक्षणपद्धतींत आढळून आलेले दोष यांतून उद्भवलीं आहेत, तर कांही कारणांचें मूळ इतर सुधारलेल्या राष्ट्रांत झालेल्या शैक्षणिक चळवळी, शिक्षणविषयक व मानसशास्त्रीय संशोधन, यंत्रयुगांतील वैज्ञानिक प्रगति इत्यादि घटनांत आहे. या सर्व कारणांचा थोडक्यांत परामर्श घेणें उचित होईल.

राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर भारत हें एक निधर्मी प्रजासत्ताक राष्ट्र बनलें. लोकशाहींतील नागरिकाच्या जबाबदाऱ्या योग्य तऱ्हेने पेलूं शकतील असे नागरिक निर्माण करणें, त्यासाठी चारित्र्यसंवर्धन करणें, योग्य संवयी व वृत्ति यांची जोपासना करणें, फुटीर प्रवृत्तींना निष्प्रभ करून नागरिकांच्या मनांत विशाल राष्ट्रीय भावनेचा परिपोष करणें इत्यादि महत्त्वाचें कार्य नव्यानेच शिक्षणाकडे आलें. तत्पूर्वी राज्यशकट चालविण्याच्या दृष्टीने कारभार करूं शकतील असे विविध पातळीवरील नोकर तयार करणें एवढेंच ध्येय माध्यमिक शिक्षणापुढे होतें. स्वातंत्र्योत्तर काळांत माध्यमिक शिक्षणाच्या ध्येयांत हा महत्वाचा फरक झाल्यामुळे माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेचे सांगोपांग विचार करून शिफारसी करण्यासाठी भारत सरकारने डॉ. लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची मुद्दाम नियुक्ति केली. त्या आयोगाने इ. स. १९५३ मध्ये केलेल्या शिफारसीनुसार माध्यमिक शिक्षणक्षेत्रांत बऱ्याच सुधारणा करण्यांत आल्या आहेत व कांही बाबतींत वाटचाल सुरु आहे.

क्रमांक ... दिनांक ... वि: नों. दि.

## भारताची आर्थिक स्थिति व माध्यमिक शिक्षण :

माध्यमिक शिक्षणाचीं ध्येयें व उद्दिष्टें ठरवितांना भारताच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करणें अपरिहार्य आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या दृष्टीने भारत जरी बराच समृद्ध देश असला तरी प्रत्यक्षांत मात्र तो दरिद्रीच आहे. राष्ट्रीय संपत्तीची वाढ करणें, नागरिकांच्या राहाणीचें मान वाढविणें व त्यासाठी आर्थिकदृष्टचा त्यांची उत्पादनक्षमता वाढविणें हे महत्त्वाचे आर्थिक प्रश्न आपल्या राष्ट्रापुढे आहेत व शिक्षण हें राष्ट्रीय जीवनाचें एक प्रमुख अंग असल्याने या प्रश्नांकडे शिक्षणाला दुर्लक्ष करतां येणार नाही. आधुनिक वैज्ञानिक युगांत नागरिक स्वावलंबी व राष्ट्रीय संपत्तींत भर घालण्याची क्षमता असलेला हवा. म्हणून केवळ पुस्तकी शिक्षणाऐवजी शिक्षणाच्या तांत्रिक, औद्योगिक व व्यावसायिक अंगावर विशेष भर देणें क्रमप्राप्त ठरतें. म्हणूनच माध्यमिक शिक्षणांत अलीकडे तांत्रिक, औद्योगिक, व्यापारविषयक व कलात्मक विषयांचा अंतर्भाव करण्यांत आला आहे.

## इंग्रजी अंमलाचा वारसा :

वरील संदर्भांत आणखी एका प्रश्नाकडे लक्ष द्यावें लागेल. भारतीय जनतेच्या दारिद्र्यामुळे बहुसंख्य जनता शिक्षणापासून वंचित राहिली आहे. अर्थातच दारिद्र्याबरोबरच संकुचित सामाजिक रूढी, अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, परकीय सत्तेचें धोरण इत्यादि अनेक कारणें त्याच्या बुडाशीं आहेत. इंग्रजी अमदानींतील विशिष्ट शिक्षणपद्धतीमुळे शिक्षण सार्वत्रिक होऊं शकलें नाही व १५० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर साक्षरतेचें प्रमाण शें. १० सुद्धां झालें नाही. शिक्षण महागडें असल्याने व त्याची जीवनाशीं फारकत असल्यामुळे सर्वसामान्य जनता त्यापासून दूरच राहिली. त्यामुळे अतिप्राचीन संस्कृतीचा उज्ज्वल वारसा लाभूनहि इतर आधुनिक पुढारलेल्या राष्ट्रांच्या तुलनेने आपली सांस्कृतिक उन्नति होऊं शकली नाही व भौतिक प्रगतींत तर आपण कित्येक शतकें मागें राहिलों. शिक्षण समाजांतील वरच्या थरापुरतेच मर्यादित होतें व तें केवळ नोकरीच्या दृष्टीनेच उपयुक्त असे. ज्यांना नोकरी मिळू शकत नव्हती ते लोक शिक्षण घेऊनहि जीवनांत अयशस्वी ठरत, कारण तें शिक्षण केवळ पुस्तकी, प्रत्यक्ष जीवनाच्या दृष्टीने कुचकामी होतें.

## माध्यमिक शिक्षणाची वाढती मागणी :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही यशस्वी होण्याच्या दृष्टीने शिक्षणप्रसाराची विशेष जरूरी भासूं लागली. यासाठी टाकण्यांत आलेलें पाहिलें पाऊल म्हणजे

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना हें होय. इंग्रजी अमदानींत सक्तीच्या शिक्षणासंबंधीं कांही कायदे करण्यांत आले होते ही गोष्ट खरी, परंतु त्यांची अंमलबजावणी मात्र इ. स. १९३५ नंतर, किंबहुना खऱ्या अर्थानें स्वातंत्र्योत्तर कालांतच सुरू झाली. या योजनेचा एक परिणाम साहाजिकमणेंच असा झाला की प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खूपच वाढली व त्यांची माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी मागणी व धडपड सुरू झाली. माध्यमिक शिक्षण घेऊं इच्छिणारीं मुलें व माध्यमिक शाळा यांच्या संख्येंत आजतागायत मेळ बसलेला नाही. इ. स. १९५० मध्ये भारतांत ७२८८ माध्यमिक शाळा होत्या. त्यांची संख्या इ. स. १९६० मध्ये १६६०० झाली. याच मुदतींत विद्यार्थ्यांची संख्या १२ लक्षांवरून २९ लक्षांवर गेली. तृतीय पंचवार्षिक योजनेअखेर (१९६५–६६) ही संख्या ४५ लक्ष होईल असा अंदाज आहे. गेल्या एकाच वर्षांत (१९६२–६३) केवळ महाराष्ट्र राज्यांत सुमारें १००० माध्यमिक शाळा नव्याने सुरू करण्यांत आल्या. यावरून माध्यमिक शिक्षणाच्या वाढीचा वेग किती प्रचंड आहे याची कल्पना येऊं शकेल. शहरांतील माध्यमिक शाळांतून दुवक्त वर्ग भरविण्यांत येतात, एकेका वर्गांतील मुलांची संख्या केव्हाकेव्हा साठपर्यंत असते. रात्रींच्या अनेक शाळा चालविल्या जातात; तरीहि वर्षाच्या सुरवातीस कित्येक तास रांगेंत उभे राहूनहि मुलांना प्रवेश मिळवून देणें पालकांना दुर्घट झालें आहे. इतकी मागणी असलेलें माध्यमिक शिक्षण योग्य पायावर, योग्य दिशेने व राष्ट्राच्या तसेंच व्यक्तीच्या सर्व गरजा लक्षांत घेऊन दिलें जावें हें उचित आहे व म्हणूनच माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेची तीव्र आवश्यकता निर्माण झाली आहे.

## मानसशास्त्रीय संशोधन आणि माध्यमिक शिक्षण :

आपल्या राष्ट्रांतील विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भांत आपण शैक्षणिक पुनर्रचनेच्या जरूरीचा विचार केला; परंतु एवढयानेच भागत नाही. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचाहि विचार नव्या मानसशास्त्रीय दृष्टिकोनांतून करणें जरूर आहे. विसाव्या शतकांत झालेल्या मानसशास्त्रविषयक संशोधनांतून ज्या नव्या सिद्धांतांची प्रतिष्ठापना झाली, त्यांचा शिक्षणव्यवस्थेवर, शिक्षणपद्धतीवर व अभ्यासक्रमावर फार मोठा परिणाम झाला आहे. प्रस्तुत विषयाच्या संदर्भांत त्यांपैकीं खालील तीन सिद्धान्त महत्त्वाचे आहेत.

(१) मानसिक तालीम किंवा वळणा ( Formal Discipline ) चा सिद्धान्त चुकीचा आहे.

(२) वैयक्तिक भिन्नता ( Individual Differences ) विचारांत घेतल्या-शिवाय शिक्षणक्रम व शिक्षणपद्धति परिणामकारकपणें ठरवितां येत नाही.

(३) पौगंडावस्थेंतील (Adolescence) विशिष्ट स्वरूपाच्या मानसिक प्रवृत्ति लक्षांत घेऊनच माध्यमिक अभ्यासक्रम व इतर अभ्यासक्रमबाह्य कार्यक्रम यांची आखणी करावी लागते.

## मानसिक वळण ( Formal Discipline ):

मानसिक वळणाच्या तत्त्वानुसार पूर्वी अभ्यासक्रमाची आंखणी होत असे. विशिष्ट विषयाचा जीवनांत कितपत उपयोग आहे किंवा त्यांत विद्यार्थ्यांना वयानुसार रस वाटतो किंवा नाही याचा विचार केला जात नसे. ज्यामुळे मानसिक व्यायाम ( Mental gymnastics ) घडेल असे विषय—व्याकरण, व्युत्पत्ति, संस्कृत किंवा लॅटिनसारख्या जुन्या भाषा इत्यादि–सर्वांना अनिवार्य स्वरूपांत अभ्यासावे लागत. अशा विषयांच्या अभ्यासाने बुद्धि तल्लख होते, स्मरणादि मानसिक शक्तींचा विकास होतो वगैरे समजुती प्रचलित होत्या; परंतु हा सिद्धान्त चुकीचा असल्याचें प्रायोगिक मानसशास्त्राने सिद्ध केलें आहे. कारण त्याला आधारभूत असलेलें शक्तिवादी मानसशास्त्र ( Faculty Psychology ) व शिक्षण संक्रमण ( Transfer of training ) वगैरे तत्त्वें आधुनिक मानसशास्त्राने अग्राह्य ठरविलीं आहेत. ज्या ज्ञानाचा वा माहितीचा उपयोग प्रत्यक्ष जीवनांतील प्रश्न सोडविण्यासाठी किंवा ते अधिक समृद्ध करण्यासाठी होईल अशी माहिती वा अनुभव विद्यार्थ्याला उपलब्ध करून देणें हें नवें तत्त्व आता त्याऐवजीं स्वीकारण्यांत आलें आहे. यामुळे शिक्षण जीवनाशीं जास्तींत जास्त सुसंबद्ध राहील व त्याची उपयुक्तता वाढेल हें उघडच आहे. याच दृष्टीने सध्याच्या क्रमिकपुस्तकांतील धडे अधिक मनोरंजक असतील अशी दक्षता घेण्यांत येते; नागरिकशास्त्रासारखे नवीन आवश्यक विषय त्यांत अंतर्भूत केलेले असतात. गणिताच्या पुस्तकांतसुद्धा दिसून येणारा बदल पाहिला म्हणजे या नवीन विचाराचा अभ्यासक्रमावरील प्रभाव लक्षांत येईल.

## वैयक्तिक भिन्नता (Individual differences) :

शैक्षणिक मानसशास्त्रांतील एक महत्त्वाचा विचार म्हणजे वैयक्तिक भिन्नतेचें तत्त्व होय. कोणतींहि दोन माणसें एकसारख्याच मानसिक गुणांनी व सामर्थ्याने युक्त नसतात. वैयक्तिक आवडीनिवडी, मनाच्या निरनिराळ्या शक्ति व वृत्ति, मानसिक विकास, व्यक्तिमत्वाचीं विभिन्न अंगें या दृष्टीने माणसांमाणसांत

बरेच–कित्येकदा जमीनअस्मानाचें–अंतर असतें हा सिद्धान्त आता सर्वमान्य झाला आहे. शिक्षणव्यवस्था, अध्यापन–पद्धति, अभ्यासक्रम इत्यादि बाबींवर याचा फार मोठा परिणाम घडून येणें अपरिहार्य होतें. हा सिद्धान्त विचारांत घेतला म्हणजे सर्व प्रकारच्या विद्यार्थ्यांसाठी एकाच ठराविक सांच्याचा अभ्यासक्रम आंखून देणें किती हास्यास्पद व हानिकारक ठरेल याची कल्पना येईल. बहात्तर रोगांवर एकच मुळी उगाळून देणाऱ्या वैद्च्या औषधाप्रमाणे वरील उपाययोजना केवळ व्यर्थच नव्हे, तर घातकहि ठरणार यांत काय संशय ?

## माध्यमिक शिक्षण––एक स्वयंपूर्ण अवस्था :

दुसरी गोष्ट अशी की पूर्वीचें माध्यमिक शिक्षण हें फार थोड्या भाग्यवान बुद्धिवंतांसाठीच असल्याने पांडित्य वा विद्वत्ता प्राप्त करण्याच्या दृष्टीने ज्ञानाच्या सखोलतेवर भर दिला जात असे. आताचे माध्यमिक शिक्षण सर्वसामान्यांसाठी असल्याने ज्ञानाच्या खोलीऐवजी रुंदीवर, व्यापकतेवर भर दिला जाणें उचितच आहे. माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या पूर्वीच्या विद्यार्थ्यांपुढे सरकारी नोकरी किंवा उच्च शिक्षण हे दोनच पर्याय असत. या व इतर कांही कारणांमुळे शिक्षणाला केवळ पुस्तकी स्वरूप प्राप्त झालें होतें. आता विद्यार्थ्यांची संख्या वाढली. सर्वांना नोकरी मिळत नाही व उच्च शिक्षण परवडत नाही. त्यामुळे माध्यमिक शिक्षणानंतर शालेय (institutional) शिक्षणाला रामराम ठोकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या बरीच मोठी असते. यामुळे माध्यमिक शिक्षण ही अवस्था उच्च शिक्षणाची पूर्वतयारी एवढ्याच स्वरूपाची न राहातां एक स्वयंपूर्ण, स्वतःचें आगळें वैशिष्टय असलेली स्वतंत्र अवस्था समजली जाऊं लागली आहे. या शिक्षणानंतर बरेच विद्यार्थी आपापला व्यवसाय करूं लागतात. त्यासाठी स्वतःच्या पायावर उभें राहून तो व्यवसाय करण्याइतपत ज्ञानाची व आत्मविश्वासाची शिदोरी त्यांना मिळणें अवश्य आहे. शिवाय, प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवडीनुसार, कुवतीनुसार प्रवृत्त्यनुसार योग्य विषयांचा अभ्यास करण्याची संधि प्राप्त करून देणें हेंहि माध्यमिक शिक्षणाचें कर्तव्य ठरतें. म्हणूनच अलीकडे अभ्यासक्रमांत अनिवार्य (compulsory) आणि वैकल्पिक (electives) अशी विषय-वांटणी केलेली दिसून येते. एस्. एस्. सी. बोर्डाने शालान्त परीक्षेसाठी निरनिराळ्या गटांत मिळून ६०-७० विषय मंजूर केलेले आहेत. अमेरिकेंत ही संख्या २५० पेक्षा जास्त आहे. या योजनेच्या बुडाशीं वरील विचार विशेषतः वैयक्तिक भिन्नतेचें तत्त्व आहे हें थोड्या विचारांतीं स्पष्टपणें दिसून येईल. अशा तऱ्हेची विषयांची निवड करण्याची संधि न दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अपयशाचें प्रमाण खूपच वाढतें. चार चार वेळां परीक्षेला बसून विद्यार्थी उत्तीर्ण होऊं शकत नाहींत. परिणामतः

वैफल्य, निराशा इत्यादींमुळे त्यांची मानसिक हानि किती होत असेल याची कल्पना केलेलीच बरी !

**पौगण्डावस्था** (adolescence):

अर्वाचीन मानसशास्त्राने निर्माण केलेला तिसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पौगण्डावस्थेंतील अथवा कुमारावस्थेंतील विशिष्ट मानसिक वृत्तींचा होय. मानसशास्त्राने विकासाच्या निरनिराळ्या अवस्था व त्यांचीं वैशिष्टचें सप्रमाण दाखवून दिलेलीं असल्याने त्या त्या अवस्थेंतील शिक्षणाचा विचार करतांना त्यांचें महत्त्व लक्षांत घ्यावेंच लागतें. माध्यमिक शिक्षणाचा कालावधि व पौगण्डावस्थेची वयोमर्यादा सामान्यतः एकच असल्यामुळे माध्यमिक शिक्षणाला एतद्विषयक संशोधनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. साधारणपणें वयाच्या १२ ते १४ वर्षापर्यंत मुलांचें बाल्य संपतें व तीं शारीरिक व मानसिक दृष्टीने प्रौढ व स्वतंत्र बनूं लागतात. * विशिष्ट शारीरिक बदल घडून येतात. त्याचबरोबर लैंगिक प्रवृत्तीसारख्या महत्त्वाच्या व नाजूक प्रवृत्तींचा उदय होतो. मूल अंतर्मुख बनतें व त्याला स्वत्वाची विशेष जाणीव होत असते. त्यच्या बाल्यसुलभ रुचि, कल आणि प्रवृत्ति कमी होऊन प्रौढत्वाला अनुरूप अशा आवडीनिवडींचा प्रादुर्भाव होतो. आत्मप्रवृत्ति, स्थिरभाव, स्तुतिनिंदेच्या बाबतींत हळवेपणा, विभूतिपूजा, नैतिकता इत्यादींचा प्रभाव पडतो व विकास होतो. या सर्व गोष्टींवर चारित्र्यपरिपोष अवलंबून असल्यामुळे शैक्षणिकदृष्टचा ही अवस्था अत्यंत महत्त्वाची ठरते †

---

* "Adolescence or Youth...... extends from puberty to the attainement of full height and weight and the cessation of growth. It is the period in which a person moves out from the home circle, and becomes physically and mentally independent." Page 64.—Psychology of Development and Personal Adjustment —J. E. Anderson.

† "The contribution which a better knowledge of the Psychology of youth is making to the reorganisation of Secondary Education is definite for, that cycle of life commonly known as adolescence has a number of its own significant characteristics and needs. Generally, at about the ages of twelve to fourteen the individual begins to take on an adult status biologically and to feel himself as part of the adult world. His interests in many ways seem to change from those characteristic of childhood

(पुढे चालू)

म्हणून माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेचें ध्येय म्हणजे मुलांना प्राप्त झालेल्या उपरोक्त नवीन अभिरुचि व नवीन जीवनविषयक दृष्टिकोन यांना अनुसरून सर्वांगीण विकासाचा समृद्ध कार्यक्रम उपलब्ध करून देणें व प्रत्येक व्यक्तीच्या विशिष्ट शैक्षणिक गरजा लक्षांत घेऊन योग्य प्रकारचे शैक्षणिक अनुभव योग्य प्रमाणांत पुरविणें हें होय. याशिवाय आपण शिक्षणाचें लोकशाही-निष्ठ तत्त्वज्ञान स्वीकारलें असल्यामुळे मुलाचें मूल म्हणून आयुष्य सुखाने व समृद्धतेने घालवितां येईल अशी अनुभवपरंपरा त्याला उपलब्ध करूण देणें व त्याचबरोबर त्याने बाहेरच्या जगांत प्रवेश केल्यावर लोकशाहींतील नागरिकाला साजेसें यशस्वी व सुखी जीवन जगतां येईल असें सामर्थ्य व दृष्टि त्याच्या अंगीं बाणविणें हें माध्यमिक शिक्षणाचें प्रमुख ध्येय होय. या दृष्टीने लोकशाही नागरिकास आवश्यक अशा बौद्धिक, मानसिक, सामाजिक व नैतिक गुणांचा विकास व मनोवृत्तींचा परिपोष करणें आणि भारतीय परंपरेला शोभणारें व्यापक व सहिष्णु राष्ट्रीयत्व विद्यार्थ्यांच्या अंगीं बाणविणें हें माध्यमिक शिक्षणाचें कर्तव्य आहे.

२

माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेची जरूरी कां भासते व त्याचीं प्रमुख ध्येयें कोणतीं आहेत याचें विवेचन आपण वर केलें आहे. ध्येयें हीं व्यापक स्वरूपाचीं असतात. त्यांच्या संदर्भांत निश्चित स्वरूपाच्या उद्दिष्टांची पूर्ति करण्याच्या दृष्टीने वाटचाल करावी लागते. आपणांपुढील उद्दिष्टांची निश्चित कल्पना आली म्हणजे माध्यमिक शिक्षणाचा सांचा (Pattern) व कालमर्यादा, तें शिक्षण देणाऱ्या भिन्न प्रकारच्या शिक्षणसंस्था व अभ्यासक्रम यांचा यथायोग्य विचार करणें शक्य होईल.

## माध्यमिक शिक्षणाचीं उद्दिष्टें :

**शारीरिक विकास :** पौगण्डावस्थेंत विद्यार्थ्यांत महत्त्वाचे शारीरिक बदल घडत असतात. त्याची प्रौढत्वाकडे वाटचाल चालू असते. शरीराची पूर्ण वाढ होण्याच्या सुरुवातीचा हा काळ असल्याने व्यायाम, खेळ, कवाइत, लष्करी व इतर शारीरिक शिक्षण इत्यादि कार्यक्रमांकडे प्राथमिक शिक्षणाच्या तुलनेने अधिक

to the type of interests characteristic of adults. The basis for this change is both biological and social and an acceptable programme of secondary education cannot overlook those facts."
—Page 62, "The Work of the Modern High School—Lesle L. Chisholm.

लक्ष देणें जरूर आहे. या वयांतील शरीराची वाढ जर खुरटली तर त्याचा परिणाम सर्व आयुष्यभर भोगावा लागतो. योग्य शारीरिक विकासाच्या अभावीं बौद्धिक प्रगति व्यर्थ ठरते. निकोप शरीरामुळें मनहि निकोप बनतें. व्यावसायिक प्रगतीला शारीरिक संपदेची आवश्यकता आहे. थोडक्यांत म्हणजे शारीरिक आरोग्य व विकास ही सुखी जीवनाची गुरुकिल्ली असल्याने माध्यमिक शिक्षणाने विद्यार्थ्याला तें प्राप्त करून देण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न केला पाहिजे. सामाजिक कार्यक्षमता लाभण्याचा तोच एक मार्ग आहे.

**बौद्धिक विकास** : पूर्वीचें माध्यमिक शिक्षण बौद्धिक विकासाकडेच सर्व लक्ष पुरवीत असे. नव्या दृष्टिकोनांत बौद्धिक विकास अभिप्रेत आहेच; पण तो लोकशाहींतील नागरिकाला साजेसा हवा. नागरिक केवळ पुस्तकी ज्ञानाने संपन्न पोपटपंची करणारा व परप्रत्ययनेय नसावा. त्याला स्वतंत्रपणें बुद्धीच्या जोरावर सारासारविवेक करतां यावा. वैयक्तिक व सामाजिक प्रश्नांचा दोन्ही बाजूंनी अभ्यास करून निर्णय करण्याची क्षमता त्याच्या अंगीं असेल तर त्याचा खराखुरा बौद्धिक विकास झाला असें म्हणतां येईल. लोकशाहींत हेकेखोर आग्रहीपणाला व पारंपरिक अभिनिवेशाला स्थान नसतें. परस्पर विचारविनिमय करून तडजोडीचे मार्ग शोधावे लागतात. यासाठी लागणारें कौशल्य व नवे विचार ग्रहण करण्याची तयारी त्याच्याजवळ हवी. आधुनिक जगांत आवश्यक ठरलेला वैज्ञानिक दृष्टिकोन अंगिकारणें, प्रत्येक गोष्टींत 'कां व कसें' हें समजून घेण्याची जिज्ञासा, हीं बौद्धिक विकासाचीं लक्षणें आहेत. आपल्या मताचा प्रचार करण्यासाठी अवश्य असणारें वक्तृत्व, संभाषणचातुर्य, तसेंच चुकीच्या मतांचा त्याग करण्याइतकें मनोधैर्य व प्रामाणिकपणा इत्यादि गुणांचा परिपोष व्हावयास हवा. म्हणून अभ्यासक्रमाची व इतर कार्यक्रमांची आंखणी त्या दृष्टीने केली पाहिजे.

## नागरिकाच्या जबाबदारीची जाणीव :

हुकुमशाही राष्ट्रांतील नागरिकांना सारासारविवेकाने, स्वतंत्रपणें विचार करून आपल्या कार्याची व्याप्ति व पद्धति ठरवावी लागत नाही. तेथील हुकुमशहा तें सर्व ठरवीत असतात व नागरिकांनी यंत्राप्रमाणे त्याची अंमलबजावणी मात्र करावयाची असते. लोकशाहींतील नागरिकाची जबाबदारी त्या मानाने मोठी व कठिण असते. त्याला सर्व प्रकारच्या राष्ट्रीय, सामाजिक स्वरूपाच्या गुंतागुंतीच्या प्रश्नांवर स्वत: विचार करून आपलें मत बनवावें लागतें व त्यानुसार मतदान व इतर कृति करावी लागते. (अर्थात् ही आदर्श स्थिति आहे !) माध्यमिक शिक्षण संपताच बऱ्याच जणांच्या शालेय अभ्यासाला विराम मिळतो. म्हणून या जबाबदारीची जाणीव व पात्रता विद्यार्थ्यांत निर्माण करणें हें माध्यमिक शिक्षणाचें

महत्त्वाचें उद्दिष्ट आहे. यासाठी वर उल्लेखिल्याप्रमाणे स्वतंत्र बुद्धीच्या विकासाचे व नवेनवे विचार ग्रहण करण्याच्या तयारीचें महत्त्व आहे. सुसूत्र व स्पष्ट विचार सुलभतेने बोलतां वा लिहितां येणें हेंहि त्याचेंच एक अंग आहे. लोकशाहींतील नागरिक आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असला पाहिजे. त्यासाठी औद्योगिक, तांत्रिक, व्यावसायिक, तसेंच शेतीच्या शिक्षणाची तरतूद माध्यमिक शिक्षणाने केली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या मनांत श्रमप्रतिष्ठेच्या भावनेची, श्रम करण्याच्या पात्रतेची व हौसेची निर्मिति केली पाहिजे.

## राष्ट्रीयत्वाची जोपासना :

भारताला प्राचीन संस्कृति व उज्ज्वल इतिहास असला तरी एकराष्ट्रीयत्वाची भावना ही तसें पाहिल्यास पाश्चात्य जगताचीच देणगी आहे. आज चिनी आक्रमणाच्या अचानक संकटामुळे राष्ट्रीय एकात्मतेचा अभूतपूर्व आविष्कार झालेला दिसत असला, तरी ती एकात्मता चिरस्थायी होण्यासाठी ज्या राष्ट्रीयत्वाची, प्रखर देशाभिमानाची आवश्यकता असते, त्याची जोपासना करणें हें शिक्षणाचें, विशेषतः माध्यमिक शिक्षणाचें महत्त्वाचें उद्दिष्ट आहे. ही राष्ट्रीयत्वाची भावना अंधश्रद्धेच्या स्वरूपाची मात्र नसावी. देशाच्या भूतकालीन ऐश्वर्याचा, संस्कृतीचा, परंपरेचा, उज्ज्वल इतिहासाचा योग्य अभिमान प्रत्येकाला असावा याबद्दल दुमत असणार नाही; पण भूतपूर्व मोठेपणाबरोबरच आपल्या राष्ट्रांतील उणीवांची, दोषांची, चुकीच्या व अन्याय्य रूढींची जाणीवहि असली पाहिजे. आपल्या राष्ट्राचें हित इतर राष्ट्रांच्या हिताशीं शक्यतितकें अविरोधी असावें. संकुचित राष्ट्रीयत्व आजच्या जगांत उपयोगी पडणार नाही व तसा संकुचितपणा बाळगतांहि येणार नाही. आंतरराष्ट्रीय राजकारण व संबंध यांचा तो अपरिहार्य परिणाम आहे. म्हणून निकोप, व्यापक राष्ट्रीयत्वाची भावना रुजविणें हें माध्यमिक शिक्षणाचें कर्तव्य ठरतें. हें कार्य प्राथमिक शिक्षणाच्या द्वारें प्रभावीपणें करता येणार नाही. कारण त्या वयांत सारासारविचार करण्याची कुवत विद्यार्थ्याच्या अंगीं नसते. पौगण्डावस्थेंत विद्यार्थी विभूतिपूजक बनतो व त्याच्या स्थिरभावांची जोपासना याच वेळीं होत असते. यामुळे माध्यमिक शिक्षणच हें कार्य करूं शकेल.

## नैतिक गुणांचा विकास :

दुसऱ्याच्या व्यक्तित्वाचा आदर करणें हें नीतिशास्त्राचें मूलभूत तत्त्व आहे व तेंच लोकशाही जीवनाचा आत्मा आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या अंगीं जितक्या प्रमाणांत समाजशीलता बाणेल तितक्या प्रमाणांत शिक्षणाची यशस्विता मोजावी लागेल. सहकार्य, शिस्त, सहिष्णुता, संयम, नेतृत्व व अनुयायित्व इत्यादि गुणांची

जोपासना माध्यमिक शिक्षणानेच केली पाहिजे; कारण पौगण्डावस्था हेंच या गुणांच्या विकासाला योग्य क्षेत्र होय. याच वयांत विद्यार्थी जास्तींत जास्त ध्येयवादी व अंतर्मुख बनलेला असतो.

## नेतृत्व :

वरील गुणांपैकीं नेतृत्वाचा विशेष विचार केला पाहिजे. माध्यमिक शिक्षण घेतलेले विद्यार्थी पुढे देशांतील दुय्यम दर्जाचें नेतृत्व पत्करतील व उच्च शिक्षण घेतलेले लोक देशाचे प्रथमश्रेणीचे नेते बनतील अशी सामान्यत: अपेक्षा केली जाते. याचा अर्थ असा नव्हे की, प्राथमिक शिक्षण घेतलेल्या व्यक्तींपैकीं कोणीहि अशी जबाबदारी स्वीकारूं शकणार नाही. आपल्या देशांत अनेक प्रकारें विकेन्द्रित लोकशाहीचा प्रयोग चालू आहे. त्यासाठी निरनिराळया पातळीवर पंचायत, तालुका, जिल्हा, राज्य इत्यादि-योग्य व नव्या नेतृत्वाची जरूरी निर्माण झाली आहे. नेतृत्वाची यशस्विता योग्य प्रकारच्या अनुयायित्वावर अवलंबून असते. म्हणून या दोन गुणांची जोपासना व विकास घडविणें हें माध्यमिक शिक्षणाचें आणखी एक महत्त्वाचें उद्दिष्ट आहे. सर्वसामान्य जनता व देशाचें उच्च पातळी-वरील नेतृत्व यांमधील दुवा जोडणारें दुय्यम दर्जाचें नेतृत्व माध्यमिक शिक्षणानें पुरवावें अशी अपेक्षा आहे. *

## माध्यमिक शिक्षण म्हणजे नक्की काय ?

आतापर्यंतच्या विवेचनावरुन माध्यमिक शिक्षणाचें नक्की स्वरूप लक्षांत येईलच. अमेरिकन सरकारने माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्घटनेसाठी नेमलेल्या एका समितीने माध्यमिक शिक्षणाची मोठी समर्पक व्याख्या केली आहे. समितीने म्हटलें आहे :

* "The small minority which goes beyond the secondary stage may provide the higher leadership, but if the purposes of that leadership are to be translated into effective programmes of work, there must be a large number of persons who have the requisite knowledge, training and character to carry them out. A few top leaders may initiate policy, but the execution of the policies will depend upon intermediate grades which have the knowledge and imagination to understand the objectives of the leadership. Secondary education can and ought to train this large body of intermediaries. They will be the executants of policy decisions taken at the highest level."—Page 40, Education in New India by Prof. Humayun Kabir.

"Secondary education denotes the education provided by schools for the purpose of guiding and promoting the development of normal individuals for whom on the one hand, the elementary school no longer constitutes a satisfactory environment and who on the other hand are either not prepared to participate effectively in society unguided by the school, or are not ready for the specialised work of the professional schools or the upper division of the liberal arts college."—(Committee on the Orientation of Secondary Education—Page 22, Bulletin No. 59, 'Issues of Secondary Education')

प्राथमिक शिक्षणाचें कार्यक्षेत्र ज्यांच्या बाबतींत पुरेसें व समाधानकारक राहिलेलें नसतें, पण प्रत्यक्ष जीवनाच्या आखाड्यांत शाळेच्या मदतीशिवाय उतरणें व वावरणें मात्र ज्यांना जमणार नाही किंवा विद्यापीठीय उच्च शिक्षण घेण्याची पात्रता ज्यांना अजून प्राप्त झालेली नाही अशा सर्वसाधारण मुलांच्या विकासाला मदत करणें व वळण लावणें यासाठी दिलें जाणारें शिक्षण म्हणजे माध्यमिक शिक्षण होय. वरील व्याख्येचा विशेष म्हणजे माध्यमिक शिक्षणाची मुदत इयत्ता किंवा वयाचीं वर्षें यांच्या कृत्रिम मर्यादेंत न सांगतां माध्यमिक शिक्षणाच्या कार्याच्या परिभाषेंत वर्णिली आहे. हें कार्य पूर्ण झाल्याची कसोटी कोणती तेंहि विशद केलें आहे. विद्यार्थ्याला शाळेच्या मदतीशिवाय धकाधकीच्या जीवनांत वावरतां आलें पाहिजे व ज्याची इच्छा आणि पात्रता असेल त्याला विद्यापीठीय शिक्षण घेणें सुलभ व्हावें एवढी पूर्वतयारी उपलब्ध झाली पाहिजे. माध्यमिक शिक्षणाचें महत्त्वाचें कार्य म्हणजे सर्वसाधारण व्यक्तीच्या विकासाला मदत करणें व वळण लावणें हें होय हेंहि निःसंदिग्धपणें सांगितलें गेलें आहे.

३

## माध्यमिक शिक्षणाची कालमर्यादा आणि व्यवस्था :

माध्यमिक शिक्षण ही शिक्षणांतील एक स्वतंत्र व वैशिष्टयपूर्ण अवस्था आहे व ती पूर्ण झाल्यावर व्यक्तीला जीवनाची जबाबदारी पत्करून आपला व्यवसाय यशस्वीपणें करतां यावा हें तत्त्व मान्य केल्यावर या शिक्षणाची कालमर्यादा

कोणती असावी हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो. सध्या भारतांत या बाबतींत कोणतीच एकवाक्यता दिसून येत नाही. निरनिराळ्या राज्यांत निरनिराळी व्यवस्था प्रचलित आहे. प्राथमिक शिक्षणाचा काळ कांही राज्यांत ५ वर्षांचा तर बऱ्याच राज्यांत ४ वर्षांचा आहे. पूर्वमाध्यमिक अवस्था ( Middle school stage) व माध्यमिक शिक्षणकाळ अनुक्रमें ३, ४ किंवा ५ आणि ४, ३ किंवा २ वर्षांचा असे आहेत. या भिन्नतेंतून मार्ग काढणें अत्यंत कठिण असल्यामुळे मुदलियार आयोगाच्या एतद्विषयक शिफारसी कांही अंशी मोघम आहेत असे प्रो. हुमायून कबीर यांनी आपल्या पुस्तकांत दाखवून दिलें आहे. *

वयाच्या ११ ते १७ व्या वर्षापर्यंत माध्यमिक शिक्षण देण्यांत यावें ही गोष्ट सामान्यपणें सर्वमान्य आहे. हा कालावधि वाढवून १८ वर्षापर्यंत नेण्याच्या सूचनेवर केन्द्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने (Central Advisory Board of Education) राज्यांचीं मतें मागविलीं होतीं. परंतु एकाहि राज्याने या सूचनेस संमति दर्शविली नाही; कारण वाढणाऱ्या एका वर्षामुळे त्यांच्या आर्थिक जबाबदारींतहि बरीच वाढ होणें अटळ होते. शिक्षक व पालक या दोघांचाहि या सूचनेस विरोध दिसून आला असें मुदलियार आयोगानेहि नमूद केलें आहे. या सात वर्षांच्या कालावधींत योग्य आंखणी करून पद्धतशीरपणें शिक्षण दिलें गेल्यास भावी आयुष्यासाठी पुरेशी शिदोरी विद्यार्थ्याला उपलब्ध करून देतां यावी. विश्वविद्यालयांत प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांजवळ सध्या आवश्यक गुणांचा व पूर्वतयारीचा अभाव असल्याचें आढळून येतें. त्यांच्या कमाईचा दर्जा बराच कमी असतो व हा दोष प्रचलित माध्यमिक शिक्षणामुळे निर्माण झालेला आहे. शिवाय, विद्यापीठांत प्रवेश करण्यापूर्वी विद्यार्थी पुरेसा प्रौढ व पक्वबुद्धीचा असणें जरूर आहे. सध्या १६ किंवा त्यापेक्षाहि कमी वयाचे, अपरिपक्व मानसिक अवस्थेंतील विद्यार्थी कॉलेजांत जातात व पुढील अभ्यासाच्या बोजामुळे त्यांची मोठ्या प्रमाणांत मानसिक हानि होते. या दृष्टीने पाहतां थोडा अधिक काल माध्यमिक शिक्षणासाठी खर्च होणें उच्च शिक्षण घेणाऱ्यास व न घेणाऱ्यासहि हितावह ठरेल. म्हणून मुदलियार आयोगाने हा काल एका वर्षाने वाढवून किमान ११ वर्षांचा करावा अशी योग्य सूचना केली आहे. कांही राज्यांत प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा काल १० वर्षांचाच आहे. मुदलियार आयोगाने उच्च शिक्षणांतील इंटरमीजिएट अवस्था नाहीशीं करून पदवी परीक्षेचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा करावा व कमी केलेलें वर्ष पदवीपूर्व अभ्यासाचें म्हणून माध्यमिक शिक्षणक्रमास जोडावें अशी सूचना केलेली आहे. त्यानुसार प्राथमिक तें उच्च शिक्षणाचा

* Page 66, Education in New India—Prof. Humayun Kabir.

कालावधि ४ (किंवा ५)–३–४–३ या सूत्रांत सांगतां येईल. पहिलीं चार वर्षें सक्तीचें प्राथमिक शिक्षण वयाच्या ११ व्या वर्षापर्यंत दिल्यानंतर पुढील तीन वर्षें उच्च प्राथमिक (upper primary) किंवा पूर्व माध्यमिक शिक्षण दिलें जावें. त्यानंतर चार वर्षांचें माध्यमिक शिक्षण राहील. यांतील चौथें वर्ष म्हणजे सध्याचें प्री-युनिव्हर्सिटी वर्ष किंवा हायर सेकंडरी शाळांतील ११ वीचें वर्ष होय.

वयाच्या ६ ते १४ वर्षापर्यंत सात वर्ष मुदतीचें मूलोद्योग शिक्षण सर्व प्राथमिक शाळांतून देण्यांत यावें असें भारत सरकारने ठरविलेलें आहे. सात वर्षांच्या माध्यमिक शिक्षणाची मुदलियार आयोगाची शिफारस या आदेशाशीं विसंगत वाटण्याचा संभव आहे, पण तें तसें नाही. इ. ५ ते ७ मध्ये दिलें जाणारे मूलोद्योग शिक्षण व मुदलियार आयोगाने सुचविलेलें पूर्व माध्यमिक शिक्षण यांचें स्वरूप फारसें वेगळें राहणार नाही. यासाठी मूलोद्योग शिक्षणाच्या आधारभूत तत्त्वांचा अंतर्भाव पूर्व माध्यमिक शिक्षणांत करावा आणि अशा रीतीने सीनियर बेसिक शाळा व इतर शाळा यांतील तफावत नाहीशी करावी अशी एक महत्त्वाची शिफारस मुदलियार आयोगाने केलेली आहे.

तात्पर्य, ४ किंवा ५ वर्षांच्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक शिक्षणाच्या दोन अवस्था राहतील: (१) पूर्व माध्यमिक किंवा उच्च प्राथमिक अवस्था–कालमर्यादा ३ वर्षें व (२) माध्यमिक अवस्था–कालमर्यादा ४ वर्षें. या तीनहि अवस्थांमध्ये पूर्ण एकात्मता असणें अवश्य आहे. घटनेनुसार सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा ६ ते १४ व्या वर्षापर्यंत वाढविली जाण्याची पुढे शक्यता असल्याने प्राथमिक शिक्षणाचीं चार वर्षें व पूर्व माध्यमिक शिक्षणाचीं तीन वर्षें यांचा एकसंघ, एकात्म घटक असणें आवश्यक ठरेल.

केन्द्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेचा सूक्ष्म विचार बरीच वर्षें करून इ. स. १९५५ च्या जानेवारींत खालील ठराव एकमताने संमत केला:

"माध्यमिक शिक्षणाची कालमर्यादा संपण्याच्या अवस्थेचा व विश्वविद्यालयांत प्रवेश देण्यासाठी आवश्यक असलेल्या पात्रतेचा अत्यंत काळजीपूर्वक विचार करून खालील निर्णय घेतला आहे—

(अ) पहिल्या पदवीचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असावा व विश्वविद्यालयांत प्रवेश देण्यासाठी किमान वय १७+ हें असावें.

(ब) १७+ या वर्षी संपणारें माध्यमिक शिक्षण म्हणजे शिक्षणांतील एक स्वयंपूर्ण टप्पा आहे व त्यांत जीवनासाठी आवश्यक असें शिक्षण विद्यार्थ्याला

मिळावें. तीन वर्षांच्या पदवी परीक्षेच्या अभ्यासक्रमाचा भार स्वीकारण्याइतकी पात्रता त्याच्या ठिकाणीं निर्माण होईल असा त्या शिक्षणाचा दर्जा असावा.

(क) हा हेतु सफल होण्याच्या दृष्टीनें शालान्त परीक्षेचा एकसूत्र (Integrated) अभ्यासक्रम आंखण्यासाठी एका समितीची नेमणूक करण्याबद्दल भारत सरकारला विनंती करावी.

(ड) माध्यमिक अवस्थेंतील शेवटच्या वर्गाला अकरावा वर्ग असें संबोधावें आणि १० वर्षांपेक्षा कमी नसलेल्या मुदतीचें शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतरच त्या वर्गांत प्रवेश मिळावा. निरनिराळ्या राज्यांत (११ वी पूर्वीच्या) शालेय शिक्षणाची मुदत किती असावी हें त्या त्या सरकारांनी ठरवावें."

विद्यापीठ कुलगुरूंच्या व माध्यमिक शिक्षणमंडळांच्या अध्यक्षांच्या त्याच सालीं नव्या दिल्लींत भरलेल्या परिषदेंत याच आशयाचा ठराव संमत करण्यांत आला व त्यावर आंतर विद्यापीठ मंडळानें (Inter University Board) शिक्कामोर्तब केलें. अशा रीतीनें माध्यमिक शिक्षणाचा सर्वसामान्य सांचा व पहिल्या पदवीपरीक्षेचा कालावधि या बिकट प्रश्नावर सन १९५५ मध्ये प्रथमतःच एकमत झालें व तत्संबंधीं वादावर अखेरचा पडदा पडला.

## सुधारलेल्या जगांत–इंग्लंड :

वरील बाबतींत जगांतील प्रमुख राष्ट्रांत कोणती व्यवस्था प्रचलित आहे हें पाहणें उद्‌बोधक ठरेल. सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा व माध्यमिक शिक्षणाचा कालावधि वाढविण्याकडे कल दिसून येतो. माध्यमिक शिक्षण अधिक कसदार व्हावें हा त्यामागील हेतु आहे. बऱ्याच युरोपीय राष्ट्रांत माध्यमिक शिक्षण संपण्याचा काल वयाचें १८ वें वर्ष हा आहे. इंग्लंडमध्ये ३ वर्षांच्या पूर्वप्राथमिक शिक्षणानंतर वयाच्या ५ व्या वर्षापासून ११ + या वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण दिलें जातें. त्यानंतर विद्यार्थ्यांचा कल, प्रवृत्ति, कुवत इत्यादि पाहून त्याला योग्य प्रकारच्या माध्यमिक शाळेंत दाखल करण्यांत येतें. माध्यमिक शाळांचे ग्रामर स्कूल, मॉडर्न स्कूल, टेक्‌निकल् स्कूल, संकलित (Comprehensive) किंवा बहु–उद्देशीय (Multilateral) शाळा, डायरेक्ट ग्रँड स्कूल, धर्मपंथांच्या खाजगी शाळा इत्यादि प्रकार आहेत. शिवाय सुप्रसिद्ध पब्लिक स्कूलस हींहि माध्यमिक शिक्षणाचेंच कार्य करतात. माध्यमिक शिक्षणांतील चार वर्षांचें शिक्षण सक्तीचें आहे. त्यानंतर ५ व्या वर्षाच्या अखेरीस एक कनिष्ठ दर्जाची व ७ व्या वर्षाच्या अखेरीस एक उच्च दर्जाची अशा दोन परीक्षा घेतल्या जातात. म्हणजेच वयाच्या १९ व्या वर्षी विद्यार्थी युनिव्हर्सिटीमध्ये

किंवा तत्सम संस्थेंत उच्चशिक्षण घेण्यासाठी जातो. तेथील शिक्षणव्यवस्थेचें सूत्र थोडक्यांत असें सांगतां येईल.

पूव प्राथमिक → प्राथमिक → माध्यमिक → पुढील शिक्षण → उच्चशिक्षण

(Further Edn.)

↓ ३ वर्षें ↓ ७ वर्षें ↓ ४ वर्षें ↓ ३ वर्षें ↓ ४ ते ६ वर्षें

## अमेरिका :

लोकशाही जीवननिष्ठेला अनुसरून अमेरिकेंतील शिक्षणाचीं सूत्रें लोकांच्या ताब्यांत आहेत व त्यामुळे वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळी व्यवस्था प्रचलित आहे. तथापि सामान्यपणें बालोद्यान पद्धतीच्या पूर्वप्राथमिक अवस्थेपासून ज्युनियर कॉलेजच्या दोन वर्षांच्या अखेरीपर्यंत १५ वर्षांचा शिक्षणक्रम प्रचलित आहे. अलीकडील विचारसरणीप्रमाणे ज्युनिअर कॉलेज उच्च माध्यमिक शिक्षणाचाच भाग समजण्यांत येतो. हा शिक्षणक्रम वयाच्या ५ ते २० वर्षांपर्यंत साधारणपणें संपतो. यांतील वय वर्षें ७ ते १६ (कांही राज्यांत ६ पासून तर कांहींत ८ पासून) सक्तीच्या शिक्षणाचीं आहेत. ही मर्यादा कांही राज्यांनी १८ पर्यंत वाढविली आहे. प्राथमिक शिक्षण ६, ७ किंवा ८ वर्षांच्या मुदतीचें आहे, तर माध्यमिक शिक्षण ४ किंवा ६ वर्षांचें आहे. हा क्रम पुढीलप्रमाणे आहे :—

पू० प्राथ०— प्राथमिक— ज्युनि० हायस्कूल— सीनीयर हाय० ज्यु० कॉलेज

वर्षें २ > — ६ → — ३ → ३ > २ → उच्च शिक्षण

> — ८ ——→ — ४ — — >

## रशिया :

राज्यक्रांतीनंतर सन १९१८ सालीं रूढ करण्यांत आलेल्या शैक्षणिक व्यवस्थेनुसार ४ वर्षें मुदतीचें प्राथमिक शिक्षण वयाच्या ७ ते ११ वर्षांपर्यंत दिलें जातें. हें प्राथमिक शिक्षण व तीन वर्षांचें माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांना अपूर्ण माध्यमिक शाळा (Incomplete secondary schools) असें म्हणतात व त्या वयाच्या ७ ते १४ वर्षांपर्यंतच्या मुलांना शिक्षण देतात. पहिल्या प्रकारच्या शाळा खेड्यांत, तर या शाळा लहानसहान शहरांत असतात. याच्यापुढे आणखी दोन वर्षें माध्यमिक शिक्षण देणाऱ्या म्हणजे एकूण नऊ वर्षांच्या शिक्षणक्रमाच्या शाळांना पूर्ण माध्यमिक शाळा म्हणतात. हा शिक्षणक्रम १६ व्या वर्षी

पूर्ण होत असे. सन १९३१ मध्ये हा ९ वर्षांचा शिक्षणक्रम एका वर्षाने वाढवून १० वर्षांचा करण्यांत आला. याचा हेतु उच्च शिक्षणसंस्थेंत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची अधिक चांगली तयारी करून घेणें हा होता. रशियांतील माध्यमिक शिक्षणांत तांत्रिक शाळा (technicums) व इतर विशेष प्रकारच्या शाळांचाहि समावेश होतो. सक्तीच्या शिक्षणाची मुदत ८ वर्षांच्या शालेय शिक्षणाची म्हणजे वयाच्या सातव्या वर्षापासून १५ व्या वर्षापर्यंतची आहे.

वरील तीन देशांच्या उदाहरणांवरून असें दिसून येईल की उच्च राहणीमान असलेल्या देशांत माध्यमिक शिक्षणाचा कालावधि वाढविण्याची प्रवृत्ति आहे. भारतांत ही मर्यादा १७+ पेक्षा अधिक वाढविण्यास सर्वांचा विरोध आहे. याचें मुख्य कारण आर्थिक आहे. शिवाय तुलनेने पाहतां भारतांतील आयुर्मर्यादा कमी आहे व उष्ण कटिबंधामुळे प्रौढत्वहि लवकर प्राप्त होत असावें. या दृष्टीने १७+ ही माध्यमिक शिक्षण संपण्याची मर्यादा ठरविण्यांत आली आहे हें योग्यच आहे.

४

## माध्यमिक शिक्षणसंस्था :

वरील विवेचनांत दिग्दर्शित केलेलें नव्या स्वरूपाचें माध्यमिक शिक्षण देण्यासाठी स्थापन करण्यांत आलेल्या नव्या शिक्षणसंस्थांचा विचार करणें आता क्रमप्राप्त आहे. माध्यमिक शिक्षणाचे दोन विभाग आहेत. दोन प्रकारच्या संस्था पूर्वमाध्यमिक (middle) शिक्षण देतात. (१) उच्च प्राथमिक (upper primary किंवा senior basic) या शाळा पूर्ण प्राथमिक शाळांचाच वरचा भाग होय. (२) पूर्व माध्यमिक (Middle schools). या शाळा कांही ठिकाणीं स्वतंत्र तर कांही ठिकाणीं पूर्व माध्यमिक शाळांतील खालचे म्हणजे इ० ५ ते ७ हे वर्ग समजल्या जातात. या दोहोंच्या स्वरूपांत एकसूत्रीपणा आणण्या-संबंधी विवेचन वर केलेंच आहे.

## उच्च माध्यमिक शाळा (Higher Secondary School) :

सध्या माध्यमिक शाळाहि दोन प्रकारच्या आहेत. साध्या व उच्च माध्यमिक. पहिल्या प्रकारांतील कांही शाळा तीन वर्षांच्या अभ्यासानंतर (इ० ८ ते १०) मुलांना शालान्त (लोअर मॅट्रिक) परीक्षेला बसवितात. विदर्भ व मराठवाड्यां-तील बहुसंख्य शाळा या प्रकारच्या आहेत. पश्चिम महाराष्ट्रांत इ० ८ ते ११

अखेर ४ वर्षांच्या अभ्यासानंतर मुलांना शालान्त परीक्षेला बसतां येतें. या दोन्ही परीक्षा समकक्ष आहेत व त्या उत्तीर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना प्री-युनिव्हर्सिटी वर्गांत दाखल व्हावें लागतें. दुसरा प्रकार उच्च माध्यमिक शाळांचा होय. या शाळा मुदलियार आयोगाच्या शिफारसींनुसार स्थापन करण्यांत आल्या आहेत. यांत उच्च शिक्षणांतील पूर्वीचें पहिलें वर्ष समाविष्ट करण्यांत आलें आहे. हें अकरावें वर्ष पूर्ण करून हायर मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याला तीन बर्षाच्या पदवी परीक्षेच्या प्रथम वर्षांत एकदम प्रवेश मिळूं शकतो.

सर्व साध्या माध्यमिक शाळांचें रूपांतर यथावकाश उच्च माध्यमिक शाळांत करण्याचें ध्येय मुदलीयार आयोगानें ठरविलें आहे. अर्थात् हें एकदम होणें शक्य नाही. उत्तम पात्रता असलेले व काळजीपूर्वक निवडलेले शिक्षक उत्कृष्ट साधन-सामुग्री, प्रयोगशाळा व वाचनालयें यांची चांगली सोय, अभ्यासक्रमबाह्य इतर कार्यक्रमांचें यथायोग्य आयोजन इत्यादि सुधारणा झाल्या तरच अशा रूपांतराला परवानगी द्यावी असें ठरविण्यांत आलें आहे.

## बहु-उद्देशीय शाळा ( Multi-purpose schools ) :

सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा वाढविण्यामुळे माध्यमिक शिक्षण घेणाऱ्यांचीहि संख्या उत्तरोत्तर वाढतच जाणार हें उघड आहे. तसेंच, वैयक्तिक भिन्नतेच्या सिद्धान्तानुसार एकमार्गी ( Single-track ) शाळा फारशा उपयुक्त ठरणार नाहीत. म्हणून अभ्यासक्रमांत वैकल्पिक विषयांची विविधता असणें अत्यंत आवश्यक आहे. यासाठी विविध विषयांचा समावेश असलेल्या अभ्यासक्रमाची सोय करणाऱ्या बहु-उद्देशीय उच्च माध्यमिक शाळांची स्थापना करण्याची शिफारस मुदलीयार आयोगानें केली. अशा शाळांमुळे मुख्यत: खालील फायदे होतील अशी अपेक्षा आहे :--

(१) व्यावसायिक व औद्योगिक विषयांना परंपरागत विषयांच्या तुलनेनें देण्यांत येणारा कमीपणा नाहीसा होईल व सर्व प्रकारच्या अभ्यासक्रमांना समान दर्जा व प्रतिष्ठा (Parity of esteem) प्राप्त होईल.

(२) वैयक्तिक आवड व कुवत यांना अनुसरून विषयांची निवड करणें शक्य होईल व योग्य शैक्षणिक मार्गदर्शन करणेंहि सुलभ होईल.

(३) एकाच शाळेंत अनेक विभाग असल्यानें एखाद्या विभागांत चुकीनें दाखल झालेला किंवा अयोग्य ठरलेला विद्यार्थी दुसऱ्या योग्य विभागांत सहजपणें दाखल होऊं शकेल.

(४) एकाच मोठ्या शाळेमुळे समाजांतील वर्गभेद नाहीसे होण्यास मदत होईल. तसेंच समान शैक्षणिक संधीचें तत्त्व अंमलांत आणणें सुकर होईल.

(५) राष्ट्राच्या औद्योगिक, तांत्रिक व शेतीविषयक योजनांना लागणारे दुय्यम दर्जाचे तंत्रज्ञ व कुशल कामगार उपलब्ध होतील.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत ३७४ साध्या माध्यमिक शाळांचें रूपांतर बहु-उद्देशीय शाळांत करण्यांत आलें व स. १९६१ पर्यंत ही संख्या २११५ झाली आहे. महाराष्ट्रांत या शाळांचे दोन प्रकार प्रचलित आहेत. विदर्भ आणि मराठवाड्यांतील बहु-उद्देशीय शाळा उच्च माध्यमिक आहेत, तर पश्चिम महाराष्ट्रामध्ये बहु-उद्देशीय असूनहि साध्या माध्यमिक शाळा आहेत.

## इंग्लंड-अमेरिकेंतील बहु-उद्देशीय शाळा :

असल्या विविधोद्देशी शाळांची स्थापना प्रथमतः अमेरिकेंत व नंतर इंग्लंडमध्ये करण्यांत आली व त्यामागे वर दिलेले हेतूच होते. अशा शाळा (Comprehenesive schools) सर्व मुलांना खुल्या असतात. अभ्यासक्रमाचें केंद्र (core) म्हणून कांही विशिष्ट विषय सर्वांनाच अभ्यासावे लागतात. शिवाय, मुलांनी स्वतःची इच्छा, अभिरुचि व शक्तीप्रमाणे निवडलेल्या वैकल्पिक विषयांच्या अध्यापनाचे वर्ग उघडण्यांत आलेले असतात.* वैयक्तिक भिन्नता व समान शैक्षणिक संधि या तत्त्वांच्या संदर्भानें सरकारवर पडणाऱ्या जबाबदारीची जाणीव इ. स. १९२० च्या सुमारासच इंग्लंडमध्ये दिसून आली.†

फ्रान्स या लोकशाहीच्या जन्मभूमींतहि हीच जाणीव अनेकदा व्यक्त झाली आहे. व्यक्तीच्या कल्याणाच्या दृष्टीने, तसेंच समष्टीच्या हितासाठी योग्य व्यक्तीला

---

* (The Comprehensive School) "Caters for all children through a system based on a central core of subjects common to all, from which branch classes in specialised subjects taken according to the desires, aptitudes and capacities of the children." —A policy for Secondary Education Page 262, New Era in Education—Kandel.

† (The Central task of the educational administrator was) "To enable the right pupils to receive the right education from the right teachers, at a cost within the means of the state, under conditions which will enable the pupils best to profit by their training."—Sir Graham Baltour. (1920)—Page 92, New Era in Education—I. L. Kandel.

योग्य असें शिक्षण देऊन त्याचा विकास घडवून आणणें अवश्य आहे; सामाजिक न्यायासाठी तरी प्रत्येकाला आपला विकास करून घेण्याची योग्य संधि मिळाली पाहिजे असें मत फ्रेंच शिक्षणमंत्र्यांनी इ. स. १९३७ मध्ये व्यक्त केलें होतें. *

परंतु हें कार्य सोपें मात्र नव्हे. वैयक्तिक भिन्नतेमुळे अभ्यासक्रम बहुशाखी असावा हें खरें; पण इंग्लंड-अमेरिकेंत बराच चर्चिला गेलेला एतद्विषयक प्रश्न म्हणजे अशा प्रत्येक शाखेचें स्वतंत्र विद्यालय असावें की एकच समावेशक (Comprehensive) व व्यापक संस्था असावी हा होय. वर उल्लेखिलेल्या सामाजिक कारणांसाठी दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे बहु-उद्देशीय शाळांना पसंती देण्यांत आली. दुसरा प्रश्न सर्वसामान्य अभ्यासक्रम कोणत्या वयोमर्यादेपर्यंत असावा व निरनिराळ्या शाखांचा विशेष अभ्यास केव्हापासून सुरू करावा हा होय. इंग्लंडमध्ये ११ + नंतर हें वर्गीकरण ( bifurcation किंवा differentiation ) करण्यांत येतें. संकलित-प्रगति-पत्रक (cumulative record card), शिक्षक व पालक यांचीं मतें व वस्तुनिष्ठ आणि बौद्धिक चांचण्या यांच्या आधारावर असें वर्गीकरण करतात. विद्यार्थ्यांची अशी विभागणी करण्याच्या या पद्धतीवर पुष्कळच आक्षेप घेण्यांत आले आहेत. बुद्धयंकामध्ये सुधारणा घडविणें विशेष प्रकारचें शिक्षण देऊन शक्य असतें, त्यामुळे ही निवड १०० टक्के शास्त्रशुद्ध आहे असें मानतां येत नाही. ११ + इतक्या लहान वयांत अशा प्रकाराने निवड किंवा विभागणी करणें शक्य होणार नाही असाहि आक्षेप घेतां येतो.† खरी वस्तुस्थिति अशी आहे की वरील मार्गाने मुलांच्या मानसिक शक्तीसंबंधीं केवळ ठोकळ मानाचे अंदाजच बांधतां येतात. म्हणून या शाळांच्या प्रयोगांत शास्त्रशुद्ध अशा शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता आहे.

---

* "This has always impressed itself upon the attention of educators—to place the individual who is appropriate in the position appropriate to him is not only a condition of well being for the individual and guarantee of stability for society. It is also demanded by social justice"—M. Jean Zay, French Minister of Education, 1937. (Page 93, New Era in Education—Kandel.)

† "Doubt was thrown on the use of intelligence tests for this purpose (of selection) on the grounds that the I. Q. was not stable and that it could be raised by coaching, an advantage not enjoyed equally by all pupils. It was doubted in fact, by the critics whether an accurate selection could be made at all at the age of eleven plus."—Page 261, New Era in Education—I. L. Kandel.

आपल्या देशांत स्थापन करण्यांत आलेल्या बहु-उद्देशीय शाळांतील मुलांची भरती व विभागणी कोणत्याच प्रकारच्या शास्त्रशुद्ध पायावर होत नाही. त्यामुळे अंगीं पात्रता नसतांना भलताच अभ्यासक्रम अंगिकारल्यामुळे अपयश प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या प्रमाणाने बरीच असणार हें उघड आहे. पालकाची इच्छा व आर्थिक स्थिति हीच या बाबतींतील सध्याची कसोटी असावी.

अमेरिकन व इंग्लिश बहुउद्देशीय शाळांच्या प्रयोगाची काय फलश्रुति झाली हें पाहणें उद्बोधक ठरेल. अशा शाळांचे वर दिलेले फायदे प्रत्यक्षांत फारच अल्पप्रमाणांत हातीं लागले अशी अमेरिकन शाळांवर टीका करण्यांत आली आहे. "या शाळांच्या पुरस्कर्त्यांनी केलेले युक्तिवाद एकतर राजकीय किंवा सामाजिक दृष्टिकोनांतून मांडलेले आहेत किंवा पोथीनिष्ट बनून अमेरिकेतील अनुभव जमेस न धरतां केलेले आहेत. समाजांतील वर्गभेद नाहीसा करण्यास किंवा सुसंस्कृत, उत्तम व्यक्तींची निर्मिती करण्यांत या शाळांना अपयश आलेलें आहे. मुलांच्या सामाजिक दर्जामुळे शाळांच्या कार्यक्रमांवर जो मोठा प्रभाव पडतो, त्याला या शाळा कांहीहि प्रतिबंध करूं शकलेल्या नाहीत. समाजांतील वर्गभेद त्या कितपत दूर करूं शकतील याविषयी शंकाच आहे, पण या प्रयोगामुळे योग्य मुलाला योग्य शिक्षण मिळणें मात्र दुर्घट होतें असा अमेरिकेचा अनुभव आहे"* अशा प्रकारच्या शाळा अतिशय बुद्धिमान, त्याचप्रमाणे अतिमंद अशा विद्यार्थ्यांचा कोणताच फायदा करूं शकत नाहीत. त्यांचा सर्व कार्यक्रम सर्वसाधारणांकरिताच

---

* "The arguments in favour of the comprehensive secondary school are inspired by social and political motives or are doctrinaire assumptions based on unverified information about the American high schools. The failure of these high schools to achieve any of the results that are claimed from the single school whether in promoting common understanding between different social groups or in providing a preparation for an elite is ignored. There is no reference to the studies that show how strongly the activities of the high school are affected by the social origins of the pupils. Finally, the influences that determine social, political and economic attitudes after school days are over are omitted from consideration whether the effect of subsequent social stratification can be offset by educating all the children of all the classes in the same school is doubtful, but that the attempt would be made at a sacrifice of the right education for the right pupil is indicated by the American experience."—Page 112, 'The New Era in Education'—I. L. Kandel.

असतो. तल्लख विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची कांहीच विशेष सोय होत नसल्याने राष्ट्राचें त्या प्रमाणांत नुकसान होतें असें म्हणावें लागेल * कारण या शाळांवर अवाढव्य खर्च होऊनहि सरासरी निम्म्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने त्या परिणामकारक ठरत नाहीत.

भारताच्या दृष्टीने हा अनुभव बोलका आहे. सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. सैय्यद्दीन यांनी या संबंधांत स्पष्टपणें लिहिलें आहे :--

"A large number of problems have arisen due to the shortage of equipment, staff, instructional materials etc. I know that there are many multi-purpose schools offering, say, the technical and agriculture streams without adequately qualified teachers to take charge of these subjects. Even where a variety of courses is offered with good teachers, the absence of provision for educational and vocational guidance makes the scheme ineffective. The establishment of the new recognised multi-purpose schools with diversified courses, has brought in its train these and many other problems which are not easy of solution but have to be tackled with care and understanding."—(Page 176, Problems of Educational Reconstruction—K. G. Saiyidain.)

श्री. सैय्यद्दीन यांचें वरील निदान अचूक व पुरेसें मार्गदर्शक आहे. बहुउद्देशीय शाळा हें योग्य दिशेने उचललेलें पाऊल आहे यांत संशय नाही; पण त्या योजनेंतील दोषांचा काळजीपूर्वक विचार करून त्यांच्या निर्मूलनाचा आटोकाट प्रयत्न निष्ठापूर्वक करणें मात्र अवश्य आहे.

---

* There has, in fact, been abelated recognition in the United States that the comprehensive school is 'too fast for the slow and too slow for the fast', that it caters to the average, and that the needs of the gifted and dull pupils are not being met"—Page 113, The New Era in Education—I. L. Kandel.

## पब्लिक स्कूल :

खरें पाहिलें असतां पब्लिक स्कूल हें नांव अर्थशून्य आहे; कारण सर्व देशांत सरकारी शाळांना पब्लिक किंवा सार्वजनिक शाळा असें म्हणतात. पण पब्लिक स्कूल या खास नांवानें ओळखल्या जाणाऱ्या संस्था एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने स्थापन केलेल्या खाजगी माध्यमिक शाळा असतात. त्या वसतिगृहयुक्त असतात व राहणीचा आणि फीचा खर्च भरमसाट असल्यामुळे त्यांत शिक्षण घेऊं शकणारीं मुलें फक्त श्रीमंत वर्गांतीलच असतात. उत्कृष्ट साधनसामुग्री, तज्ज्ञशिक्षक, खेळांच्या सोयी, उत्तम इमारती, सुखसोयीने युक्त अशीं वसतिगृहें, अभ्यासक्रमबाह्य कार्यक्रमांचें सुंदर आयोजन वगैरेमुळे अशा शाळांत नागरिकत्वाचें शिक्षण, नेतृत्वाची जोपासना व विविध शैक्षणिक प्रयोगाला उपयुक्त वातावरण हीं वैशिष्टचें आढळून येतात.

इंग्लंडमधील ईटन, हॅरो, रुग्बी इत्यादि ठिकाणच्या नऊ सुप्रसिद्ध पब्लिक स्कूलसच्या धर्तीवर या शाळांची स्थापना भारतांतहि करण्यांत आली. बडेबडे संस्थानिक, सरदार-जहागिरदार, सनदी नोकर वगैरे धनिक लोकांच्या मुलांसाठी खास शिक्षण मिळण्याची सोय करावी हा त्यामागील हेतु होता. इंग्लंडमध्ये वरील नऊ पब्लिक स्कूलसशिवाय इतर तत्सम संस्था अस्तित्वांत आल्या आहेत. अशा खाजगी पब्लिक स्कूलसची संख्या सुमारें २०० आहे. यांपैकीं कांहींची सरकारी अधिकाऱ्यांकडून तपासणीहि होते. इ. स. १९४४ च्या कायद्याने अशा खाजगी शाळांच्या स्थापनेला परवानगी आहे.

इंग्लंडमध्ये व भारतांतहि अशा शाळांवर खूपच टीका करण्यांत आली आहे. पहिला महत्त्वाचा आक्षेप म्हणजे लोकशाहीच्या काळांत त्या कालबाह्य आहेत; कारण त्या धनिक आणि वरचे समजले जाणारे वर्ग यांच्या शिक्षणाचीच सोय करतात. एका दृष्टीने ही गोष्ट कांही अंशीं खरीच आहे. इंग्लंडमधील अशा शाळांची वार्षिक फी १७५ पौंडांपासून ते ३०० पौंडांपर्यंत ( सुमारें २००० ते ४००० रु. ) आहे. सर्वसामान्य माणसाला ही प्रचंड फी देणें कधीच परवडणार नाही. भारतांतील अशा शाळांची फी देखील दर वर्षास ९०० ते २००० रु. आहे. या शाळांनी देशाच्या प्रगतींत फारशी भर घातलेली नाही असाहि एक आक्षेप घेण्यांत येतो. तो भारताच्या बाबतींत खरा असला, तरी इंग्लंडच्या बाबतींत मात्र तसें मुळींच म्हणतां येणार नाही. त्या देशाला अशा शाळांनी शतकानुशतकें उत्कृष्ट दर्जाचें नेतृत्व पुरविलेलें आहे. एवढेंच नव्हे, तर टीकाकारांचा असा आक्षेप आहे की खास हक्क असलेल्या शासकांचा एक वर्ग त्यांनी निर्माण करून

ठेवला.* भारतांतील टीकाकारांचें म्हणणें असें आहे की, भारतीय राज्यघटनेचा उद्देश वर्गविरहित समाजाची स्थापना करणें हा आहे व या शाळांमुळे एक निराळा मूठभर भाग्यवंतांचा वर्ग निर्माण होत असल्यामुळे त्यांची स्थापना करणें घटनेला धरून होणार नाही. या शाळांत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जीवनसंग्रामांत अधिक सवलती व पुढचें खास स्थान मिळतें व त्यामुळे धनिकांशिवाय इतर वर्ग कायमचेच मागे राहणार. म्हणून अशा शाळांची स्थापना मुळींच करूं नये. वरील टीकेंत तथ्य आहे हें नाकबूल करतां येणार नाही. पब्लिक स्कूलमधील शिक्षण फार खर्चाचें असतें व तें तसेंच असणार हेंहि उघड आहे. त्याचा फायदा केवळ धनिकांनाच मिळूं नये म्हणून सर्व खर्चाची जबाबदारी इंग्लंडमधील सरकारहि उचलूं शकलें नाही, तर भारतांत तें कसें शक्य होणार? हें एक दुष्टचक्र आहे व त्यांतून बाहेर पडणें दुर्घट आहे.

परंतु या प्रश्नाला दुसरीहि एक बाजू आहे. भारतांतील सध्याच्या माध्यमिक शाळांपैकीं बहुसंख्य शाळा ज्ञानाचीं घाऊक व किरकोळ दुकानेंच बनलीं आहेत असें म्हणणें विशेष धाडसाचें होणार नाही. समाजशीलता, नेतृत्व, शील, खेळाडूपणा, स्वावलंबन इत्यादि गुणांची जोपासना करण्यासारखी परिस्थिति त्या शाळांत उपलब्ध असल्याचें दिसत नाही. या अत्यावश्यक गुणांच्या वाढीला पब्लिक स्कूलचें वातावरण पोषक असतें हें टीकाकारांनाहि कबूल करावें लागेल. सर जॉन सार्जंट यांनी पब्लिक स्कूलमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांबद्दल त्यांचे दोष मान्य करून म्हटलें आहे—"The product of the public school may be limited in its intelectual range, narrow in its sympathies, and arrogant in its assumptions, but at the same time it displays a capacity to set up, and abide by standards of conduct, and a readiness to accept responsibility, qualities which must form an essential part of the equipment of any real public servant."†

* "In the movement for secondary education for all, the Public Schools have been attacked as the bastions of privilege. It was charged that those who attend the best of them constitute a clique which retains control of the country's affair-spolitical, social and economic—in its hands and that they represent the worst form of segregation and class stratification."—Page 270—The New Era in Education—Kandel.

† Page 50, "Report of the Secondary Education Commission."

अनुक्रम ...... क्रमांक ........ दि: ...
क्रमांक .......... नों. दि.

तात्पर्य, वरील फायद्यांसाठी इतर संस्थांना आदर्श म्हणून मर्यादित प्रमाणांत का होईना, अशा शाळांचें अस्तित्व आवश्यक आहे. शिवाय वर बहु-उद्देशीय शाळांची चर्चा करतांना आपणांस दिसून आलें आहे की विशेष बुद्धिमान् (gifted) विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय मुद्दाम करणें राष्ट्राच्या हिताचें ठरणार आहे. लोकशाहीच्या ब्रीदाशीं हें विसंगत आहे असें मानण्याचें कारण नाही. लोकशाही म्हणजे सर्वांना समान अशा खालच्या पातळीवर आणणें नव्हें, तर प्रत्येकाला त्याच्या महत्त्वाकांक्षेला व परिश्रमाला अनुसरुन जें स्थान मिळणें जरूर आहे त्याच्या प्राप्तींत येणाऱ्या अडचणींचा निरास करून त्याला वर येण्यास मदत करणारी राजकीय व सामाजिक स्थिति होय.* म्हणून अत्यंत बुद्धिमान् अशा विद्यार्थ्यांची खास व्यवस्था करण्यासाठी तरी पब्लिक स्कूलसारख्या शाळांची स्थापना करणें इष्ट ठरेल.

मग यांतून मार्ग कोणता? इ. स. १९४२ मध्ये इंग्लंडमधील शिक्षण-मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष श्री. आर्. ए. बटलर यांनी लॉर्ड फ्लेमिंग यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने पुढील मार्ग सुचविला–'**अशा शाळांतील प्रवेश पालकांच्या आर्थिक स्थितीवर अवलंबून न ठेवतां विद्यार्थ्यांची वैयक्तिक पात्रता पाहूनच द्यावा.** यासाठी दोन प्रकारच्या सोयी कराव्यात. शिक्षणमंडळाने स्वतःच्या कांही शिष्यवृत्त्या निवडक विद्यार्थ्यांसाठी ठेवाव्यात व स्थानिक शिक्षण शासनाने (Local Education Authority) कांही नादाऱ्यांची सोय करावी.'

वैयक्तिक पात्रतेवरच अशा शाळांत प्रवेश देण्याचें तत्त्व सर्वमान्यच आहे; पण त्याच्या अंमलबजावणींत दोन प्रमुख अडचणी आहेत : एक आर्थिक जबाबदारीची व दुसरी विद्यार्थ्यांची वैयक्तिक पात्रता ठरविण्याची. दोन्हींतून मार्ग काढणें अत्यंत कठीण आहे; तथापि कांहीतरी मार्ग काढल्याशिवाय मात्र इलाज नाही. अशाच प्रकारच्या सैनिकी शाळांची थोडीबहुत जबाबदारी सरकारने नादाऱ्यांच्या स्वरूपांत स्वीकारली आहेच. तशीच पब्लिक स्कूलमध्ये नादाऱ्या किंवा शिष्यवृत्त्यांच्या स्वरूपांत स्वीकारणें हितावह ठरेल. तसेंच, शक्य त्या सर्व उपायांचा अवलंब करून खरेखुरे तल्लख बुद्धीचे विद्यार्थी शोधून काढून त्यांच्या खास शिक्षणाची सोय अशा शाळांतून केली पाहिजे. शिवाय प्रा. हुमायून कबीर

* "Democracy is not the regime which reduces all men to the same level and to the lowest level; it is a regime which allows every child to rise without ever encountering any obstacles to the point where his labour and ambition will lead him."—Edward Herriot—Page 112, The New Era in Education—I. L. Kandel.

यांनी सुचविलेल्या पुढील सुधारणा अमलांत आणल्यास पब्लिक स्कूल योजनेंतील बरेच दोष नाहीसे होऊन त्यांचा राष्ट्राला फायदा होईल :

(१) पब्लिक स्कूलची घडण भारतीय जीवनाशीं मिळतीजुळती असली पाहिजे. सध्या त्यांच्यापुढे इंग्रजी आदर्श आहे. त्याऐवजी भारतीय संस्कृतीशीं जुळणारा आदर्श व सांचा स्वीकारावा.

(२) प्रत्येक पब्लिक स्कूल म्हणजे स्वतंत्र अस्तित्वाची शिक्षणपद्धति असें असता कामा नये. एकंदर भारतीय शिक्षणपद्धतीचें एक अंग असेंच त्याचें स्वरूप असावें.

(३) पब्लिक स्कूलच्या खर्चाचें प्रमाण शक्यतितकें कमी करण्यांत यावें. सरकारी मदत, देणग्या व विद्यार्थ्यांचें उत्पादनक्षम कार्य (Productive labour) या मार्गानें हें कांही प्रमाणांत शक्य होईल.

(४) समान शैक्षणिक संधीचें तत्त्व जास्तींत जास्त प्रमाणांत अवलंबिण्यांत यावें. त्यासाठी वैयक्तिक पात्रता हीच प्रवेशाची कसोटी मानली जावी.

(५) वसतिगृहयुक्त शाळांची (residential schools) संख्या शक्य तितकी अधिक वाढवावी व पब्लिक स्कूलमधील शक्य तेवढी चांगली वैशिष्टयें त्यांत आणण्याचा प्रयत्न करावा.

वरील सूचना अमलांत आणणें आर्थिक सुस्थितीवर अवलंबून आहे व त्या दृष्टीने हा प्रश्न अनुत्तरित समजावा लागेल.

माध्यमिक शिक्षणाच्या पुनर्रचनेचा सांगोपांग विचार करावयाचा म्हटल्यास वरील विवेचनाशिवाय शिक्षणाचें माध्यम व भाषिक प्रश्न, बेशिस्त, धार्मिक शिक्षण शिक्षकांचें प्रशिक्षण, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण, शारीरिक शिक्षण, पाठ्य-पुस्तकें, शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन इत्यादि प्रश्नांची चर्चा केली पाहिजे. परंतु पुढील प्रकरणांतून या प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्रपणे विचार केलेला असल्याने त्याकडे अंगुलिनिर्देश करून प्रस्तुत प्रकरणाची इतिश्री येथेच करणें सोईस्कर आहे.

## संदर्भ ग्रंथ


(1) Report of the Secondary Education Commission.

(2) Education in New India—Prof. Humayun Kabir.

(3) Problems of Educational Reconstruction—K. G. Saiyidain.

(4) The New Era in Education—I. L. Kandel.

(5) Teaching in Secondary Schools—Bossing.

(6) The work of the Modern High School—Laslie & Chisholm.

(7) New Pattern of Secondary Education—Symposium Govt. of India—Ministry of Edn. Publication No. 455.

(8) Experiments in Secondary Education—Editor E. A. Pires—Govt. of India, Ministy of Education.

(9) Proceedings of the Meetings of the Central Advisory Board of Education, Govt. of India.

# परीक्षा पद्धति : ३ :

उन्हाळ्यानंतर पावसाळा येणें जितकें स्वाभाविक वाटतें तितकेंच आजकाल बोर्डाचा अगर विद्यापीठांचा निकाल जाहीर झाल्यानंतर आजच्या परीक्षा पद्धतिबाबतची खरमरीत टीका स्वाभाविक वाटूं लागली आहे. इ. स. १९६१ सालीं नागपूर विद्यापीठाच्या बी. एस्. सी. ( पार्ट वन् ) परीक्षेचा निकाल फक्त बारा टक्के लागला ! प्री-युनिव्हर्सिटी परीक्षांचा निकाल सोळा पासून तीस टक्क्यांपर्यंत लागत असतो. एस्. एस्. सी. परीक्षेंतहि नापास होणाऱ्यांची संख्या वाढतीच आहे. पुढील कोष्टकावरून धावती नजर टाकली तरी वरील मुद्दा लक्षांत येईल. खालील कोष्टकांत दरवर्षी पास होणाऱ्या विद्यार्थ्यांचें प्रमाण दिलें आहे. *

| | १९५७ | १९५८ | १९५९ | १९६० |
|---|---|---|---|---|
| एस. एस. सी. परीक्षा, महाराष्ट्र राज्य. | ५८·७४ | ५४·७३ | ४८·५८ | ४३·३२ |
| हायस्कूल परीक्षा, राजस्थान. | — | ४२·६३ | ४८·८७ | ४३·०९ |
| एस.एस. एल. सी.परीक्षा, मद्रास. | ५५·५ | ५७·४ | ४४·९ | ५०·१ |
| हायस्कूल सर्टिफिकेट परीक्षा, ओरीसा. | — | ५९·० | ५९·५ | ५४·४ |

या कोष्टकावरून आपल्याला सहज दिसून येईल की आपल्या देशांत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फार मोठी आहे व ती वाढती आहे. परंतु ही आकडेवारी थोडी फसवी आहे. कारण या कोष्टकांत दरवर्षी परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या दिलेली नाही. परीक्षेस बसणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांशी अयशस्वी विद्यार्थ्यांचें प्रमाण ताडून पाहिलें तर तें आजकाल गेल्या दशकांत फार वाढलें आहे असें म्हणता येणार नाही. मुंबई विद्यापिठांत मॅट्रिकची परीक्षा सुरू

* ही माहिती Report on the causes of failure in High School Examination—Ministry of Education—Page vii येथून घेतली आहे.

झाल्यापासून आजपर्यंत मॅट्रिकचा म्हणजेच आजच्या एस. एस. सी. चा निकाल चाळीस ते पन्नास टक्केच लागत आला आहे. परंतु आज एस. एस. सी. परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५,००० वरून १,००,००० पर्यंत गेली आहे. सहाजिकच नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचें सरासरी प्रमाण पूर्वीपेक्षा फारसें वाढलें नसलें तरी तो आकडा एकदम फार मोठा दिसतो आणि त्यामुळे लोकांचें लक्ष वेधून घेतलें जाते.

परीक्षांबाबत जी कठोर टीका आजकाल केली जाते त्याचें दुसरें कारण असें की गेल्या पांच-सहा दशकांमध्ये शिक्षणाचें महत्त्व समाजाला प्रकर्षाने पटलें आहे. सामान्यांतील सामान्य माणसालाहि आपला मुलगा कमीतकमी एस. एस. सी. झाला पाहिजे असें वाटतें. आपल्या प्राथमिक गरजांनाहि काट देऊन आपल्या मुलाबाळांना शिकविणारे पालक पाहिले म्हणजे नापासांच्या संख्येबद्दल टीका व्हावी हें स्वाभाविक वाटतें. ज्या अनेकविध अडचणी सोसून पालक आपल्या मुलांना चिकाटीने शिक्षण देतात तें कांही त्यांच्यावर नापासाचा शिक्का मारून घेण्यासाठी खासच नव्हे !

पास नापासाची चिकित्सा होण्याचें तिसरें कारण असें कीं आज जगाच्या बाजारांत परीक्षांना फार महत्त्व दिलें जातें. विद्यार्थ्यांच्या भावी जीवनाचें यशापयश परीक्षेंतील त्यांच्या कमीअधिक यशावर अवलंबून असतें. शिक्षण घेणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने सामान्य दर्जाच्या नोकऱ्यांसाठीहि पदवीधर रांगा लावतात ! अशा परिस्थितींत विद्यार्थ्यांना परीक्षेंतील यशाचें अतिशय महत्त्व वाटणें स्वाभाविक आहे. अपयशाच्या भीतीने आत्महत्या करणाऱ्या अथवा घरांतून पळून जाणाऱ्या विद्यार्थ्यांची उदाहरणें म्हणजे नापास होणाऱ्या शेंकडो विद्यार्थ्यांच्या निराशेची द्योतक आहेत ! अपयशी बनणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवनाची सुरवातच त्यांतील उत्साहाला खो देऊन होते !

विचार करण्यासारखा आणखी एक मुद्दा असा की शेंकडो विद्यार्थ्यांचें अपयश म्हणजे शिक्षणावर आपण जो खर्च करीत आहोंत त्याचा एक प्रकारें अपव्ययच (wastage) आहे. चाळीस ते पन्नास टक्के विद्यार्थी नापास होतात. याचाच अर्थ शिक्षणावरील खर्चाचा निम्मा भाग वाया जातो अथवा त्याचा योग्य प्रकारें उपयोग होऊं शकत नाही. प्रगतिपथावर पहिलीं पावलें टाकणाऱ्या भारतासारख्या अर्धविकसित देशाला तरुण मनाच्या शक्तीचा व पैशाचा हा अपव्यय परवडण्यासारखा नाही.

वरील सर्व दृष्टिकोनांतून विचार केला तरी विद्यार्थ्यांच्या परीक्षांतील अपयशाबाबत अधिक मूलग्राही विचार करणें जरूर आहे असें दिसून येईल. असा

विचार करावयाचा म्हणजे परीक्षापद्धतीचे स्वरूप काय आहे; अभ्यासक्रम-अध्यापनाच्या पद्धति व विषयांचीं उद्दिष्टें यांचा व परीक्षापद्धतीचा अन्योन्यसंबंध कसा आहे, विद्यार्थ्यांच्या अपयशाचीं प्रमुख कारणें कोणतीं व तीं दूर करण्यासाठी कोणते उपाय योजावे या सर्व बाबींची चर्चा करणें जरूर ठरतें.

## परीक्षा व त्यांचें स्वरूप

### (अ) परीक्षा कशाची निर्देशांक ?

शिक्षकांची अध्यापनपद्धति, विद्यार्थ्यांची प्रगति व संस्थेचा दर्जा ठरविणें व्यावहारिकदृष्टचा आवश्यक असते. हें ठरविण्यासाठी कांही प्रमाणित मोजमाप ( Standard measurement ) मानावें लागतें. अशा तऱ्हेचें एक मोजमाप म्हणून आज परीक्षांकडे पाहिलें जातें. परीक्षेंत विद्यार्थी जे गुण मिळवितात त्यांवरून त्यांची प्रगति अजमाविली जाते, त्यांची बौद्धिक पात्रता ठरविण्यांत येते. एस्. एस्. सी. परीक्षेंत शाळांचे जे निकाल लागतात त्यावरून संस्थेची गुणवत्ता मोजली जाते. जून महिन्याच्या पहिल्या पंधरवडचांत वृत्तपत्रें चाळलीं तर वरील विधानाची साक्ष सहज पटते. “ आमच्या शाळेंतील विद्यार्थी जिल्ह्यांत सर्वप्रथम आला आहे ”, “ पहिल्या तीस क्रमांकांतील विद्यार्थ्यांत आमचे चार विद्यार्थी आहेत ” अशा तऱ्हेचा मजकूर विविध शाळांची जाहिरात करीत असतो. सारांश, वैयक्तिकरीत्या विद्यार्थ्यांची वा सामूहिकरीत्या संस्थांची शैक्षणिक प्रगति दर्शविणारा निर्देशांक (index) म्हणून आज सर्वसामान्यपणें परीक्षांकडे पाहिलें जातें.

परंतु शैक्षणिक प्रगति म्हणजे काय ? शिक्षणप्रक्रियेचीं जीं ध्येयें तत्वतः आपण मानतों त्यांची प्रत्यक्षांतील सफलता म्हणजेच शैक्षणिक प्रगति होय. अशाप्रकारच्या साफल्याची चाचणी आजच्या परीक्षेमुळे होत नाही. कारण आज शिक्षणप्रक्रिया तत्वतः मानलीं जाणारीं ध्येयें बाजूस पडून प्रत्यक्ष व्यवहारांत परीक्षा पास होणें हेंच शिक्षणाचें ध्येय बनलें आहे. अनुभवी शिक्षक पांच सहा वर्षांच्या प्रश्नपत्रिका चाळून व अभ्यासक्रमांतील कोणत्या भागावर पुनः पुनः प्रश्न विचारले जातात हें पाहून त्या प्रश्नांचीं उत्तरें विद्यार्थ्यांकडून घटवून घेतात. विषय शिकविण्यापेक्षा त्या विषयाची परीक्षेच्या दृष्टीने तयारी करून घेणें हें शिक्षकांचें उद्दिष्ट असतें. तसेंच आजकाल अनेक विद्यार्थी क्रमिक पुस्तकांपेक्षा मार्गदर्शिकाच विकत घेतात. मार्गदर्शिकांचें प्रस्थ आज इतकें वाढलें आहे की मराठी तिसरी चवथी पासून विद्यार्थी ‘दीपिकां’च्या प्रकाशांत वाढू लागतात. चवथीपासून

थेट एम्. ए. पर्यंत दीपिकांच्या प्रकाशांत चाचपडणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या ठिकाणी असलेल्या प्रकाशाची जाणीव कशी होणार ? आणि कधी होणार ? क्रमिक पुस्तकें व संदर्भग्रंथ यांचा सांगोपांग व सखोल अभ्यास करण्याची विद्यार्थ्यांची दृष्टीच नसल्याने वर्षभर सातत्याने अभ्यास करण्याची निकड त्यांना वाटत नाही. यामुळे पदवी परीक्षेपर्यंत पोचलेल्या सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं एकाद्या प्रश्नावर स्वतंत्र रीतीने साकल्याने विचार करण्याची फारशी पात्रता येत नाही. शाळा, शिक्षक, क्रमिक पुस्तकें यांत सुप्त असलेलें संस्काराचें सामर्थ्य विद्यार्थ्यांना प्रतीत होत नाही. किंबहुना शिक्षण म्हणजे एक प्रभावी संस्कार, मनाच्या विकसनाचें एक साधन असें जें आपण तत्वतः मानतों त्याचा अंश प्रत्यक्ष शिक्षणप्रक्रियेंत फारसा दिसत नाही.

## (अ) महत्त्व परीक्षेला, विषयाला नव्हें !

एकूण शिक्षणप्रक्रियेंत आज परीक्षांना निरतिशय महत्त्व प्राप्त झाल्याने जे विषय अगर कार्यक्रम परीक्षेशी प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षरीत्या निगडित नसतात त्यांना शिक्षक व विद्यार्थ्यांकडून फारसें महत्त्व दिलें जात नाही. अगदी अलीकडचें उदाहरण द्यावयाचें झालें तर समाजअध्ययन व सामान्य विज्ञान या विषयांचा निर्देश करता येईल. हे विषय इयत्ता दहावीपर्यंत आवश्यक आहेत; परंतु अकरावीला मात्र ऐच्छिक आहेत. त्यामुळे नाही म्हटलें तरी दहावीपर्यंत या विषयांची थोडीफार चालढकल होतेच ! तसेंच अभ्यासपूरक कार्यक्रमांत खरें पाहतां व्यक्तित्व विकासाच्या दृष्टीने फार महत्त्व आहे. गायन, नृत्य, चित्रकला, वक्तृत्व, नाटक, खेळ आदि विभागांत वरचे क्रमांक पटकाविणाऱ्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता काय परीक्षेंत वरचे क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा कमी दर्जाची असते ? परंतु परीक्षांच्या मोजपट्टीमुळे त्यांच्या या गुणांचें मापन होत नसल्याने त्यांच्या गुणाचें चीज होत नाही, सन्माननीय विद्यार्थ्यांच्या यादींत अशा विद्यार्थ्यांची नांवें सहसा झळकत नाहीत.

## (इ) परीक्षा : एक जुगार !

विद्यार्थी वर्षभरांत जे शिकतात अगर जो अभ्यास करतात त्याचे तीन तासांच्या अवधींत मोजमाप करण्याचा आजच्या परीक्षापद्धतींत प्रयत्न केला जातो. 'शितावरून भाताची परीक्षा झालीच पाहिजे' असा आपला सिद्धांत असतो. सागराच्या पाण्यांतील एक थेंब जरी घेतला तरी सागरी पाण्याचे सर्व गुणदोष त्यांत असतातच, नाही का ? याचप्रमाणे वर्षभर केलेल्या अभ्यासाचें अगर संपूर्ण अभ्यासक्रमाचें मोजमाप तीन तासांत कां करूं नये ? परंतु तीन तासांची मर्यादा

लक्षांत घेऊन नेहमीच्या पद्धतीच्या प्रश्नपत्रिका काढणाऱ्या परीक्षकाला अभ्यासक्रमांतील कांही भाग वगळावा लागतो, कांही भागावर प्रश्न काढावे लागतात. आणि यामुळेच परीक्षेला जुगाराचें स्वरूप प्राप्त होतें, 'भविष्यकथनाला' ऊत येतो, संभाव्य प्रश्नांची 'शिकार' सुरू होते ! ज्यांचा संभाव्य प्रश्नांबाबतचा अंदाज अगर मिळालेली माहिती बरोबर ठरते त्यांना 'लॉटरी' मिळाल्यासारखें वाटतें. याउलट वर्षभर अभ्यास करणाऱ्यांच्या पदरीं कांही वेळा निराशा येते. अभ्यासक्रमांतील कोठल्यातरी बारीकसारीक भागावर आधारित प्रश्न आले म्हणजे त्याचें समाधानकारक उत्तर अभ्यास करूनहि विद्यार्थ्यांना लिहिता येत नाही. अशावेळीं वर्षभर प्रामाणिकपणें अभ्यास करण्याऐवजी आपण इतरांप्रमाणे संभाव्य प्रश्न मिळविण्याची खटपट केली असती तर बरें झालें असतें असें त्यांना वाटतें. कांही परीक्षक तर कुठल्यातरी बारीकसारीक तपशिलांवर आडवे तिडवे प्रश्न काढण्याबद्दल प्रसिद्ध असतात ! जणू विद्यार्थ्यांचें ज्ञान अजमाविण्याऐवजी त्यांचें अज्ञान उघडकीस आणण्याची त्यांची इच्छा असते ! खरें पाहतां वर्षभरांत झालेल्या सर्व अभ्यासक्रमावर परीक्षेंत प्रश्न आले पाहिजेत परंतु परीक्षेच्या वरील स्वरूपामुळे सर्वसाधारण विद्यार्थी संभाव्य प्रश्न घोकतो, सर्व अभ्यासक्रमाची तयारी करीत नाही. आणि तरीहि ती विशिष्ट परीक्षा पास झाल्याचें प्रशस्तीपत्र आपण त्याला देतो. समजा, उद्या एकाद्या आचाऱ्याने लग्नाचा निम्माच स्वयंपाक केला अगर एकाद्या स्थापत्यशास्त्रज्ञाने एकतृतियांश इमारत बांधली व आपल्याकडे पूर्ण मोबदला मागितला तर आपण तो देऊं का ? मग अभ्यासक्रमांतील निम्मा अर्धाभाग कसातरी पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला उत्तीर्ण कां करावें ? परंतु हें घडतें याचें कारण आजची निबंधवजा परीक्षा व तिचें जुगारी स्वरूप !

## (ई) गुणदानाची सदोष पद्धति :—

विद्यार्थ्याला मिळणाऱ्या गुणसंख्येवर त्याची श्रेणी ( division ) ठरते. समजा पासष्ठ टक्के गुण मिळविणाऱ्यास पहिली श्रेणी, पंचावन टक्के गुण मिळाल्यास दुसरी व चाळीस टक्के गुण मिळाल्यास तिसरी श्रेणी देण्यांत येईल असें एखाद्या बोर्डाने अगर विद्यापीठाने ठरविलें. दुसरी श्रेणी मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी कांहींना त्रेसष्ठ, बासष्ठ असेहि गुण असतात. आता विचार करण्यासारखा मुद्दा म्हणजे बासष्ठ, सहासष्ठ गुण मिळवून पहिल्या श्रेणीच्या काठावर कसेतरी टेकलेले विद्यार्थी व दुसऱ्या श्रेणीचा छाप मारले गेलेले वरील प्रकारचे विद्यार्थी यांच्या गुणवत्तेंत कांही फरक असतो का ? तसें नसेल तर असा फरक करणें कितपत बरोबर आहे ? गुण अगदी काटेकोररीत्या दिले जात असते अगर उत्तरपत्रिका कोणत्याहि परीक्षकाने तपासूनहि गुणसंख्येंत फरक पडला नसता तर

वरील प्रश्न उपस्थितच झाला नसता. परंतु परीक्षकाच्या मानसिक अवस्थेवर (mood) कित्येकदा विद्यार्थ्यांचें भवितव्य ठरतें. उद्विग्न, त्रस्त अगर विमनस्क अवस्थेंत उत्तरपत्रिका तपासल्यास विद्यार्थ्यांना दोन-तीन गुण कमी मिळण्याची शक्यता असते. एकच उत्तरपत्रिका एकाच परीक्षकाकडून दोनदां तपासून घेतली तरी गुणसंख्येंत फरक पडतो. एकच उत्तरपत्रिका भिन्नभिन्न परीक्षकांकडून तपासून घेतल्यास कांही वेळां दहा-पंधरा गुणांचा फरक आढळून येतो. याशिवाय परीक्षकाच्या उदार अगर संकुचित दृष्टिकोनाचाहि गुणसंख्येवर परिणाम होतो. कांही परीक्षक एखाद्या प्रश्नास प्रथम कांही गुण देतात. पण नंतर त्यांना वाटतें "हे गुण जरा जास्तच झाले"! या पुनर्विचारानंतर परिक्षक महाशय दिलेल्या संख्येंतून एक-दोन गुण वजा करतात! कांही परीक्षक उत्तरपत्रिका तपासण्यापूर्वी 'यंदा किती टक्के निकाल लावायचा?' अशा तऱ्हेचे प्रश्न करतात. निकाल हा 'लावावयचा' नसतो तो 'लागत' असतो. तसेंच आपली परीक्षक होण्याची संधि जाऊं नये म्हणून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना पस्तीत ते पन्नासच्या संख्येंत आणून बसविणारे परीक्षक प्रथम श्रेणी अगर विशेष योग्यतेचे (distinction) गुण मात्र सहसा देत नाहीत! या सर्व कारणांस्तव गुणदानाच्या प्रचलित पद्धतीवर कडक टीका केली जाते व ती रास्तहि आहे. *

गुणसंख्येंत ज्यामुळे फरक पडतो अशा आणखी एका गोष्टीचा येथे उल्लेख करणें योग्य ठरेल. परंपरागत अनुभवामुळे अभ्यासक्रमांतील काही विषय गुण मिळविण्यास सोपे (scoring) तर कांही गुण मिळविण्यास कठिण मानले जातात. संस्कृत, गणित यांसारख्या विषयांत शंभरपैकी नव्वद-पंच्याण्णव गुण मिळूं शकतात. पण मराठीसारख्या विषयांत उत्तम उत्तरें लिहूनहि ऐंशीच्यावर गुणांचा आकडा जाणें कर्मकठिण! रूपें बरोबर लिहिलीं अगर उदाहरण बरोबर सोडविलें तर संपूर्ण गुण मिळतात. पण उत्तमांतील उत्तम निबंधालाहि कमाल गुण दिले जात नाहीत.

या दृष्टीने विचार करतां गुण आकड्यांत देण्याऐवजी विद्यार्थ्यांची सर्वसाधारण वर्गवारी लावावी हें इष्ट वाटतें. उत्तम, छान, चांगला, बरा, वाईट अशा प्रकारची वर्गवारी केल्यास एकदोन गुण कमी मिळाल्याने विद्यार्थ्यांचें जें आज

---

* Since the students' academic, social and vocational fate now hinges on the results of the external examination, the lack of reliability of the marking system is even more serious than it would be if the examination results were less decisive."
—Examinations in Indian Higher Education.

नुकसान होतें तें होणार नाही. राधाकृष्णन व मुदलियार आयोगांनीहि अशीच शिफारस केली आहे.

## (उ) परीक्षा फक्त स्मरणशक्तीची :

व्यक्तिमत्वाचा विकास हें शिक्षणप्रक्रियेचें ध्येय मानलें जातें. व्यक्तित्व-विकासांत शील, चारित्र्य, बुद्धि, स्मरणशक्ति, मौलिकता, विचार, भावना, कल्पनाशक्ति आदींचा विकास अंतर्भूत असतो. शिक्षणप्रक्रियेची सफलता अजमावायची असेल तर वरील सर्व बाबींची चाचणी झाली पाहिजे. परंतु आजच्या परीक्षापद्धतीच्या कक्षेंत शील, चारित्र्य यांसारख्या कित्येक बाबी येऊंच शकत नाहीत. आजच्या परीक्षा पद्धतीमुळे बुद्धीची परीक्षा होते असें म्हणतात. पण विचारांतीं तेंहि पटत नाही. कारण ठराविक भागावर ठराविक प्रकारचे प्रश्न विचारले जातात हें माहीत असल्याने त्या प्रश्नांचीं ठराविक उत्तरें पाठ करण्यावरच विद्यार्थी भर देतात. आजच्या परीक्षापद्धतीचा ज्ञानापेक्षा माहितीवर व बुद्धीपेक्षा स्मरणशक्तीवर भर आहे. त्यामुळे एखाद्या विषयावरील प्रचलित मतांच्या युक्तायुक्ततेचा विचार करून व त्यांचें विश्लेषण करून आपला स्वतःचा त्याबद्दलचा दृष्टिकोन बनविण्याची शक्ति आजच्या सर्वसाधारण विद्यार्थ्यांत दिसत नाही. परीक्षापद्धतीच्या प्रचलित स्वरूपामुळे अध्यापकवर्गहि माहितीवरच भर देतो; बुद्धीचें विकसन करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांकडून ठराविक घोकंपट्टी करून घेणें हेंच त्यांचें ध्येय असतें.† अशा रीतीने परीक्षेच्या स्वरूपामुळे अध्यापनपद्धतीवर बंधनें पडतात व अध्यापनपद्धतींतील त्रुटींचा परिणाम परीक्षेच्या स्वरूपावर होतो. हें एक दुष्टचक्र आहे. मात्र ही कोंडी

---

* Intelligence is entirely at a discount in the present examination system. What matters is learning by rote. Students know that they will be asked stock questions on the stock material and their primary concern—as unfortunately also of their teachers—is to be prepared with stock replies."—Report on the causes of failure in high school Examinations—P. vii

† "With the Syllabi fixed in terms of specific items of knowledge, however, it is no wonder that virtually all classroom teaching is limited to the knowledge aspect of education rather than to the understanding and application of knowledge, problem solving, critical thinking or creative thinking in the particular field of study. Any teacher who attempts to improve avenue of

( पुढे चालू )

आता कुठेतरी फोडली पाहिजे. कारण आजच्या परीक्षापद्धतीमुळे शिक्षणप्रक्रियेच्या मूलभूत व उदात्त ध्येयांना मदत होण्याऐवजी उलट अडथळाच होतो. केवळ माहितीची चाचणी घेणाऱ्या या परीक्षा उत्तीर्ण होणें हें विद्यार्थ्यांचें व त्यासाठी तयारी करून घेणें हें अध्यापकांचें प्रमुख उद्दिष्ट बनतें. आणि त्यामुळे मौलिक अध्ययन व अध्यापन दूर सारलें जातें.*

## (ऊ) सब घोडे बारा टक्के :

प्रचलित परीक्षापद्धतींचा दिसून येणारा आणखी एक दोष म्हणजे सर्व विषयांची परीक्षा एकाच विशिष्ट पद्धतीने घेतली जाते. खरें पाहतां एकाच विषयांतील विविध अंगांची तसेंच विविध विषयांची परीक्षा एकाच साच्यांत बसविणें सयुक्तिक नाही. उदाहरणार्थ भाषेच्या अध्ययनांत सुसंगत व परिणामकारकरीतीने बोलता येणें व दुसरे लोक बोलत असतां त्यांचे विचार समजून घेता येणें या क्षमता महत्त्वाच्या असतील तर त्यांचाहि समावेश परीक्षेच्या कक्षेंत व्हावयास नको का? उच्चारशुद्धता, स्पष्टोच्चार, स्वरापात, आवाजांतील आरोह, अवरोह आदि कितीतरी बाबींचा विचारहि सध्याच्या परीक्षेंत संभवत नाही. त्याचप्रमाणे गृहशास्त्रासारख्या विषयांत प्रात्यक्षिकाला विशेष प्राधान्य द्यावयास नको का? गृहशास्त्र विषय घेऊन पदवी परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या आजच्या कित्येक मुलींना सुंदर शिरा अगर चकली जमेलच असें नाही; पण शिरा अगर चकली कशी करावी याबद्दल लिहितां मात्र निश्चित येईल!

आजच्या परीक्षेचें सर्वसाधारण स्वरूप वर सांगितल्याप्रमाणे आहे. परीक्षेच्या या स्वरूपाचें वर्णन मुदलियार आयोगाच्या अहवालांत फार समर्पक रीतीने केलें आहे. त्या अहवालांत म्हटलें आहे की आजच्या परिस्थितींत परीक्षांवर विशेषतः

---

learning through pupil selected optional projects is doomed to meet with discouragement because his students are motivated only to master the syllabus by memorization for fuctual examinations! Even if the teacher introduces up-to-date materials for teaching the fundamental, classical topic, the students lose interest knowing that 'it won't be on the examination.''—Examinations in Indian Higher Education—P. 20.

* Thus, the present examinations impede progress toward loftier educational objectives. That is, because passing these fuctual examinations is now the major goal of students and teachers, the serve to supress creative teaching and learning."—Examinations in Indian Higher Education—P. 29.

बाह्य परीक्षांवर अयोग्य व अतिरिक्त भर दिला जातो. परिणामत: शिक्षणाचा मूळ हेतूच विफल ठरत आहे. आज अभ्यासक्रमानुसार परीक्षापद्धति ठरविण्याऐवजी परीक्षेच्या स्वरूपानुसार अभ्यासक्रम ठरविला जातो. त्यामुळे प्रयोगशीलतेला वाव राहत नाही, विषयांचें अध्ययन व अध्यापन योग्य प्रकारें होऊं शकत नाही. साचेंबंद परीक्षापद्धतीमुळे शिक्षणांत यांत्रिकता निर्माण होते. याचाच परिणाम म्हणजे सर्वसामान्य विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या मर्यादित भागावर लक्ष केंद्रित करतात. थोडक्यांत सांगावयाचें तर या परीक्षांमुळे विद्यार्थी चुकीच्या शैक्षणिक मूल्यांची जोपासना करतात आणि शिक्षकांनाहि त्याच मूल्यांनुसार आपली अध्यापनपद्धति ठरवावी लागते.*

## विद्यार्थ्यांच्या अपयशाची मीमांसा :----

आतापर्यंत आपण परीक्षापद्धतीच्या प्रचलित स्वरूपाची व त्यांतील दोषांची चर्चा केली.परीक्षेचें हें स्वरूप बदलण्यासाठी विविध विचारवंतांनी आयोगांनी केलेल्या शिफारशींचा आपण अभ्यास केला पाहिजे. परंतु या शिफारसी योग्य आहेत की नाहीत हें समजण्यासाठी प्रथमत: विद्यार्थ्यांच्या परीक्षेंतील अपयशाचीं सर्वसाधारण

* "Thus all circumstances compire to-day to put an undue and unnatural emphasis on examinations, specially the external examinations and they have come to exercise a restricting influence over the entire field of Indian Education to such an extent as almost to nullify its real purpose. We generally agree that the examinations today dictate the curriculum instead of following it, present any experimentation, hamper the proper treatment of subjects and sound method of teaching, foster a dull uniformity rather than originality, encourage the average pupil to concentrate too rigidly upon too narrow a field and thus help him to develop wrong values in education. Pupils assess education in terms of success in examinations. Teachers, recognising the importance of the examination to the individual pupil, are constrained to relate their teaching to an examination which can test only a narrow field of the pupil's interest and capacities and so inevitably neglect the qualities which are more important though less tangible. They are forced to attend to what can be examined, to do that with success they often have to 'spoonfeed' their pupils than encourage habits of Independent study."—Report of the Secondary Education Commisson—P. 146-147.

कारणें आपल्याला समजलीं पाहिजेत. एस. एस. सी. अगर तत्सम परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अपयशाची कारणमीमांसा करणाऱ्या दोन संशोधनात्मक पुस्तिका आमच्या पाहण्यांत आल्या आहेत. त्यांपैकी एक उत्तरप्रदेशांतील हायस्कूल परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अपयशाच्या कारणांची चर्चा करून त्यावर उपाय सुचविणारी पुस्तिका असून ती अलाहाबाद विद्यापीठाच्या शिक्षण विभागाने तयार केली आहे. * या पुस्तिकेचे तीन विभाग मानतां येतील. पहिल्या विभागांत बुद्धि, व्यक्तिमत्व व समायोजन (adjustment) या दृष्टिकोनांतून विद्यार्थ्यांचा विचार केला आहे. विद्यार्थ्यांना दिलेल्या बुद्धिमापन कसोटीचे निष्कर्ष मांडतांना त्या पुस्तिकेंत म्हटलें आहे की बहुसंख्य विद्यार्थी बुद्ध्यंकाच्या (I. Q.) दृष्टीने सर्वसाधारण कक्षेच्याहि खाली असतात. त्यांच्या ठिकाणी विचार, विश्लेषण व संयोजन या शक्तींचा पूर्ण विकास झालेला नसतो. (पृ. १६) त्याचप्रमाणे बहुसंख्य विद्यार्थी अंतर्मुख असून चिंतांच्या जाळ्यांत गुरफटलेले असतात हा व्यक्तिमत्व (personality) कसोटीचा दिलेला निष्कर्षहि महत्त्वाचा आहे. (पृ. २७) पुस्तिकेच्या दुसऱ्या विभागांत मुख्याध्यापक, शिक्षक व पालक यांनी दिलेल्या विद्यार्थ्यांच्या अपयशाचीं कारणें व त्यांची चर्चा आहे. त्यांपैकी पुढील कारणें विशेष मननीय आहेत :—(१) अनेक विद्यार्थ्यांच्या घरीं शिक्षणास पोषक असें वातावरण नसतें. (२) विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिति अत्यंत हलखीची असते. कित्येक विद्यार्थ्यांजवळ जरूर तीं पुस्तकेंहि नसतात. (३) शिक्षक व पालक यांच्यामध्ये योग्य सहकार्य नसतें. (४) विद्यार्थ्यांना शाळेंत प्रवेश देणें व वरच्या वर्गांत घालणें याबाबत संस्थाचालक (managements) ढवळाढवळ करीत असल्याने कमी दर्जाचे विद्यार्थी शाळेंत प्रवेश मिळवितात व वरच्या वर्गांत जातात. (५) वर्गांत विद्यार्थ्यांची संख्या फार असते. (६) शिक्षकांची आर्थिक परिस्थिति अत्यंत वाईट असते. त्यामुळे शाळेच्या कामाव्यतिरिक्त त्यांना अर्धवेळ नोकऱ्या अगर शिकविण्या कराव्या लागतात. या जादा कामाच्या ताणामुळे शिक्षक शाळेंत चांगल्या प्रकारें काम करूं शकत नाहीत. (७) तज्ज्ञ शिक्षक नेमणें शाळांना शक्य नसतें. (८) पुष्कळ विद्यार्थी इंग्रजी विषयांतच नापास होतात. फक्त मॅट्रिक झालेल्या शिक्षकांना इयत्ता पांचवी ते सातवीपर्यंत इंग्रजी शिकविण्यास देण्याचा हा परिणाम असू शकेल. (९) पुष्कळ विद्यार्थ्यांचा बुद्ध्यंक (I. Q.) सर्वसाधारण बुद्ध्यंकाच्याहि खाली असतो. कांही विद्यार्थी बेफिकीर असतात. (१०) दोन दोन इयत्ता एकदम करणाऱ्या विद्यार्थ्यांना वरच्या वर्गांतील अभ्यासाचें ओझें झेपत नाही.

---

* Report on the causes of failure in the High School Examinations—Ministry of Education.

मुख्याध्यापकांनी सांगितलेल्या बहुतेक कारणांना दुजोरा देऊन शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अपयशाचीं आणखीहि कांही कारणें सांगितलीं आहेत. त्यांपैकी प्रमुख कारणें पुढीलप्रमाणे:—(१) विद्यार्थ्यांची ग्रहण व निवेदनशक्ति कमी असते. (२) लेखी काम टाळण्याकडे सर्वसाधारण विद्यार्थ्यांची प्रवृत्ति असते. (३) अनेक विद्यार्थ्यांचें हस्ताक्षर फार वाईट असतें. (४) शाळांचीं ग्रंथालयें व प्रयोगशाळा समृद्ध नसतात.

पालकांच्या दृष्टिकोणावर या पुस्तिकेने टाकलेला प्रकाश लक्षांत घेण्यासारखा आहे. आपला मुलगा अगर मुलगी नापास होण्यासारखीच (deserved to fail) असें पालकांना कधीच वाटत नाही. प्रश्नांचीं उत्तरें देतांना ९३·७% पालकांनी आपला मुलगा वा मुलगी नापास होण्यासारखी नव्हती असें म्हटलें आहे. मात्र बहुसंख्य पालकांनी स्वतःची आर्थिक परिस्थिति विद्यार्थ्यांच्या अपयशास थोडीफार जबाबदार असूं शकेल असें म्हटलें आहे.

या पुस्तिकेंतील तिसऱ्या विभागांत वरील संशोधनाचे निष्कर्ष व शिफारसी दिल्या आहेत. परंतु त्यांची चर्चा पुढे योग्य त्या संदर्भांत आपण करूं. वर एके ठिकाणीं उल्लेख केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याच्या सेकंडरी स्कूल सर्टिफिकेट एक्झॅमिनेशन बोर्डातर्फेहि एक संशोधनात्मक पुस्तिका प्रसिद्ध झाली आहे.* या पुस्तिकेंत वेगवेगळ्या बाबतींतील आकडेवारी दिली आहे. त्या आकडेवारीवरून काढलेल्या निष्कर्षांपैकी पुढील निष्कर्ष महत्त्वाचे वाटतात:—(१) सर्वसाधारणपणें ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजींत चांगले गुण मिळतात त्यांना इतर विषयांतहि चांगले गुण मिळतात. (२) इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेंतील विद्यार्थ्यांना सगळ्यांत जास्त अवघड वाटणारा प्रश्न म्हणजे अर्थग्रहण व सारांशलेखन हा होय. (३) प्रिलिमिनरी परीक्षेंत यश मिळविणारे विद्यार्थी बोर्डाच्या परीक्षेंतहि यशस्वी होतात.

विद्यार्थ्यांच्या अपयशाची जी कारणमीमांसा आपण आतापर्यंत पाहिली त्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली पाहिजे अगर केली जात आहे, याचा विचार करणें अगत्याचें आहे.

## सुधारणेची नांदी :—


स्वातंत्र्योत्तर कालांत आजच्या परीक्षापद्धतींत कांही बदल करता येईल की काय आणि हा बदल कोणत्या दिशेने केला पाहिजे याचा जोरदार विचार

* Statistical investigation on some problems pertaining to the results of the S. S. C. Examinations—Secondary School Certificate Examination Board August 1960.

सुरू झाला. स्वतंत्र देशाचा विकास घडवूं शकणारीं तरुण मनें योग्य रीतीने संस्कारित करण्याचें काम शिक्षणाने केलें पाहिजे असें आज विचारवंतांना वाटतें आहे. साहजिकच शिक्षण घेणें म्हणजे ठराविक परीक्षा पास होणें व परीक्षा पास होणें म्हणजे कांही प्रश्नोत्तरें स्मरणसंपुटांत साठविणें असें जें समीकरण परंपरागत अनुभवाने मांडलें जातें तें प्रथमतः खोडून टाकलें पाहिजे. जीवनसंघर्षांत यशस्वी होण्यासाठी शिक्षणाची मदत झाली पाहिजे. जीवनाचीं आव्हानें स्वीकारल्याशिवाय हें यश मिळत नाही. हीं आव्हानें स्वीकारण्यासाठी मौलिकता, सातत्य, परिश्रमशीलता, बुद्धि, कल्पनाशक्ति यांची आवश्यकता असते. आज प्राथमिक शाळेपासून महाविद्यालयापर्यंतचा चौदा वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करूनहि या गोष्टी विद्यार्थ्यांत दिसत नाहीत. म्हणूनच तरुण मनाची जडण-घडण वेगळयाच प्रकारें करण्यासाठी शिक्षणपद्धतींत कांही महत्त्वाचे बदल केले पाहिजेत हा विचार तीव्र झाला आहे. या संकल्पित बदलांपैकी एक बदल म्हणजे आजच्या परीक्षेचें स्वरूप बदलणें हा होय. नव्या परीक्षा पद्धतीचें स्वरूप कसें असावें, जुन्या परीक्षा पद्धतींतील चांगल्या बाबी कोणत्या, इतर देशांच्या परीक्षा कशा प्रकारच्या असतात याबाबत गेल्या दशकांत पुष्कळच चर्चा झाली. या विचारमंथनांतून पुढील गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत.

## (अ) अभ्यासक्रमांचीं उद्दिष्टें निश्चित केलीं पाहिजेत :—

अभ्यासक्रमाचें उद्दिष्ट निश्चित करावयाचें ही काय भानगड ? अभ्यासक्रम 'संपविण्या' व्यतिरिक्त दुसरें कोणतें उद्दिष्ट असणार ? परंतु अभ्यासक्रम संपवावयाचा या आपल्या दृष्टीमुळे आजपर्यंत आपण केवळ विषयांची माहिती शिकवीत आलों आणि त्या माहितीचीच चाचणी परीक्षेंत घेत राहिलों. परंतु जी माहिती आपण देतो त्याचा विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष वर्तनावर कांही परिणाम झाला पाहिजे व त्यावर आपण भर दिला पाहिजे या गोष्टीची दखल न घेतल्यामुळेच शिक्षण व जीवन यांत भयंकर तफावत पडली आहे. आज नागरिकशास्त्राचा संपूर्ण अभ्यास करूनहि विद्यार्थ्यांत नागरिकत्वाची जाणीव ( civic sense ) निर्माण होत नाही. म्हणूनच अभ्यासक्रमाचीं कार्यात्मक उद्दिष्टें ( functional objectives ) निश्चित केलीं पाहिजेत. हीं उद्दिष्टें निश्चित केलीं म्हणजे कोणत्या ज्ञानग्रहणात्मक प्रसंगांतून ( learning situations) ती कार्यवाहीत आणतां येतील याचा विचार करता येतो. म्हणूनच आज मूल्यमापनाचा नवा दृष्टिकोन मांडतांना पुढील प्रकारचा त्रिकोन मांडला जातो.




एखाद्या विषयांतील विशिष्ट विभागाचें उदाहरण घेतल्यास वरील त्रिकोणाचा अर्थ समजण्यास अधिक मदत होईल. भाषेच्या अध्ययनांत 'विद्यार्थ्यांस वाचावयास शिकविणें' हें आपण एक उद्दिष्ट मानतों. परंतु हें उद्दिष्ट साध्य करावयाचें असेल तर वाचनप्रक्रियेंत कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो याची प्रथमतः नोंद करावी लागेल: ही नोंद करणें म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या विद्यार्थ्यांत आपण कोणते बदल (behavioural changes) अपेक्षितो याचीच नोंद करणें होय. चांगलें वाचतां येण्यासाठी स्पष्ट व शुद्ध उच्चार, अर्थानुकूल आरोह, अवरोह, योग्य स्वराघात इत्यादि गुण आवश्यक असतात. हे गुण विद्यार्थ्यांत रुजविण्यासाठी विविध कार्यक्रम व प्रसंग (learning situation) यांचा उपयोग करून घेतला पाहिजे. म्हणूनच श्री. सलामतुल्ला यांनी म्हटलें आहे की अध्ययनाच्या यशस्वितेचें योग्य मूल्यमापन करण्यासाठी अभ्यासक्रमाची आखणी सुस्पष्ट शैक्षणिक उद्दिष्टें लक्षांत घेऊन केली पाहिजे. अभ्यासक्रमांतील विशिष्ट विभागावर प्रभुत्व मिळविल्यास विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीवर प्रत्यक्ष काय परिणाम होईल हें स्पष्ट केलें पाहिजे. किंबहुना सर्व अभ्यासक्रमाचें विवरण कार्यात्मक घटकांच्या दृष्टीने—विद्यार्थ्यांत अपेक्षित असणाऱ्या वर्तणुकींतील बदलाच्या दृष्टीने केलें पाहिजे* अभ्यासक्रमाचीं उद्दिष्टें ठरविण्याची नितांत

* In order to evaluate properly the outcomes of learning, the curriculum should be drawn up in accordance with well defined educational goals. It is to be clearly stated what a given content of the syllabus is expected to do for the learner, that is, in what particular respect the mastery of the content is likely to modify his behaviour. The whole curriculum should be broken up into functional units indicating what each unit is meant for in terms of the learner's behaviour."—Improvement of Examination—The Education Quarterly—vol, X No. 38—Page 159.

आवश्यकता भारतीय परीक्षा सुधारणा प्रकल्प समितीनेहि आपल्या अहवालांत मांडली आहे. त्या समितीने म्हटलें आहे की 'परीक्षासंबंधी सुधारणा करण्याच्या प्रश्नाचा अलगपणें विचार करता येणार नाही. कारण शिक्षणाचें स्वरूप व हेतु यासारख्या व्यापक प्रश्नांशी तो निगडित झाला आहे. योग्य दृष्टिकोनांतून पाहिलें तर परीक्षा या अचानकपणें कोसळणाऱ्या आकाशींच्या कुऱ्हाडीप्रमाणे नसून प्रदीर्घ कालपर्यंत केलेल्या शैक्षणिक मेहनतीचे व वाढीची ती परिपूर्ति आहे. विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीला योग्य दिशेने वळण लाभणें व त्यांत इष्ट बदल घडवून आणणें हाच शिक्षणप्रक्रियेचा अर्थ आहे.···आणि खरें पाहतां परीक्षा म्हणजे तरी काय ? अभ्यासक्रम आणि अध्यापनप्रक्रिया यांच्यामुळे विद्यार्थ्यांच्या वर्तणुकींत जे अपेक्षित बदल घडवून आणावयाचे आहेत ते कितपत घडले आहेत याचा पद्धतशीर पुरावा गोळा करणें म्हणजेच परीक्षा होय. म्हणूनच आपण घेत असलेल्या परीक्षांची योग्यता ठरविण्याची प्रमुख कसोटी उद्दिष्टांची स्पष्ट व अचूक निश्चिति हीच आहे. अशा निश्चित उद्दिष्टांमुळे अध्ययन व अध्यापनाच्या अनुभवांना निश्चित दिशा प्राप्त होते. एवढेंच नव्हे तर त्यांची परीक्षांना खराखुरा अर्थ प्राप्त होण्यासाठीहि अत्यंत आवश्यकता असते.* अशाप्रकारें अभ्यासक्रमाचीं कार्यात्मक उद्दिष्टें जर आपण निश्चित करूं शकलों तर फक्त 'पास' व 'नापास' या दोन

---

* The problem of examinational reform cannot be tackled in isolation. It is inextricably bound up with brooder educational issues like those of the nature and purpose of our educational programmes......viewed properly, examinations are not a sudden doomsday visitation, but the natural fruitition and fulfilment of a long period of educational preparation and growth. Education is process of bringing about certain behavioural changes in desirable directions in the pupils who go through it ..... We can have valid examinations only on the basis of a definition and specification of these objectives. Examinations are nothing more than a systematic gathering of evidence regarding the extent to which behavioural changes envisaged in our curricula and teaching process have actually occured in a given set of students. A clear statement of objectives is, therefore, the main criterism by which the validity of our examinations should be judged. An explicit definition of objectives not only gives direction to learning and training experiences, but is quite integral to the very meaning and validity of our examinations."
—Report of the Committee on the Indian Examinations Reform Project—Page 9.

प्रकारच्या विभागांत विद्यार्थ्यांचें वर्गीकरण करण्याचेंच काम परीक्षेमुळे होणार नाही तर एखाद्या विषयाच्या कोणत्या विशिष्ट बाबतींत विद्यार्थी कच्चे आहेत, त्याचीं कारणें काय असूं शकतात व अध्यापन पद्धतींत कोणते बदल आवश्यक आहेत याचेंहि दिग्दर्शन परीक्षांमुळे होईल. थोडक्यांत सांगावयाचें तर परीक्षांना निदानात्मक मूल्य (diagnostic value) प्राप्त होईल.

## (आ) नोकरी व पदवी यांची निरगाठ :—

परीक्षापद्धतींत सुधारणा होण्यासाठी ज्या एका दृढमूल समजुतीचा अप्रत्यक्ष-रीत्या परीक्षेच्या स्वरूपावर परिणाम होतो तिलाहि धक्का द्यावा लागेल. देशांतील दारिद्र्यामुळे आज साध्या कारकुनाच्या नोकरीसाठीहि विद्यापीठीय पदवी आवश्यक मानली जाते. नोकरी मिळविण्याठी पदवी मिळविणें जरूर ठरते. नोकरी आणि पदवी यांची जी निरगाठ बसली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांत व्यापक स्वरूपाच्या आवडीनिवडी निर्माण होऊं शकत नाहीत व जीवनचरितार्थच पदवीवर अवलंबून असल्याने वशिलेबाजी, फसवाफसवी करूनहि पास व्हावें ही वृत्ति बळावते.* एम. ईडी. अगर पी. एच. डी. सारख्या अत्युच्च परीक्षांचे प्रबंध लिहिण्यासाठी जे विषय घेतले जातात तेहि वरील विधानाची साक्ष देतील. शैक्षणिक क्षेत्रांत प्रत्यक्ष काम करीत असतां ज्या अडचणी येतात त्याबद्दल संशोधन करण्याऐवजी ठरीव साच्याचे समालोचनात्मक विषय कां घेतले जातात अशी पृच्छा केल्यास पुढील प्रकारचीं उत्तरें मिळतात— "ज्यामुळे पदवी लवकर पदरांत (अगर खिशांत) पडेल असा विषय घेतला आहे," "अहो, खात्यांतील अधिक वरची जागा मिळावी म्हणून हें काम हातीं घेतलें आहे. नाहीतर हें विकतचं श्राद्ध कशाला घेतलं असतं मी गळ्यांत?" ज्ञानसाधना हें मुळी आज शिक्षणाचें

---

* With the great economic pressure due to the prevailing poverty in the country, the insistence on a university degree as the minimum requirement even for posts of minor officials and clerks has put a premium on a number of evils which have come to be associated with the examination system. It has subjected teaching to the examination, made it almost impossible to provide true education and to develop wider interests and has created temptations of cheating, corruption and favouritism. The obsession to secure a ticket in the lottery of job-securing has over-shadowed the educational purpose which a good examination can serve."—Report of the University Education Commission Page 329.

ध्येयच राहिलें नाही. याचें एक कारण म्हणजे शिक्षण आणि नोकरी यांची घातली गेलेली ही सांगड होय. म्हणूनच राधाकृष्णन आयोगाने सांगितलें आहे की सरकारी नोकरीसाठी पदवी आवश्यक मानूं नये.* विद्यापीठ अनुदान मंडळाचे माजी अध्यक्ष श्री. चिंतामणराव देशमुख यांनीहि एका भाषणांत याच प्रकारचे विचार प्रकट केले होते.

मराठी ... दा. क्र. 230e.6

## (इ) वस्तुनिष्ठ कसोटयांचा वापर :—

आजच्या परीक्षेंतील व्यक्तिगतता व अनिश्चितता काढून टाकून ती वस्तुनिष्ठ व निश्चित स्वरूपाची करावयाची असेल तर त्यासाठी वस्तुनिष्ठ कसोटयांचा वापर करणें हा एक मार्ग आहे. या कसोटयांचा वापर केल्याने गुणदानांतील व्यक्तिगतता नाहीशी होईलच. परंतु अभ्यासक्रमाचा बहुतेक भाग अशा कसोटयांत आणता येत असल्याने आज परीक्षेला प्राप्त झालेलें जुगाराचें स्वरूपहि यामुळे नष्ट होईल. म्हणूनच भारतीय उच्च शिक्षणविषयक परीक्षांचा विचार करावयास नेमलेल्या समितीने म्हटलें आहे की भारतीय शिक्षणांत योग्य ती प्रगति करण्यासाठी निबंधवजा परीक्षांशिवाय मूल्यमापनाच्या अन्य मार्गांचा विचार व जरूर तेथे अवलंब केला पाहिजे.† या कसोटयांचे प्रकार पुष्कळ आहेत. राधाकृष्णन आयोगाच्या अहवालांत परिशिष्ट 'म' मध्ये अशा प्रकारच्या कांही कसोटया छापल्या आहेत. त्यावरून धावती नजर फिरवली तरी कोणालाहि या कसोटयांच्या स्वरूपाची कल्पना येईल. अमेरिकेंत या कसोटयांचा वापर फार मोठया प्रमाणावर केला जातो. परंतु वस्तुनिष्ट कसोटयांचे वरील गुण मान्य करूनहि त्यांच्या स्वरूपाची अधिक चिकित्सापूर्वक पाहणी केल्यास त्यांच्यांतहि कांही दोष दिसून येतात. श्री. जॉर्ज यांनी या कसोटयांबद्दल लिहितांना म्हटलें आहे की परीक्षा म्हणजे केवळ मूल्यमापमाचें साधन नसून त्यांचा अध्ययन व अध्यापनावरहि परिणाम होत असतो. आणि यामुळेच भाषेच्या अध्यापनावर या कसोटयांचा अनिष्ट परिणाम होतो. संदर्भापासून अलग करून चूक व बरोबर उत्तरें मिसळून त्यांतून बरोबर उत्तराची निवड करावयास सांगणें योग्य नव्हे.‡

---

* Report of the University Education Commission—P. 341.

† Report of the Committee on Examination in Indian Higher Education—Page 31.

‡ It is wrong to think of an examination simply as a measuring device; for the teachers and the students. The examination decides the programme of work. And from this point of

(पुढे चालू)

याशिवाय कल्पनेची भरारी, विचारांची प्रगल्भता, मौलिकता, भाषाशैली यांसारख्या गुणांचें मूल्यमापन या वस्तुनिष्ठ कसोटीच्या ठराविक साच्यांत चांगल्या प्रकारें होऊं शकत नाही अशीहि टीका अनेकांनी केलेली आहे. म्हणूनच असें वाटतें की आपल्या परीक्षापद्धतीचें स्वरूप बदलतांना त्यांत निबंधवजा परीक्षांशिवाय मूल्यमापनाच्या अन्य साधनांचा अवलंब जरूर करावा. पण तो त्या साधनांच्या उपयोगितेचा साधकबाधक विचार करूनच करावा.

## (ई) निबंधवजा परीक्षेंत सुधारणा :--

वरील बाबींचा विचार करतां असें वाटतें की वस्तुनिष्ठ कसोटचा व निबंधवजा परीक्षा या दोहोंचाहि उपयोग करणें योग्य ठरेल. मात्र त्यासाठी आजच्या निबंधवजा परीक्षांत कांही सुधारणा करणें जरूर आहे. पहिली सुधारणा म्हणजे प्रश्नांत निश्चितता आणली पाहिजे. प्रश्न वाचल्याबरोबर त्याचा अर्थ स्पष्टपणें समजला पाहिजे. प्रश्नांत संदिग्धता असेल तर प्रश्नाचें योग्य उत्तर परीक्षकाच्या दृष्टीने कोणतें असूं शकेल याचा विचार करण्यांत विद्यार्थ्यांचा बराच वेळ वाया जातो. जणूं ती प्रश्नपत्रिका काढणाऱ्या अगर ती उत्तरपत्रिका तपासणाऱ्या व्यक्तीच्या मनांत त्या प्रश्नाचें कोणतें उत्तर असूं शकेल याचा अंदाज विद्यार्थ्यांना कितपत करता येतो यावर त्यांचें भविष्य लटकत असतें. प्रश्नांच्या अशा प्रकारच्या स्वरूपामुळे उत्तरांत जसें वैविध्य असतें तशीच गुणदानांतहि तफावत असते. एका परीक्षकाच्या मतें जें उत्तर चांगलें तें दुसऱ्याच्या मतें तसें ठरेलच असें सांगता येत नाही. भारतीय परीक्षापद्धतीचा अभ्यास करून त्याबाबत सुधारणा सुचविण्यासाठी जी अमेरिकन समिती नेमली होती त्यांनीहि हा दोष दूर व्हावा असें सुचविलें आहे. या समितीने आपल्या अहवालांत या दोषाबद्दल लिहितांना म्हटलें आहे की कांही प्रश्नांची व्याप्ति फारच मोठी असते. अशा प्रश्नांमुळे विद्यार्थी एका प्रकारच्या काळजीने ग्रासले जातात. बाह्य परीक्षेंत दिलें जाणारें प्रश्नांच्या व्यापकतेबद्दलचें हें स्वातंत्र्य गुणदानाचा खात्रीशीरपणा कमी करतें. एखाद्या

---

view objective evaluation exercises a persicious influence on language teaching.........In order to satisfy the condition of unambigious answers special kinds of questions are adopted, regardless of the efect of the questions of this kind on classroom teaching...... It is quite wrong as a classroom technique to present incorrect and correct forms simultaneously and exact a choice between them. "in an artificially isolated context"—H. V. George—Bulletin of the C. I. E. Sept. 1961—Page 56.

प्रश्नांत जितक्या जास्त प्रमाणांत हें स्वातंत्र्य आढळेल तितक्या प्रमाणांत निरनिराळ्या परीक्षकांकडून भिन्न प्रकारें गुणदान केलें जाण्याचा संभव अधिक ! * गुणदानांत निश्चितता आणण्यासाठी प्रश्नांचें स्वरूप निःसंदिग्ध करणें हा एक उपाय आहे. दुसरा उपाय म्हणजे प्रश्नांच्या उत्तरांत कोणते मुद्दे आलेच पाहिजेत व त्यासाठी त्या प्रश्नास ठेवलेल्या एकूण गुणांची विभागणी कशी करावी याबद्दलच्या लेखी सूचना (memorandum of instructions) परीक्षकांना देण्यांत याव्या. एस्. एस्. सी. परीक्षेसाठी 'अपेक्षित उत्तरांचा नमुना' व अशा सूचना दिल्या जातात. कांही विद्यापीठांतहि हा उपक्रम केला जातो.

## अंतर्गत गुण (Internal marks):—

शिक्षणाद्वारें विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व त्या विकासाचें मूल्यमापन परीक्षेंतून होण्यासाठी राधाकृष्णन व मुदलियार आयोग आणि परीक्षाविषयक अन्य समित्या या सर्वांनी अंतर्गत गुण राखून ठेवण्याची शिफारस केली आहे. शिक्षणप्रक्रियेंत जें संस्कारसामर्थ्य आहे त्याचा विद्यार्थ्यांच्या मनावर ठसा उमटावयाचा असेल तर शाळेंत अगर महाविद्यालयांत अभ्यास-विषयक व अभ्यासपूरक जे विविध कार्यक्रम होतात, त्यांत विद्यार्थ्यांनी मनःपूर्वक भाग घेतला पाहिजे. याचाच अर्थ असा की या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झालें पाहिजे. याच दृष्टीने राधाकृष्णन आयोगाच्या अहवालांत म्हटलें आहे की विद्यार्थी वर्षभरांत जें काम करतात, त्यासाठी कांही गुण राखून ठेवावे. या योजनेमुळे कांही विशिष्ट महिन्यांत कामांची गर्दी व बाकीच्या महिन्यांत काम नाही असें होणार नाही. शिवाय परीक्षेच्या आधी एक दोन महिने घोकंपट्टी करण्याच्या वृत्तीलाहि आळा बसेल. म्हणूनच या आयोगाने प्रत्येक विषयांतील एक

---

* "Indeed the freedom was so great in some questions that it would appear the students marks hinged on how well he could guess what the paper setter had in mind when he wrote the questions or what the examiner would look for when he marked the papers. Such questions can only create anxieties on the part of students...... The freedom allowed in the external examinations directly affects the reliability of the marking; the greater the freedom allowed by a question, the more likely it is that different examiners will give different marks for an answer."—Examinations in Indian Higher Education—Page 33.

तृतीयांश गुण अंतर्गत म्हणून राखून ठेवावे अशी शिफारस केली.* मुदलियार आयोगानेहि ही शिफारस माध्यमिक शिक्षणाबाबत उचलून धरली.

वरील शिफारशींचा दृश्य परिणाम म्हणजे आज एस. एस. सी. परीक्षेसाठी वीस टक्के गुण शालांतर्गत असतात. अशाच प्रकारें महाविद्यालयीन परीक्षेसाठीहि कांही गुण अंतर्गत म्हणून राखून ठेवले तर त्याचा परिणाम फार चांगला होतो. माध्यमिक शिक्षकांसाठी जीं अध्यापक महाविद्यालयें असतात त्यांत एकूण गुणांपैकीं पंचवीस ते पन्नास टक्के गुण ( विविध विद्यापीठांत हें प्रमाण भिन्न आहे ) अंतर्गत म्हणून राखीव असतात. अध्यापन परिपाठ, निबंधलेखन, तिमाही व सहामाही परीक्षा, मानसशास्त्रीय प्रयोग, विविध कार्यक्रमांत घेतलेला भाग आदि प्रत्येक बाबीसाठी गुण राखून ठेवलेले असतात. अंतर्गत गुणदानाचा हा प्रयोग बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठांत बरीच वर्षें केला गेला. या प्रयोगाचा अध्ययन अध्यापनावर फार चांगला परिणाम झाल्याचें विद्यापीठाच्या उपकुलगुरु श्रीमती हंसा मेहता यांनी सांगितलें आहे.†

माध्यमिक शाळेंतील वरच्या वर्गांत अगर महाविद्यालयांत वर्षभराचे हे विविध कार्यक्रम सुरक्षितपणें पार पाडण्यासाठी वर्षाच्या सुरवातीस कामाचा आराखडा (work-chart for the year) सूचनाफलकावर लावून

---

* No credit is at present given to classroom in courses except sometimes in the case of practical work. It was strongly urged by a host of witnesses that such credit should be given. We feel that it will be conducive to efficiency both in teaching and learning. It will make it possible to spread the work uniformly during the academic year and the very common practice of working at high pressure in the last few months immediately preceding the examination will be effectively discouraged. We recommend, therefore, that onethird of the marks alloted to each subject be reserved for work done during the course of instruction."—Report of the University Education Commission —Page 341.

† "After working out new programme of examination for five years, we find that we have no regrets to record for the steps we have taken. On the other hand, we are happy. Those steps have brought in a healthier academic life among teachers, a more regular and intelligent student participation in curricular and co-curricular activities and sounder judgement of the talents and achievements of students."—Hansa Mehta.

अनुक्रम ... विभाग
क्रमांक ... क्रमांक



टाकावा. या आराखड्यांत विविध कामांची तपशिलवार नोंद असावी. संबंधित विद्यार्थ्यांशी त्या बाबतची चर्चाहि करावयास हरकत नाही. विद्यार्थ्यांच्या कांही अडचणी असल्यास जरूर तर बदलहि करावे. मात्र एकदा हा आराखडा मान्य झाला की तो कार्यवाहीत आणणें ही आपली नैतिक जबाबदारी आहे असें सर्वांनी मानलें पाहिजे.

## (ए) सर्वांगीण नोंद पत्रक :--

(cumulative record card) वर्षभरांत विद्यार्थी जें काम करतात त्यासाठी कांही गुण राखून ठेवावयाचे म्हटलें की विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांनी दाखविलेल्या कमीअधिक गुणांची नोंद करण्याची जबाबदारी शाळा व महाविद्यालयें यांच्याकडे येते. मुदलियार आयोगाने ज्या सर्वांगीण नोंद पत्रकाचा पुरस्कार केला आहे त्याचें महत्त्व या संदर्भांत जाणवतें. शालेय अगर महाविद्यालयीन परिसरांत होणारे सर्वच कार्यक्रम व्यक्तिरत्व विकासास पोषक असें मानल्यावर ज्या विभागांत विद्यार्थ्यांची विशेष गुणवत्ता दिसून येईल, त्याची व्यवस्थित नोंद होणें जरूर ठरते. चित्रकला, गायन, नृत्य, वक्तृत्व हस्तकला व अभ्यासक्रमांच्या विविध विषयांतील कमीअधिक गुणांची नोंद जशी या पत्रकांत होईल तशीच विद्यार्थ्यांच्या विशेष आवडीनिवडी (interests), त्यांच्या व्यक्तिमत्वाचे विशेष उदाहरणार्थ आत्मविश्वास, चिकाटी, समतोल व समत्वबुद्धि (poise), नम्रता, उद्योगशीलता, नियमितपणा, व्यवस्थितपणा, यांचीहि नोंद त्यांत होणें अवश्य आहे. विद्यार्थ्यांच्या कुटुंबविषयक माहितीची नोंदहि त्यांत केली जाते. या सर्व नोंदी व्यवस्थित रीतीने केल्या गेल्या तर एकाच दृष्टिक्षेपांत विद्यार्थ्याची कितपत प्रगति होत आहे व ती कोणत्या दिशेने होत आहे हें समजून येतें. त्याचप्रमाणे विद्यार्थी एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत अगर शाळेंतून महाविद्यालयांत जेव्हा जातात तेव्हा या पत्रकामुळे त्या विद्यार्थ्याचें संपूर्ण चित्र नव्या संस्थेच्या चालकांपुढे उभें राहतें.* अशा तऱ्हेचीं पत्रकें ठेवण्याची पद्धति परदेशांत आहे. या पत्रकाचा संपूर्ण नमुना मुदलियार आयोगाच्या परिशिष्ट सातमध्ये दिला आहे.

---

* या पत्रकाचें महत्त्व वर्णन करतांना मुदलियार आयोगाच्या अहवालांत म्हटलें आहे—"But neither the external examination nor the internal examination, singly or together, can give a correct and complete picture of a pupil's all-round progress at any particular stage of his education.......For this purpose a proper system of school records should be maintained for every pupil......

(पुढे चालू)

## (ऐ) विद्यार्थ्यांची संख्या :—

शिक्षण ही एक द्विकेंद्रात्मक ( bipolar ) प्रक्रिया आहे असें म्हणतात. अर्थातच संस्कार घेणारा व संस्कार देणारा जितके निकट येतील तितकी ही प्रक्रिया अधिक यशस्वी होणार. परंतु आजकाल वर्गांत विद्यार्थ्यांची इतकी खेचाखेच असते की कित्येकदां शिक्षकांना विद्यार्थ्यांची नांवेंहि माहीत नसतात. यामुळे शाळांचें संस्कार केंद्रांचें स्वरूप नाहीसें होऊन त्यांना शिक्षणाच्या भाडोत्री वर्गाचें स्वरूप येतें. क्रमिक पुस्तकें संपविणें म्हणजे शिक्षण असें आपण मानणार असूं तर वर्गांत संख्या कितीहि असली तरी हरकत नाही ! परंतु शिक्षण म्हणजे एक क्रियाप्रतिक्रियात्मक संस्कारपूर्ण प्रक्रिया असेल तर वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या मर्यादितच असली पाहिजे. विद्यार्थी बेशिस्त असल्याचा जो प्रकार आज केला जातो त्याचें एक कारण असें की विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजून घ्यायला शिक्षकवर्गाला उसंत सापडत नाही व शिक्षकांशी व्यक्तिगत संबंध न आल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्याविषयी फारसा आदर वाटत नाही. शाळा ही ‘ आपली संस्था ’ आहे अशी भावना विद्यार्थ्यांत निर्माण झाली, तर मुख्याध्यापकांना कठिण वाटणारे कितीतरी प्रश्न सहज सुटूं शकतील !

जी गोष्ट शाळांची, तीच महाविद्यालयांची आहे. प्राध्यापक वर्गांत येऊन व्याख्यानें देऊन जातात. आपण जें शिकवितों तें विद्यार्थ्यांना कितपत समजतें हें जाणून घेण्याचा प्रयत्न प्राध्यापकवर्ग सहसा करीत नाही. परंतु हें योग्य नव्हे. विशेषतः प्री युनिव्हर्सिटीचा निकाल पाहिला म्हणजे या अननुभवी तरुणांना प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाची किती जरूरी असते हें दिसून येतें. वर्गांत जरी प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिकरीत्या लक्ष देणें शक्य नसलें तरी अन्य मार्गांनी विद्यार्थ्यांशी प्राध्यापकांचा निकट संबंध आला पाहिजे. या दृष्टीने विचार करतां टयुटोरियल्सची योजना योग्य प्रकारें कार्यवाहीत आणली तर तिचा चांगला उपयोग होईल असें वाटतें. एक साधेंच उदाहरण घेऊं. पंच्याहत्तर टक्के उपस्थिति असल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेला बसूं देऊं नये असा विद्यापीठाचा दंडक वर्षअखेरीस विद्यार्थ्यांच्या निदर्शनाला आणला गेला. ज्यांची उपस्थिति कमी होती अशांचें वर्ष फुकट जाण्याचा प्रश्न उपस्थित झाला. विद्यार्थ्यांनी मोर्चा, सामानसुमानाची मोड-

---

Such a school record will present a clear and continuous statement of the attainments of the child in different intellectual pursuits throughout the successive stages of his education. It will also contain a progressive evaluation of development in other directions of no less importance—Report of the Secondary Education Commission—Page 148.

तोड या मार्गाचा अवलंब करून आपलें म्हणणें वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कानीं घातलें. परंतु विद्यार्थी व प्राध्यापक यांचा संबंध टयुटोरियल्समध्ये येत असता तर प्राध्यापकांनी त्यांना पूर्वसूचना दिली असती, विद्यार्थ्यांनीं आपल्या अडचणी मांडल्या असत्या, वरिष्ठांच्या कानीं योग्य वेळीं व योग्य प्रकारें विद्यार्थ्यांचें म्हणणें पोचलें असतें. परिपक्व, अनुभवी प्राध्यापकांच्या जिव्हाळयाच्या मार्गदर्शनाच्या अभावीं आज तरुण मनाला आत्मशक्तीचा प्रत्ययच येत नाही. आपल्या देशांतील तरुण वर्ग क्रियाशील, देशाच्या उत्कर्षासाठी झटणारा व कोणत्या ना कोणत्या क्षेत्रांत विक्रम करण्याच्या कल्पनेने भारावलेला व्हावयाचा असेल तर शिक्षण प्रक्रियेंतील संस्कारक्षमता महत्त्वाची मानली पाहिजे. त्यासाठी वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित ठेवून विद्यार्थी व शिक्षक यांचे विविध पातळीवर निकटचे संबंध आले पाहिजेत.

## (ओ) महाविद्यालयें कोणासाठी ?

महाविद्यालयांतील वाढती संख्या ही आज एक समस्या होऊन बसली आहे. मुंबई विद्यापीठाने सकाळचीं महाविद्यालयें बंद करण्याच्या निर्णय घेतल्यावर जें वादंग माजलें त्याचें कारण हेंच आहे. परंतु महाविद्यालयीन शिक्षणाचें जें ध्येय मानलें जातें तें लक्षांत घेतलें तर महाविद्यालयांत इतकी अफाट विद्यार्थीसंख्या कां असावी असा मनाला प्रश्न पडतो. कारण महाविद्यालयीन शिक्षणाचें प्रमुख ध्येय विविध क्षेत्रांत सामर्थ्यपूर्ण नेतृत्व करूं शकणारे लोक निर्माण करणें हें आहे; पोटार्थी नोकरवर्गाची पैदास करणें हें कांही या शिक्षणाचें ध्येय नव्हे. इंग्लंडमध्ये माध्यमिक शिक्षण संपवून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी फक्त तीन टक्के विद्यार्थी महाविद्यालयांतील पूर्ण वेळांच्या तांत्रिक व औद्योगिक अभ्यासक्रमाकडे वळतात व तीन टक्के विद्यार्थी विद्यापीठांत दाखल होतात.* याचें एक कारण म्हणजे अर्धवेळ सायंकालीन असे पुष्कळ तांत्रिक व औद्योगिक अभ्यासवर्ग तेथे चालविले जातात. आपल्याकडेहि बहुविध व्यावसायिक शिक्षणक्रमांची सोय व ते शिक्षणक्रम पार पाडणारास नोकरी या दोन गोष्टींची सोय केल्यास महाविद्यालयांतील संख्येला आपोआप आळा बसेल. या संदर्भात इंग्लंडमधील आणखी एका प्रथेचाहि उल्लेख करावा लागेल. माध्यमिक शिक्षणाच्या सुरवातीस विद्यार्थ्यांची चांचणी घेऊन त्यांची वर्गवारी करण्यांत येते. या वर्गवारीनुसार फारच थोडया विद्यार्थ्यांना ग्रामर स्कूलमध्ये जावयास परवानगी मिळते,† आणि महाविद्यालयांत प्रवेश मिळविणारे

* At school in Britain—Central office of information—Page 37.

† Ibid Page 12—सर्वसाधारणपणें पांचांपैकी एका विद्यार्थ्याला ग्रामर स्कूलमध्ये शिक्षण घेण्याची संधि मिळते.

बरेचसे विद्यार्थी ग्रामर स्कूलसमधूनच येतात.

अमेरिकेने हा प्रश्न अगदीच वेगळया रीतीने सोडविला आहे. विद्यापीठांचा अभ्यासक्रम पेलूं शकणाऱ्या हुषार विद्यार्थ्यांनाच फक्त महाविद्यालयांत प्रवेश देण्याऐवजी सर्वसामान्य विद्यार्थ्याला पेलतील असे अभ्यासक्रम अमेरिकन विद्यापीठांतून सुरू केले आहेत. न्यूयॉर्कमधील कोलंबिया विद्यापीठांत कित्येक हजार अभ्यासक्रम आहेत व विविध प्रकारच्या पन्नास पदव्यांच्या अभ्यासक्रमाची सोय तेथे आहे.* मात्र आजचें रशियाचें वैज्ञानिक क्षेत्रांतील अलौकिक यश पाहून अमेरिकेंतील कांही विचारवंतांना हुषार विद्यार्थी निवडून काढून त्यांच्या विकासाकडे जास्तीत जास्त लक्ष दिलें पाहिजे असें वाटूं लागलें आहे.

लोकशाहीप्रधान देशांत 'समान संधी'चें तत्व पाळलें पाहिजे हें खरें आहे. परंतु समान गुणवत्तेच्या लोकांना समान संधि असाच त्या तत्वाचा खरा अर्थ आहे. या दृष्टीने महाविद्यालयांत कोणीहि प्रवेश मिळवून तीन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी पांच सहा वर्षें घालवावी हें इष्ट वाटत नाही. त्यापेक्षा सर्वसाधारण मगदुराच्या विद्यार्थ्यांनी व्यवसायीन शिक्षण घेऊन स्वावलंबी बनावें हें योग्य नाही का? तसेंच आपल्या देशाचा विकास होण्याच्या दृष्टीने प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना कांही विशेष प्रकारचें शिक्षण देणें इष्ट ठरेल की काय हाहि विचारार्ह मुद्दा आहे.

## (औ) दुहेरी मूल्यमापन :—

अलाहाबाद विद्यापीठाच्या हायस्कूल परीक्षेविषयीच्या एका संशोधनात्मक पुस्तिकेचा उल्लेख याच प्रकरणांत आपण पूर्वी केला आहे. त्या पुस्तिकेंत विद्यार्थ्यांना संस्थेंत प्रवेश देणें अगर त्यांना वरच्या वर्गांत घालणें याबाबत संस्थाचालक (managements) ढवळाढवळ करतात आणि त्यामुळे संस्थेचा दर्जा घसरतो असा एक निष्कर्ष मांडला आहे. आमच्या मतें हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. शाळांतील अंतर्गत परीक्षांत दोन तीन विषयांत नापास होणारे विद्यार्थीहि वरच्या वर्गांत जातात; परंतु एस. एस. सी. परीक्षेंत मात्र एका विषयांत नापास होणारा विद्यार्थी नापासच ठरतो! शाळांच्या अंतर्गत परीक्षांच्या निकालांचा निकष बाह्य परीक्षेच्या निकालांना लाभला तर निकाल ऐंशी नव्वद टक्के ठरतील; आणि बाह्य परीक्षांच्या निकालाचा निकष अंतर्गत परीक्षांना लाभला तर ते चाळीस पन्नास टक्के ठरतील! परंतु या प्रथेमुळे विद्यार्थी व पालक यांची आत्मसंतुष्टता वाढते व मग बाह्य परीक्षेंतील अपयशाचा धक्का त्यांना सहन होत

* Education for freedom—Page 28.

नाही. म्हणून हें दुहेरी मूल्यपापन बंद होऊन अंतर्गत व बाह्य परीक्षेंत विद्यार्थ्यांचें यशापयश मोजण्याचा निकष एकच असला पाहिजे.

## (अं) आणि तो इंग्रजीचा प्रश्न :--

एस. एस. सी. परीक्षेंत नापास होणाऱ्यांपैकी अनेकजण इंग्रजींत नापास होतात हा निष्कर्ष यापूर्वी आपण पाहिलाच आहे. पॉलिटेकनिक अगर महाविद्यालयांतील नापासांच्या संख्येचें कारणहि प्रामुख्याने तेंच आहे. प्राध्यापक इंग्रजींत जें बोलतात तें विद्यार्थ्यांना समजत नाही. इंग्रजी पुस्तकांतील अर्थग्रहण होत नाही आणि स्वतःचे विचारहि इंग्रजींत मांडता येत नाहीत ! अशी ही आजची परिस्थिति आहे. नापासांची संख्या कमी करावयाची असेल तर या परिस्थितीची शहानिशा केली पाहिजे. या परिस्थितीचें उघड दिसणारें एक कारण असें की आज माध्यमिक शाळांत इंग्रजीच्या अध्यापनासाठी मिळणारा वेळ कमी झाला आहे. पूर्वी इंग्रजी पांचवी ते अकरावी या कालमर्यादेंत इंग्रजीसाठी सर्वसाधारणपणें सत्तावीसशे शालेय तास ( periods ) मिळत असत. आज त्यांची संख्या अकराशेच्या आसपास आहे. वेळांत पडणारी सोळाशे तासांची तफावत प्री. युनिव्हर्सिटीच्या अगर पॉलिटेकनिकच्या पहिल्या वर्षांत भरून काढणें केवळ अशक्य आहे. उच्च शिक्षणांत इंग्रजीला महत्त्वाचें स्थान राहणार असेल तर माध्यमिक शाळांत इंग्रजीकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे.

विचार करण्यासारखा दुसरा मुद्दा म्हणजे केवळ कालमर्यादा वाढविली तर विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारें इंग्रजी भाषा अवगत होईल असें म्हणता येईल का ? विषय कशा प्रकारें शिकविला जातो हेंहि महत्त्वाचें नाही का ? इंग्रजीचें क्रमिक पुस्तक संपविणें व इंग्रजी भाषा शिकविणें या दोन गोष्टी आजच्या परिस्थितींत भिन्न मानाव्या लागतील. पुस्तकांतील धडे हे भाषा शिकविण्याचें एक साधन असतात. परंतु आज अनेक शिक्षक साधनालाच साध्य मानतात आणि त्यामुळे विद्यार्थी भाषेपासून दूर राहतात. साधी, सोपी अभिव्यक्ति व अर्थग्रहण हें इंग्रजीच्या अध्यापनाचें ध्येय मानून कार्यक्षम, लायक शिक्षकांची इंग्रजी शिकविण्यासाठी नेमणूक केली तर वरील मुद्याचें महत्त्व कमी वाटेल.

इंग्रजी भाषेचें आपल्या शिक्षणक्रमांत कोणतें स्थान आहे व असावें या समस्येचा आपण या पुस्तकांत अन्य ठिकाणीं स्वतंत्रपणें विचार केला असल्याने आम्ही येथे त्याबद्दल सविस्तर लिहीत नाही. मात्र केवळ इंग्रजी भाषेवरील कमीअधिक प्रभुत्वामुळे विद्यार्थ्यांचें नुकसान होऊं नये व त्यासाठी योग्य ते उपाय तातडीने योजावेत असेंच कोणीहि म्हणेल !

## (अः) उपसंहार :--

शिक्षणांतील कोणतीहि समस्या घेतली आणि तिचा आपण विचार करूं

लागलों की अनेक प्रश्नांची गुंतावळ त्यांत आढळते. परीक्षा पद्धतीचा विचार करतांना हीच गोष्ट आपण पाहिली. शिक्षणाला प्राप्त झालेला मर्यादित अर्थ, पदवीला मिळालेलें निरतिशय महत्त्व, शिक्षणाचा झालेला प्रसार व त्यामुळे विद्यार्थ्यांची वाढणारी संख्या, सामाजिक जीवनांत इंग्रजीला असलेलें महत्त्व, आजची गुणदानाची पद्धति अशा अनेक प्रश्नांच्या चक्रव्यूहांतून मार्ग कसा काढावा हें समजत नाही. परंतु तरीहि एका विशिष्ट दिशेने भारत सरकारने पाऊल उचललें आहे. वस्तुनिष्ठ कसोटयांचा अधिक वापर व्हावा म्हणून ठिकठिकाणी शिक्षकांचीं शिबिरें भरवून मूल्यमापनाच्या नव्या पद्धतींची माहिती त्यांना करून देण्यांत आली आहे. त्याबाबतचें वाङमयहि शिक्षणमंत्रालयातर्फे प्रसिद्ध झालें आहे. बी. एड. च्या अभ्यासक्रमांत Evaluation and Measurement नांवाच्या विषयाचा समावेश करण्यांत आला असून आता लवकरच प्रत्येक राज्यांत एक Evaluation unit उघडण्यांत येणार आहे. सर्व बी. एडटी. कॉलेजेसना या विषयाचें वाङमय घेण्यासाठी पांचशे रुपयांचें विशेष अनुदान देण्याची योजना आहे. अंतर्गत गुणदानाची पद्धति सुरू झाली आहे. आज विद्यार्थ्यांना पुरवणी परीक्षेस बसतांना पुनः सर्व विषयांची सक्ती राहिलेली नाही. औद्योगिक व तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या वाढते आहे. विद्यार्थ्यांचा व्यक्तित्व विकास शिक्षणप्रक्रियेंत साधला पाहिजे व परीक्षेंत त्याचें सर्वांगीण मूल्यमापन झालें पाहिजे हा विचार रूजूं लागला आहे. या सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे आपण योग्य दिशेने चाललों आहोंत याची खात्री पटते. आणखी थोडया वर्षांत परीक्षा पद्धतींतील आपण वर पाहिलेले सर्व दोष दूर होतील व विद्यार्थ्यांना ती एक 'टांगती तलवार' वाटणार नाही.

❧ ❧ ❧

### संदर्भ ग्रंथ


(1) Report of the Secondary Education Commission.
(2) Report on the Causes of Failures in High School Examination.
(3) Examinations in Indian Higher Education.
(4) Statistical Investigation on some Problems pertaining to the results of the S. S. C. Examinations.
(5) Report of the Committee on the Indian Examinations Reform Project.
(6) Report of the University Education Commission.
(7) At School in Britain.

# शिक्षकांचें प्रशिक्षण : ४ :

## प्रश्नाचें स्वरूप :--

शिक्षकाचा देशाचे द्योतक म्हणून अनेकदा दिव्याचा उल्लेख केला जातो. रविंद्रनाथांनी देखील एके ठिकाणीं म्हटलें आहे की जो शिक्षक स्वत: शिकावयाचें थांबला आहे त्याला खऱ्या अर्थी शिकवितां येणार नाही. विझलेल्या ज्योतीने का दुसरी ज्योत प्रज्वलित करतां येईल? खळाळत्या धारेचें पाणी आपण प्राशन करतों; डबक्यांतील नव्हे. शिक्षकाची ज्ञानधारा प्राशन करण्यायोग्य होण्यासाठी त्याने कूपमंडूक, आत्मसंतुष्ट राहतां कामा नये. ज्ञानाच्या वाढत्या विकासाबरोबर गति राखण्याने शिक्षकाचा स्वत:चा विकास होतों हें खरेंच आहे. परंतु शिक्षकाने आपलें ज्ञान अद्यावत ठेवण्याचें आणखी एक महत्त्वाचें कारण आहे. एखाद्या कारागीराने एखादी मूर्ति घडवितांना एखादी चूक केली अगर एखाद्या डॉक्टराचें एखाद्या रोग्याबद्दलचें निदान चुकलें तर ती विशिष्ट मूर्ति अगर ती विशिष्ट व्यक्ती यांच्यावरच त्या चुकीचा होणारा परिणाम सीमित राहतो. परंतु विजापुरच्या गोलघुमटांत आवाजाचे असंख्य प्रतिध्वनि निघतात अगर एका बीजांत ज्याप्रमाणे कोटि कोटि तरूंना जन्म देण्याची शक्ति असते त्याप्रमाणे शिक्षकांच्या गुणदोषांचा, बऱ्यावाईट अध्यापनपद्धतींचा अगर कमीअधिक संस्कारसामर्थ्याचा प्रभाव एका सबंध तरुण पिढीवर होत असतो. या संदर्भांत मला एक चिनी म्हण आठवते. त्या म्हणींत म्हटलें आहे की तुम्हाला एका वर्षाची तरतूद करावयाची असेल तर धान्य पेरा, एका दशकाची करावयाची असेल तर झाडें लावा आणि शतकांची तरतूद करावयाची असेल तर माणसें पेरा. ( plant men ). म्हणूनच शाळेची इमारत, इतर शैक्षणिक साधनें, सामानसुमान इत्यादि गोष्टींकडे एखादेवेळेस थोडेसें दुर्लक्ष झालें तरी चालेल परंतु शिक्षकांच्या गुणवत्तेकडे, त्यांच्या शिक्षणाकडे व त्यांच्या विकासाकडे जराहि दुर्लक्ष करून अगर त्याबाबत चालढकल करून चालणार नाही. विविध प्रकारचे भविष्यकालीन बहुविध फायदे लक्षांत घेऊन ज्याप्रमाणे आज आपण त्या योजनांवर कोट्यावधि रुपये खर्च करीत आहोंत, त्याचप्रमाणे शिक्षकांचें शिक्षण म्हणजे भांडवलाची गुंतवणूक आहे. जें बी पेरावयाचें त्याच्या प्रतीवर जशी येणाऱ्या धान्याची प्रत अवलंबून

असते त्याप्रमाणे शिक्षकांच्या शिक्षणावर राष्ट्रांतील तरूण पिढीचा दर्जा अवलंबून असतो. याच अर्थी म्हटलें जातें की-

शिक्षकांच्या शिक्षणाचें महत्त्व गेल्या शतकापासून तर फारच तीव्रतेने जाणवूं लागलें आहे. शिक्षण म्हणजे विशिष्ट पुस्तकांतील माहिती विद्यार्थ्यांच्या डोक्यांत कोंबणें हा शिक्षणाचा अर्थ आता नाहीसा झाला आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तींचा विकास घडवून आणणें, त्यांच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष देणें हें शिक्षणप्रक्रियेचें ध्येय बनल्याने स्वाभाविकच शिक्षकाची जबाबदारी अधिकच वाढली आहे. आज शिक्षक हा फक्त ज्ञानाचा विक्रेता राहिला नसून तो व्यक्तित्वाचा शिल्पकार बनला आहे. त्यामुळे अध्यापनतंत्रांतील कांही खुब्या (tricks of the trade) माहीत करून घेऊन काम भागणार नाही. ज्ञानाची सखोलता, अध्यापनाचा प्रभावीपणा, विद्यार्थ्यांच्या मानसिक विकासाची पूर्ण कल्पना, सूक्ष्म व मार्मिक विनोद, चौरस वाचन, विविध छंद यांनी विनटलेला शिक्षकच विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाचें शिल्प घडविण्याचें काम करूं शकतो.* विद्यार्थ्यांची विचारशक्ति प्रगल्भ असावी, त्यांच्या कल्पनेची झेप पल्लेदार असावी, त्यांचें निरिक्षण सूक्ष्म असावें असें आपणास वाटत असेल तर प्रथम शिक्षक तसे असले पाहिजेत. अगर शिक्षकांना तसें घडविले पाहिजे. नभांगणीं चमकणाऱ्या तारकांचें व चंद्रम्याचेंच प्रतिबिंब खालच्या जलाशयांत पडतें ना? जे मूळ नाहींच त्याचें प्रतिबिंब पकडूं म्हटलें तर तें कसें शक्य होईल? कोरांटीच्या झाडाला जुईची सुवासिक फुलें कशी लागतील? आडांत नसलेलें पोहऱ्यांत कसें येईल?

## ऐतिहासिक पार्श्वभूमि :—

शिक्षकांच्या शिक्षणाची पहिली योजना आपल्या देशांत मद्रासचे गव्हर्नर श्री. थॉमस मन्रो यांनी इ. स. १८२६ सालीं मांडली. अधिक चांगल्या प्रकारें

---

* याच प्रकारचे विचार पुढील परिच्छेदांत वाचावयास मिळतील:

" Teaching, therefore, has become more than a matter of the relation of the nature to the immature learner. It involves not only imparting a mastery of knowledge of a limited number of subjects, but sympathetic understanding of the place of knowledge in the growth of each pupil and of its value to society. ......With the acceptance of the new theory of education the teacher can no longer look upon his job as one of imparting doses of curriculum and courses of study prescribed by a central authority, whether local or national."—The New Era in Education—I. L. Kandel—Page 324.

प्रशिक्षित झालेल्या शिक्षकांची आत्यंतिक निकड सांगून त्यांनी त्यासाठी मध्यवर्ति प्रशिक्षण केंद्राची स्थापना व्हावी अशी शिफारस केली. बंगालमधील कलकत्ता स्कूल सोसायटीने एतद्देशीय शाळांतील शिक्षकांच्या शिक्षणाची सुरवात केली. या व्यवस्थेस ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टरांची मान्यताहि मिळाली. डायरेक्टरांनी या योजनेबद्दलचें आपलें मत मांडतांना म्हटलें आहे की शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सुरवात केल्याने आपण भारतांतील जनतेला अधिक चांगल्या प्रकारचें शिक्षण देऊं शकूं. शिक्षकांच्या शिक्षणाच्या या योजनेला मिळालेला प्रतिसाद मात्र फारच अल्प होता. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत या क्षेत्रांत फारशी प्रगति झाली नाही. त्यामुळे इ. स. १८५४ च्या वुडच्या खलित्यांतहि सर्व इलाख्यांत प्रशिक्षण केंद्रें ताबडतोब स्थापन व्हावीत अशी सूचना आढळते. एवढेच नव्हे तर याबाबतची सविस्तर योजनाहि या खलित्यांत दिली आहे. या विविध घटनांचा परिणाम म्हणूनच की काय इ. स. १८५८–५९ सालीं अनुदानाचे जे नवीन नियम तयार झाले त्यांत शिक्षकाच्या पगारावर मिळणाऱ्या अनुदानासाठी शिक्षक प्रशिक्षित ( qualified ) असला पाहिजे अशी अट घालण्यांत आली. त्यामुळे इ. स १८५८ मध्ये मंगलोर, बेऱ्हाणपूर, बेलोर, अहमदाबाद, धारवाड व कराची येथे असणाऱ्या प्रशिक्षण केंद्रांच्या ( normal schools ) आग्रा, बनारस, मीरत व अलमोरा येथे नवीन स्थापन झालेल्या केंद्रांची भर पडली. पुढे इ. स. १८६२–६३ मध्ये मध्यप्रांतांत ( Central Provinces ) नऊ व इ. स. १८८५ मध्ये पंजाबांत सात प्रशिक्षण केंद्रें सुरूं झाली. परंतु शिक्षकांच्या शिक्षणाची ही सर्व सोय प्राथमिक स्तरापर्यंतच मर्यादित होती. त्यामुळे माध्यमिक शाळेंतील शिक्षकांसाठी मद्रासमधील इ. स. १८५८ सालीं स्थापन झालेलें प्रशिक्षण केंद्र व लाहोर येथे इ. स. १८८० सालीं सुरू झालेलें केंद्र या दोनच संस्था अखिल भारतांत काम करीत होत्या. परंतु याचा अर्थ आपण शैक्षणिकदृष्ट्या फारच मागासलेले होतो असा मुळीच नव्हे. खुद्द इंग्लंडमध्ये इ. स. १८८२ मध्ये माध्यमिक शाळेंतील शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा प्रश्न ही एक वादग्रस्त बाब होती ! इ. स. १८८२ सालीं भारतीय प्रशिक्षणाचा विचार करण्यासाठी ज्या आयोगाची नेमणूक झाली त्या आयोगाने सरकारी व मदत शाळांतील ( aided ) शिक्षकांवर कायम नोकरीसाठी प्रशिक्षणाची अट घातली जावी असें सांगितलें. शिक्षकाच्या पगारावर मिळणाऱ्या सरकारी अनुदानासाठी व नोकरींत कायम होण्यासाठी प्रशिक्षणाची

---

"By training up a class of teachers you provide for the eventual expension of improved education to a portion of the natives of India, for exceeding that, which elementary instruction that could be immediately bestowed would have any chance of reaching."—

अट घातली गेल्याने यापुढील काळांत अनेक प्रशिक्षण संस्था निघाल्या. इ. स. १९०२ च्या सुमारास सादीपेठ, राजमहेंद्री, कुर्सिआंग, अलाहाबाद, लाहोर व जबलपूर अशा सहा ठिकाणीं प्रशिक्षण संस्था सुरू झाल्या. मुंबईंत अशी संस्था इ. स. १९०६ मध्ये निघाली. इ. स. १९०६-२१ या कालांत एकूण प्रशिक्षण संस्थांची संख्या सहावरून तेरावर गेली. शिक्षकाच्या प्रशिक्षणाच्या प्रश्नावर इ. स. १९१९ च्या कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशन व इ. स. १९३९ चे हॅरटॉग कमिशन यांनीहि आपल्या मान्यतेचा शिक्का मारला. पुढे इ. स. १९३७ ते १९४७ हा काल जोराच्या राजकीय लढ्यांत गेल्याने या प्रश्नाबाबत प्रत्यक्ष काम कांही झालें नाही. मात्र स्वातंत्र्य मिळाल्याबरोबर इ. स. १९४८ सालीं जें राधाकृष्णन कमिशन व त्यानंतर इ. स. १९५२ सालीं जें मुदलियार कमिशन नेमलें गेलें त्यांनी अधिक चांगल्या शिक्षणासाठी शिक्षकांच्या प्राशिक्षणाची व सेवाकालांतर्गत शिक्षणाची (in-service education) आवश्यकता सांगितली.

## आजची व्यवस्था :—

पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व विद्यापीठीय हे एकूण शिक्षणक्रमाचे सर्वसामान्य प्रमुख भाग आहेत. याशिवाय अंध व बहिऱ्या मुलांचें शिक्षण, बौद्धिकदृष्टचा मागासलेल्या मुलांचें शिक्षण, शारिरीकदृष्टचा अपंग मुलांचें शिक्षण अशा खास (special) शिक्षणाची व्यवस्था करावी लागतेच. परंतु यांपैकी कोणत्याहि प्रकारचें अगर कोणत्याहि पातळीवरील शिक्षण देणारा शिक्षक प्रशिक्षित असला पाहिजे हें आज मान्य झालें आहे. पूर्व प्राथमिक शाळांसाठी शिक्षक तयार करणाऱ्या सरकारमान्य (recognised) संस्था आज ठिकठिकाणी दिसतात. या संस्थांत मॅट्रिक झालेल्या विद्यार्थ्यास प्रवेश मिळतो. हा अभ्यासक्रम एक वर्षाचा असून त्यासाठी लेखी परीक्षेप्रमाणे प्रत्यक्ष अध्यापनकौशल्याचीहि परीक्षा पाठ (lesson) घेऊन द्यावी लागते. प्राथमिक शिक्षक तयार करणाऱ्या संस्थांना बुनियादी प्रशिक्षण महाविद्यालय (Basic training college) असें म्हणतात. इतके दिवस सातवी ते दहावीपर्यंत शिक्षण झालेल्या लोकांना बुनियादी प्रशिक्षण महाविद्यालयांत प्रवेश मिळत असे. हा अभ्यासक्रम दोन वर्षांचा आहे. शैक्षणिक तत्वज्ञान, मानसशास्त्र, शालेय व्यवस्था, अध्यापनपद्धति आदि विषयांचा अभ्यास, निवडलेल्या हस्तकलेचें (craft) नेमून दिलेलें काम, पाठ घेणें ह्या या अभ्यासक्रमांतील प्रमुख गोष्टी आहेत. प्राथमिक शाळांना अधिक चांगले शिक्षक मिळावेत या दृष्टीने इ. स. १९५८ पासून महाराष्ट्र राज्यांत मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या लोकांसाठीहि दोन वर्षांचा एक नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यांत आला आहे. प्राथमिक शिक्षणाचा वाढता पसारा लक्षांत घेतां

पुढील पांच दहा वर्षांत या महाविद्यालयांची संख्या वाढेल असा कयास बांधावयास हरकत नाही. पूर्व माध्यमिक (middle-school) शिक्षक तयार करणाऱ्या दोन प्रकारच्या संस्था महाराष्ट्रांत दिसतात. एस. टी. सी. व डिप टी. या दोन्ही प्रकारच्या संस्थांतून पूर्व माध्यमिक शिक्षकांना शिक्षण दिलें जातें. दोन्ही संस्थांचे अभ्यासक्रम एक वर्षाचे असून त्यांच्या अभ्यासक्रमाचा सांचा सामान्यपणें एकच आहे. माध्यमिक शाळांचे शिक्षक तयार करणाऱ्या प्रशिक्षण संस्थांपैकी (Secondary Teachers' Training College अगर B. Ed. College अशीं यांचीं नांवें असतात) कांही 'बेसिक' आहेत. मात्र या बुनियादी (basic) अगर इतरहि प्रशिक्षण महाविद्यालयांचा अभ्यासक्रम एक वर्षाचा असून या संस्थांत पदवीधरांनाच प्रवेश मिळतो. दोन्ही संस्थांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक तत्त्वें व परिपाठ, शैक्षणिक मानसशास्त्र, निवडलेल्या विषयाची अध्यापनपद्धति, शालेय व्यवस्था व आरोग्य आणि भारतीय शिक्षणाचा इतिहास अगर आधुनिक शैक्षणिक समस्या हे विषय अभ्यासावे लागतात. शैक्षणिक वर्ष जरी दहा महिन्यांचें असलें तरी प्रत्यक्ष कामासाठी सर्वसाधारणपणें पांच ते साडेपांच महिने मिळतात. या कालावधींत वर उल्लेखिलेल्या पांच विषयांच्या अभ्यासाच्या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना इतर कितीतरी काम करावें लागतें. पाठ पाहणें, पाठ घेणें, निबंध लिहिणें, अभ्यासपूरक कार्यक्रमांत भाग घेणें व त्यांचें नियोजन करणें, मानसशास्त्रीय प्रयोग करून त्यांची पद्धतशीर नोंद ठेवणें, टच्यूटोरियलसाठी निबंध लिहिणें इत्यादि कितीतरी कामांची अपेक्षा विद्यार्थ्यांकडून केली जाते. त्यामुळे कामासाठी मिळणारा वेळ व कामें यांचा मेळ घालतां घालतां विद्यार्थ्यांना मुष्कील होते. शिवाय विविध प्रांतांत व विविध विद्यापीठांत वरील प्रकारच्या करावयाच्या कामाबाबत, गुणांबाबत पुष्कळच फरक आहे. त्यामुळे कांही विद्यार्थ्यांना पुष्कळ काम करावे लागते. उदाहरणार्थ प्रांतपरत्वे घ्यावयाच्या पाठांची संख्या तीस ते साठच्या दरम्यान तर पहावयाच्या पाठांची संख्या दहा ते एकशेवीसच्या दरम्यान आढळते. कांही विद्यापीठांत प्रात्यक्षिक (practical) व लेखी (theory) परीक्षांतील श्रेणी (class) अलग अलग आहे, कांही ठिकाणीं प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेंत विद्यार्थ्यांस मिळणाऱ्या गुणांची बेरीज करून त्याची श्रेणी ठरविली जाते तर कांही विद्यापीठांत श्रेणीच दिली जात नाही. परंतु तपशीलांतील फरक हे फार महत्त्वाचे आहेत असें आम्हांस वाटत नाही. कारण शिक्षक-महाविद्यालयांतून चांगल्या प्रकारें प्रशिक्षित झालेला--शिक्षक बाहेर पडतो काय हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे. आता या दृष्टीने शिक्षक महाविद्यालयांतील अभ्यासक्रमाचा व इतर बाबींचा विचार करूं.

## (अ) विद्यार्थी शिक्षकांची निवड :—

प्राध्यापक महाविद्यालयांतून बाहेर पडणारे विद्यार्थी उत्तम शिक्षक असले पाहिजेत असें वाटत असेल तर विशिष्ट दर्जाच्याच लोकांना महाविद्यालयांत प्रवेश दिला पाहिजे. परंतु हें तत्व अमलांत आणण्याबाबतची प्रमुख अडचण म्हणजे फारच थोडे प्रज्ञावंत व प्रतिभावंत लोक शिक्षकी पेशाची निवड करतात. जागतिक शिक्षणयंत्रणेने याबाबत जी माहिती गोळा केली त्याचा सारांश सांगतांना म्हटलें आहे की "कार्यक्षम शिक्षकांचा अभाव हा एक सर्व ठिकाणी आढळणारा प्रश्न असून त्याचें प्रमुख कारण म्हणजे शिक्षकांना मिळणारा पगार !"* याच यंत्रणेने विविध देशांतील दर डोई उत्पन्न व शिक्षकांचा सरासरी पगार याबद्दलची जी माहिती

| देशाचें नांव | शिक्षकांचा सरासरी पगार | दर डोई उत्पन्न | चलन | शिक्षकाच्या वार्षिक पगाराचें दर डोई उत्पन्नाशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| इंग्लंड | ५४० | २२० | पौंड | २·५ |
| अमेरिका | ३,१०० | १,६०० | डॉलर्स | १.९ |
| डेन्मार्क | १३,००० | ४,१०० | क्रोनर | ३·२ |
| भारत | १,००० | २८० | रुपये | ३·६ |

* "Information from our member organisations throughout the world indicates that the shortage of competent teachers is growing in scope and severity......Among the many reasons for this growing and ominous shortage of teachers, one reason stands out so prominently that all others seem relatively inconsequential, namely, the notoriously unsatisfactory conditions of the teacher's compensation."—The year book of education—Evans Brothers Ltd. 1953—Page 102.

इ. स. १९५२ मध्ये मिळविली तीहि या संदर्भांत उद्बोधक आहे. त्या माहितीपैंकी कांही राष्ट्रांची आंकडेवारी खाली दिली आहे :--*

परंतु आकडेवारीच्या गुंतावळींत न पडतांहि आज आपल्या देशांत मुला-मुलींच्या मनांत काय स्थान आहे हें सहज अजमावितां येतें. विवाहेच्छू मुली सांगतात, "मला शिक्षक नको ! बाकी कोणीहि चालेल." शाळेंतल्या मुलांना "तुम्ही पुढे कोण होणार ?" असें विचारलें तर 'शिक्षक' असें उत्तर क्वचितच मिळतें. याचाच अर्थ असा की समाजांतील चांगल्या थरांतील व बुद्धिमान लोक या पेशाकडे आकर्षित होण्यासाठी शिक्षकांच्या वेतनश्रेणींत वाढ करणें व समाजा-तील त्यांचें स्थान उंचावणें आवश्यक आहे. स्वातंत्र्योत्तर कालांत भारतांत या दिशेने हळूहळू का होईना पण योग्य दिशेने प्रयत्न सुरू आहेत.

अध्यापक महाविद्यालयांनीहि विद्यार्थ्यांची निवड करतांना कांही निकष वापरले तर शाळांना अधिक चांगले शिक्षक मिळू शकतील. राधाकृष्णन कमिशनच्या परिशिष्ट 'एक' मध्ये विविध अध्यापक महाविद्यालयांत प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्यांची व प्रत्यक्ष प्रवेश घेणाऱ्यांची आकडेवारी दिली आहे. त्या परिशिष्टा-वरून धावती नजर फिरविली तरी असें आढळून येईल की महाविद्यालयांना 'निवड' करण्याला पुष्कळच वाव असतो. आज पदवीपरीक्षेंतील कमीअधिक यशावरून प्रवेश दिला जातो. प्रवेश घेऊं इच्छिणाऱ्या व्यक्तींत कोणते गुण आहेत, वृत्ति कशी आहे, जीवनविषयक दृष्टिकोन काय आहे, आवडीनिवडी कोणत्या आहेत याची महाविद्यालयाच्या अधिकाऱ्यांना कांहीच कल्पना नसते. या दृष्टीने विचार करता प्रत्यक्ष मुलाखत घेऊन व जमल्यास कांही कसोटयांचा (Test) वापर करून प्रवेश द्यावयाचा की नाही हे ठरविणें इष्ट वाटते. 'शिक्षण म्हणजे व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास' ही व्याख्या प्रत्यक्षांत साकार व्हावयाची असेल तर विद्यार्थी शिक्षकांची (Pupil Teachers) निवड अधिक कसोशीने केलीच पाहिजे. म्हणूनच श्री. डेंट यांनी म्हटलें आहे की 'या पेशासाठी आवश्यक असणारी वृत्ति, स्वभाव, बुद्धि व चारित्र्य असणारे लोक या धंद्यांत पडल्याशिवाय शिक्षणांत सुधारणा घडवून आणणें शक्य होणार नाही.' †

---

* ही माहिती The Year Book of Education—1953—Evans Brothers या ग्रंथांत पृ. १०६ वर आहे.

† "Unless we improve substantially the quality of the teaching force and above all see that only men and women fitted by temperament, character, intelligence and attitude to teaching

(पुढे चालू)

## (आ) पुराणांतील वांगीं :--

प्रतिभावंत व प्रज्ञावंत लोक अध्यापक महाविद्यालयांत दाखल झाले तर एकूण शिक्षणाचा दर्जा उंचावेल यांत संशयच नाही परंतु अध्यापक महाविद्यालयांतील अभ्यासक्रमाचीं ध्येयें व उद्दिष्टें कोणतीं हें ठरवून जर महाविद्यालयांतील कामाची आखणी केली तर तीं ध्येयें साकार होण्याची शक्यता वाढेल. शैक्षणिक पुनर्रचनेच्या कामांत हातभार लावणारे शिक्षक केवळ 'सांगकामें' असता कामा नयेत. शिक्षणविषयक विशिष्ट श्रद्धा (convictions), व जीवनविषयक विशिष्ट वृत्ति (attitude) घेऊनच विद्यार्थी शिक्षक महाविद्यालयाच्या परिसरांतून बाहेर पडले पाहिजेत. परंतु आजचे प्रशिक्षित शिक्षक प्रशिक्षणकालांत ऐकलेल्या, पाहिलेल्या अगर प्रत्यक्ष आचरलेल्या गोष्टींचा उपयोग दैनंदिन अध्यापन कार्यांत क्वचितच करतात. पूर्वीच्या बायका बासनांत बांधून ठेवलेल्या आपल्या शालू पैठण्या ज्याप्रमाणे कांही 'खास' प्रसंगीं बाहेर काढीत असत त्याप्रमाणे प्रशिक्षित शिक्षक शाळेची वार्षिक तपासणी अथवा अशाच प्रकारच्या अन्य प्रसंगीं प्रशिक्षण महाविद्यालयांत शिकलेल्या अध्यापनपद्धतीचा वापर करतात--"असें कां ?" असा प्रश्न केल्यास विविध उत्तरें ऐकावयास मिळतात. महाविद्यालयांत प्रतिपादिल्या जाणाऱ्या अध्यापनपद्धति गोंडस दिसल्या व ऐकायला बऱ्या वाटल्या तरी 'व्यवहार' दृष्टचा त्या फलदायी ठरत नाहीत. या पद्धतीने शिकवायाचें म्हटलें तर अभ्यासक्रम पूर्ण करणें शक्य होत नाही. पाठ घेणें वेगळें व शाळेंत शिकविणें वेगळें--अशा प्रकारचीं विधानें ऐकावयास मिळतात. याचाच अर्थ असा की पुराणांतील वांगीं पुराणांतच राहतात ! ही स्थिति बदलावयाची असेल तर महाविद्यालयाचा उंबरा ओलांडून विद्यार्थी शिक्षक बाहेर पडले की आपलें कर्तव्य संपलें; प्रशिक्षणाचा ते दैनंदिन अध्यापनांत उपयोग करतात की नाही, नसल्यास कां करीत नाहीत हें पाहणें कांही आपल्या कर्तव्याच्या कक्षेंत येत नाही अशी आत्मसंतुष्ट वृत्ति महाविद्यालयीन अधिकाऱ्यांनी टाकून दिली पाहिजे. शिक्षकांना हीं महाविद्यालयें एकाद्या दीपस्तंभाप्रमाणे वाटलीं पाहिजेत. शालेय परिसरांत उत्पन्न होणाऱ्या विविध समस्यांची उकल कशी करावी याबाबतचें मार्गदर्शन मिळविण्यासाठी अध्यापकांनी महाविद्यालयांकडे धाव घेतली पाहिजे तसेंच आपल्या अध्यापनपद्धति, आपलीं तत्त्वें व्यवहाराच्या निकषावर घासून पाहण्याची कर्मभूमि संशोधन शाळा म्हणून महाविद्यालयीन प्राध्यापकांनी शाळांकडे पाहिलें पाहिजे

---

are allowed to become teachers, we may look, but we shall look in vain, for any reform in education, however much we may improve the organization, plant and amenities of the public system of education."--To be a teacher—Dent Page 29.

शाळा आणि अध्यापक महाविद्यालयें यांचा असा परस्परपूरक संबंध स्थापन झाला तरच शैक्षणिक नवरचनेच्या कामांतला आपला वांटा महाविद्यालयें उचलूं शकतील.

## (इ) अनुभव हीच कसोटी :—

महाविद्यालयांनी अशा प्रकारची भूमिका पार पाडण्यासाठी पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे आपल्या विद्यार्थ्यांत विशिष्ट प्रकारच्या श्रद्धा व वृत्ती कशा निर्माण होतील व रूजतील याकडे प्राध्यापकांनी विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. एक-दोन उदाहरणें दिल्याने मुद्दा अधिक स्पष्ट होईल. अध्यापक महाविद्यालयांत ह्युरिस्टिक मेथड, डाल्टन प्लॅन, प्रॉजेक्ट मेथड, ॲक्टिव्हिटि मेथड आदि अनेक आधुनिक अध्यापनपद्धतींचीं गुणवर्णनें केलीं जातात. मात्र त्या पद्धतींचा केलेला उपयोग अथवा उपयोग करून पाहण्याची संधि प्रशिक्षणकालांतहि विद्यार्थी शिक्षकांना सहसा मिळत नाही. सामाजिक अध्ययनासारखा विषय प्रत्यक्ष निरीक्षण, दैनंदिन वर्तमानपत्रें व गटवार काम यांसारख्या साधनांचा उपयोग करून चांगला शिकविता येतो असें प्राध्यापक वर्गांत सांगतात. परंतु विद्यार्थी शिक्षक त्यांच्याकडे पाठासाठी 'मार्गदर्शन' घेण्यासाठी गेले म्हणजे प्रश्नपद्धति व कथनपद्धतीचाच वापर करण्यास सांगितलें जातें. तसेंच प्रोजेक्टर, टेप रेकॉर्डर, एविडायस्कोप, रेडिओ, ग्रामोफोन हीं आजच्या कालांतील फार महत्त्वाचीं शैक्षणिक साधनें आहेत असें सांगून का या साधनांच्या उपयोगितेबद्दल विद्यार्थी-शिक्षकांच्या मनांत त्याबद्दल विश्वास निर्माण होईल ? दृक्श्राव्य (audio-visual) साधनांचा उपयोग केल्याने अमूर्त वाटणाऱ्या गोष्टी विद्यार्थ्यांच्या मनःचक्षूंपुढे कशा साकार होतात, पाठांतील माहिती व प्रत्यक्ष जीवन यांचा दुवा जोडण्यास कशी मदत होते व त्यामुळे दिलेली माहिती स्मरणांत राहण्यास कशी मदत होते याचे प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थी-शिक्षकांना मिळाले पाहिजेत. बऱ्याच अध्यापक महाविद्यालयांत क्वचित प्रसंगीं व तुरळक संस्थांत बऱ्याच वेळीं असे अनुभव विद्यार्थी-शिक्षकांना मिळत असतीलहि ! परंतु श्रद्धा निर्माण करण्याच्या दृष्टीने हे अनुभव तोकडे पडतात. त्याचप्रमाणे वरील प्रकारच्या पद्धतींचा सर्रास वापर करावयाचा म्हणजे शाळांच्या त्याबाबतच्या सहकार्याचा प्रश्न उद्भवतो. परंतु हें सहकार्य मिळविण्याचे सर्व प्रकारचे प्रयत्न महाविद्यालयीन अधिकाऱ्यांनी केले पाहिजेत. ज्या शाळांना महाविद्यालयांकडून शिक्षक मिळत असतात त्या शिक्षकांच्या शिक्षणासाठी सर्व प्रकारचें सहकार्य शाळांनी दिलें पाहिजे. अमेरिका अगर इंग्लंडमध्ये अशा प्रकारच्या सहकार्याचा प्रश्न उद्भवत नाही. आपल्याकडील अध्यापक महाविद्यालयांना हा प्रश्न सतावत असेल तर संबंधित विद्यापीठांनी याबाबत योग्य ते प्रयत्न केले पाहिजेत.

## (ई) विषयज्ञानाची कमीतकमी पातळी :--

माध्यमिक ( secondary ) शिक्षकांसाठी असणाऱ्या अध्यापक महाविद्यालयांत प्रवेश मिळविण्यासाठी अर्जदाराने कोणत्या ना कोणत्या विषयांत पदवी प्राप्त केलेली असावी लागते. स्वाभाविकच ज्या विषयाचे ते पदवीधर आहेत त्याचे एका विशिष्ट पातळीपर्यंतचें ज्ञान त्यांनी आत्मसात केलें आहे अशी अपेक्षा ठेवणें योग्यच होय. परंतु दुर्दैवाने ही अपेक्षा रास्त ठरत नाही. अध्यापन परिपापाठासाठी विद्यार्थी-शिक्षक जे विषय निवडतात त्याबाबतचें त्यांचें ज्ञान सखोल असावयास हवें. म्हणूनच अनेक महाविद्यालयांत विषय ज्ञानाची ( subject knowledge ) चाचणी घेण्यांत येते. पुष्कळ ठिकाणीं तर विद्यार्थी-शिक्षकाचें ज्ञान एस. एस. सी. च्या दर्जाचें आहे की नाही इतकेंच या चाचणींत पाहिलें जातें. वैयक्तिकरीत्या आम्हाला हें बरोबर वाटत नाही. शाळांतील वाढते अभ्यासक्रम व शिक्षकांकडून केल्या जाणाऱ्या वाढत्या अपेक्षा लक्षांत घेतां शिक्षकांचें ज्ञान प्रगाढ असलें पाहिजे. परंतु गंमत अशी की अशा प्रकारच्या चांचण्यांतहि बहुसंख्य विद्यार्थी-शिक्षक उत्तम गुण मिळवूं शकत नाहीत ! खरें पाहतां या चांचण्यांत उत्तीर्ण न होऊं शकणाऱ्यांना प्रवेश तरी नाकारला पाहिजे अगर त्यांचें विषयज्ञान वाढविण्याची जबाबदारी तरी स्वीकारली पाहिजे. परंतु पांच साडे पांच महिन्यांच्या कालावधींत विषयज्ञानाची पातळी उंचावण्याचें उद्दिष्ट ठेवणें सर्वथैव अव्यवहार्य ठरतें. हें उद्दिष्ट साधावयाचें असेल तर प्रशिक्षणकाल कमीतकमी दोन वर्षांचा करावा लागेल. राहतां राहिला प्रवेश नाकारण्याचा मार्ग ! तो संस्थांना परवडत नाही म्हणून की काय इतर विषयांत ज्यांचा कस कमी वाटतो त्यांना विशेष अध्यापन पद्धति ( special method ) म्हणून मराठी विषय घेण्याची सूचना कांही वेळा केली जाते. कोणीहि सोम्यागोम्याने इंग्रजी, शास्त्र अगर गणित शिकविणें जितकें चूक ठरेल तितकेंच कोणीहि मराठी शिकविणें घातक ठरतें. मराठी 'येणें' निराळें आणि 'शिकवितां येणें' निराळें ! अशा परिस्थितींत दयार्द्र बुद्धीने कमी प्रतीच्या शिक्षकांना 'खपवून' घेतलें जातें. परंतु याचा परिणाम पुढे कित्येक वर्षें व कित्येक मुलांवर होणार असतो हें लक्षांत घेतलें तर या बाबतींत महाविद्यालयीन अधिकाऱ्यांनी थोडे कठोर बनणेंच श्रेयस्कर ठरेल असेंच कोणीहि म्हणेल. मात्र अध्यापक महाविद्यालयांत करतां येण्यासारखी एक गोष्ट म्हणजे आपलें विषयज्ञान अद्यावत केलें पाहिजे व तें सखोल असलें पाहिजे ही जाणीव विद्यार्थ्यांत निर्माण करणें. अध्यापक महाविद्यालयांच्या ग्रंथालयांत 'विषय शिकवावेत कसे ?' हें सांगणारीं पुस्तकें असतात. उदाहरणार्थ, 'मराठीचें अध्यापन' या विषयावरील पुस्तकें असतात पण नवीन कादंबऱ्या, नाटकें, कथा, कविता या पुस्तकांची संख्या फारच कमी असते. पण अशी त्या त्या विषयाचीं आधुनिक पुस्तकें ग्रंथालयांत

असलीं पाहिजेत. अशीं पुस्तकें आणणें जसें शक्य आहे तसेंच विद्यार्थी शिक्षकांचे विषयवार गट पाडून नवीन वाङ्मयाबद्दलची उपलब्ध माहितीची चर्चा करण्यासाठी मंडळेंहि स्थापन करता येतील. अशा प्रकारच्या उपक्रमामुळे आपलें विषय-ज्ञान अद्यावत व सखोल ठेवण्याची वृत्ति कांही विद्यार्थी-शिक्षकांत निर्माण झाल्याविना राहणार नाही. सध्याच्या परिस्थितींत 'हेंहि नसें थोडकें' असें तुम्हाला नाही वाटत ?

## (उ) मानसशास्त्राचा अभ्यास, नव्हे दर्शन !

आधुनिक शिक्षणशास्त्रांत मानसशास्त्राला निरतिशय महत्त्व दिलें जातें. आजचें शिक्षण विद्यार्थी-केंद्रित (pupil-centered) आहे असें म्हणतात. त्याचा अर्थ असा की ज्या विद्यार्थ्यांना शिकवावयाचे त्यांच्या आवडीनिवडी, वृत्ति, कल, शारीरिक व मानसिक वाढ यांची दखल घेऊन विषय शिकविणें अधिक इष्ट ठरतें. पूर्वी -ग्रीक, लॅटिन, संस्कृत, गणित यासारखे विषय महत्त्वाचे मानले जात असत. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या गळीं ते विषय उतरविण्याचा प्रयत्न होत असे. आज सर्वच विषयांना महत्त्व आहे म्हणून विद्यार्थ्यांचें मन ओळखणारा शिक्षक हवा. तसेंच आपला विषय अधिक रसपूर्ण (interesting) कसा करावा, विद्यार्थ्यांत त्या विषयाबद्दलची गोडी कशी निर्माण करावी हें समजण्यासहि मानसशास्त्राचा फार उययोग होतो. आपण पंतोजी (pedagoque) नसून शिक्षक (educator) आहोंत हें समजण्यास या शास्त्राची शिक्षकांस मदत होते. या दृष्टीनेच अध्यापक महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमांत महत्त्वाचें स्थान देण्यांत येतें.

परंतु अशा रीतीने शिक्षकास मानसशास्त्राचा अध्यापनकार्यांत उपयोग होण्यासाठी मानसशात्राचा केवळ अभ्यास करून भागणार नाही. आज आपण पुस्तकांत वर्णन केलेल्या विशिष्ट मुलांच्या मनाची माहिती पाठ करतो. पण ही माहिती सजीव स्वरूपांत आपल्यापुढे वावरत असते, त्याकडे मात्र दुर्लक्ष करतो. मुलांच्या मनाचें ज्ञान प्रत्यक्ष अनुभव, निरिक्षणाने मिळवून त्याला प्राध्यापकांच्या व्याख्यानांची, चर्चांची व पुस्तकांच्या परिशीलनांची जोड असावी. * या संदर्भांत

---

* इंग्लंडमधील अध्यापक महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमाबाबत लिहितांना राजेसाहेबांच्या पर्यवेक्षकांनी (His Majesty's Inspectors) सांगितलें की— "All students should get to know as much as possible about children from first-hand contact with them in and out of schools. The basis of the study should be guided observation and recording,

(पुढे चालू)

विविध राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी युनेस्कोने इ. स. १९४८ सालीं घेतलेल्या चर्चासत्रांत (seminar) केलेल्या सूचना विचारार्ह आहेत. त्यांच्या मतें खालील प्रकारचीं प्रात्यक्षिकें विद्यार्थ्यांना करावयास लावावीं. *

(१) क्रिडांगणांवर मुलांचें निरीक्षण करा. मुलें कोणते खेळ खेळतात त्यांची नोंद करा. एकमेकांस तीं कशी मदत करतात अगर टीका करतात त्याचें टिपण करा. त्या मुलांपैकी कोणतीं मुलें नेतेपण करतात ? तींच मुलें नेते बनण्याचीं कांही कारणें तुम्ही सांगू शकाल का ? मुलें जे खेळ खेळतात त्याचा तुम्हांला वर्गांत उपयोग करून घेतां येईल का ? कसा ?

(२) एखाद्या विद्यार्थ्याचा संपूर्ण व सविस्तर अभ्यास (case-study) करणें. त्या विद्यार्थ्याची कौटुंबिक, मानसिक व शारीरिक माहिती मिळविणें, या माहितीचा व त्याच्या शालेय प्रगतीचा (scholastic achievement) कांही मेळ आहे का हें पाहणें. त्या विद्यार्थ्यांतील विशिष्ट वृत्तींची—धीटपणा,

---

strengthened by discussion, reading and lectures."—Memorandum on the Training College Curriculum—Page 2.

हीच गोष्ट स्कॉटिश अॅडव्हायझरी कौंसिलने सांगितली आहे. "If the psychology course does not, in fact, fertilise the teacher's professional work, it should either be modified in such a way that it will or be omitted from the professional training and counted as one of the optional subjects. We believe that the subject can effect this fertilization, but it will do so only if it begins and frequently returns to the actual child ......Through this experience he should learn that to observe and how to observe and group discussions of his observation will inevitably lead him to make excursions into paychology proper. He will thus obtain a thorough knowledge of child development and of the ways in which psychology can help him in handling children and presenting educational activities to them at the various stages of development. He will obtain that psychological insight which is of more importance to the teacher than the knowledge about psychology together with a sympathetic understanding of children and a respect for their liberty of development."—The Training of Teachers—Page 18-19.

* The education and training of teachers towards world understanding—II Unesco—Page 9-10.

बुजरेपणा, नम्रता, उद्यमशीलता—कारणें त्याच्या कौटुंबिक वातावरणांत आहेत की काय याचा मागोवा घेणें. त्या मुलांतील दोष दूर कसे होतील अगर जरूर त्या वृत्तींची वाढ कशी करता येईल याचें विवेचन करणें.

(३) आलेख (sociogram) तयार करणें:-- एकाद्या वर्गांतील विद्यार्थीत एकमेकांबद्दल असणाऱ्या आवडीनिवडीचा आलेख तयार करणें. या आलेखामुळे वर्गांतील कोणती मुलें अधिक लोकप्रिय आहेत अगर नावडती आहेत हें समजूं शकतें. स्वाभाविकच तीं मुलें प्रिय अगर अप्रिय होण्याचीं कारणेंहि समजूं शकतात.

(४) बुद्धिमापन कसोटी—यांसारख्या कसोटयांचा प्रत्यक्ष वापर करून पाहणें.

(५) स्मरण, अध्ययनाचे नियम आदि बाबतींत जे विविध मानसशास्त्रीय प्रयोग प्रायोगिक मानसशास्त्रांत आपण करतो त्यांच्या निष्कर्षांचा प्रत्यक्ष अध्यापनांत उपयोग करून पाहण्यास विद्यार्थी शिक्षकांना प्रवृत्त करणें.

(६) महाविद्यालयांत अगर आसपास असणाऱ्या शिशु मार्गदर्शन केंद्रांत (child guidance clinic) जाऊन तेथील मुलाचें व त्यांना कशा प्रकारें मार्गदर्शन केलें जातें याचें निरीक्षण करणें.

हीं प्रात्यक्षिकें यशस्वी रीतीने पार पाडण्यासाठी विद्यार्थी शिक्षकांना प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. शिवाय अशा प्रकारचें काम कसें करावें याबद्दल सामान्य सूचनाहि त्यांना द्याव्या लागतील. अशाप्रकारचा एक सूचनात्मक सांचा Training for teaching in India and England या पुस्तकांतील परिशिष्ट एक व दोनमध्ये दिला आहे. मानसशास्त्राचा केवळ पुस्तकी अभ्यास नव्हे तर त्याचें प्रत्यक्ष दर्शन विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारें घडवावयाचें हा तपशिलाचा प्रश्न जरी बाजूला सारला तरी एक गोष्ट स्पष्ट आहे. ती गोष्ट म्हणजे विद्यार्थी-शिक्षकांनी आपल्या भावी अध्यापनकार्यांत मानसशास्त्रीय अभ्यासाचा उपयोग करावा असें वाटत असेल तर पुस्तकी अभ्यासास प्रात्यक्षिकांची (practicals) जोड देणें अत्यावश्यक आहे.

## (ऊ) मज गडे चंद्र हवा !

बी. एड्. च्या अभ्यासक्रमांत शालेय व्यवस्था व शालेय आरोग्य (School organisation and school hygiene) असाहि एक विषय असतो.

शाळांचीं वेळापत्रकें, विविध प्रकारचीं नोंद पुस्तकें ( record-books ) मुख्याध्यापक व इतर शिक्षक यांचें स्थान व संबंध, शाळेची इमारत, फर्निचर, शारीरिक तपासणी ( medical examination ), जीवनसत्वयुक्त मधल्या वेळचें खाणें, आदि अनेक बाबींचा अभ्यास या विषयांत अपेक्षित असतो. परंतु बरेच वेळा अनेक विद्यार्थ्यांना या विषयांत रस वाटत नाही. ज्या आपल्या देशांत विद्यार्थ्यांच्या डोक्यावर छपराची सावली कशीबशी उभी केली जाते तिथे इमारतींचे व फर्निचरचे प्रकार, प्रकाशयोजनेबद्दलचे नियम केवळ सांगून काय उपयोग? या विषयाची व्याख्यानें ऐकतांना वाटतें की मृगजळाने का कोणाची पाण्यांची तहान भागते? हात वर केले म्हणून का आकाशांतील चंद्र हातांत येईल? त्यामुळे परीक्षेंत लिहावयाची माहिती याच दृष्टीने केवळ या विषयाकडे पाहिलें जातें. परंतु गावांतील शाळांची पाहणी ( survey ) करून शाळांच्या इमारती, त्यांतील फर्निचर, क्रीडांगणें, डबे खाण्याची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यांची नोंद करून त्याबाबत जाणवणाऱ्या दोषांची व त्याबाबत योजतां येण्यासारख्या उपायांची चर्चा विद्यार्थी शिक्षकांनी केल्यास निदान चंद्राचें प्रतिबिंब तरी पकडल्यासारखें होईल. शाळांतील व्यवस्थेबद्दल अगर आरोग्याबद्दलचें हें निरीक्षण विद्यार्थी-शिक्षकांनी कोणत्या दृष्टीने करावें हें सांगणारें एक परिशिष्ट Training for teaching in India and England या पुस्तकांत दिलें आहे.

## (ए) जहाजाला सुकाणूं व जीवनाला तत्वज्ञान हवें :—

केवळ अध्यापनाचें तंत्र अगर कांही खुब्या ( tricks ) शिकविणें हें कांही आजच्या अध्यापक महाविद्यालयांचें ध्येय नव्हे. जें नवें समाजशिल्प आपल्याला उभारावयाचें आहे त्याचा शिक्षक हा एक शिल्पकार आहे. परंतु ही भूमिका पार पाडण्यासाठी शिक्षकांस जीवनाबद्दलचा दृष्टिकोन, मूल्यांची जाणीव, त्या मूल्यांची जिद्दीने जोपासना करण्याची तळमळ व निराकार रूपाने आपल्या मनांत वास करणारीं मूल्यें आपल्या विद्यार्थ्यांत साकार करून पाहण्याची इच्छा इत्यादि गोष्टी आवश्यक आहेत. अशा प्रकारचे शिक्षक असावेत अशी इच्छा करून ते निर्माण होण्यास आपण कांही कल्पवृक्षाखाली राहात नाही! म्हणून आपल्याला असे शिक्षक निर्माण करावे लागतील. ज्या अध्यापक महाविद्यालयांत केवळ परीक्षांना आवश्यक असणारी माहिती दिली जाते व अभ्यास आणि अन्य कार्यक्रम या दोन स्वतंत्र गोष्टी मानल्या जातात, तिथे अशा प्रकारचे शिक्षक तयार होऊं शकणार नाहीत. ज्या महाविद्यालयांतील वातावरणाचा परिपाक म्हणून विद्यार्थी-शिक्षकांच्या व्यक्तित्वाचे विविध पैलू, उत्साह आणि श्रद्धा, ध्येयाकांक्षा आणि जीवनमूल्यें

उजळून निघतील तींच महाविद्यालयें देशाला वरील प्रकारचे शिक्षक देऊं शकतील.* अशा प्रकारचें वातावरण कसें तयार करावयाचें हा प्रश्न म्हणजे अध्यापक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी व प्राध्यापकांनी एकत्र येऊन ठरविण्याची बाब आहे. परंतु एक सुरवात म्हणून पुढील कांही गोष्टी करतां येतील :––

(१) साप्ताहिक प्रार्थना व प्रार्थनोत्तर भाषण ठेवणें. मात्र ही प्रार्थना फार लांबलचक नसावी व त्यावेळीं प्रार्थनेस योग्य असें वातावरण ठेवण्याची दक्षता घ्यावी. कोणताहि एकादा चांगला विचार निवडून त्यावर दहा पंधरा मिनिटें प्रार्थनोत्तर भाषण व्हावें. मनाची एकाग्रता करणें, चिंतांच्या जंजाळांतून मन काढून घेऊन केवळ दहा मिनिटें स्तब्ध राहणेंहि किती आवश्यक आहे व त्यासाठी प्रार्थना साधनमय ठरूं शकते याची जाणीव विद्यार्थी-शिक्षकांना दिल्यास प्रार्थनेच्या वेळीं वातावरण गंभीर राहण्यास मदत होते.

(२) महाविद्यालयांतील वातावरण अत्यंत निरामय आहे व वैयक्तिक हेव्यादाव्यांना येथे स्थान नाही याची प्रतीति विद्यार्थी-शिक्षकांना यावी. तसेंच प्राध्यापकवर्ग तत्वनिष्ठ व आचारवान असल्यास त्यांच्या वागणुकीचा खोल ठसा विद्यार्थ्यांच्या मनावर उमटल्याविना राहत नाही.

(३) विविध धर्म व विचारशाखा यांचा अंतिम उद्देश एकच आहे हें सांगणारी भाषणमाला योग्य व्यक्तींनी गुंफावी. अधिकारी व्यक्तींनाच यासाठी पाचारण करण्याची दक्षता घेतली जावी.

(४) चिरकाल टिकणारें समाधान, ऐहिक आकांक्षा अगर पैसा यांमुळे मिळतेंच असें नाही हें मनावर ठसविण्यासाठी भिन्नभिन्न मूल्यांची प्राणापलीकडे जपणूक करणाऱ्या व्यक्तींना शक्य असल्यास विद्यार्थ्यांसमोर आपले विचार मांडण्याची विनंती करावी.

(५) अध्यापन हा केवळ एक पेशा नसून तो एक धर्म आहे ही भावना विद्यार्थी शिक्षकांत प्रज्वलित करावी.

---

* ही गरज सर्वदूर आहे हें पुढील अवतरणावरून दिसून येईल—

"Though living in such an enviornment the student should acquire the scholarship, professional knowledge and skill he needs; but it should above all be an enviornment in which he will acquire, as lasting qualities of personality. The ideals, standards, attitudes, enthusiasm and faith that will determine the vitality of his educational work."—Training of teachers Scottish Council of Education—Page 9.

## (ऐ) अध्यापन परिपाठ : एक परीक्षणनलिका :--

मानसशास्त्र, शैक्षणिक तत्वज्ञान, शालेय आरोग्य व व्यवस्था या विषयांच्या व्याख्यानांत सामान्यतः व विशेषेंकरून अध्यापनपद्धतीच्या चर्चेत जें ऐकलेलें असतें तें कसाला लावून पाहण्याची संधि अध्यापन परिपाठाद्वारें विद्यार्थी शिक्षकांना मिळतें. यादृष्टीने विचार केल्यास अध्यापक महाविद्यालयांतील कार्यक्रमांपैकी एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे अध्यापन परिपाठ ( Practice teaching ) असें म्हणावें लागेल. परंतु प्रत्यक्षांत मात्र हा परिपाठ म्हणजे जात्यावरील दळण असें अनेक विद्यार्थी शिक्षकांना वाटतें. असें वाटण्याचें एक प्रमुख कारण म्हणजे सर्व पाठ एकाच साच्याचे वाटतात.* अनेक अध्यापनपद्धतींची तात्विक चर्चा महाविद्यालयांतील वर्गांत कानावर पडते. पण ती चर्चा महाविद्यालयांची लक्ष्मण-रेषा ओलांडून बाहेर पडून कार्यवाहीत आलेली दिसत नाही. याचें एक कारण याच प्रकरणांत पूर्वी सांगितलें आहे. तें म्हणजे विविध अध्यापनपद्धतींचा वापर करून पाहण्याऐवजी हर्बर्टसाहेबांचेच पाय नेहमी धरलें जातात ! विविध अध्यापनपद्धतींच्या उपयोगाकडे जसे दुर्लक्ष होते तसेच अध्यापन परिपाठाच्या कार्यक्रमांत विविध प्रकारच्या पाठांकडेहि दुर्लक्ष होतें.† उदाहरण देऊनच बोलावयाचें म्हटलें तर भाषेच्या पाठांत बहुधा स्थूलाभ्यास व क्वचित् सूक्ष्माभ्यासाचे पाठ घेतले जात असले तरी व्याकरण, लेखन, लेखनदोष, वाचन आदि पाठ फारसे घेतले जात नाहीत, आणि यदाकदाचित् घेतलेच तर फारसे खोलांत कोणी शिरत नाही ! सांगितलें तर आश्चर्य वाटेल परंतु अपठित गद्याचा उतारा व क्रमिक पुस्तकांतील गद्य उतारा हे दोन्ही अगदी एकाच पद्धतीने हाताळलें गेलेलें अनेकांनी पाहिले असतील. परंतु शाळांतील विद्यार्थ्यांचें लेखन अधिक दर्जेदार होण्यासाठी लेखन-विषयाची चर्चा करतांना कोणती दक्षता घ्यावयास हवी, चर्चेच्या वेळीं विद्यार्थ्यांना

---

* एका प्राचार्यांनी मांडलेलें या प्रकारचें मत डॉ. पीरेस यांनी आपल्या पुस्तकांत पुढीलप्रमाणे नमूद केलें आहे--

"Lessons tend to be uiformly decorative, revealing a plentiful lack of originality and approach."—Better Teacher Education —Page 113.

† एका प्राचार्यांचें अशाच प्रकारचें मत डॉ. पीरेस यांनी आपल्या पुस्तकांत नमूद केलें आहे--

"Lessons tend to be uniformly decorative, revealing a plentiful lack of originality and approach."—Better Teacher Education—Page 113.

क्रमांक अनुक्रम... दिनांक... क्रमांक... नों. दि.

बोलके कसें करावें, लेखनदोष दूर करण्यासाठी चुकांबद्दल मार्गदर्शन कसें करावें, हे दोष दूर करण्यासाठी कोणते उपाय योजावेत, विद्यार्थ्यांचे उच्चारदोष दूर कसे करता येतात याबद्दल प्रत्यक्ष अनुभव-निरीक्षणांतून विद्यार्थी शिक्षकांनी विविध प्रकारचें कौशल्य प्राप्त केल्याशिवाय महाविद्यालयांतील अध्यापनपद्धतींचा त्यांना पुढील आयुष्यांत उपयोग होणार नाही अगर या पद्धतींविषयी त्यांच्या मनांत श्रद्धा उत्पन्न होणार नाही. अध्यापनविषयक सिद्धांतांची सत्यता अजमाविणारी एक परीक्षणनलिका म्हणजे अध्यापन धर्मपाठ असें विद्यार्थी-शिक्षकांना वाटल्यास आज झांपड बांधलेल्या बैलाप्रमाणे विशिष्ट संख्या पूर्ण होईपर्यंत ते जसे त्याचत्याच चाकोरींतून फिरत असतात त्यास आळा बसेल* आज अनेक शाळांना आलेलें 'कोचिंग क्लासेस'चें स्वरूप जाऊन तीं चैतन्यमय संस्कारकेंद्रें बनावयाचीं असतील तर अनेक अद्ययावत अध्यापनपद्धतींचा उपयोग करणें त्यासाठी इष्ट ठरेल. आजच्या अध्यापक महाविद्यालयांनी अशा प्रकारच्या पद्धतींवर श्रद्धा ठेवून त्यांचा वापर करणारे शिक्षक निर्माण केले पहिजेत असें मुदलियार आयोगानेहि आपल्या अहवालांत सांगितलें आहे.† या दृष्टीने जरूर तर अध्यापक महाविद्यालयांनी आत्मपरीक्षण करणेंहि हितकारक ठरेल.

## (ओ) अध्यापन परिपाठाचे नियोजन :--

अध्यापन परिपाठाचा हा कार्यक्रम कसा आंखावा याबद्दलच्या विविध पद्धति

---

* अशाच प्रकारचा विचार पुढील अवतरणांत मांडलेला आढळेल--

"Theory and practice corelate natuarlly and cannot be separated without doing violence to both. Theory without practice is sterile and even dangerous; practice without theory is blind......Unless the two interpenetrate, inform and complete each other, neither will be vital or dynamic. This is especially true with regard to teaching, for without a realization of individual differences or the needs of children, teaching can never be more than a mere trial and error affair and will degenerate into mere technique, a shadow without substance."—Training for Teaching in India and England—Page 115.

† "But every teacher and educationist of experience knows that even the best curriculum and the most perfect syllabus remain dead unless quickened into life by the right methods to teaching and the right kind of teachers. ....It is really the function of training colleges to introduce these methods in our schools through their trained teachers."—Secondary Education Commission's Report—Page 102.

व भिन्नभिन्न मतें प्रचलित आहेत. आठवड्यां तून दोन पाठ घ्यावे व अशा रीतीने जवळजवळ वार्षिक परीक्षेपर्यंत पाठ घेत राहावे हें चांगलें असें कांही लोकांचें म्हणणें आहे. या पद्धतीने परिपाठाच्या कार्यक्रमाचें नियोजन केल्यास पाठाची तयारी करण्यास भरपूर वेळ मिळतो. पर्यवेक्षकांनी दिलेल्या सूचनांचा विचार करून जरूर ते बदल करण्यास अवसर मिळतो हें खरें आहे. परंतु अशा रीतीने आठवड्यांतून एक दोन पाठ घेणारे विद्यार्थी-शिक्षक त्या वर्गाची, त्या विषया-पुरती का होईना, जबाबदारी आपणावर आहे असें मानत नाहीत. त्यामुळे पाठ घेतांना ज्या त्रुटि राहतात त्याची क्षिति बाळगत नाहीत. या पद्धतींतील हे दोष भरून काढण्यासाठी पंधरा-वीस दिवस सतत एकाच शाळेंतील एकाच वर्गावर पाठ घ्यावे असे सुचवितां येईल. कांही अध्यापक महाविद्यालयांत या पद्धतीने परिपाठाचें वेळापत्रक लावलें जातेंहि. परंतु असें केल्यास विद्यार्थ्यांना पाठाचा विचार करून पाठाचें कच्चें टांचण पर्यवेक्षकांना अगर संबंधित प्राध्यापकांना दाखवणें नंतर जरूर ते फेरफार करून पाठाच्या वहींत टांचण लिहिणें या चक्रांत विचार करायला उसंत मिळत नाही. त्यामुळे पाठांच्या गुणवत्तेंत फारसा फरक पडत नाहीत. या पद्धतींतील नजरेंत भरणारा दुसरा मोठा दोष म्हणजे विविध वर्गांवर व विभिन्न शाळांत पाठ घेण्याने विविध विद्यार्थ्यांना हाताळण्याची संधि मिळत नाही हा होय या दोन्ही पद्धतींतील सुवर्णमध्य साधल्यास विद्यार्थी-शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या दृष्टीने तें योग्य ठरेल. अध्यापन परिपाठाचे कार्यक्रम व महाविद्यालयीन व्याख्यानें यांचें समायोजन (adjustment) साधण्यासाठी कांही ठिकाणी सकाळीं अगर दुपारी अध्यापन परिपाठ व अन्य वेळीं व्याख्यानें असा कार्यक्रम ठेवतात तर कांही महाविद्यालयांत आठवड्यांतील कांही दिवस नुसती व्याख्यानें व बाकीचे दिवस फक्त अध्यापन परिपाठ असें करतात. अनेकदा शाळा व महाविद्यालय यांतील अंतर, शाळांच्या अडचणी, विद्यार्थी-शिक्षकांची आर्थिक परिस्थिति, पर्यवेक्षकांची संख्या आदि गोष्टींचा विचार करून वरील प्रकारें समायोजन साधावें लागतें. परंतु आपण स्वीकारलेल्या पद्धतीमुळे विद्यार्थी व प्राध्यापक यांचा दररोजचा संपर्क तुटतो की काय, पाठाचा विचार करण्यास जरूर तो वेळ मिळतो ना, विविध शाळांत व वेगवेगळ्या वर्गांवर विविध प्रकारचे पाठ घेण्याची संधि मिळते की नाही, निवडलेल्या दोन्ही विषयांचे पाठ एकाच गतीने लावले जात आहेत ना या बाबींकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

## (औ) पर्यवेक्षण (Supervision):—

विद्यार्थी–शिक्षकांचे सर्वच्या सर्व पाठ संपूर्णपणें प्राध्यापकांकडून पाहिलें जावे व त्याबाबत योग्य त्या मार्गदर्शनात्मक सूचना त्यांनी द्याव्या हा आदर्श प्रत्येक

महाविद्यालयांत प्रत्यक्षांत येतोच असें नाही. शिवाय सर्वच्या सर्व पाठ संपूर्णपणें पाहिले जाण्याची, खरें पाहतां, आवश्यकताहि नाही. पहिले दहा बारा पाठ संपूर्णपणें पाहून त्यावर सविस्तर चर्चा केल्यास पुढील पाठ संपूर्णपणें पाहण्याची आवश्यकता वाटत नाही. मात्र अधूनमधून प्राध्यापक येऊन आपला पाठ पाहून जातात हें विद्यार्थी शिक्षकांना माहीत असावें. पर्यवेक्षणाच्या कामांत शाळांतील मुख्याध्यापकांची व अन्य योग्य अध्यापकांचीहि मदत घ्यावी असें कांही लोकांचें मत आहे. याउलट, शाळांतील कांही अध्यापकांची महाविद्यालयांबाबतची कुत्सित दृष्टि लक्षांत घेऊन की काय, ही मदत घेऊं नये असें दुसऱ्या कांहींचें म्हणणें आहे. परंतु याबाबत Training for Teaching in India and England या पुस्तकांत मांडलेला दृष्टिकोन बरोबर आहे असें आम्हांस वाटतें. या पुस्तकाचे लेखक म्हणतात की पाठांचें पर्यवेक्षण शाळा व महाविद्यालयें या दोन्हीं संस्थांतील लोकांनी मिळून करावे. जरूर तेव्हा पाठ पाहणाऱ्या संबंधित व्यक्तींनी एकत्र बसून अध्यापन परिपाठविषयक उत्पन्न झालेल्या प्रश्नांची मनमोकळी चर्चा करावी. या चर्चेमुळे परस्परांविषयी असणारी संशयात्मक व क्वचित् प्रसंगीं असणारी तिरस्कारपूर्ण दृष्टि दूर होऊन अध्यापन परिपाठच अधिक फलदायी होईल.*

हें जें पर्यवेक्षण केलें जातें त्याबद्दलहि येथे दोन शब्द लिहिणें उचित ठरेल. पाठ कसा झाला याबाबत पर्यवेक्षक जे 'शेरे' देतात त्यांवरून कांही वेळां विद्यार्थीशिक्षकांत कांही गैरसमज निर्माण होतात. याचें एक कारण असें की स्वतःच्या पाठाबद्दलच्या टीकेकडे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतून पाहणें कठिण असल्याने गैरसमज निर्माण होतात. परंतु पाठ पाहणारे विद्यार्थी शिक्षक, पाठ घेणारी व्यक्ति व पर्यवेक्षक यांची चर्चा अधिक खेळीमेळीच्या वातावरणांत व अधिक constructive झाली तर कदाचित् हे गैरसमज कमी होतील. क्वचित् असेंहि दिसतें की पाठ कितीहि उत्तम झाला तरी कांही प्राध्यापक दिलखुलास 'वाहवा' देतच नाहीत ! त्यामुळे 'कडू कारलें तुपांत तळलें अन्—' अशी भावना त्या विशिष्ट प्राध्यापकांबद्दल निर्माण होते. त्याचप्रमाणे आपण केलेल्या सूचना जाणून विद्यार्थी-

---

* Supervision must be a joint and equal partnership between college and school staffs. This partnership must be cemented by two way visits of the training college lectures to the schools and of the heads and staff of schools to the colleges ; and conferences should be held between two parties on the problems of teaching practice whenever necessary. This would do much to dissipate the mutual suspicion and sometimes mutual contempt, that the two parties have for each other, which often negatives much for the value of school practice--Ibid--Page 134.

शिक्षकांनी योग्य ती सुधारणा केली तर त्याबद्दल त्यांना शाबासकी दिल्याशिवाय राहूं नये. ‘रसज्ञ’ पर्यवेक्षक असला तर पाठ घ्यावयास हुरुप येतो असे ‘जाणकार’ विद्यार्थी शिक्षक म्हणतात त्यांत बरेंच तथ्य आहे !

## (अं) पाठांचें अवलोकन ( Lesson observation )

अध्यापन परिपाठांत पाठ ‘घेणें’ जसें अंतर्भूत असतें तसें पाठ ‘पाहणें’ हि असतें. विविध व्यक्तींच्या ठिकाणीं असलेलें अध्यापनविषयक कौशल्य पाहण्याची संधि या अवलोकनाच्या कार्यक्रमामुळे मिळते. तसेंच पाठाचा सर्वसामान्य आराखडा एकच असूनहि दोन शिक्षकांनी हाताळलेल्या त्याच विषयांवरील ( unit ) पाठांत किती फरक पडूं शकतों हें पाहणें उद्बोधक ठरतें. ‘वाचन भावपूर्ण, अर्थवाही व्हावें’, ‘पाठांत जिवंतपणा आणण्याचा प्रयत्न करावा’, ‘पाठ पद्धतशीर झाला; पण रंगला नाही’—अशाप्रकारच्या शेऱ्यांचा खरा अर्थ पाठांचें अवलोकन करीत असतां समजतो. या दृष्टीने पाहतां विद्यार्थी शिक्षकांनी स्वतः निवडलेल्या विशेष अध्यापन पद्धतीचेच (special method) पाठ पाहण्याऐवजीं अन्य विषयांचेहि पाठ पाहणें हितावह ठरतें. मात्र हें निरीक्षण म्हणजे विशिष्ट संख्या पूर्ण करण्यासाठी केवळ झालें तर त्याचा योग्य तो परिणाम होणार नाही. सूक्ष्म निरीक्षणशक्तीमुळे गुणावगुण टिपण्याची सवय होते, विचारांना चालना मिळते, आपल्याला जें कठीण अगर अशक्य वाटतें तें तितकें दुर्लभ नसावें असें वाटूं लागतें. म्हणूनच सूक्ष्म निरीक्षण हा विकासाचा एक टप्पा आहे. यासाठी विद्यार्थी-शिक्षकांचे अवलोकन अधिक डोळस व जाणीवपूर्वक होऊन त्यांची टीका भरीव ( Consrtuctive ) होईल याबद्दल योग्य तें मार्गदर्शन पहिल्या कांही आठवड्यांत देण्याची जबाबदारी प्राध्यापकांनी उचलली पाहिजे.

## (अः) प्रयोगात्मक पाठ ( Experimental lessons )

विविध शाळांतील नामवंत शिक्षक व प्राध्यापक यांचे पाठ आयोजित करणें हाहि अध्यापन परिपाठाचा एक भाग म्हणावा लागेल. पाठ कसा घ्यावा याबद्दलचें उत्तम उदाहरण, एक नमुनाच म्हणाना, विद्यार्थी-शिक्षकांना यांतून मिळावा अशी अपेक्षा असल्याने अशा प्रकारच्या पाठांना ( model ) पाठ असें म्हणत असत. पाठ घेण्याची पद्धति शाळा, वर्ग, मुलांची सामाजिक परिस्थिति व शिक्षकांचा वकूब यावर अवलंबून असल्याने कोणत्याहि एका पद्धतीचा सांचा बनवून त्यांत बाकीचे पाठ बसवूं म्हटलें तर तें योग्य ठरत नाही. म्हणूनच ‘नमुना’ पाठ हें नांव आज मागे पडूं लागलें आहे आजकाल अशा प्रकारच्या पाठांना (demonstration)

पाठ हें नांव रूढ झालेलें दिसतें. पहिल्या सत्राच्या सुरवातीस असे जे पाठ ठेवले जातात त्यांमुळे विद्यार्थी-शिक्षकांना अध्यापन तंत्राची पुसट कल्पना येऊं शकते. आम्हांला तर असें वाटतें की प्रत्यक्ष पाठ घेण्यापूर्वी त्या पाठाचा लेखी आराखडा सूचनाफलकावर विद्यार्थी-शिक्षकांना पाहण्यासाठी लावावा. पाठाचे टांचण वाचतांना विद्यार्थी शिक्षकांना कांही भाग 'जमणार' नाही असें वाटतें. परंतु एकाद्या गवयानें एकादी अवघड जागा सहजतेने पकडली म्हणजे श्रोत्यांकडून जशी त्याला 'दाद' मिळते, त्याप्रमाणे विद्यार्थी-शिक्षकांना कठिण वाटणारें विवेचन वर्गांत रंगलें म्हणजे त्यांना विशेष आनंद वाटतो. शिवाय पाठाचें प्रत्यक्ष टांचण कसें करावें याबद्दलचेंहि मार्गदर्शन यामुळे विद्यार्थी-शिक्षकांना मिळूं शकते. दुसऱ्या सत्रांतहि अशा प्रकारच्या पाठांची योजना मुद्दाम करावी. कारण स्वत: पाठ घेतल्यामुळे व आपल्या सहाध्यायांचे पाठ पाहून विद्यार्थी-शिक्षक अधिक चिकित्सक बनलेले असतात. मात्र हे पाठ म्हणजे ज्यांची हुबेहुब नक्कल करावयाची असे पाठ असें विद्यार्थी-शिक्षकांनी मानूं नये. कारण अनेकदा अशा पाठांत कांही चुका राहतात. या चुका मनमोकळेपणें कबूल करण्याचा मनाचा मोठेपणा प्राध्यापकवर्गानें दाखवावयास हवा. त्याचप्रमाणे अमुक एकाद्या प्राध्यापकांचा पाठ म्हणजे एका ठराविक विषयावर असें समीकरण तयार होऊं देऊं नये. ( आपल्या सतरा अठरा वर्षांच्या कारकीर्दींत दरवर्षी बाबराचें पुनरुज्जीवन करणारे एक प्राध्यापक आम्हाला माहीत आहेत ! ) अभ्यासक्रमांतील सर्व विषयांवरील विविध विभागांचे, विविध शाळांतील विविध इयत्तांवर घेतलेले अशा प्रकारचे पाठ पाहण्याची संधि विद्यार्थी-शिक्षकांना मिळाली पाहिजे.

## अभ्यासपूरक कार्यक्रम व अध्यापक महाविद्यालयें :—

स्मरणशक्तीला ताण देऊन परीक्षा कशी उत्तीर्ण व्हावी व नोकरी कशीबशी करावी हेंच ज्यांच्या शिक्षणाचें उद्दिष्ट होतें असे शिक्षक आजच्या घडीला फारसे कामाचे नाहीत. बुद्धि, चारित्र्य, संयम, शील, उद्यमशीलता, चिकाटी आदि अनेक सद्‌गुणांची जोपासना व विकास शिक्षणानें झाला पाहिजे असें आपण मानतों व त्यादृष्टीने शाळांतून अभ्यासपूरक कार्यक्रमांना महत्त्व दिलें जातें. परंतु वादविवाद, चर्चा, स्नेहसंमेलनें, खेळांचे सामने आदि कार्यक्रमांचें शैक्षणिक महत्त्व लक्षांत घेऊन ते कार्यक्रम हातीं घ्यावयाचें म्हटलें तर शिक्षकांना त्यासाठी मार्गदर्शन मिळणें अवश्य आहे. प्रतिभावान व प्रज्ञावंत शिक्षक मार्गदर्शनाशिवायहि असे कार्यक्रम उत्तम प्रकारें पार पाडूं शकतील पण सर्वसामान्य शिक्षकाला या दिशेने मार्गदर्शन मिळालें तर हवेंच आहे. म्हणूनच आज अध्यापक महाविद्यालयांतहि अभ्यासपूरक कार्यक्रमांना महत्त्व प्राप्त झालें आहे.

आज अध्यापक महाविद्यालयांत अनेकविध अभ्यासपूरक कार्यक्रम होत असतात. परंतु महाविद्यालयांत हे कार्यक्रम केवळ सादर करण्यापेक्षा त्यांतील शैक्षणिक व संघटनात्मक बाजूकडे विद्यार्थी शिक्षकांचें लक्ष वेधून घेण्याची आपली दृष्टि असली पाहिजे. एखादें नाटक सादर करण्यापेक्षा शाळांना योग्य अशीं नाटुकलीं कशी लिहावी व निवडावीं, रंगमंच कसा तयार करावा, प्रकाशयोजनेचें महत्त्व काय असतें, नेपथ्ययोजना म्हणजे काय, पाहुण्यांच्या निमंत्रणपत्रिका कशा लिहाव्या व त्यांचे स्वागत कसें करावें, बसण्याची व्यवस्था कशी असावी, स्वागतपर व आभाराचें भाषण कसे करावे या व अशा अनेक गोष्टी आपण अधिक महत्त्वाच्या मानल्या पाहिजेत. या संदर्भांत मी वाचलेलें एक वाक्य मला आठवतें. तें वाक्य असें. Trifles make perfection but perfection is not a trifle. शंभर टक्के अचूकतेचा अट्टाहास आपण धरीत नाही. संचलन चालू असतां विद्यार्थ्यांची पाऊलें अगदी एका रेषेंत पडली पाहिजेत असा अट्टाहास आपण कोठे धरतो ? खरें पाहतां स्नेहसंमेलनांत अगर अन्य वेळीं आपण मुख्य पाहुण्यांचें स्वागत करतों. तें करण्याची खरी वेळ पाहुणे प्रवेशद्वाराजवळ असतात त्यावेळीं असते. प्रवेशद्वाराच्या कमानीजवळ येतांच दूरध्वनिक्षेपकावरील 'स्वागत करूं या सुजनांचें' ही स्वरमाला त्यांच्या कानीं पडली पाहिजे. हें करणें का फार कठिण आहे ? मुळीच नाही. त्यासाठी फक्त वरील प्रकारचा अट्टाहास हवा. 'चलता है, चलानेवाला चाहिये' ही वृत्ती आपण टाकून द्यायला हवी. तेव्हा शिक्षकांनी अभ्यासपूरक कार्यक्रमांचें संघटन व संयोजन योग्य प्रकारें करावें असें आपणांस वाटत असेल तर त्यादृष्टीने आवश्यक ते प्रयत्न अध्यापक महाविद्यालयांत झाले पाहिजेत.

शाळांचे व अध्यापक महाविद्यालयांचे अधिक निकटचे व स्नेहाचे संबंध जुळवून आणण्यासाठीहि या कार्यक्रमांचा उपयोग करता येईल व त्यांद्वारे विद्यार्थी-शिक्षकांनाहि हे कार्यक्रम प्रत्यक्ष संघटित करण्याची संधि प्रशिक्षणकाळांत मिळेल. विद्यार्थी-शिक्षकांची गटवार विभागणी करून विविध शाळांसाठी त्या गटांची नियुक्ति करावी. जरूर वाटल्यास मार्गदर्शनासाठी प्रत्येक गटासाठी एक प्राध्यापक असावे. बहुरंगी करमणूक, चर्चा-परिसंवाद आदि कार्यक्रम बसवून घेऊन विविध गटांनी ते महाविद्यालयांतील निमंत्रितांसमोर सादर करावे. या योजनेमुळे शैक्षणिक मूल्याचें सत्व व केवळ करमणुकीचा भुसा यांचा मेळ घालून उत्तम कार्यक्रम सादर करण्याची दृष्टि विद्यार्थ्यांत बिंबल्याशिवाय राहणार नाही. शिवाय या योजनेमुळे विद्यार्थी-शिक्षक व शाळांतील विद्यार्थी यांचा निकटचा संबंध आल्याने कुमारांचें मानसशास्त्र कसें असतें, काय केलें असतां विद्यार्थी प्रोत्साहित होतात, वर्गांत सामान्य वाटणारीं मुलें त्यांच्या आवडीनिवडीला वाव मिळाल्यास कशी चमकतात

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. अनुक्रम ...... क्रमांक ...... दि:

व त्याचा त्यांच्या शालेय प्रगतीवरहि कसा परिणाम होतो याचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थी-शिक्षकांना मिळतो.

## रात्र थोडी, सोंगें फार !

गेल्या दशकांत अध्यापक महाविद्यालयांतील अभ्यासक्रमांत जे नवीन विषय समाविष्ट झाले आहेत त्यांत दृक्-श्राव्य शिक्षण, व्यावसायिक व शैक्षणिक मार्गदर्शन, ग्रामीण शिक्षण, जीवन शिक्षण, शारीरिक शिक्षण आदि विषयांचा अंतर्भाव करता येईल. यांपैकी कोणताहि एक विषय विद्यार्थ्यांनी निवडावयाचा असतो. समाजाच्या गरजा लक्षांत घेऊन नवे विषय अभ्यासक्रमांत घालणें आवश्यक असते हें खरें; व त्यादृष्टीने होऊं घातलेल्या शिक्षकांची वरील विषयांशीं ओळख होणें जरूर आहे यांत संशयच नाही. प्रश्न पडतो तो असा की या विषयांचे सर्वसामान्य ज्ञान प्रत्येक शिक्षकाला असणें आवश्यक आहे असें आपण मानीत असल्यास ते ऐच्छिक का ठेवावयाचे ? व या विषयांचा विद्यार्थ्यांनी सखोल अभ्यास करावा या अपेक्षेने ते ऐच्छिक ठेवले असल्यास ती फलद्रूप होते काय ? सुट्टया वजा करतां शिक्षकांचा प्रशिक्षणकाल अवघ्या साडेपांच महिन्यांचा असतों. या कालावधींत अभ्यासाचे आवश्यक विषय, अध्यापन परिपाठ व अभ्यासपूरक कार्यक्रम यांना योग्य तें स्थान दिल्यास या ऐच्छिक विषयांना कितपत वेळ राहतो ? 'रात्र थोडी, सोंगें फार' अशी थोडीशी स्थिति त्यामुळे नाही का होत ? शिवाय महाविद्यालयीन काळांत शारीरिक शिक्षण अगर जीवनशिक्षण यासारखा एखादा विषय घेतल्याने विद्यार्थी-शिक्षकांना त्यांच्या भावी आयुष्यांत काय फायदा होतो? निवडलेल्या विषयाचे विशेषज्ञ (specialist) म्हणून त्यांची गणना होत नाहीच ! विविध संस्थांतर्फे आज वरील प्रकारच्या सर्व विषयांत डिप्लोमा अगर सर्टिफिकेट देण्याची सोय उपलब्ध आहे. असें असतां प्रशिक्षणाच्या तोकड्या कालांत हे विषय कोंबण्याने काय साधतें ? अशा परिस्थितींत प्रशिक्षणकालांत या विषयांची केवळ तोंडओळख सर्वांना करून देऊन ज्याने त्याने आपल्या आवडीच्या विषयाबाबत पुढे अधिक प्रशिक्षण घ्यावें असें सांगणें इष्ट ठरणार नाही का ?

जातां जातां आणखी एका गोष्टीचाहि येथे उल्लेख करूं. अध्यापक महाविद्यालयांनी पार पाडावयाच्या जबाबदारीची कांही विशिष्ट लक्ष्मणरेषा आपण मानली पाहिजे. एकादे उदाहरण दिलें म्हणजे आम्ही असें कां म्हणतों हें स्पष्ट होईल. प्रशिक्षणार्थ येणाऱ्या अनेकांना शुद्ध लिहिता येत नाही व शुद्ध बोलता येत नाही. शिक्षकांची भाषा शुद्ध असणें आवश्यक आहे ही गोष्ट वादातीत आहे. प्रश्न आहे तो असा की अध्यापनपद्धतीसाठी निवडलेल्या विषयांची माहिती (subject-

matter) अगर भाषाशुद्धता या गोष्टी शिकविणें प्रशिक्षण कालाच्या तोकडया अवधींत शक्य आहे काय ? शालेय अभ्यासक्रमांतील विविध विषयांचा मूळ गाभा (Content) शिकविणें हें मुळी अध्यापक महाविद्यालयांचे कार्य नव्हेच; विषय शिकवावा हें शिकविण्याचे त्यांचे कार्य असतें. म्हणूनच प्रशिक्षणाची कालमर्यादा जोपर्यंत वाढत नाही तोपर्यंत तरी निदान आधुनिक काळाच्या गरजा वाढल्या म्हणून विविध विषय अभ्यासक्रमांत घालणें अगर प्रशिक्षणार्थीच्या सर्व त्रुटि भरून काढण्याचे प्रयत्न महाविद्यालयांत झाले पाहिजेत असें मानणें इष्ट ठरत नाही. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बहुउद्देशीय शाळांतील गृहशास्त्र, व्यापार, शेतकी, संगीत आदि विशेष विषयांचें शिक्षक तयार करण्यासाठी अजमेर, भोपाळ, म्हैसूर व भुवनेश्वर येथे चार अध्यापक महाविद्यालयें सुरू करण्याची योजना आहे. संगीत चित्रकला, नाटक आदि अनेक विषयांची माहिती शिक्षकांना असली तर चांगलेच असते. परंतु म्हणून अध्यापक महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांत विविध विषयांची खेचाखेच केली तर महाविद्यालयांतील विद्यार्थी त्या भाराखाली अगदीच पिचून जातात, बिचाऱ्यांना श्वास टाकायलाहि उसंत मिळत नाही. यामुळे नेमलेल्या गोष्टी 'पार पाडणें' एवढेंच त्यांचें उद्दिष्ट राहतें. अवांतर वाचन, मनन, परस्पर विचार-विनियम याला वेळच उरत नाही.

## सेवाकालांतर्गत शिक्षण (In-service education)

शिक्षक हा जन्मभर विद्यार्थी असतो हें तत्वत: जरी आपण मान्य करीत असलों तरी गेल्या तीन दशकापर्यंत सर्वसाधारणत: शिक्षकांचें शिक्षण म्हणजे फक्त अध्यापक महाविद्यालयांत मिळणारें शिक्षण असाच केला जात असे. याबाबतची आपली नापसंती राधाकृष्णन आयोगाने पुढील शब्दांत व्यक्त केली आहे—"आपल्या शाळांतील शिक्षण जे विषय शिकवितात त्याचें ज्ञान त्यांनी वयाच्या चोवीस-पंचवीसाव्या वर्षापर्यंतच घेतलेलें असतें आणि त्यानंतर ते केवळ अनुभवान शिकत असतात. परंतु अनुभवाचा कांही फायदा व्हायचा असेल तर सतत प्रयोगशील असले पाहिजे. जुन्या ज्ञानाची परीक्षा नवीन ज्ञानाच्या निकषावर केली पाहिजे. भरपूर देण्यासाठी भरपूर घेतलें पाहिजे."* गेल्या दहा पंधरा वर्षांत जग किती

* "It is extraordinary that our school teachers learn all of whatever subject they teach before reaching the age of twenty four or twenty five and then all their further education is left to 'experience', which in most cases is another name for stagnation. We must realize that experience needs to be supplemented by experiment before reaching its fullness and that a teacher, to keep alive and fresh,

(पुढे चालू)

झपाट्याने बदललें आहे आणि बदलतें आहे हें पाहिलें म्हणजे शिक्षकांनी आपल्या ज्ञानाला वरचेवर उजाळा देऊन व त्यांत जरूर ती नवी भर घालून कालाच्या ओघाबरोबर तें वाढतें व वाहतें ठेवलें पाहिजे ही गोष्ट पटते.* परंतु सेवाकालांतर्गत शिक्षण म्हणजे कांही प्रशिक्षणकालांत राहिलेल्या उणिवा भरून काढणें नव्हे. अत्याधुनिक शैक्षणिक विचार व पद्धति यांची माहिती करून देऊन शैक्षणिक तत्वें व ध्येयें यांबद्दलची नवी दृष्टि देऊन शिक्षकांच्या व्यावसायीन कार्यक्षमता उंचावण्याचें स्वप्न सत्यसृष्टींत आणणें हेंच या शिक्षणाचें कार्य आहे.† अशा प्रकारचा विकास करून घेण्याची इच्छा निर्माण होऊन या शिक्षणाकडे वळणाऱ्या शिक्षकांनाच त्याचा फायदा होतो. केवळ लादलेली गोष्ट म्हणून शिक्षणक्रम पार पाडणाऱ्या शिक्षकांवर त्याचा फारसा परिणाम होत नाही. अग्निशिखा प्रज्वलित करण्याची शक्ति वाऱ्यांत असते; परंतु मूळ स्फुल्लिंग कांही अग्नि निर्माण करूं

---

should become a learner from time to time. Constant out pouring needs constant in taking; practice must be reinforced by theory and the old must be constantly tested by the new."—The Report of the University Education Commission—vol. I—Page 96.

* ही गोष्ट श्रीमती मार्गारेट मीड यांनी फार सुंदर शब्दांत व्यक्त केली आहे. त्या म्हणतात—

"Within the life time of ten years old the world has entered a new age, and already before they enter the sixth grade. The atomic age has been followed by the age of the hydrogen bombs, differentiated from the atomic age in that many of those who failed to understand the dangers of the atom bombs are painfully beginning to take in the significance of the hydrogen bomb. Teachers who never heard a radio until they were grown up have to cope with children who have never known a world without television. Teachers who struggled in their childhood with a buttonhook find it difficult to describe a buttonhook to a child bred up among zippers......"—The School in American Culture—Margaret Mead—Page 36.

† "Teachers should be brought face to face with new and latest ideas in the educational thought and practice, educational psychology and socialogy, mental hygiene, new skills in the fine art of teaching and new understanding of educational principles and ideals. Only then can professional growth in service for all teachers became reality."—In Service Teacher Education—H. S. S. Lawrence—Page 4.

शकत नाही, तो असावाच लागतो. तद्वतच ज्या शिक्षकांच्या मनांत आपण विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त चांगल्या प्रकारें शिकविले पाहिजे हा स्फुल्लिंग नाही त्यांना सेवाकालांतर्गत शिक्षणाचा फारसा फायदा होणार नाही.* सेवाकालांतर्गत शिक्षण पुष्कळ प्रकारें दिलें जातें. त्यांपैकी कांही प्रमुख प्रकारांचा आता विचार करूं.

## रिफ्रेशर कोर्सेस :--

सेवाकालांतर्गत शैक्षणिक कार्यक्रमाचा हा एक प्रकार आहे. स्वातंत्र्योत्तर कालांत सरकारची शैक्षणिक बाबतींत जी जागरूकता आहे त्याचा एक दाखला म्हणजे वरील प्रकारचे कोर्सेस. गेल्या दहा वर्षांत शालेय अभ्यासक्रमांतील विविध विषयांवर असे अभ्यासक्रम आयोजित करण्यांत आले. शिक्षक शाळेंत जे विषय शिकवीत असतात त्याबद्दलचे नवीन विचार, नवीन पद्धति व नवीन पुस्तकें पाहण्याची व ऐकण्याची संधि अशा शैक्षणिक सत्रांत मिळते. या सत्रांत केवळ व्याख्यानांची आतषबाजी न होतां परस्परचर्चा, विचारविनिमय होऊन व्यवहारांतील प्रत्यक्ष अडचणींचें निराकरण कसें करावें याबद्दलची कांही नवीन दृष्टि वा दिशा शिक्षकांना यांतून मिळाली पाहिजे म्हणून या शैक्षणिक सत्राची यशस्विता त्यासाठी अनुभवी, व्यासंगी व ह्या क्षेत्रांतील अधिकारी व्यक्तीचें सहकार्य मिळविणें व त्यांत भाग घेणाऱ्या शिक्षकांना सचेत करणें यांतच सामावललें असतें.

## कार्यसत्रें ( Work shops )

नवीन माहिती, नव्या पद्धति यांची माहिती शिक्षकांना मिळाली की आपले प्रश्न कसे सोडवावे यांची दिशा त्यांना मिळते हें खरें आहे. परंतु अनेकदां प्रत्यक्ष शाळेंत काम करीत असतां जे प्रश्न आपल्याला भेडसावतात ते फक्त आपल्यालाच येतात की काय अशी शंका येते व कांहीवेळां त्याची उकल कशी करावी तें समजत नाही. एकाद्या पुस्तकांत तत्सम प्रश्नावरील तोडगा जरी सांगितलेला असला तरी तें स्वप्नमय अवास्तव वाटतें. म्हणून समव्यवसायी लोकांनी एकत्र येऊन आपल्या

---

* लावला गेलेला सेवाकालांतर्गत शैक्षणिक कार्यक्रम नीरस होतो असें सांगतांना श्री गुडमन म्हणतात--

"Where intellectual curiosity is leaking, where there is a paucity of the natural drive to develop one's self, outside efforts are almost futile. Forcible feeding may fatten geese, but it can hardly cause sterile mentalities to sprout."—School and Society—Goodman N. G.—Page 115-16.

दैनंदिन अडचणी कशा सोडवाव्या यांचा विचार व त्या दृष्टीने आचार करणें जरूर ठरतें. यादृष्टीने शिक्षक जेव्हा एकत्र जमतात तेव्हा केवळ चर्चा करणें, माहिती मिळविणें हा हेतु न राहतां प्रश्नांची चिकित्सा करून त्यांची उकल कशी करावी, त्यासाठी कोणते उपाय योजावेत या दिशेने कांही पावलें टाकलीं जातात.* म्हणूनच या प्रकाराला इंग्रजींत work-shop असें नांव दिलें गेलें असावें. कार्यसत्रांत भाग घेणाऱ्या व्यक्तींचें मूल्यमापन कार्यसत्रांमुळे होत नाही. परंतु कार्यसत्राचें मूल्यमापन करावयाचें असतें. आपल्या प्रश्नांच्या सर्वांच्या सहकार्याने पण स्वतःच शोधून काढलेलीं उत्तरें घेऊन कार्यसत्रांत भाग घेणारे लोक परतले पाहिजेत. †

## मेळावे व परिसंवाद ( Conferences and Seminars )

स्वातंत्र्योत्तर काळांत या दोन कार्यक्रमांचीं नांवें सुपरिचित झालीं आहेत. मुख्याध्यापकांच्या अडचणी व शिक्षकांच्या अडचणी भिन्न असतात. शाळा अधिक्षकांचे ( Educational inspectors ) प्रश्न या दोघांच्या प्रश्नांहून वेगळे असतात. म्हणून वरील तिन्ही प्रकारच्या लोकांचे वेगवेगळे मेळावे घेतले जातात. या मेळाव्यांत प्रश्नांची चर्चा केली जाते. कांही ठिकाणीं शिक्षकांची विषयवार गट संमेलनेंहि घेतलीं जातात. तिथेहि त्या विशिष्ट विषयाचे शिक्षक एकत्र आल्याने प्रश्नांचें क्षेत्र मर्यादित होतें व चर्चा अधिक सखोल होऊं शकते. अशा प्रकारचे मेळावे परस्पर विचारांची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने उपयुक्त असतात याबद्दल संशयच नाही. परंतु या मेळाव्यांत भाग घेणारांनी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने नंतर कांही प्रत्यक्ष काम केलें पाहिजे. 'केवळ चार दिवस मजा व बदल' यादृष्टीने याकडे पाहिल्यास यांवर खर्च होणारा पैसा वाया जातो असेंच म्हणावें लागेल.

---

* The workshop has a more 'down to earth' than 'up to heaven' quality.—In Service Teacher Education—Page 20.

† या संदर्भांत श्री. लॉरेन्स यांनी एका कार्यसत्राबद्दलची एका शिक्षकाची प्रतिक्रिया सांगितली आहे. ती अशी--

"I came to the workshop tired and perhaps discouraged. I am leaving it rested and inspired. I came thinking my problems were peculiar to me and my situation. I found many were trying to solve these same problems. I came expecting someone would tell me what to do; I soon learned we made our own assignments and the finals we administered ourselves."—In Service teacher Education—Page 23.

सर्वसाधारण जनतेला एकाद्या स्वरूप समजून देण्याच्या दृष्टीने त्या विशिष्ट क्षेत्रांत विविध स्तरांवर काम करणाऱ्या व्यक्तींना एकत्र आणून त्या प्रश्नावरील त्यांचे विचार समाजासमोर मांडण्यासाठी अनेकदा परिसंवाद आयोजित केले जातात. 'विद्यार्थी बेशिस्त आहेत का?' आजच्या सुशिक्षित स्त्रियांचे प्रश्न, आधुनिक काळांत वैवाहिक निष्ठा धोक्यांत आहेत काय?—इत्यादींसारख्या विषयांवर परिसंवाद ऐकल्याचें वाचकांस स्मरत असेल. जनमत जागृत ठेवण्याच्या दृष्टीने या प्रकारचे परिसंवाद महत्त्वपूर्ण कार्य करूं शकतात.

आपल्या दैनंदिन कार्यांत जाणवणाऱ्या प्रश्नांची सविस्तर चर्चा करण्याच्या दृष्टीने आजकाल पुष्कळदा शिक्षकांची विषयवार चर्चासत्रें (seminars) घेतलीं जातात. हीं चर्चासत्रें बहुधा विस्तारकार्य विभागातर्फे (Extension services department) आयोजित होतात. त्यामुळे अध्यापक महाविद्यालयांतील प्राध्यापक, अनुभवी व व्यासंगी मुख्याध्यापक यांच्यापैकी निवडक व्यक्तींना चर्चासत्राच्या दिग्दर्शनाचें काम दिलें जातें.

## अनुसरणात्मक कार्याचें (follow-up work) महत्त्व :—

शिक्षकांची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने वर उल्लेखिलेल्या सेवाकालांतर्गत शिक्षणाच्या विविध प्रकारांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. परंतु अनेकदा अशा प्रकारें शिक्षण घेऊन आलेल्या लोकांच्या कामांत नंतरच्या काळांत कांही नवीन दृष्टि, दिशा दिसतेच असें नाही. व्यवहाराच्या चक्रव्यूहांत, चर्चासत्रांत, कार्यसत्रांत अगर नवीन अभ्यासक्रमांत ऐकलेल्या गोष्टी विरून जातात आणि पूर्वीच्याच पद्धतीने राहाटगाडगें फिरत राहतें. आपण अमुक योजना पुढे मांडल्या होत्या, अमुक निर्णय घेतले होते या गोष्टी सेवाकालांतर्गतच्या शैक्षणिक कार्यक्रमांत सहभागी होणाऱ्या व्यक्ति विसरून जातात! यामुळे या कार्यक्रमांचा शाळांत नवीन अध्यापनपद्धति, नव-विचार रूजविण्याच्या दृष्टीने फारसा उपयोग होऊं शकत नाही. यासाठी विस्तारकार्य विभागांनी अनुसरणात्मक कार्याकडे अधिक लक्ष पुरविलें पाहिजे. या प्रकारच्या शैक्षणिक कार्यक्रमांत भाग घेणाऱ्या व्यक्तींनीहि मान्य केलेल्या निर्णयानुसार वाटचाल करणें ही आपली नैतिक जबाबदारी आहे असें मानलें पाहिजे. मुख्याध्यापकांनी जरूर त्या सवलती देऊन नवीन दिशेने वाटचाल करण्यास शिक्षकांना मदत केली पाहिजे. विस्तारकार्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी चर्चासत्राचे प्रमुख निर्णय शाळा अधिक्षकांना कळवून त्याबद्दलचें त्यांचें मतहि अजमावावें. कारण शालेय कार्यक्रमांत कामाची कोणतीहि नवी दिशा स्वीकारायची असेल तर त्यासाठी विषय शिक्षक, मुख्याध्यापक व

शाळांचे अधिक्षक यांचे एकमत हवें. वरील प्रकारच्या शैक्षणिक कार्यक्रमांत तसेंच विविध डिप्लोमा व सर्टिफिकेट कोर्सेस करून अनेक शिक्षक आपली कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करीत असतात. परंतु शिक्षकांनी अधिक संख्येने सेवाकालांतर्गत शिक्षणाचा फायदा घ्यावा या दृष्टीने पुढील कांही सूचना कराव्याशा वाटतात--

(१) शिक्षक आपल्या क्षेत्रांत जसजसा विकास करतील तसतशी त्यांच्या पगारांत वाढ व्हावी. दृक्-श्राव्य शिक्षण, व्यावसायिक व शैक्षणिक मार्गदर्शन, शारीरिक शिक्षण यासारखे अभ्यासक्रम यशस्वीपणें उत्तीर्ण होणाऱ्यांना एक जादा पगारवाढ ( increment ) मिळावें. त्याचप्रमाणे वरच्या श्रेणींत लोक दाखल करून घेतांनाहि त्यांनी पार पाडलेल्या सेवाकालांतर्गत शैक्षणिक कार्यक्रमाचा विचार व्हावा.

(२) आपली कार्यक्षमता वाढविण्याची इच्छा शिक्षकांत निर्माण होण्यासाठी अभ्यासासाठी रजा, पुस्तकें अगर इतर कांही सवलती त्यांना द्याव्या. विविध अभ्यासक्रमासाठी ज्या शिक्षकांची नेमणूक केली जाते त्यांना शक्य तर पगाराबरोबरच त्या संस्थेंत राहण्यासाठी येणाऱ्या खर्चासाठीहि कांही रक्कम मिळावी.

(३) दर पांच वर्षांनी शैक्षणिक सहली, अभ्यासक्रम, प्रबंध पुरा करणें अगर अशाच प्रकारच्या कांही कामासाठी शिक्षकांना चार-पांच महिन्यांची पूर्ण पगारी रजा मिळावी. अमेरिका, रशिया आदि देशांत शिक्षकांना अशा सवलती दिल्या जातात.

शासनयंत्रणा व संस्थाचालक यांनी जशा शिक्षकांसाठी अनेक गोष्टी करावयाच्या त्याचप्रमाणे शिक्षकसंघांनीहि करण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. आजपर्यंत या संघांनी शिक्षकांना आर्थिक स्थैर्य व सुरक्षितता मिळावी यासाठी यशस्वीपणें अनेक लढे दिले. परंतु आता त्यांनी रचनात्मक कार्याकडे वळलें पाहिजे. केवळ पगारवाढीसाठी विकासशील रहावयाचें या सर्वसामान्य शिक्षकांच्या वृत्तीला पायबंद घातला पाहिजे. हजारों वर्षांच्या अनेक पिढ्यांच्या त्यागाने मानवी संस्कृतीचें जें सुंदर शिल्प उभारलें गेलें तें आज नष्ट होणार की काय अशी भीति आज अनेक विचारवंतांना वाटत आहे. ही भीति दूर करण्यास एक नव्या विचाराची पिढी निर्माण करण्याचें महत्त्वपूर्ण कार्य शिक्षक करूं शकतात. या कार्याबद्दलचा आत्मविश्वास व तें कार्य करण्याची इच्छा शिक्षकांच्या मनांत पालवेल असें कार्य शिक्षक संघांनी केलें पाहिजे, विविध अध्यापनपद्धतींची योग्य चिकित्सा करण्यासाठी वेगवेगळ्या शाळेंत विविध प्रयोग हातीं घेतले पाहिजेत.

शिक्षकांच्या प्रशिक्षणावर होणारा खर्च म्हणजे एक प्रकारची आर्थिक गुंतवणूक ( investment ) आहे. आज आपल्या देशांत तयार होणाऱ्या विविध योजनांत चैतन्य ओतणारा, स्वतंत्र भारताची नवी पिढी घडविणारा खरा शिल्पकार आजचा शिक्षकच आहे. या शिक्षकांचें प्रशिक्षण व सेवाकालांतर्गत शिक्षण याबद्दलच्या जास्तीत जास्त सुविधा सुसंस्कृत समाजाने पुरविल्या पाहिजेत.

### संदर्भ ग्रंथांचीं नांवें


(1) The Professor of teaching—T. M. Stinnett.

(2) World perspectives in education—Edward and king.

(3) The new era in education—I. L. Kandel.

(4) In service education—56th year book of the National society for the study of Education.

(5) The training of teachers in Universities—R. A. C. Oliver

(6) Three year training for teachers—5th report of the National Advisory Council on the training and supply of teachers.

(7) The fourth year book of the National Society for the study of Education.

(8) The education of teachers in England, France and U. S. A.—C. A. Richardson, Helence Brule, Harold E. Snyder.

(9) The year book of education 1953—Evans Brothers.

(10) The education and training of teachers—UNESCO.

(11) In service teacher education—H. S. S. Lawrence.

(12) Better teacher education—E. A. Pires.

(13) The training of teachers—Ministry of education—Pamphlet No. 34—1957—Her Majesty's stationery office.

(14) Training for teaching in India and England—D'souza and Chatterjee.

# स्त्री-शिक्षण : ५ :

## स्त्री शिक्षणाचें महत्त्व

### (अ) स्त्री-एक व्यक्ति :--

गुहेंत राहून शिकारीवर जगणाऱ्या प्राण्यापासून आजच्या सुसंस्कृत मानवापर्यंतचा इतिहास म्हणजे शिक्षणाने जीवनांत किती प्रकारें क्रांति होऊं शकते याचाच इतिहास आहे. यामुळे आज वस्त्र, अन्न व आसरा या प्राथमिक गरजांच्या यादींत शिक्षणाचाहि अंतर्भाव केला जातो. सुशिक्षणाच्या संस्कारांनी परिस्कृत झालेल्या व्यक्तीला जीवनांतील विविध दालनें खुलीं असतात. म्हणूनच आज विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत जगांतील बहुतेक सर्व देशांत जात, लिंग, वर्ण व धर्मातीत शिक्षण हा मानवाचा हक्क मानला जातो.* परंतु गंमत अशी की मान्य

---

* या विधानाच्या पुष्टचर्थ कांही अवतरणें—

"Article 1—All human beings are born free and equal in dignity and rights". Article 2—"Everyone is entiteled to all the rights and freedoms set fourth in this declaration, without distinction of any kind, such as race, colour, sex".—Universal Declaration adopted in 1948 Access of Women to Education—UNESCO—Page 9.

"All people shall have the right to receive an equal education corresponding to their ability as provided by law."—Japanese Constitution (1946)—Article 26—Ibid Page 11.

"No applicant shall be refused admission to any assisted school on account of religion, nationality, race, caste, social status or language of such applicant or either of his parents."—Ceylon's Education Ordinance—No. 31—Ibid Page 32.

(पुढे चालू)

केलेल्या गोष्टींचीहि आठवण देण्याची अनेकदा वेळ येते. म्हणूनच स्त्री शिक्षण समितीने आपल्या अहवालांत अगदी प्रथमतः स्त्री व पुरुष मानव म्हणून समान असल्याची आठवण करून दिली आहे.* स्वाभाविकच शिक्षण हा स्त्रीचाहि जन्मसिद्ध हक्क आहे. मग स्त्रीशिक्षणाचा प्रश्न कां उपस्थित व्हावा? याचें उत्तर आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाने तयार केलेल्या पुस्तिकेंत एका वाक्यांतच पण फार मार्मिकपणें दिलें आहे. त्या पुस्तिकेंत म्हटलें आहे की कायद्याने मान्य केलेला हक्क डावलून स्त्रियांना शैक्षणिक क्षेत्रांत वेगळी वागणूक मिळत असेल तर त्याचीं कारणें बहुधा आर्थिक अगर सामाजिक असण्याचीं शक्यता आहे †

## (आ) स्त्री–समाजाचा एक घटक :––

एक व्यक्ति या नात्याने स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने शिक्षणाचा हक्क प्राप्त होत असला तरी तिचें जें सामाजिक कर्तव्य आहे त्यामुळे तिला या हक्काची जरूर नाही असें कांही लोकांचें म्हणणें आहे. 'चूल आणि मूल' हेंच स्त्रीचें कार्य-क्षेत्र असल्याने घर कसें चालवावें, मुलांची जोपासना कशी करावी, नवऱ्याला कसें खूष ठेवावें, घराची सजावट कशी करावी याचें शिक्षण स्त्रीला मिळालें म्हणजे झालें ! याशिवाय दुसऱ्या प्रकारच्या शिक्षणाची तिला आवश्यकता नाही व

---

"It is the paramount duty of the state to make ample provision for the education of all children residing within its borders without distinction or preference on account of race, colour, caste or sex."—United States (Washington)—Constitution Article IX Section 1—Ibid Page 11.

* But how distressing and how degrading and how unfortunate it has been that such a simple and obvious proposition as this that man and woman are not different essentially has gone in history unrecognised if not in thought or word, certainly in action ! This fundamental and basic equality of man and woman, therefore, is the first thing that we would like to highlight in our consideration of the problems ef women's education."—Report of the National Committee on Women's Education. —Page 6.

† "If an actual practice, then the sexes are accorded differential treatment, the fault does not lie in the field of legislation, but elsewhere, more especially, perhaps in the economic or social domain."—Access of Women to Education—International Bureau of Education—Publication No. 141--Page 14.

त्याप्रकारच्या शिक्षणावर केलेला खर्च म्हणजे समाजाच्या पैशाचा अपव्यय होय असें मत या विचारप्रणालीचे लोक मांडतात. फॅसिस्ट विचारसरणीच्या हिटलरने याच विचारप्रणालीचा पाठपुरावा केला. याउलट मार्क्स, लेनिन, कांट, टॉल्स्टॉय, म. गांधी आदि लोकांनी सांगितलें की समाजाच्या निम्म्या भागाला घराच्या भिंतीआड ठेवून समाज प्रगति करूं शकणार नाही. प्रत्येक देशाच्या इतिहासांत असा एक कालखंड येऊन गेलेला दिसतो की ज्या कालांत स्त्री ही केवळ एक शोभेची वस्तु, एक भोगदासी, घर व मुलें संभाळणारी एक व्यक्ति म्हणूनच तिच्याकडे पाहिलें गेलें. 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति' असे म्हणणारे आपले पंडित अगर 'A woman should leave her home but three times —when she is christened, when she is married and when she is buried' असे म्हणणारे पाश्चिमात्य लोक यांची विचारसरणी एकच आहे. परंतु प्रश्न आहे तो असा की पत्नी व माता हीं कर्तव्यें पार पाडण्यासाठीहि स्त्रीच्या मानसिक विकासाची आवश्यकता नाही का ? आपल्या मुलाला केवळ प्रेमाने कवटाळून बसणारी स्त्री म्हणजे आदर्श माता काय ? मुलांच्या शारीरिक व मानसिक विकासाकडे लक्ष देऊन त्यांना योग्य तें वळण लावणारी स्त्रीच आदर्श माता, चांगली माता होऊं शकेल. "दशविप्रादुपाध्यायो गौरवेणातिरिच्यते। तेभ्यो पिता दशेंभ्यतु ततो माता गरीयसी।" या संस्कृत श्लोकांत अगर 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी ती जगां उद्धारी' या मराठी म्हणींत अथवा 'The future destiny of the child is always the work of the mother' या इंग्रजी उक्तींत वर्णन केलेली माता अशिक्षित असूच शकत नाही. मुलांच्या आहारविहारादि योग्य संवयी कशा लावाव्या, त्यांचा योग्य तो मानसिक विकास होण्यासाठी त्यांना कशा प्रकारचें वाङ्मय वाचावयास द्यावें, कोणते चित्रपट पहावयास द्यावे, चांगल्या संस्कारजन्य वातावरणाची निर्मिति त्यांच्याभोवतीं कशी करावी इत्यादि गोष्टींत योग्य तें मार्गदर्शन देण्यासाठी स्त्री शिक्षणाची आवश्यकता नाही का ? त्याचप्रमाणे रघुवंशांत सांगितल्याप्रमाणे 'गृहिणी सचिव: सखी मिथ: प्रियशिष्यां ललिते कलाविधौ।' अशी पत्नीची कल्पना साकार व्हावयाची असेल तर ती पतिपेक्षा शिक्षणांत कमी असून चालणार नाही. एकाच्या विकासांत दुसऱ्याची अविकसता जेव्हा खोडा घालते तेव्हां विवाह म्हणजे एक बेडी वाटते. प्रेमाचा सुगंध देऊं करून विकास मागणारा प्रियकर अगर प्रेयसी, 'माझी' हा शिक्कामोर्तब करून गति मागणारा पति, अगर आर्थिक सुस्थिरता देऊन आशा आकांक्षाच्या स्वप्नांचें दान मागणारा पति अगर पत्नी आज कोणालाच आवडणार नाहीत. आजच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या काळांत विकासाला लंगर घालणारी व्यक्ति प्रिय होऊं शकत नाही.

म्हणूनच श्रीमती दुर्गाबाई देशमुख समितीने स्त्रियांना सर्वसाधारण शिक्षणाप्रमाणेच व्यावसायिक व धंदेशिक्षणहि मिळालें पाहिजे अशी शिफारस करून त्यामुळे त्या आपली घरांतील व बाहेरील कर्तव्यें पार पाडूं शकतील असें सांगितलें आहे.*

## (इ) बदललेली सामाजिक व आर्थिक परिस्थिति :––

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं स्त्रियांना विविध प्रकारचीं कामें करावी लागलीं व ती त्यांनी फार कार्यक्षमतेने पार पाडलीं. त्यामुळे जीं क्षेत्रें पूर्वी फक्त पुरुषांचीं म्हणून ओळखलीं जात अशा क्षेत्रांतहि युद्धजन्य परिस्थितींत कामें केल्यामुळे स्त्रियांनी आता तीं आपल्या आवाक्याबाहेरचीं आहेत असें वाटत नाही. शिवाय रशिया व चीन या दोन देशांच्या उदाहरणावरून समाजाच्या नवनिर्माणाच्या कामांत स्त्रीचा वाटा किती मोठा असतो व राष्ट्रीय कार्यांत स्त्री किती सहभागी होऊं शकते याचें प्रत्यंतर इतर राष्ट्रांना आल्यामुळे त्यांनाहि स्त्रियांना केवळ घरांत डांबून ठेवणें अनिष्ट वाटूं लागलें आहे. शिवाय औद्योगीकरणाच्या वाढत्या गतीमुळे देशांतील सामाजिक परिस्थितीहि बदलत आहे. औद्योगीकरणामुळे घरकामांत अनेक यंत्रांचा वापर केला जातो, संततिनियमनामुळे मुलांची संख्या मर्यादित राहते व घरकामाच्या रगाडयांत मुलींना डांबून ठेवावें लागत नाही. त्यामुळे लहानपणीं व लग्न झाल्यावरहि स्त्रियांना पुरेसा मोकळा वेळ मिळतो. आज लग्न झालेल्या तरुणी कोणत्या ना कोणत्या प्रकारची पगारी नोकरी करीत असतात. अशी नोकरी करावयाची म्हणजे त्यासाठी अर्थातच शिक्षण असणें अवश्य असतें.† स्त्रीशिक्षणाची वाढती गरज भासण्याचें आणखी एक कारण म्हणजे

---

* Girls as well as women should recieve not only as good, varied and comprehensive a general education as boys and men but also suitable professional and vocational education such as would fully equip them for their duties both in the home as well as outside."—Report of the National Committee on Women's Education—Page 9.

† या विधानाला आधार म्हणून पुढील अवतरण पाहा :––

"In the past only exceptional women found time or energy for their activities. But the last half century has brought a change in living conditions in Britain. The majority of mothers have fewer children than grandmothers and great-grandmothers had ; houses are now easier to look after and although the number

(पुढे चालू)

आजची आर्थिक परिस्थिति हें होय. आज वस्तूंच्या किंमती पांचपट वाढल्या आहेत. त्यामुळे पुरुषाचा पगार जरी वाढलेला दिसला तरी तो पुरत नाही. भारतांत इ. सन १९५२ मध्ये जी राष्ट्रीय पाहणी ( national sample survey ) करण्यांत आली त्यांत असें आढळून आलें की जनतेची ६१·३% क्रयशक्ति धान्य जेवण यांत, ७·७% क्रयशक्ति कपडेलत्ते खरीदण्यांत, ५·५% इंधन दिवाबत्तीसाठी व समारंभ आणि नोकरचाकर यासाठी ५–६% क्रयशक्ति खर्च होते. स्वाभाविकच शिक्षण, करमणूक, प्रवास आदि बाबींवर खर्च करण्यास पैसा राहत नाही. परंतु सुसंस्कृत जीवनासाठी तर या गोष्टी आवश्यक आहेत. तेव्हा या गोष्टी प्राप्त करण्यासाठी आज पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीला अर्थार्जन करणें जरूर झालें आहे. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणून स्त्रियांना सर्वसाधारण (general) तसेंच औद्योगिक व धंदेविषयक शिक्षण देणें महत्त्वाचें वाटूं लागलें आहे. सुशिक्षित व सुजाण पालकांना तर मुलीला शिक्षण देणें म्हणजे तिच्या नांवें विमा उतरण्यासारखें वाटतें.

## ऐतिहासिक पार्श्वभूमि :—

स्त्रीशिक्षणाच्या आवश्यकतेबद्दलची ही सर्वसामान्य चर्चा संपविल्यानंतर आज आपल्या देशांत त्याबाबत काय परिस्थिति आहे हें पाहिलें पाहिजे. परंतु हें पाहण्यापूर्वी या प्रश्नाची थोडी ऐतिहासिक पार्श्वभूमि जाणून घेतली तर प्रश्नाकडे पाहण्याची योग्य दृष्टि (perspective) येते. म्हणून प्रथमतः आपल्या देशांतील स्त्रीशिक्षणाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीकडे नजर टाकूं.

विविध संस्कृतींचा अभ्यास करतांना जी एक गोष्ट बऱ्याच ठिकाणीं आढळून येते ती म्हणजे जसजसें भूतकालांत शिरावें तसतसा स्त्रियांचा दर्जा अधिकाधिक कनिष्ठ दिसूं लागतो. परंतु या सर्वसामान्य नियमाला भारताची संस्कृति अपवादभूत मानावी लागेल. भारताच्या इतिहासाचीं पानें जसजशीं मागें उलटावीं तसतसा स्त्रियांचा दर्जा विविध क्षेत्रांत अधिकाधिक श्रेष्ठ होता असें दिसूं लागतें. पडदा, सती, बालविवाह यांसारख्या ज्या वाईट चालीरीती पुढील काळांत भारतांत

---

of domestic servants is much less in proportion to the rest of the population, quantities of labour saving devices are available. This change had meant married women have now more leisure for activities outside their homes and that their daughters are not needed or expected to stay at home to help with housework. To-day it is exceptional for young married women not to find some form of paid employment." — Women in Britain — Central Office of Information—Page 1.

आल्या त्यांचा मागमूसहि वेदकाळांत दिसत नाही. वेदकाळांत सर्वसाधारणपणें मुलींचीं लग्नें सोळा सतराव्या वर्षीं होत असत. विविध यज्ञांत धार्मिक समारंभांत स्त्रिया भाग घेत असत. पुरुषाला पत्नीशिवाय यज्ञ करता येत नसे. दोघांनाहि विशिष्ट प्रकारची दीक्षा घेऊन यज्ञकर्मांत प्रत्यक्ष जातीने भाग घ्यावा लागे. ( अयज्ञियो वा एष योऽ पत्नीक : । ) स्वाभाविकच वेदांतील प्रार्थना म्हणणें, अगर यज्ञयागांत भाग घेणें यासाठी ज्या शिक्षणाची आवश्यकता असे. ती पूर्ण करण्यासाठी मुलांप्रमाणेच मुलींचाहि 'उपनयन' संस्कार होत असे. त्या कालीं हा संस्कार झाल्याशिवाय व्यक्तीला शिक्षणाचा अधिकार प्राप्त होत नसे. इसवी सन सुरू झाल्यानंतर स्त्रियांचा हा संस्कार प्रचारांतून गेला. परंतु वेदकाळांत स्त्रीशिक्षणाचा प्रचार भरपूर झालेला असल्याने स्त्रिया वेदाध्ययन करीत असत. ज्ञानाच्या विविध शाखांत आपली गति दाखवीत असत व धार्मिक अगर तात्विक वादविवादांत चांगल्या रीतीने सहभागी होत असत. ऋग्वेदांतील अनेक ऋचा लोपामुद्रा, अपाला, उर्वशी, सिकता, विश्ववारा, निवावरी, घोशा आदि कवयित्रींच्या आहेत. काशकृत्स्नी नांवाच्या स्त्रीने मीमांसेसारख्या अत्यंत कठिण विषयावर ग्रंथ लिहिला होता आणि त्यामुळेच मीमांसा या विषयांत शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांना काशकृत्स्ना असें अभिधान मिळलें होतें. गार्गी, मैत्रेयीसारख्या स्त्रियांचीं नांवें तर विद्वानांच्या

---

बदललेल्या परिस्थितीचें विवरण करणारी पुढील दोन अवतरणें वाचनीय आहेत.--

"The present tendency is increasingly to offer vocational training for girls leading to socially better posts in all sectors of the national economy and to admit them to industrial courses hitherto exclusively for boys. This tendency has come about through the dearth of indusrial labour, the necessity for many girls to earn their own living and their rightful desire to secure the better paid posts formerly reserved for men."—Access of women to education—Page 29.

"The war and the profound economic and social changes taking place throughout the world have brought women into situations which are utterly new for them and which required preparation and training if they were to be met and dealt with adequately. Such preparation has now become a matter of simple necessity, forcing questions of principle into the background and making a demand of steadily increasing urgency for sound and prolonged vocational and general education."—Ibid--Page 49.

यादींत गोवलीं जातात. या सर्व गोष्टींवरून वेदकाळांत शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची संख्या बरीच असली पाहिजे असें म्हणतां येईल.

परंतु इसवी सन पूर्व २०० ते इसवी सन २०० या काळांत स्त्रियांच्या या श्रेष्ठ दर्जाला घसरती लागली. इसवी सनाच्या सुरवातीपर्यंत निदान एक धार्मिक विधि म्हणून तरी स्त्रियांच्या उपनयन संस्काराला महत्त्व होतें. परंतु नंतर हा संस्कार स्त्रियांच्या बाबतींत प्रचारांतून गेला. याज्ञवल्क्याने स्त्रियांच्या उपनयनाला विरोध केला. त्या काळांतील सर्व शिक्षणाला आवश्यक अशा या संस्काराचा हक्क स्त्रियांना नाकारल्यामुळे पुढील काळांत त्यांचा सामाजिक दर्जा घसरला. वेदांतील मंत्र म्हणणें, यज्ञांत भाग घेणें हा अधिकार त्यांना राहिला नाही. त्यांना शूद्रासमान मानलें जाऊं लागलें. ( वदन्ति केचिन्मुनयः स्त्रीणां शूद्रसमानताम् । ). या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन स्त्रियांचीं लग्नेंहि लवकर होऊं लागलीं. स्मृतिकालांत तर सातव्याआठव्या वर्षीच मुलींचीं लग्नें उरकण्यांत येत असत. पुढील काळांत पडद्याची पद्धति आली व मोंगल काळांत ती रूढहि झाली. या सर्व गोष्टींमुळे अठराव्या शतकाच्या अखेरच्या काळांत स्त्रीचें क्षेत्र केवळ चूल व मूल इतकेंच मर्यादित झालें आणि तिचें स्वातंत्र्य नष्ट झालें. या परिस्थितीचें स्पष्ट प्रतिबिंब एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीस ब्रिटिशांनी एतद्देशीय शिक्षणाची जी पाहणी केली त्यांत दिसतें. इ. स. १८२२ मध्ये मद्रास राज्यांत १,७८,६३० मुलें एतद्देशीय प्राथमिक शाळांत शिकत होतीं; पण अशा शाळांत शिकणाऱ्या मुलींची संख्या फक्त ५,४८० होती. मुंबई राज्याच्या इ. स. १८२४–२९ च्या कालांतील आकडेवारींत तर शिकणाऱ्या मुलींचा उल्लेखहि नाही. इ. स. १८३५ च्या ॲडमच्या अहवालांत बंगालमध्ये स्त्रीशिक्षणविषयक ज्या विचित्र समजुती होत्या त्यांचा उल्लेख आहे. लिहायला वाचायला शिकलेल्या मुली लग्नानंतर लवकरच विधवा होतात अशा प्रकारच्या समजुती प्रचलित असल्याने बंगालमध्ये मुलींना शिक्षण देण्याची कल्पनाहि त्याकाळीं पालकांच्या मनाला शिवत नसे. या समजुतींचा परिणाम म्हणजे इ. स. १८१३ मध्ये कंपनी सरकारने जेव्हा भारतीय लोकांच्या शिक्षणाची तरतूद करण्याचें ठरविलें तेव्हा सरकारच्या सामाजिक व धार्मिक धोरणानुसार स्त्रीशिक्षण त्यांतून वगळण्यांत आलें. एवढेंच नव्हे तर मिशनरी लोकांनी स्थापन केलेल्या मुलींच्या शाळांना अनुदान देण्याचेंहि सरकारने नाकारलें. परंतु मिशनरी लोक व डेव्हिड हरे, प्रा. पेटन, बेथून यांच्यासारख्या लोकांनी याबाबतींत नेटाने काम केलें. वर उल्लेखिलेल्या इंग्लिश लोकांनी तर स्वःतच्या खर्चाने मुलींच्या शाळा चालविल्या. हळूहळू भारतांतहि स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते लोक निर्माण झाले. राजा राम मोहन रॉय व पंडित ईश्वरचंद विद्यासागर यांच्या-

सारख्या समाजधुरीणांनी स्त्रीशिक्षणाची तळी उचलून धरली. यामुळे इ. स. १८५४ पर्यंत स्त्रीशिक्षणाची थोडीबहुत प्रगति झाली. त्या सुमारास मद्रासमध्ये मुलींच्या २५६ शाळा होत्या व त्यांत ८,००० मुली शिकत होत्या. मुंबईंत मुलींच्या ६५ शाळा होत्या व त्यांत ६,५०० मुली होत्या. या आकड्यांची तुलना इ. स. १८२२–२९ या कालखंडांतील जी आंकडेवारी वर दिली आहे त्याच्याशी केली तर स्त्रीशिक्षणाची वाटचाल हळूहळू का होईना पण प्रगतीच्या दिशेने चालली होती असें दिसून येईल. सरकारचें धोरणहि इ. स. १८५४ पर्यंत बदललें होतें. इ. स. १८५४ च्या वुडच्या खलित्याने मुलींच्या शाळांना सरकारी अनुदान देण्याचें जाहीर केलें व जरूर तर अशा शाळा सरकारतर्फेहि चालविण्याचें आश्वासन दिलें. त्यामुळे इ. स. १८८१ पर्यंत याबाबत पुष्कळच काम झालें. परंतु तरीहि शिक्षण घेणारे स्त्री व पुरुष यांच्या संख्येंत फारच तफावत होती. प्रत्येक १,००० मुलांमागे शिकणाऱ्या मुलींची संख्या फक्त ४६ होती आणि साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत १६ : १ असें होतें तर स्त्रियांत त्याचें प्रमाण ४३४ : १ असें होतें. * शिवाय इ. स. १८८२ पर्यंत झालेली ही स्त्रीशिक्षणाची प्रगति फक्त प्राथमिक शिक्षणापुरतीच मर्यादित होती.

इ. स. १८८१ सालीं नेमल्या गेलेल्या इंडियन एज्युकेशन कमिशनने स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाचा बराच सविस्तर विचार केला. स्त्रियांना फीविषयक सवलती देणें विशेषत: बारा वर्षांवरील मुलींसाठी शिष्यवृत्त्या ठेवणें, मुलींच्या शाळांना जादा अनुदान देणें व स्त्रीशिक्षिका तयार करण्यासाठी प्रशिक्षण संस्था उघडणें आणि खासगी प्रशिक्षण संस्थांना भरपूर अनुदान देणें इत्यादि महत्त्वाच्या शिफारसी या आयोगाने केल्या. परंतु आर्थिक अडचणींमुळे सरकारला या शिफारसी फारशा कार्यवाहींत आणता आल्या नाहीत. असें असूनहि भरघोस खासगी प्रयत्नांमुळे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस स्त्रीशिक्षणाची प्रगतीच झालेली दिसते. या प्रगतीची स्पष्ट कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल. इ. स. १८८१-८२ मध्ये स्त्रियांसाठी फक्त एक महाविद्यालय होतें, मुलींसाठी ८२ माध्यमिक शाळा व १५ प्रशिक्षण केंद्रें होतीं परंतु इ. स. १९०१-२ मध्ये या संस्थांचा आंकडा अनुक्रमें १२, ४२२ व ४५ वर गेला. परंतु या यशाचा फारच थोडा वाटा सरकारकडे जातो. कारण स्त्रियांसाठी असलेल्या १२ महाविद्यालयांपैकी फक्त १ सरकारी होतें, ४५ प्रशिक्षण संस्थांपैकी ३२ खासगी होत्या व ४२२ माध्यमिक शाळांपैकी ३५६ खासगीरीत्या चालविल्या जात होत्या. †

* Report of the National Committee on Women's Education —Page 18.

† Ibid—Page 22.

इ. स. १९०१-२१ या कालांत स्त्रीशिक्षणाची अधिक झपाट्याने प्रगति झाली. बदलत्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीची स्त्रीशिक्षणाचा प्रसार होण्यास मदत झाली. या कालांत आपलें शिक्षण पूर्ण होऊन एकादी नोकरी मिळाल्या-शिवाय विवाहित होण्यास तरुण नकार देऊं लागले. विभक्त कुटुंबपद्धति रूढ होऊं लागल्यामुळे लहानपणीच मुलींचीं लग्नें उरकल्यास त्यांना घर संसार सांभाळता येणार नाही हें उघड होतें. शिवाय सुशिक्षित तरुणांना आपली पत्नीहि सुशिक्षित असावी असें वाटूं लागलें. या सर्व परिस्थितीचा परिणाम जनमानसाचा कांटा स्त्रीशिक्षणाकडे पूर्णपणें झुकण्यांत आला. त्यामुळे तुलनात्मकदृष्टया सरकारी मदत कमी असूनहि स्त्रियांना शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या या कालांत वाढली. इ. स. १९१६ त महर्षि कर्व्यांनी खास स्त्रियांसाठी एक विद्यापीठ सुरू केलें. यानंतरचा इ. स. १९२०-४७ पर्यंतचा काल हा भारताच्या इतिहासांतील अत्यंत घडामोडीचा काळ म्हणावा लागेल. खरें पाहतां इ. स. १९२१ मध्ये व्दिदल राज्यपद्धतीमुळे शिक्षणाचें खातें राज्य पातळीवर हिंदी मंत्र्यांकडे दिलें गेलें होतें आणि इ. स. १९३७ मध्ये प्रांतिक स्वायत्तताहि मिळाली होती. परंतु आर्थिक ओढघस्तीच्या परिस्थितीमुळे इ. स. १९३७ पर्यंत व नंतर दुसऱ्या महायुद्धामुळे पुढील काळांत शासनयंत्रणेला शैक्षणिक विकासाला फारशी मदत करता आली नाही. तसेंच राष्ट्राची बरीच शक्ति या कालखंडांत राजकीय लढयांत खर्च झाल्याने मोठ्या प्रमाणावरील रचनात्मक कार्यक्रम हातीं घेतलीं गेले नाहीत. परंतु असें असूनहि या कालांत स्त्रीशिक्षणाचा प्रसारच झाला. इ. स. १९२१-२२ मध्ये शिकणाऱ्या मुलींची संख्या १२, २४, १२८ होती. ही संख्या इ. स. १९४७ मध्ये ४२, ९७, ७८५ वर गेली.

इ. स. १९४७ मध्ये भारत पारतंत्र्याच्या शृंखलांतून मुक्त झाला आणि देशांत एका नव्या पर्वाचा आरंभ झाला. ब्रिटिश अमदानींतील इ. स. १८२२-१९४७ या कालखंडाकडे नजर टाकली तर स्त्रीशिक्षणाबाबत संख्यात्मक व गुणात्मक प्रगति झालेली दिसते परंतु पुढील आकडेवारीवरून नजर फिरविल्यास साधारण-पणें सव्वाशें वर्षांच्या वाटचालीनंतरहि भारतांतील स्त्रीशिक्षण किती कमी होतें हें दिसून येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
अनुक्रम ........ विभाग ........ दि: ........
क्रमांक ........ क्रमांक ........ नों दि ........

## भारतांतील स्त्रीशिक्षण १९४६–४७.*

| | शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या | शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या | एकूण संख्या | प्रत्येक शंभर मुलांमागे शिकणाऱ्या मुलींचें प्र० |
|---|---|---|---|---|
| १) विद्यापीठें महाविद्यालयें | १,७५,८५४ | २०,३०४ | १,९६,१५८ | १२ |
| २) धंदेशिक्षण देणारीं महाविद्यालयें व खास शिक्षण | ४१,२३४ | २,९०३ | ४४,१३७ | ७ |
| ३) माध्यमिक शाळा | १९,१२,६६७ | २,८०,७७२ | २१,९३,४३९ | १४ |
| ४) पूर्व माध्यमिक शाळा | ९५,६१,०८३ | ३४,७५,१६५ | १,३०,३६,२४८ | ३६ |
| ५) इतर खास शाळा | ४,४२,८०१ | ५६,०९० | ४,९८,८९१ | ३० |
| एकूण | १,३५,९३,५२१ | ४१,५६,७४२ | १,७७,५०,२६३ | ३० |

इ. स. १९४७ सालीं स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सरकारची स्त्रीशिक्षणाकडे पाहण्याची दृष्टि बदलली. जात, धर्म, लिंग व वर्णातीत समाजरचना करून सर्वांना समान संधि देण्याचें तत्व स्वतंत्र भारताच्या घटनेने मान्य केलें. अविकसित जाति-जमाति अगर मागासलेले लोक यांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केलें पाहिजेत ही जाणीव निर्माण झाली. समाजवादी समाजरचनेसाठी सर्व समाजाची शैक्षणिक पातळी वाढली पाहिजे असें वाटूं लागलें. इ. स. १९४८ सालीं नेमल्या गेलेल्या राधाकृष्णन आयोगानेहि स्त्रीशिक्षणाची वाढ झाली पाहिजे असें आवर्जून सांगितलें परंतु स्वातंत्र्योत्तर कालांत सरकारवर ज्या प्रचंड जबाबदाऱ्या येऊन पडल्या

* Report of the National Committee on Women's Education —Page 28.

ग्रा. क. १३०९८

त्यामुळे इच्छा असूनहि सरकारला या प्रश्नाबाबत फारशी प्रगति करता आली नाही. पुढील तक्त्यावरून स्त्रीशिक्षणाची इ. स. १९४९–५७ या कालांत जी प्रगति झाली ती दिसून येईल.*

| | मुलींच्या शिक्षण संस्था | | मुलांच्या शिक्षण संस्था | |
|---|---|---|---|---|
| | १९४९–५० | १९५६–५७ | १९४९–५० | १९५६–५७ |
| १) विद्यापीठें व संशोधन संस्था | १ | २ | ४२ | ७२ |
| २) महाविद्यालयें | ६६ | ११३ | ४०१ | ६२८ |
| ३) धंदेविषयक व तांत्रिक शिक्षणाचीं महाविद्यालयें | १७ | ३४ | १६९ | ३५७ |
| ४) खास शिक्षणाचीं महाविद्यालयें | ६ | १६ | ६० | १०४ |
| ५) माध्यमिक शाळा | ९९७ | १,७५८ | ५,६८५ | ९,४४६ |
| ६) पूर्व माध्यमिक शाळा | १,५८८ | २,६१५ | ११,३३२ | २०,५२४ |
| ७) प्राथमिक शाळा | १३,९७२ | १६,०६५ | १,९०,८५४ | २,६३,८९३ |
| ८) पूर्व प्राथमिक शाळा | ६५ | २४७ | २१० | ५१६ |
| ९) धंदेविषयक व तांत्रिक शिक्षणाच्या शाळा | ४३८ | ७१० | १,५९० | २,२४५ |
| १०) खास शिक्षणाच्या शाळा | ६,९१७ | ४,८६७ | ४४,८९३ | ४४,२४६ |
| एकूण | २४,०६७ | २६,४२७ | २,५५,२३६ | ३,४२,०३१ |

* Report of the National Committee on Women's Education —Page 30.

परंतु याच आकडेवारीवरून तुलनात्मकदृष्टचा स्त्रीशिक्षण किती कमी होतें हेंहि दिसून येतें. स्त्री व पुरुष यांच्या शिक्षणांत असणारी तफावत या कालांत फारशीं भरून आली नाही. इ. स. १९४९–५० मध्ये शिकणाऱ्या दर शंभर मुलांमागे शिकणाऱ्या मुलींचें प्रमाण ३३ होतें. हें प्रमाण इ. स. १९५६–५७ मध्ये ३६ झालें. परंतु या गतीने आपण प्रगति करावयाची म्हटलें तर स्त्री-पुरुषांत शैक्षणिक समानता आणण्यासाठी अजून कमीतकमी दीडशें वर्षें तरी लागतील ! लक्षांत घेण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे स्त्रीशिक्षणाबाबत जी थोडीफार प्रगति झाली आहे ती आधीच प्रगतिपथावर असणाऱ्या राज्यांत झाली. उत्तरप्रदेश, बिहार, राजस्थान या राज्यांत स्त्रीशिक्षणाचें प्रमाण फारच कमी आहे. तेव्हा स्त्रीशिक्षणाबाबत आपल्या देशाला अजून बरीच वाटचाल करावयाची आहे. या वाटचालीची दिशा ठरविण्यासाठी भारत सरकारने इ. स. १९५८ सालीं श्रीमती दुर्गाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमली. या समितीने आपल्या अहवालांत स्पष्ट शब्दांत सांगितलें की अजून कित्येक वर्षें आपण स्त्रीशिक्षण हा एक प्रमुख विशेष शैक्षणिक प्रश्न मानला पाहिजे. आणि त्यासाठी आखण्यांत येणाऱ्या योजनांना विशेष प्राधान्य देऊन त्यासाठी जरूर तो खर्च केला पाहिजे.*

ही ऐतिहासिक पार्श्वभूमि लक्षांत घेऊन आजच्या स्त्रीशिक्षणाचा, त्यांत येणाऱ्या अडचणींचा व त्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा विचार आता आपल्याला करावयाचा आहे. पण तत्पूर्वी स्त्रीशिक्षणाच्या संदर्भांत जे एकदोन प्रश्न नेहमी उद्भवतात त्यांची थोडक्यांत चर्चा करूं.

## स्त्रीशिक्षणाशीं संलग्न असणारें कांहीं प्रश्न

### (अ) स्त्रियांसाठी वेगळ्या अभ्यासक्रमाची गरज ?

निसर्गतः स्त्री व पुरुष यांना करावी लागणारी कामें वेगवेगळ्या प्रकारचीं

* "We therefore strongly recommend that the education of women should be regarded as a major and special problem in education for a good many years to come and that a bold and determined effort be made to face its difficulties and magnitude......That the highest priority be given to schemes prepared from this point of view and that the funds required for the purpose should be considered to be the first charge on the sums set aside for the development of education."—Report of the National Committee on Women's Education—Page 38.

असल्याने व स्त्री-पुरुषांचे स्वभाव–आवडीनिवडी भिन्न असल्याने स्त्रियांचा अभ्यासक्रम वेगळा असावा असा एक मतप्रवाह आहे. अभ्यासक्रमांत अशा प्रकारचा बदल करावयाचा म्हटल्यास तो केव्हा करावा व त्याचें स्वरूप काय असावें याहि मुद्यांचा विचार करावा लागेल. परंतु वरील मताची शहानिशा करतांना एक गोष्ट आपण सदैव लक्षांत ठेवली पाहिजे. ती गोष्ट अशी की निसर्गाने स्त्री-पुरुषांना वेगवेगळ्या भूमिका दिल्या असल्या व सामाजिक संस्कारांमुळे स्त्रीला आपल्याठायीं विशिष्ट स्वभावविशेष जोपासावे लागत असले, तरी स्त्री-पुरुषांचे स्वभावविशेष व आवडीनिवडी म्हणजे कांही तटबंदीच्या भिंती नव्हेत. Sex and Temparament या आपल्या पुस्तकांत डॉ. मार्गारेट मीडने हीच गोष्ट प्रतिपादिली आहे. त्यामुळे केवळ लिंगभेदानुसार अभ्यासक्रमांत बदल करावा हें पटत नाही. शिवाय समाजाचा एक सुजाण घटक या नात्याने येणारी जबाबदारी चांगल्या प्रकारें पार पाडण्यासाठी स्त्री व पुरुषांच्या शिक्षणाच्या सर्वसामान्य साच्यांत फारसा फरक करूनहि चालणार नाही. यादृष्टीने विचार केला तर असें म्हणता येईल की प्राथमिक महत्त्वाचे ( core ) विषय मुलामुलींना समान ठेवून प्रात्यक्षिक कामांत ( practical activities ) अथवा ऐच्छिक ( optional ) विषयांबाबत फरक ठेवावा. परंतु प्रात्यक्षिक कामांची अगर ऐच्छिक विषयांची निवड करतांनाहि केवळ लिंगभेदानुसार सक्ती करूं नये. बहुतेक सर्व देशांतहि आज हाच विचारप्रवाह प्रभावी दिसतो.* आपल्या देशांतील बहुतेक राज्यांनीहि प्राथमिक शाळेंतील मुलामुलींच्या अभ्यासक्रमांत फरक करण्यास विरोध दर्शविला आहे.† पूर्व माध्यमिक ( middle-school ) स्तरावर मुलामुलींच्या अभ्यासक्रमांत फरक असावा असें मत पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, ओरिसा या राज्यांनी नोंदविलें आहे. परंतु बाकीच्या राज्यांनी अभ्यासक्रमांत असा फरक करूं नये असें

---

* "The replies received indicate that it is a widespread practice to have differential programmes of practical activities (at the primary level). The tendency is for boys to take masculine ones and for girls to take the specifically feminine activities. The girls do needlework, domestic economy, dress making, cookery, child care, etc. While boys take handicrafts proper......In some countries the demarcation between what practical activities shall be taken by boys and what shall be taken by girls, is less marked."—Access of Women to Education —Page 16-17.

† Report of the National Committee on Women's Education —Page 250.

म्हटलें आहे.* परंतु श्रीमती देशमुख समितीने मात्र आपल्या अहवालांत म्हटलें आहे की आपल्या देशांतील बहुसंख्य मुलींचें शिक्षण पूर्व माध्यमिक स्तरापर्यंतच मर्यादित असल्याने या शैक्षणिक कालांतील शेवटच्या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमांत शिवणकाम, विणकाम, गायन, चित्रकला, पाकशास्त्र यांसारख्या विषयांचा अंतर्भाव करावा व हस्तकला शिक्षिका, ग्राम सेविका, समाज कार्यकर्ती यांसारख्या धंद्यांना उपयुक्त असें प्राथमिक स्वरूपाचें शिक्षणहि त्यांना मिळावें.† परंतु माध्यमिक शाळेंतील अभ्यासक्रम मात्र मुलामुलींसांठी वेगळे असावे असें मत आपल्या देशांतील सर्व राज्यांनी व्यक्त केलें आहे. हा फरक अर्थातच बहुधा ऐछिक विषयांपुरता मर्यादित राहील. परंतु या ऐच्छिक विषयांबाबतहि केवळ लिंगभेदाखातर मुलींना कांही विषय घेण्यास मज्जाव करणें इष्ट ठरणार नाही. परदेशांतहि आज हीच विचारसरणी प्रभावी ठरत आहे.‡ यामुळेच आज परदेशांत विविध धंद्यांचें शिक्षण घेणाऱ्या व विविध व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया आपल्याला दिसतात. इंग्लंडमध्ये नोकरी करणाऱ्या एकूण लोकसंख्येचा तिसरा हिस्सा स्त्रियांचा आहे★ ही एकच गोष्ट जरी लक्षांत घेतली तरी वरील विधानाची सत्यता पटेल. म्हणून आपल्याला असें म्हणतां येईल की विविध व्यक्तींच्या विभिन्न आवडीनिवडी व कल अगर एकाच व्यक्तीच्या विविध आवडीनिवडी व काल यांना योग्य तो वाव देण्यासाठी अभ्यासक्रमांत वैविध्य हवें. परंतु केवळ लिंगभेदाखातर ठराविक विषयांची सक्ती कोणावरहि करणें इष्ट ठरणार नाही.

## (आ) सहशिक्षण :--

मुलामुलींना एकत्र शिक्षण द्यावें की मुलींच्या शिक्षणसंस्था वेगळ्या असाव्या हा एक विवाद्य मुद्दा आहे. स्त्रीपुरुषांच्या शारीरिक पक्वतेच्या (physical maturity) वयोमर्यादेंत पुष्कळच फरक आहे. ११ वर्षापर्यंत मुलामुलींचा शारीरिक विकास सारखाच असतो. परंतु ११½ वर्षानंतर मुलींची शारीरिक वाढ

* Ibid—Page 250.

† Report of the National Committee on Women's Education —Page 201.

‡ "As at primary level, there is now-a-days a tendency in secondary education not to restrict either sex to given practical activities but to allow boys to take feminine practical activities and girls to take practical activities fermerly regarded as being more specifically for boys."—Access of Women to Education—Page 23.

★ Women in Britain—Page 1.

फार झपाट्याने होते. साधारणपणें ६०% मुलींची शारीरिक वाढ पंधराव्या वर्षापर्यंत पूर्ण होते. परंतु पंधराव्या वर्षापर्यंत फक्त २०% मुलांची वाढ पूर्ण होते. वयाच्या १३½ ते १५½ या कालावधींत मुलामुलींच्या शारीरिक विकासांत फारच फरक आढळून येतो. त्यानंतर १७½ पासून मात्र हा विकास समान असतो. म्हणून कांही लोकांचें म्हणणें असें आहे की सहशिक्षण प्राथमिक स्तरापर्यंत द्यावयास हरकत नाही. परंतु माध्यमिक स्तरावर मात्र सहशिक्षण असूं नये. कारण त्या काळांत सहशिक्षण दिल्यास मुलेंमुली सतत एकत्र राहिल्याने लैंगिक भावनांवर जादा ताण पडून त्या चेतविल्या जातात. नटणें-मुरडणें वाढतें व ज्ञानसाधनेंत व्यत्यय येतो. परंतु अमेरिकेचें उदाहरण पाहिलें तर ही भीति अनाठायी आहे असें वाटतें. मुलांमुलींना केवळ एकत्र शिक्षण दिल्याने त्यांचा नैतिक ऱ्हास होईल ही कल्पना पटत नाही. किंबहुना असें वाटतें की मुलांमुलींना आपण फारच दूर ठेवल्यामुळे त्यांच्यामध्ये परस्परांबद्दल फाजील आकर्षण निर्माण होते, केवळ लैंगिक पातळीवर स्त्रीपुरुष संबंधांचा विचार होतो. शिवाय प्राथमिक व विद्यापीठीय स्तरावर सहशिक्षण द्यावयाचें व केवळ माध्यमिक स्तरावर मुलींना वेगळें काढावयाचें यामुळेहि कदाचित् विरुद्ध लिंगाबद्दल अधिक कुतूहल निर्माण होत असेल. आणि आपल्याकडे ज्या स्तरांवर अगर ज्या संस्थांत सहशिक्षण दिलें जातें तें तरी खऱ्या अर्थी सहशिक्षण असतें काय ? की केवळ एका संस्थेंत मुलेंमुली एका वर्गांत बसल्या म्हणजे तें सहशिक्षण झालें ? मुलेंमुली वेगवेगळ्या ठिकाणीं बसतात. एवढेंच काय पण कित्येक ठिकाणीं मुलींच्या जाण्यायेण्यासाठी खास वेगळे जिने असतात ! आजच्या जीवनसंघर्षांत स्त्री-पुरुष संबंध अनेकविध संदर्भांत येणार असतील तर शाळांतून मुलामुलींच्या मनांचीं त्या प्रकारे तयारी केली पाहिजे. खरें पाहतां शालेय व सहशालेय कार्यक्रमांत योग्य शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली मुलामुलींनी, तरुणतरुणींनी एकत्र येऊन कामें केलीं तर भावनांचें उन्नयन होण्यास मदतच होईल. क्रीडांगण, प्रयोगशाळा, ग्रंथालयें, नाट्यगृहें, नृत्यशाला, पोहण्याचे तलाव इत्यादि ठिकाणीं कांही उच्च हेतूंनी प्रेरित होऊन व त्या हेतूंच्या पूर्तीचा निदिध्यास बाळगून मुलेंमुली एकत्र आल्या तर त्या धीट, मोकळ्या, चतुर, होतील. त्यांच्यांतील भीतीचा मनोगंड दूर होऊन लिंगभेद विसरून एकत्र काम करण्याची त्यांना सवय होईल. शाळांतील अगर महाविद्यालयांतील वातावरणांचा प्रभावच असा असला पाहिजे की विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लैंगिक आकर्षणाला जादा महत्त्व न देतां जीवनाच्या अन्य साहसांनी भारून जावें. त्यासाठी पोषाख, केशरचना याबाबत कांही बंधनेंहि विद्यार्थीवर्गावर घालावयास लागतील, प्राध्यापक अध्यापकांनीहि आपल्या संस्थांतील वातावरण निरामय रहावें म्हणून विशेष प्रयत्न करावें लागतील. स्त्री-पुरुषाचें नातें हरिणी व पारधी, लोणी व विस्तव असें नको असेल तर खऱ्या अर्थी दिलेल्या सहशिक्षणाची मदतच होईल. शिवाय शिक्षणाचा खर्चहि

सहशिक्षणाने कमी होतो ही गोष्ट आपल्या भारतासारख्या गरीब राष्ट्राने लक्षांत घेण्यासारखी आहे. परंतु आपल्या देशांतील प्रभावी विचारप्रवाहानुसार माध्यमिक स्तरावर सहशिक्षण असूं नये असें मानलें जातें. म्हणून श्रीमती देशमुख समितीने आपल्या अहवालांत पूर्व माध्यमिक स्तरावर सहशिक्षण देणाऱ्या जास्तीत जास्त शाळा सुरू कराव्या व माध्यमिक स्तरावरील सहशिक्षणाबाबत ज्या अडचणी आहेत अगर लोकांत जी भीति आहे ती दूर करण्याचे प्रयत्न करावे असें सुचविलें आहे.*

## आजची स्थिति

### (अ) प्राथमिक शिक्षण :--

आज प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत हक्क मानला जातो. यूनोच्या सर्वसाधारण सभेने (general assembly) इ. स. १९४८ मध्ये मानवी हक्कांची जी घोषणा केली त्यांत म्हटलें आहे की निदान प्राथमिक स्तरावरील शिक्षण विनामूल्य व सक्तीचें असलें पाहिजे. पाश्चिमात्य राष्ट्रांत निदान सात वर्षाचें शिक्षण सक्तीचें केलें गेलें आहे. परंतु आशियाई राष्ट्रांतील जपान व्यतिरिक्त अन्य कोणत्याहि राष्ट्राने हें उद्दिष्ट अजून साध्य केलेलें नाही. आपल्या भारतांत तर प्राथमिक स्तरावरहि शिक्षण घेणाऱ्या मुली व मुलें यांच्या संख्येंत फार तफावत आहे. मुलामुलींची संख्या सर्वसाधारणपणें सारखीच असूनहि इ. स. १९५६–५७ च्या आकडेवारीनुसार सहा ते अकरा या वयोमर्यादेंतील ७३·८ टक्के मुलें शाळेंत जात होतीं. पण त्याच गटांतील फक्त ३४·७ टक्के मुली शाळेंत जात होत्या. ही झाली एकूण देशाची स्थिति. परंतु राज्यनिहाय विचार केला तर कांही ठिकाणीं या प्रश्नाचें स्वरूप अधिकच गंभीर आहे असें दिसून येतें. खालील तक्त्यावरून नजर फिरविल्यास ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल.

---

* "At the middle stage, more and more co-educational institutions may be started subject to condition that adequate attention is paid to meet the special needs and requirments of the girls. For the secondary stage, however, we have suggested the establishment of separate girls' schools, especially in rural areas, the parents who so desire having full freedom to admit their girls to co-educational institutions even at the secondary stage. Efforts will ,however, have to be made to remove the difficulties and apprehensions that parents feel in respect of co-education at this stage."—Report of the National Committee on Women's Education—Page 184.

## ६–११ वर्षाच्या शाळेंत जाणाऱ्या मुलामुलींचें प्रमाण (१९५६–५७)

| राज्याचें नांव | मुलें | मुली |
|---|---|---|
| राजस्थान | ४३·४ | ९·५ |
| मध्यप्रदेश | ७२·९ | १७·७ |
| उत्तर प्रदेश | ५४·७ | १४·४ |
| हिमाचल प्रदेश | १००·० | २५·० |
| पंजाब | ८१·४ | ३६·५ |
| मद्रास | ८३·८ | ४८·९ |
| मुंबई | ९५·३ | ५३·१ |
| केरळ | १००·० | ९४·५ |

कांही राज्यें जशीं अप्रगत आहेत तसेंच ग्रामीण व शहरी विभागांतील मुलामुलींच्या संख्येंत फार तफावत दिसते. त्यासाठी पुढील तक्ता पाहूं.

## ६–११ वर्षाच्या शाळेंत जाणाऱ्या मुलींची संख्या (१९५६–५७)

| राज्याचें नांव | ग्रामीण विभाग | शहरी विभाग |
|---|---|---|
| राजस्थान | ४·१ | ३२·४ |
| उत्तर प्रदेश | ८·४ | ३८·१ |
| मध्य प्रदेश | ९·२ | ५१·२ |
| हिमाचल प्रदेश | १७·१ | ५६·२ |
| पंजाब | २६·९ | ७४·७ |
| मद्रास | ३९·७ | ८५·६ |
| मुंबई | १७·६ | १००·० |
| केरळ | २५·० | १००·० |

वरील दोन्ही तक्त्यांवरून असें दिसून येईल कीं मुलींच्या प्राथमिक शिक्षणाबाबत पुष्कळच मजल आपणांस गाठावयाची आहे. नियोजन मंडळाने इ. स. १९६५ पर्यंत ११ + पर्यंतचें सार्वत्रिक शिक्षण सक्तीचें व विनामूल्य करण्याचें उद्दिष्ट ठरविलें आहे. हें उद्दिष्ट गांठावयाचें झालें तर प्राथमिक शिक्षणाबाबत जे प्रमुख दोष आहेत ते दूर केले पाहिजेत. शिक्षणांतील गळती ( Wastage ) व कुंचंबणा ( Stagnation ) हे दोन दोष प्राथमिक स्तरावर प्रकर्षानें जाणवतात. या दोषांची थोडी चर्चा केल्यास त्याचें गांभीर्य सहज लक्षांत येईल.

**गळती** :--( Wastage )

प्राथमिक शाळेंत नांव घातल्यापासून साक्षरता प्राप्त होऊन तें ज्ञान पक्कें होण्यासाठी पांच वर्षांचा कालावधि लागतो. हा कालावधि पूर्ण होण्यापूर्वी विद्यार्थ्यांची नांवें शाळेंतून काढलीं जातात. यालाच 'गळती' असें म्हणतात. या गळतीमुळे मधूनच शाळा सोडणाऱ्या मुलांवर होणारा खर्च वाया जाऊन तीं मुलें पुनः निरक्षर बनतात. शिवाय ११ + पर्यंतचें शिक्षण सक्तीचें व सार्वत्रिक करण्यांतहि यामुळे अडथळा निर्माण होतो. आपल्या देशांत मुलांचें बाबतींतहि गळतीचें प्रमाण जास्त आहे, पण मुलींच्या बाबतींत तर तें प्रमाण फारच आहे. या प्रश्नाचें गांभीर्य पुढील आकडेवारीवरून स्पष्ट होईल.

**प्राथमिक शिक्षणांतील गळतीचें प्रमाण**

(इ. स. १९५१–५२ ते १९५५–५६)

| राज्याचें नांव | मुलांच्या गळतीचें शेंकडा प्रमाण | मुलींच्या गळतीचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|
| राजस्थान ........ | ५४·४ | ६२·६ |
| उत्तर प्रदेश ........ | ६९·१ | ७८·४ |
| मध्यप्रदेश ........ | ६७·६ | ७८·४ |
| हिमाचल प्रदेश ........ | ४८·४ | ४१·४ |
| पंजाब ........ | ३३·३ | ६२·० |
| मद्रास ........ | ५३·५ | ६५·७ |
| मुंबई ........ | ६३ ७ | ८३·५ |

एकूण भारताचा विचार केला तर मुलांच्या गळतीचें प्रमाण ६२·४% आहे, तर मुलींच्या बाबतींत त्याचें प्रमाण ७४% आहे.

अशा या गळतीला पायबंद घातला नाही तर आपली ११ + पर्यंतच्या सार्वत्रिक व सक्तीच्या शिक्षण योजनेंत मोठाच अडथळा निर्माण होईल. आपल्या देशांत अनेक पालकांना मुलींच्या शिक्षणाचें महत्त्वच समजत नाही. पाहणीअंती आढळून आलें आहे की २५ ते ३० टक्के मुलींच्या बाबतींतील गळती केवळ पालकांच्या स्त्रीशिक्षणविषक उदासीनतेमुळे आहे. म्हणून समाजांतील प्रौढ स्त्रियांना शिक्षण देऊन त्यांच्यांत जागरूकता निर्माण केली तर मुलींना शिक्षण पूर्ण होण्या-शाळेंतून काढलें जाणार नाही. घरांतील कामांत मुलींचा पुष्कळच उपयोग होत असल्याने त्यांना शाळेंत न पाठविण्याकडे ग्रामीण भागांतील पालकांचा व आर्थिक-दृष्टया कमी उत्पन्नाच्या पालकांचा कल दिसतो. ही अडचण दूर करण्यासाठी अर्धवेळ शाळा सुरू करण्याची शिफारस श्रीमती देशमुख समितीने केली आहे. स्थानिक कामकाजाच्या गरजा लक्षांत घेऊन वेळ ठरविण्यांत यावी. इंग्लंडमध्येहि इ. स. १८७० ते १९१८ या काळांत अशा अर्धवेळ शाळा चालविण्यांत येत असत. मद्रास व केरळ राज्यांच्या उदाहरणावरून असें दिसून येतें की मधल्या वेळच्या खाण्याची ( mid-day meal ) मोफत सोय केल्यास शाळेंत येणाऱ्यांची अधिक नियमितता येते. शाळेंत येणाऱ्या मुलींची संख्या वाढविण्यासाठी पश्चिम बंगाल-मध्ये यशस्वी झालेला 'शालेय मातांच्या' नियुक्तीचा प्रयोगहि करून पाहण्यां-सारखा आहे. भारतासारख्या गरीब देशांत गळतीचें एक प्रमुख कारण आर्थिक परिस्थिती हेंहि असतें. सर्वसाधारणपणें ६५ टक्के विद्यार्थ्यांच्या गळतीचीं कारणें आर्थिक असतात असें दिसून आलें आहे. यासाठी विशिष्ट पातळीपेक्षा ज्या पालकाचें उत्पन्न कमी आहे अशा लोकांच्या मुलींना वह्या—पुस्तकें व कपडे मोफत पुरवि-ण्याची श्रीमती देशमुख समितीची शिफारस विकारहि आहे. पुष्कळ घरांत मुलींना घरांतील लहान मुलांकडे लक्ष देण्यासांठी शाळा सोडावी लागते. सरकारतर्फे संगोपन केंद्रांची ( creches ) व्यवस्था झाल्यास आयांना आपलीं मुलें तिथे ठेवून कामाला जातां येईल व घरांतील मुलीहि शाळेंत येऊं शकतील. मुलींची गळती थांबविण्यासाठी अधिक कडक कायद्याची तरतूद करावी असें कांही लोक सुचवितात. ही तरतूद करणें फारसें कठिणहि नाही. परंतु यामुळे कायद्यापाठीमागील हेतू साध्य होईलच असें नाही. कारण आजहि शेकडो मुलींची ११+ पर्यंत शाळेच्या पटावर नांवें असतात. गैरहजेरीबद्दल पालकांना नोटीस मिळाली तर पुनः चार—दोन दिवस मुली शाळेंत येतातहि. पण यामुळे आपला हेतू पूर्ण होतो का ? म्हणूनच स्त्रीशिक्षणाबाबत जनमानस जागृत कर-ण्याबाबत देशमुख समितीने दिलेला भर योग्य वाटतो. ही जागृति साधण्यासाठी

स्त्रीशिक्षण सप्ताह, शिक्षक पालक संपर्क, प्रौढ स्त्रियांचें शिक्षण आदि योजनांची शिफारसहि समितीने केली आहे.*

## कुचंबणूक (Stagnation)

एकाच इयत्तेंत एकापेक्षा अधिक वर्षें राहण्यालाच तांत्रिक भाषेंत stagnation असें म्हणतात. याबाबतच्या मुंबई सरकारच्या आकडेवारीवरून असें दिसून येतें की प्राथमिक शाळेच्या पहिल्या वर्गांत मुलांच्या कुचंबणूकीचें प्रमाण ४० ते ५० टक्के असतें. दुसऱ्या ते चौथ्या वर्गांत हें प्रमाण २० ते २५ टक्के असतें. अशाप्रकारें विद्यार्थी नापास होण्याने त्यांच्या शिक्षणावर होणारा राष्ट्राचा पैसा वाया तर जातोच पण सक्तीचें शिक्षण ठराविक वयोमर्यादेंत पूर्ण करणेंहि या विद्यार्थ्यांना शक्य होत नाही. म्हणूनच या दोषाला आळा घालणें जरूर ठरतें. या दोषाची कारणपरंपरा शोधली तर त्याला पायबंद कसा घालावा हें आपोआप उमजतें.

पहिल्या वर्गांतच अधिक मुलें नापास होण्याचें एक कारण असें की आपल्या मुलाचें नांव एकाद्या शुभदिनीं शाळेंत घालावें असें पालकांना वाटतें. भिन्न धर्माच्या भिन्न जातीच्या पालकांचे 'शुभदिन' वेगवेगळे असतात! स्वाभाविकच पहिल्या वर्गांतील नांव नोंदणीचें काम वर्षभर चालू असतें. अशा परिस्थितींत कित्येक मुलांची वर्षभरांतील हजेरी जास्तीत जास्त शंभर दिवस भरते. हीं मुलें नापास झालीं तर काय नवल? मुलाचें नांव शाळेंत घातल्याबरोबर त्याला कांही एकदम शाळेबद्दल आवड निर्माण होत नाही. परिणामतः पहिल्या वर्गांत नांव नोंदविल्यानंतर पहिले पांच-सहा महिने मुलें अतिशय अनियमितपणें शाळेंत येतात. यामुळेहि पहिल्या वर्गांतील नापास होणाऱ्यांची संख्या वाढते. कित्येक पालकहि विशेषतः ग्रामीण भागांतील आपला मुलगा नियमितपणें शाळेला जातो की नाही याबद्दल विशेष जागरूक नसतात. याशिवाय प्राशिक्षित नसलेल्या शिक्षकांची नेमणूक,

* We are of the view that mere passing of legislation would be of no avail unless suitable conditions for enforcing parents to send their daughters to schools are created......We have to remember that legislative compulsion is practicable only against recalcitrant minority and legislation for compulsory education is no exception to this. The creation of a preparatory ground through the education of public opinion for enforcement of legislative compulsion is very necessary—Report of the National Committee on Women's Education—Page 54.

अनुक्रम ...(विभाग ...... वि:
क्रमांक ...... १११ नों दि

अकार्यक्षम अगर उदासीन शिक्षकांचा होणारा परिणाम, एकशिक्षकी शाळांत पहिल्या वर्गाकडे होणारें दुर्लक्ष, वर्गांतील जादा संख्या, वह्या-पुस्तकें आदि शैक्षणिक साहित्याचा विद्यार्थ्यांजवळ दिसणारा अभाव या कारणांमुळेहि वरील दोष निर्माण होतो. यासाठी प्रशिक्षणाचीं केंद्रें खोलून प्रशिक्षित शिक्षकांची सोय करण्याचा प्रयत्न चालू आहे, शाळा उघडण्यांत येत आहेत. शिवाय महाराष्ट्र सरकारने यंदा पहिलीची परीक्षा न घेण्याचा निर्णय घेतला आहे.

## (आ) पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिक्षण :--

स्त्रियांनी आर्थिकदृष्टया स्वावलंबी व्हावयाचें म्हटलें तर कमीतकमी माध्यमिक शिक्षण तरी त्यांना मिळालें पाहिजे. विद्यापीठीय शिक्षण घेण्याचा परवाना मिळविण्यासाठीहि माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याची आवश्यकता असते. येवढेंच नव्हे तर गृहिणी व नागरिक या नात्याने येणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीहि माध्यमिक शिक्षणाची शिदोरी स्त्रीजवळ असणें उपयुक्त ठरतें. यावरून असें म्हणतां येईल की प्राथमिक शिक्षण हा आज स्त्रीला मिळणारा एक हक्क असला तर माध्यमिक शिक्षण ही एक आजची गरज आहे. परंतु या स्तरांवर शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या फारच कमी आहे. राजस्थान, बिहार, ओरिसा व उत्तर प्रदेश या राज्यांत इ. स. १९५५–५६ सालीं ६–११ ह्या वयाच्या गटांतील शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या संख्येचें शेंकडा प्रमाण मुलींच्या एकूण संख्येशी ९–५, १४–३, १६–१ असें होतें. परंतु ११ ते १४ या वयाच्या गटांतील मुलींचें त्याच राज्यांतील प्रमाण मात्र अनुक्रमें २–५, १–३, ३–३ असें होतें. ग्रामीण भागांची उदाहरणें घेतलीं तर याबाबतची स्थिति अधिकच वाईट होती असें दिसून येतें. तसेंच या वयोमर्यादेच्या शिक्षण घेणाऱ्या मुलांच्या संख्येची मुलींच्या संख्येशी तुलना केली तर त्यांत फारच तफावत दिसते. इ. स. १९५५–५६ मध्ये मुला-मुलींच्या संख्येचें हें प्रमाण बिहारमध्ये ११ : १, ओरिसांत ९ : १ आणि राजस्थान व उत्तरप्रदेशांत ७ : १ असें होतें. राज्यांच्या पातळीवरील ही आकडेवारी बाजूस सारून एकून देशाचा विचार केला तरी वरील प्रमाण जवळजवळ तेंच दिसतें. इ. स. १९५६ च्या आकडेवारीनुसार मुलींच्या एकूण संख्येशी ६ ते ११ वयाच्या शिक्षण घेणाऱ्या मुलींचें शेकडा प्रमाण ३४–७ असें होतें, तर ८ ते ११ या गटांतील मुलींचें प्रमाण ८-५ असें होतें. याच वयोमर्यादेच्या शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींच्या संख्येंतील फरकाचें प्रमाण अनुक्रमें २ : १ व ३४ : १ असें होतें. माध्यमिक स्तरावर तर मुलींची संख्या अधिकच कमी झालेली व मुलामुलींच्या संख्येंत फारच तफावत पडलेली दिसतें. १४ ते १७ या वयाच्या एकूण १–२० कोटी मुलींपैकी फक्त ३–४

टक्के मुली शाळेंत जात होत्या. याच वयोमर्यादेंतील शिक्षण घेणाऱ्या मुलांचें प्रमाण १५–० टक्के होतें. फक्त ग्रामीण विभागांचा विचार केला तर परिस्थिति अधिकच गंभीर असल्याचें दिसून येईल.

वरील चर्चेवरून पूर्व माध्यमिक व माध्यमिक स्तरावर स्त्रीशिक्षणाचा प्रसार करून जास्तीत जास्त मुलींना शिक्षण देण्याची निकड आपणाला जाणवते. कांही अन्य देशांत माध्यमिक शाळांतून शिक्षण घेणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण आपण पाहिलें तर ही निकड अधिकच तीव्रतेने जाणवतें. त्यादृष्टीने पुढील तक्ता पाहण्यासारखा आहे.

**माध्यमिक शाळांतील भरतीची शेकडेवारी** *

| देशाचें नांव | मुलें | मुली |
|---|---|---|
| डेन्मार्क .. .. .. .. | ४९–२२ | ५०–७८ |
| फ्रान्स .. .. .. .. | ५०–४१ | ४९–५९ |
| इंग्लंड व वेल्स .. .. .. | ५०–९० | ४९–१० |
| ऑस्ट्रिया .. .. .. .. | ६५–२० | ३४–८० |
| युनायटेड स्टेटस् खासगी शाळा .. | ४८–४५ | ५१–३५ |
| ,, ,, सरकारी शाळा .. | ४८–६२ | ५१–३८ |

पूर्वमाध्यमिक व माध्यमिक स्तरावर स्त्रीशिक्षणाचा प्रसार आपल्या देशांत करावयाचा असेल तर आजच्या या दुःस्थितीची कारणें समजून घेतलीं पाहिजेत. श्रीमती देशमुख समितीने या परिस्थितीची चिकित्सा करतांना पुढील कारणाचा उल्लेख केला आहे:—

* याच तक्त्यांत भारतांतील मुलांची संख्या ८७.२७ व मुलींची संख्या १२·७३ अशी आहे.— ही माहिती Access of Women to Education—Page 21 येथून घेतली आहे.

पूर्व माध्यमिक व माध्यमिक शिक्षणाचा मुलींना त्यांच्या भावी आयुष्यांतील गृहिणी व माता या प्रमुख भूमिकांच्या दृष्टीने फायदा तर होत नाहीच पण उलट त्यांना या शिक्षणामुळे खर्चिक सवयी लागतात असें पालकांना वाटतें. कित्येक पालकांना ११ ते १४ या वयाच्या मुलींना बाहेर पाठविणें अगर मुलांच्या शाळेंत पाठविणें आवडत नाही. अनेक मुलींची या वयांत लग्नें होतात अगर ठरतात. त्यामुळेहि त्यांना शाळेंत पाठविले जात नाही. दूर अंतरावरच्या शाळेंत मुलींना पाठविणें पालकांना पसंत नसतें. शिवाय मुलाला शिक्षण द्यावें की मुलीला असा आर्थिक पेच पालकांपुढे उभा राहिल्यास मुलीच्याच शिक्षणाला खो बसतो. या सर्व कारणांमुळे या स्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या फारच कमी असते.

मुलींच्या शिक्षणांत अडथळा आणणारीं हीं कारणें दूर केल्याशिवाय मुलींची संख्या वाढणार नाही हें ओळखून राष्ट्रीय स्त्रीशिक्षण समितीने त्याबाबत पुढील उपाययोजना सुचविली आहे:—

(१) विविध मर्यादेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलींना पूर्व-माध्यमिक शिक्षण मोफत असावें व माध्यमिक स्तरावर मुलींना फीविषयक संपूर्ण अगर निम्म्या सवलती द्याव्यात. या सूचनेच्या संदर्भात महाराष्ट्र सरकारने बाराशेंच्या खाली ज्या पालकांचें उत्पन्न आहे त्यांच्या पाल्यांना शिक्षण नि:शुल्क देण्याचा जो निर्णय घेतला आहे तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. या निर्णयामुळे अधिक मुलें-मुली शिक्षण घेऊं लागल्या हें खरें आहे. परंतु आज कांही पालकांकडून व संस्थांकडून या सवलतीचा दुरुपयोग होतो आहे अशी शंका आल्याने त्याबाबत चौकशी समिति नेमावी असें ठरलें आहे. तेव्हा मुलींच्या बाबतींतील वरील शिफारशींची अंमलबजावणी करतांना तिचा कोणत्याहि प्रकारें दुरुपयोग होणार नाही अशी खबरदारी प्रथमपासूनच घेणें इष्ट ठरेल.

(२) अनेक पालकांना आपल्या मुलींना मुलांच्या शाळेंत पाठविणें आवडत नाही. म्हणून ग्रामीण अथवा नागरी (suburbun) विभागांत मुलींसाठी माध्यमिक शाळा स्थापन कराव्या त्याचप्रमाणें सहशिक्षण देणाऱ्या शाळांत मुलींचा विकास व त्यांच्या अन्य गरजा यांकडे पूर्ण लक्ष देऊन अभ्यासक्रम, सहशालेय कार्यक्रम, खेळ आणि क्रीडा, त्यांच्यासाठी वेगळया विश्रांतीखोल्या आदि गोष्टींची तरतूद झाली पाहिजे. दूर अंतरावर असणाऱ्या शाळांत मुलींना एकटेंदुकटें पाठविणें पालकांना अनिष्ट वाटतें हें ओळखून परिवहनाची (transport) मोफत अगर अल्प खर्चांत सोय केली पाहिजे. तसेंच नजीकच्या भविष्यकाळांत प्रत्येक खेडयांत मुलींसाठी माध्यमिक शाळा सुरू करणें शक्य होणार नाही हें समजून घेऊन ज्या

ठिकाणीं मुलींच्या माध्यमिक शाळा आहेत अशा जास्तीत जास्त ठिकाणी वसतिगृहाची सोय केली पाहिजे.

(३) विशिष्ट मर्यादेपेक्षा ज्यांचें उत्पन्न कमी आहे अशा पालकांच्या मुलींसाठी पूर्व माध्यमिक स्तरापर्यंत पुस्तकें, वह्या, शाळेचा गणवेष यासाठी आर्थिक मदत द्यावी अथवा त्या वस्तूच पुरविल्या जाव्यात. माध्यमिक स्तरावर मात्र या सवलती फक्त गरीब व लायक मुलींनाच द्याव्यात. गुणशिष्यवृत्यांची (merit scholarships) अधिक सोय करणेंहि इष्ट ठरेल. तसेंच विविध प्रकारचे अभ्यासक्रम निवडण्याबाबत व शिक्षण संपल्यानंतर नोकरीधंद्याबाबत योग्य मार्गदर्शन शाळेतर्फे मुलींना मिळाल्यास त्यांचें शिक्षण करणेंहि उपयुक्त आहे असें पालकांना वाटेल.

## (इ) स्त्रियांचें व्यावसायिक शिक्षण :--

आज भारताला दुसऱ्या विकसित देशांच्या बरोबरीने स्वतःची प्रगति करून घेण्यासाठी विविध लहानमोठ्या धंद्यांची वाढ करावयाची आहे. ही वाढ स्त्रीवर्गाचा हातभार लागल्याशिवाय जलद गतीने होणार नाही. शिवाय आज भारतांतील सरासरी वार्षिक दरडोई (per-capita) उत्पन्न रु. २७५ आहे. वाढती महागाई व जीवनविषयक वाढत्या गरजा यामुळे हें उत्पन्न अगदीच तोकडे पडतें. स्वाभाविकच स्त्रीनेहि अर्थार्जन करून कुटुंबपोषणाला हातभार लावणें आवश्यक वाटूं लागलें आहे. प्रौढ कुमारिका व विधवा स्त्रियांनाहि आपला भार दुसऱ्यांवर घालण्याऐवजी आपण आर्थिकदृष्टया स्वावलंबी असावें असें वाटते. शिवाय गेल्या दीडशें वर्षांत भारतांत ज्या विविध सामाजिक व राजकीय चळवळी झाल्या त्यांमुळे स्त्रियांच्यांत जागृति होऊन त्यांना केवळ 'गृहभूषा' होणें आवडत नाही. या सर्व बाबींचा विचार केल्यावर स्त्रियांना लहानमोठ्या उद्योगधंद्यांचें शिक्षण मिळण्याच्या सर्व सोयी उपलब्ध होऊन देशाच्या विकासाला हातभार लावून स्वतःची अस्मिता टिकविण्याचें साफल्य त्यांना मिळालें पाहिजे असें म्हणावें लागतें. इतर देशांतील स्त्रिया याबाबत किती पुढे गेल्या आहेत हें पाहिलें म्हणजे आपल्या स्त्रियांना धंदेशिक्षण देण्याची आवश्यकता अधिकच जाणवते. पुढील तक्त्यावरून कांही इतर देशांची या बाबतची प्रगति दिसून येईल.

**धंदेविषयक शाळांतील भरतीची शेंकडेवारी** (लिंगभेदानुसार) *

| राष्ट्राचें नांव | मुलें | मुली |
|---|---|---|
| डेन्मार्क .. ... .... | ७४·४८ | २५·५२ |
| ऑस्ट्रिया ... .... | ५०·१२ | ४९·८८ |
| इंग्लंड व वेल्समधील अर्धवेळ शाळा . | ६१·२९ | ३८·७१ |
| इंग्लंड व वेल्समधील पूर्णवेळ शाळा . | ७१·८३ | २८·१७ |
| युनायटेड स्टेटस् .. .... | ४७·०१ | ५२·९९ |

आज भारतांत विविध उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या पुरुषांची संख्या ९३% आहे, तर स्त्रियांची संख्या फक्त ७% आहे. नोकऱ्या करणाऱ्या पुरुषांची संख्या ८८·६% आहे तर स्त्रियांची संख्या ११·४% आहे. फक्त पश्चिम जर्मनींत विविध धंद्यांत काम करणाऱ्या स्त्रियांची संख्या १० लक्ष आहे.† अमेरिकेंत तर नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या २१,२५०,००० आहे. नोकरी करणाऱ्या एकूण लोकांच्या संख्येशी स्त्रियांचें प्रमाण ३३% आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांपैकी ६०% स्त्रिया लग्न झालेल्या असतात.‡ या दृष्टीने विचार केला तर स्त्रियांसाठी योग्य असे अभ्यासक्रम सुरू करणें, व्यावसायीन मार्गदर्शनाची व्यवस्था करणें, नोकरींत त्यांना कांही विशेष सवलती देणें इत्यादि श्रीमती देशमुख समितीच्या सूचना महत्त्वाच्या वाटतात.

आज भारत देश संक्रमणावस्थेंतून जात आहे. प्रत्येक क्षेत्रांत देशाची उन्नति करण्याची जिद्द बाळगून जनता व सरकार भगीरथ प्रयत्न करीत आहेत. अशावेळीं

* Access of women to education—Page 29.

ही माहिती इ. स. १९६० मधील आहे. या तक्त्यांत भारतांतील मुलांचें प्रमाण ८० १२ व मुलींचें प्रमाण १९·८८ असें दिलें आहे.

† Vital speeches and documents of the day May 15, 1962—Page 402.

‡ Facts about the United States, 1962.

स्त्रीशिक्षणाच्या प्रश्नाला विशेष महत्त्व द्यावें हें स्वाभाविकच आहे. श्रीमती दुर्गाबाईंच्या अध्यक्षतेखाली नेमल्या गेलेल्या समितीने या प्रश्नाची सखोल चर्चा करुन महत्त्वाच्या शिफारसी केल्या आहेत. पुढील दहा पंधरा वर्षें भारताच्या इतिहासांतील अत्यंत महत्त्वाचीं वर्षें ठरतील व इतर प्रगतिपर राष्ट्रांप्रमाणे स्त्री-पुरुष खांद्याला खांदा लावून देशाच्या नवनिर्माणांत सहभागी होतील यांत शंका नाही.

✤ ✤ ✤

### संदर्भ ग्रंथांचीं नांवें

(1) Access of women to Education.

(2) Report of the National Committee on Women's Education.

(3) Women in Britain.

(4) Report of University Education.

(5) Ancient Indian Education.

# विद्यार्थी व शिस्त : ६ :

## विद्यार्थ्यांची वर्तणूक--एक चिंता :--

प्रत्येक मावळती पिढी नव्या पिढीबद्दल कुरकुरत असते. नवी पिढी अश्रद्ध आहे; थिल्लर आहे, हल्ली दर्जा घसरला आहे—असे म्हणणारे अनेक लोक जुन्या पिढींत असतात. आपल्या वाडवडिलांना त्यांच्या वडीलधाऱ्यांनी असेंच म्हटलें व आजचे वडीलधारे तरुणांना तेंच म्हणत आहेत. 'विद्यार्थी बेशिस्त आहेत' असें म्हणण्यांत फक्त वरील प्रकारचा दृष्टिकोन असता तर त्याचा विचार करण्याची जरूर नव्हती. विद्यार्थीबद्दलची ही ओरड म्हणजे केवळ दोन पिढ्यांच्या दृष्टिकोनांतील फरकाचा प्रश्न आहे असें समजून आपण शिस्त निकालांत काढली असती ! पण आजकाल विद्यार्थ्यांची वर्तणूक हा एक चिंतेचा विषय झाला आहे. ह्या चिंतेची टोचणी अधिक तीव्र होण्याचें कारण असें की ज्या तरुणांच्या शारीरिक व मानसिक सामर्थ्यावर स्वतंत्र राष्ट्राच्या इभ्रतीची व लौकिकाची इमारत उभी करावयाची त्यांच्याबद्दलच साशंकता निर्माण झाल्याने समाजधुरीण विमनस्क झाले आहेत. एकाद्या मोठ्या वृक्षाच्या बुंध्यालाच कीड लागलेली दिसावी तसें झालें आहे ! आमचे तरुण एकादी प्रश्नपत्रिका कठीण निघाली की हुल्लडबाजी करीत आहेत, आपल्याला मान्य नसलेलें परीक्षेचें वेळापत्रक बदलून घेण्यासाठी विद्यापीठांतील चीजवस्तूंची मोडतोड करीत आहेत. विरुद्ध निर्णय देणाऱ्या कुलगुरूंना मारण्याचे व परीक्षेच्या वेळीं पर्यवेक्षकांना विद्यार्थ्यांनी ठोकल्याचे प्रसंग घडत आहेत. विद्यार्थ्यांतील बेशिस्त विकोपाला गेल्यामुळेच अलाहाबाद, अलीगढसारखीं विद्यापीठें कांही काळ बंद ठेवावीं लागलीं. हीं सर्व दृश्यें मनःचक्षूंसमोर आलीं म्हणजे चिंता वाटते. आपलें मत दुसऱ्याला पटविण्यासाठी वरील मार्गांचा अवलंब करण्याची वृत्ति आजच्या विद्यार्थ्यांत वाढली तर त्यांच्यांतून उद्यांचे 'अयूब' निर्माण झाल्याशिवाय राहणार नाहीत. जी लोकशाही जीवननिष्ठा आपण स्वीकारली आहे, त्याला हें 'बळी तो कान पिळी'चें धोरण सर्वस्वी विरोधी आहे. आणि म्हणूनच आजच्या तरुणांत शिस्त कशी निर्माण करतां येईल हा एक विचाराचा विषय बनला आहे. वर सांगितलेल्या उदाहरणांमुळे कोणीहि सुजाण नागरिक अस्वस्थ व्हावा हें

स्वाभाविक आहे. परंतु विचारवंतांनी विषण्ण व्हावें अशा अन्य गोष्टीहि आज विद्यार्थ्यांत दिसत आहेत. महाविद्यालयांतीलच नव्हे तर माध्यमिक शाळांतील विद्यार्थीहि अनेकदा विद्यार्थिनींना कागदी बाण मारून, अपशब्द बोलून, त्यांच्या पाठीमागे लागून हैराण करतात. दोन वर्षांपूर्वी उषा भार्गवच्या प्रसंगाने सर्व लोक विव्हल झाले. पण तो प्रसंग म्हणजे दररोजच्या जीवनांत विद्यार्थ्यांकडून जें वर्तन होतें त्याचीच परिणति होती. महाविद्यालयांत प्राध्यापकांना शिकविणें अशक्य व्हावें अशी परिस्थिति अनेकदा निर्माण होते. संस्थेंत बोलाविलेल्या पाहुण्यांचा उपमर्द विद्यार्थ्यांकडून केला जातो. या सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे 'विद्यार्थी असें कां वागतात ?' हें प्रश्नचिन्ह डोळयांपुढून हलत नाही. पौरुषाला, शौर्याला, साहसाला आवाहन करणाऱ्या गोष्टीच त्यांना दिसत नसल्याने विद्यार्थी आपलें शौर्य वरील प्रकारच्या गोष्टींत प्रकट करतात की काय ? विद्यार्थ्यांनी आदराने नतमस्तक व्हावे असे अध्यापक, प्राध्यापक आज नाहीतच की काय ? आपलें म्हणणें अधिकाऱ्यांच्या कानीं घालण्याचा खात्रीचा उपाय म्हणजे संप, हरताळ, आरडाओरड असा विद्यार्थ्यांचा अनुभव आहे की काय ? तरुणवर्गाचे विचार, भावना व कल्पनाशक्तीला योग्य वळण लागणारे उपक्रम आपल्या शिक्षणक्रमांत कमी पडतात की काय ? आणि समजा, असें होत असेल तर विद्यार्थ्यांच्या वरील प्रकारच्या वर्तणुकीला आपण कितपत जबाबदार आहोंत ? या प्रश्नांचीं कारणें शोधून विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक सामर्थ्याचें पोषण कोणत्या उपक्रमांद्वारें होऊं शकेल याचा आपण आता विचार करूं.

## छडी वाजे छम्‌छम् :—

विद्यार्थ्यांत शिस्त पाहिजे असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा आपल्याला नक्की काय म्हणावयाचें आहे याबद्दलच्या आपल्या कल्पना स्पष्ट असल्या पाहिजेत. सैन्यांतील जवानांत करडी शिस्त बाणविण्याचा प्रयत्न त्यांच्या प्रशिक्षणकालांत केला जातो. 'आगे चलो' असा हुकुम मिळतांच पुढे दरी आहे की डोंगर याचा विचार न करतां हुकुमाची काटेकोर अंमलबजावणी तेथे अपेक्षित असते. सुप्रसिद्ध आंग्ल कवि टेनिसनने एके ठिकाणीं म्हटलें आहे—

Their's not to reason why
Their's not to make reply
Their's but to do and die.

सैन्यांतील जवानांनी असें न करतां प्रत्येकाने आपल्या विचाराने व आपल्या कलाने वागावयाचें म्हटलें तर देशाचें स्वातंत्र्य धोक्यांत यावयास वेळ लागणार नाही. विचारपूर्वक धोरण ठरविण्याची जबाबदारी सैन्यांतील अधिकाऱ्यांची असते. त्या धोरणाची अंमलबजावणी शिपायांनी करावयाची असते हुकुम पाळण्याची तत्परता व त्याबाबतचा काटेकोरपणा सैनिकी शिस्तींत आवश्यक असते. विजेचें बटण दाबतांच जसा दिवा लागतो त्याप्रमाणे ओठांतून हुकूम बाहेर पडतांच त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे अशी येथे अपेक्षा असते. शिस्तीच्या या प्रकारांत यांत्रिकतेवर भर असून व्यक्तिगत विचारांना, भावनांना त्यांत स्थान नसतें. शालेय जीवनांतहि एकोणिसाव्या शतकापर्यंत शिस्तीची हीच कल्पना प्रचलित होती. ज्या शिक्षकाला विद्यार्थी चळचळ कापतात तो खरा शिक्षक असें मानले जाई. त्यामुळे शिक्षकांपुढे ब्र काढण्याची विद्यार्थ्यांची ताकद नसे. परंतु कँपमधून सुटीसाठी बाहेर पडलेले सैनिक जसे तेवढया वेळांत आपल्या भावना विचारांना स्वैर सोडून मन मानेल तसें वागून घेतात तसें शिस्तीच्या पोलादी चौकटींत सापडलेले विद्यार्थीहि शिक्षक नसले तर वर्गांत अगर शाळेबाहेर स्वैर वर्तन करतात. एखाद्या बुभुक्षित माणसापुढे अन्न ठेवलें म्हणजे तें किती व कसें खावें याबद्दलच्या विचारापेक्षा तें थोडयाशा वेळांत कसें संपवितां येईल हाच विचार त्याच्या मनांत प्रामुख्याने येतो. अशीच अवस्था लादलेल्या कडक शिस्तीच्या जोखडाखालून सुटलेल्या विद्यार्थ्यांची होते. म्हणूनच केवळ लादलेली शिस्त विद्यार्थ्यांच्या जीवनाला वळण लावूं शकत नाही.

## शिस्त स्वयंस्फूर्त असावी :—

विसाव्या शतकांत रूसो, हर्बर्ट आदि विचारवंतांनी शिक्षणविषयक तत्व-प्रणालीला एक वेगळीच कलाटणी दिली. विद्यार्थ्याच्या सर्व सुप्त शक्तींचा विकास त्याचा विशिष्ट कल ओळखून करणें म्हणजेच शिक्षण अशी विचारसरणी प्रसृत होऊं लागली. लॅटिन, गणित, संस्कृतसारखे विषय अत्यंत महत्त्वाचे आहेत व ते प्रत्येक विद्यार्थ्याला आलेच पाहिजेत ही कल्पना दूर झाली. त्यामुळे नावडते विषय विद्यार्थ्यांच्या डोक्यांत कोंबण्यासाठी ज्या विविध अस्त्रांचा उपयोग केला जात असे त्यांचा वापर कमी होऊं लागला. आधुनिक मानसशास्त्रज्ञांनी असाहि सिद्धांत मांडला की ज्या गोष्टींना संबंध मधुर स्मृतींशी अधिक असतो त्या गोष्टी पुनः पुनः करण्याकडे व कटु स्मृतींशी निगडित असलेल्या गोष्टी टाळण्याकडे कोणत्याहि प्राण्याची स्वाभाविक प्रवृत्ति असते. त्यामुळे मारणें अगर अन्य शिक्षा करण्यामुळे

त्या विशिष्ट विषयापासून अगर शिक्षकापासून विद्यार्थी दूर राहतों हा उपसिद्धांत निघाला. शिवाय शिक्षणाची कल्पनाहि बदलली. शिक्षण म्हणजे विशिष्ट विषयांची ठराविक माहिती विद्यार्थ्यांच्या डोक्यांत कोंबणें नव्हे; स्वतःच्या सर्व शक्तींचा व बुद्धीचा वापर करून शिक्षकांच्या मदतीने व मार्गदर्शनासाठी ज्ञान मिळविणें म्हणजे शिक्षण. या नवीन कल्पनेच्या प्रभावामुळे प्रोजेक्ट मेथड, डाल्टन प्लॅन, गॅरी मेथड अगर ॲस्टिव्हिटि मेथड या सर्व आधुनिक पद्धतींत विद्यार्थ्यांच्या स्वप्रयत्नांना उत्तेजन देण्यात आलें आहे. या सर्व अध्यापन पद्धतींत शिक्षक व विद्यार्थी यांचे संबंध व वर्गव्यवस्था याबद्दलचे नवीन विचार अनुस्यूत आहेत. चाबकाऱ्या धाकाखाली वाघाला काबूत ठेवणाऱ्या रिंगमास्तरप्रमाणे छडीच्या धाकाने विद्यार्थ्यांच्या हालचाली व आवाज काबूत ठेवणारा शिक्षक आधुनिक मानसशास्त्र व विचारप्रवाहांच्या उदयापूर्वी आदर्श मानला जात असे. परंतु नवीन कल्पनांमुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे संबंध पार बदलून गेले. मूल जन्मतःच भाषा, गणित आदि विषय शिकून येत नाही त्याला ते विषय शिकावे लागतात. त्याचप्रमाणे संयमाने अगर नम्रतेने वागणें, अधिकाऱ्यांचा मान ठेवणें, नियमांचें पालन करणें या गोष्टीहि मुलाला शिकाव्या लागतात. म्हणूनच वागण्याच्या बाबतींत विद्यार्थ्यांच्या चुका झाल्यास त्या त्यांनी मुद्दाम केल्या असें न समजतां त्या अज्ञानाने, अपरिपक्वतेमुळे झाल्या असें प्रथमतः मानलें पाहिजे व विद्यार्थ्यांच्या चुका सुधारण्यासाठी कोणते मार्ग स्वीकारावे याचाहि विचार केला पाहिजे. जे उपाय योजले असतां मुलांच्या वर्तणुकींत योग्य तो बदल होतो तेच उपाय चांगले असेच कोणीहि म्हणेल. त्या दृष्टीने पुढे दिलेल्या कोष्टकाचा विचार करण्यासारखा आहे.*

---

* Teaching in Secondary Schools—Bossing—Page 59—वर ही माहिती दिली आहे.

| योजलेला उपाय | किती मुलांना लागू केले ? | यशस्वितेची शेकडेवारी |
|---|---|---|
| विशिष्ट हक्क हिरावून घेणें | ४८ | ७७ |
| केलेल्या गुन्हयाप्रमाणेच वागणूक देणें | २६ | ६९ |
| पालकांचें सहकार्य घेणें | २१ | ५७ |
| जादा काम देणें | ७ | ५७ |
| केलेल्या चुकीचें विवरण करणें | २४ | ४५ |
| उपहास करणें | ९ | ४४ |
| नांव काढून टाकणें | ८४ | ४३ |
| कानउघाडणी करणें | ३५ | ४२ |
| गुन्हयाकडे दुर्लक्ष करणें | ३३ | ३३⅓ |
| शिक्षकाने राजीनामा देणें | ८ | ३३⅓ |
| गुन्हा करणाऱ्यास शारीरिक शिक्षा देणें | ५६ | ३० |
| क्षमा मागावयास लावणें | ४० | ३० |
| नांव तात्पुरतें कमी करणें (Suspension) | ८८ | २७ |
| उपरोधात्मक वागणूक | ८ | २५ |
| कांहीच न करणें | १४९ | ६ |
| सहानुभूति व दयाळूपणा दाखविणे | १८ | ९४ |

या कोष्टकावरून जरी नुसती दृष्टि फिरविली तरी असें दिसून येईल की विद्यार्थ्यांची मनोभूमिका समजावून घेऊन, तो बेशिस्त वागण्यास कां प्रवृत्त होतो

याचा शोध घेऊन विद्यार्थ्याला विश्वासांत घेऊन त्याच्या चांगुलपणाला आवाहन करणारे उपाय अधिक यशस्वी होतात. कुमारवयांतील भावनिक अस्थिरता, ज्ञानाचा अभाव, अपरिपक्व विचार यामुळे मुलें अनेकदा अयोग्य वर्तन करतात. परंतु विद्यार्थ्यांवर विश्वास ठेवून त्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीला आवाहन केल्यास मुलें शिक्षकाच्या विश्वासास पात्र ठरण्याचा प्रयत्न करतात. आधुनिक शैक्षणिक विचारप्रवाहानेहि हेंच तत्व मान्य केलें आहे. † याशिवाय शिस्तीबद्दलच्या आपल्या कल्पनाहि तपासून पाहिल्या पाहिजेत. सर्वसाधारणपणें वर्गांतील वातावरणावर अनिष्ट परिणाम करणाऱ्या वर्तणुकीलाच बेशिस्त म्हटलें जातें. परंतु याबाबत अधिक सखोल विचार करणें जरूर आहे. श्री. विकमन यांनी याबद्दल संशोधन केलें आहे. विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीबद्दलची एक प्रश्नपत्रिका त्यांनी शिक्षकांना व मानसिक आरोग्यशास्त्रज्ञांना (mental hygienists) दिली परंतु या दोघांच्या उत्तरांत त्यांना मध्यंतर आढळून आलें ‡ अप्रामाणिकपणा, अनीतिमानता, अधिकाऱ्यांवर कुरघोडी, सांगितलेलें काम न करणें व वर्गांतील शिस्तीला बाधा आणणें या गोष्टी शिक्षकांना अत्यंत महत्त्वाच्या वाटतात. आक्रमक वृत्ति, पाठीमागे राहण्याची प्रवृत्ति, आपल्यांतच गुरफटून राहणें या गोष्टी त्यांना विशेष लक्ष पुरविण्याजोग्या वाटत नाहीत. परंतु मानसिक आरोग्यशास्त्रज्ञांचें मत बरोबर याच्या विरुद्ध आहे असें श्री. विकमन यांना आढळून आलें. शिस्त म्हणजे केवळ पुस्तकी शिक्षणाला पोषक अशी वर्तणूक अशी कल्पना असेल तर खोटें बोलणें, बुजरेपणाने वागणें, क्रूरपणें अगर लहरीपणें वागणें, चुकारपणा करणें या दोषांकडे दुर्लक्ष केलें जाईल. परंतु विद्यार्थ्यांच्या पुढील आयुष्यांतील यशस्विता

---

† या संदर्भांत पुढील अवतरण मननीय आहे—

"Modern educational theory maintains that normal adolescent youth with heart wishes to do right, but that lack of knowledge, immaturity of judgement and emotional instability often lead him in moments of stress to do things he would not do were he informed or fully poised. Most of the disciplinary problems the teacher contronts are not serious, at least in the beginning. The teacher who reveals a genuine faith in the good intentions of the student will find that confidence honoured—Even though the students were not deserving of the assumption, in most cases, he would endeavour to rise to the estimate of his teacher."—Teaching in Secondary Schools—Bossing—Page 501-502.

‡ Children's Behaviour and Teache's Attitudes—E. K. Wickman—Page 130.

अगर अयशस्विता वरील गोष्टींवरच अवलंबून असते.* म्हणूनच आधुनिक शिक्षणतज्ज्ञ असें मानतात की मुलें गैर वागतात याचें कारण योग्य वर्तनास आवश्यक असें वातावरण त्यांना मिळत नाही हें होय. प्रसिद्ध विचारवंत फ्रान्सिस बेकर यांनी म्हटलें आहे.—"The fundamental reason why children do not act right is because they do not have the conditions for right action." विद्यार्थी गैर वागतात म्हणून त्यांना झोडून काढा, त्यांचीं नांवें काढून टाका इत्यादि उपायांनी तात्पुरती दहशत बसली तरी ज्यामुळे गैरशिस्तीचें वातावरण पसरलेलें असतें त्याचीं बीजें नाहीशी होत नाहीत. चेंडू खाली आपटला म्हणजे तो जसा दुप्पट जोराने वर येतो त्याप्रमाणें दडपशाही मार्गामुळे विद्यार्थ्यांचें तरुण, बंडखोर मन दुप्पट वेगाने अशिस्त, गैरवाजवी मार्गाकडे धावते. म्हणूनच शिस्त 'ठेवण्याच्या' प्रयत्नांपेक्षा ती 'निर्माण' करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. झाडावर उमलणाऱ्या फुलाप्रमाणे शिस्त विद्यार्थ्यांच्या मनांत उमलली पाहिजे. आधुनिक विचारानुसार शिस्त म्हणजे केवळ अधिकाऱ्यांच्या म्हणण्याला मान तुकविणें अगर नियमांबरहुकूम वागणें

---

* ह्या प्रकारचे विचार परदेशांतील अनेक विचारवंतांनी प्रकर्षाने पुढे मांडले आहेत. नमुन्यादाखल आपण दोन अवतरणें पाहूं—

(1) Problems that indicate a lack of personal adjustment such as lying about others, inattention in class, carelessness in work—behaviour traits that are usually symptoms of maladjustment—that may lend to serious disabling habits and attitudes, are given a place much below those traits that challenge ordinary school routine.......Teachers and principals are inclined to think in terms of their own welfare and that of the regular routine. Docility, obedience, conformity are prize objectives. They become ends in themselves and infranctions of the rules of the school or of the moral code are treated not as symptoms of mal adjustment whose cause is to be found but as an offense to be punished."—The Administration of Discipline in the High School—E. M. Garinger –Page 9.

(2) Although the recessive and witdrawiang traits do not interfere with order and decorum in the classroom, these characterstics do denote mentally cancerous growths, that sap the mind of ease, happiness and contentment. Bashfulness and shyness should be viewed as deep-seated troubles and both need to be diagnosed and remedied many times more concentiously

( पुढे चालू )

नव्हे. शिस्त म्हणजे मनाचा विकास, स्वप्रज्ञेचा अंमल, स्वतःच्या कर्तव्याबाबतची जबाबदारी स्वतःच घेणें.*

## अशिस्त वर्तणुकीचीं कारणें :--

वर उल्लेखिलेल्या फ्रान्सिस वेकर यांच्या विचाराप्रमाणे विद्यार्थ्यांना गैर वर्तनास उद्युक्त करणारी परिस्थिति कोणती हें पाहिलें पाहिजे. विद्यार्थ्यांची शारीरिक व मानसिक परिस्थिति शालेय वातावरण व समाजिक परिस्थिति यांचा विद्यार्थ्यांवर परिणाम होत असतो. म्हणून त्यांचाच प्रथम तपशिलवार विचार करूं.

## (अ) शारीरिक व मानसिक अवस्था :--

कांही वेळां वर्गांतील कांही विद्यार्थी हट्टीपणाने वागतात अगर अध्यापनाकडे लक्ष देत नाहीत असें आपल्याला दिसतें. त्यांच्या या वर्तणुकीबद्दल शिक्षा केली तर कित्येकदा त्यांची वागणूक सुधारण्याऐवजी बिघडतच जाते. अशावेळीं त्या विद्यार्थ्यांचा अधिक जवळून अभ्यास केल्यास त्यांच्या वर्तणुकीचें कारण सापडतें व त्याच्या बाबतींत कोणता इलाज करावा हेंहि समजतें. अनेकदा आपल्याला दिसते की पूर्वी चांगले वागणारे विद्यार्थीहि चिडखोर, आळशी अगर अस्थिर बनले आहेत. बऱ्याच वेळां विशिष्ट ग्रंथींचें काम बरोबर होत नसल्याने त्यांच्या वर्तणुकींत बदल होतो† बिघडलेले डोळे, वाईट दांत अगर असत्व आहार यामुळे

---

than are the purely academic difficulties...... If the school neglects this objective, what social agency will or can do very much about it ?—Improvement of Teaching in Secondary Schools —Frank A. Butler—Page 332.

* What then is the modern conception of high school discipline ? Stated negatively, it is not outward conformity, not coercion, not merely submission to authority and obedience to rules......It is primarily concerned with a state of mind, not automatic execution of orders. It recognized in the pupil the stage of continuous and concomitant development. It is the gradual transition from control by rule to control by reason. It implies a guarded shifting of responsibility for conduct to the pupils themselves. ....The Psychology of High School Discipline—Pringle R. W.—Page 6.

† A study of five hundred high school problem cases traced disciplinary difficulties to the usual functioning of endocrine glands in over ten per cent of the cases—Teaching in Secondary schools—Bossing—Page 488-89.

विद्यार्थी अनेकदां उदास अगर ताठर वृत्तीचे बनतात. मुलांच्या शरीरांत होणारे हे बदल समजूं न शकणारा शिक्षक मुलांना काबूंत ठेवूं शकत नाही. आपले वैशिष्टच प्रकट करायला संधि न मिळाल्याने कुमारवयांतील अनेक विद्यार्थी खोड्या करतात, अर्वाच्यपणें वागतात; शिक्षकांचा अगर अधिकाऱ्यांचा उघड-उघड अपमान करतात. "आम्ही कोण म्हणून काय पुसतां?" अशा प्रकारची वृत्ति बळावते * परंतु याच विद्यार्थ्यांना विश्वासांत घेऊन त्यांच्यावर जबाबदारीचीं कामें सोपविलीं म्हणजे त्यांच्यांत आश्चर्यकारक बदल दिसून येतो. म्हणूनच असें म्हटलें जाते की बेशिस्तीची समस्या म्हणजे खरें पाहतां अ. समायोजनाची ( mal adjustment ) प्रश्न होय.†

वरील विवेचनाचा अर्थ विद्यार्थ्यांना शिक्षा करूंच नये असा नव्हे. आम्हाला इतकेंच सांगावयाचें आहे की आळशीपणा, अप्रामाणिकपणा, चुकारपणा, अनवधान यांसारख्या वर्तणुकीची कारणें खोलवर रूजलेली असण्याची शक्यता असते; आणि म्हणून विद्यार्थ्यांच्या या प्रकारच्या वर्तनाचीं कारणें शोधून काढून त्याबाबत विचारपूर्वक इलाज केले पाहिजेत. परंतु सरळसरळ अवज्ञा, उद्धटपणा, सामानाची मोडतोड यांसारख्या विद्यार्थ्यांच्या वर्तनाला ताबडतोब व कठोरपणें शिक्षा केलीच पाहिजे. असें वर्तन आपण चालवून घेतलें तर भविष्यकालांतील सामाजिक जीवनांतहि ते तसेच वागतील. आता प्रश्न येतो तो हा की विद्यार्थ्यांच्या अनिष्ट वर्तणुकीला आळा कसा घालावा? या प्रश्नाचें उत्तर न सापडल्याने अनेकदा ठराविक प्रकारच्या शिक्षा केल्या जातात. या दृष्टीने पुढील कोष्टक पाहण्यासारखें आहे.‡

---

* A study made on the basis of the seven causes of disciplinary problems given by Moorehouse revealed that approximately twenty two per cent of high school disciplinary problems might be classified as antagonism to imposed controls."--Teaching in Secondary Schools--Bossing--Page 491.

† "Problems of discipline in the school are problems of mal-adjustment."—Teaching in the Secondary School—Goetting --Page 504.

‡ Improvement of teaching in secondary schools— Frank A. Butler—Page 338.

| शिस्त राखण्यासाठी केलेली उपाययोजना | मुख्याध्यापक | वर्ग शिक्षक |
|---|---|---|
| शाळा संपल्यावर थांबवून घेणें | ३४·९ | ७३.७ |
| पालकांना शाळेंत बोलावणें | ८५·९ | ११·२ |
| वरिष्ठाकडे पाठविणें, कार्यालयांत पाठविणें | ११·८ | ८६·२ |
| कांही हक्क काढून घेणें | ७५·६ | २४·६ |
| कानउघाडणी करणें | ५७·० | ४९·३ |
| नांव तात्पुरतें कमी करणें | ८५·८ | ०·३ |
| जादा काम देणें | २९·८ | ५३·५ |
| क्षमा मागावयास लावणें | ३९·१ | ३२·३ |
| अभ्यासक्रम बदलावयास लावणें | ५३·२ | १२·१ |
| शाळेंतून काढून टाकणें | ३९·४ | ०·० |
| गुण कमी करणें | ४·१ | २९·४ |
| शारीरिक शिक्षा देणें | २१·७ | ३·८ |
| दंड करणें | १८·५ | ७·६ |

या कोष्टकावरून नुसती दृष्टि फिरविली तरी शिक्षक कोणत्या शिक्षा वरचेवर देतात हें दिसून येईल परंतु एकादी उपाययोजना एकाद्या विशिष्ट व्यक्तीच्या अगर वर्गाच्या बाबतींत लागू पडली म्हणून तिचा सर्रास वापर करणें योग्य ठरणार नाही. विद्यार्थ्याला केवळ व्याख्यान सुनावणें कठीण नाही; परंतु त्याच्याशी बोलून त्याच्या वर्तनाचीं कारणें शोधणें अवघड आहे. विद्यार्थ्याला अभ्यासक्रम बदलण्यास सांगणें सोपें आहे; पण वैयक्तिक आवडीनिवडींकडे लक्ष देऊन तोच अभ्यासक्रम परिणामकारक रीतीने शिकविणें सुलभ नाही. आळशीपणा,

बेफिकीरपणा यांसारख्या दुर्गुणांबद्दल शिक्षा म्हणून विद्यार्थ्याचे गुण कमी करणें लेखणीच्या एका फटकाऱ्याने साधतें; पण त्याच्या या वर्तनाची कारणमीमांसा करून इलाज करावयाचा म्हटलें तर तें असें सोपें नाही. आणि म्हणूनच वरील कोष्टकांत दिलेल्या प्रकारची उपाययोजना करून आपण आपली जबाबदारी केवळ टोलवितो.* परंतु असें न करतां विद्यार्थ्याचें अयोग्य वर्तन अनिष्ट परिस्थितींतून निर्माण होतें असें मागून त्याबद्दल आपल्याला काय करतां येईल याचा विचार केला पाहिजे. त्या दृष्टीने खालील गोष्टींचा उल्लेख करणें योग्य ठरेल:—

(१) विद्यार्थ्यांच्या मानसिक अगर बौद्धिक कुवतीपेक्षा फारच खालच्या प्रतीचें काम अगर अभ्यास दिला तर त्यांचें लक्ष त्यावर केंद्रित होत नाही तसेंच अभ्यासविषय फारच कठीण असेल तर तो न समजल्याने विद्यार्थी निराश, चिडखोर अगर बेफिकीर बनतो. म्हणून शिक्षकाला विद्यार्थ्याच्या मानसिक व त्यानुसार त्याला द्यावयाच्या कामाचा अंदाज करता आला पाहिजे.

(२) घरीं करावयास दिलेल्या कामाचा बोजा विद्यार्थ्यांच्या शक्तीपलीकडचा असेल तर त्यांतून अपराधी वृत्ति निर्माण होते, आपण व कमी प्रतीचें आहोंत ही भावना विद्यार्थ्यांत बळावते. कित्येकदा घरून काय काम करून आणावयाचें हेंच विद्यार्थ्यांना नीटसें समजलेलें नसतें. अशा परिस्थितींत तें काम न केल्याबद्दल शिक्षकांनी ताशेरे झाडले अगर शिक्षा केली की त्या विषयाबद्दल, शिक्षकाविषयी अगर शाळेबद्दलच अप्रीतीची भावना विद्यार्थ्याच्या मनांत रूजूं लागते. म्हणूनच

* "Correction in too many cases becomes the habit of prescribing a few stereotyped punishments for all offenses. Sending to the office and detention after school are easy ways to relieve the teacher of responsibility, easy ways to pass over the causes, easy way to avoid thinking out corrective measures. While the methods of correction mentioned may be appropriate at times. They surely are not blanket cares for all poor adjustments. A conference for 'hauling out' purposes is much easier than a conference designed to get at the causes. It is easier to make a pupil drop the course than it is to make the course worthwhile, provide for individual differenees in the course and teach the course effectively. It is easier to lower the mark of a pupil than it is to diagnose the causes of indifference, inattention and lack of industry. In short it is easier to do the ineffective thing than it is to accomplish the worthwhile thing"—Improvement of teaching in secondary schools—Frank A. Butler—Page 338.

प्रत्येक शाळेने घरून करून आणावयाच्या कामाचे (home-work) वर्गवार वेळापत्रक तयार करावें. असें केल्यास एकाच दिवशीं दोन-तीन विषयांचें काम दिलें जाणार नाही व पालकांनाहि विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर देखरेख ठेवणें सोपें जाईल.

(३) वाढत्या वयांत मुलांच्या विविध इंद्रियांना काम न मिळालें तर तीं कंटाळून जातात. फार वेळ नुसतेंच व्याख्यान देत राहणाऱ्या शिक्षकांच्या तासाला मुलें आपसांत कुजबुजतात, हातापायांना आळोखे पिळोखे देतात; वर्गांत पुस्तकें अगर कंपास पेट्या पडतात. म्हणून विद्यार्थ्यांच्या एकाच इंद्रियावर ताण न पडतां त्यांच्या विविध इंद्रियांना काम मिळेल अशी अध्यापनपद्धति असावी.

(४) प्रत्येक विद्यार्थ्याला स्वत:चें विशेष कौशल्य दाखविण्यास वाव मिळाल्यास त्याला वर्गांतील आपले स्थान निश्चित झाल्यासारखें वाटतें; आपण आपल्या कर्तृत्वाने शिक्षकांच्या व आपल्या वर्गबंधूंच्या मनांत स्वत: विषयी चांगल्या भावना निर्माण करूं शकतो याची खात्री वाटते. या मानसिक समाधानाचा परिणाम विद्यार्थ्याच्या इतर विषयांतील प्रगतीवरहि होतो. 'यशासारखें यशदायी दुसरें कांही नाही' ही म्हण अगदी योग्य आहे.

(५) वर्गांत करून घ्यावयाच्या कामाची आखणी करतांना त्यांत विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावें. आपण निश्चित केलेलीं कामें पार पाडणें ही आपली नैतिक जबाबदारी आहे अशी भावना विद्यार्थ्यांत निर्माण होण्यास त्यामुळे मदत होते. वर्गांत होणाऱ्या गैरवागणुकीचा विचार करण्यासाठी विद्यार्थ्यांचींच मंडळें नेमावीं. वर्गाच्या भिंती अगर सामानसुमान खराब करणें, अभ्यासांत व्यत्यय आणणें, अश्लील बोलणें अशा गोष्टींबाबत आपल्याच वर्गमित्रांचें मत आपल्याविरुद्ध आहे असें दिसून आल्यास त्याचा परिणाम गैरवर्तणूक करणाऱ्या मुलांवर अधिक होतो.

(६) शिक्षक न्यायी व नि:पक्षपाती आहेत असा विश्वास विद्यार्थ्यांना वाटला पाहिजे. कांही विशिष्ट नियमांच्या बाबतींत अत्यंत कठोरपणें परंतु अन्यवेळीं विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेणाऱ्या शिक्षकाच्या शिस्तीबद्दलच्या अपेक्षा विद्यार्थी समजूं शकतात. पण पक्षपाती अगर लहरी शिक्षकाची बदलती वागणूक व अपेक्षा पाहून विद्यार्थी गोंधळतात.

(७) विद्यार्थ्यांची चूक दाखवून देतांना त्यांच्या एकूण व्यक्तिमत्वाबद्दल अवहेलनेने अगर उपहासाने बोलणें इष्ट नव्हे. तसेंच वरचेवर त्यांच्या दोषांबद्दल टोचून बोलणेंहि अनिष्ट असते. गुणांची मनमोकळी तारीफ व दोषांचीं स्पष्ट

जाणीव शिक्षकांकडून दिली जाते अशी विद्यार्थ्यांस खात्री वाटल्यास शिक्षकांकडून शाबासकी घेण्याकडे विद्यार्थ्यांचा स्वाभाविक कल असतो.

(८) कोणत्याहि परिस्थितींत आपला मानसिक तोल (Poise) शिक्षकांनी जाऊं देता कामा नये. विशिष्ट रीतीने वागल्यास शिक्षक चिडतात असें दिसल्यास कांही विद्यार्थी मुद्दामच तसें वागतात.

## शालेय वातावरण :--

आनंददायक व आरोग्यपूर्ण वातावरणांत काम अधिक चांगलें होतें असा सर्वसाधारण अनुभव आहे. बौद्धिक कामाच्या बाबतींत तर हें विशेष खरें आहे. बसण्याची खुर्ची अगर लिहिण्याचें मेज फार लहान अगर फार उंच आहेत, खोलींत पुरेसा उजेड नाही, ताज्या हवेच्या अभावी कोंदटपणा दाटला आहे अशा परिस्थितींत फार वेळ एकाग्रचित्त होणें जमत नाही. विद्यार्थी दिवसाचे सहा-सात तास शाळेंत घालवतात. शाळांत प्रकाशयोजना योग्य नसल्याने कित्येक मुलांचे डोळे बिघडतात. दृष्टिदोष एकदा निर्माण झाला की तो सहसा नाहीसा होत नाही. आपले शेकडो विद्यार्थी पोक काढून बसतात, चालतात. शाळांतील अयोग्य फर्निचरचा त्यांच्या शारीरिक स्थितीवर (posture) कायमचा परिणाम होतो. अनेक शाळांना पटांगणें नसतात. त्या शाळांतील मुलांनी खेळावें कोठे? सुसज्ज प्रयोगशाळा, भव्य सभागृह, पोहण्याचा तलाव, तालीमखाना, भरपूर प्रकाश व हवा आंत येणाऱ्या खोल्या, भलेंमोठें पटांगण, योग्य प्रकारचें फर्निचर--भावी पिढीसाठी करावयाच्या या कमीतकमी गोष्टी आहेत. परंतु त्याहि आज चंद्रासाठी हट्ट करण्यासारख्या वाटतात. मात्र अशा प्रकारच्या सुसज्ज शाळा व महाविद्यालयें आपल्या मुलांना शक्य तितक्या लवकर आपण दिल्या पाहिजेत अशी तीव्र टोचणी लागल्यास दारिद्र्याचें तुणतुणें बाजूला ठेवलें जाईल, भगीरथ प्रयत्न केले जातील व स्वप्न साकार होईल. प्रयत्न व तीव्र इच्छाशक्तीच्या जोरावर आज वाळवंटांत गुलाबाचे ताटवे फुलविलेले आहेत. एकलव्याची चिकाटी, भीष्माचा निर्धार आपणाजवळ आहे. महाराष्ट्रांतील भाऊराव पाटलांनी तर आपल्याला याबाबत वाटहि दाखवून दिली आहे. त्यांच्या संस्थेंत खडकावर उत्तम बागाईत डुलते आहे. विशेष पैसा जवळ नसतांनाहि टोलेजंग इमारती उभ्या केल्या आहेत. आपले उद्याचे नागरिक साहसी, सुदृढ व्हावयास पाहिजे असतील तर तसें वातावरण शाळांतून, महाविद्यालयांतून निर्माण केलें पाहिजे. शाळा म्हणजे चार भिंतींचा कोंडवाडा न वाटतां आपल्या विविध शक्तींचें विकसन करणारें केंद्र असें विद्यार्थ्यांना वाटलें पाहिजे. उत्तमांतील उत्तम शालेय वातावरण निर्माण करणें

म्हणजे एक प्रकारें भांडवलाची गुंतवणूक आहे. आज एका हाताने आपण तरुण पिढीला जें देऊं तेंच उद्या दहा हातांनी तरुण पिढी राष्ट्राला देईल.

## सामाजिक जीवन:–(अ) शिक्षकांबद्दलचा आदर कमी झाला:–

आपल्या देशांत इ. स. १९२० पासून इ. स. १९४७ पर्यंत सतत राजकीय लढे चालू होते. प्रस्थापित सत्तेविरुद्ध बंड करून उठण्यांत विद्यार्थी वर्गहि सहभागी झाला. परंतु सर्वसामान्य शिक्षक अगर प्राध्यापक लढ्यांत प्रत्यक्ष सहभागी होऊं शकले नाहीत. येवढेच नव्हे तर स्वतःच्या मनाविरुद्धहि अनेक शिक्षकांना राजकीय लढ्यांत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षा कराव्या लागल्या. शिक्षकवर्गाबद्दलचा आदर कमी होण्यास हें एक कारण झालें. हा अनादर वाढण्याचीं अन्य कारणेंहि आहेत. दुसऱ्या महायुद्धापासून सतत वाढत चाललेल्या महागाईमुळे आधीच बेताचा पगार असणारा शिक्षक होरपळून निघत आहे. आलेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी अनेक शिक्षक—प्राध्यापक खासगी शिकवण्या करतात. कांही शिक्षकांना तर त्यांच्या पगारापेक्षा जास्त पैसा या शिकविण्यांमुळे मिळतो. असे शिक्षक परीक्षेसाठी लागणाऱ्या माहितीचे (ज्ञानाचे नव्हे) घाऊक व किरकोळ विक्रेते बनतात. केवळ पैशावर दृष्टि ठेवून ज्ञानाचा व्यापार सुरू होतो. याबाबत संस्कृतमध्ये एक फार मार्मिक श्लोक आहे. तो असा––यस्यागमः केवलजीविकायै । तं ज्ञानपण्यं वाणिजं वदन्ति । अशा अध्यापकांचें शाळेंतील कामांत फारसें लक्ष नसतें. त्यामुळे शाळा व बाहेर चालणारे क्लासेस यांत विद्यार्थ्यांना फारसा फरक वाटत नाही. शिक्षण म्हणजे पैसे टाकून विकत घ्यावयाची एक वस्तु (commodity) अशी भावना त्यांच्या मनांत रुजते. या खासगी शिकवण्यांचा आणखी एक परिणाम म्हणजे खासगीरीत्या ज्या मुलांना शिक्षक शिकवितात त्यांना परीक्षेचे प्रश्न आधी समजतात, गुण अधिक मिळतात. शिक्षकाबद्दलच्या विद्यार्थ्यांच्या आदराला तडा जातो. शिवाय समाजांतहि शिक्षकाला फारसें मानाचें स्थान नाही असें दिसून आल्याने मुलें तोच सूर धरतात. आजचें शिक्षण कुचकामी आहे अशा प्रकारची टीका लहानपणापासून मुलांच्या कानावर पडल्याने शिक्षणपद्धतीवरील व पर्यायाने शिक्षकाबद्दलची श्रद्धा कमी होते.

## (ब) वाढती विद्यार्थी संख्या :––

इ. स. १९२० पासून पुढे आपल्या देशांत जी जागृति झाली त्यामुळे प्रसंगीं आपल्या पोटाला चिमटा घेऊनहि पालक आपल्या मुलांना शाळेंत पाठवूं लागले. आज तर महाराष्ट्रांत बाराशे रुपयांच्या खाली ज्या पालकांचें उत्पन्न आहे अशा

साऱ्या मुलांना शिक्षण फुकट आहे. शिवाय सूचित जाती-जमाति व इतर मागासलेल्या लोकांसाठी इतर अनेक सवलती उपलब्ध आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणजे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या भरमसाट वाढली आहे. पूर्वी फक्त शाळाच दुवक्त ( shift ) पद्धतीने चालविल्या जात असत. परंतु आता अनेक महाविद्यालयांतहि दुवक्त पद्धति सुरू झाली आहे. आणि असें असूनहि कित्येक शाळांच्या वर्गांतील संख्या पन्नासच्या आसपास असते. महाविद्यालयांतील प्राध्यापकांचें प्रमाण विद्यार्थ्यांच्या मानाने किती कमी असतें हें नागपूर महाविद्यालयाच्या टीचर्स क्लबने जाहीर केलेल्या खालील आकडेवारीवरून दिसून येईल.*

| विभाग | एकूण विद्यार्थी | प्राध्यापक |
|---|---|---|
| आर्टस् फॅकल्टी | ९,४५६ | ३९७ |
| सायन्स फॅकल्टी | ५,४४४ | ३०१ |
| कॉमर्स फॅकल्टी | ७,१७४ | ७३ |

शंभराहून अधिक विद्यार्थ्यांवर एक प्राध्यापक नियंत्रण ठेवूं शकेल ही कल्पनाच थोडी अवास्तव आहे. कित्येकदां शिक्षक अगर प्राध्यापक काय सांगत आहे हें सर्व विद्यार्थ्यांना धड ऐकूंहि जात नाही. अशा परिस्थितींत विद्यार्थ्यांनी दंगा केला तर त्याला जबाबदार कोण ? बहुतेक प्राध्यापकांना वर्गातील विद्यार्थ्यांची नांवेंहि माहीत नसतात. एकाद्या कारखान्यांत वस्तू जशा आपोआप पुढे सरकत असतात त्याप्रमाणे घंटेच्या ठोक्याबरोबर एक शिक्षक अगर प्राध्यापक वर्गांतून बाहेर पडतात व दुसरे येतात. अध्यापक व विद्यार्थी यांचा निकटचा संबंध आल्याशिवाय त्यांना एकमेकांविषयी प्रेम अगर आदर कोठून वाटणार ?

## (क) सर्वश्रेष्ठ मूल्य : पैसा :—

आजच्या आपल्या समाजांत शिक्षकाला फारसें मानाचें स्थान नाही. किंबहुना आजच्या समाजांत व्यक्तीची गुणवत्ता, चारित्र्य यापेक्षा तिच्या पैशाला अधिक मान आहे असें विद्यार्थ्यांना दिसतें. या संदर्भांत पुढील अवतरण पहा—" इथे

* ही माहिती दिनांक २ सप्टेंबर १९६२ च्या केसरींत प्रसिद्ध झाली होती.

डॉक्टर रोग्यास औषधाऐवजी विष देतो, वकील प्रतिपक्षांकडून पैसे घेऊन आपल्या अशिलांचे गळे कापतो, विद्यापीठाच्या परीक्षांचे पेपर्स आदल्या दिवशी प्राध्यापकच विद्यार्थ्यांना मिळवून देतात आणि मनाविरुद्ध वागणाऱ्या विद्यार्थ्यांना सहा सहा महिने प्रथम आव्हान देऊन अनुत्तीर्ण करतात. इथे काळाबाजार करणाऱ्यांचा समाजसेवक म्हणून गौरव होतो"* एका विद्यार्थ्याचे हे विचार थोडे अतिरंजित असले तरी मननीय आहेत. नाही का ? बसच्या तिकिटाचे पैसे चुकविण्यासाठी मुलाचें खोटें वय सांगणारीं वडीलधारी माणसें पाहणाऱ्या विद्यार्थ्यांनी असत्य वर्तन केलें तर त्याला जबाबदार कोण ? आपल्या हातीं आलेल्या संधीचा फायदा स्वतःच्या पोळीवर तूप ओढण्यासाठीच केला जातो असें दृश्य सर्रास पाहणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांतील स्नेहसंमेलनाचें चिटणीसपद मिळतांच त्या निधींतून स्वतःसाठी गरम कोट शिवला तर त्यांत दोष कोणाचा ? बोलण्याची भाषा व करण्याची कृति यांत सतत व सर्वदूर दिसणारी तफावत पाहणारा विद्यार्थी अश्रद्ध बनला नाही तरच नवल ! विद्यार्थी हा समाजाचा एक घटक असल्याने समाजांतील वातावरणाचा त्याच्यावर परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. 'खाण तशी माती' या चालीवर 'समाज तसा विद्यार्थी' असें म्हणावयास हरकत नाही.

## (ड) उदासीन पालक :—

आजच्या सामाजिक जीवनाचा आणखी एक विशेष म्हणजे आपली सर्वांची स्थिति परिस्थितीच्या वाऱ्याच्या दिशेने जाणाऱ्या एकाद्या होडक्यासारखी झाली आहे. जीवनाला वळण लावण्याचें सुकाणू आपण हरवून बसलों आहोंत. त्यामुळे माणसाचें चारित्र्य बनतें, त्याच्या जीवनाला कांही तत्वज्ञानाची बैठक मिळते अशा निष्ठा ढासळल्या आहेत. त्यामुळे ऐहिक सुखाचें शिखर गाठणाऱ्या अमेरिकेंतहि घटस्फोट, मानसिक रोग, आत्महत्या यांचें प्रमाण वाढतें आहे. सुखाचीं साधनें वाढूनहि माणूस सुखी झालेला दिसत नाही. विज्ञानाने अणु व हैड्रोजन बाँबपर्यंतची आश्चर्यकारक वाटचाल केली आहे. परंतु त्यामुळेच जनमानसांत 'कशाला उद्याची बात' ही वृत्ति बळावली आहे. आजच्या घडीचा जास्तीत जास्त उपभोग घेण्याकडे माणसाची प्रवृत्ति झुकली आहे. प्रामाणिकपणा, सत्यनिष्ठा, चारित्र्य हे शब्द बुळबुळीत वाटूं लागले आहेत. हे शब्द नुसते बोलण्यांत वापरावयाचे परंतु आचरावयाचे नाहीत अशी समजूत रुजूं लागली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणूनच की काय सर्वसाधारण पालक आपल्या मुलांवर चांगले संस्कार झालेच पाहिजेत, त्याचें चारित्र्य निष्कलंकच राहिलें पाहिजे याबद्दल फारसा जागरूक नाही. अनेक

* केसरी—दिनांक १२ ऑगस्ट १९६२.

पालकांना आपल्या मुलांचे मित्र कोण आहेत, तीं कोणतीं पुस्तकें वाचतात, शाळेंत त्यांची वागणूक कशी आहे, शिक्षकांचें त्यांच्याबद्दल काय मत आहे हें फारसें माहीत नसतें. मोठमोठ्या शहरांतील विशिष्ट जीवनपद्धतीमुळे कांही पालकांना मनांत असूनहि मुलांच्या मानसिक घडणीकडे लक्ष पुरवतां येत नाही. आजच्या शिक्षणांत फारसा अर्थ नाही या भावनेमुळेहि पालकांच्या उदासीनतेंत भर पडत असेल. परंतु अनेक शाळांचें स्वरूप केवळ ज्ञानाच्या दुकानाप्रमाणे असल्याने व पालक उदासीन असल्याने मुलांच्या संस्कारक्षम कालांत त्यांच्या मनांची मशागत केलीच जात नाही.

## (इ) इतर कारणें :—

वर उल्लेखिलेल्या विविध सामाजिक परिस्थितीचा परिणाम विद्यार्थ्यांवर झाल्याशिवाय राहत नाही. आजचें शिक्षण पुस्तकी आहे, केवळ कारकून निर्माण करणारें आहे अशी चर्चा कानीं पडल्याने त्यांचीं कोवळी मनें साशंक बनतात. आजच्या परीक्षांच्या विशिष्ट स्वरूपामुळेहि विद्यार्थ्यांच्या वृत्तीवर परिणाम होतो. गुणदानांत पडणारा व्यक्तिगत फरक असणें, अभ्यासक्रमांतील फार थोड्या भागावर प्रश्न विचारले जाणें, विश्लेषण व विवरण शक्तीपेक्षा पाठांतरावर वरचा दर्जा मिळविता येणें इत्यादि गोष्टींमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष विषयांचा अभ्यास करण्यापेक्षा 'दीपिका', 'नोटस्' पाठ करणें बरें वाटतें. वर्षभर अभ्यास करण्यापेक्षा दोन–तीन महिने घोकंपट्टी करणें सोपें असें वाटतें. विद्यार्थ्यांना सतत कार्यमग्न (fruitfully engaged) ठेवण्याकडे सर्वसाधारण शाळा दृष्टि ठेवीत नाहीत. आजकाल अनेक अभ्यासपूरक कार्यक्रम शाळांतून केले जातात. परंतु त्यापाठीमागे योजनापूर्वक विविध विद्यार्थ्यांच्या विभिन्न आवडींना वाव देऊन त्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची दृष्टि असण्यापेक्षा दिन साजरे करण्याचाच भाग जास्त असतो. या सर्व परिस्थितीचा परिणाम म्हणजे विद्यार्थ्यांची रिकामी मानसिक व शारीरिक शक्ति अन्य वाटा शोधते. पराक्रमाला, पौरुषाला शैक्षणिक कार्यक्रमांत आवाहन नसल्याने अनुचित मार्गांनी कां होईना पण आपला पराक्रम दाखवावा असें त्यांना वाटतें. घरांत, समाजांत दिसणाऱ्या अश्रद्धतेच्या वातावरणामुळे विद्यार्थ्यांत काल्पनिक विश्वांत रममाण होण्याची वृत्ति बळावते. नटनटी, चित्रपट यांचें आजच्या तरुण मनाला वाटणारें आकर्षण याच गोष्टीची साक्ष देते. शिक्षण पूर्ण केलें तरीहि भविष्यकालांतील यशाबद्दल निश्चितता न वाटल्याने दैववाद बळावतो. गुणवत्तेपेक्षा वशिलेबाजी, लाचलुचपतीने कामें लवकर साधतात असें दिसल्याने पराक्रमाने एकादी गोष्ट साध्य करण्यापेक्षा त्या मार्गांचाच अवलंब करावा असें वाटूं लागते.

शिक्षक, पालक, विद्यार्थी व एकूण समाज यांच्या बाबतची वर सांगितलेली परिस्थितीच विद्यार्थ्यांच्या अशिष्ट वर्तणुकीस जबाबदार आहे. या परिस्थितींत योग्य तो बदल केल्याशिवाय केवळ व्याख्यानें झोडून विद्यार्थ्यांत शिस्त निर्माण होईल अशी अपेक्षा ठेवणें फोल आहे. या दृष्टीने कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत अगर करतां येतील याचा विचार करूं :—

## (१) धंदेशिक्षणावर भर :—

शिक्षणाच्या वाढत्या पसाऱ्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे नातें मेंढपाल व मेंढरे यांचें बनलें आहे. एक मेंढपाल शेकडो मेंढ्या हाकलतो त्याचप्रमाणे बिचारा एकटा शिक्षक पन्नास-साठ विद्यार्थ्यांपुढे घसा कोरडा करतो. ही संख्या आपल्याला रोखता येणार नाही. प्राथमिक शिक्षण सक्तीचें असल्यामुळे तिथे अधिक शाळा काढणें, अधिक शिक्षक नेमणें हाच एक उपाय असा आहे की ज्यामुळे शिक्षक व विद्यार्थी निकट येऊं शकतील. परंतु माध्यमिक शाळांतील फुगलेल्या संख्येला वेगळें वळण लावतां येईल. विविध धंद्यांचें ( trades ) शिक्षण देणाऱ्या शाळा जर स्थापन केल्या तर आठवीपासून अनेक विद्यार्थी तिकडे वळतील. या शाळांत शिक्षण घेणारे विद्यार्थी विश्वविद्यालयांत गर्दी न करतां नोकरींत शिरतील. औद्योगिक व तांत्रिक शाखांतील डिप्लोमा देणाऱ्या संस्थांची संख्याहि वाढवणें जरूर आहे. माध्यमिक स्तरावर विशिष्ट गुणवत्तेच्याच विद्यार्थ्यांना विश्वविद्यालयीन शिक्षणास उपयुक्त असें शिक्षण द्यावें. बाकीच्यांनी आपापल्या आवडीप्रमाणे व कुवतीप्रमाणे विविध धंदेशिक्षण, औद्योगिक अगर तांत्रिक शिक्षणाकडे वळावें. इंग्लंडसारख्या शेकडो वर्षांची लोकशाही परंपरा असलेल्या देशांतहि गुणवत्तेप्रमाणे विद्यार्थ्यांचें वर्गीकरण केलें जातें. प्राथमिक शिक्षण हा सर्वांना मिळणारा हक्क असला तरी पुढील शिक्षण हा प्राप्त करून घ्यावयाचा अधिकार आहे असें विद्यार्थ्यांना वाटलें पाहिजे.

## (२) शिक्षक—विद्यार्थी संबंध

### (अ) सहशालेय कार्यक्रम :—

धंदेशिक्षणावर भर दिल्याने आज सर्वसाधारण माध्यमिक शाळांत व विश्वविद्यालयांत दिसणाऱ्या अफाट संख्येला आळा बसेल व शिक्षक आणि विद्यार्थी यांचे संबंध निकटचे होण्यास मदत होईल. परंतु हे संबंध अधिक जवळचे

होण्याच्या दृष्टीने आणखीहि कांही गोष्टी करता येण्यासारख्या आहेत. विद्यार्थ्यांच्या विविध विभागाकडे लक्ष देण्याचें काम वर्गवार विविध शिक्षकांकडे दिलें तर शिक्षक-विद्यार्थ्यांचा वैयक्तिक संबंध येऊं शकेल. हॉकी, फुटबॉल, खोखो इत्यादि खेळ मुलें खेळतात. या खेळांतल्या जाणकार शिक्षकांनी हे खेळ मुलांबरोबर खेळले पाहिजेत. तसें झाल्यास खेळाची नीतिमत्ता पाळणें, अपयशहि सहजतेने स्वीकारणें, विरुद्ध बाजूंच्या गुणांची तारीफ करणें, खिलाडूवृत्तीने वागणें इत्यादि कितीतरी सद्‌गुणांची वाढ क्रिडांगणांवर सहज होऊं शकते. मासिक भित्तीपत्रकें, वादविवाद सभा, नाटकें, विज्ञान मंडळ आदि कार्यक्रम वर्षभर वर्गवार चालवून स्नेहसंमेलनाच्या वेळीं गटवार बक्षिस देण्याची योजना ठेवल्यास सहशालेय कार्यक्रमांना व्यवस्थित स्वरूप येऊन त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचा वैयक्तिक संबंध येण्यास मदत होईल.

## (ब) सर्वांगीण नोंद पत्रक :—

घरची परिस्थिति, विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक वारसा, त्याचें अवांतर वाचन, इतर आवडीनिवडी, छंद, गुण इत्यादि सर्वांगीण नोंद पत्रकांतील ( cumulative record card ) नोंदी प्रामाणिकपणें भरावयाच्या म्हटल्या तर विद्यार्थ्यांशी शिक्षकाचा अधिक जवळचा व वैयक्तिक स्वरूपाचा संबंध आल्याशिवाय राहणार नाही. ही माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांचे जवळून निरीक्षण करावे लागेल.

## (क) टयुटोरियल्स :—

महाविद्यालयांत आजकाल सुरू केलेल्या टयुटोरियल पद्धतीची योग्य अंमलबजावणी झाल्यासहि प्राध्यापक व विद्यार्थी यांचा जवळचा संबंध येऊं शकेल. मनमोकळेपणाने आपल्या अभ्यासविषयक अगर इतर अडचणी मांडून त्याबाबत योग्य मार्गदर्शन मिळण्याची हमी या पद्धतीने विद्यार्थ्यांना मिळते. विशेषतः प्री युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांना नवीन विश्वांत आपल्याला मार्गदर्शन करणारे कोणी आहे असें वाटल्याने आधार वाटतो. कॉलेज कौन्सिल स्थापन करू महानविद्यालयाच्या कांही संघटनात्मक कामांत विद्यार्थ्यांचें सहकार्य घेतल्यासहि विद्यार्थ्यांची वर्तणूक अधिक संयमित होईल.

## (३) शिक्षकांचा दर्जा :—

शिक्षकाच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव विद्यार्थ्यांवर असला तर विद्यार्थी सहसा अर्वाच्यपणें वागत नाहीत. शिक्षकाचा असा प्रभाव पडण्यासाठी प्रथमावश्यक

असलेली गोष्ट म्हणजे शिक्षकाची कार्यक्षमता ( efficiency ) व व्यासंग. ज्या शिक्षकांची स्वतःच्या विषयाची तयारी उत्तम असते व जे शिकविण्याचें काम कळकळीने व प्रामाणिकपणें करतात अशा शिक्षकांच्या बाबतींत विद्यार्थी गैरवर्तणूक करीत नाहीत. कामांत चालढकल करणारे अगर वेठबिगार करणारे शिक्षक कोणते हे अगदी पांचवी-सहावींतील विद्यार्थीहि ओळखूं शकतात. शिक्षकांच्या सामाजिक दर्जाचा परिणामहि विद्यार्थीवर्गावर झाल्याशिवाय राहत नाही. इतर अधिकारी व मान्यवर लोक व शिक्षक यांच्या राहणींत जमीनअस्मानाचा फरक दिसता कामा नये. तुर्कस्थानमध्ये प्राथमिक शिक्षक व उच्च शासकीय अधिकारी यांच्या पगाराचें प्रमाण १ : ३ असें आहे. आपल्या देशांत हें प्रमाण १ : ८० असें आहे.* जपानमध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना मिळणारा पगार हा एकाद्या शासनाधिकाऱ्याइतका असतो.† स्वातंत्र्योत्तर कालांत भारतसरकारने शिक्षकांची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू केली आहे. शिक्षकांचा दर्जा वाढविण्यासाठी त्यांना अधिक सामाजिक मान्यता मिळवून देणें हाहि एक उपाय आहे. या संदर्भांत तुर्कस्थानांतील एका प्रथेचा उल्लेख करण्यासारखा आहे. तेथे विधिविषयक ( legislative ) कोणतीहि नवी उपाययोजना ( measure ) अमलांत आणावयाची असेल तर ती योजना प्रथम विद्यापीठीय शिक्षकांकडे त्यांच्या मतासाठी पाठविली जाते. शिक्षकांनी दिलेलें मत सरकारवर बंधनकारक नसतें. परंतु या प्रथेमुळे शिक्षकांचा दर्जा उंचावला जातो. अभ्यासक्रम, परीक्षाविषयक बदल, शालेय संघटनात्मक बदल यांबाबत सर्वसाधारणपणें शिक्षणतज्ज्ञांचें मत घेतलें जातें. परंतु शाळा-कॉलेजांत काम करणाऱ्या अध्यापक-प्राध्यापकांचेंहि मत घेतलें जातें. अन्य सामाजिक व कायदेविषयक सुधारणांबाबतहि त्यांचें मत विचारावें. नामवंत शिक्षकांना राष्ट्रीय पारितोषिकें देण्याची जी नवीन प्रथा भारत सरकारने सुरू केली आहे त्यामुळेहि शिक्षकवर्गाचा दर्जा वाढण्यास मदत होत आहे.

## (४) समाजाची जबाबदारी :--

गुरुकुल पद्धतींत विद्यार्थी समाजजीवनापासून दूर राहून विद्या घेत असत. परंतु आजच्या पद्धतींत शाळा व समाज दूर राहूं शकत नाहीत. त्यामुळे शालेय वातावरणाप्रमाणेच समाजजीवनाचाहि विद्यार्थ्यांच्या मनावर परिणाम होत असतो.

---

* Student Indiscipline--Humayun Kabir—Page 12.

† Ibid--Page 12.

समाजमानस घडविण्याची रेडिओ, चित्रपट, वृत्तपत्र, मासिकें हीं साधनें विद्यार्थ्यां-वरहि परिणाम करतात. आज कामवासना उत्तेजित करणाऱ्या मासिकांचें पीक वाढलें आहे, प्रणयी युग्मांची पळापळ दाखविण्यांत दिग्दर्शक धन्यता मानीत आहेत. अशा परिस्थितींत समाजधुरीणांना व विचारवंतांना विद्यार्थ्यांच्या वर्तनांत दोष दिसत असतील तर केवळ शाळा कॉलेजांवर त्याची जबाबदारी टाकून त्यांना हात झटकता येणार नाहीत. समाजाला नवी पिढी सुसंस्कारांनी संपन्न व्हावी असें वाटत असेल तर समाजांत जें जें असत्-अमंगल आहे तें तें कठोरपणें उपटून टाकलें पाहिजे. आपण जें करीत नाही तें करावयास सांगण्याचा अधिकार आपणांस राहणार नाही हें ओळखून समाजाने आपली वागणूक बदलली पाहिजे. प्रामाणिक-पणा, प्रखर ध्येयवाद, कडवी निष्ठा, सत्याचरण या मूल्यांची कदर समाजांत झाली पाहिजे व त्यांची जोपासना झाली पाहिजे. स्वहितापेक्षा स्वदेशहिताकडे लक्ष देण्याची वृत्ति वाढविली पाहिजे. विद्यार्थ्यांतील प्रतिभा, पौरुष व पराक्रमाचा स्फुल्लिंग चेतविणारा शैक्षणिक कार्यक्रम समाजाने दिला नाही तर विद्यार्थी कल्पनाविश्वांत रमणें, नेभळट बनणें व अशिस्त वागणे फारसें अस्वाभाविक नाही.

विद्यार्थ्यांतील बेशिस्तीला आळा घालण्याच्या दृष्टीने महाविद्यालयीन स्तरावर चालणारें सहशिक्षण बंद करावें असा विचार कांही लोक मांडतात. "सहशिक्षणाने मुलांमुलींत मोकळेपणा व स्वास्थ्य न राहतां संकोच वाढतो. त्यांत ज्ञानसाधना करणें अशक्य उलट मोह उत्पन्न होऊन त्यांतून धोके उत्पन्न होतात," "आज विद्यार्थ्यांच्या बेताल वागणुकीला सर्वांत जास्त प्रोत्साहन कशाने मिळत असेल तर तें सहशिक्षणामुळे"––अशा प्रकारचे विचार हे लोक मांडतात. या विचा-रांत तथ्यांश नाही असें नाही. तंग व भडक कपडे करून आपल्या अंगोपांगांचें प्रदर्शन करणाऱ्या विद्यार्थिनी व केवळ पैशाच्या जोरावर महाविद्यालयांत प्रवेश मिळविणारे विद्यार्थी यांच्यामुळे महाविद्यालयांतील वातावरण गढूळतें यांत संशय नाही. परंतु हें घडण्याचें कारण सहशिक्षण नव्हे. खरें पाहतां महाविद्यालयांतील आजचें शिक्षण हें सहशिक्षणाचें विडंबन आहे. केवळ एका संस्थेंत शिक्षण घेणें म्हणजे का सह-शिक्षण? प्रयोगशाळेंत, ग्रंथालयांत, वर्गांत, क्रीडांगणावर, नाटकांत, खेळांच्या स्पर्धांत तरुण तरुणींनी आपले लिंगभेद विसरून काम केलें पाहिजे. भारताने स्वीकारलेल्या लोकशाही जीवनपद्धतींत स्त्रीला पडद्याआड ठेवतां येणार नाही. उच्च ध्येय वा मूल्याच्या पूर्तीसाठी काम करणाऱ्या तरुण-तरुणी आपल्याला पाहिजे असतील तर चांगल्या कार्यक्रमांनी परिपूर्ण असा शैक्षणिक कार्यक्रम देऊन विद्या-र्थ्यांचें लक्ष केवळ आपुक-मापुक गोष्टींवर स्थिरावणार नाही, आपल्यावरील नैतिक जबाबदारीची जाणीव त्यांच्यांत निर्माण होईल, केवळ शारीरिक आकर्षणाकडे

त्यांचें मन ओढणार नाही अशी दक्षता घेऊन दिलेलें सहशिक्षण आजच्या घडीला अधिक योग्य ठरेल. या संदर्भांत केवळ स्त्रियांसाठी महाविद्यालयें चालविण्याचा जो कार्यक्रम महाराष्ट्रांत दोन-तीन ठिकाणीं अयशस्वी झाला त्याचीहि दखल घेणें योग्य ठरेल.

## आणि म्हणून :--

या सर्व चर्चेनंतर विद्यार्थ्यांची वर्तणूक गैर, बेताल अगर अशिस्त कां आहे व त्याला वेगळें वळण कसें लावतां येईल याची थोडीफार कल्पना आल्याशिवाय राहणार नाही. धार्मिक शिक्षण दिल्याने विद्यार्थ्यांची वर्तणूक सुधारेल असेंहि कांही लोकांचें मत आहे. परदेशांतील विचारवंतांनाहि ध्येयवादाचा तरुणांत दिसणारा अभाव भरून काढण्यासाठी त्यांच्या जीवनाला तत्वज्ञानाची, जीवन-मूल्यांची बैठक द्यावी असें वाटूं लागलें आहे.* परंतु केवळ धार्मिक विषयावरील क्रमिक पुस्तकें वाचलीं अगर त्या विषयांवरील व्याख्यानें ऐकलीं म्हणजे विद्यार्थ्यांतील अश्रद्धता दूर होईल असें मानणें बरोबर ठरणार नाही. आहारशास्त्रावरील पुस्तकें वाचून का कोणाची तब्यत सुधारते? समाजांत सत्-शिव व मंगल यांची कदर केली जाते असें विद्यार्थ्यांना दिसलें, त्या मूल्यांसाठी जीवनाची आहुति देणाऱ्या थोर लोकांचे आदर्श त्यांच्यासमोर असले व तरुण मनाची योग्य प्रकारें मशागत करून त्यांत सुंदर विचारांचें बीजारोपण करणारे प्रभावी शिक्षक असले तर विद्यार्थी अशिस्त होऊंच शकणार नाहीत. आणि म्हणूनच विद्यार्थ्यांतील

---

* या विषयाबाबत The new breed of U. S. School boys with grown up worries--The voice of the nego--हा लेख वाचण्यासारखा आहे. तो Life च्या vol. 33 No. 2 Page 5 वर आहे. त्या लेखांतील कांही भाग मुद्दाम पुढे दिला आहे. A nego is a young man who cannot find any basis for the standards of morality most adults take for granted, faith in life, religion, ethics, right and wrong.

......At and over a seventeen year old spoke hesitantly--"I have no values because there is no basis for them. I have'nt any goal because I don't know what to aim for."

......"In twenty five years of teaching," said one faculty member about the negos, "I have never seen boys more troubled. They see on all sides and sadistic indifference to human values and it has shattered their idealism."

बेशिस्तीची केवळ चर्चा करण्यापेक्षा प्रत्येकाने आपापल्या परीने या दिशेने पावलें टाकणें आवश्यक आहे.

❖ ❖ ❖

### संदर्भ ग्रंथ


(1) Student Indiscipline—Humayun Kabir.

(2) Letters on Discipline—Humayun Kabir.

(3) Improvement of Teaching in Secondary Schools—Frank A. Butler.

(4) Teaching in the Secondary Schools—Goetting.

(5) Effective Teaching in Secondary Schools—Alexander and Halverson.

(6) Teaching in Secondary Schools—Bossing

(7) Children's Behaviour and Teacher's attitudes—Raleigh Schorling, Howard T. Batchelder.

# धार्मिक व नैतिक शिक्षण : ७ :

## प्रश्नाचें स्वरूप :

शीलसंवर्धन व सर्वांगीण विकास हीं शिक्षणाचीं सर्वमान्य ध्येयें आहेत. केवळ बौद्धिक आणि शारीरिक शिक्षणाने विद्यार्थ्यांची सर्वांगीण वाढ होऊं शकणार नाही. शीलसंवर्धन होण्यासाठी धार्मिक व नैतिक शिक्षणाची आवश्यकता असते.* विद्यार्थ्यांना नैतिक शिक्षण दिलें जावें याबद्दल फारसें दुमत नाही; फक्त तें कोणत्या मार्गाने द्यावें याबद्दलच मतभिन्नता आढळून येतें. पण धार्मिक शिक्षणाचा प्रश्न विवाद्य ठरला आहे. बर्ट्रान्ड रसेल, जॉन ड्युई, डॉ. र. पु. परांजपे यांसारखे शिक्षणतज्ज्ञ धर्माचे व धार्मिक शिक्षणाचे कट्टर विरोधक आहेत. भारतांत अनेक धर्मांचे, पंथाचे व जातींचे लोक असल्याने धार्मिक शिक्षणाचा प्रश्न अधिक बिकट बनला आहे. इंग्लंडसारख्या देशांत एकच प्रमुख धर्मपंथ असल्यामुळे तेथे हा प्रश्न तुलनेने तितकासा अवघड नाही. याच कारणामुळे महात्मा गांधीजीसारख्या धार्मिक प्रवृत्तीच्या व ईश्वरावर गाढ श्रद्धा ठेवणाऱ्या नेत्याने आपल्या शिक्षणविषयक योजनेंत धर्माची बाब पूर्णपणें वगळली.† म्हणून धार्मिक शिक्षण द्यावें किंवा नाही, द्यावयाचें झाल्यास कोणत्या प्रकारचें आणि कसें द्यावें या प्रश्नांचा सांगोपांग विचार आपण केला पाहिजे. भारतांतील विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भांत विशेषेंकरून ही चर्चा करणें जरूर आहे.

---

* Religious and moral instruction also play an important part in the growth of character.....There is little doubt that the whole purpose of education is not fulfilled unless certain definite moral principles are inculcated in the minds of the youth of the country.'' —Page 125, Chap. VIII, Part III—Report of the Secondary Education Commission.

† We have left out the teaching of religions from the Wardha Scheeme of Education, because we are afraid that religions as they are taught and practised today, lead to conflict rather than unity.''—Harijan, 26-6-1938.

## पूर्वेतिहास : प्राचीन व मध्ययुगीन काल :--

प्राचीन भारतीय शिक्षणपद्धति प्रामुख्याने धर्मभावनेवर आधारलेली होती. जगाच्या आधुनिक कालापर्यंतच्या इतिहासांतहि फक्त ग्रीक शिक्षणपद्धतीचा अपवाद सोडल्यास हीच स्थिति आढळून येते. प्राचीन भारतांत मोक्षप्राप्ति हेंच मुळी शिक्षणाचें ध्येय मानलें जात होतें. ('सा विद्या या विमुक्तये ।'). लष्करी किंवा व्यावसायिक शिक्षणांतहि नित्य व नैमित्तिक असे धार्मिक आचार अभ्यासक्रमांतच अंतर्भूत केलेले असत. प्राचीन वैदिक व बौद्ध शिक्षणपद्धतींत धर्माचा तात्त्विक अभ्यास व प्रत्यक्ष आचरण हीं दोन्हीं अंगें अध्ययनाचा अपरिहार्य भाग गणलीं जात होतीं. मोंगलअमदानींतहि शिक्षण निरपवादरित्या धर्माधिष्ठित होतें. उच्च शिक्षण व धार्मिक शिक्षण यांत फरकच नव्हता.

## धर्मशिक्षणाचें तत्कालीन उद्दिष्ट :--

शिक्षणाचें ध्येय बौद्धिक शक्तींच्या विकासापुरतेंच सीमित नसून विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनाला योग्य वळण लावण्यासाठी शिक्षणाच्या द्वारें धर्मशास्त्र व नीतिशास्त्राच्या मूलभूत तत्त्वांवर आधारलेला आचारधर्म विद्यार्थ्याला आत्मसात् व्हावा अशी तत्कालीन समाजधुरीणांची धारणा होती. ऐहिक व पारलौकिक कल्याणाचा एकमेव मार्ग म्हणजे धर्म असा सर्वमान्य सिद्धान्त असल्यामुळे धर्मसाधना हें जीवनांतील प्रत्येक अंगाचें ध्येय बनलें. ( प्राणिनां साक्षादभ्युदयनिःश्रेयसहेतुर्यःस धर्मः ) अशा डोळसपणें पत्करलेल्या ध्येयाच्या अभावी मनुष्याच्या आंतरिक शक्तींची एकात्मता ( integrity ) व सुसूत्र वागणूक या गोष्टी साध्य होणें अशक्यप्रायच आहे. जीवन सुखसंपन्न व यशस्वी होण्यासाठी मनुष्य केवळ बौद्धिकदृष्टचा उन्नत असून भागत नाही; तर त्याला भावनिक स्थैर्यहि लाभलें पाहिजे. आयुष्यांत हमखास येणारे मानसिक संघर्ष व ताण सहन करण्याचें सामर्थ्य त्याला प्राप्त झालें पाहिजे. नव्या पिढीच्या भावनिक व नैतिक विकासाची बाब केवळ योगायोगावर सोपविणें केव्हाहि योग्य नव्हे, आणि म्हणून समाजाने शिक्षणसंस्थांच्या द्वारा ती जबाबदारी पार पाडली पाहिजे. कारण शिक्षणाचा हेतु मानवाचा सर्वांगीण--शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक किंवा ऐहिक व पारमार्थिक --विकास घडविणें हा आहे. हें कार्य फक्त धार्मिक शिक्षणानेच होऊं शकेल असा तत्कालिन नेत्यांचा विश्वास होता.

## इंग्रजी अमदानींत :--

इंग्रजी अमदानींत धार्मिक शिक्षणाच्या बाबतींत काटेकोर तटस्थता पाळ-

ण्याचें राज्यकर्त्यांचें धोरण होतें. सुरुवातीस कंपनी सरकारच्या कांही ख्रिश्चन धर्माभिमानी अधिकाऱ्यांनी मिशनऱ्यांच्या दडपणामुळे धर्मप्रसारास अनुकूल धोरण स्वीकारण्याचे तुरळक प्रयत्न केले; पण एकंदरीने सरकारी धोरण धार्मिक तटस्थतेचेंच होतें असें सामान्यपणें म्हणण्यास हरकत नाही.

इ. स. १८८२ मध्ये हंटर कमिशनची नेमणूक झाल्यावर या प्रश्नाने पुनः उचल खाल्ली. ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या दृष्टीने मिशनऱ्यांनी सरकारवर अनेक प्रकारें दडपण आणण्याची खटपट चालू ठेवली होती. तटस्थतेच्या धोरणामुळे सरकारी शिक्षणसंस्थांतून कोणत्याहि स्वरूपांत एखाद्या विविष्ट धर्माचें शिक्षण देणें शक्य नव्हतें. सर्व धर्मांच्या शिक्षणाची सोय एकाच शिक्षणसंस्थेंत करण्यांत अनुल्लंघनीय अडचणी आहेत असें कमिशनचें मत होतें. सामान्य शिक्षणाचें कार्य मात्र सरकारी शिक्षणसंस्थाच योग्य प्रकारें करूं शकतील असें मत त्या कमिशनने नमूद केलें आहे; कारण एखाद्या धर्मपंथाच्या विद्यालयांत त्या पंथाचे अनुयायी असलेल्या विद्यार्थ्यांनाच धार्मिक व इतर शिक्षणाचा पुरेसा लाभ मिळेल व त्यामुळे परिणामतः त्याकाळीं अस्तित्वांत असलेल्या भेदभावांचीं क्षितिजें अधिकाधिक विस्तृत होत जातील असा धोका होता. याउलट, सरकारी किंवा इतर तत्सम निधर्मी संस्थांतून समाजाच्या शैक्षणिक गरजा, थोड्या कमी प्रमाणांत का होईना, पण समत्वाने भागविल्या जातील व सर्वसाधारण शिक्षण घेण्यासाठी सर्व धर्मांचे विद्यार्थी एकत्र जमतील हा लाभ कमी महत्त्वाचा नव्हे असें स्पष्ट मत कमिशनने प्रदर्शित केलें आहे.

हंटर कमिशनने धार्मिक शिक्षणाबाबत खालील शिफारसी केल्या होत्या :— (१) सर्व धर्मांना समान असणाऱ्या मूलभूत धर्मतत्त्वांवर आधारलेलें नीतिपाठांचें एक पुस्तक तयार करण्यांत यावें; (२) सर्व सरकारी व बिनसरकारी विद्यालयांतून संस्थेच्या प्रमुखाने किंवा अध्यापकांपैकी एखाद्या योग्य व्यक्तीने मनुष्याची व नागरिकांचीं कर्तव्यें या विषयावर प्रत्येक सत्रांत एक व्याख्यानमाला गुंफावी.

या शिफारसी सरकारने स्वीकारल्या नाहीत. कारण एक तर अशा तऱ्हेचें पाठ्यपुस्तक तयार करणें म्हणजे अनेक ज्वलन्त प्रश्नांची भुतावळ उभी करणें होय असें सरकारचें मत होतें. दुसरें म्हणजे सर्व धर्मांना समान अशा नीतितत्त्वांचें पुस्तक फारच मोघम व रुक्ष होणार व तें कोणत्याच धर्माच्या अनुयायांना पसंत पडणार नाही. म्हणून अशा पुस्तकाचा मुळीच उपयोग होणार नाही असें सरकारने ठरविलें.

या नंतर या प्रश्नाची पुष्कळ चर्चा अधूनमधून होत राहिली; पण तो तसाच लोंबकळत राहिला. इ. स. १९४४ मध्ये मध्यवर्ती शिक्षण सल्लागार

मंडळानें ( Central Advisory Board of Education ) या प्रश्नाला पुनरपि हात घातला व धार्मिक आणि नैतिक शिक्षणाची आवश्यकता जोराने प्रतिपादन केली. सर्व प्रकारचें शिक्षण धर्माच्या व्यापक, विशाल स्वरूपावर आधारलेलें असावें आणि ज्या अभ्यासक्रमाला नैतिक अधिष्ठान नाही तो अंतिम हिताचा ठरणार नाही असें स्पष्ट मत मंडळाने मांडले* व हें शिक्षण कसें देतां येईल याचा विचार करण्यासाठी एक स्वतंत्र समिति नेमली. या समितीच्या अहवालाचा विचार करून मंडळाने जो निर्णय घेतला, तो मात्र मंडळाच्या उपरोक्त भूमिकेशीं थोडा विसंगतच होता. "या प्रश्नाचा सर्व बाजूंनी विचार करून मंडळाने असें ठरविलें की, शीलाची योग्य जोपासना होण्यासाठी आध्यात्मिक व नैतिक शिक्षणाचें मूलभूत महत्त्व जरी मंडळाला मान्य असलें तरी निधर्मी शिक्षणाच्या कक्षेंत जेवढें अशा तऱ्हेचें शिक्षण बसू शकेल त्याच्या पलीकडील धार्मिक व नैतिक शिक्षण ही विद्यार्थ्याच्या पालकाची व त्याच्या विवक्षित समाजाची ( पंथाची ) जबाबदारी आहे.† या निर्णयावर एक असा महत्त्वाचा आक्षेप घेता येईल की त्यामुळे मुलाचा पूर्ण विकास होण्यापासून त्याला वंचित करण्यांत आलें. कारण जीवनाच्या आध्यात्मिक अंगाची ओळख त्याला लहान वयांत होऊंच शकणार नाही. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की या बाबतींत मार्गदर्शन करण्याचें कार्य जर पालकांवर आणि पंथोपपंथांवर सोपविलें तर धार्मिक विद्वेष, असहिष्णुता व स्वार्थी वृत्ति या अनिष्ट गोष्टींची वाढ होण्याचाच धोका अधिक संभवतो.

## स्वातंत्र्योत्तर :—

आज या प्रश्नाबाबत कोणती परिस्थिति आहे हें पाहणें मनोरंजक व

---

* "Religion in the widest sense should inspire all education and that a curriculum devoid of all ethical basis will prove barren in the end."—Introduction to the Memorandum on the Past-War Educational Development in India. (1943)

† After fully considering all aspects of the question, the board resolved that while they recognise the fundamental importance of spiritual and moral instruction in the building of character, the provision for such teaching, except in so far as it can be provided in the normal course of secular instruction, should be the responsibility of the home and the community to which the pupil belongs."—Memorandum on the Post-war Educational Development in India.

उद्बोधक ठरेल. भारतीय स्वातंत्र्याला चौदा वर्षे होऊन गेलीं असून भारत हें एक निधर्मी (secular) गणराज्य म्हणून घोषित करण्यांत आलें आहे. गेलीं अकरा वर्षें राबविण्यांत आलेल्या भारतीय राज्यघटनेंत धार्मिक स्वातंत्र्य व धार्मिक शिक्षण याबाबतच्या तरतुदी घटनेच्या १९, २१, २२ (१) व २२ (२) या कलमांत केल्या गेल्या आहेत. १९ व्या कलमांत सर्व व्यक्तींना आपल्या सदसद्विवेकबुद्धिप्रमाणे वागण्याचें व कोणत्याहि धर्माचा अंगीकार करण्याचें, आचरण्याचें व प्रचार करण्याचें स्वातंत्र्य असल्याचें घोषित केलें आहे.* मात्र अशा तऱ्हेचें स्वातंत्र्य सार्वजनिक सुव्यवस्था, नीति, आरोग्य व तत्सम इतर विधिविषयक तरतुदी यांना बाधक असता कामा नये. हें कलम खऱ्या धर्माचरणाला पोषकच आहे. आपल्या सदसद्विवेकबुद्धिला अनुसरून कोणत्याहि धर्माचें आचरण व प्रचार करण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीला असावा हें लोकशाही निष्ठेच्या दृष्टीने सर्वस्वी उचित आहे. कोणत्याहि विशिष्ट धर्माच्या प्रचारासाठी किंवा हितासाठी सरकारी पैशाचा उपयोग केला जाऊं नये अशी तरतूद कलम २१ मध्ये आहे.†

धार्मिक शिक्षणाच्या दृष्टीने २२ वें कलम अत्यंत महत्त्वाचें आहे.‡ पूर्णपणें

---

* **Article 19 (1) :** "Subject to public order, morality and health and to the other provisions of this part, all persons are equally entiled to freedom of consicence and the right freely to profess, practice and propagate religion."

† **Article 21 :** "No person may be compelled to pay any taxes, the proceeds of which are specifically appropriated in payment of expenses for the promotion or maintenance of any particular religion or religious denomination."

‡ **Article 22** (1) : "No religious instruction shall be provided in and educational institution wholly maintained out of state funds—

Provided that nothing in this cause shall apply to an educational institution which is administered but has been establshied under an endowment or trust which requires that religious instruction shall be imparted in such institution."

(2) "No person attending any educational institution recognised by the state or receiving aid out of state funds shall be required to take part in any religious institution or to attend any religious worship that may be conducted in such institution or in any premises attached thereto unless such person, or if such person is a minor, his guardian, has given his consent thereto."

सरकारी खर्चाने चालविल्या जाणाऱ्या कोणत्याहि शैक्षणिक संस्थेंत कसलेंहि धार्मिक शिक्षण दिलें जाणार नाही असें कलम २२ (१) मध्ये स्पष्टपणें नमूद केलें आहे. धार्मिक शिक्षण देण्याच्या अटीवरच शिक्षणसंस्था स्थापन करणाऱ्या देणग्या किंवा ट्रस्टच्या बाबतींत मात्र अपवाद करण्यांत आला आहे. दुसऱ्या पोट-कलमांतील तरतूद अत्यंत महत्त्वाची आहे. सरकारमान्य किंवा सरकारी अनुदान घेणाऱ्या कोणत्याहि शिक्षणसंस्थेंत शिकणाऱ्या व्यक्तीस एखाद्या धार्मिक संस्थेच्या कार्यांत भाग घेण्याची किंवा अशा सस्थेंत किंवा तिच्या अन्य इमारतींत चालविल्या जाणाऱ्या धार्मिक उपासनेंत भाग घेण्याची सक्ति, त्या व्यक्तीने अगर ती व्यक्ति कायद्याने अज्ञान (minor) असल्यास तिच्या पालकाने संमति दिल्याखेरीज करता येणार नाही.

घटनेंत अशा स्वरूपाच्या तरतुदी करण्याचें कारण अगदी उघड आहे. आपल्या देशांत अनेक धर्मांचे व पंथांचे लोक आहेत. वरील प्रकारच्या संस्थांतून या सर्व धर्म-पंथांचें शिक्षण देणें अशक्यच आहे. शासनसंस्थादेखील हें करूं शकणार नाही. प्रत्येक व्यक्तीला आपला धर्म श्रेष्ठ व सत्यपथदर्शक वाटतो. एखाद्या संस्थेंत अनेक धर्मांचा आचार-विचार या संकुचित भावनेने सुरु झाल्यास वाद आणि कटुता वाढून त्या संस्थेंतील शांततामय वातावरण नष्ट होईल म्हणून वरील स्वरूपाच्या तरतुदी अवश्य व योग्यच आहेत.

भारतीय घटनेनुसार सरकार धार्मिक शिक्षण देण्याची तरतूद करूं शकत नाही; तथापि धार्मिक शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांना मान्यता देण्यास किंवा त्यांना अनुदान देण्यास कोणतीहि कायदेशीर अडचण नाही. फक्त सदसद्विवेक-बुद्धीचा उल्लेख असलेल्या उपरोक्त कलमाचाच विचार करावा लागतो. त्याला बाध न येतां धार्मिक शिक्षण किंवा उपासना यांत भाग घेण्याची ज्यांची इच्छा व संमति असेल त्यांनाच तें शिक्षण द्यावें, इतरांना तें देण्यांत येऊं नये असा स्पष्ट आदेश घटनेने दिलेला आहे.

या ठिकाणी धार्मिक शिक्षण आणि धर्माचा तात्त्विक किंवा तौलनिक अभ्यास यांतील फरक लक्षांत घेतला पाहिजे. एखाद्या विशिष्ट धर्मांतील ठराविक तत्त्वांवर (dogma) श्रद्धा ठेवणें थोड्याफार अंशाने धार्मिक शिक्षणांत अभिप्रेत आहे. अशा तत्त्वांचा ऐतिहासिक अगर तौलनिकदृष्टचा पूर्णपणें त्रयस्थ वृत्तीने तात्त्विक स्वरूपाचा अभ्यास संस्कृतीच्या एका अंगाचा अभ्यास म्हणून विश्वविद्यालयांतून केला जाण्यास घटनेचा प्रत्यवाय नाही. राष्ट्र या नात्याने कोणत्याहि एका धर्माचा पाठपुरावा घटनेनुसार करतां येणार नाही. सर्व धर्मांच्या अभिवृद्धीसाठी समान संधि उपलब्ध करून देणें हा घटनेचा उद्देश आहे. अर्थात्

कोणत्याहि धर्माला खास सवलती किंवा बंधनें न ठेवणें हें घटनेंतील धोरण आपण अंगिकारलेल्या लोकशाही निष्ठेला अनुसरूनच आहे.

## इतरत्र :--

सध्या जगांत धार्मिक शिक्षणाची विशेष आवश्यकता कां आहे व त्याला विरोध कां करण्यांत येतो हें पाहण्यापूर्वी इतर देशांत या बाबतींत कोणतें धोरण स्वीकारलें गेलें आहे हें पाहणें जरूर आहे. रशिया, चीन वगैरे देशांचा विचारच करण्याचें कारण नाही. या साम्यवादी राष्ट्रांनी तत्वज्ञानाच्या बाबतींत स्पष्टपणें भौतिक जडवादाचा स्वीकार केलेला आहे. अलीकडे रशियांत वैयक्तिक स्वरूपाच्या धार्मिक उपासनेला मान्यता व परवानगी देण्याकडे कल दिसून येतो असें सांगण्यांत येतें. तथापि अशा परिस्थितींत धार्मिक शिक्षण देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

## अमेरिका :--

संयुक्त संस्थानांचें गणराज्य हें पूर्णतया निधर्मी राष्ट्र आहे व धार्मिक बाब ही व्यक्तीच्या सारासारविवेकावर सर्वस्वी सोपविली गेली आहे. एखाद्या धर्माचा राष्ट्रधर्म म्हणून स्वीकार किंवा प्रतिष्ठापना अथवा त्याच्या आचरणाला प्रतिबंध या गोष्टी व्हाव्यात म्हणून अमेरिकन कॉंग्रेस कसलाहि कायदा करूं शकत नाही. आपापल्या सदसद्विवेकबुद्धीला अनुसरुन अमेरिकन लोकांनी पाहिजे त्या मार्गानें परमेश्वराची उपासना करावी वा मुळींच करूं नये; त्यांत अमेरिकन सरकार लुडबूड करणार नाही. धार्मिक बाबतींत मार्गदर्शन करण्याचा अधिकार सरकारला देणें म्हणजे धर्मस्वातंत्र्यावर घाला घालणें होय आणि ही गोष्ट अमेरिकेच्या लोकशाहीला जीवननिष्ठेला विरोधी आहे. अमेरिकेच्या जन्मापासूनच परिस्थितीच्या दडपणामुळे सर्व तऱ्हेचे धार्मिक संघर्ष टाळले गेले. कारण राष्ट्रधर्म म्हणून कोणत्याच धर्माला मान्यता व प्राधान्य मिळालें नाही. भारतीय घटनेंतील वर दिलेल्या धर्मविषयक तरतुदींचें साम्य येथे नजरेंत भरण्यासारखें आहे.

अमेरिकेचें धर्मविषयक धोरण कटाक्षाने तटस्थतेचें राहावें म्हणून धर्मविरोधी लोकांकडून जागरूकपणें कारवाई केली जाते. धर्मशिक्षणवादी लोकांनी 'रविवारची शाळा' आणि 'सुटीचा वेळ' इत्यादि उपक्रमांद्वारें सार्वजनिक शाळांतून धार्मिक शिक्षण सुरू केलें होतें. सरकारी शाळांतील मुलांना धर्मशिक्षणासाठी सामान्यत: आठवडयांतून एक तासाची सुटी देण्यांत येत असे. सुप्रीम कोर्टानें (मॅक्कॉलम दावा १९४८) या बाबतींत असा निर्णय दिला की या धर्मशिक्षण कार्यासाठी

सार्वजनिक शाळांच्या इमारतींचा उपयोग करतां येणार नाही.* अगदी अलीकडेहि सार्वजनिक शाळांतून सुरुवातीस जी धार्मिक प्रार्थना म्हटली जाते ती म्हणण्याची सक्ति अवैध व घटनाविरोधी आहे व म्हणून ती बंद करण्यांत यावी असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिलेला आहे. दक्षिणेकडील कांही संस्थांनांतून त्याला विरोध प्रगट झाला ही गोष्ट वेगळी !

## ऑस्ट्रेलिया :--

अमेरिकेप्रमाणे ऑस्ट्रेलियाहि एक अर्वाचीन राष्ट्र आहे व तेथेहि तशाच स्वरूपाची तरतूद घटनेंत करण्यांत आली आहे. प्रत्येक मनुष्याला आपल्या मताप्रमाणे धर्माचरण करण्याचें वा न करण्याचें स्वातंत्र्य आहे. नोकरी किंवा इतर सार्वजनिक जबाबदारी पत्करण्यासाठी कोठलीहि धर्मविषक अट योग्यता म्हणून लागू केली जाणार नाही अशी स्पष्ट घोषणा घटनेंत आहे.†

## इंग्लंड :--

वरील दोन निधर्मी राज्यांपेक्षा निराळ्या स्वरूपाची कायदेशीर तरतूद इंग्लंडमध्ये असल्याचें दिसूस येतें. इ. स. १९४४ च्या कायद्याने धार्मिक उपासना व शिक्षण सर्व शाळांतून अनिवार्य करण्यांत आलें. तत्पूर्वी फक्त खाजगी शाळांमध्येच तें मिळण्याची सोय होती. ही सक्ति इंग्लंडच्या परंपरेला अनुसरूनच आहे. कारण प्रॉटेस्टंट पंथ हा राष्ट्रधर्म म्हणून टयूडर कालापासूनच स्वीकृत केला गेला आहे. अर्थात्, जरी ही सक्ति सार्वजनिक असली तरी एखाद्या नागरिकाची धर्मावर प्रामाणिक श्रद्धा नसेल तर त्याला किंवा त्याच्या पाल्याला भाग न घेण्याची मोकळीक आहे. एवढेंच नव्हे तर शाळेंतील एखाद्या शिक्षकालाहि अशा धार्मिक शिक्षणांत व उपासनेंत भाग घेण्याची सक्ति करतां येणार नाही. शालेय कार्य-

---

* धर्मशिक्षण व धार्मिक निरक्षरता याबद्दल अमेरिकेंतील पंथोपपंथ व त्यांच्या चळवळी यासंबंधीं अधिक माहितीसाठी पाहा—"विसाव्या शतकांतील अमेरिकेमधला धर्म"—लेखक हर्बर्ट स्नायडर, अनुवादक चं. वि. बावडेकर—प्रकरण २ व ३.

† "The Commonwealth shall not make any law for establishing any religion, for imposing any religious observance or for prohibiting the free exercise of any religion, and no religious test shall be required as a qualification for any office or public trust under the Commonwealth."

क्रमाची सुरुवात धार्मिक उपासनेने किंवा प्रार्थनेने व्हावी, दिवसाच्या कोणत्याहि वेळीं धार्मिक शिक्षण देण्यांत यावें, धार्मिक शिक्षणाचा अभ्यासक्रम सर्व पंथांनी मान्य केलेला असा नियुक्त करण्यांत आला आहे. या तरतुदी इ. स. १९४४ व १९४७ च्या शिक्षणविषयक कायद्यांतून करण्यांत आल्या आहेत.*

## भारत–एक निधर्मी राज्य :

वरील माहितीवरून भारताने इंग्लंडचें अनुकरण न करतां अमेरिकेच्या पावलांवर पाऊल टाकलें आहे हें दिसून येईल. याचें कारण म्हणजे स्वातंत्र्यपूर्व-कालांत भारताला धार्मिक संघर्षामुळे अपरिमित हानि सोसावी लागली हें होय. धर्मविषयक संकुचित दृष्टिकोनामुळे प्रासंगिक स्वरूपाच्याच दंगली घडून आल्या, एवढेंच नव्हे, तर शेकडों वर्षें एकत्र नांदलेल्या भिन्नधर्मीय समाजांत पराकोटीचा विद्वेष निर्माण झाला व त्याचीच परिणति अखेर भारताचीं दोन छकलें होण्यांत झाली. ही हानि एवढ्यावरच थांबली असें नव्हे, तर फाळणीनंतर झालेल्या दंगली व कत्तली, त्यानंतर भारतांत येणाऱ्या निर्वासितांचा प्रचंड लोंढा इत्यादि प्रश्नांना भारताला तोंड द्यावें लागलें. असहिष्णुता व संकुचित धर्मभावना यांमुळे पोळलेल्या भारताने वरील निधर्मीपणाचें तत्त्व स्वीकारलें यांत नवल नाही. परंतु त्याच्या बुडाशीं सर्व प्रकारच्या धार्मिक शिक्षणाला बंदी घालण्याचा हेतु मुळीच नव्हता.

* "For the first time, religious worship and religious instruction, subject to the usual conscience clauses, have become compulsory in every country and voluntary school. Every school day must begin with an act of collective worship attended by all the pupils (except in schools without an assembly hall, where worship may take place in the classs-rooms)......Religious instruction is to be given in all schools and may be at any time during the school session instead of being restricted to the beginning or the end of the session.......In country schools the religious instruction must be given in accordance with an agreed syllabus and no teacher is obliged to take part in it if he does not wish to do so."—Page 380—History of Education in Great Britain—Curtis.

"The school day shall begin with collective worship on the part of all pupils in attendance and that religious instruction shall be given in every country school and in every voluntary school."—Article 25, Education Act of 1948.

बंदी फक्त एकांगी, संकुचित, हेकट (dogmatic) स्वरूपाच्या एखाद्याच विशिष्ट पंथाच्या धार्मिक शिक्षणावर घातली गेली व तीहि सरकारी शिक्षण-संस्थांतूनच. आपण जर सरकारी शाळांतून असें संकुचित धार्मिक शिक्षण देऊं लागलों तर मुलांमध्ये भ्रातृभाव व शांतताप्रियता निर्माण होण्याऐवजीं एखाद्या विशिष्ट धर्मपंथाचा आग्रही अभिनिवेश व संकुचित निष्ठा निर्माण होतील. खऱ्या धर्माचरणाला इतर धर्मांचा द्वेष करण्याची आवश्यकता आहे असा (गैर?) समज एका काळीं प्रचलित होता. माझाच धर्म सत्याचें यथार्थ स्वरूप दाखवितो, इतर सारे धर्म झूठ आहेत, अशा दुराग्रहाचा तो काळ आता इतिहासजमा झाला आहे. या दुराग्रहामुळेच वर उल्लेखिलेले अत्याचार जगांतहि ठिकठिकाणीं घडून आले. धर्माचा हा दुरुपयोग पाहून धर्म ही अफूची गोळी आहे असें आपण म्हणूं लागलों. धर्माचरण प्रतिगामित्वाचें निदर्शक आहे असें आपणांस वाटूं लागलें. हें जरी साहजिक असलें तरी आपण केवळ भावनांच्या आहारी जातां कामा नये. जी हानि घडून आली तिला धर्म जबाबदार नसून चुकीच्या कल्पना, हटवाद व स्वार्थ यांची खऱ्या धर्माशीं जी गल्लत करण्यांत आली ती जबाबदार आहे. स्वार्थी लोक आपल्या दुष्ट हेतूंच्या पूर्तीसाठी दोषैकदृष्टीने व संधिसाधूपणें अज्ञ लोकांच्या बाबतींत धर्माचा दुरुपयोग करतात व त्यामुळे ही अनर्थपरंपरा कोसळते.

आपल्या निधर्मी राज्याच्या कल्पनेमागे ही कारणपरंपरा आहे व तिचा अर्थ धर्माला बंदी असा नव्हे.* पवित्र किंवा उपासनीय अशी कोणतीच वस्तु किंवा तत्त्व जगांत नाही असा अर्थ त्यांत मुळीच नाही. आपल्या राष्ट्राने भौतिक जडवादाचा कांहीं साम्यवादी देशांप्रमाणे स्वीकार केला आहे असाहि सूर त्यांतून निघत नाही; कारण तो भारतीय प्रकृतीशीं, स्वभावधर्माशीं विसंगत आहे. राष्ट्रधर्म म्हणून आपण कोणत्याहि धर्माचा स्वीकार केलेला नसला, तरी ज्ञात इतिहासांत भारतीय जीवन आध्यात्मिकतेने भारलें गेलेलें आहे हें मात्र नाकबूल करतां येणार नाही.

---

* "This does not imply that because the state is secular there is no place for religion in the state. All that is understood is that the state as such should not undertake to uphold actively, assist, or in any way to set its seal of approval on any particular religion. It must be left to the people to practise whatever religion they feel is in conformity with their inclinations, traditions, culture and hereditary influence."—Page 125, Chap. VIII, Part III. Report of the Secondary Education Commission.

# धार्मिक शिक्षण कां हवें ?

वर केलेलें विवेचन ऐतिहासिक स्वरूपाचें आहे. आजच्या जगांत धर्म व त्याच्या शिक्षणाची आवश्यकता कां आहे हें पाहिलें पाहिजे.

## जगाची राजकीय परिस्थिति :–

जगाची आजची स्थिति आजपर्यंतच्या इतिहासांत कधीच नव्हती इतकी बिकट झाली आहे. जग अगदी खऱ्या अर्थाने विनाशाच्या उंबरठ्यावर उभें आहे. एखाद्याच चुकीच्या पावलाने मानवाने आजवर केलेल्या सर्व कमाईचा सत्यानाश होणार आहे. सर्व मानवसंस्कृतीचा विनाश अल्पकाळांतच होऊं शकेल अशीं भीषण, सर्वसंहारक अण्वस्त्रें पुरेशा प्रमाणांत उपलब्ध झालीं आहेत. बसल्या ठिकाणापासून पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं अचूक मारा करूं शकणाऱ्या आंतरखंडीय स्वयंचलित अण्वस्त्रांचे यशस्वी चांचणीप्रयोग करण्यांत आले आहेत. या सर्व खटाटोपाच्या परिणामाबद्दल एका शास्त्रज्ञाचे उद्‌गार फार मार्मिक आहेत. पुढील महायुद्धांत कसल्या प्रकारचीं अस्त्रें वापरलीं जातील या प्रश्नाला उत्तर देतांना त्याने सांगितलें,—“तिसऱ्या महायुद्धांत कोणतीं शस्त्रास्त्रें वापरलीं जातील याबद्दल मी निश्चितपणें कांही सांगू शकत नाही, परंतु त्यानंतरचें युद्ध मात्र दगड व काठ्यांनीच लढलें जाईल.” तात्पर्य, सारें जग एका भयानक परिस्थितीच्या कड्यावर उभें आहे.

या संदर्भांत शिक्षणाच्या पुनर्रचनेचा विचार करावयाचा झाल्यास ती अचूक तत्त्वज्ञानाच्या भक्कम पायावर झाली पाहिजे याबद्दल मतभेद होण्याचें कांही कारण नाही. ज्या निरनिराळ्या राजकीय तत्त्वज्ञानांची कांस धरून जगांतील प्रमुख राष्ट्रें एकमेकांसमोर युद्धाच्या पवित्र्यांत उभीं ठाकलीं आहेत, त्या तत्त्वप्रणाली अशा तऱ्हेचा आधार शिक्षणाला देऊं शकत नाहीत. विज्ञानयुगांत भौतिकतेवर भर असल्याने संघर्षापासून, चुकीच्या मार्गावरून मनुष्यास परावृत्त करूं शकेल असें समर्थ प्रभावी तत्त्व आज दिसत नाही. मानवतावादाचा बराच बोलबाला आजकाल ऐकूं येतो; पण तो या बाबतींत अपुरा व लंगडा ठरला आहे. मानवाच्या मूलभूत चांगुलपणावर श्रद्धा ठेवल्यामुळे युद्धखोरी किंवा मनुष्याच्या इतर दुष्ट प्रवृत्तींचा प्रतिकार करण्याच्या कामीं तो फारसा उपयोगी पडत नाही.* या परिस्थितींत धर्म हा एकच तोडगा आहे असें विचारवंतांना वाटतें.

---

* “A mere humanism is bankrupt; lacking resources beyond itself, it has not stood in the evil day.”—Page 238, Groundwork of Educational Theory—Ross.

**मानसिक पोकळी :--**

मानवाच्या मानसिक विश्वांत एक तऱ्हेची पोकळी निर्माण झाली आहे आणि वैफल्याच्या व निराशेच्या भावनेने त्याला ग्रासलें आहे. दारिद्र्य व आपत्तींनी गांजलेल्या भारतासारख्या देशांतच ही स्थिति आहे असें नाही. अमेरिके-सारख्या संपन्न, बलशाली व वैभवशिखरावर आरूढ झालेल्या पहिल्या क्रमांकाच्या देशांतील लोकहि या विफलतेच्या भावनेंतून सुटलेले नाहीत. भौतिक सुखांची परिसीमा गाठूनहि अमेरिकन माणूस सुखी नाही असें तेथील परिस्थितीचें सूक्ष्म अवलोकन करून आलेल्या अनेक विचारवंतांचें मत आहे. कोणत्याच मूल्यांना महत्त्व न राहिल्याने तेथील तरुणांच्या जीवनांत एक भलें मोठें अनुत्तरित प्रश्न-चिन्ह उभें राहिलें आहे. कार्यवादाचा प्रणेता व प्रख्यात शिक्षणशास्त्रज्ञ जॉन डयुई याने या परिस्थितीची अचूक मीमांसा केली आहे. तो म्हणतो--"ज्या निष्ठांमुळे समाजांतील व्यक्ति एकत्रित केल्या जात होत्या, ज्यांच्यामुळे त्यांना एक प्रकारचा आधार, जीवनविषयक दृष्टिकोनाची एकात्मता व दिशा लाभत होती, त्या साऱ्या निष्ठा एकामागून एक ढांसळल्या आहेत. परिणामत: सामान्य जनांचा गोंधळ उडाला आहे व ते स्तंभित झाले आहेत. खात्रीलायक व भक्कम अशा श्रद्धा-स्थानांच्या व सर्वमान्य ध्येयांच्या अभावाच्या बाबतींत मानवी इतिहासाचा कोणताहि कालखंड वर्तमानकालाशीं बरोबरी करूं शकणार नाही. स्थिरमूल्यांवर जेवढी अव्यभिचारी निष्ठा असेल, त्या प्रमाणांत व्यक्तिमत्वाला स्थैर्य लाभतें." पण जुनीं मूल्यें, जुन्या निष्ठा विज्ञानयुगांत हतप्रभ झाल्या. त्यांची जागा नवीन मूल्यांनी घ्यावयास हवी होती, पण वर्तमानकाळ अशीं मूल्यें पुरवूं शकत नाही. डयुईच्या मतें मनुष्य दोलायमान अवस्थेंत लोंबकळत आहे. एका बाजूला बौद्धिक-दृष्टया स्थैर्य न देऊं शकणारा भूतकाळ आहे, तर दुसऱ्या बाजूस अतिरेकी विविधतेने भरलेला व भावनांचें समतोल नियमन व मार्गदर्शन करण्यास असमर्थ ठरलेला वर्तमानकाळ आहे. या दोन्हींत हेलकावे खाणाऱ्या माणसाच्या मानसिक-विश्वांत स्थैर्य निर्माण करण्यासाठी कांहीतरी उपाययोजना करणें जरूर आहे व तें कार्य धार्मिक व नैतिक मूल्येंच करूं शकतील असा विचारवंतांचा विश्वास आहे, (डयुईला मात्र हें मान्य नाही.)*

---

* "The loyalties which once held individuals, which gave them support, direction and unity of outlook on life, have well-nigh disappeared. In consequence, individuals are confused and bewildered. It would be difficult to find in history an epoch as lacking in solid and assured objects of belief and approved ends

(पुढे चालू)

भारत सरकारने इ. स. १९५९ सालीं नेमलेल्या श्रीप्रकाश समितीने आपल्या अहवालांत वरील परिच्छेदांत उल्लेखिलेल्या परिस्थितीचा निर्देश केला आहे. ही समिति शिक्षणसंस्थांतून नैतिक व आध्यात्मिक मूल्याधिष्ठित शिक्षणाची इष्टता व व्यवहार्यता याबद्दलचा निर्णय करण्यासाठी व तें इष्ट असल्यास जरूर तें मार्गदर्शन करण्यासाठी नेमली गेली होती. समितीची नेमणूक कां झाली असावी याबद्दल समितीनेच म्हटलें आहे--"शिक्षणक्षेत्रांत आज जी बेशिस्त, जी विफलता व जी जीवनमूल्यांची वाताहात झालेली दिसते, ती केवळ आपल्या शिक्षणपद्धतींतील दोषांमुळेच होय व त्या दोषांमुळेच की काय, आज विद्यालयें, महाविद्यालयें आणि विद्यापीठें यांतून अपेक्षेप्रमाणे सुयोग्य तरुण बाहेर पडत नाहीत. या भीतींतूनच आमच्या समितीची नेमणूक झालेली असावी."

## एकात्मतेचा अभाव :--

धार्मिक व नैतिक मूल्याची हेळसांड झाल्यामुळेच संघर्ष, स्वार्थ इत्यादि दुष्प्रवृत्ति निर्माण होतात. भारतांत भावतिक एकात्मता दृढमूल करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरितां अलीकडेच नेमलेल्या समितीचे अध्यक्ष डॉ. संपूर्णानंद यांनी चालू परिस्थितीचें निदान करतांना धार्मिक संस्कारांची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. ते म्हणतात--"स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भावनात्मक ऐक्यावर भर देण्याऐवजी निव्वळ भौतिकतावादाच्या मागेच सत्ताधारी पक्षाचे पुढारी लागल्यामुळे आजच्या तरुणपिढींत चांगुलपणाचा अभाव निर्माण झाला आहे. त्याचें दुसरें कारण असें आहे की, धार्मिक बंधनें लुप्त झाल्यामुळे युवकांचें आध्यात्मिक बल व त्यांचें चारित्र्य नष्ट झालें आहे. तेव्हा माणसाच्या वागणुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी धार्मिक संस्कारांची व बंधनांची आजच्या काळांत निकडीची गरज आहे."

---

of action as in the present. Stability of individuality is dependent upon stable objects to which allegiance firmly attaches itself. There are, of course, those who are still militantly fundamentalist in religious and social creed. But their very clamour is evidence that the tide is set against them. For the others, traditional objects of loyalty have become hollow or are openly repudiated and they dritf without anchorage. Individuals vibrate between a past that is intellectually too empty to give stability and a present that is too diversely crowded and chaotice to afford balance or direction to ideas and emotion."—Page 52-53, Individualism Old and New—John Dewey.

भारतांत एकछत्री राजकीय अंमल इंग्रजी अमदानीपूर्वी क्वचितच होता. तरीहि या खंडप्राय देशांत आसेतुहिमाचल एका महान् संस्कृतीचा विकास घडून आला. या चमत्काराच्या मागे जीं कारणें आहेत, त्यांत धार्मिक आचार-विचारांचें समानत्व हें प्रमुख आहे. देशाचे कोनेकोपरे एका अदृश्य सूत्राने घट्ट बांधून ठेवण्याचें कार्य धर्माच्या व संस्कृतीच्या ज्या अंगांनी केलें, त्यांची काळजीपूर्वक जपणूक केली पाहिजे.* सारांश, राष्ट्रीय एकात्मतेसाठी धार्मिक शिक्षणाची आज नितान्त आवश्यकता आहे.

## धर्म--संस्कृतीचें एक प्रधान अंग :--

भारतामध्ये शिक्षणक्षेत्रांत जी गोंधळाची परिस्थिति निर्माण झाली आहे, तिचें निर्मूलन करावयाचें झाल्यास धार्मिक शिक्षण देणें हाच एक प्रभावी उपाय आहे असें अनेक शिक्षणतज्ज्ञांचें मत आहे. गेल्या शंभर वर्षांत सार्वजनिक शाळांतून जें निधर्मी, नास्तिक स्वरूपाचें शिक्षण दिलें गेलें त्याचाच परिणाम म्हणजे तरुणांच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनांत सध्या प्रकर्षाने आढळून येणारी बेशिस्त, अव्यवस्था आणि अराजक हा होय, आणि भूतकालांतील चुका तशाच चालूं न देणें हें राजकीयदृष्टया शहाणपणाचें ठरेल असें अनेकांचें मत आहे.† म्हणून धार्मिक शिक्षण दिलें गेलेंच पाहिजे. भूतकाळांत धर्माच्या नांवाखाली दंगे व अत्याचार झाले किंवा धर्मयुद्धेंहि झालीं, एवढ्यामुळेच आपल्या समाजाच्या प्रगतीसाठी व सुधारणेसाठी आंखलेल्या योजनांतून धर्माला अजिबात फांटा देणें योग्य ठरणार नाही. कारण मानवी संस्कृतीचा फार मोठा भाग व आजहि मानवी वर्तनाला वळण लावणारीं परंपरागत मूल्यें हीं धर्मानेच घडविलीं आहेत. आजहि

---

* "Elements in our religion and culture that work strongly towards uniting one part of the country to another have to be conserved."—Dr. Sampurnanand, Chairman of the Committee on Emotional Integration—Speech in its first meeting in New Delhi (Nagpur Times, 12-9-61)

† "The Godless education that the public schools of India have imparted during the past 100 years, has much to account for the indiscipline, the disorder and the anarchy in the individual and social lives of the young men of India. And it would be the more of the political wisdom not to repeat the mistake of the past." —केसरी दि. २५-८-६१ 'धार्मिक शिक्षणाची आवश्यकता व त्याची दिशा' या लेखांतील एक अवतरण.

भारतीय समाजांत धर्म ही एक प्रभावी शक्ति आहे.*

धार्मिक मूल्यांची जोपासना करण्यास कित्येकांचा विरोध आहे. बर्ट्रान्ड रसेलसारख्या महापंडिताने देखील धर्मावर प्रखर हल्ला चढविला आहे.† पण सामाजिक स्थैर्य व उत्कर्ष यांसाठी श्रद्धेची, निष्ठेची आवश्यकता नाकारणें कठीण आहे. शिवाय भारतीय प्रकृतीला निसर्गवाद किंवा कार्यवाद यांसारख्या आधिभौतिक तत्त्वज्ञानप्रणालींपेक्षा आध्यात्मिकतेवर भर देणारा आदर्शवादच जवळचा आहे. 'सत्यं, शिवं, सुंदरम्' हीं मूल्यें परमात्म्याचें स्वरूप असून त्यांची प्राप्ति करून घेणें हें मानवी जीविताचें इतिकर्तव्य आहे असें तो मानतो. याच मार्गानें जीवित सफल होईल अशी त्याची शिकवण आहे.

## धर्माचें स्वरूप :—

धर्मविषयक कल्पनांची उत्पत्ति मानवाला सभोंवतीच्या नैसर्गिक चमत्कारांविषयी वाटणाऱ्या आश्चर्य, भीति इत्यादि भावनांतून झाली असें सर्वसाधारणपणें म्हणावयास हरकत नाही. आदिमानवाला नैसर्गिक शक्तींविषयी मोठेंच गूढ वाटत असलें पाहिजे व त्याने आपल्या परीने त्याची उपपत्ति लावण्याचा प्रयत्न केला. म्हणून धर्माचें मूळ अधिष्ठान निसर्गाच्या पलीकडील अभौतिक व अतींद्रिय विश्व आहे. निरनिराळ्या समाजांत भिन्नभिन्न ईश्वरविषयक कल्पना प्रचलित आहेत; परंतु सर्वसामान्य मानवाला सगुण ईश्वराच्या कल्पनेचेंच जास्त आकर्षण असल्याचें दिसतें. यांतूनच भक्तिमार्गाचा उदय झाला आहे. ईश्वराची निरपेक्ष भक्ति करणाऱ्या भक्तांचा आदर्श समाजापुढे राहावा म्हणून सर्व धर्मांतून पुराणें (Mythology) निर्माण झाली. पुराणें हें धर्माचेंच एक अंग होय. धर्मभावना स्थिर करण्यासाठी यांचा मोठाच उपयोग झाला आहे. पुराणग्रंथांतून आढळणारा अद्‌भुतरस धर्मश्रद्धा बळकट करण्यासाठी उपयुक्त ठरतो.

---

* "A great part of the culture of humanity and most of the traditional values which continue to influence human conduct have been shaped by religion, which is even today one of the most powerful forces in our society. We should recognise this fact and plan accordingly. Simply because some people have fought in the name of religion or debased it by committing other crimes against humanity. We cannot exclude it from our plans for social progress and betterment of life."—Page 10, Report of the Shri Prakash Samittee.

† Education and the Social Order—Chap. VIII—Bertrand Russell.

धर्माचें दुसरें अंग म्हणजे धर्मकार्याचे विधि व तांत्रिक प्रघात हे होय. यांपैकीं बरेच विधि ( Rituels ) त्या त्या काळाच्या दृष्टीने उपयुक्त होते. गुरुकुलांतून विद्या प्राप्त करून आल्यावर गृहस्थाश्रम पत्करणाऱ्या व नदीकांठच्या प्रदेशांत शेती करणाऱ्या प्राचीन आर्यांच्या दृष्टीने श्रावणी (उपाकर्म) सारखे संस्कार उपयुक्त होते. बदललेल्या परिस्थितींत त्यांची उपयुक्तता संपली व ते कालबाह्य ठरले तरीहि त्यांच्या आचरणाचा आग्रह धरण्यामुळें धर्मविषयक श्रद्धेला धक्का बसतो. परंपरावादी लोक 'तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते' या तत्त्वाचा आधार घेतात; पण असले कालबाह्य आचार व तांत्रिक विधि म्हणजे खरें शास्त्र नव्हे.

खरें धर्मशास्त्र म्हणजे धर्माचें आधारभूत तत्त्वज्ञान हें धर्माचें तिसरें व महत्त्वाचें अंग होय. मानवी जीवनाचा अर्थ, सृष्टीचें मूळ कारण, सृष्टीच्या उत्पत्तींतील उद्देश, जीवनांतील उच्चतर मूल्यें इत्यादि प्रश्नांचा विचार यामध्ये अंतर्भूत आहे. या तत्त्वज्ञानानुसार जीवनांत खरीखुरी धार्मिक मनोवृत्ती निर्माण झाली, विशिष्ट आध्यात्मिक दृष्टिकोन प्राप्त झाला म्हणजे खरें धर्माचरण झालें, जीवनसाफल्य झालें असें म्हणतां येईल. खरी धार्मिक वृत्ति जीवनाशीं एकरूप झालेली असते. एकनाथ—तुकारामासारख्या संतांनी ती आत्मसात् केलेली होती. ते केवळ पोपटपंची करीत नव्हते. या वृत्तीला बगल देऊन जेव्हा वरपांगी कर्मकांडाला व आचारांनाच धर्म ही संज्ञा प्राप्त होते तेव्हा धर्मविषयक श्रद्धेला उतरती कळा लागते.

धर्माचा उगम वर सांगितल्याप्रमाणे ज्ञानाच्या मर्यादेपलीकडे अवाङमनसगोचर अशा अज्ञाताच्या क्षेत्रांत होत असल्याने ('यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसासह' किंवा 'अतीतः पन्थानं तव च महिमा वाङमनसयोः) धर्माचें साधन श्रद्धा हेंच आहे. विज्ञान बुद्धिग्राह्य आहे; पण धार्मिक श्रद्धेशिवाय धर्मविषयक अंतिम अनुभव प्राप्त होणें असंभव आहे. ही श्रद्धा अंधश्रद्धा मात्र नव्हे. कारण वर लिहिलेल्या तिसऱ्या अंगाचा, शास्त्राचा तिला आधार आहे. म्हणून ज्ञानाशीं तिची फारकत नाही. हें ज्ञान विचारवंतांना साक्षात्काराच्या द्वारें मिळालेलें असतें. ज्ञानाची श्रद्धेशी जोड असेल तरच तें ज्ञान परिणामीं हितकर ठरतें. श्रद्धाविरहित ज्ञान विध्वंसनच घडवून आणणार हें आजहि आपल्या अनुभवास येत आहे.

म्हणून पुराणें-तंत्र-तत्त्वज्ञान यांची कालोचित योग्य सांगड घातली पाहिजे. केवळ तत्त्वज्ञानाचा अभ्यास विद्वानांनाच शक्य आहे. ( क्लेशोऽधिकतरस्त्रेषा-भव्यक्तासक्तचेतसाम्—भ. गीता) इतरांना पुराणें व तंत्र यांचा धार्मिकवृत्तीच्या जोपासनेसाठी अधिक उपयोग होईल. वरील विवेचनांतून धार्मिक शिक्षणाचें स्थूल

स्वरूप स्पष्ट होईल. धार्मिक शिक्षण म्हणजे पुराणकाळीन व्यक्तींचीं चरित्रें, कांही नैतिक तत्त्वें व कांही पौराणिक कथा यांची पोपटपंची नव्हे. हीं केवळ साधनें होत. सहिष्णुता आणि सहानुभूति यांच्या आधारावर उच्च सांस्कृतिक तत्त्वें प्रत्यक्षांत उतरविणारें जीवन म्हणजेच खरा धर्म. असल्या जीवनाची ओळख करून देणें हेंच धार्मिक शिक्षणाचें मर्म. खरा धर्म एखाद्या रुढ, आग्रही स्वरूपाच्या आचारांत सामावलेला नसतो, किंवा धर्ममंदिराच्या चार भिंतींतहि तो अडकून पडलेला नसतो. धर्म म्हणजे मूलभूत महत्त्वाची, सजीव भावना आहे, निष्ठा आहे.*

निर्गुण, निराकार परमात्म्याचें स्वरूप या दृष्टीने सत्य, शिव, सुंदर या मूल्यांचा अनुभव येणें केवळ महात्म्यांनाच शक्य आहे. सर्वसामान्य माणसाला या अव्यक्ताची उपासना कशी साधणार ? त्याला कांहीतरी मूर्त, प्रत्यक्ष लागतें व त्यावर तो श्रद्धा, विश्वास ठेऊं शकतो. तत्त्वज्ञान बुद्धिग्राह्य असतें; म्हणून तें सामान्यांच्या उपयोगी पडत नाही. धर्मांत भावनेच्या जोरावर त्या अतींद्रिय सत्तत्वाचें दर्शन घडतें. अशाश्वत व इंद्रियगोचर सृष्ट वस्तूंमध्ये, त्यांच्यामागे व त्यांच्या पलीकडे असलेल्या 'तत्त्वाचें' दर्शन धर्म घडवितो. तें तत्त्व सत्यस्वरूप आहे, पण त्याची अनुभूति मात्र घडावयाची असते; क्वचित्काळीं त्याचें आकलन होण्याची शक्यता असली तरी तें सदासर्वकाळ विद्यमान मात्र असतें. त्याची प्राप्ति म्हणजे उच्चतम नीतिसाफल्य.† म्हणून धर्म म्हणजे श्रद्धा ठेवण्याचा केवळ एक

---

* या संदर्भांत खालील अवतरण चिंतनीय आहे.

"In this era of world wars, in this atomic age, values have changed. We have learnt that we are the guests of existence, travellers between two stations. We must discover security within ourselves. During our short span of life we must find our own insights into our relationship with the existence in which we participate so briefly. Otherwise we cannot live ! This means, as I see it, a departure from the materialistic view of the nineteenth century. It means a reawakening of the spiritual world, of our inner life of religion. I don't mean religion as a dogma or a church, but as vital feeling."—Boris Pasternak. (quoted by Shri Daxindas in his आधुनिक शिक्षण सिद्धान्त—Page 232.)

† "Religion is the vision of something which stands beyond behind and within, the passing flux of immediate things, something which is real and yet waiting to be realised, something which is a remote possibility, and yet the greatest of present

( पुढे चालू )

पंथ असें नसून आमूलाग्र बदललेलें जीवन होय. भारतीयांचा धर्माकडे पाहण्याचा दृष्टिकोन विशिष्ट प्रकारचा आहे. मनुष्याच्या धर्माची कल्पना त्याच्या बुद्धिसामर्थ्यावरून येत नसून ती त्याच्या शीलावरुन व मन:प्रवृत्तीवरून येते. धर्माचें तांत्रिक ज्ञान झालें म्हणजे धर्मसाधना झाली असें नव्हे. म्हणून आपणांला औपचारिक, आचारप्रधान धर्माचें शिक्षण नको, तर आध्यात्मिक प्रशिक्षण हवें. हें शिक्षण कोणी देऊन मिळत नाही, तर तें स्वप्रयत्नाने, इच्छाशक्ति व सारासारविवेक यांच्या जोरावर प्राप्त करून घेतां येतें. आचारप्रधान, हटवादी धर्मांत विचारस्वातंत्र्य व चौकसपणा यांना अर्थातच प्रतिबंध केलेला असतो. उलट, अंधश्रद्धा व अंधानुकरण यांच्यामुळे मनुष्याची आध्यात्मिक उन्नति होणेंच शक्य नाही अशी भारताची शिकवण आहे. विश्वाचें सम्यक् ज्ञान प्राप्त करून घेणें हें जीविताचें अंतिम ध्येय आहे व तें साध्य करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे धर्म होय. धर्माच्या हटवादी स्वरूपाचा (dogmas) त्याग करून त्याचा चिकित्सक वृत्तीने अभ्यास केल्यावर धर्मस्वीकार केल्यास संघर्षच होणार नाही. परंपरागत रूढींची चिकित्सापूर्वक तपासणी करण्याचें व जरूर तर त्यांचा त्याग करण्याचें मनोधैर्य आपण दाखविलें पाहिजे. धडाक्याने व क्षणोक्षणीं बदलणाऱ्या जगांत कालबाह्य आचरणाच्या आधारावर जगण्याची आशा व्यर्थ आहे. खरा भारतीय दृष्टिकोन अशा तऱ्हेचा चिकित्सक, विशाल व सहिष्णु आहे.

## नैतिक व आध्यात्मिक मूल्यें म्हणजे काय ?

धर्म व नीति यांचें शिक्षण या शब्दप्रयोगाऐवजीं अलीकडे नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना करणें असा शब्दप्रयोग वापरला जातो. या शब्दांद्वारें आपणांस कोणत्या गोष्टी अभिप्रेत आहेत याची सुस्पष्ट कल्पना आपणांस हवी. ज्या मूल्यांमुळे मानवी वर्तन व जीवन सपन्न आणि सुसंस्कृत बनतें त्या मूल्यांनाच आध्यात्मिक व नैतिक मूल्यें म्हणतां येईल. नैतिक सुव्यवस्थेशिवाय कोणताहि समाज स्थिर व दृढमूल होऊं शकणार नाही. नैतिक व आध्यात्मिक मूल्यांशिवाय सामाजिक जीवनाला आधारच मिळणार नाही. समाजाची घडण जसजशी अधिकाधिक गुंतागुंतीची बनत जाते, समाजांतील घटकांच्या परस्पर सहकार्यावर जेव्हा सर्वांचें कल्याण अवलंबून असतें, तेव्हा तर सर्वसामान्य नैतिक तत्त्वांची

facts; something that gives meaning to all that passes, and yet eludes apprehension; something whose possession is the final good and yet is beyond all reach; something which is the ultimate ideal and the hopeless quest."—Page 267-68, 'Science and the Modern World'—by A. N. Whitehead.

आध्याधिक आवश्यकता भासते. व्यक्तिमत्वाची एकात्मता, प्रामाणिकपणा, आत्मसंयम इत्यादि नैतिक गुणांचा समाजघटकांमध्ये अभाव असेल, तर कितीहि सामाजिक परिवर्तनें घडवून आणलीं, शासनव्यवस्थेंत सुबुद्धपणाने केवढचाहि मोठचा सुधारणा केल्या किंवा उदात्त हेतूने कितीहि कायदे केले तरी चांगला व स्थिर समाज निर्माण करणें असंभव आहे.*

आपल्या विशिष्ट विचारप्रणालीच्या अनुरोधाने आपण शिक्षणाचीं उद्दिष्टें विविध प्रकारें निश्चित करतों. पण अशा सर्व उद्दिष्टांच्या बुडाशीं अभिप्रेत असलेलें सर्वसामान्य ध्येय म्हणजे नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना करणें हें होय. हीं मूल्यें शिक्षणाचीं स्फूर्तिस्थानेंच होत आणि त्यांच्या अभावीं शिक्षण ध्येयशून्य व दिशाविरहित ठरेल. उलटपक्षीं, तीं मूल्यें केवळ पुराणांतील वांगींच असतां उपयोगी नाहींत. मानवी वर्तनांत त्यांना प्रत्यक्ष स्थान न मिळाल्यास केवळ पोकळ शब्दजंजाळापलीकडे त्यांना कांहीच महत्त्व राहणार नाही.†

## नैतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना :—

खरें पाहिलें असतां अशा मूल्यांची जपणूक राष्ट्रीय पातळीवरून व्हावयास पाहिजे. विज्ञानयुगाने निर्माण केलेल्या सामाजिक समस्या, आर्थिक मंदी, महायुद्धें, तथाकथित सुसंस्कृत समाजांत अधूनमधून उसळणाऱ्या रानटी प्रवृत्ति, इत्यादि अनेकविध कारणांमुळे व्यक्ति व समाज यांच्या विचारांचा आणि कृतींचा सांचाच पार बदलून गेला आहे. महायुद्धाची झळ ज्या राष्ट्रांना प्रत्यक्षपणें लागली त्यांच्या नैतिक विश्वासाला व आचरणाला तर फारच मोठा धक्का बसला आहे. यंत्रयुगाने

* "No society can survive without a moral order. A system of moral and spiritual values is indispensable to group living....... No social invention however ingeneous, no improvments in government structure however prudent, no enactment of statutes and ordinances however lofty their aims; can produce a good and secure society, if personal integrity, honest and soft discipline are lacking."—Moral and spiritual values in the public schools. (Published by the Educational Policies Commission of N. E. A., U. S., USIS New Delhi.—Page 3–4. Chap I.)

† "The development of moral and spiritual values is basic to all other educational objectives. Education uninspired by moral and spiritual values is directionless. Value unapplied in human behaviour are empty."—Pages 6–7—Ibid.

कामाचे तास कमी करून रिकामा वेळ वाढविला आहे खरा, पण दूरदृष्टि, स्वतःच्या उत्कर्षाची तळमळ किंवा लोकसेवेची इच्छा यांच्या अभावीं हा 'फावला वेळ' योग्य तऱ्हेने न घालविला जाण्याचा धोका मात्र वाढला आहे. नव्या समाज-रचनेंत जुन्या एकत्र कुटुंबाची नवी रचना झाल्यामुळे व्यक्तींच्या वर्तनाचें नियमन करण्याचा त्याचा पूर्वीचा अधिकार आता इतिहासजमा झाला आहे. जाहिराती, सिनेमा-नाटकें, ललित व इतर साहित्य वगैरेमधून लैंगिक बाबींवर अवास्तव भर दिला जात असल्याने तरुणांवर त्यांचा विपरीत परिणाम घडून येत आहे. राष्ट्रगटांतील वैचारिक मतभेदांमुळे मानवी वर्तनाच्या निकषाबद्दलहि मतभेद निर्माण होतात व त्याचा परिणाम म्हणजे व्यक्तीच्या आंतरविश्वांतहि एकात्मता राहत नाही हा होय. सत्तापिपासेच्या पाशवी प्रवृत्तीला आळा घालणारी आंतरिक नैतिक जाणीव जर मनुष्यांत निर्माण होऊं शकली नाही, तर 'बळी तो कान पिळी' या रानटी, पाशवी अवस्थेपर्यंत जगाची पिछेहाट होईल. म्हणून मानवी स्वातंत्र्याची जपणूक हा नैतिक आणि आध्यात्मिक विकासाचा प्रश्न आहे व त्यासाठी नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांची कसोशीने जपणूक करणें अवश्य आहे हें सूक्ष्म विचारांतीं दिसून येईल.*

## नैतिक व आध्यात्मिक मूल्यें कोणतीं ?

वरील विवेचनांत नैतिक व आध्यात्मिक मूल्यें असा शब्दप्रयोग अनेक वेळां करण्यांत आला आहे. धर्म अथवा धार्मिक मूल्यें या शब्दांऐवजीं हा शब्दप्रयोग करण्याचीं कारणें उघड आहेत व त्याची चर्चा सुरुवातीस केलेलीच आहे. जर आपल्या राष्ट्राचें धर्मनिरपेक्षत्व आपण लक्षांत घेतलें तर अशा धोरणाला बाध न

* "In a sense the division in the world is also a division within each person. If there are not developed in men some inner moral restraints strong enough to control their impulses toward power and brutality, the alternative appears to be the rule of the strong over the weak, of the few over the many, of the despot over the subject. To be sure, the defence of freedom in the modern world has become in part a problem in military strength and strategy; in part a problem in diplomatic foresight and ingenuity; in part a problem in economic and industrial organization. But it is also, as in the last analysis it always has been, a problem in moral and spiritual development."—Page 11-12, Moral and Spiritual Values in the Public Schools.

येतां हीं मूल्यें कोणतीं असूं शकतील याचीहि निश्चित कल्पना आपणांस हवी. अमेरिकेच्या या बाबतींतील धोरणाशीं आपल्या राष्ट्राच्या धोरणाचें बरेंच साम्य असल्याने यासंबंधीं तिकडील विचारवंतांचीं मतें काय आहेत हें पाहणें मनोरंजक ठरेल. हीं मूल्यें निश्चित करण्याचे अनेक प्रयत्न तिकडील सरकारी व खाजगी संस्थांनी केलेले आहेत. 'सार्वजनिक शाळांतील नैतिक व आध्यात्मिक मूल्यें' (Moral Spiritual Values in Public Schools) या पुस्तकांत अशा कांही मूल्यांचें दिग्दर्शन तपशीलवार करण्यांत आलें आहे. तें आपणांसहि मार्गदर्शक ठरण्यासारखें असल्याने त्याचा सारांश खाली दिलेला आहे.

## मानवी व्यक्तिमत्वाची जोपासना :--

जीवनाचें व शिक्षणाचें अंतिम ध्येय आत्मज्ञान (self realisation) होय असें आदर्शवाद्यांचें सर्वमान्य मत आहे. कांटच्या मतानुसारहि मानवी व्यक्तित्वाची कदर करणें हें सर्वोच्च नैतिक मूल्य आहे. सामाजिक जीवनाशिवाय हें ध्येय साध्य होणें अशक्य आहे आणि म्हणून नैतिक आध्यात्मिक मूल्यांचें निरतिशय महत्त्व आहे. मानवी व्यक्तिमत्व विकसित होण्यासाठी मुलाला मानवी संस्कृतीचा वारसा उपलब्ध करून देणें व त्याचा जास्तींतजास्त प्रमाणांत शारीरिक, बौद्धिक, नैतिक व आध्यात्मिक विकास घडवून आणणें हें शिक्षणाचें महत्त्वाचें कार्य होय. इतर सर्व मूल्यांना हें मूल्य आधारभूत असल्याने त्याला अत्यधिक महत्त्व आहे.

## नैतिक जबाबदारीची जाणीव :--

आपल्या कृत्यांच्या परिणामाबद्दल आपण जबाबदार आहोंत अशी जाणीव निर्माण व्हावयास हवी. त्यासाठी आत्मसंयम, आत्मविश्वास इत्यादि गुणांची वाढ करणें हें शिक्षणाचें कार्य होय. शिक्षणाच्याद्वारें आणखी एक जाणीव विद्यार्थ्यांत निर्माण व्हावयास हवी. ती म्हणजे विविध प्रकारच्या सामाजिक संस्था मानवी हिताकरिताच आहेत ही होय समाजाने वेळोवेळीं निर्माण केलेल्या संस्था मनुष्याचें कल्याण व्हावें यासाठीच निर्माण केल्या आहेत; मनुष्याच्या सेवेसाठीच त्यांचें अस्तित्व आहे; मनुष्याने त्यांचा गुलाम बनूं नये. सामाजिक संस्थांचा कोणत्याहि परिवर्तनाला नेहमींच विरोध असतो. उलट, शिक्षणाचें कार्य प्रचलित गोष्टींचें मूल्यमापन करून जें अनुपयुक्त असेल त्याचा त्याग करणें व हितावह अशा नव्या गोष्टींची प्रतिष्ठापना करणें हें असतें. हें कार्य सक्तीने न करतां विचारांतीं खुषीने व्हावें; कारण सक्तीपेक्षा खुषीने दिलेली संमति हितकर असते. खुशीचें सहकार्य हेंच लोकशाहींतील मार्गदर्शक तत्त्व आहे. समाजाच्या नियमनाला जरूर महत्त्व

आहे; परंतु त्यासाठी बळी तो कान पिळी (survival of the fittest) हें तत्त्व उपयोगांत आणणें मात्र अयोग्य आहे.

## सत्यनिष्ठा :--

व्यक्तित्वाचा संपूर्ण विकास करण्याचें ध्येय मतस्वातंत्र्य व माहिती मिळविण्याचें स्वातंत्र्य असल्याखेरीज साध्य होणें असंभवनीय आहे. हुकुमशाही राष्ट्रांतून अशा तऱ्हेचें स्वातंत्र्य मिळूं शकत नाही. बौद्धिक स्वातंत्र्यावर बंधनें घातल्यास ढोंग व फसवणूक यांचें साम्राज्य सर्वत्र पसरेल. म्हणून बौद्धिक प्रामाणिकपणा व स्वातंत्र्य मुलांमध्ये वाढेल अशी कार्ययोजना शिक्षणानें केली पाहिजे.

## विभूतिमत्वाबद्दल आदर व नैतिक समता :--

व्यावहारिक व नैतिकदृष्टया सर्व मानव सारखे आहेत, परंतु नैसर्गिक व आनुवंशिकरीत्या प्राप्त झालेलें सर्वांचें सामर्थ्य सारखें असत नाही. विभूतिमत्व, (excellence) अलौकिकत्व हें परमेश्वरी अंशापासून निर्माण झालेलें असतें* व म्हणून सदैव आदरणीय असतें. जें जें अत्युत्तम असेल त्याच्या पूर्ण विकासास वाव देणें हें शिक्षणाचें कार्य आहे. नैतिक समतेच्या तत्त्वाशीं या मूल्याचा विरोध आहे असें मात्र नव्हे. सर्व माणसांच्या वर्तनाला एकाच प्रकारची नैतिक कसोटी लावली गेली पाहिजे. कुटुंब, वंश, राष्ट्र, धर्म, किंवा आर्थिक दर्जा यांच्यावर आधारलेले कोणतेहि भेदभाव सर्वथैव त्याज्य आहेत. शिक्षणाच्या द्वारें नैतिक समता व भ्रातृभाव या मूल्यांची जपणूक व्हावी.

## सुखाचा शोध व आध्यात्मिक विकास :--

सुखप्राप्तीची जास्तींत जास्त संधि प्रत्येक व्यक्तीला प्राप्त झाली पाहिजे; मात्र तें सुख इतरांना अविरोधी असावयास हवें. तसेंच सुख या शब्दाचा अर्थ संकुचित स्वरूपाचा नसावा. केवळ इंद्रियतृप्ति करणारीं सुखें येथे अभिप्रेत नाहीत. दूरदृष्टीने ठरविलेलें, दुसऱ्याविषयी आदर, प्रेम यांतून निर्माण झालेलें व स्वतःच्या उत्कर्षाच्या इच्छेवर पोसलेलें आत्यंतिक सुख येथे ग्राह्य आहे. ('सुखमात्यंतिकं यत्तद् बुद्धिग्राह्यमतींद्रियम्'–भ. गी.) भौतिकापलीकडील अतींद्रिय सुखाच्या प्राप्तीविना जीवनाला परिपूर्णता नाही. जड जीवनापलीकडील भावनिक व आध्यात्मिक अनुभवाची जोड प्रत्येकाला लाभली पाहिजे. त्याशिवाय व्यक्तिमत्वाचा

---

* यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेतोंऽशसंभवम् ॥ भ. गीता १०–४१

पूर्ण विकास झाला असें म्हणतां यावयाचें नाही. उपरोक्त नैतिक मूल्यें सामाजिक संबंधांतून उद्भवतात, पण आध्यात्मिक मूल्यें आंतरिक भावना व स्थिरभाव यांतूनच विकसित होतात. म्हणूनच या विकासासाठी धर्माचें शिक्षण व आचरण अवश्य ठरतें. *

## केवळ नीतिशिक्षण ?

नैतिक व आध्यात्मिक मूल्यांच्या वर केलेल्या विवेचनावरून नीति व धर्म या दोहोंच्याहि शिक्षणाची आवश्यकता व व्याप्ति लक्षांत येईल. पण धर्मविरोधी लोकांकडून असा युक्तिवाद वरचेवर केला जातो की व्यक्तींचें व समाजाचें योग्य नियमन व मार्गदर्शन नीतीच्या द्वारें होऊं शकतें. म्हणून धर्मासारखी विवाद्य बाब शिक्षणांत न आणतां केवळ नैतिक शिक्षणाचीच सोय करावी. थोडचा विचारांतीं आपणांस असें आढळून येईल की हा युक्तिवाद फसवा आहे. कारण धर्म व नीति या दोहोंत सूचित केला जातो तितका विरोध मुळीच नाही. किंबहुना धर्म व नीति या दोहोंची संपूर्ण फारकत करणें शक्यच नाही. व्यक्तीने समाजांतील इतर व्यक्तींशीं कसें वागावें हें सांगणारें शास्त्र म्हणजेच नीतिशास्त्र. धर्माचें एक अंग समाजाची धारणा हें आहे. (धारणात् धर्ममित्याहु:-महाभारत) त्या दृष्टीने हे नीतिनियम धर्मानेच घालून दिलेले आहेत असें म्हणतां येईल. नीतिनियम बुद्धिग्राह्य आहेत. ईश्वरनिष्ठेच्या जोरावर ते पाळणें सामान्यजनांना सुलभ जातें. सामाजिक धारणेचा सर्वोच्च बिंदु 'सर्व मानव हे ईश्वराचींच रूपें आहेत' या कल्पनेंत आपणांस आढळतो ("ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत्-"ईशावास्योपनिषद्). सर्व धर्मांची हीच शिकवण आहे व त्यानुसार आचरण म्हणजेच नीतिशास्त्राला अभिप्रेत असलेलें अंतिम जीवनसाफल्य. म्हणून नीतीला धर्माच्या तात्त्विक अभ्यासाची व शुद्ध आचरणाची जोड हवीच. "जर शिक्षणसंस्थांतील नीतिशिक्षण हें खरोखरच प्रभावी व्हावें अशी इच्छा असेल तर तें शिक्षण विशिष्ट धर्मांनी निर्माण केलेल्या तात्त्विक पार्श्वभूमीवर व्हावयाला पाहिजे."† धर्म व नीति यांच्या परस्परसंबंधाविषयी बर्नार्डशॉ सारखा बुद्धिवाद्यांचा मुकुट-

* "Moral values have consequences chiefly in social relationships. Spiritual Values, however, take effect mainly in terms of inner emotions and sentiments."—Page 29, Moral and Spiritual Values in Public Schools".

† डॉ० सी. डी. देशमुख यांचा रामकृष्णाश्रम, दिल्ली या संस्थेंत दिलेल्या भाषणांतील उतारा–नवभारत, जून १९६१.

क्रमांक ........................ दि: ........................ स्थळप



मणि व समाजवादाचा चिकित्सक पुरस्कर्ता काय म्हणतो तें पाहणें मनोरंजक ठरेल. त्याने म्हटलें आहे—"धर्मविरहित नीति म्हणजे मुळें नसलेला वृक्ष किंवा पाण्याचा संतत पुरवठा करील अशा तऱ्हेचा झरा नसलेला एखादा ओढाच होय. अशी नीति म्हणजे वाळूंत बांधलेलें घर! जोंवर अंतराळ काळचाकुट्ट अंधाराने व्याप्त झालेलें नाही किंवा वादळाचें भीषण थैमान सुरु झालेलें नाही तोंवरच राहण्यास योग्य असलेलें एखादें सुखद स्थान एवढीच धर्माचें अधिष्ठान नसलेल्या नीतीची योग्यता आहे."* "जिची उभारणी धर्माच्या पायावर झालेली नाही अशी खरीखुरी, त्रिकालाबाधित नीति असूंच शकत नाही.† उच्च नीतितत्त्वांना धर्माकडून स्फूर्ति व चैतन्य प्राप्त झालेलें नसेल तर नराचा नारायण बनूं पाहाणाऱ्या सजीव व परिपूर्ण बनलेल्या मनुष्याच्या दृष्टीने तीं तत्त्वें संगमरवरी पुतळ्याप्रमाणे निर्जीव किंवा प्रेताप्रमाणे निःसत्त्व व निःशब्द आहेत ‡.

तात्पर्य, केवळ नीतिशिक्षण निदान सध्यांच्या परिस्थितींत तरी पुरेसें पडणार नाही. "भूतकाळांत मानवतेने ज्या मूलभूत मूल्यांची जपणूक अत्यंत काळजीपूर्वक व प्राणपणाने केली तीं आध्यात्मिक मूल्यें आज आपण कायम राखूं शकूं काय हा आपणांपुढील अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. जीवनाचें सार असलेलें जें आध्यात्मिक तत्त्व आहे त्याची जपणूक व विकास यापुढे साधतां येईल की प्रचलित संघर्षांत त्याचा संपूर्ण अस्तच होईल हें त्या प्रश्नाचें स्वरूप आहे. समाजाची भौतिक प्रगति जरी अमाप झालेली असली तरी उपरोक्त आध्यात्मिकतेच्या अभावी समाजाच्या विघटनाची सध्या चालू असलेली प्रक्रिया कदाचित् तशीच पुढेहि चालू राहील."★ हा धोका आपले महामंत्री पं. नेहरू यांनी स्पष्टपणें दाखविलेला आहे. धार्मिक शिक्षण देणें या दृष्टीने विशेष आवश्यक ठरतें.

---

* "Morality without religion is a tree without roots; a stream without any spring to feed it; a house built on the sand; a pleasant place to live in till the heavens grow dark, and the storm begins to beat."—J. B. Shaw—Page 406—Dictionary of Thoughts.

† "There is no true and abiding morality that is not founded in religion"—H. W. Beecher, Page 406, Ibid.

‡ "The highest morality, if not inspired and vitalised by religion, is but as the marble statue, or the silent corpse, to the living and perfect man."—S. I. Prime,—Page 405;—Ibid.

★ "The question for us to consider is whether we can retain in this process some of the basic values to which humanity

(पुढे चालू)

धार्मिक शिक्षण देण्याच्या आवश्यकतेसंबंधीं मुदलियार आयोगाने (Secondary Education Commission) प्रगट केलेल्या मतांचा उल्लेख आतापर्यंतच्या विवेचनांत दोनतीन ठिकाणीं करण्यांत आलेला आहे. सदर आयोगाने सुचविलेल्या सुधारणांचा अधिक विचार व अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने निरनिराळ्या देशांतील शिक्षणतज्ज्ञांचें एक मंडळ नेमलें होतें. सदर मंडळाने मुदलियार आयोगाच्या धर्मशिक्षणविषक शिफारसींचा विचार करतांना मतभेद प्रगट करून त्यांना विरोध केला. आयोगाच्या शिफारसी भारतीय घटनेला विरोधी आहेत असा मंडळाचा अभिप्राय आहे.* यासंबंधींच्या घटनेंतील तरतुदींचा विचार आपण वर केलेलाच आहे व त्या धार्मिक शिक्षणाला विरोधी नसून व्यापक अर्थाने पोषक आहेत हेंहि आपण पाहिलेंच आहे. तथापि जरी कायदेशीररीत्या धार्मिक शिक्षण देणें घटनेच्या चौकटींत असंभाव्य आहे असें दिसून आलें, तरी आतापर्यंत केलेल्या वरील विवेचनावरून धर्म व नीतिशिक्षणाची आवश्यकता प्रतीत होईल व अशा परिस्थितींत कांहीतरी मार्ग काढण्याची जरूरी पटेल.

## शाळांतील प्रत्यक्ष कार्यक्रम :

वरील विवेचनानंतर असा प्रश्न निर्माण होतो की जरी त्याची तात्त्विक बैठक ठीक असली तरी प्रत्यक्ष शाळाकॉलेजांत धर्म व नीति यांचें शिक्षण द्यावयाचें म्हणजे काय शिकवावयाचें ? राधाकृष्णन् कमिशन व मुदलियार कमिशन यांनी आपापल्या अहवालांत हा कार्यक्रम स्थूलमानाने सूचित केलेला आहे. सरकारने मुद्दाम नेमलेल्या श्रीप्रकाश समितीने केलेल्या शिफारसी थोडक्यांत खालीलप्रमाणे आहेत :—

---

has attached great importance in the past, and whether the spiritual element in life, using the word in its widest sense, can be retained or augmented or will it fade away, without that spiritual element, probably the disintegration of society will proceed in spite of all material advance."—Pandit Jawaharlal Nehru in his convocation address at the University of Delhi.—Quoted in Appendix N of the proceedings of the 26th meeting of the C. A. B. E.

* "This recommendation appears to us to be in conflict with Part III—Fundamental Rights—Article 28, paragraph (3), of the constitution of India, which states that "No person attending......consert thereto."—Para 79. Teachers and Curricula in Secondary Schools—The Ford Foundation, New Delhi.

(१) शाळा सुरु होतांना आरंभीं सर्वांनी दोन मिनिटें स्तब्धता पाळावी व नंतर एखाद्या धार्मिक ग्रंथांतील उतारा वा एखादा उत्कृष्ट वाङमयीन उतारा वाचून दाखवावा, प्रसंगीं भाषणहि ठेवावें.

(२) आठवडयांतून एक तास नैतिक शिक्षणासाठी ठेवावा. योग्य वक्त्यांचीं भाषणें ठेवावींत. सर्व धर्मांचे प्रमुख सण एकत्र येऊन साजरे करावेत. दुसऱ्या धर्मासंबंधीं व त्यांच्या संस्थापकांसंबंधीं आदर वाढविण्यासाठी निबंध वगैरेंच्या स्पर्धा ठेवाव्यात.

(३) इतिहासाच्या अभ्यासक्रमांत जगांतील प्रमुख धर्मांची शिकवण अंतर्भूत करावी व भाषेच्या पाठयपुस्तकांत सोपे सोपे धार्मिक उतारे व गोष्टी अवश्य आणाव्यात.

(४) स्वकष्टाचें मोल, मानवजातीबद्दलचें प्रेम, स्वदेशभक्ति व स्वयंशिस्त या गोष्टींचो शिकवण देणारेच कार्यक्रम ठेवावेत.

(५) विद्यार्थ्यांचें चारित्र्य व त्यांची वागणूक यालाच शालेय जीवनांत मोलाचें स्थान मिळावें. *

मध्यवर्ति शिक्षण सल्लागार समितीने थोडयाफार फरकाने अशाच स्वरुपाच्या शिफारसी तिच्या एका अहवालांत नमूद केलेल्या आहेत :--

(१) सर्व प्रकारच्या शिक्षणसंस्थांतून प्रार्थना व ध्यानधारणा (meditation) सुरु करण्यांत यावी. हा उपक्रम वसतिगृहें व स्काऊट, गर्ल गाईड्स, एन्. सी. सी. इत्यादि संस्थांच्या कार्यक्रमांत अंतर्भूत करावा. (२) शिक्षणाच्या निरनिराळ्या पातळीप्रमाणे महान् ग्रंथांतील उतारे व धर्मग्रंथांतील वेचे अभ्यासासाठी नियुक्त करण्यांत यावेत. (३) ठरवून दिलेल्या धोरणानुसार नवीन वाङमयाची निर्मिती मुद्दाम करवून घ्यावी. (४) विविध धर्म व पंथ, नैतिक तत्त्वें व धर्मग्रंथ यांच्या अभ्यासाच्या दृष्टीने व्याख्यानें, इतर कार्यक्रम व समारोह वगैरेसाठी रिकाम्या वेळेचा सदुपयोग करण्यास विद्यार्थी व शिक्षकांना उत्तेजन देण्यांत यावें. (५) सध्या स्थूल व सूक्ष्म वाचनासाठी नेमलेल्या पुस्तकांतील नैतिक शिकवण अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने त्यांचो तपासणी करण्यांत यावी.†

---

* "धार्मिक शिक्षणाची आवश्यकता व त्याची दिशा"--ले. वि. उ. वैद्य–केसरी ता. २५–८–६१ व ५–९–६१.

† Appendix N, Memorandum on Item 15—Proceedings of the 26th Meeting of the Central Advisory Board of Education.

या कार्यक्रमाचा उपयोग शाळेंत अवश्य असें योग्य वातावरण निर्माण करण्यासाठी होईलच. पण एका अर्थी धार्मिक वा नैतिक शिक्षण ही कोणी कोणाला देण्याची बाब नव्हे असें म्हटलें जातें तें खरेंच आहे. कांही वर्षांपूर्वी नैतिक शिक्षणाचीं पुस्तकें ( Moral Text-books ) कांही संस्थांतून उपयोजिलीं जात होतीं, पण त्यामुळे मुलांच्या नैतिकतेंत परिणामकारक सुधारणा घडून आल्याचें ऐकिवांत नाही. सुधारणेला आवश्यक अशी पार्श्वभूमि जरूर तयार झाली असेल; परंतु अशा शिक्षणाचा प्रभावीपणा तें देणाऱ्या शिक्षकाच्या आदर्श वागणुकीवर अवलंबून असतो. शीलवान शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये असणें म्हणजे धार्मिक शिक्षण. अनेक ग्रंथ जे संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर करूं शकणार नाहीत, ते संस्कार त्या शिक्षकाचें चालणें, बोलणें, हंसणें, वागणें इत्यादि प्रत्येक क्रिया करूं शकेल. शिक्षकाच्या आदर्श वागणुकींतून नैसर्गिक रीतीनेच सहज जातां जातां हें शिक्षण मिळालें पाहिजे. चारित्र्यसंवर्धनाचा दुसरा प्रभावी मार्ग कोणता असणार ? धार्मिक शिक्षणाचा अभ्यासक्रम कोणता असावा, धार्मिक शिक्षणाचें वेळापत्रक कोणतें असावें व या विषयाच्या अध्यापनाची व्यवस्था काय या तीनहि प्रश्नांना आचार्य विनोबा भावे यांनी एकच उत्तर दिलें आहे. "सत्पुरुषांच्या संगतीनेच धर्मज्ञान लाभत असतें. म्हणून शीलवान शिक्षकांची योजना हीच माझी धर्मशिक्षणाची योजना आहे."* धर्मशिक्षणासाठी त्यांना मुद्दाम कृत्रिम वेळापत्रक आणि अभ्यासक्रम नको आहे. धर्मशिक्षण व शिक्षकाचा सहवास आणि आदर्श यांचें महत्त्व महात्मा गांधींनी एका ठिकाणीं अत्यंत स्पष्टपणें वर्णन केलें आहे. ते म्हणतात—"धर्माचा अर्थ सत्य आणि अहिंसा किंवा एक सत्यच मी मानतों. सत्यामध्ये अहिंसेचा अंतर्भाव होतोच. सत्यशोधनासाठी अहिंसा ही परमावश्यक आणि अपरिहार्य साधन आहे. म्हणून या गुणांचा जास्त जास्त आचार करण्याला जी वस्तु मदत करते, तेंच धार्मिक शिक्षण देण्याचें साधन समजावें, आणि माझ्या मतें, हें साधण्यासाठी शिक्षकांनी स्वतःच्या आचरणांत हे गुण आणण्याचा कसून प्रयत्न करावा. त्यांच्या सहवासानेच मुलांना या मूलभूत सद्‌गुणांचें सुंदर शिक्षण मिळेल. मग तो सहवास क्रिडांगणांवरील असो किंवा वर्गांतील असो."†

धार्मिक व नैतिक शिक्षण प्रभावी करण्यासाठी शिक्षकाच्या स्वतःच्या वागणुकीला एवढें महत्त्व देण्याचें कारण असें की मुलांवर प्रभाव पाडणाऱ्या इतर शक्तींचें नियमन आपण करूं शकत नाही. शिक्षकापेक्षाहि मुलाच्या घरांतील परिस्थिति अधिक प्रभावी म्हटली पाहिजे. तसेंच समाजाच्या ज्या थरांत मूल

---

* विनोबाजी आणि धार्मिक शिक्षण—ले. श्री. शं. सराफ-साधना दि. ८ सप्टेंबर १९६२.

† 'विनोबाजी आणि धार्मिक शिक्षण'—साधना, दि. ८-९-६२.

राहात असेल त्यांतील परिस्थितीसुद्धा तितकीच प्रभावी असते. कारण शाळेंत तें मूल जितका वेळ घालवितें, त्यापेक्षा कितीतरी अधिक वेळ तें घरांत व आजूबाजूच्या सामाजिक परिस्थितींत घालवीत असतें. परंतु पालकाचें सहकार्य नसेल तर या परिस्थितींत आपण इष्ट अशी कोणतीच सुधारणा करूं शकत नाही. म्हणून शालेय विश्वांत तरी आदर्श शिक्षक व उपरोक्त कार्यक्रम यांच्या आधारावर आपणांस मुलांवर योग्य ते संस्कार घडवितां येतील व त्यायोगें त्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावतां येईल.

❦ ❦ ❦

## संदर्भ ग्रंथांचीं नांवें


(1) Groundwork of Education Theory—Ross.

(2) A History of the Problems of Education—Brubacher.

(३) शिक्षणाचें तत्त्वज्ञान—बोकील.

(4) Education and Social Order—Russell.

(5) Report of the University Education Commission.

(6) Report of the Secondary Education Commission.

# प्राथमिक शिक्षण : ८ :

स्वातंत्र्योत्तर कालांत भारतापुढे असलेल्या अनेकविध शैक्षणिक समस्यांपैकी सर्वांत अधिक जटिल व प्रचंड समस्या म्हणजे प्राथमिक शिक्षण ही होय. राष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी सार्वत्रिक शिक्षणाची सोय असणें ही एक आवश्यक बाब आहे याबद्दल आता शिक्षणतज्ज्ञांमध्ये कोणत्याहि तऱ्हेचा मतभेद आढळून येत नाही. कारण राष्ट्राची खरी इभ्रत ही कांही बुद्धिवंतांच्या लौकिकापेक्षा सर्वसामान्यांच्या बौद्धिक विकासावर अवलंबून असते. सर्वांगीण प्रगतीसाठी नवभारताची पराकाष्ठेची धडपड चालू आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या नियोजनाच्या कालांत सामाजिक, आर्थिक, औद्योगिक व राजकीय कार्यक्रमांना खूप जोराची गति मिळाली आहे. तथापि प्राथमिक शिक्षणासारख्या अत्यंत अवघड व मोठ्या प्रश्नाबाबत केवळ राज्यकर्त्यांचा उत्साह किंवा भिन्नभिन्न योजनांची आखणी एवढ्यानेच काम भागत नाही. भारतांतील परिस्थिति तर फारच बिकट आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळांत तत्कालीन राज्यकर्त्यांनी प्राथमिक शिक्षणाबद्दल पराकोटीची अनास्था दर्शविली. इतर कोणत्याहि राष्ट्राला प्राथमिक शिक्षणाच्या प्रश्नाला इतक्या मोठ्या प्रमाणावर तोंड द्यावें लागलें नाही; पण भारताला मात्र परिस्थितीचें हें आव्हान वरील कारणामुळे अतिशय मोठ्या प्रमाणावर स्वीकारावें लागलें आहे. या प्रश्नाचें बिकट व प्रचंड स्वरूप आणि त्यांतील अडचणी यांची यथायोग्य कल्पना येण्यासाठी स्वातंत्र्यपूर्वकाळांत प्राथमिक शिक्षणाची वाटचाल कोणत्या प्रकारें झाली यावर थोडीशी ओझरती नजर टाकणें उपयुक्त ठरेल.

## पूर्वपीठिका :--

प्राचीन भारतांत सामान्यपणें प्राथमिक शिक्षणाची सोय सर्वत्र उपलब्ध होती असें दिसून येतें. समाजाची रचना गुंतागुंतीची नसल्यामुळे व खेडीं किंवा शहरें स्वयंपूर्ण असल्याने प्राथमिक शिक्षण पित्याकडून मुलामुलींना घरींच मिळत असे. यांत व्यावसायिक व जरूर तेवढें सांस्कृतिक शिक्षण यांचा अंतर्भाव असे. त्याकाळीं सांस्कृतिक शिक्षणाचें स्वरूप मुख्यत: धार्मिकच असे. निरनिराळ्या व्यवसायांत यंत्रांचा उपयोग केला जात नव्हता; सर्व कामें हातानेच करण्यांत येत असत. व्यावसायिक प्रक्रिया सुलभ, साध्यासुध्या असत व त्यांचें ज्ञान निरीक्षण व

अनुभवाच्या द्वारें वंशपरंपरेने मिळूं शकत होतें. पुढे जसजशी समाजाची वैज्ञानिक प्रगति होऊं लागली व शहरी संस्कृतीचा अधिकाधिक विकास झाला तसतशा या प्रक्रिया उत्तरोत्तर गुंतागुंतीच्या होत गेल्या. म्हणून समाजाने त्यांचें शिक्षण देणाऱ्या खास संस्था स्थापन करून तें कार्य विशेषज्ञांकडे सोपविलें. तथापि प्राचीन भारतांत व मोंगल अमदानींतहि सामान्य स्वरूपाचें प्राथमिक शिक्षण देणाऱ्या घरगुती व खास शिक्षणसंस्था खेडोंपाडीं सर्वत्र अस्तित्वांत होत्या हेंच इंग्रजी अमदानीच्या सुरुवातीस ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी व कांही मिशनऱ्यांनी केलेल्या पाहाणीवरूनहि दिसून येतें.

## इंग्रजी अंमलांतील प्राथमिक शिक्षण :--

इंग्रजी अमदानीच्या सुरुवातीस प्राथमिक शिक्षण देण्याबाबत विशेष हालचाल करण्यांत आली नाही. हें कार्य मिशनऱ्यांनीच चालू ठेवलें होतें. इंग्रज अधिकाऱ्यांचें लक्ष पाश्चात्त्य विद्येचा प्रसार इंग्रजी भाषेच्या द्वारें करण्याकडे असल्यामुळे देशी भाषांकडे व त्यांतून मिळणाऱ्या प्राथमिक शिक्षणाकडे त्यांचें संपूर्ण दुर्लक्ष झालें. एतद्देशीय शाळांचा राजाश्रय नाहीसा झाला व त्या हळूहळू नाहीशा झाल्या. इंग्रजी शिक्षणामुळे पैसा व राजमान्यता मिळत असल्याने समाजांतील वरचे वर्ग तिकडे वळले व सामान्य जनता मात्र प्राथमिक शिक्षणासहि मुकली. इ. स. १८३० पासून राजा राममोहन रॉय, जगन्नाथ शंकरशेट इत्यादि भारतीय नेत्यांनी सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला होता. ई. इं. कंपनीच्या डायरेक्टरांकडून येणाऱ्या बहुतेक सर्व खलित्यांत प्रथमिक शिक्षणाच्या प्रसाराबद्दल सूचना करण्यांत येत होत्या; परंतु त्या सर्व कागदावरच राहिल्या. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस लॉर्ड कर्झनच्या कारकीर्दींत नामदार गोपाळकृष्ण गोखल्यांसारख्या धुरंधर नेत्यांनी सार्वत्रिक व सक्तीचें शिक्षण उपलब्ध व्हावें म्हणून आटोकाट प्रयत्न केले. इ. स. १९१० मध्ये त्यांनी कायदेमंडळांत मांडलेल्या सक्तीच्या प्राथमिक ठरावांवर भाषण करतांना सन १८५४ पासून या प्रश्नाबाबत केलेल्या योजनांचा आढावा घेऊन त्यांनी सरकारी धोरणावर सडेतोड टीका केली. ते म्हणाले " ..(The Hunter Commission) found that there were about .. 25 lakhs of pupils in 1882 receiving elementary instruction. That means 1·2 per cent of the whole population of India at that time. ...Well that was in 1882. A quarter of a century has elapsed since then, and what do we find today ?...Thus in

the course of a quarter of a century the progress of primary education in this country is reprensented by an advance from 1·2 per cent to 1·9 per cent of the total populotion. My Lord, I venture to say that this is exceedingly slow and disappointing progress ." त्याच सुमारास इतर देशांत प्राथमिक शिक्षणाबाबत करण्यांत आलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी आंकडेवारीसह दिली होती. इ. स. १८७० ते १८८२ या बारा वर्षांच्या कालावधींत इंग्लंडमध्ये सक्तीच्या वयोमर्यादेंतील ४३·३ पासून १०० टक्क्यापर्यंत मुलें दाखल करून प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व मोफतहि करण्यांत आलें. १८७२ ते १९०० या मुदतींत जपानमध्ये साक्षरतेचें प्रमाण २८ टक्क्यांपासून ९० टक्क्यापर्यंत वाढविण्यांत आलें. इ. स. १८८० सालीं भारत व रशिया या राष्ट्रांत प्रा. शाळेंत दाखल झालेल्या मुलांची संख्या लोकसंख्येच्या १·२ टक्के होती. १९०६–०७ मध्ये मात्र हें प्रमाण अनुक्रमें १·९ व ४·५ टक्के होतें. फिलिपाइन्सनेहि हें प्रमाण १९०३ ते १९०८ या मुदतींत २ पासून ५ टक्क्यांवर नेलें होतें.* ना. गोखल्यांनी अतिशय खंबीरपणें केलेल्या मुद्देसूद टीकेचा उपयोग मात्र कांही झाला नाही व त्यांचें बिल कायदेमंडळाने फेटाळून लावलें. पुढे द्विदल-राज्यपद्धतीच्या कालखंडांत व १९३७ मध्ये कांग्रेस मंत्रिमंडळें अधिकारारूढ झाल्यावर कांही कायदे व विशेष योजना करण्यांत आल्या परंतु स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत खऱ्या अर्थाने प्राथमिक सार्वत्रिक शिक्षणाची व्यवस्था अस्तित्वांत होती असें म्हणतां येणार नाही. १५० वर्षांच्या ब्रिटिश राजवटीचा वारसा मोठा भयानक होता. बहुसंख्य जनता निरक्षर होती. कांही तुरळक प्रयत्न सोडले तर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची चर्चाच चालू होती. प्राथमिक शाळांची संख्या अत्यल्प होती. ज्या काळांत इंग्लंड, अमेरिका, रशिया, जपान इत्यादि देशांतील साक्षरतेचें प्रमाण १०० टक्क्यांजवळ पोंचलें होतें, त्यावेळीं तें आपल्या देशांत शेंकडा १२·२ (सन १९४१ च्या खानेसुमारीप्रमाणे) होतें. भारतांत ग्रामीण विभागांत एकूण लोकसंख्येपैकी शेंकडा ८० लोक राहतात. तरीहि शहरी विभागांत असलेल्या शाळांच्या संख्येपेक्षाहि कमी शाळा ग्रामीण विभागांत होत्या. तेथे दाखल झालेल्या मुलींची संख्या तर अगदीच नगण्य होती. प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम बराचसा पुस्तकी व जीवनाशी फारसा संबंध नसलेला असा होता. पुस्तकें आणि परीक्षा यांवरच सर्व लक्ष केन्द्रित करणाऱ्या शिक्षणपद्धतींचें प्राबल्य होतें. त्यामुळे व्यक्ति व स्वतंत्र राष्ट्राचा नागरिक या दृष्टीने मुलांचा कितपत विकास होत असेल याची

* अधिक माहितीसाठी पाहा : पान ३६३ ते ३६५—A History of Education in India—Naik-Nurullah.

कल्पनाच केलेली बरी !

अशा परिस्थितींत स्वतंत्र भारतानें परिस्थितीचें हें आव्हान मोठ्या जोमाने स्वीकारलें. भारतीय राज्यघटनेच्या शिल्पकारांनी घटनेच्या ४५ व्या कलमांत वयाच्या ६ ते १४ पर्यंतच्या मर्यादेंतील सर्व मुलांना सार्वत्रिक, मोफत व सक्तीचें शिक्षण घटना लागू करण्यांत आल्यापासून दहा वर्षांत देण्यांत यावें असा आदेश नमूद केला आहे. ("The state shall endeavour to provide free and compulsory education for all children upto the age of fourteen years within ten years from the date on which the Constitution comes into force"). स्वातंत्र्यपूर्वकाळीं तत्कालीन हिंदुस्थानसरकारने सर जॉन सार्जंट यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या युद्धोत्तर शिक्षणविषयक पुनर्रचनासमितीने सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची विस्तृत व तपशीलवार योजना आपल्या अहवालांत मांडली होती. सर्व हिंदुस्थानभर शंभर टक्के साक्षररेचा प्रसार होण्यासाठी किमान ४० वर्षांचा कालावधि लागेल असा अभिप्राय सार्जंट कमिटीने व्यक्तविला होता सार्जंटसाहेब हे ब्रिटिश सनदी नोकर असल्यामुळे व ब्रिटिशांच्या हेतूविषयी भारतीयांच्या मनांत त्या काळीं शंका असल्यामुळे सार्जंटसमितीच्या अहवालाने भारतीय नेत्यांचें व जनतेचें समाधान झालें नाही. म्हणून या प्रश्नाचा विचार करण्यासाठी स्वातंत्र्यप्राप्ती तर कै. ना. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमण्यांत आली. या समितीने प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी लागणारा कालावधि ४० वर्षांवरून १६ वर्षांवर आणला; तर राज्यघटनेने हें कार्य वर लिहिल्याप्रमाणे दहा वर्षांतच संपविण्याचा आदेश दिला. राज्यघटनेनुसार शिक्षण हा विषय राज्यसरकारांच्या अखत्यारींतील ठरला आहे. त्यामुळे घटनेच्या आदेशाची योग्य ती अंमलबजावणी राज्यसरकारें करीत असतील या कल्पनेंत केंद्रीयसरकार व शिक्षणखातें मश्गूल झालें होतें. १९५१–५६ या काळांत पहिली पंचवार्षिक योजना पूर्ण झाली. ती संपल्यानंतर परिस्थितीचा जो आढावा घेण्यांत आला त्यावरून संपलेल्या पांच वर्षांत प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीने जवळजवळ कांहीच प्रगति झालेली नाही असें दिसून आलें. एवढेंच नव्हे, तर या काळांत भारताच्या लोकसंख्येमध्ये लक्षावधि मुलांची अधिक भर पडल्यामुळे उपलब्ध आंकड्यांवरून प्रगतीचें कोणतेंहि चिन्ह दिसेना. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस केन्द्रीय शिक्षणसल्लागार मंडळाच्या वार्षिक सभेंत तत्कालीन शिक्षणमंत्री मौ. आझाद यांनी ६ ते १४ वर्षांच्या सर्व मुलांना सार्वत्रिक आणि मोफत सक्तीचें शिक्षण देण्याचें लक्ष्य दहा वर्षांतच काय, पण नजीकच्या भविष्यकालांतहि शक्य नसल्याचें स्पष्टपणें निवेदन केलें. यासंबंधांत त्यांनी एक नवीन

योजना मांडली. त्या योजनेनुसार तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत ६ ते १४ ऐवजीं ६ ते ११ वर्षांच्या सर्व मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण द्यावयाचें ठरलें. या निर्णयामुळे सर्वसाधारण जनतेला मोठाच धक्का बसला. ही प्रगति की परागति असा प्रश्न जो तो विचारूं लागला. तथापि ही योजना वास्तववादी स्वरूपाची होती; केवळ ध्येयवादावर आधारलेली नव्हती. फक्त सदिच्छा आणि ध्येयवाद यांच्या बळावर का असल्या प्रचंड योजना फलद्रुप होत असतात? प्रत्यक्ष परिस्थिति कितीहि कटु, खडतर आणि भयानक असली तरी ती विचारांत घेऊनच वास्तविक दृष्टिकोनांतून नवे नवे मार्ग शोधावे लागतात; नव्या योजना आंखाव्या लागतात. महात्मा गांधी म्हणत, "तुम्ही परमेश्वराला फसवूं शकाल. पण अंकगणिताला फसविणें मात्र कोणाला शक्य नाही." यांतील मर्म हेंच आहे, घटनेच्या आदेशानुसार प्रगति कां होऊं शकली नाही, त्यांत अडचणी कोणत्या आल्या, त्यावर आज कोणत्या उपाययोजना करण्यांत आल्या आहेत, आणखी कोणती खबरदारी घ्यावी लागेल इत्यादि बाबींचा सांगोपांग विचार करणें जरूर आहे. तत्पूर्वी सक्तीच्या व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा आग्रह तरी कां धरला जातो या प्रश्नाचा स्थूलमानाने विचार करणें आवश्यक आहे.

## सक्तीचें प्राथमिक शिक्षण :--

सुधारलेल्या सर्व आधुनिक राष्ट्रांत सक्तीचें सार्वत्रिक व मोफत शिक्षण ही राष्ट्राच्या प्रगतीसाठी एक आवश्यक बाब समजली जाते. अशा शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी शासनसंस्थेची आहे याबद्दलहि आता वाद राहिलेला नाही. राष्ट्राचे नागरिक ज्या प्रमाणांत सुशिक्षित--केवळ साक्षरच नव्हेत—असतील, त्या प्रमाणांत त्या राष्ट्राचा भौतिक उत्कर्ष घडून येतो. नागरिकांच्या सुसंस्कृततेवर राष्ट्राचा आर्थिक, सामाजिक व राजकीय अभ्युदय अवलंबून असतो. युनेस्कोमार्फत जगांतील विविध राष्ट्रांत करण्यांत आलेल्या पाहाणीवरून शिक्षणाचा दर्जा व प्रसार आणि आर्थिक विकास यांचा फार निकटचा संबंध आहे असें दिसून आलें आहे. राष्ट्रीय संपत्तींत जर जलदीने वाढ घडवून आणावयाशी असेल तर त्या राष्ट्रांतील शाळांची सुधारणा घडवून आणली पाहिजे. या सुधारणेंत अध्ययनशीलता आणि विद्वत्ता यांचा मोठ्या प्रमाणावर विकास घडविण्याच्या पद्धतशीर योजनेचा अंतर्भाव असला पाहिजे. शिवाय कोणत्याहि पात्रता असलेल्या मुलाला कोणत्याहि ज्ञानशाखेंतील उत्कृष्ट दर्जाचें शिक्षण मिळूं शकण्यासाठी शैक्षणिक समान संधीचें तत्त्व प्रत्यक्षांत उतरलें पाहिजे.*

* "No change would conduce so much to a rapid increase of

(पुढे चालू)

शैक्षणिक व आर्थिक प्रगति परस्परावलंबी आहेत असें म्हटल्यास वावगें होणार नाही. वरील विवेचनावरून शैक्षणिक प्रगतीवर राष्ट्राचा आर्थिक अभ्युदय अवलंबून असतो ही गोष्ट स्पष्ट होईलच. या उलट जसजसें जनतेच्या राहाणीचें मान सुधारत जाईल तसतशी शैक्षणिक क्षेत्रांतहि संख्या आणि गुणवत्ता या दोन्ही दृष्टीनें प्रगति होत जाईल. म्हणून आपल्या देशानें शैक्षणिक प्रगति ही देशाच्या एकूण सर्वांगीण प्रगतीचा एक अविभाज्य भाग समजून विविध योजनांची आंखणी केलेली आहे. इ. स. १९५१ पासून सुरु असलेल्या सामूहिक विकास योजनांतून प्राथमिक शिक्षण हा एक महत्त्वाचा कार्यक्रम मानण्यांत आला आहे व इतर विकास कार्यक्रमांशी सक्तीच्या शिक्षणयोजनेची सांगड घातली गेल्यामुळे तुलनेने अशा विकासखंडांत अधिक यश प्राप्त झाल्याचें दिसून आलें.

## प्राथमिक शिक्षणाचीं उद्दिष्टें :

शिवाय, प्राथमिक शिक्षणाचीं अर्वाचीन उद्दिष्टें लक्षांत घेतलीं तर राष्ट्रांतील सर्व स्त्री-पुरुषांना तें शिक्षण सक्तीने देणें कां अवश्य आहे तें लक्षांत येईल. प्राथमिक शिक्षणाची परंपरागत कल्पना साक्षरता--लेखन, वाचन, अंकगणित यापुरतीच मर्यादित होती. सार्वत्रिक साक्षरता ही राष्ट्राच्या विकासांतील पहिली गरज आहे यांत शंकाच नाही; पण आधुनिक जीवनांतील गुंतागुंतीच्या विविध प्रश्नांना यशस्वीपणें तोंड द्यावयाचें झाल्यास केवळ साक्षरता पुरेशी पडत नाही

---

material wealth as an improvement in our schools, and especially those of the middle grades, provided it be combined with an extensive system of scholarship which will enable the clever son of a working man to rise gradually from school to school, till he has the best technical and practical education which the age can give" (Alfred Marshal in his 'Principles of Economics'). The events all over the world since this statement have proved beyond doubt that this is the secret of all material progress. Anyone can show a practically perfect correlation between the ratio of literacy and economic development. It is now universally accepted that education has been the precursor of rapid and firm advancement of nations. The Unesco has conducted several surveys in all parts of the world and have reported remarkable rank order between the level of education and economic development."—Shri G. Chaurasia in his article 'Making the Millions Literate'.—The Education Quarterly Winter 1960.

हेंहि सर्वांच्या अनुभवाला आलें आहे. प्रगत अशा इंग्लंड, अमेरिका किंवा रशिया-सारख्या पाश्चात्य देशांचा दाखला या बाबतींत आपणांस फारसा उपयोगी पडणार नाही; कारण ते देश १०० टक्के साक्षरतेच्या जवळपास पोहोंचले आहेत त्यांच्या-पुढचा आजचा प्रश्न प्राथमिक शिक्षणाचा मगदूर किंवा दर्जा वाढविण्याचा आहे; संख्येचा नव्हे. आपला प्रश्न प्रथम शिक्षणप्रसाराचा व नंतर गुणवत्तेचा आहे. भारत सध्या शिक्षणावर दर माणशीं ६–६॥ रुपये म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नांतील २·३ टक्के खर्च करीत आहे. इंग्लंडमध्ये हा खर्च दर माणसामागे सुमारे २०० रुपये म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाच्या ४ टक्के आहे. अमेरिकेंत दर माणसीं २५० रु. व रशियांत ३०० रुपये शिक्षणावर खर्च पडतात. रशिया या बाबतींत आघाडीवर आहे. शिक्षणाला तेथे अग्रक्रम मिळाला आहे व राष्ट्रीय उत्पन्नाचा ७ ते ८ टक्के भाग शिक्षणासाठी खर्च पडतो. या आंकड्यांवरुन हीं राष्ट्रें शैक्षणिकदृष्टया किती प्रगत आहेत तें ध्यानीं येईल व पूर्वेकडील नवोदित मागासलेल्या राष्ट्रांना, विशेषतः भारताला केवढी मजल गाठावयाची आहे याची कल्पना येईल. यूनेस्कोच्या पाहाणीवरून निरनिराळ्या आशियायी राष्ट्रांत निरनिराळीं प्राथमिक शिक्षणाचीं उद्दिष्टें निश्चत करण्यांत आल्याचें दिसून आलें. हीं ठरविण्याचें त्यांचें मार्गहि अर्थातच भिन्न आहेत. तथापि साक्षरतेवर पूर्वी देण्यांत येत असलेला भर आता मुलाच्या व्यक्तिमत्वाच्या सुसंगत विकासावर देण्यांत येत आहे. राष्ट्रीय विकास घडविण्याच्या कार्यांत त्याला यशस्वीपणें भागीदार होतां यावें म्हणून त्याची तयारी करून घेण्याकडे अधिक लक्ष देण्यांत येत आहे. साधारणपणें प्राथमिक शिक्षणाकडून खालील अपेक्षा करण्यांत येतातः—

(१) विद्याप्राप्तीच्या लेखन, वाचन इत्यादि मूलभूत साधनांवर पुरेसें प्रभुत्व संपादन करणें;

(२) चांगल्या नागरित्वाची तयारी करून घेणें;

(३) राष्ट्राबद्दलच्या, राष्ट्राची संस्कृति आणि परंपरा यांविषयींच्या आदराची जोपासना करणें व राष्ट्राच्या सुधारणेसाठी कार्य करण्याची स्फूर्ति निर्माण करणें;

(४) योग्य अशा वैयक्तिक, सामाजिक व नैतिक गुणांची जोपासना करणें;

(५) सौंदर्य व कला यासंबंधीं आवड निर्माण करणें;

(६) आवश्यक कौशल्याचा ( skills ) विकास घडविणें व मुलाला स्वावलंबनाने उदरनिर्वाह करतां यावा म्हणून जरूर तें व्यवसायपूर्व शिक्षण देणें;

(७) मुलाच्या व्यक्तिमत्वाचा सामान्यपणें सर्वांगीण विकास घडवून आणणें व सामाजिक जीवनांत आणि राष्ट्राच्या पुनर्रचनेच्या कार्यांत परिणामकारकपणें भाग घेतां यावा यासाठी मुलाची आवश्यक ती तयारी करणें. *

प्राथमिक शिक्षणाच्या उद्दिष्टांमधे हा जो व्यापक बदल करण्यांत आला, त्याचा परिणाम प्राथमिक शिक्षणाचें स्वरूप व व्यवस्था यांवर होणें अपरिहार्य होतें. सक्तीचें शिक्षण, त्याची वयोमर्यादा, शिक्षकांचा दर्जा वगैरे बाबतींत महत्त्वाचे फेरबदल घडून आले आहेत. प्राथमिक शिक्षणाच्या सोयी प्रचंड प्रमाणावर उपलब्ध करून देणें व त्यासाठी शिक्षक, इमारती, साधनसामुग्री पुरेशा प्रमाणांत पुरविणें आवश्यक झालें. हें कार्य जास्तीतजास्त यशस्वी व्हावयाचें असेल तर जे शिक्षक नेमले जातात ते लायक, सुशिक्षित व विनीत असावयास हवेत. त्यांना पुरेसें वेतनहि मिळालें पाहिजे. अशा रीतीने प्राथमिक शिक्षणाचें कार्य अधिक खर्चाचें व गुंतागुंतीचें झालें आहे. समाजकल्याण योजनांपैकीं सर्वांत मोठी व जास्त खर्चाची हीच योजना आहे व ती जबाबदारी शासनसंस्थेची ठरली आहे. हें कार्य राष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व आर्थिक पुनर्रचनेसाठी पायाभूत महत्त्वाचें असल्याने त्यासाठी करण्यांत येणारी मेहनत व त्याग सर्वस्वी उचितच आहे.

## तृतीय पंचवार्षिक योजना :--

भारताच्या पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराचें कार्य किती प्रमाणांत झालें व तृतीय पंचवार्षिक योजनेंत या बाबतींत किती प्रगति अपेक्षित आहे याची कल्पना खालील कोष्टकावरून येईल.

| वर्ष | शाळेंत दाखल झालेलीं मुलें | | |
|---|---|---|---|
| | ६ ते ११ वय | ११ ते १४ वय | ६ ते १४ वय |
| १९५०-५१ | ४२·६ | १२·७ | २७·६ |
| १९५५-५६ | ५२·९ | १६·५ | ३४·७ |
| १९६०-६१ | ६१·१ | २२·८ | ४१·९ |
| १९६५-६६ (अपेक्षित) | ७६ ४ | २८·६ | ५२·५ |

* Indian Journal of Educational Administration and Research.

परिस्थितीची यथार्थ कल्पना देण्यास वरील आंकडे पुरेसे आहेत. घटनेने दिलेला दहा वर्षांचा कालावधि तर बाजूसच राहिला; पण खेर समितीने केलेला सोळा वर्षांचा अंदाजहि बरोबर ठरला नाही हें स्पष्ट आहे. सार्जंट समितीच्या अहवालानुसार भारतांत संपूर्ण साक्षरता निर्माण होण्यास ४० वर्षे तरी लागतील हें वरील आंकड्यांवरूनहि दिसतें. श्री. जे. पी. नाईकांसारख्या शिक्षणतज्ज्ञांच्या मतें इ. स. १९८५ पर्यंत जरी भारतांत १०० टक्के साक्षरता आढळून आली तरीहि प्रगतीचा वेग समाधानकारक म्हणावा लागेल. तृतीय पंचवार्षिक योजनेनुसार सन १९६५–६६ मध्ये ६ ते १४ वयाच्या एकूण मुलांपैकी फक्त ५२·५ टक्के मुलें शाळेंत येऊं शकतील. याचा अर्थ असा की ४७·५ टक्के मुलांच्या प्राथमिक शिक्षणाची सोय सन १९६६ अखेरहि होऊं शकणार नाही.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ६ ते ११ वयोमर्यादेंतील मुलांच्या शिक्षणाची खालील योजना पार पाडण्याचें ठरविण्यांत आलें आहे. (अ) प्रत्येक मुलाच्या राहण्याच्या ठिकाणापासून सहज चालत जाण्याइतक्या अंतरामध्ये प्राथमिक शाळेची सोय करणें. (आ) सन १९६०–६१ मध्ये इयत्ता १ ते ५ मधील मुलांची संख्या ३३०००००० होती, ती १९६५–६६ च्या अखेरीस सुमारे ५१०००००० करणें (६१ टक्क्यापासून ८१ टक्क्यांपर्यंत वाढविणें.) (इ) शिक्षणाची समानसंधि उपलब्ध करण्याच्या दृष्टीने मागासलेल्या राज्यांत ६ ते ११ वयांचीं शे. ९० मुलगे व शे. ५० मुली शाळेंत दाखल व्हाव्यात म्हणून त्या राज्यांत खास आर्थिक मदत देणें. (ई) मुलींच्या शिक्षणाचा विशेषतः ग्रामीण भागांत प्रसार करणें व त्यासाठी, त्या भागांत काम करूं शकणाऱ्या शिक्षिका तयार करणें. (उ) मागासलेल्या वर्गांच्या, विशेषतः आदिवासी जमातीच्या शिक्षणाचा प्रसार जास्तीत जास्त घडवून आणणें.

## प्राथमिक शाळांची स्थापना :—

प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक होण्यासाठी पुरेशा प्राथमिक शाळा स्थापन करणें अवश्य आहे. प्राथमिक शाळा सुरू करतांना केवळ शहरें व खेडीं यांची संख्या विचारांत घेऊन चालणार नाही. प्राथमिक शाळेंत दाखल होणारें मूल ६–७ वर्षांचें असणार. म्हणून कोणत्याहि मुलाला शाळेंत जाण्यासाठी एका मैलापेक्षा जास्त अंतर चालावें लागू नये, ही एखादी शाळा नव्याने स्थापन करतांना विचारांत घेण्याची आवश्यक कसोटी होय. कांही खेडीं व त्यांच्याखाली असणाऱ्या वाड्या यांमधील अंतर कित्येकदा २–३ मैलहि असतें. म्हणून खेडें हा घटक धरून शाळा स्थापन केल्यास प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक होणार नाही. प्रत्येक वस्तीला

(habitation) एक शाळा असणें अवश्य आहे. अशा शाळा किती काढाव्या लागतील हें निश्चित करण्यासाठी सन १९५६ ते १९५८ या मुदतींत अखिल भारतीय शैक्षणिक पाहाणी करण्यांत आली. त्यावरून असें दिसून आलें की देशभर नागरीविभागांत (५·५६ कोटी लोकसंख्या असलेल्या एकूण २८१२ शहरांत) प्राथमिक शिक्षणाच्या पुरेशा सोयी उपलब्ध आहेत. ग्रामीण विभागांत एकूण लोकसंख्येपैकी ८३ टक्के लोक राहतात. या विभागांत मात्र शिक्षणाच्या सोयी फार कमी आहेत. एकंदर वस्त्या (habitations) ८४००३३ असल्याचें पाहणीवरून आढळून आलें व त्यांच्यासाठी एकूण ३२३४६३ प्राथमिक शाळांची गरज असल्याचें दिसून आलें. यांपैकी १५०२१५ शाळा स्वतंत्र प्राथमिक शाळा व १७३२४८ शाळा केंद्र शाळा म्हणून काढण्याचें ठरलें. या दोहोंच्या द्वारें ९६·७६ टक्के वस्त्यांच्या शिक्षणाची सोय होऊं शकेल. पाहाणीच्या वेळीं म्हणजे ३१ माच १९५७ रोजीं अस्तित्वांत असलेल्या शाळांची संख्या २२७१३५ होती. याचा अर्थ ९६३२८ नव्या शाळा काढाव्या लागणार. यांपैकी कांही द्वितीय पंचवार्षिक योजनेंत काढण्यांत आल्या. तिसऱ्या योजनेंत उरलेल्या सुमारे ७० हजार शाळा नवीन काढाव्या लागतील.

इतक्या शाळा काढल्यावरहि ३६·५ लक्ष लोकसंख्या असलेल्या कांही वस्त्यांना कोणतीहि प्राथमिक शिक्षणाची सोय उपलब्ध होऊं शकणार नाही. या वस्त्या बहुतकरून आदिवासी विभागांत, देशाच्या दूरच्या कानाकोंपऱ्यांत आहेत. अशा प्रदेशांत तीन प्रकाराने शैक्षणिक सोयी उपलब्ध करतां येतील. (१) फिरत्या शिक्षकाच्या शाळा (२) वसतिगृहयुक्त केन्द्र शाळा (३) परिवहनाची (transport) सोय असलेल्या केन्द्र शाळा. यांपैकी पहिल्या प्रकारच्याच (Peripatetic Teacher Schools) शाळा सर्वत्र काढणें शक्य आहे असें वरील पाहाणींत गृहीत धरण्यांत आलें व त्यानुसार या विभागासाठी ६९६० फिरत्या शिक्षकाच्या शाळा नवीन काढाव्या लागतील असें दिसून आलें. तात्पर्य या शाळांसकट एकूण १०३२८८ नवीन शाळा तृतीय पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत काढाव्या लागतील (यांत पश्चिम बंगाल व अंदमान, निकोबार वगैरे बेटें यांचा समावेश नाही). या सर्व नवीन शाळा योजनेच्या पहिल्या दोन वर्षांच्या कालावधींतच काढण्याचें ठरविण्यांत आलें होतें.

भारतातील पुढारलेल्या राज्यांच्या तुलनेने इतर कांही मागासलेल्या राज्यांत अजून पुष्कळच कार्य करावें लागणार आहे. नवीन उघडावयाच्या १०३२८८ शाळांपैकी पुढील सहा मागासलेल्या राज्यांतच त्यांपैकी ७३ टक्के शाळा उघडाव्या लागणार आहेत: बिहार—१०९१०; जम्मू-काश्मीर—९४१; मध्यप्रदेश—

१४९८४; ओरिसा ६३३८; राज्यस्थान--८८४०; व उत्तरप्रदेश--३३४६९. अर्थातच केन्द्र सरकारकडून या राज्यांत खास आर्थिक मदत मिळाल्याशिवाय हें कार्य पूर्ण होणें कठीणच आहे.

## प्राथमिक शाळांचे प्रकार :--

वर केन्द्र शाळा, फिरत्या शिक्षकाच्या शाळा, पूर्ण प्राथमिक शाळा इत्यादि प्रकारांचा उल्लेख करण्यांत आला आहे. प्राथमिक शिक्षणाची सार्वत्रिक सोय उपलब्ध करण्यासाठी प्रत्येक खेडयांत शाळा असणें जरूर आहे; परंतु कांही खेडीं किंवा वाडया इतक्या लहान असतात की, एका शाळेपुरतीच काय, पण एका वर्गाला पुरेशी मुलांची संख्याहि तेथे मिळूं शकत नाही. साधारणपणें एका शिक्षकाला ४० मुलें हें प्रमाण सर्वमान्य आहे. तें आदर्श नसलें तरी प्रचलित परिस्थितीचा विचार करतां योग्यच आहे. खेडयांतील लोकसंख्या जर ३०० पेक्षाहि कमी असेल तर तेथे शाळेंत जाण्याच्या वयाचीं मुलें एकूण ४० असणेंहि शक्य असत नाहीं. अशा ठिकाणीं जर इयत्ता १ ते ४ मध्ये शिकणारीं एकूण सर्व मुलें ३० ते ४५ असलीं तर त्या ठिकाणच्या शाळेसाठी एकच शिक्षक नेमून सर्व वर्ग त्याच्याच ताब्यांत देण्यांत येतात. अशा एकशिक्षकी शाळांचा प्रश्न मोठा बिकट आहे.* एकाच शिक्षकाला एकाण खोलींत सर्व वर्गांचीं मुलें बसवून शिकवावें लागतें. एका वर्गाला शिकवीत असतां दुसऱ्या वर्गांना लेखी किंवा अन्य कांही कामांत गुंतविणें; वरच्या वर्गांतील मुलांकडून खालच्या वर्गांतील मुलांना मार्गदर्शन करविणें, परवचा म्हणून घेणें किंवा वाचन वगैरे करवून घेणें इत्यादि गोष्टी मोठ्या कौशल्याने करून घ्याव्या लागतात. अशा एकशिक्षकी शाळेवर शक्यतों अनुभवी आणि विनीत शिक्षकाची योजना व्हावी हें सर्वांत उत्तम. परंतु बहुधा इतक्या लहान खेडयांत विनीत शिक्षक नेमणें शक्य होत नाही व असे शिक्षक त्या ठिकाणीं काम करण्यास नाखूषहि असतात. कांही असलें तरी एकशिक्षकी शाळांशिवाय आपणांस लहानलहान खेडयांत तरणोपाय नाही. अमेरिकेसारख्या संपन्न देशांतहि अशा शाळा आहेतच. म्हणून कामसू व विनीत शिक्षक नेमणें हाच या शाळा यशस्वी करण्याचा मार्ग आहे.

## केन्द्रशाळा ( Group Schools ) :--

ज्या खेडयांतून एकशिक्षकी शाळेपुरतीं मुलेंहि मिळत नाहीत अशा खेडयांसाठी केन्द्रशाळा स्थापन करण्यांत येतात. सामान्यपणें १ ते १।। मैलाच्या

* अधिक माहितीसाठी पाहा : एक शिक्षकी शाळा ले. श्री. जे. पी. नाईक.

परिसरांत असलेल्या दोनतीन लहान वाड्या (hamlets) किंवा वस्त्यांमध्यें (habitations) एखाद्या मध्यवर्ति ठिकाणीं शाळेची इमारत बांधण्यांत येते. त्यामुळे त्यापैकीं कोणत्याहि खेड्यांतील मुलाला शाळेंत हजर राहाण्यासाठी एक मैलापेक्षा जास्त चालावें लागत नाही. आदिवासींच्या डोंगराळ विभागांत किंवा कोंकणपट्टींतील विरळ वस्तींत अशा शाळांची जरूरी भासते. या शाळा जास्त अंतरावरील मुलांसाठी असतील तर त्या वसतिगृहयुक्त असणें विशेषतः चांगलें. आदिवासी जनतेला शिक्षणाबद्दल आकर्षण निर्माण होण्यासाठी मोफत वसति-गृहांची सोय करणें अवश्य आहे. इग्लंड-अमेरिकेंत मुलांना लांब अंतरावरील शाळेंत नेण्यासाठी मोटारींची (school buses) सोय केलेली असते. त्यामुळें मुलांना घरीं राहून व मधल्या वेळचें जेवण बरोबर घेऊन दूरच्या शाळेंत हजर राहतां येतें. पुढारलेल्या सर्व पाश्चात्य देशांत मुलांना शाळेमार्फत मधल्या वेळचें खाणें देण्यांत येतें व तें इष्टच आहे. वसतिगृहयुक्त शाळांपेक्षा परिवहनाची (transports) सोय कमी खर्चाची ठरण्याचा संभव आहे. तथापि वसतिगृहत राहण्याचे फायदे फार महत्त्वाचे असल्यामुळे शक्य तेथे तशी सोय करणेंच उचित होईल.

## फिरत्या शिक्षकाच्या शाळा (Peripatetic Teacher Schools)

वरील प्रकारच्या केन्द्रशाळाहि नैसर्गिक व इतर अडचणींमुळे सर्वत्र काढतां येत नाहीत. तेथे तिसऱ्या प्रकारच्या म्हणजे फिरत्या शिक्षकाच्या शाळा सुरू करण्यांत येतात. ज्या खेड्यांत किंवा वाड्यांमधून मुलांची संख्या केवळ १०–१५च आहे अशा नजीक वसलेल्या दोन खेड्यांत एकच शिक्षक नेमला जातो. अशा दोन खेड्यांतील अंतर सामान्यतः पांच मैलांपेक्षा जास्त नसतें. दोन गावांत अंतर जरी कमी असलें तरी पहाड, ओढा किंवा नदी, जंगल इत्यादि नैसर्गिक अडचणी-मुळे लहान मुलें इकडून तिकडे जाऊं शकत नाहीत. म्हणून शिक्षकच आळीपाळीनें दोन्ही गावांत जातो. खेडीं अगदी जवळ म्हणजे एकदोन मैलांच्या अंतरावर असलीं तर एका गावांत सकाळीं व दुसऱ्या गावांत त्याच दिवशीं दुपारीं अशी अर्ध वेळ शाळा भरविण्यांत येते. अंतर दोन ते पांच मैल असल्यास शाळा आळीपाळीने एक दिवस एका गावांत व दुसऱ्या दिवशीं दुसऱ्या गावांत किंवा २॥ सलग दिवस (सोमवार ते बुधवार सकाळीं आणि गुरूवार ते शनवारी सकाळीं) प्रत्येक खेड्यांत भरविण्यांत येतें. उत्साही व तळमळीने काम करणारा विनीत शिक्षक त्या खेड्यांतील लोकांचें सक्रिय सहकार्य व योग्य प्रकारची शिक्षणाधिकाऱ्याची देखरेख या गोष्टी असल्यास ही योजना शाळा अर्धवेळाची असूनहि यशस्वी होते असा अनुभव आहे. पण बहुधा विनीत अनुभवी शिक्षक अशा कोपऱ्यांतील

शाळेंत जाण्यास नाखुष असतात. त्यामुळे बहुतकरून नव्या अननुभवी शिक्षकाची अशा शाळेवर नेमणूक होते. त्याला कामांत रस वाटत नसल्यामुळे व अनुभव नसल्याने त्याच्याकडून अपेक्षित कार्य होत नाही.

## पूर्ण प्राथमिक शाळा :--

मोठ्या खेडेगावांत इयत्ता १ ते ७ अखेर शिक्षणाची सोय एकाच शाळेंत असते. अशा शाळांना पूर्ण प्राथमिक शाळा म्हणण्याचा प्रघात आहे. या शाळेचे दोन विभाग समजले जातात. इ. १ ते ४ पर्यंत प्राथमिक विभाग व इ. ५ ते ७ अखेर उच्च प्राथमिक विभाग समजतात. मध्यम लोकवस्तीच्या खेडेगावांत बहुधा १ ते ४ पर्यंतचे वर्ग असलेल्या प्राथमिक शाळाच आढळतात. यापुढील शिक्षणासाठी मुलांना इतरत्र जवळपासच्या मोठ्या गावांत जावें लागतें.

या प्रकाराशिवाय आणखी एक प्रकार म्हणजे मूलोद्योगी शाळांचा होय. शिकविण्यांत येणारा अभ्यासक्रम व पद्धति यांच्या भिन्नत्वावर हा प्रकारभेद अवलंबून आहे. त्यासंबंधी सविस्तर चर्चा पुढे स्वतंत्र प्रकरणांत केलेली आहे.

## प्राथमिक शाळेंतील मुलांची संख्या :--

तृतीय पंचवार्षिक योजनेंतील दुसरें महत्त्वाचें उद्दिष्ट म्हणजे इ. १ ते ४ मधील मुलांची संख्या ६–११ वयोमर्यादेंतील एकूण मुलांच्या ६१ टक्क्यांवरून ८१ टक्क्यांपर्यंत वाढविणें हें होय. या हिशोबाने योजनेच्या पांच वर्षांत एकूण सुमारें १८० लक्ष मुलें ( ८० लक्ष मुलगे व एक कोटि मुली ) शाळेंत दाखल व्हावयास हवींत. याचा अर्थ दरवर्षी सरासरीने ३६ लाख मुलांची नवीन भरती शाळांतून व्हावयास पाहिजे. प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराला स्वातंत्र्यानंतर जोराची गति मिळूनहि दोन पंचवार्षिक योजनांनंतर अपेक्षित प्रगति झालेली दिसत नाही. पहिल्या योजनेंत दर वर्षी १२ लक्ष व दुसऱ्या योजनेंत दर वर्षी १७ लक्ष याप्रमाणे एकूण जादा भरती १ कोटि ४५ लक्ष मुलांचीच होऊं शकली. दहा वर्षांच्या या प्रगतीच्या मानाने १८० लक्ष मुलांच्या जादा भरतीचें तृतीय पंचवार्षिक योजनेंतील लक्ष्य थोडेंफार महत्त्वाकांक्षी व म्हणूनच शिकस्तीच्या प्रयत्नाला आवाहन करणारें आहे.

---

* या प्रश्नाबाबत सांगोपांग चर्चा ५ व्या प्रकरणांत केलेलीच आहे. पृ. ९१ ते ११६

## मुलींच्या शिक्षणाचा बिकट प्रश्न :--*

वरील उद्दिष्ट पार पाडण्याचें कार्य अतिशयच कठीण आहे. त्यांतहि नवीन दाखल करावयाच्या १८० लक्ष मुलांपैकीं १ कोटी मुलीच आहेत ही गोष्ट विशेष लक्षांत घेतली पाहिजे. हें साध्य पूर्ण करण्यासाठी दर वर्षी किमान २०-२१ लक्ष मुली शाळेंत भरती झाल्या पाहिजेत हा सरळ हिशोब आहे. गेल्या कित्येक शतकानंतर मुलींच्या शिक्षणाला सर्वांत अनुकूल परिस्थिति सन १९५० पासून पुढेच निर्माण झाली. तथापि पहिल्या पंचवार्षिक योजनेंत मुलींची संख्या दरसाल ४॥ लक्ष व दुसरींत दरसाल ७ लक्ष यापेक्षा अधिक वाढू शकली नाही. यावरून दरसाल २० लक्ष मुली दाखल करण्याचें लक्ष्य किती कठिण आहे हें लक्षांत येईल. या कार्याचा कठिणपणा खालील आंकड्यांवरून स्पष्ट होईल :--

| | | |
|---|---|---|
| ६ ते ११ वयाच्या एकूण मुली १९६५-६६ मधील अपेक्षित संख्या- | -- | ३०५·७६ लक्ष |
| १९६०-६१ पर्यंत भरती झालेल्या मुलींची ( अंदाजें ) संख्या- | -- | १११·९५६ लक्ष |
| ६ ते ११ वयाच्या मुलींपैकीं शाळेंत न जाणाऱ्या मुली | -- | १९३·८०४ लक्ष |
| १९६५-६६ पर्यंत शाळेंत दाखल करावयाच्या मुलींचें शे. प्रमाण (लक्ष्य)- | -- | ७२·% |
| या लक्ष्यानुसार १९६५-६६ अखेर भरती होणाऱ्या मुलींची अपेक्षित संख्या- | -- | २२१·०२४ लक्ष |
| म्हणून १९६१ ते १९६६ या मुदतींत नवीन दाखल करावयाच्या मुलींची संख्या- | -- | १०९·३२८ लक्ष |
| तरीहि १९६६ नंतर ६ ते ११ वयाच्या पण शाळेंत न जांणाऱ्या मुलींची संख्या- | -- | ८४ ७३६ लक्ष |

हे आंकडे * बोलके आहेत व गेल्या दहा वर्षांतील अनुभवावरून याबाबत थातुरमातुर उपायांनी काम भागणार नाही हेंहि स्पष्ट आहे. सामाजिक व आर्थिक कारणांमुळे मुली शाळेंत दाखल होऊं शकत नाहीत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत शाळेंत नवीन दाखल झालेल्या मुलींची संख्या सुमारें १ कोटी १२ लक्ष

* तपशीलवार आंकडेवारीसाठी पाहा : Indian Journal of Education Administration and Research—Summer 1960.

होती, तर त्याच मुदतींत सव्वादोन कोटींपेक्षांहि जास्त मुलगे शाळेंत भरती झाले. मुलामुलींच्या शिक्षणांत ही प्रचंड तफावत कां पडते याचा विचार करणें जरूर आहे. ग्रामीण जनतेला मुलींच्या शिक्षणाची आवश्यकता पटविणें व सहशिक्षणाबाबत अनुकूल मतपरिवर्तन घडविणें ही प्राथमिक महत्त्वाची गोष्ट आहे. यासाठी राज्यांतून खास शासनयंत्रणा निर्माण केली पाहिजे. ग्रामीण विभागांत शिक्षिका म्हणून स्त्रियांचीच नेमणूक झाली तरच कांही पुढचें पाऊल पडल्याचें दिसून येईल. यासाठी शिक्षिकांची खेड्यांतून राहण्याची सोय करणें, त्यांना खेडेगाव-भत्ता देणें, प्रौढ स्त्रियांना शिक्षिका होण्यासाठी खास व थोड्या मुदतीचें प्रशिक्षण देणें इत्यादि विशेष उपायांचा अवलंब करण्यांत आला पाहिजे. तसेंच, गरजू मुलींना कपडे, पुस्तकें व इतर शैक्षणिक साधनें मोफत पुरविणेंहि अवश्य आहे. तात्पर्य, एक खास महत्त्वाचा प्रश्न म्हणून याची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला तरच प्राथमिक शिक्षणाची एकूण योजना यशस्वी होण्याचा संभव आहे. स्त्रीशिक्षणाबद्दल नेमलेल्या राष्ट्रीय समितीने म्हटल्याप्रमाणें तिसऱ्या व चवथ्या पंचवार्षिक योजनेंतील प्राथमिक शिक्षणाच्या विस्ताराचा प्रश्न म्हणजे खरें पाहिले असता मुख्यतः मुलींच्या शिक्षणाच्या प्रसाराचाच प्रश्न होय.*

## मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणाची गंभीर समस्या :--

मुलींच्या शिक्षणाप्रमाणेच मागासलेल्या वर्गांच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रश्नहि फार महत्त्वाचा व बिकट आहे. भारतीय घटनेच्या ४६ व्या कलमानुसार या वर्गांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक प्रगतींतील अडचणींचें निराकरण करून त्यांचा विकास घडवून आणण्याची एक खास जबाबदारी शासनसंस्थेवर सोपविण्यांत आली आहे. या वर्गांत प्राथमिक शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार घडवून आणणें हें अर्थातच वरील जबाबदारीस अनुसरून मूलभूत महत्त्वाचें कार्य ठरतें. या वर्गांची लोकसंख्या व तिचें भारताच्या एकूण लोकसंख्येशीं असलेलें शेंकडा प्रमाण इ. स. १९५१ च्या खानेसुमारीस अनुसरुन खालीलप्रमाणे असल्याचें दिसून येतें :--

| | लक्ष | शें. प्रमाण |
|---|---|---|
| १. वर्गीकृत जाति ( Scheduled Castes )- | ५५२ | १४·४ |
| २. वर्गीकृत जमाती ( Scheduled Tribes )- | १९१ | ५·३ |

* अधिक माहितीसाठी पाहा : Report of the National Committee on Women's Education.

३. अनुसूचित जमाती (Denotified Communities)- ४० १·१

४. इतर मागासलेले वर्ग ( Other backward Classes )-

(भिन्नभिन्न राज्यांत भिन्नभिन्न आधारावर वर्गीकरण करण्यांत आलें असल्याने नक्की आंकडे उपलब्ध नाहींत.)

सामान्यपणें असें म्हणतां येईल की इतर मागासलेले वर्ग सोडून दिल्यास एकूण लोकसंख्येच्या २१ टक्के जनता मागासलेल्या वर्गांत मोडते आणि एवढ्या मोठ्या लोकसंख्या–विभागांत बहुसंख्य जनता संपूर्णपणें निरक्षर आहे. इतके लोक प्राथमिक शिक्षणापासून वंचित असतां प्राथमिक शिक्षणाची कोणतीहि योजना यशस्वी झाली असें म्हणतां यावयाचें नाही. म्हणून मागासलेल्या वर्गांचें प्राथमिक शिक्षण हा खास विचाराचा व शिकस्तीच्या प्रयत्नाचा प्रश्न म्हणून हाताळला जाणें अवश्य आहे. या वर्गांना समाजांतील तथाकथित वरचे वर्ग अस्पृश्य समजत असत व यामुळेच त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. पण हरिजन सेवकसंघ, भिल्ल सेवा मंडळ, आदिवासी सेवा मंडळ इत्यादि सामाजिक संस्थांनी आणि म. फुले, म. गांधी, डॉ० आंबेडकर, ठक्करबाप्पा इत्यादि नेत्यांनी व समाजसुधारकांनी केलेल्या अविश्रांत परिश्रमामुळे सध्या परिस्थिति खूपच पालटलेली आहे. याचें कांही श्रेय अनुकूल सरकारी धोरणालाहि आहे. गेल्या ३०–४० वर्षांत मुंबई राज्यांतील प्राथमिक शाळांतून दाखल झालेल्या मागासलेल्या वर्गांतील मुलांच्या संख्येकडे पाहिल्यास ही गोष्ट स्पष्ट होईल :—

| सन | मागासलेल्या वर्गांतील दाखल मुलें. |
|---|---|
| १९२१–२२ | ५३९५६ |
| १९३१–३२ | १२७९३६ |
| १९४१–४२ | २३१३२२ |
| १९५१–५२ | ७०८०२९ |
| १९५४–५५ | ७५१११७ |

वरील आंकड्यांवरून जी प्रगति दिसून येते तिचें प्रमुख कारण म्हणजे सरकारने या मुलांसाठी चालविलेल्या वसतिगृहांची सोय हें होय. अशीं वसतिगृहें १९३६–३७ सालीं मुंबई राज्यांत १७ होतीं. सरकारने खाजगी संस्थांनाहि यासाठी पुरेशीं अनुदानें दिल्यामुळे १९५४–५५ अखेर अशा वसतिगृहांची संख्या २३४ झाली. १९३६ ते १९५५ या मुदतींत सरकारी अनुदानाची रकम ९०१६ रु. वरून १२२५९५६ वर गेली. यामुळे मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणाला खूप

जोराची चालना मिलाली. त्याशिवाय भारतीय घटनेंत सर्वांना समान संधि उपलब्ध करून देण्याचें आश्वासन देण्यांत आलें. त्यास अनुसरून या मागासलेल्या वर्गांचा मागासलेपणा शक्यतितक्या लवकर नाहीसा व्हावा यासाठी घटना अंमलांत आल्यापासून प्रारंभीचीं दहा वर्षें त्यांना अनेक जादा सवलती व राखीव अधिकार देण्यांत आले. ही दहा वर्षांची मुदतहि नंतर वाढविण्यांत आली आहे. या सर्व प्रयत्नांचा इष्ट असा परिणाम दिसून येत आहे.

वर्गीकृत जातींच्या शिक्षणाच्या बाबतींत इ. स. १९३७ पासून पुढे खूप प्रगति झालेली आहे. अस्पृश्यतेबद्दलचा दुराग्रह जवळजवळ नाहीसा झाल्यामुळे तृतीय पंचवार्षिक योजनेंत या जातींतील मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न फारसा भेडसावणारा राहिलेला नाही. 'इतर मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणाचा प्रश्नहि जादा सवलती, शिष्यवृत्त्या, वसतिगृहाच्या सोयी इत्यादींमुळे विशेष अडचणींचा राहिलेला नाही. वर्गीकृत जातींच्या ( Scheduled Castes ) शिक्षणाबाबत तृतीय पंचवार्षिक योजनेंत खालील गोष्टींवर भर देण्यांत येत आहे:—

१) खास हरिजनांकरिता म्हणून चालविण्यांत येत असलेल्या स्वतंत्र शाळा बंद करणें;

२) अस्पृश्यतेचें संपूर्ण निर्मूलन करणें आणि वर्गीकृत जातींच्या मुलांन कोणत्याहि प्राथमिक शाळेंत अनिर्बंध प्रवेश देणें;

३) पुस्तकें, शैक्षणिक साधनसामुग्री इत्यादींसाठी आर्थिक अनुदान देणें; अत्यंत गरीब मुलांच्या कपडयांची व मधल्या वेळच्या जेवण्याचीहि व्यवस्था करणें

सध्या सर्व राज्यांतून प्राथमिक शिक्षकांच्या उपलब्ध जागांपैकीं कांही जाग. ठराविक प्रमाणांत मागासलेल्या वर्गांपैकी उमेदवारांसाठी राखून ठेवण्यांत येतात व त्यांची नेमणूक सर्वसामान्य शाळांवर करण्यांत येते. अस्पृश्यतेच्या उच्चाटनाच्या दृष्टीने या उपक्रमाचा बराच फायदा होतो.

वर्गीकृत जातींतील मुलांच्या शिक्षणाच्या प्रश्नापेक्षा वर्गीकृत जमातींतील ( Scheduled Tribes ) मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न अधिक अवघड आहे. यांत खालील अडचणींना तोंड द्यावें लागते :—

१) हे लोक बहुधा जंगलांत किंवा डोंगराळ विभागांत राहात असल्याने नागरी जीवनाचा अनुभव घेतलेले सुशिक्षित लोक प्राथमिक शिक्षक म्हणून तेथे जाऊन काम करण्यास तयार असत नाहीत.

२) या वर्गांपैकीं कांही जमाती भटक्या आहेत आणि त्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक सोयी उपलब्ध करणें जवळजवळ अशक्यच असतें.

३) या क्षेत्रांत शिक्षकांची कमतरता हीच खरी महत्त्वाची अडचण आहे. शिकलेल्या गिरिजनांना इतरत्र भरपूर संधि व व्यावसायिक क्षेत्र उपलब्ध होत असल्यामुळे आपल्या वस्तींत प्राथमिक शिक्षक म्हणून काम करण्यास त्यांचीहि तयारी नसते. इतर जातींच्या सुशिक्षित लोकांचा उल्लेख वर केलाच आहे. यांना त्या विशिष्ट जमातीची भाषा अवगत असत नाही ही आणखी एक विशेष अडचण असते. या विभागांत काम करण्यासाठी शिक्षिका उपलब्ध होणें ही तर असंभाव्य गोष्ट आहे. परिणामतः गिरिजनांच्या मुली व शिक्षण या दोन गोष्टी एकत्र असूंच शकत नाहीत.

४) प्राथमिक शिक्षण मातृभाषेंतून देण्यांत यावें हें तत्त्व सर्वमान्य झालेलें आहे. परंतु गिरीजनांच्या भाषांपैकीं बहुसंख्य भाषांना स्वतःची लीपि नाही; त्यामुळे पाठ्यपुस्तकें किंवा वाङमयहि नाही. म्हणून त्या भाषांचा शैक्षणिक माध्यम म्हणून उपयोग होऊं शकत नाही. अर्थातच त्या जमातींतील मुलांची या बाबतींत मोठीच कुचंबणा होते. स्वतंत्र लीपि आणि पाठ्यपुस्तकें उपलब्ध करण्याचे प्रयत्न चालू आहेत. लहान क्षेत्र, आजवरची उपेक्षा आणि देशांतील एकूण शैक्षणिक मागासलेपणा यामुळे या बाबतींत अपेक्षित यश पदरांत पडलेलें नाही.

५) सार्वत्रिक अज्ञान आणि पराकोटीचें दारिद्र्य यांमुळे शिक्षणक्षेत्रांत स्थानिक जनतेचें सहकार्य मुळीच मिळत नाही. याचा परिणाम म्हणजे शिक्षणाबाबतच्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी सरकारवरच पडते आणि तरीहि यशाचें प्रमाण बेताचेंच असतें.

६) या जमातींतून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी फार मोठ्या प्रमाणावर पाठ्यपुस्तकें, शैक्षणिक साधनसामुग्री, कपडेलत्ते, मधल्या वेळचें जेवण इत्यादींची व्यवस्था करण्यांत आली पाहिजे. या सोयींचा पुरेपूर फायदा व्हावा म्हणून देखरेख ठेवण्यासाठी जरूर ती शासनयंत्रणाहि हवी.

७) आदिवासी जमातींतील जनमत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणयोजनेला अद्यापि तितकेंसें अनुकूल नाही. म्हणून तृतीय पंचवार्षिक योजनेंत आदिवासी विभागांत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा लागूं करूं नये अशी शिफारस वर्गीकृत जाती-जमातींच्या आयुक्तांनी ( Commissions ) केली आहे. या विभागांत जबरदस्तीऐवजीं मन वळविण्यावर भर दिला पाहिजे हें उघड आहे.

वरील महितीवरून आदिवासी व डोंगराळ भागांतील जनतेंत प्राथमिक शिक्षणाचा प्रसार करणें केवढें दुर्घट कार्य आहे हें लक्षांत येईलच. त्यांच्या दारिद्र्याचा आणि अंधश्रद्धेचा फायदा घेऊन कांही परकी धर्मप्रचारकांनी सामाजिक व राजकीयदृष्टचा या अगोदरच अवघड असलेल्या प्रश्नाची गुंतागुंत अधिकच वाढविली आहे. तात्पर्य, त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व त्यांच्या आर्थिक स्थितीची सुधारणा या गोष्टी एकदमच झाल्या पाहिजेत. तरच यशाचा संभव आहे. म्हणून या तत्त्वास अनुसरून या विभागांतील योजनांची दिशा ठरविली पाहिजे. कांही ठिकाणीं चालू असलेल्या "आश्रमशाळांचा" उल्लेख येथे करणें जरूर आहे. बऱ्याच दिवसांपासून चालू असलेली ही योजना अधिकाधिक विस्तृत करण्यांत यावी. आश्रमशाळांचें स्वरूप वर उल्लेखिलेल्या वसतिगृहयुक्त केंद्रशाळांप्रमाणेच आहे. अशा प्रकारच्या शाळांमधूनच आदिवासी जनतेला स्वतःची गाऱ्हाणीं दूर करून घेण्यासाठी व प्रगति साधण्यासाठी स्वतःमधूनच नवें नेतृत्व लाभेल. शिवाय, या जंगलातून विस्कळितपणें राहणाऱ्या लोकांच्या आणि भटक्या जमातींच्या शेक्षणिक गरजा त्या शाळांतून प्रभावीपणें पुरविल्या जातील.

मागासलेल्या वर्गांपैकी आता विचारांत घ्यावयाचा तिसरा वर्ग म्हणजे अनुसूचित जमातींचा ( Denotified Communities ) होय. अशा लोकांची संख्या फार लहान आहे; पण त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न मात्र फारच अवघड आहे. कारण, या जमाती भटक्या आहेत. आत्यंतिक दारिद्र्य किंवा स्थिर स्वरूपाच्या उद्योगधंद्याचा अभाव यांमुळे बहुतकरून त्यांची प्रकृति गुन्हे करण्याकडे असल्याचें आढळून येते. गुन्हेगार जमाती म्हणूनच त्या ओळखल्या जातात. त्यांच्या या प्रवृत्तीमुळे समाज त्यांना शक्य तितकें दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो व यामुळे त्यांची गुन्हेगारी कमी होण्याची शक्यता नसते. म्हणून त्यांच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांच्या पुनर्वसनाच्या मोठया सामाजिक व आर्थिक प्रश्नाशीं निगडित आहे. त्यांना शांततामय व स्थिर जीवन प्राप्त करून देण्यासाठी त्यांच्या वसाहती स्थापन करणें व त्यांना कामधंदा उपलब्ध करून देऊन समाजाचे उपयुक्त घटक बनविणें हाच त्यांचा शैक्षणिक प्रश्न सोडविण्याचा खरा उपाय आहे.

## सक्तीच्या शिक्षणांतील इतर अडचणी:--

सक्तीच्या सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाची योजना फलद्रूप होण्यासाठी ज्या उपायांची योजना आणि अडचणींचें निराकरण होणें जरूर आहे, त्यांपैकीं प्राथमिक शाळांची सोय, मुलांची संख्या वाढविण्याचा प्रश्न, मुलींचें तसेंच मागासलेल्या वर्गांच्या मुलांचें शिक्षण इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींचा परामर्श आतापर्यंत घेतला

आहे. या कार्याच्या विस्तृत आणि अवघड स्वरूपाची, कल्पना त्यावरून येईलच. एवढयां प्रचंड कार्यासाठी पैशाची सोयहि मोठ्या प्रमाणावर केल्याशिवाय तरणोपाय नाही. ख्यातनाम शिक्षण तज्ज्ञ श्री. जे. पी. नाईक म्हणतात त्याप्रमाणे आपल्या देशांत प्राथमिक शिक्षण घेण्याऱ्या मुलांची संख्या खूप आहे आणि त्या मानानें आपणांजवळ पैसा मात्र फारच कमी आहे. आज आपल्या देशांत प्राथमिक शिक्षणावर जो पैसा खर्च होतो त्याचें प्रमाण दर मुलामागे सुमारे ३० रु. आहे. या पैशांपैकी सुमारे ८५ टक्के रकम शिक्षकांच्या पगारावरच खर्च होते. उरलेल्या शें. १५ रकमेंतून शिक्षकांचें प्रशिक्षण, साधनसामुग्री, इमारती, शाळातपासणी इत्यादि खर्च केला जातो. यामुळे शिक्षणाचा मगदूर किंवा गुणवत्ता यावर प्रतिकूल परिणाम होणें अपरिहार्य आहे. प्रत्येक व्यक्तीमागे ४० रु. या प्रमाणांत देशानें शिक्षणावर खर्च केल्यास योग्य, निदान आवश्यक एवढी शैक्षणिक प्रगति होऊं शकेल. आपल्या देशांत शिक्षणाला अग्रक्रम तर राहोच, पण महत्त्वाचा क्रमांकहि मिळालेला नाही. उद्योगधंदे, शेती, विद्युत्, लष्कर इत्यादि बाबींना राष्ट्राच्या अभ्युत्थानांत अतिशय महत्त्व मिळणें अपरिहार्य आहे. सध्या भारतांत शिक्षणावर सुमारे ३०० कोटी रुपये खर्च करण्यांत येतात. आपली शैक्षणिक प्रगति समाधानकारक होण्यासाठी हा खर्च वार्षिक १३०० कोटी रुपयांपर्यंत वाढावा अशी अपेक्षा आहे. एवढा वार्षिक खर्च शिक्षणावर करण्याची क्षमत आपल्या राष्ट्राला प्राप्त होण्यासाठी आपलें राष्ट्रीय उत्पन्न सध्याच्या १४००० कोटी रुपयांवरून ३४००० कोटी रुपयांवर गेलें पाहिजे व त्यासाठी आपल्या विकासाचा सध्याचा वेग कायम राहिला तर १९७५ तरी उजाडेल असा तज्ज्ञांचा कयास आहे. तात्पर्य, प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक होण्याचा भारताचा प्रश्न त्याच्या आर्थिक प्रगतीशीं निगडित आहे. योजनाबद्ध सर्वांगीण विकास → जनतेचें जीवनमान व राहाणीचा दर्जा सुधारणें → शैक्षणिक प्रगति → सुखी आणि समृद्ध जीवन अशी ही वाटचाल सुरूं आहे.

परंतु सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या यशस्वितेसाठी पुरेसा पैसा ही एक आवश्यक बाब असली तरी आणखीहि दोनतीन गोष्टी त्यासाठी जरूर आहेत. ग्रामीण जनतेंत याबाबत पुरेशी जागृति व उत्साह निर्माण झाला पाहिजे. लोकांच्या सहकार्यानें मुलींच्या व मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणासाठी खास प्रयत्न झाले पाहिजेत. केवळ सरकारी योजना आणि सक्तीच्या शिक्षणाचे कायदे यांमुळे हें कार्य होणार नाही. सामाजिक क्रांति घडविण्याच्या योजना केवळ कायद्याच्या दंडुक्यावर केव्हाच यशस्वी होत नाहीत. जनतेचें पुरेसें व हार्दिक सहकार्य लाभेल तरच वर दिलेले अवाढव्य संकल्प पार पाडणें शक्य होईल. या दृष्टीने समाज-शिक्षणाचें कार्य प्राथमिकशिक्षणाला पूरकच आहे. सुशिक्षित व साक्षर प्रौढांनाच

शिक्षणाचें महत्त्व पुरेपूर पटेल. म्हणून प्राथमिक शिक्षणाबरोबरच समाजशिक्षणाचें कार्यहि जोमाने व्हावयास हवें.

प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारांत येणाऱ्या बाह्य अडचणी कोणत्या आहेत याचें दिग्दर्शन वर झालेंच आहे. ज्या अंगभूत दोषांमुळे आपण याबाबत इष्ट प्रगति करूं शकत नाही त्यांचा थोडक्यांत विचार करणें आता क्रमप्राप्त आहे.

## प्राथमिक शिक्षणांतील गळती व गतिरोध :--

कोणत्याहि देशांतील शिक्षणपद्धतींत गळती ( Wastage ) आणि गतिरोध (Stagnation) हे दोष असणें हें अपरिहार्य आहे. प्रगत देशांतून या दोषांमुळे होणाऱ्या पैसा व श्रम यांच्या राष्ट्रीय हानीचें प्रमाण अत्यल्प असतें. याउलट भारतासारख्या मागासलेल्या, पण विकसनशील देशांत अशा हानीचें प्रमाण खूपच आढळून येतें. यामुळे एक विशेष चमत्कारिक परिस्थिति निर्माण होते. अशा देशांत शैक्षणिक विकासासाठी उपलब्ध असलेला पैसा अत्यंत मर्यादित असतो व या हानीमुळे तेवढ्या पैशाचा अपेक्षित मोबदलाहि पदरांत पडत नाही. म्हणून अशा विकसनशील राष्ट्रांच्या शैक्षणिक नियोजनांतील महत्त्वाचें एक अंग म्हणजे वरील दोषामुळे होणाऱ्या राष्ट्रीय अपव्ययाचें प्रमाण व कारणें शोधून काढणें व त्यांच्या आधारें उपलब्ध पैशाचा जास्तींत जास्त उपयोग शिक्षणाची सुधारणा व विस्तार यांसाठी करणें हें होय.

## गळती व गतिरोध म्हणजे काय ?

शाळेचा किमान अपेक्षित अभ्यासक्रम पूर्ण न करता मध्यंतरींच शाळा सोडणें व परीक्षेंतील अपयश हीं वर उल्लेखिलेल्या राष्ट्रीय हानीचीं दोन प्रमुख स्वरूपें आहेत. शाळाकॉलेजांतून मुलांचें शिक्षण पूर्ण होण्यापूर्वींच कित्येकांना शिक्षण सोडणें भाग पडतें. समाज व शासनसंस्था शाळांतून आणि महाविद्यालयांतून शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी कांही प्रमाणांत खर्च करीत असतात. केवळ फीच्या उत्पन्नामधून कांही शिक्षणसंस्थांचा सर्व खर्च भागत नाही. शिक्षण मध्येच सोडण्यामुळे त्या विद्यार्थ्यांवर राष्ट्राने केलेला खर्च अशा रीतीने व्यर्थ जातो. मुदतीपूर्वीं शिक्षण सोडल्यामुळे होणाऱ्या या हानीला गळती (Wastage) असें म्हटलें जातें. शिक्षणाच्या सर्वच अवस्थांमधून ही गळती आढळून येते व ती त्या अवस्थेच्या प्रमुख उद्दिष्टांशीं संबंधित असते. उदाहरणार्थ, प्राथमिक शिक्षणाचें

* याबद्दलची थोडीशी चर्चा निराळ्या संदर्भांत अन्यत्र केलेली आहे.

प्रमुख उद्दिष्ट चार किंवा पांच वर्षांच्या शालेय शिक्षणानंतर टिकाऊ साक्षरता प्राप्त करून देणें हें असतें. म्हणून प्रा. शिक्षणांत इयत्ता ४ थी पर्यंतचा अभ्यासक्रम पूर्ण न करतां एखाद्या विद्यार्थ्यानें शाळा सोडली तर होणारी हानि गळतीमुळे झाली असें मानण्यांत येतें.

एखाद्या विद्यार्थ्याची प्रगति असमाधानकारक असल्यामुळे त्याला त्याच वर्गांत एका वर्षापेक्षा जास्त काल राहावें लागणें म्हणजे गतिरोध असें समजतात. गळतीप्रमाणे याहि कारणांमुळे राष्ट्रीय संपत्तीचा अपव्यय होत असतो. यालाच इंग्रजींत stagnation किंवा retardation असें म्हणतात.

गळती व गतिरोध या दोन्ही कारणांमुळे होणारी हानि प्राथमिकशिक्षणाच्या क्षेत्रांत फार मोठ्या प्रमाणावर झालेली आढळून येते. भारतांत इ. स. १९२८ मध्ये प्रथमत: सर फिलिप हार्टॉग यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने या प्रश्नाचा उहापोह करून त्याकडे लक्ष वेधलें. गळतीमुळे होणारी हानि मोजण्याची सनातन पद्धति म्हणजे एका वर्षी १ ल्या इयत्तेंत भरती झालेल्या विद्यार्थ्यांची एकूण संख्या व चार वर्षांनंतर त्यांपैकीं इ. ४ थीमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या यांची तुलना करून त्यावरून शेंकडा प्रमाण काढणें ही होय. इ. १ लींतील प्रत्येक विद्यार्थी चार वर्षांनंतर इ. ४ थी ची परीक्षा उत्तीर्ण होईल असें गृहीत धरून ही आंकडेवारी काढली जाते हें उघड आहे.

याबाबतची इ. १ ते ४ मधील विद्यार्थ्यांची भारतांतील आंकडेवारी सन १९४९–५० पासून उपलब्ध आहे. या वर्षी सुमारें ६९ लक्ष मुलें १ ल्या वर्गांत दाखल केलेलीं होतीं. इ. स. १९५३–५४ मध्ये यांपैकीं सुमारे २२४०००० मुलें पांचवींत दाखल झाली. म्हणजे गळतीच्या हानीचें प्रमाण शें. ६७ ७५ होतें. अशाच पद्धतीने मुलामुलींच्या गळतीचे प्रमाण त्यापुढील वर्षांत कसें होतें तें खालील कोष्टकावरून दिसून येईल.

| वर्ष | मुलगे | मुली | एकूण शें. प्रमाण |
|---|---|---|---|
| १९५३-५४ | ६३·९४ | ७५·६२ | ६७·७५ |
| १९५४–५५ | ६३·२६ | ७४·८७ | ६६·९१ |
| १९५५–५६ | ६२·०६ | ७३·८६ | ६५·७९ |
| १९५६–५७ | ६१·७७ | ७२·०० | ६४·३७ |

या आकडयांवरून खालील दोन गोष्टी प्रामुख्याने दिसून येतात. (१) मुलांच्या तुलनेने मुलींच्या गळतीचें प्रमाण अधिक आहे. मुली घरकामांत जास्त उपयोगी पडतात, ग्रामीण विभागांत मुलींचीं लग्नें लवकर होतात व सहशिक्षणाबाबत सर्वसाधारणतः प्रतिकूल जनमत इत्यादि कारणांमुळे त्यांना शाळेंतून लवकर काढण्यांत येतें. (२) मुलांच्या व मुलींच्या गळतीचें प्रमाण सालोसाल कमी होत आहे; तथापि कमी होण्याचा वेग मात्र फारच मंद आहे.

या पद्धतीने केलेल्या पाहाणीवरून राष्ट्रीय हानीचा अंदाज ठोकळमानाने मिळतो ही गोष्ट खरी असली तरी गळतीचें प्रमाण काढण्याचीही शास्त्रोक्त पद्धति नव्हे.* वरील आंकडयांवरून दिसून येणारी हानि केवळ गळतीमुळेच झालेली नसून त्यांत गतिरोधजन्य हानीहि अंतर्भूत आहे. शिवाय, या आकडेवारींत मुलांचें मृत्यु किंवा स्थलांतर यांमुळे होणारी घट विचारांत घेतलेली नाही. मधली इयत्ता गाळून वरच्या वर्गांत दाखल होणारीं मुलेहि विचारांत घेतलीं जात नाहींत. १ ल्या इयत्तेंत दरवर्षी सर्व मुलें नवीनच येतात असेंहि एक गृहीत कृत्य मानलें जातें. तात्पर्य, ही पद्धति सदोष आहे आणि तिच्या आधारावर गळती-गतिरोधाची मीमांसा करणेंहि दुर्घट आहे. यासाठी कांही निवडक ठिकाणीं मर्यादित क्षेत्रांत सर्वंकष व शास्त्रपूत पाहाणी करून तज्ज्ञांकडून मिळालेल्या माहितीची छाननी करण्यांत आली. सातारा, पुणें, अहमदाबाद, बडोदें, मुंबई इत्यादि ठिकाणीं केलेल्या संशोधनावरून जे निष्कर्ष काढण्यांत आले त्यांचा सारांश पुढीलप्रमाणे आहे :--

गळतीचें सर्वांत महत्त्वाचें व प्रमुख कारण म्हणजे दारिद्र्य हें होय. शाळा सोडणाऱ्यांपैकीं शें. ६५ मुलें या कारणामुळे शाळा सोडतात. एकतर त्यांना कुटुंबासाठी अर्थार्जन करणें अवश्य असतें किंवा पालकांना त्यांच्या शिक्षणासाठी होणारा अल्प खर्चहि परवडत नाही. प्राथमिक शिक्षण सध्या मोफत असूनहि अर्थार्जन करण्याच्या आवश्यकतेमुळे मुलांना शाळा सोडणें भाग पडतें. त्यानंतरचें महत्त्वाचें दुसरें कारण म्हणजे सदोष शिक्षणपद्धति हें होय. यामुळे मुख्यतः शैक्षणिक मागासलेपणा ( Retardation ) निर्माण होतो. आणि तिच्यांत मुलांना शालेय कार्याकडे आकृष्ट करण्याची ताकद नसतें. पालकांची उपेक्षावृत्ति हें गळतीचें आणखी एक कारण आहे व हें बऱ्याच अंशीं ग्रामीण विभागांत खरें आहे. अगदी अलीकडील काळांत मात्र या बाबतींत बरीच सुधारणा होऊन पालकांना योग्य ती

* यासंबंधीं शास्त्रीय चर्चेसाठी पाहा : ' Wastage and Retardation in Education ' by Shri R. S. Chitkara--Govt. of India Publication, 1961.

जाणीव झाल्याचें दिसतें. मृत्यु, उडाणटप्पूपणा इत्यादि कारणांमुळे होणारी हानि अगदीच अल्प आहे.

गतिरोधाचीं अनेक कारणें आहेत. शिक्षकांचा निकृष्ट दर्जा, त्यांच्यामध्ये तळमळीचा अभाव, उपेक्षावृत्ति व निष्काळजीपणा, सदोष परीक्षापद्धति, विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानग्रहणाविषयी तळमळ नसणें, ( हें विशेषेंकरून कॉलेजविद्यार्थ्यांत दिसून येतें ). घरीं योग्य व पोषक वातावरणाचा अभाव, पाठ्यपुस्तकांचा व शैक्षणिक साधनसामग्रीचा तुटवडा वगैरे प्रमुख कारणें असल्याचें दिसून आलें.

थोड्या विचारांती असें दिसून येईल की ज्याप्रमाणे डोकेंदुखी, ताप किंवा खोकला हे खरे मूळ रोग नसून तीं दुसऱ्या कोणत्यातरी रोगांचीं बाह्यलक्षणें आहेत, त्याचप्रमाणे गळती आणि गतिरोध हे शिक्षणांतील मूलभूत दोष नव्हेत. त्यांना कारणीभूत ठरणारी परिस्थिति ज्या प्रमाणांत नाहीशी होईल त्या प्रमाणांत हे दोष कमी होत जातील. शिक्षकांचा निकृष्ट दर्जा, साधनसामग्रीचा अभाव, अयोग्य अध्यापनपद्धति, सदोष परीक्षापद्धति वगैरे शिक्षणांतील दोष कमी होण्यावर ही हानि टळणें बऱ्याच अंशीं अवलंबून आहे. याहिपेक्षां महत्त्वाची बाब म्हणजे आपले शैक्षणिक प्रश्न राष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक जीवनाशीं निगडित आहेत. आर्थिक सुबत्ता आणि सामाजिक समता ज्या प्रमाणांत लाभेल त्या प्रमाणांत गळती व गतिरोध हे दोषहि नाहीसे होतील हें उघड आहे.

## सक्तीच्या शिक्षणाची कालमर्यादा :--

ही कालमर्यादा वेगवेगळ्या राष्ट्रांत वेगवेगळी आढळून येते. इंग्लंडमधे ६ ते १५ ही सक्तीच्या शिक्षणाचीं वर्षें असून १९४४ च्या कायद्यानुसार ती १६ व्या वर्षापर्यंत वाढविण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. अमेरिकेंत तर १६ ते १८ या वयोमर्यादेंतील नोकरी करणाऱ्या तरुणांना पुढील शिक्षणाच्या शाळांतून (Continuation Schools) अर्धवेळ हजर राहाणें सुमारें २७ संस्थानांतून सक्तीचें आहे. एवढी प्रदीर्घ कालमर्यादा आज आपल्या राष्ट्राला परवडणारी नाही. म्हणून ६ ते १४ ही मर्यादा घटनेनुसार स्वीकृत केली गेली आहे व त्याचा पहिला भाग म्हणून ६ ते ११ वयोमर्यादेंतील मुलांना सक्तीचें प्राथमिक शिक्षण देण्याचा संकल्प आपण तूर्त स्वीकारला आहे. प्राथमिक शिक्षणाचा कालावधि आपल्या आसपासच्या देशांत किती आहे हें पाहणें मनोरंजक ठरेल.

आशिया खंडांतील राष्ट्रांत हा कालावधि सामान्यपणें ४ ते ७ वर्षांचा आहे. ब्रह्मदेशांत प्राथमिक शिक्षण चार वर्षांचें आहे. रंगूनसारख्या शहरांत बालो-

ह्यानवर्गाचें आणखी एक वर्ष त्यांत अंतर्भूत केलें जातें. पाकिस्तानमधे प्राथमिक-शिक्षण साधारणतः पांच वर्षाचें व कांही ठिकाणीं ४ वर्षाचेंहि आढळतें. नेपाळ व व्हिएतनाम या देशांत तें ५ वर्षाचें आहे. व्हिएतनाममध्ये हें शिक्षण पूर्ण झाल्यावर पुरेशा माध्यमिक शाळा नसल्यामुळे कित्येक प्राथमिक शाळांत ६ वा वर्गहि चालविण्यांत येतो. अफगाणिस्तानांत प्राथमिक शिक्षणाचा प्रसार अत्यंत कमी आहे; तरीहि प्राथमिक शिक्षणाचा तेथील कालावधि ६ वर्षांचा आहे. खेड्यांतून मात्र ३ इयत्तांच्या शाळांचीच सोय आहे. कंबोडिया, इंडोनेशिया, कोरिया, मलाया आणि फिलिपाइन्स या राष्ट्रांत प्राथमिक शिक्षण ६ वर्षें देण्यांत येतें. लाओसमधे तें तीन तीन वर्षांच्या दोन खंडांत मिळून देण्यांत येतें. तथापि ६ वर्ग असणाऱ्या शाळा तेथे फारच थोड्या आहेत. इराणमधेहि प्राथमिक शिक्षण ६ वर्षांचें आहे, पण ही स्थिति फक्त शहरांतीलच आहे. ग्रामीण भागांत ४ वर्षांचेंच प्रा. शिक्षण दिलें जातें. थायलंडमधे प्राथमिक शिक्षण ४ वर्षांचें आहे, पण अलीकडे त्याच्यापुढे ३ वर्षांचा एक्स्टेंशन कोर्स सुरु करण्यांत आला आहे. हा अभ्यासक्रम भारतांतील उच्च प्राथमिक अथवा पूर्व माध्यमिक अवस्थेप्रमाणेंच आहे.

युनेस्कोमार्फत या देशांची जी पाहाणी मूलभूत शिक्षणयोजनेच्या (Fundamental Education) संदर्भांत करण्यांत आली, तिच्यावरून वरील माहिती उपलब्ध झाली आहे. त्या पाहाणींत तीन महत्त्वाचे प्रश्न उपस्थित झाले:—(१) प्राथमिक शिक्षणाचा एकूण कालावधि किती असावा ? (२) हा कालावधि शिक्षणाचा एकसंघ किती असावा की त्याचे दोन विभाग वा खंड असावेत ? (३) जर असे दोन विभाग किंवा अवस्था करावयाच्या ठरविल्या तर त्या कशा प्रकारच्या असाव्यात ?

उपरोक्त पाहणीवरून पहिल्या प्रश्नाबाबत दोन प्रकारचीं धोरणें अंगिकारल्याचे दिसून आलें. सिलोनमध्ये प्राथमिक शिक्षण सहा वर्षाचें असून त्यानंतर पूर्वमाध्यमिक शिक्षण ३ वर्षांचें आहे. ही नऊ वर्षें सक्तीच्या शिक्षणाचीं गणलीं जातात. ह्या प्रकारचें देशांतहि साधारणपणें हेंच धोरण अवलंबिलें जातें. भारताने दुसऱ्या प्रकारचें धोरण अंगिकारलें आहे. सक्तीच्या शिक्षणाची वयोमर्यादा व प्राथमिक शिक्षणाचा काळ एकच म्हणजे सात वर्षें ठेवण्यांत आला आहे. पाकिस्तान, थायलंड, नेपाळ इ. देशांतहि थोड्या फरकाने हेंच धोरण अनुसरलें आहे.

सहा किंवा कमी वर्षें मुदतीच्या प्राथमिक शिक्षणांत दोन अडचणी येतात. प्राथमिक शिक्षणाचीं उद्दिष्टें साध्य करण्याच्या दृष्टीने हा काळ अपुरा पडतो. शिवाय १२-१३ व्या वर्षीं मुलगा शाळा सोडत असल्याने व्यावसायीय जबाबदारी स्वीकारण्यास तो असमर्थच ठरतो. म्हणून प्राथमिक शिक्षण निदान ७ वर्षांच्या

मुदतीचें असणें हितावह आहे. सक्तीच्या वयोमर्यादेची सुरुवात निरनिराळ्या देशांत ६ व्या ते ८ व्या वर्षापासून होते. वयाच्या १४ व्या वर्षापूर्वी मुलावर व्यवसायाची जबाबदारी सोपविणें इष्ट नाही. म्हणून सक्तीच्या वयोमर्यादा ६ ते १४ असणेंच उचित आहे व अंतिम उद्दिष्ट म्हणून भारताने तीच स्वीकारली आहे.

## सक्तीच्या शिक्षणासंबंधीं कायदे :--

सर्वच देशांत यासंबंधीं कायदे करण्यांत आले आहेत. भारताच्या केन्द्रीय शिक्षणखात्यामार्फत सर्व राज्यांना उपयोगी पडावा म्हणून अशा कायद्याचा एक आदर्श नमुनाहि तज्ज्ञांकडून तयार करविण्यांत आला आहे. राज्यशिक्षणमंत्र्यांच्या बैठकींत (१९५९) ठरल्याप्रमाणे सर्व राज्यांत हे कायदे लागू केले गेले आहेत. तथापि त्यांच्या अंमलबजावणींत मात्र अनेक अडचणींमुळे पुरेशी सफलता मिळ शकलेली नाही. जनतेचें हार्दिक सहकार्य व पुरेसा पैसा ज्या प्रमाणांत उपलब्ध होतील त्या प्रमाणांत या कायद्याचा यशस्वी अंमल करतां येईल.

## विकेन्द्रित लोकशाही आणि प्राथमिक शिक्षण :--

भारतांतील कांही राज्यांत विकेंद्रित लोकशाहीचा प्रयोग सुरु करण्यांत आलेला आहे. महाराष्ट्र सरकानेहि हा उपक्रम हातीं घेतला आहे. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती या स्थानिक स्वराज्य संस्थांना विस्तृत अधिकार देण्यांत आले असून शासनाची बरीच जबाबदारी स्थानिक संस्थांवर सोपविली आहे. लोकशाहीच्या या विकेंद्रीकरणामुळे स्थानिक नव्या नेतृत्वाचा उदय, स्थानिक प्रश्नांबाबत उत्साह व त्यासाठी अधिक त्याग करण्याची तयारी, सरकारवर आत्मोद्धारासाठी अवलंबून राहाण्याऐवजीं जबाबदारी स्वीकारण्याची जनतेची इच्छा इत्यादि गोष्टी या प्रयोगांतून अपेक्षित आहेत. विशेषत: विकासाची गति अधिक वाढावी हीच मुख्य अपेक्षा आहे. तेव्हा प्राथमिक शिक्षणाबाबत विशेषत: ग्रामपंचायतींचें स्थान व कार्य कोणतें याचा थोडक्यांत विचार करणें जरूर आहे. जिल्हापरिषदा व पंचायत समित्या यासाठी शक्य तेवढें अनुदान देतीलच व स्थूल स्वरूपांत धोरणहि ठरवून देतील. तथापि त्यांत जिवंतपणा व उत्साह निर्माण करण्याचें कार्य मुख्यत: ग्रामपंचायतींचेंच राहील. स्थानिक जनतेने निवडलेल्या प्रतिनिधींच्या ग्रामपंचायतीसारख्या संस्था किंवा पालकशिक्षकसंघ यांच्या मार्फत स्थानिक समाज व प्राथमिक शाळा यांच्यामधें घनिष्ट संबध घडवून आणण्याच्या आवश्यकतेचें तत्त्व जगभर सर्वमान्य झालेलें आहे. या तत्त्वाचें महत्त्व पुढील गोष्टींवरून स्पष्ट होईल.

(१) सुधारलेल्या जगतांत प्राथमिक शाळेला स्थानिक जनतेच्या सामुदायिक कार्याचें केन्द्र बनविण्याचा प्रयत्न केला जातो. प्राथमिक शाळेचें रूपांतर लोकशाळेंत (Community School) किंवा संस्कारकेंद्रांत केलें जातें. फिलिपाइन्स व चीनमधे या दृष्टीने केलेले प्रयत्न फार लाभदायक ठरले आहेत. प्राथमिक शाळा व स्थानिक समाज यांच्यामधे एकात्मता निर्माण करणें हें मूलोद्योगशिक्षण योजनेचेंहि एक महत्त्वाचें अंग आहे.

(२) अशा एकात्मतेमुळे पुष्कळच फायदे होतात. यामुळे प्राथमिक शाळा ही समाजशिक्षणाचें एक प्रभावी केंद्र बनतें. शालेय कार्यांत मोठी प्रगति घडून येते. शाळेसाठी जादा आर्थिक मदत उपलब्ध होते. भावी काळांत त्या समाजाचे घटक बनणाऱ्या मुलांना समाजसेवेची अनेक प्रकारची संधि व शिक्षण मिळतें.

(३) स्थानिक जनतेने पूर्ण लक्ष दिल्याखेरीज व तिच्यावर मुलांना शाळेंत हजर ठेवण्याची कायदेशीर जबाबदारी असल्याखेरीज सक्तीचें प्राथमिक शिक्षण यशस्वी होणार नाही. म्हणून ग्रामपंचायतींचा शालेय कार्याशीं कायदेशीर संबंध असणें जरूर आहे.

(४) मद्रास व इतरत्र कांही ठिकाणीं स्थानिक समाजाचे शाळेशीं घनिष्ट संबंध जोडले गेले. परिणामत: स्थानिक जनतेनें शाळेची इमारत, शैक्षणिक साधनें व इतर सामुग्री, गरीब विद्यार्थ्यांना दुपारचें जेवण वगैरे पुरविण्याची जबाबदारी पुष्कळ अंशीं पत्करली आहे.

ग्रामपंचायतींकडून प्राथमिक शिक्षणाबाबत खालील कार्यें अपेक्षित आहेत:—

(१) त्यांच्या क्षेत्रांत प्राथमिक शिक्षणाच्या विकासाच्या योजना तयार करणें व कार्यवाहींत आणणें. यासाठी पंचायत समित्यांना जरूर तें साहाय्य देणें;

(२) स्थानिक शाळेला पुरेशी जागा, इमारत व साधनसामुग्री पुरविणें.

(३) शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक त्या योजना अंमलांत आणणें. उदा, आखाडा, विविधस्पर्धा इ.

(४) शाळा इमारतीची किरकोळ दुरूस्ती करणें व पंचायत समितीचा आदेश असल्यास विशेष दुरूस्ती करणें किंवा नवी इमारत बांधणें.

(५) पंचायत समितीच्या आदेशानुसार स्थानिक शाळेवर रीतसर देखरेख ठेवणें. मुंबई राज्याच्या १९४९ च्या प्राथमिक शिक्षण कायद्यानुसार स्थापन करण्यांत आलेल्या शाळा समितीला असे अधिकार देण्यांत आले होते.

(६) सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्यानुसार मुलांच्या हजरीसंबंधी कायदेशीर अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी स्वीकारणें.

(७) निधी उपलब्ध असल्यास मुलांना पाट्या, पुस्तकें, कपडे व इतर साधनें पुरविणें.

(८) शालेय निधीचा ( School fund ) योग्य विनिमय करणें. या निधीच्या उत्पन्नाच्या बाबी अशा:--(१) ग्रामपंचायतीकडून वर्गणी (उत्पन्नाच्या २ ते ४ टक्के) -सध्या कांहीच वर्गणी दिली जात नाही. (२) स्थानिक जनतेकडून ऐच्छिक देणगी. (३) शाळेची बाग, शेत, हस्तव्यवसाय इ० चें उत्पन्न. (४) सक्ती कायद्यानुसार दंडाचें उत्पन्न. (५) पंचायतसमितीकडून अनुदान. (६) इतर किरकोळ बाबी.

(९) शाळेसाठी खेळाचें मैदान व बाग यासाठी जागा पुरविणें शिक्षक-विद्यार्थ्यांच्या मदतीने त्यांची योग्य निगा राखणें.

(१०) विद्यार्थ्यांसाठी शाळेंत पिण्याच्या पाण्याची व इतर सुखसोयींची व्यवस्था करणें.

(११) शक्य असल्यास गरीब व अशक्त मुलांना मधल्या वेळचें जेवण देणें.

(१२) शालेय गणवेष पुरविणें.

(१३) सरकारच्या किंवा पंचायतसमितीच्या आदेशानुसार शालेय कार्यक्रम, सहली किंवा इतर सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम साजरे करणें.

(१४) सामान्यपणें पंचायत समितीकडून दिले गेलेले अधिकार वापरणें व कर्तव्यें पार पाडणें. *

तात्पर्य, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा संकल्प पार पाडण्याची गुरुकिल्ली बऱ्याच अंशीं स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या हातीं आहे हें स्पष्ट झालेंच असेल.

## शिक्षक-मुलांचा भाग्यविधाता :--

मुलांचें भवितव्य घडविण्यासाठी सरकार, स्थानिक संस्था व नेते यांनी जरी कंबर कसली तरी हें कार्य शेवटी शिक्षकामार्फतच होणार आहे. शिक्षकांचें महत्त्व व त्यांच्या प्रशिक्षणाची जरूरी याबद्दल एका स्वतंत्र प्रकरणांत सविस्तर चर्चा केलेलीच आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील प्राथमिक शिक्षणाचें लक्ष्य

* श्री. जे. पी. नाईक याच्या Indian Journal of Educational Administration Research मधील एका लेखाच्या आधारें.

साधण्यासाठी ४० मुलांना एक शिक्षक या प्रमाणाने एकूण सुमारे ६ लक्ष ३४ हजार शिक्षकांची जरूरी आहे. सुरुवातीस निदान ५ लक्ष शिक्षक तरी नेमावे लागतील असा अंदाज होता. पुरेसे प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध होण्याच्या दृष्टीने भारत-सरकारने योग्य ती उपाययोजना तांतडीने जारी केली. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या उत्तरार्धांत नवीन प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यासाठी व जमलेल्या संस्थांतून विद्यार्थी-शिक्षकांची संख्या वाढविण्यासाठी येणाऱ्या खर्चावर भारत सरकारने राज्यांत १०० % अनुदान दिलें. द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस विनीत प्राथमिक शिक्षकांचें शें. प्रमाण ६० होतें. तें तृतीय पं. वा. योजनेंत शें. ७५ होईल. यासाठी १९६०–६१ पर्यंत नवीन २७६ प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजें स्थापन करण्यांत आलीं व दरसाल २७५०० जादा शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय करण्यांत आली. एवढ्यानेच भागेल असें नाही. तृतीय पंचवार्षिक योजनेच्या काळांत दरवर्षी ५३००० याप्रमाणे एकूण २,६५००० शिक्षिकांची गरज भासेल. त्यांचें प्रशिक्षण बऱ्याच अंशीं संक्षिप्त वर्गांतूनच करावें लागेल. यासंबंधीं चर्चा वर केलेलीच आहे. त्यांच्या नेमणुकीची कमाल वयोमर्यादा ४० पर्यंत वाढविली पाहिजे. तसेंच शिक्षकांच्या सेवानिवृत्तीची वयोमर्यादाहि ६० पर्यंत नेली पाहिजे. म्हणजे अनुभवी व प्रौढ शिक्षकशिक्षकांच्या कार्याचा अधिक लाभ मिळेल. शिक्षकांची ही प्रचंड संख्या उपलब्ध होणें फार कठिण आहे. म्हणून एका शिक्षकाकडे अधिक मुलें सोंपविणें, सहा तासांऐवजीं तीनच तास शाळा चालवून दुप्पट मुलांना शिकविणें, इमारतींचा प्रश्न सोडविण्यासाठी दुवक्त शाळा भरविणें, घरकामांत मदत करतां यावी म्हणून सोइस्कर वेळीं शाळा भरविणें, सुगीच्या वेळी लांब सुटचा देणें व उन्हाळ्यांत शाळा चालू ठेवणें इत्यादि तातडीचे उपक्रम हातीं घेतले पाहिजेत. मुलांच्या मधल्या वेळच्या खाण्याचा प्रश्न लोकांच्या सहकार्याने सोडविला पाहिजे. यासंबंधी चर्चा पुढील एका प्रकरणांत स्वतंत्रपणें केलेली आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराला देशाच्या सर्वांगीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमांत महत्त्वाचें स्थान आहे. राष्ट्रीय पुनर्रचनेचें एक साधन या दृष्टीने प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न सोडविण्याचा सर्वव्यापी प्रयत्न एकदिलाने व सर्व पातळीवरून झाला तरच अपेक्षित यश पदरांत पडेल. समाजधुरीण, सामाजिक व शैक्षणिक संस्था, सरकारी अधिकारी, कार्यकर्ते व शिक्षक या सर्वांनी हा जगन्नाथाचा रथ आपली सर्व शक्ति पणाला लावून ओढला पाहिजे. प्रयत्नांची शिकस्त व्हावयास हवी. भारताचे शिक्षणमंत्री डॉ. श्रीमाळी यांनी सन १९५९ मध्ये राज्यशिक्षणमंत्र्यांच्या चौथ्या परिषदेंत भाषण करतांना हीच गोष्ट प्रभावीपणें सांगितली. ते म्हणाले:—
"The task we are undertaking is of great magnitude and has few parallels in history. It can be

accomplished only by mobilising the resources of the Central Government, State Governments and the Community. All three must act together as partners in this great adventure and face the task with faith and determination ".

✤ ✤ ✤

## संदर्भ ग्रंथ


1) Souvenir of the Second Commonwealth Education Conference 1962
2) Wastage and Retardation in Education—R. S. Chitkara.
3) Indian Journal of Educational Administration and Research - various issues.
4) The Education Quarterly - different issues.
5) प्राथमिक शिक्षणाच्या समस्या - कर्णिक, गोखले.
6) History of Education in India - Nurullah, Naik.
7) Education in New India - Humayun Kabir.
8) Problems of Educational Reconstruction - K. G. Saiyidain

# व्यावसायिक शिक्षण :९:

# ( Vocational Education )

## जीवनाचा केंद्रबिंदू व्यवसाय :

मानवी जीवनाचें हें महावस्त्र विविध व्यवसायांच्या धाग्यांनी विणलेलें आहे. गुहेंत राहून शिकारीवर उपजीविका करणाऱ्या मानवाचें जीवन व आजच्या मानवाचें जीवन यांत जें मध्यंतर आहे तें त्यांच्या व्यवसायाच्या संख्येंत व व्यावसायिक क्षेत्रांतील दर्जांत आहे. केवळ जगण्यासाठी शिकार करून त्यापासून अन्न व वस्त्र मिळवून गुहेंत आसरा घेणारा मानव व पशु यांच्या जीवनांत फारसा फरक नव्हता परंतु हा आदिमानव व आज अवकाशांत घर बांधावयास सिद्ध झालेला मानव यांच्यांत साम्य नांवापुरतेंच ! थंडी, पाऊस यांपासून संरक्षण मिळावें म्हणून कातडी पांघरणारा मानव व आज काचेपासून वस्त्र तयार करणारा मानव यांच्यांत तुलना करणें शक्य नाही. आज मानवाच्या मूलभूत गरजांच्या यादींत अन्न, वस्त्र व निवास यांच्याबरोबर शिक्षण व करमणूक यांचीहि गणना होते. मानवाच्या गरजांची संख्या जसजशी वाढूं लागली व त्यांचें स्वरूप जसजसें संकीर्ण (Complex) होऊं लागलें तसतशी व्यवसायांची संख्या वाढूं लागली. एकदोन उदाहरणें घेतलीं तर हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. पूर्वी खेडेगावांत बारा बलुत्यांची संस्था कार्यवाहीत होती. परंतु आजच्या खेड्यांच्याहि गरजा ही संस्था पूर्ण करूं शकत नाही. अर्धशतकापूर्वी अभियंता (Engineer) म्हटलें की घरें बांधणे हीच गोष्ट आपल्या डोळ्यापुढे उभी राही परंतु आज कृषि, विद्युत्, हवाई, सागरी, स्थल व यांत्रिकी, रेडिओ अभियंते काम करतांना दिसतात. वस्त्रचित्राचा (Textile) व्यवसाय घेतल्यासहि आज त्याचें स्वरूप पूर्वीपेक्षा पुष्कळ बदललेलें दिसेल. रंग कसे तयार करावे, सुतावर कोणत्या रासायनिक क्रिया कराव्या, वस्त्रावर कोणत्या प्रकारची चित्राकृति टाकावी, विणणावळींत कोणत्या सुधारणा करता येतील, मूळ वस्त्र व काठ यांची रंगसंगति कशी साधावी यासारख्या कितीतरी बाबींचा आज वस्त्रचित्रांत विचार करावा लागतो. या बाबी यशस्वीपणें हाताळण्यासाठी स्वाभाविकच या विविध शाखांचा विशेष अभ्यास

केलेल्या लोकांची जरूरी असते. आज कोणत्याहि व्यवसायांत काम करण्यासाठी अधिक शास्त्रशुद्ध ज्ञानाची आवश्यकता असते. केशकर्तन ( Hair-cutting ) आणि केशभूषा ( Hair-dressing ) यांत जो फरक आहे तो त्या व्यवसायांत ज्या शास्त्रीय माहितीचा व दृष्टिकोणाचा उपयोग केला जातो त्यामुळेच होय. मानवाचा 'सुखाचा शोध' जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत त्याच्या गरजा सतत वाढत राहणार आणि या गरजा जोपर्यंत वाढत राहणार तोपर्यंत व्यवसायांच्या संख्येंत तर भर पडतच राहणार परंतु त्यांचें स्वरूपहि बदलत राहणार.

## व्यावसायिक शिक्षणाची आवश्यकता :--

प्राचीन काळापासून मनुष्याला आपल्या उदरभरणासाठी कांही ना कांही काम करावें लागलें आहे. मग आजच हें व्यावसायिक शिक्षणाचें खूळ काय काढलें आहे ? प्राचीन काळच्या मानवाला त्याच्या व्यवसायांचें शिक्षण कोणी दिलें ? तीव्र गरजेच्या जाणीवेमुळे मनुष्न प्रथमतः एकादें काम करण्यास उद्युक्त झाला असेल. पुढे काम करतांकरतां ज्या अडचणी आल्या, ज्या उणीवा जाणविल्या त्या दूर करण्यासाठी केलेल्या चुकांतून शहाणपण शिकून (Trial and error) त्याने कामांत कौशल्य प्राप्त केलें असेल. जित व जेते अशा प्रकारच्या संबंधांत कांही मानवसमूहाला चाबकाच्या वादीच्या धाकानेहि कांही गोष्टी शिकविल्या गेल्या. समाजाच्या गरजा जोपर्यंत मर्यादित होत्या व व्यवसायांचे स्वरूप गुंतागुंतीचें होऊन विषेशज्ञ ( Specialist ) लोकांची गरज जोपर्यंत भासत नव्हती तोपर्यंत बाप मुलाला घरच्या घरीच उद्योगधंद्याचें शिक्षण देई. त्यामुळे सुताराचा मुलगा सुतारकीच करीत असे. वंशपरंपरागत धंदे चालत असत, केवळ उमेदवारी ( Apprenticeship ) करूनच व्यावसायिक शिक्षण मिळत असे. नियोजित, संघटित व्यावसायिक शिक्षण ही आधुनिक जगाची एक देणगी आहे.

व्यक्तिनिहाय बुद्धिमत्ता, आवडीनिवडी, वृत्ति व कल बदलत असतात त्यामुळे एकाद्या सुताराच्या मुलाला नर्तक व्हावे असें वाटणें शक्य आहे. परंतु वंशपरंपरागत धंदे चालविण्याची प्रथा असलेल्या काळांत ही गोष्ट शक्य नव्हती. परंतु एकोणिसाव्या शतकापासून ज्या लोकशाही जीवनपद्धतीचा स्वीकार अनेक राष्ट्रांनी केला त्यांतील एक प्रमुख तत्व म्हणजे 'सर्वांना समान संधि' हें होय. या तत्वामुळे सर्व व्यक्तींना सर्व प्रकारच्या शिक्षणाचे दरवाजे खुले ठेवण्याची जबाबदारी समाजावर आली. त्यामुळे आपल्या आवडीनिवडीनुसार शिक्षणक्रमाची —म्हणजेच अप्रत्यक्षरीत्या व्यवसायांची—निवड केली जाऊं लागली. वंशपरंपरागत धंदे चालविण्याच्या पद्धतीला या बदलामुळे स्वाभाविकच धक्का बसला.

लोकशाहीच्या विचारसरणीचा आणखी एक परिणाम म्हणजे विविध व्यवसायांना समाजांत कमीअधिक प्रतिष्ठा असली तरी कोणताहि व्यवसाय केवळ त्याच्या स्वरुपामुळे कमी प्रतीचा नसतो ही कल्पना हळूहळू रूजूं लागली. श्रमप्रतिष्ठा ( dignity of labour ) व तिचें महत्त्व समाजाला पटूं लागलें.

आजचा समाज औद्योगिकरणाच्या प्रचंड शक्तीने भारला गेला आहे. गिरण्या आणि शेतें, समुद्र, अवकाश व जमीन, दुकानें आणि कार्यालयें आज यंत्रांच्या आवाजाने घुमत असतात. अधिक उत्पादन व कमीतकमी वेळांत जास्तीत जास्त उत्पादन हा आजच्या जगाचा मंत्र असल्याने कोणत्याहि क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तीला त्या कामाचे विशेष ज्ञान व प्रशिक्षण असल्याशिवाय चालत नाही. केवळ डॉक्टर, वकील यांसारख्या धंद्यांनाच प्रशिक्षण लागतें ही जुनी कल्पना जाऊन कारकून, दायी, आचारी, कामगार व सुतार आदि सर्वांनाच प्रशिक्षणाची आज जरूर असते. आधुनिक जगांतील कोणत्याहि व्यवसायांत वेग, कार्यक्षमता व त्या कामाचें विशेष ज्ञान या गोष्टी काम करणाऱ्याजवळ असाव्या लागतात आणि त्यामुळेच व्यावसायिक शिक्षणाची तीव्र गरजउत्पन्न झाली आहे. *

व्यावसायिक शिक्षणाच्या कार्यक्रमाला चालना मिळण्यास अप्रत्यक्षपणें आधुनिक मानसशास्त्रहि कारणीभूत आहे. पूर्वी ग्रीक-लॅटिन अगर संस्कृत व गणित या विषयांच्या अभ्यास आवश्यक मानला जात असे. शरीर बळकट ठेवण्यासाठी शरीराच्या स्नायूंना व्यायाम घडणें जसें आवश्यक असते तसें बुद्धि तल्लख होण्यासाठी वरील विषयांचा अभ्यास आवश्यक मानला जाई. परंतु, मानसशास्त्रांतील अद्यावत् संशोधनाने ज्ञान संक्रमणाचे ( transfer of training ) चें तत्व खरें नसल्याचें सिद्ध केलें. या संशोधनाचा शालेय अभ्यासक्रमावर फार दूरगामी परिणाम झाला. आवश्यक विषयांची संख्या कमी होऊन विविध विद्यार्थ्यांच्या विविध आवडीनिवडींना अगर एकाच विद्यार्थ्याच्या विविध आवडींना

* पुढील परिच्छेदांत हेच विचार मांडलेले आहेत:--

"Modern conditions require speed, efficiency, and intelligence —Modern ideals of democracy call for equality of opportnuities for all levels, classes and Individuals - Men to-day require not only that their preachers and lawyers be given opportunity for proper training but that their cooks and chauffeurs also find such opportunities. Not only the engineer, the doctor and the architect but the factory worker, the nurse and the carpenter must be given a fair chance for vocational education"— Principles and Practices of vocational education—Mays P. N.-65

वाव देण्याची जबाबदारी आज त्यामुळे शाळांवर आली आहे.* पांच दशकांपूर्वी भारतांत इंग्रजी विषय न घेतां मॅट्रिक होणें ही गोष्ट असंभवनीय वाटली असती. तसेंच नर्तन, लोहारकाम, सुतारकाम, टायपींग यासारखे विषय माध्यमिक शाळांत शिकविले जातात यावरहि कोणाचा विश्वास बसला नसता. परंतु आज बहुमुखी (diversified) अभ्यासक्रम आल्याने इंग्लिश, संस्कृत, गणित या विषयांइतकेंच सुतारकाम, लोहारकाम या विषयांनाहि महत्त्व आलें आहे. अभ्यासक्रमांतील या बदलाचें आपल्या देशांतील दुसरें महत्त्वाचें कारण म्हणजे माध्यमिक शिक्षणाच्या ध्येयांत व उद्दिष्टांत झालेला बदल हें होय. स्वातंत्र्यपूर्वकालांत माध्यमिक शिक्षण म्हणजे केवळ महाविद्यालयीन शिक्षणासाठी लागणारा परवाना असें मानलें जाई. त्यामुळे पदवीला समाजांत व विद्यार्थ्यांत अवास्तव महत्त्व दिलें जाई. त्यामुळे सामान्य बुद्धीचीं मुलेंहि महाविद्यालयाकडे धांव घेतात. यांपैकी अनेकजण अपयश घेऊन पालकांच्या खर्चाचा बोजा वाढवीत असत. परंतु स्वातंत्र्योत्तर कालांत माध्यमिक शिक्षण स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू झाले व माध्यमिक शाळेंतून बाहेर पडणारे विद्यार्थी म्हणजे विविध क्षेत्रांतील दुय्यम दर्जाचे नेते असतात असें मानून केवळ पुस्तकी शिक्षणावरील भर कमी करून नवीन अभ्यासक्रम अंमलांत आणला गेला. माध्यमिक शिक्षणाला नवी दिशा लावणाऱ्या मुदलियार आयोगाने याच दृष्टीने बहुउद्देशीय शाळांची व तांत्रिक आणि औद्योगिक संस्थांच्या स्थापनेची जोरदार शिफारस केली.

## सांस्कृतिक ( General ) व व्यावसायिक शिक्षण:—

बुद्धिजीवी व श्रमजीवी असे काम करणाऱ्या लोकांचे दोन वर्ग कित्येक शतकांपासून रूढ होते. डॉक्टर, वकील, इंजीनियर, प्राध्यापक आदि व्यवसाय प्रतिष्ठित (white collared) मानले जात असत. उलट गवंडी, सुतार, लोहार, चांभार, विणकर वगैरे लोकांच्या धंद्यांना समाजांत फारसा मान नव्हता. याचाच परिणाम म्हणजे पहिल्या प्रकारच्या धंद्यांसाठी शिक्षण दिलें जाई, परंतु दुसऱ्या तऱ्हेच्या धंद्यांसाठी सुयोग्य, संघटित शिक्षणाची अवश्यकता आहे असें मानलें जात नसे. याचा परिणाम असा की समाजाचा एक वर्ग शासक बनला तर दुसरे केवळ गुलाम बनले; एकाने निर्माण करावें व दुसऱ्याने भोगावें ही रूढि

* "Throughout the course of Secondary instruction surely there must be no procrustean led which every pupil by some process of dusrfing or stretching must be made to fit, but natural endowments, as soon as discovered, should have full scope"— American Education in the 20th century — I. L. Kandel P.-142.

बनली; गायन-वादन, नाटक, कथा-काव्य, कादंबरी, विलास या गोष्टी म्हणजे प्रतिष्ठित लोकांची मक्तेदारी झाली. परंतु फ्रेंच राज्यक्रांतीने समता, बंधुभाव व स्वातंत्र्य या त्रयीचा उद्घोष केला आणि या प्रकारच्या मक्तेदारीला तडा गेला. स्वाभाविकच यानंतरच्या कालांत सांस्कृतिक शिक्षण की व्यावसायिक शिक्षण ही निवड पालकांच्या सामाजिक दर्जावरून न ठरतां ती विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी, बुद्धि या गोष्टी लक्षांत घेऊन ठरवावी लागेल असें मानलें जाऊं लागलें. शिवाय प्रत्येक विद्यार्थ्यालाच पुढे कोणता ना कोणता व्यवसाय करणें अवश्य असल्यानें प्रत्येक विद्यार्थ्याला कोणत्या ना कोणत्या व्यवसायाचें शिक्षण मिळावें ह्या विचाराला चालना मिळाली.* लोकशाही व्यवस्थेंत समाजाचा प्रत्येक घटक मग त्याचा व्यवसाय कोणता का असेना--एक जबाबदार नागरिक असल्याने प्रत्येकाला कमीतकमी सांस्कृतिक शिक्षण मिळणें अवश्य ठरलें. समाजाचा जगन्नाथाचा रथ ओढण्यासाठी विविध व्यवसायांत विविध थरांवर काम करणारे लोक लागतात. परंतु हीं विविध कामें करणाऱ्या लोकांची सांस्कृतिक पातळी जितकी उंच असते तितका कामाचा दर्जाहि उंचावतो. हाच विचार अमेरिकेंतील सार्वजनिक शाळांच्या अधीक्षकांनी फार सुंदर शब्दांत व्यक्त केला आहे. ते म्हणतात की व्यावसायिक शिक्षण म्हणजे हातांनी काम करावयाचें शिक्षण व सांस्कृतिक शिक्षण म्हणजे बुद्धीचें शिक्षण असें मानणें बरोबर नाही. तसेंच मंद बुद्धीच्या मुलांना फक्त शारीरिक मेहनत करता येते व म्हणून त्यांना व्यावसायिक शिक्षण द्यावें हें म्हणणेंहि बरोबर नाही. प्रत्येकाची क्षमता व व्यावसायिक कल लक्षांत घेऊन प्रत्येकाला व्यावसायिक शिक्षण दिलें पाहिजे. तसेंच प्रत्येकाला नागरिक म्हणून अगर व्यक्ति म्हणून संपन्नपणें जगण्याचें शिक्षणहि मिळालें पाहिजे.† हाच विचार इतर

---

* "There cannot be general education for some people and vocational education for others - Differences in the kind of education must be determined by individual capacity and social needs,- vocational education is for every body who works and everybody should work"—Forty second year book — Part I — National Society for the study of education — P. 11.

† "vocational education and what might be called general or academic education do not differ, - - - - the former is not training of the hand and the latter training ef the brain - the former is not for those only of low ability, capable only of learning how to work with their hands - Everyone ought to be educated vocationally, according to his ability and his occupational desires and everyone ought to be educated for citizenship,

(पुढे चालू)

विचारवंतांनीहि उचलून धरला आहे.* याचा अर्थ सांस्कृतिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण यांत फरक नाही असा मात्र नव्हे. कोणत्याहि एका विशिष्ट व्यवसायाच्या संदर्भात शिक्षण न देतां सर्वसामान्यपणें यशस्वी जीवनासाठी जें ज्ञान, ज्या वृत्ति व जें कौशल्य लागतें त्यावर सांस्कृतिक शिक्षणांत भर दिला जातो. याउलट व्यावसायिक शिक्षणांत एकाद्या व्यक्तीस एकादा व्यवसाय पूर्णत: अगर अंशत: करता येण्यासाठी जें ज्ञान, कौशल्य आणि वृत्ति लागतात त्यांच्यावर भर दिला जातो.

या संदर्भात मुदलियार आयोगाने केलेली अभ्यासक्रमाची पुनर्रचना पाहण्यासारखी आहे. अभ्यासक्रमांतील भाषा, सामान्य विज्ञान, सामाजिक अध्ययन, शारीरिक शिक्षण व हस्तकला हे विषय या आयोगाने आवश्यक (core) म्हणून सुचविले. स्मरणशक्तीवर भर देण्याऱ्या परंपरागत विषयांपेक्षा सुव्यवस्थितपणें व सुजाणपणें दिल्या जाणाऱ्या प्रात्यक्षिक कामांतून विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तींचा विकास होऊं शकतो.† विविध माध्यमांच्या द्वारें व्यक्तित्वाचा विकास घडवून आणणें

---

for effective living as an individual and for successful participation in the society of which he is a part "— Principles and practices of vocational education — Mays p. n.–52.

* "If education is concerned with the individual's progressive emergence as an integrated being for whom life has direction and meaning; it must recognize that, on the normal course of an individual's life, occupational and non-occupational experiences are woven together into total life pattern, not into two patterns– sharp breaks of this unity during and following formal school may lead to unfortunate personal mal adjustment "— General education in the American College, —Year look of the National Society for the study of education—p. n.–277.

† "It is necessary to Point out clearly that the diversification of courses and the introducation of many practical subjects at the secondary stage does not mean that something called general or cultural education is to be provided for one group of students while others are to be given a narrow practical or vocational or technical education – the whole modern approach to this question is based on the insight that the cultural and intellectual development of different individuals takes place lest through a variety of media, that the book or the study of traditional

(पुढे चालू)

हेंच आजच्या शिक्षणाचें उद्दिष्ट असलें पाहिजे. याच दृष्टीने एकाच इमारतींत विविध विषयांचें शिक्षण देण्याची व्यवस्था बहूद्देशीय शाळांतून केली गेली.

## व्यावसायिक शिक्षण म्हणजे काय ?

व्यावसायिक शिक्षण म्हटलें की बहुधा तांत्रिक (technical) व औद्योगिक (industrial) शिक्षणच डोळ्यांपुढे उभें राहतें. परंतु कुटिरोद्योग (cottage industries), लघु उद्योग (small scale industries), शेती, व्यापार वगैरे कोणत्याहि शाखेंतील शिक्षण हें व्यावसायिक शिक्षणच होय. म्हणूनच व्यावसायिक शिक्षणाचें वर्णन "समाजाला जरूर असणाऱ्या विविध कामांचें शिक्षण घेण्यास लोकांना प्रवृत्त करणें आणि त्यासाठी त्यांना तयार ठेवणें" असें अगर "समाजाला उपयुक्त असणारे व्यवसाय चालविण्यास जरूर असे अनुभव देणें" असें * केलें जाते. एकाद्या धंद्यांत शिरूं इच्छिणाऱ्या मुलांमुलींना व्यवसाय शिक्षण कनिष्ठ तांत्रिक शाळा, औद्योगिक प्रशिक्षण केंद्रें, बहुउद्देशीय माध्यमिक शाळा, पोलिटेकनिकल महाविद्यालयें व संशोधन संस्था अशा विविध स्तरांवर देतों. त्याचप्रमाणे एकाद्या धंद्यांत आधीच काम करीत असलेल्या लोकांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी किंवा अधिक जबाबदारीच्या जागांसाठी त्यांना लायक बनविण्यासाठीहि व्यावसायिक शिक्षण दिलें जातें. विविध स्तरांवर दिल्या जाणाऱ्या व्यवसायशिक्षणाचीं उद्दिष्टें व दर्जा भिन्न असला तरी विविध स्तरांवर काम करणाऱ्या लोकांची असलेली गरज त्यामुळे पूर्ण होते. आज भारताला भौतिक क्षेत्रांत प्रगतीची जी मजल गाठावयाची आहे त्यामुळे तर अशा विविध प्रकारें प्रशिक्षित झालेल्या कामगारांची, तंत्रज्ञांची व संशोधकांची गरज तीव्रतेने भासत

---

academic subjects is not the only door to the education of the personality and that in the case of many – perhaps a majority of the children practical work intelligently organised can unlock their latent energies much more successfully than the traditional subjects which address themselves only to the mind or worse still, the memory "— Report of the Secondary Education Commission- p. n.—36.

* "Vocational education means getting people ready and keeping them ready for the services we need"—Vocational education for a Changing World —F-struch p. n.–7.

"Vocational education refers to the experiences that enable one to carry on successfully a socially useful occupation—Ibid —p. n.—6.

आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी तृतीय पंचवार्षिक योजनेंत काय तरतूद केली आहे हें पाहणें उपयुक्त ठरेल.

## तृतीय पंचवार्षिक योजना व व्यवसाय शिक्षण:--

तृतीय पंचवार्षिक योजनेंत तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाला विशेष प्राधान्य देण्यांत आलें आहे. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत तांत्रिक व औद्योगिक शिक्षणासाठी एकूण शिक्षणावर होणाऱ्या खर्चापैकी अनुक्रमें तेरा व एकोणीस टक्के रक्कम ठेविली होती. तृतीय योजनेंत ही रकम पंचवीस टक्क्यांपर्यंत वाढविली आहे. तांत्रिक शिक्षणाचा विस्तार करून कमीअधिक कौशल्याच्या तंत्रज्ञांचा पुरवठा करण्याची तरतूद तृतीय पंचवार्षिक योजनेंत आहे. त्याचप्रमाणे एकाच विषयाच्या विविध शास्त्रांचा अभ्यास करण्याची सोयहि उपलब्ध करून देण्याचें ठरविलें आहे. उदाहरणार्थ बोलावयाचें तर तृतीय योजनेच्या कालांत नवी सतरा इंजीनियरिंग महाविद्यालयें निघणार आहेत येवढेंच नव्हे तर खाणविषयक ( mining ), धातु शुद्धीकरणाबाबत ( metallurgy ) व रसायनविषयक ( chemical ) अशा इंजीनियरिंगच्या विविध शाखांचा अभ्यासक्रमहि महाविद्यालयांत सुरू करण्यांत येणार आहे. पहिल्या दोन योजनांच्या कालांत पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सोय करण्यासाठी खरगपूर, बंगलोर, मुंबई, मद्रास व कानपूर येथे टेकनॉलॉजी व इंजीनियरिंगच्या संस्था स्थापन झाल्या आहेत. तृतीय योजनेच्या कालांत रांची येथे ओतकाम व लोखंड आणि इतर धातु शुद्ध करण्याविषयीच्या इंजीनियरिंगची एक मध्यवर्ति संस्था स्थापन करण्याचें ठरलें आहे. परंतु सर्वच विद्यार्थ्यांना पदवीपरीक्षेचा अभ्यासक्रम अगर पदव्युत्तर संशोधन करणें परवडचासारखें नसतें अथवा त्यांची बौद्धिक कुवतहि तें शिक्षण झेपण्यासारखी नसतें. अशा प्रकारच्या लोकांसाठी आज देशांत १९६ पॉलिटेकनिकस् आहेत. तृतीय योजनेच्या काळांत ६७ नवी पॉलिटेकनिक्स् निघणार आहेत. याशिवाय डिप्लोमा घेतलेल्या लोकांना अधिक शिक्षण घेण्याची संधि उपलब्ध करून देण्यासाठी अर्धवेळ अभ्यासक्रम व पत्रव्यवहाराद्वारें शिक्षण देणारे अभ्यासक्रम सुरू करण्याचा विचार चालू आहे. चौदा ते सतरा वर्षाच्या मुलांसाठी दुसऱ्या योजनेच्या काळांत ३८ कनिष्ठ तांत्रिक शाळा सुरू करण्यांत आल्या होतया. तृतीय योजनेच्या काळांत अशा आणखी ९६ शाळा स्थापन करण्यांत येतील. तांत्रिक शिक्षण घेणाऱ्या लोकांना अधिक शिष्यवृत्त्या देता याव्यात म्हणून ८ कोटी रुपयांची तरतूद तृतीय योजनेंत आहे. द्वितीय योजनेंत तांत्रिक शिक्षण घेण्याच्या फक्त विद्यार्थ्यांना ८ टक्केअशी मदत मिळाली. आता १८ टक्के विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देता येईल.

इंजीनियरिंग व टेकनॉलॉजीप्रमाणे इतर व्यवसायांच्या शिक्षणाकडेहि भारत सरकारने लक्ष पुरविलें आहे. नियोजन ( Planning ) व शिल्पशास्त्र (Architecture) च्या दिल्ली येथील महाविद्यालयाचें काम पूर्ण करण्याचा संकल्प तृतीय योजनेंत आहे. त्याचप्रमाणे मुद्रण ( Printing ) व शिलामुद्रण ( Lithography) च्या अलाहाबाद, मुंबई, कलकत्ता आणि मद्रास येथे स्थापन झालेल्या चार प्रादेशिक संस्थांची अधिक वाढ करून दिल्ली येथे याबाबतची एक केंद्रीय संस्था स्थापन करण्याचा संकल्प तृतीय योजनेंत आहे. धंदेविषयक व्यवस्थापनाच्या ( business management ) संस्था आज अनेक ठिकाणीं आहेत. तृतीय योजनेंत अशी एक अखिल भारतीय संस्था स्थापन होईल. तसेच देशांत आज नवीन उभारल्या जाणाऱ्या उद्योगधंद्यांसाठी प्रशिक्षित कुशल कामगारांची ( craftsmen ) गरज आहे. प्रथम व द्वितीय योजनांच्या काळांत या हेतूच्या पूर्ततेसाठी १६७ प्रशिक्षण केंद्रें स्थापन करण्यांत आलीं. तृतीय योजनेंत ही संख्या ३१८ पर्यंत जाईल. नोकरींत असणाऱ्या औद्योगिक कामगारांसाठी सायंशिक्षणाच्या वर्गांची संख्या वाढवून त्यांत ११,००० कामगारांच्या शिक्षणाची सोय करण्यात येईल. द्वितीय योजनेच्या कालांत अशा प्रकारचें शिक्षण घेणाऱ्यांची संख्या फक्त २,००० होती.

याच संदर्भांत उल्लेख करण्यासारखी आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रादेशिक शिक्षण महाविद्यालयांची योजना होय. आपल्या देशांत आज दोन हजार बहुउद्देशीय माध्यमिक शाळा चालू आहेत. परंतु या शाळांतून शिकविल्या जाणाऱ्या गृहशास्त्र, वाणिज्य, शेती इत्यादि विषयांच्या दृष्टीने शिक्षकांच्या विशेष प्रशिक्षणाची सोय नव्हती. तृतीय पंचवार्षिक योजनेंत ही गरज लक्षांत घेऊन चार प्रादेशिक शिक्षण महाविद्यालयांची उभारणी करण्याचें ठरलें आहे. भुवनेश्वर, भोपाळ, म्हैसूर व अजमीर या चार ठिकाणीं हीं महाविद्यालयें स्थापन होतील व त्यामुळे बहुउद्देशीय शाळांना त्यांच्या विशेष विषयांसाठी प्रशिक्षित शिक्षक मिळतील.

वरील माहितीवरून असें दिसून येईल की आपल्या देशाची औद्योगिक भरभराट करण्यासाठी जरूर असणारे कुशल कामगार, तंत्रज्ञ व संशोधक निर्माण करण्यासाठी भारत सरकारचा आटोकाट प्रयत्न चालू आहे.

### व्यावसायिक शिक्षणाचा एक भाग व्यवसाय मार्गदर्शन :—

आपण यापूर्वीच्या विवेचनांत हें पाहिलें की आज अनेक नवीन व्यवसाय निर्माण होत आहेत व एकाचा व्यवसायाच्या विविध शाखांचा विस्तारहि इतका

वाढला आहे की त्या शाखेचें विशेष शिक्षण घेणें अवश्य ठरलें आहे. उपलब्ध व्यवसायांची संख्या वाढल्याने कोणत्या व्यवसायांत शिरणें हितावह ठरेल याचा विचार आज विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना करावा लागतो. एकाच ठिकाणीं अनेक दिशांना जाणारे रस्ते दिसले म्हणजे प्रवासी जसा भांबावून जातो त्याप्रमाणे आज विद्यार्थ्यांची व अनेकदा पालकांचीहि स्थिति होते. परंतु आपल्याला कोठे जावयाचें आहे, किती वेळांत जावयाचें आहे, त्यासाठी जरूर तें शारीरिक व आर्थिक बळ आपल्याजवळ आहे काय हें पाहून ज्याप्रमाणे आपण कोणता मार्ग पत्करावा हें ठरवितो त्याप्रमाणे एकाद्या व्यवसायासाठी लागणारी बौद्धिक कुवत व इतर गुण, त्यासाठी जरूर असणारें शिक्षण, शिक्षणक्रमाची मुदत, त्यासाठी येणारा खर्च, शिक्षणक्रम पूर्ण झाल्यानंतर मिळू शिकणारे रोजगार या सर्व बाबींचा विचार करूनच व्यवसाय निश्चित करावा लागतो. मात्र आज अनेक विद्यार्थी जेव्हा अभ्यासक्रम निवडतात म्हणजेच पर्यायाने भावी व्यवसायाची निवड करतात--तेव्हा त्यांत फारशी शास्त्रीय दृष्टि नसते. याचा परिणाम म्हणजे अनेक विद्यार्थी निवडलेला अभ्यासक्रम पूर्ण करू शकत नाहीत. त्यांना अपयशाचा जबर फटका बसतो, पालकांचा पसा व्यर्थ जातो, व्यक्तीची वृत्ति व कल विशिष्ट व्यवसायाला अनुकूल नसेल तर अनेकदां जरूर तो शिक्षणक्रम पूर्ण करूनहि ती व्यक्ति त्या व्यवसायांत यशस्वी ठरूं शकत नाही. यांतहि राष्ट्राचा पैसा वायाच जातो, तेव्हा व्यक्तीच्या सफल जीवनाच्या दृष्टीने अगर राष्ट्राच्या उन्नतीच्या दृष्टीने अशी अनमानधवक्याची, अशास्त्रीयपणें केली जाणारी व्यवसायांची निवड अयोग्य आहे हें कोणीहि मान्य करील. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर कालांत व्यवसाय मार्गदर्शनाच्या कामाला चालना मिळाली आहे. या प्रकारच्या मार्गदर्शनाची आवश्यकता किती तीव्र आहे हें पाहण्यासाठी आपण अमेरिकेचें उदाहरण घेऊं. येथे या कामाला सुरवात होऊन कित्येक वर्षें लोटलीं आहेत आणि तरीहि शाळेंतून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे निश्चित प्रकारच्या व्यावसायिक योजना तरी नसतात अगर ज्या योजना असतात त्यांचा व्यक्तीच्या गुणांशी व नोकरीच्या संधीशी मेळ तरी नसतो.* त्याचप्रमाणे डॉक्टर होऊं इच्छिणाऱ्यांपैकी पन्नास टक्के विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयांत प्रवेश मिळू शकेल असे गुण ( Grades ) नसतात, शिक्षक बनू पाहणाऱ्यांपैकी पंचाहत्तर टक्के लोकांना जो विषय ते भावी कालांत शिकविणार त्यांत ऐंशी टक्यांहून कमी गुण असतात,

* "Large numbers of boys and girls on the point of leaving school either have no vocational plans or have plans which are quite out of line with their own demonstrated abilities and with opportunities for employment"—High School and life - Francis Spaulding p. n.--55.

आणि दंतवैद्य होऊं इच्छिणाऱ्यांपैकी पन्नास टक्के विद्यार्थ्यांना दंतवैद्यक विद्यालयाची किमान गुणसंख्येची अट पुरी करता येत नाही अशी स्थिति असल्याची नोंद व्यवसाय मार्गदर्शनाच्या मासिकांत आहे.* आज भारतांत तर लाखो खेड्यापाड्यांत व गावांत अनेक गायक, नर्तक, नट, लेखक, तंत्रज्ञ एकाद्या समुद्राच्या तळाशी पडून राहणाऱ्या रत्नांप्रमाणे कधी प्रकाशांत येतच नाहीत. हजारो तरुण तरुणींच्या शक्तीला योग्य वळण न लागल्याने ते सफल जीवन जगूं शकत नाहीत व देशाला त्यांच्या गुणांचा व्हावा तसा उपयोग होत नाही. म्हणूनच व्यवसाय मार्गदर्शन ही आज भारताची निकडीची गरज आहे. व्यक्तीला योग्य व्यवसायाची निवड करून त्यास जरूर तें शिक्षण घेण्यास व त्यानंतर त्या व्यवसायांत पदार्पण करून त्यांत प्रगति साधण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शनाच्या प्रक्रियेंत मदत केली जाते.† मात्र या प्रक्रियेंत कोणता व्यवसाय निवडावा याबद्दलचा निर्णय मार्गदर्शकाने द्यावयाचा नसतो. स्वतःचे गुण व मर्यादा यांची जाणीव ठेवून योग्य व्यवसाय निवडण्यास मार्गदर्शकाने मदत करावयाची असते.

स्वातंत्र्योत्तर कालांत भारत सरकारने देशाच्या गरजा लक्षांत घेऊन शिक्षणाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न चालविला आहे. ब्रिटिश राजवटींत बुद्धिपुरस्सर दुर्लक्षिल्या गेलेल्या व्यवसाय शिक्षणाकडे म्हणूनच आज अधिक लक्ष दिलें जातें. पदवीचा अप्रस्तुत बडिवार, महाविद्यालयांकडे धाव घेणाऱ्या विद्यार्थ्यांची अफाट संख्या, विविध व्यवसायांत जाणवणारी कुशल कामगारांची व तंत्रज्ञांची तीव्र उणीव, समाजांतील पोषाखी वृत्ति, महाविद्यालयीन परीक्षांत नापास होणाऱ्यांची प्रचंड संख्या व त्यामुळे राष्ट्राचें होणारें आर्थिक नुकसान अशा कितीतरी समस्यांवर विविध व्यवसायांच्या संघटित व शास्त्रशुद्ध शिक्षणाची सोय हा एक तोडगा आहे. भारत सरकारने योग्य दिशेने पाऊल उचललें आहे. पुढील पंचवीस वर्षे भारतीय जीवनांत क्रांतिकारक बदल खचित घडवून आणतील.

⚜ ⚜ ⚜

---

* The vocational Guidance Magazine — XVI p. 36.

† "Vocational guidance is the process of assisting the individual to choose an occupation, prepare for it, enter upon and progress in it. It is concerned primarily with helping individuals make decisions and choices involved in planning a future and building a career"— Principles and techniques of vocational guidance — Myres —p. n.--3.

## संदर्भ ग्रंथांचीं नांवें

1 ) Vocational education for a changing world – F. Struck.

2 ) Principles and practices of vocational education – Mays.

3 ) Forty second year book Part I of the National Society for the study of Education.

4 ) Principles and techniques cf vocational guidance – Myers.

5 ) Report of the Secenbary Education commission.

# भारताचा भाषिक प्रश्न : १० :

## एक ज्वलन्त समस्या :

भारतीय शैक्षणिक क्षेत्रांत सर्वांत अधिक चर्चिला गेलेला व अतिशय गुंतागुंतीचा प्रश्न म्हणजे भाषाविषयक प्रश्न होय. या प्रश्नासंबंधीं इतकीं परस्परविरोधीं विभिन्न मतें मोठ्या हिरीरीने मांडण्यांत आलेलीं आहेत की सामान्य माणसाला आपलें मत नि:पक्षपातीपणें बनविणें जवळजवळ अशक्य झालें आहे. हा प्रश्न आजकाल अगदी नव्याने निर्माण झाला आहे असें मुळीच नव्हे. इंग्रजी शिक्षणाच्या सुरुवातीपासून म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांतच या भाषाविषयक प्रश्नाला तोंड लागलें. अर्थात् त्या वेळचें त्याचें स्वरूप निराळें होतें. त्या वेळेपासून आजतागायत या ना त्या स्वरूपांत हा प्रश्न एकसारखा मतभेदाचा विषय म्हणून भारतापुढे आहे. भारतीय घटनेने सूचित केलेला भाषाविषयक बदल आज निरनिराळ्या पक्षोपपक्षांना अनेक कारणांमुळे मान्य नाही व या संबंधात मतप्रदर्शन करतांना ते अगदी युध्यमान राष्ट्रांच्या पवित्र्यांत उभे राहून आग्रही अभिनिवेशाने आपापली बाजू मांडीत असतात. "हा प्रश्न भावनांमध्ये इतका गुरफटला आहे की त्याचा शांतपणें व तटस्थपणें विचार करणें दुर्घट झाले आहे."* भाषावार प्रांतरचनेच्या आंदोलनामुळे या प्रश्नाला एक नवीनच धार निर्माण झाली आहे व अतिरेकी प्रादेशिक भाषाभिमानामुळे प्रांताप्रांतामध्ये तीव्र कटुता निर्माण झाली. भारतीय एकात्मतेला तडे जातात की काय अशी भीति कांही काळापूर्वी निर्माण झाली होती. परकीय आक्रमणामुळे भारतीयांच्या एकात्मतेचें पुन: एकहा हृद्य दर्शन घडलें ही गोष्ट निराळी ! अनेक भाषांबरोबर भारतांत अनेक लिप्याहि प्रचलित आहेत व त्यांमुळे या वादांत लीपीसंबंधीच्या आणखी एका पैलूची भर पडली आहे. विज्ञानाच्या विभिन्न शाखांच्या व इतर तांत्रिक विषयांच्या अभ्यासासाठी जी परिभाषा आवश्यक असते ती भारतीय

---

* "It (the language problem) is so wrapped up in sentiment that it is difficult to consider it in a calm and detached manner." —Page 305 Chap. IX—Report of the University Education Commission.

भाषांमधून सध्यातरी रूढ झालेली नसल्याने या प्रश्नाची गुंतागुंत अधिकच वाढली आहे. भारतीय भाषांपैकी एकहि भाषा इंग्रजीची जागा घेण्याच्या दृष्टीने पुरेशी समृद्ध नाही. म्हणून भाषाविषयक बदल करण्यासंबंधीच्या वादाला राजकीय व शासनात्मक बाजूहि निर्माण झाल्या आहेत. संघराज्याची कारभाराची भाषा म्हणून हिंदी भाषेला घटनेने मान्यता दिलेली असली तरी राष्ट्रभाषा म्हणून तिला मान्यता देण्यास अनेकांचा विरोध आहे. दक्षिण भारतांतील कांही राजकीय पक्ष 'हिंदीचा साम्राज्यवाद' म्हणून हिंदीला विरोध करतात; तर इंग्रजी आणखी कांही दिवस राज्यकारभाराची भाषा म्हणून कायम ठेवण्याच्या तरतुदींत दुसऱ्या कांही पक्षांना 'इंग्रजी राजवटीची अवशिष्ट गुलामगिरी' दिसते. हिंदी राष्ट्रभाषा झाल्यास केंद्रीय शासनांत व त्याच्या यंत्रणेंत हिंदीभाषी लोकांचेंच वर्चस्व राहील अशी अहिन्दी राज्यांतील लोकांना धास्ती वाटते. सरकारी शासनाची भाषा म्हणून इंग्रजीबरोबर निदान जिल्हापातळीपर्यंत प्रादेशिक भाषेचा वापर केला जातो; परंतु आंतरराज्यसंबंध, न्यायालयें, केंद्रीय शासन, तसेंच परराष्ट्रसंबंध यांसाठी तूर्त तरी इंग्रजीशिवाय तरणोपाय दिसत नाही. इंग्रजीच्या उच्चाटनाबद्दल भल्याभल्यातच तीव्र मतभेद आहेत. तत्संबंधीं उपाय व वेळापत्रक यांची गोष्ट दूरच आहे. कारण अनिश्चित कालपर्यंत इंग्रजीला राज्यकारभाराची सहभाषा (associate language) म्हणून कायदेशीर स्थान नुकतेंच प्राप्त करून देण्यांत आलें आहे. अशा रीतीने राजकारणी लोक, समाजाचे नेते, शिक्षणतज्ज्ञ आणि विचारवंत परस्परविरुद्ध व अनेक वेळां एकांतिक मतांचा पाठपुरावा करतांना दिसतात. म्हणून या प्रश्नाचा विचार त्रयस्थ वृत्तीने, साकल्याने व शैक्षणिक दृष्टिकोनांतून करणें अवश्य आहे.

## प्रश्नाचें स्वरूप :

भाषिक प्रश्नाचा शैक्षणिक दृष्टिकोनांतून विचार करतांना त्याच्या मुख्य दोन बाजू विचारांत घेतल्या पाहिजेत. भारतांत सुमारे १७९ भाषा आणि ५४४ बोली प्रचलित आहेत.* शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक भारतीयाला किमान किती भाषांचा अभ्यास अवश्य असावा ही या भाषिक प्रश्नाची एक बाजू आहे. या भाषा त्याने शिक्षणाच्या कोणत्या अवस्थेंत शिकाव्यात हेंहि ठरवावें लागेल. मातृभाषा, प्रादेशिक भाषा, इंग्रजी व हिंदी या अखिल भारतीय स्वरूपाच्या भाषा, अन्य भारतीय प्रादेशिक भाषा, इंग्रजीखेरीज अन्य परकी भाषा, संस्कृत-फारसीसारख्या पुरातन अभिजात भाषा या सर्वांमध्ये अग्रक्रम कोणाला व

* पृ. २०, सरकारी भाषामंडळाचा अहवाल १९५६--प्रसिद्धीखातें, मुंबई सरकार.

व्यावहारिक महत्त्वाच्या दृष्टीने आणि शैक्षणिक दृष्टयाहि इतरांचा क्रम कसा लावावा, कोणती भाषा केव्हा शिकावी, कोणत्या भाषांचा अभ्यास वैकल्पिक असावा, अनिवार्य अभ्यासाच्या भाषा कोणकोणत्या अवस्थेंत किती मर्यादेपर्यंत अभ्यासाव्यात, मुलांच्या वयोमानानुसार किती भाषांचा अभ्यास इष्ट आहे इत्यादि प्रश्नांचा विचार करणें या संदर्भांत क्रमप्राप्त ठरतें.

या प्रश्नाची दुसरी बाजू म्हणजे शक्षणिक माध्यमाचा विचार ही होय. शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेंत व बऱ्याच अंशाने माध्यमिक शिक्षणांतहि हा प्रश्न फारसा भेडसावीत नसला, तरी विश्वविद्यालयीन शिक्षणाच्या बाबतींत मात्र तो फार बिकट आणि विवाद्य ठरला आहे. एकदोन अपवाद सोडल्यास महाविद्यालयांतील माध्यम इंग्रजी अंमल संपेपर्यंत इंग्रजीच होतें. स्वातंत्र्योत्तर कालांत त्यांत बदल करण्याच्या दृष्टीने हालचाल सुरू झाली. म्हणून प्रादेशिक भाषा, हिंदी व इंग्रजी यांपैकी कोणती भाषा उच्चशिक्षणांत माध्यम म्हणून स्वीकारावी असा प्रश्न निर्माण झाला. पदवी परीक्षेपर्यंतचें शिक्षण व पदव्युत्तर अभ्यासक्रम या दोन विभागांसाठी एकच माध्यम असावें की भिन्न, आंतरविश्वविद्यालयीन संबंधाच्या दृष्टीने कोणतें माध्यम इष्ट, संशोधनकार्यांत एकसूत्रता येण्यासाठी अखिल भारतांत एकच माध्यम असण्याची जरूरी आहे काय, विद्यार्थी व प्राध्यापक यांना एका विश्वविद्यालयांतून दुसऱ्यांत जाण्यामध्ये कोणत्या अडचणी येतील; विज्ञान, कायदा, वैद्यक, यंत्रशास्त्र, तांत्रिक विषय वगैरेसाठी माध्यम व परिभाषा कोणती वगैरे प्रश्न आपणांपुढे आहेत. इंग्रजी माध्यम बदलण्याने कोणते परिणाम घडतील याचा काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. महाविद्यालयीन माध्यमाचा माध्यमिक अभ्यासक्रमावर महत्त्वाचा परिणाम होत असतो. त्याचाहि विचार आपणांस करावा लागेल. क्रमिक पुस्तकें, लीपि व तिची टंकलेखन सुकरता, नवें माध्यम हाताळणारे तज्ज्ञ शिक्षक, नव्या माध्यमामुळे विद्यार्थ्यांना अखिल भारतीय नोकऱ्या व इतर संधि मिळविण्यांत येणाऱ्या अडचणी वगैरे आनुषंगिक प्रश्नांचा विचार केल्याशिवाय भाषिक प्रश्नाची उकल होणार नाही. इतके लहानमोठे प्रश्न या एकाच समस्येंत अंतर्भूत असल्याने त्यावर सर्वमान्य तोडगा अजून कां सांपडला नाही हें लक्षांत येऊं शकेल.

## पूर्वेतिहास :

या प्रश्नाची पूर्वपीठिका समजून घेण्यासाठी इंग्रजी अंमलांतील शिक्षणाच्या इतिहासाकडे ओझरती नजर टाकणें भाग आहे. भाषाविषयक प्रश्नांसंबंधीचा वाद भारतांत इ. स. १८१३ पासून सुरू झाला असें म्हणावयास हरकत नाही. ईस्ट-

इंडिया कंपनीची सनद जेव्हा नूतनीकरणासाठी ब्रिटिश पार्लमेंटसमोर आली त्यावेळी इंग्लंडमध्ये कंपनीच्या धर्मविषयक धोरणाबरोबरच कंपनी सरकारच्या शिक्षणविषयक जबाबदारीच्या प्रश्नाची खूप चर्चा झाली. ई. इं. कंपनी व्यापाराबरोबरच राज्यविस्तारहि करीत होती. म्हणून कंपनी सरकारने हिंदी लोकांच्या शिक्षणासंबंधी जबाबदारी स्वीकारावी काय आणि ती स्वीकारल्यास त्या शैक्षणिक कार्यवाहीची व्याप्ति व स्वरूप काय असावें असा प्रश्न चर्चिला जात होता. शेवटी पार्लमेंटने कंपनीच्या निव्वळ फायद्यांतून एक लक्ष रुपये बाजूस काढून दरवर्षी ते शैक्षणिक कार्यासाठी खर्च करण्याचा कायदेशीर अधिकार गव्हर्नर जनरलला दिला. ही रकम 'वाङ्मयाच्या पुनरुज्जीवनासाठी व अभिवृद्धीसाठी, एतद्देशीय विद्वानांना उत्तेजन देण्यासाठी, तसेंच हिंदुस्थानांतील ब्रिटिश प्रजाजनांना विज्ञानाचें शिक्षण देण्यासाठी' खर्च करण्यांत यावी असा आदेश सनदेच्या ४३ व्या कलमांत दिलेला होता.* यांतील वाङमय व एतद्देशीय विद्वान यांसंबंधींचा उल्लेख संस्कृत-अरबी भाषांना अनुलक्षून आहे हें उघड आहे व त्यानंतरचा विज्ञानाच्या शिक्षणाचा संबंध इंग्रजींतून द्यावयाच्या आधुनिक ज्ञानाशी आहे. त्यामुळे संस्कृत व अरबी या भाषांतून शिक्षण द्यावें की इंग्रजी माध्यमांतून द्यावें यासंबंधीं फार मोठा वाद हिंदुस्थानांत चालू झाला. कंपनीचे जुने अधिकारी संस्कृत-अरबीचे पक्षपाती होते; तर मन्रो आणि एल्फिन्स्टनसारखे कांही अधिकारी भारतीय आधुनिक भाषांतून हें ज्ञान द्यावें अशा मताचे होते. जगन्नाथ शंकरशेटसारखे कांही भारतीय नेतेहि याच मताचा पाठपुरावा करीत होते. राजा राममोहनरॉय वगैरे भारतीय पुढारी व कंपनीचे कांही अधिकारी इंग्रजी माध्यमाचे व पाश्चात्य शिक्षणाचे पुरस्कर्ते होते व लॉर्ड मेकॉलेकडे त्यांचें नेतृत्व होतें. इ. स. १८३५ मध्ये मेकॉलेने आपल्या राजकीय धोरणानुसार इंग्रजीच्या बाजूने या वादाचा निर्णय दिला व लॉर्ड बेंटिकने त्यावर शिक्कामोर्तब केलें. या वादांत आधुनिक भारतीय भाषांकडे पूर्णपणें दुर्लक्ष करण्यांत आलें व त्यामुळे ब्रिटिशांच्या दीडशे वर्षांच्या आमदानींत त्यांचा विकास फारच कमी झाला. जर त्यावेळींच माध्यम म्हणून त्याचा स्वीकार करण्यांत आला असता तर आज त्या पुरेशा समृद्ध व संपन्न झाल्या असत्या व आज दिसणारा किचकट स्वरूपाचा भाषिक प्रश्नच उरला नसता. त्यावेळी प्रति-

* "..... a sum of not less than one lac of rupees in each year shall be set apart and applied to the revival and improvement of literature and the encouragement of the learned natives of India, and for the introduction and promotion of a knowledge of the science among the inhabitants of the British territories in India."—Page 46, A Student, History of Education in India—Narullah and Naik.

पाढिल्या गेलेल्या पाझर-पद्धतीच्या तत्त्वाचा ( Downward Filtration or Percolation Theory ) फोलपणा काळाने नंतर दाखविला. इंग्रजी भाषेच्या द्वारें ज्ञानसंपन्न झालेले वरच्या थरांतील लोक समाजांतील खालच्या इतर लोकांना त्यांच्या मातृभाषेंतून शिक्षण देऊन सुविद्य करतील व पाश्चात्य विद्येचा प्रसार या मार्गें झपाट्याने होईल ही कल्पना सपशेल चुकीची ठरली. इंग्रजी माध्यमामुळे शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होऊंच शकला नाही. सर चार्लस वुड यांच्या सुप्रसिद्ध खलित्यांत (१८५४) देशी भाषांचें महत्त्व व त्यांच्या विकासाची आवश्यकता यांची जाणीव दिसून येते. * युरोपीय ज्ञानाच्या प्रसारासाठी इंग्रजी व एतद्देशीय भाषा या दोहोंचाहि उपयोग व्हावा असें त्यांत स्पष्टपणें म्हटलें आहे. परंतु त्या खलित्यांतील इतर चांगल्या शिफारसींप्रमाणे हीहि फक्त कागदावरच राहिली व इंग्रजीचा हानिकारक वरचष्मा तसाच कायम राहिला. या उपेक्षेचा परिणाम शेवटी असा झाला की जरी शिक्षणाचा व्याप १९ व्या शतकाच्या अखेरीस खूपच वाढला तरी माध्यमिक व उच्च शिक्षणांत इंग्रजी भाषा हीच माध्यम म्हणून राहिली. इंडियन युनिव्हर्सिटीज् कमिशनने स. १९०२ मध्ये आपल्या अहवालांत नमूद केल्याप्रमाणे एका मद्रास विश्वविद्यालयाचा अपवाद वगळतां कोणत्याहि विद्यापीठांत एकहि आधुनिक भारतीय भाषा अभ्यासाचा विषय म्हणून कोणत्याहि परीक्षेसाठी स्वीकृत केली गेली नव्हती. अर्थात् त्यांचा माध्यमिक शाळेंत किंवा महाविद्यालयांत माध्यम म्हणणून उपयोग करणें ही गोष्ट तर फारच दूर !

लॉर्ड कर्झनच्या प्रेरणेने शैक्षणिक धोरणांत जे बदल करण्यांत आले, त्यांनुसार माध्यमिक शिक्षणाच्या खालच्या विभागांत ( मिड्लस्कूल ) मातृभाषा हें माध्यम असावें व वरच्या विभागांत ( हायस्कूल ) माध्यमासाठी इंग्रजीचा उपयोग करावा असें ठरविण्यांत आलें. इ. स. १९२१-२२ पर्यंत ही सुधारणा अंमलांत आली. इ. स. १९०४ च्या इंडियन युनिव्हर्सिटीज ॲक्टांन्वयें विश्वविद्यालयांतून आधुनिक भारतीय भाषांच्या अभ्यासाची तरतूद करण्यांत आली. कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशननेहि आपल्या अहवालांत अशाच स्वरूपाची जोरदार शिफारस केली होती. तरीहि सन १९२१-२२ पर्यंत या दृष्टीने विशेष प्रगति झालेली

* "We look, therefore, to the English language and to the vernacular languages of India together as the media for the diffusion of European knowledge and it is our desire to see them cultivated together in all schools in India of a sufficiently high class to maintain a school master possessing the requisite qualifications."—Quoted on page 115, A Student's History of Education in India—Narullah and Naik.

नव्हती. इ. स. १९१९ च्या गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्टप्रमाणे अस्तित्वांत आलेल्या द्विदलराज्यपद्धतीच्या काळांत (१९२१ - ३७) मात्र बहुतेक माध्यमिक शाळांतून देशी भाषांना माध्यम म्हणून स्थान मिळालें. विश्वविद्यालयांत इंग्रजी माध्यम चालूच असल्याने माध्यमिक अभ्यासक्रमांत इंग्रजीचें महत्त्वाचें स्थान राहिलें. महाविद्यालयांतून अभ्यासाचा विषय म्हणूनहि या काळांत देशी भाषांनी स्थान प्राप्त करून घेतलें. त्यानंतर प्रांतिक स्वायत्ततेच्या स्वातंत्र्यपूर्वकाळांत (१९३७-४७) ही प्रक्रिया चालू राहिली व माध्यमिक अवस्थेंत देशी भाषांच्या माध्यमाविरुद्ध ज्या अडचणींचा बाऊ करण्यांत येत होता, त्या सर्व अडचणी क्रमाक्रमाने नाहींशा झाल्या. देशी भाषांत लिहिलेलीं क्रमिक पुस्तकें पुरेशा प्रमाणांत उपलब्ध झालीं व थोड्याफार प्रमाणांत आवश्यक परिभाषाहि रूढ झाली. अशा रीतीने स्वातंत्र्याच्या प्रभातकाळीं माध्यमिक शिक्षणांतील माध्यमाबद्दलचा प्रश्न बऱ्याचअंशीं सुटून तें स्थान देशी आधुनिक भाषांना देण्यांत आलें होतें. माध्यमिक शिक्षणक्रमांत किती भाषांचा अभ्यास करावा किंवा कोणत्या भाषांना कोणतें महत्त्व मिळावें या प्रश्नांची सोडवणूक मात्र झालेली नव्हती.

## भाषिक प्रश्नाची शासनात्मक व राजकीय अंगें :--

भाषाविषयक प्रश्नाला राजकीय व शासनात्मक बाजू असतात असें वर एके ठिकाणीं म्हटलें आहे. भारतीय संघराज्याची कारभारविषयक भाषा कोणती असावी, राज्यभाषा म्हणून प्रादेशिक भाषांपैकी एका किंवा अधिक भाषांना मान्यता मिळावी काय, संसदेचें व विधिमंडळाचें कामकाज कोणत्या भाषांतून चालावें, न्यायालयांनी विविध पातळीवर कोणती भाषा वापरावी व कायद्याची भाषा एकसूचत्रतेच्या दृष्टीने कोणती असावी, सध्याच्या एतद्विषयक व्यवस्थेंत कोणते बदल करावेत इत्यादि प्रश्न शासनविषयक होत. पण जनतेंत एकात्मता व राष्ट्रीयत्व निर्माण व्हावें यासाठी एका राष्ट्रभाषेची निवड करणें हा प्रश्न राजकीय स्वरूपाचा आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांतून व परिषदांतून आपल्या राष्ट्राची बाजू प्रभावीपणें मोडतां येण्याच्या दृष्टीने इंग्रजीसारख्या परकीय भाषेचा अवलंब करणें व त्यासाठी तिच्या शिक्षणाची योग्य तजवीज करणें कांही मर्यादेपर्यंत तरी आवश्यक ठरतें. यामागील कारणहि राजकीयच आहे.

## राष्ट्रीयत्व व भाषिक अल्पसंख्यांक :--

राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होण्याचीं अनेक कारणें आहेत. सर्वांची एक मातृभूमि, जुन्या इतिहासाचे समान बंध, सांस्कृतिक परंपरेंतील समान भागीदारी, कांही वेळां समान धर्म व समान भाषा यांमधून एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण

होते. अमेरिकन जनता अनेक वंशांची, अनेक धर्मांची व वर्णभेद असलेली अशी मिश्र स्वरूपाची आहे. तथापि इंग्रजी भाषेच्या धाग्याने सर्व राष्ट्र एकत्र गुंफलें गेलें आहे. एक धर्म, एक भाषा, राजेशाही व दीर्घ परंपरा यांवर ब्रिटिश लोकांची राष्ट्रीय भावना भक्कमपणें उभी आहे. समान भाषा हें जरी एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेचें एकमेव विषयक कारण म्हणतां येणार नाही तरी त्यासंबंधी जाणिवेचा तो एक प्रभावी धागा आहे यांत मात्र शंका नाही.

भाषिक अल्पसंख्यांकाचा प्रश्न हा या भाषिक प्रश्नाचा आणखी एक राजकीय पैलू आहे. बहुतेक सर्वच देशांना हा प्रश्न विचारांत घ्यावा लागतो. राज्यकारभाराच्या कोणत्याहि अंगाचा विचार करतांना शासनसंस्थेला भाषिक माध्यमाचा प्रश्न सोडविणें भाग असतें. एका राष्ट्रांत अनेक भाषिक गट अस्तित्वांत असतात. या भाषिक गटांच्या आत्मीयतेच्या भावना भाषा या मानचिन्हाभोवती एकत्रित होतात. कित्येकदा हीच भाषाविषयक अस्मिता राष्ट्रीयत्वाचें चिन्ह मानली जाते. परंतु राजकीय सरहद्दी व भाषिक सरहद्दी केव्हाच एक नसतात. भारताची राजकीय कारणांमुळे फाळणी झाली. बंगालचा पूर्वभाग पाकिस्तानचा भाग बनला, पण या राजकीय सरहद्दीच्या बदलाबरोबर भाषिक हद्द थोडीच बदलणार ? पाकिस्तानची राष्ट्रभाषा जरी उर्दू असली, तरी पूर्व बंगालची जनता नित्याचा व्यवहार बंगालींतच करणार हें उघड आहे. पश्चिम पंजाबमधील लोक हे पाकिस्तानांत पंजाबी भाषिक अल्पसंख्य म्हणूनच राहिले व त्यांच्या भाषेचा प्रश्न निर्माण झाला. भारतांत मुख्यतः शासनविषयक सोयींसाठी व काही अंशीं राजकीय कारणामुळे भाषावार प्रांतरचना करण्यांत आली. परंतु कितीहि निःपक्षपातीपणें व कांटेकोरपणें आंखणी केली तरी दोन राज्यांच्या हद्दीवर असे कित्येक पट्टे आढळतील की त्यांतील कांही खेडीं व गावें एका राज्याची भाषा बोलणारीं असूनहि त्यांचा अंतर्भाव दुसऱ्या राज्यांत झालेला आहे. द्विभाषिक मुंबई राज्याच्या विसर्जनानंतर महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात इत्यादि भाषावार राज्यें निर्माण झालीं. मराठी भाषा बोलणारे बहुसंख्य लोक महाराष्ट्र राज्यांत आले तरी कांही शेजारच्या राज्यांत राहिले. त्यांचा प्रश्न त्या त्या राज्यसरकारांपुढे उभा राहिला. उलट महाराष्ट्र सरकारला सीमेवरील गुजराती व कानडी भाषा बोलणाऱ्यांसाठी शाळा, शासनविषयक तरतुदी इ. उपाय योजावे लागलेच. जेथे शासनविषयक प्रश्नांशीं राजकीय प्रश्नाची अदूरदर्शीपणें गल्लत केली जाते, तेथील जनतेची भाषिक अस्मिता प्रमाणाबाहेर ताणली जाते व भाषिक अल्पसंख्यांकांचा प्रश्न प्रखर बनतो. क्वचित् राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाण्यापर्यंत त्याची मजल जाते. दक्षिण भारतांतील हिंदीला होणारा प्रखर विरोध व त्यामागील राजकारण लक्षांत घेतां वरील विधानाची सत्यता पटेल. या विविध प्रश्नांसंबंधीं विचार करतांना आपणांला मुख्यतः शैक्षणिक दृष्टिकोनच अंगिकारा-

वयाचा आहे; तथापि अशा प्रश्नांत राजकीय व इतर प्रश्नांची किती गुंतागुंत झालेली असते हें वरील विवेचनावरून लक्षांत येईल. भाषिक हक्क, शैक्षणिक सोयी, कारभारविषयक तरतुदी यासंबंधीं भारतीय घटनेने कोणते आदेश दिलेले आहेत हें पाहणें या संदर्भांत उद्बोधक ठरेल; कारण त्यांच्या पार्श्वभूमीवरच आपणांस यापुढे कोणताहि पवित्रा घ्यावा लागेल किंवा प्रचलित मतामतांचें मूल्यमापन करावें लागेल.

## भारतीय घटनेंतील भाषाविषयक तरतुदी :--

भारताच्या घटनेंत भाषिक हक्क, भाषाशिक्षणाच्या सोयी, कारभारभाषा इत्यादींसंबंधीं ज्या तरतुदी करण्यांत आल्या आहेत त्यांतील अभिप्राय व त्यांमागील दृष्टिकोन यासंबंधांत विद्वानांत मतभेद आढळून आले असें मुदलियार आयोगाने आपल्या अहवालांत म्हटलें आहे. त्यामुळे घटनेंत या संबंधांत कोणत्या तरतुदी केल्या गेल्या आहेत याचा आढावा घेणें अवश्य आहे.

घटनेच्या तिसऱ्या भागांत २९ व्या कलमामध्ये अल्पसंख्यांकांच्या भाषेचें, लीपीचें व संस्कृतीचें संरक्षण करण्याचा त्यांचा हक्क मान्य करण्यांत आला आहे. त्याशिवाय, राज्याने चालविलेल्या अथवा राज्यसरकारच्या मदतीवर चालणाऱ्या कोणत्याहि शिक्षणसंस्थेंत केवळ भाषाभिन्नतेच्या सबबीवर प्रवेश नाकारतां येणार नाही अशीहि त्यांत तरतूद केलेली आहे. कलम ३० मध्ये भाषेच्या किंवा धर्माच्या दृष्टीने अल्पसंख्य असणारांना आपली शिक्षणसंस्था स्थापण्याचा हक्क आहे व अशा संस्थांना मदत देतांना राज्यसरकारांना भेदाभेद करतां येणार नाही असें नमूद केलेलें आहे.

पांचव्या भागांत कलम १२० मध्ये लोकसभेचें कामकाज हिंदी किंवा इंग्रजींत चालण्याबद्दल तरतूद आहे. त्याच कलमांत दुसऱ्या पोटकलमांत पुढील खास तरतूद आहे--"पार्लमेंटने कायदा करून अन्य व्यवस्था न केल्यास या कलमांत असलेले 'किंवा इंग्रजींत' हे शब्दहि घटना अंमलांत आल्यापासून पंधरा वर्षांनी त्या कलमांतून जणूं वगळले गेले आहेत असें समजण्यांत येईल.* या तरतुदीला अनुसरूनच गृहमंत्री श्री. लालबहादूर शास्त्री यांनी इंग्रजीला सहभाषा (asso-

* ".....that the Official language of the Union shall be Hindi and that for a period of 15 years from the commencement of the Constitution, English language shall continue to be used for all the official purposes of the Union for which it was being used immediately before such commencement."

ciate language ) म्हणून १९६५ नंतर चालू ठेवण्यासंबंधीं बिल पार्लमेंटपुढे आणलें व तें नुकतेंच मंजूर करण्यांत आलें आहे.

सहाव्या भागांतील कलम २१० मध्ये राज्याच्या कायदेमंडळाचें कामकाज त्या राज्याच्या प्रादेशिक भाषेंत किंवा हिंदींत किंवा इंग्रजींत चालेल असें नमूद केलें आहे. इतर पोटकलमें १२० व्या कलमाप्रमाणे आहेत.

घटनेचा १७ वा भाग कचेरीच्या कारभारभाषेसंबंधी आहे. ३४३ वें कलम अत्यंत महत्त्वाचें आहे. त्यांत संघराज्याची सरकारी भाषा देवनागरी लीपींतील हिंदी असेल असें स्पष्टपणें नमूद केलें आहे. त्याच्या दुसऱ्या पोटकलमांत इंग्रजी-संबंधी पुढील उल्लेख आहे--" . . . . ही घटना सुरू झाल्यानंतर पंधरा वर्षेंपर्यंत इंग्रजी भाषा संघराज्याच्या सर्व सरकारी कामकाजाकरिता ही घटना सुरू होण्यापूर्वी जशी उपयोगांत होती तशीच उपयोगांत राहील."

३४४ व्या कलमांत राष्ट्रपतींनी सरकारी भाषामंडळ व संसदीय समितीची नेमणूक करण्याबद्दल आदेश देण्यांत आलेला आहे. त्यास अनुसरून कै. बा. गं. खेर यांच्या अध्यक्षतेखाली सरकारी भाषामंडळ नेमण्यांत आलें होतें. त्या मंडळाने इ. स. १९५६ मध्ये आपला विस्तृत अहवाल राष्ट्रपतींना सादर केला. त्यानंतर कै. गोविंद वल्लभ पंत यांच्या अध्यक्षतेखाली संसदेच्या तीस सदस्यांची एक समिति नेमण्यांत आली. भाषामंडळाच्या शिफारसींचा पूर्ण विचार करून त्याबद्दलचा तपशीलवार अभिप्राय या समितीने आपल्या अहवालांतून राष्ट्रपतींना सादर केला आहे.

कलम ३४५ हें राज्यांच्या अधिकृत भाषेसंबंधीं आहे. ". . . राज्याचें कायदेमंडळ कायदा करून, राज्यांत प्रचलित असलेल्या एका किंवा अधिक भाषांना किंवा हिंदीला त्या राज्याच्या सरकारी कामकाजाकरिता भाषा किंवा अनेक भाषा म्हणून मान्यता देऊं शकेल. मात्र, राज्याच्या कायदेमंडळाकडून कायद्याने अन्यथा व्यवस्था होईपर्यंत ही घटना अमलांत येण्यापूर्वी इंग्रजी भाषा त्या राज्यांत ज्या सरकारी कामकाजाकरिता उपयोगी आणली जात होती, त्या कामकाजा-करिता तशीच उपयोगांत आणली जात राहील."*

* "The legislature of a State may by law adopt any one or more languages in use in the State or Hindi as the language or languages to be used for all or any of the official purposes of the State; provided that until the legislature of the State otherwise provides by law, the English language shall continue to be used for those official purposes within the State for which it was being used immediately before the commencement of this Constitution."

३४६ व्या कलमान्वये एक राज्य व दुसरें राज्य यामधील कामकाजाची व एक राज्य आणि संघराज्य यांमधील कामकाजाची भाषा ठरविण्यांत आली आहे. त्यांत असें नमूद केलें आहे की, "संघराज्यामध्ये सरकारी कामकाजाकरिता अधिकृत ठरली असेल तीच भाषा एक राज्य व दुसरें राज्य आणि एक राज्य व संघराज्य यांच्यामधील व्यवहाराची भाषा असेल. मात्र जर दोन किंवा अधिक राज्यांनी हिंदी भाषा हीच त्या राज्यांतील व्यवहाराची भाषा असावी असें मान्य केलें तर ती भाषा त्या व्यवहारासाठी उपयोगांत आणतां येईल." *

कलम ३४७ मध्ये राज्यांतील लोकसंख्येपैकी एका विभागाकडून बोलल्या जाणाऱ्या भाषेबद्दल खास तरतूद आहे. "जर एखाद्या राज्यांतील भरीव प्रमाणांतल्या लोकसंख्येने इच्छा प्रगट केली की, आपण बोलत असलेली भाषा ही त्या राज्याने मान्य करावी, तर राष्ट्रपतींची त्या मागणीवरून खात्री पटल्यास, राष्ट्रपति आदेश देऊन त्या आदेशांत निर्दिष्ट करतील त्या कामाकरिता, तीहि भाषा सर्व राज्यांत किंवा विभागांत अधिकृत म्हणून मानली जावी असें सांगतील."

घटनेचीं ३४८ ते ३५० हीं कलमें भाषाविषयक असलीं तरी प्रस्तुत विषयाशीं प्रत्यक्षपणें संबंधित नाहीत. कलम ३४८ मध्ये उच्चतम न्यायालय व हायकोर्ट यांमध्ये वापरावयाच्या भाषेसंबंधीं आदेश आहेत. कलम ३४९ मध्ये भाषाविषयक कायदे करण्यासंबंधीं खास तरतुदींचा अंतर्भाव करण्यांत आला आहे. कलम ३५० मध्ये तक्रारींची दाद मागण्यासंबंधीं केलेल्या अर्जाच्या भाषेसंबंधी खुलासा आहे. कलम ३५१ मध्ये हिंदी भाषेच्या विकासासंबंधीं महत्त्वाचा आदेश देण्यांत आला आहे. त्यांत म्हटलें आहे--"हिंदी भाषेचा प्रसार करणें, भारताच्या संमिश्र संस्कृतींतील सर्व घटकांच्या विचारप्रदर्शनाचें मध्यम म्हणून उपयोग होण्याकरिता तिचा विकास करणें, तिच्या स्वाभाविक वळणाला अडथळा येऊं न देतां हिंदुस्तानींतील आणि आठव्या परिशिष्टांत दिलेल्या अन्य भाषांतील घडण, घाटणी

* "The language for the time being authorised for use in the Union for official purposes shall be the official language for communication between one State and another State and between a State and the Union; provided that if two or more States agree that the Hindi language should be the official language for communication between such States, that language may be used for such communication."

पान ५११, परिशिष्ट १३ वें, सरकारी भाषा मंडळाचा अहवाल (मराठी भाषांतर .

व प्रयोग हे आपलेसे करून ती भाषा संपन्न करणें आणि जेथे आवश्यक किंवा इष्ट असेल तेथे त्या भाषेच्या शब्दसंग्रहाकरिता मुख्यतः संस्कृत आणि नंतर इतर भाषांच्या भांडारांचा उपयोग करणें हें संघराज्याचें कर्तव्य असेल." *

वरील सर्व तरतुदींचा विचार केल्यास घटनाकारांनी राष्ट्रहिताचा सर्व बाजूंनी विचार करून योग्य स्वरूपाचें भाषाविषयक धोरण आंखल्याचें दिसून येईल. भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्कांची जपणूक काळजीपूर्वक करण्यांत आलेली आहे. कारभारविषयक तरतुदीहि प्रादेशिक भाषांवर अन्याय होणार नाही अशा तऱ्हेने करण्यांत आल्या आहेत. भारतीय आधुनिक भाषा पुरेशा समृद्ध नाहीत हें सत्य विचारांत घेऊन इंग्रजी पहिलीं १५ वर्षें तरी राज्यकारभाराची भाषा म्हणून चालावी ही तरतूद करण्यांत आली व ती उचितच आहे. इंग्रजी भाषेचें हें स्थान तसेंच पुढे चालू ठेवण्याबद्दल संसदेपुढे विधेयक येतांच त्यासंबंधांत उलटसुलट खूपच चर्चा झाली व राष्ट्राने पूर्ण विचारांतीं तें मान्य केलें. याचा शैक्षणिक धोरणावर परिणाम होणें अपरिहार्य होतें. माध्यमिक शिक्षणांत किती भाषा शिकणें आवश्यक असावें या प्रश्नाची चर्चा करतांना इंग्रजीला जरी दुय्यमस्थान दिलें तरी ती वैकल्पिक न करतां आवश्यक करावी काय याचाहि आता विचार करावा लागेल. तसेंच विश्वविद्यालयांत इंग्रजीचें माध्यम बदलावें की इंग्रजीचें तें स्थान तसेंच ठेवावें हाहि दुसरा महत्त्वाचा प्रश्न सोडविला पाहिजे. शिक्षणांत, विशेषतः माध्यमिक क्षेत्रांत भाषाभ्यासाचा प्रश्न जगांतील इतर राष्ट्रांनी कशा पद्धतीने सोडविला आहे व त्यांत त्यांना कोणत्या अडचणी आल्या हें पाहाणें जरूर आहे. माध्यमिक शिक्षणक्षेत्रांत इंग्रजीचा सासुरवास नको अशी जोरदार विचारधारा आढळून येते. दुसरा आक्षेप भाषांच्या संख्येवर आहे. इंग्रजी, मातृभाषा, हिंदी व वैकल्पिक म्हणून एखादी अभिजात भाषा हा बोझा जास्त होतो व इतर विषयांकडे त्या मानाने दुर्लक्ष होतें असा तो आक्षेप आहे. इतर राष्ट्रांच्या शिक्षणपद्धतीकडे पाहिल्यास त्या बाबतींतहि आपणांस मार्गदर्शन होईल.

---

* It shall be the duty of the Union to promote the spread of the Hindi language, to develop it so that it may serve as a medium of expression for all the element of the composite culture of India and to secure its enrichment by assimilating without interfering with its genius, the forms, style and expressions used in Hindustani and in the other languages of India specified in the eighth schedule, and by drawing whenever necessary or desirable, for its vocabulary primarily on Sanskrit and secondarily on other languages."

# इतर देशांतील भाषाभ्यास

**फ्रान्स :**

सामान्यपणें वयाच्या ११ व्या वर्षापासून सर्व माध्यमिक शाळांत इंग्रजी भाषा शिकविली जाते. ती भाषा सक्तीची मात्र नाही. विद्यार्थ्याला जर्मन, इटालियन, स्पॅनिश किंवा त्या शाळेंत शिकविली जाणारी अन्य भाषा इंग्रजीच्या ऐवजी घेतां येते. प्रत्यक्षांत, बहुसंख्य विद्यार्थी इंग्रजी किंवा जर्मन यांपैकी एका भाषेची निवड करतात. एका परकीय भाषेचा अभ्यास आणि लॅटिन भाषा घेतली नसेल तर दोन परकीय भाषांचा अभ्यास शालेय शिक्षण संपेपर्यंत करावा लागतो व शालान्त परीक्षेंत परकीय भाषेच्या एका चांचणींत उत्तीर्ण व्हावें लागतें. फ्रान्स-सारख्या एकभाषिक देशांत माध्यमिक शिक्षणक्रमांत दोन किंवा तीन भाषा शिकाव्याच लगतात हें पाहाण्यासारखें आहे.

**जपान :**

जपानमध्ये भाषिक प्रश्नाला विशेष स्वरूप आहे. जपानी लीपि चिनी लिपीप्रमाणे चिन्ह-लीपि आहे. प्रत्येक चिन्ह म्हणजे एक साकार कल्पनाच (ideograph) होय. त्या लीपींत अशीं चिन्हें एकूण सुमारें ८०००० आहेत. अर्थातच इतकीं चिन्हें आत्मसात् करून भाषेवर प्रभुत्व मिळविणें विद्वानांनाहि दुर्घट ! म्हणून तेथे या लिपीच्या जोडीला दोन नव्या अक्षर-पद्धति शब्दध्वनि-तत्त्वानुसार सुरू करण्यांत आल्या. या सुलभ लेखन पद्धतींमुळे तेथील साक्षरतेचें प्रमाण सध्या ९० टक्क्यांवर गेलें आहे. शिक्षणाचें माध्यम म्हणून सर्वत्र जपानी भाषेचा उपयोग करण्यांत येतो. शास्त्राच्या व औद्योगिक शिक्षणांत मात्र माध्यम म्हणून इंग्रजीचा मोठ्या प्रमाणांत वापर केला जातो. इंग्रजी हा विषय माध्यमिक शाळांत सक्तीचा आहे; पण उच्च माध्यमिक शाळेंत किंवा विश्वविद्यालयांत तो वैकल्पिक आहे.

**पश्चिम जर्मनी :**

पश्चिम जर्मनीच्या संघराज्यांत ज्या वेळीं अभ्यासक्रमांत जर्मन भाषेशिवाय एकच भाषा शिकविली जाते त्यावेळीं ती इंग्रजीच असते. कांही प्रांतांत वयाच्या १० व्या वर्षापासून इंग्रजी हा सक्तीचा विषय आहे तर कांहींत फ्रेंच सक्तीने शिकविलें जातें. सर्व प्रकारच्या कनिष्ठ व उच्च माध्यमिक शाळा अनेक भाषा शिकविण्याची सोय करतात व त्यांपैकी इंग्रजी ही नेहमीच अनिवार्य विषय असते.

शिकविण्यांत येणाऱ्या इतर भाषा म्हणजे जुन्या अभिजात भाषा किंवा फ्रेंच, रशियन, स्पॅनिशन इ० होत.

## इजिप्त :

इजिप्तमध्ये इजिप्शियन भाषेबरोबरच फ्रेंच व इंग्रजी भाषा सक्तीने शिकविल्या जातात. परकीय भाषांचें अध्ययन माध्यमिक शाळेंतील पहिल्या वर्षापासून सुरु होतें व माध्यमिक अभ्यासक्रमाच्या पांचहि वर्षांत चालू राहतें. बाह्य जगांतील घडामोडींचें ज्ञान तेथील लोकांना त्वरित व्हावें या उद्देशाने इंग्रजी व आणखी एक परकी भाषा सर्व विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणक्रमांत सक्तीच्या करण्यांत आल्या आहेत.

## रशिया :

सर्व माध्यमिक व दुय्यम शाळांत एक परकीय भाषा अनिवार्य विषय म्हणून अभ्यासावी लागते. अशा परकी भाषांत इंग्रजी, जर्मन, फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश इत्यादि भाषांचा समावेश होतो. परकीय भाषेचा अभ्यास तिसऱ्या किंवा पांचव्या शालेय वर्षापासून सुरु करण्यांत येतो. स्थानिक भाषा रशियन नसेल तर ती पहिल्या वर्षाच्या पहिल्या सहामाहींत व रशियन दुसऱ्या सहामाहींत सुरु करतात. परकीय भाषांचा अभ्यास शालेय शिक्षण संपेपर्यंत करावा लागतो.

सोव्हिएट संघराज्यांत सुमारे दोनशे भाषा व बोली प्रचलित आहेत. त्यांतील बऱ्याच अप्रगत आहेत. तेथील भाषिक परिस्थितीचें भारताशीं भाषांच्या संख्येबाबत साम्य असलें तरी एकूण परिस्थिति खूपच भिन्न आहे. झारशाहींत रशियन भाषेला सर्व महत्त्व होतें. त्यामुळे तिचा पुष्कळ विकास झाला व संघराज्याची भाषा म्हणून तिला अविवाद्य स्थान प्राप्त झालें. हिंदी भाषेची स्थिति तशी नाही. तिच्याइतपत प्रगति झालेल्या भाषा भारतांत अनेक आहेत. प्रत्येक रशियन विद्यार्थ्याला आपली मातृभाषा किंवा आपल्या प्रजासत्ताकाची भाषा, रशियन भाषा आणि एकतरी परकीय भाषा अशा तीन किंवा चार भाषा शिकाव्याच लागतात.

## इराण :

इराणमध्ये माध्यमिक शाळेंत इंग्रजी भाषा वैकल्पिक विषय म्हणून शिकविली जाते. सहा वर्षे प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यावर तिचें अध्ययन सुरू होतें. इंग्रजीशिवाय इतर वैकल्पिक भाषा रशियन, फ्रेंच व अरबी या आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला फारसीखेरीज एकतरी परकी भाषा शिकावीच लागते.

## स्वीडन :

माध्यमिक शाळेंत पहिल्या वर्षापासून (शालेय ५ व्या व वयाच्या ११ व्या) इंग्रजी सर्वांना शिकविलें जातें. त्यानंतर दोन वर्षांनीं जर्मन भाषा शिकविण्यास सुरुवात होते. कलाशाखेकडे जाणाऱ्या विद्यार्थ्याला शेवटच्या दोन शालेय वर्षांत फ्रेंचहि शिकावी लागते. स्वीडनमधे भाषाविषयाचा अभ्यास प्रदीर्घ काळापर्यंत चालतो. उदा० इंग्रजी ८ वर्षें, जर्मन ६ वर्षें व फ्रेंच ५ वर्षें शिकावें लागते. विद्यापीठांतील सर्व विषयांचीं क्रमिक पुस्तकें बहुतकरून इंग्रजी, फ्रेंच व जर्मनी भाषांत असल्याने प्रत्येक स्वीडिश विद्यार्थ्याला या तीन भाषा शिकल्याशिवाय सामान्यतः पदवी प्राप्त करतां येत नाही.

## बेल्जम :

या देशांत फ्लेमिश, फ्रेंच व जर्मन या तीन भाषा बोलल्या जातात. फ्रेंच व फ्लेमिश या अधिकृत राज्यभाषा आहेत व सरकारी परिपत्रकें आणि हुकुम यांसाठी दोन्हींचा उपयोग केला जातो. बहुसंख्य लोक तिन्ही भाषा जाणतात व वापरतात.

## कॅनडा :

कॅनडा हें द्विभाषिक राष्ट्र आहे. या संघराज्याच्या अधिकृत भाषा इंग्रजी व फ्रेंच या आहेत. सरकारी परिपत्रकें, हुकुम, प्रसिद्धीपत्रकें, चलनी नोटा, पोस्टाचीं तिकिटें वगैरेसाठी दोन्ही भाषांचाहि उपयोग केला जातो. शिक्षण पद्धतींतहि माध्यम म्हणून दोन्हींचा उपयोग करतात. केवळ एकाच भाषेंत शिक्षण देणारीं विद्यापीठें आहेत; पण त्यांतहि दुसऱ्या भाषेंतून शिळण देण्याची सोय आढळते. शहरांतून बहुसंख्य लोक द्विभाषिक आहेत.

## स्वित्झर्लंड :

स्वित्झर्लंड हें बहुभाषिक राष्ट्र आहे. जर्मन, फ्रेंच, इटालियन व रोमन या चार भाषा विविध गटांकडून मातृभाषा म्हणून बोलल्या जातात. राष्ट्रीय भाषा म्हणून चारहि भाषांना व राज्यभाषा म्हणून पहिल्या तीन भाषांना मान्यता देण्यांत आली आहे. सर्व सरकारी परिपत्रकें, हुकुम व प्रकाशनें तीन्ही अधिकृत भाषांत प्रसिद्ध होतात. प्रत्येक राज्यांतील विद्यार्थ्याला त्या राज्याच्या भाषेबरोबरच इतर राष्ट्रीय भाषांपैकी एक भाषा दुय्यम भाषा म्हणून सक्तीने शिकावी लागते. इ. ५ वी पासून मॅट्रिकपर्यंत ती सक्तीची आहे. विद्यापीठें ज्या राज्यांत असतील त्या राज्यामार्फतच चालविलीं जातात व त्या राज्याची भाषा तेथे माध्यम

म्हणून वापरली जाते. शैक्षणिक व्यवहारांत कोणतीच अडचण येत नाही. कारण सर्व प्राध्यापक व विद्यार्थी पूर्णपणें द्विभाषिक असतात.

## दक्षिण आफ्रिका :

दक्षिण आफ्रिकेचें संघराज्यहि बहुभाषिक आहे. तेथे आफ्रिकी, डच व इंग्रजी या तीन्ही भाषा प्रचलित आहेत व त्या सर्वांना राज्याच्या अधिकृत भाषा म्हणून मान्यता आहे.

## तुर्कस्तान :

तुर्कस्तानांतील भाषिक सुधारणेच्या चळवळीचा उल्लेख एका निराळ्या संदर्भांत अवश्य आहे. केमालपाशाने सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा एक भाग म्हणून भाषा सुधारणेचा प्रश्न हातीं घेतला. सन १९२८ मध्ये तुर्कीभाषेसाठी लॅटिन लीपीचा अंगीकार केला गेला व आंतरराष्ट्रीय (रोमन) आकडेहि स्वीकृत करण्यांत आले. अरेबिक व पर्शियन भाषेंतील जे शब्द तुर्कीभाषेंत घुसले होते ते काढून त्यांऐवजी मूळ तुर्की भाषेंतील शब्द रूढ करण्यात आले. लीपिसौकर्य व भाषाशुद्धि यांमुळे साक्षारताप्रसार झपाट्याने झाला व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागली. डॉ. संपूर्णानंद यांच्या अध्यक्षत्वाखाली नेमलेल्या राष्ट्रीय एकात्मतामंडळाने भारतीय भाषांसाठी रोमन लीपीचा अंगीकार करण्याची शिफारस नुकतीच केली आहे. त्या संदर्भांत तुर्कस्तानचें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे.

## जगांतील देशांत इंग्रजीचें शिक्षण :--

जगांतील सर्व खंडांत, सर्व देशांत इंग्रजी ही सर्वांत पुढारलेली भाषा म्हणून मान्यता पावली आहे. अनेक सुधारलेल्या देशांत त्यांच्या स्वतःच्या मातृभाषे-बरोबरच ती प्रमुख दुय्यम भाषा म्हणून शिकविली जाते, हें वरील माहितीवरून ध्यानीं येईल. बहुतेक सर्व युरोपीय राष्ट्रें, मध्यपूर्व, आशिया व आफ्रिका खंडांतील सुधारलेलीं व नवोदित राष्ट्रें या सर्व भूभागांत इंग्रजी दुय्यमभाषा म्हणून अभ्या-साचा विषय बनली आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया हे भाग तर इंग्रजीभाषिकच आहेत.

विविध देशांतील वर दिलेल्या माहितीवरून आपणांस थोडक्यांत खालील निष्कर्ष काढतां येतील:--

(१) बहुतेक सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत मातृभाषेशिवाय किंवा एक अधिक परकीय भाषा माध्याविक अभ्यासक्रमांत अनिवार्य विषय म्हणून अंतर्भूत केलेल्या आहेत.

(२) पुष्कळ देशांत शास्त्रीय ज्ञानासाठी एखादी परकीय भाषा दुय्यम भाषा म्हणून मान्य करण्यांत आली आहे. ती विशेषेंकरून इंग्रजीच आहे व तिला सर्व देशांत वाढतें महत्त्व आहे.

(३) या दुय्यम भाषांच्या अध्ययनाची सुरुवात बहुधा ५ व्या इयत्तेपासून व कांही ठिकाणीं प्राथमिक शाळेंत ३ऱ्या इयत्तेपासून होते.

(४) सर्वसाधारणपणें प्रत्येक विद्यार्थ्याला माध्यमिक शिक्षण संपेपर्यंत किमान दोन किंवा तीन भाषा सक्तीने शिकाव्याच लागतात.

(५) बहुतेक देशांत राज्यभाषा किंवा प्रादेशिक भाषा माध्यमिक व उच्च शिक्षणांत माध्यम म्हणून वापरल्या जातात. कांही देशांत विज्ञान व तांत्रिक विषयांसाठी एखाद्या प्रगत परकी भाषेचा (विशेषतः इंग्रजीचा) उपयोग उच्च शिक्षणांत केला जातो.

(६) जुन्या अभिजात भाषा वैकल्पिक विषय म्हणून सर्वत्र अभ्यासिल्या जातात. इंग्लंडमधील ग्रामर स्कूल्स व कांही पब्लिक स्कूल्स, तसेंच युरोपांतील तत्सदृश विशेष शाळा (Gymnasium) यांचा या बाबतींत अपवाद आहे.

(७) लीपिसुकरता शिक्षणप्रसाराला उपकारक ठरते हें तुर्कस्तान, जपान-चीन वगैरे देशांच्या उदाहरणांवरून दिसतें.

(८) अमेरिकेसारख्या संमिश्र संस्कृतीच्या व व्यक्तिस्वातंत्र्याला पूर्ण वाव देणाऱ्या निधर्मी लोकशाही राष्ट्रांत एक भाषा व एक लिपि राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा एक भक्कम आधार ठरते.

## प्राथमिक अभ्यासक्रमांतील भाषाभ्यास :

वरील माहितीच्या आधारावर आपणांस आता शिक्षणाच्या निरनिराळ्या अवस्थांतील भाषाध्ययनाचा विचार करतां येईल. प्राथमिक अभ्यासक्रमांत आपल्या शिक्षणपद्धतींत दोन अवस्था मानल्या जातात. इ. १ ते ४ किंवा ११ + वयोमर्यादेपर्यंतची पहिली प्राथमिक अवस्था व इ. ५ ते ७ पर्यंतची उच्च प्राथमिक किंवा दुसरी अवस्था होय. ही दुसरी अवस्था दुय्यम शिक्षणसंस्थांतील खालच्या वर्गाशीं समकक्ष असल्याने त्या दृष्टीने तिचा विचार करावा लागतो.

## इयत्ता १ ते ४ :

या पातळीवरील भाषाविषयक अभ्यासक्रमाबाबत सामान्यतः एकमत आढळून येतें. या सर्व इयत्तांमधून शिक्षणाचें माध्यम मातृभाषाच राहावें याबद्दल

## त्रिभाषा–सूत्र :

स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण-मंत्री मौ. आझाद यांनी मध्यवर्ती शिक्षण-सल्लागार-मंडळाच्या जानेवारी १९५७ मध्ये भरलेल्या २४ व्या बैठकींत भाषण करतांना या त्रिभाषासूत्राचा प्रथम उपन्यास केला. ते म्हणाले, "माध्यमिक शिक्षणक्रमांत प्रत्येक विद्यार्थ्यानें तीन भाषांचा अभ्यास अनिवार्य स्वरूपांत करणें राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे अशी माझी खात्री पटली आहे. त्याने आपल्या राज्याची भाषा प्रथम क्रमांकाने, नंतर हिंदी ( जर ती राज्य-भाषा नसेल तर ) आणि तिसऱ्या क्रमांकाने इंग्रजी भाषा अभ्यासावी. जर हिंदी ही त्याची राज्यभाषा असेल तर त्याने दुसऱ्या एखाद्या आधुनिक भारतीय भाषेचा अभ्यास केला पाहिजे. माझ्या मतें माध्यमिक शाळेंतील प्रत्येक विद्यार्थ्यानें दोन आधुनिक भारतीय भाषांचा अभ्यास केलाच पाहिजे. त्यायोगें संमिश्र संस्कृतीची गुंतागुंत व संपन्नता कळण्याची दृष्टि त्याला लागेल. त्याचप्रमाणे त्याने इंग्रजीचाहि अभ्यास केला पाहिजे. आधुनिक विचारप्रवाह व पाश्चिमात्य जगाची महान् वैज्ञानिक प्रगति यांच्याशीं सतत संबंध ठेवण्याच्या दृष्टीने हें अवश्य आहे. शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेपलीकडे अध्ययन करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक हिंदी नागरिकाला आधुनिक काळाच्या गरजा लक्षांत घेतां इंग्रजी, हिंदी व आणखी एक भारतीय भाषा अवगत असणें अवश्य आहे. हें जर आपण नाकारलें, तर आपण सत्याकडे व प्रचलित परिस्थितीकडे डोळेझाक केली असें होईल. ' या भाषणांत मौ. आझादांनी उल्लेखिलेलें त्रिभाषासूत्र कायदेशीर परिभाषेंत खालीलप्रमाणे आहे:—

(अ) [१] मातृभाषा, किंवा [२] प्रादेशिक भाषा, किंवा [३] मातृभाषा आणि प्रादेशिक भाषा यांचा संमिश्र ( Composite ) अभ्यासक्रम, किंवा [४] मातृभाषा आणि पुरातन अभिजात भाषा यांचा संमिश्र अभ्यासक्रम, किंवा [५] प्रादेशिक भाषा आणि पुरातन अभिजात भाषा यांचा संमिश्र अभ्यासक्रम;

(ब) इंग्रजी किंवा दुसरी आधुनिक युरोपीय भाषा;

(क) हिंदी ( अहिंदी प्रदेशांकरिता ), किंवा दुसरी आधुनिक भारतीय भाषा ( हिंदीभाषिक प्रदेशासाठी ).

इ. स. १९६१ च्या ऑगस्ट महिन्यांत सर्व राज्यांच्या मुख्य मंत्र्यांच्या परिषदेंत या सूत्रावर चर्चा झाली व त्यांत खालील सुटसुटीत सूत्र एकमताने मान्य करण्यांत आलें:—

(अ) प्रादेशिक भाषा व जेथें ती मातृभाषेहून भिन्न असेल तेथे मातृभाषा;

मुळीच वाद नाही. तसेंच मातृभाषेच्या अध्ययनाला या अवस्थेंत सर्वोपरि महत्त्व असावें याबद्दलहि दुमत नाही. याच वेळीं दुसऱ्या एखाद्या भाषेचें शिक्षण यावें किंवा काय याबद्दल मात्र मतभेद संभवतो. पुरेशा मर्यादेपर्यंत मातृभाषेचा अभ्यास झाल्याशिवाय दुसऱ्या एखाद्या भाषेचा अभ्यास सुरू केल्यास दोन्ही भाषांच्या अध्ययनांत गोंधळ होतो असें एक मत प्रचलित आहे. शुद्ध भाषा बोलणें व लिहिणें हा मुख्यतः सवयीचाच परिणाम आहे आणि भाषेची रचना, घटना व घाटणी या संबंधीच्या विशिष्ट प्रयोगांची सवय लागली म्हणजे भाषा शुद्ध लिहितां व बोलतां येते. हिंदी भाषिक प्रदेशांजवळ राहणाऱ्या, मराठी बोलणाऱ्या लोकांच्या भाषेंत अशी वाक्यरचनेच्या प्रयोगांची सरमिसळ झालेली आढळते. 'तो काम करून राहिला आहे' यावरील 'वह काम कर रहा है' याची छाप स्पष्ट आहे. तसा प्रकार होत असल्याने मुलांच्या बाबतींत मातृभाषेवर पुरेसें प्रभुत्व संपादन झाल्याशिवाय दुसरी भाषा सुरू करणें हितावह नाही. या मतामध्ये पुष्कळच सत्यांश आहे. उलटपक्षीं कांही भागांत तिसऱ्या वर्गापासूनच इंग्रजीच्या अभ्यासाला सुरुवात होते. इंग्रजी माध्यमाच्या शाळांतहि दोन्ही भाषा एकदमच शिकविल्या जातात. उर्दू शाळांत प्रादेशिक भाषाहि याच अवस्थेंत शिकविली जाते. लहान मुलें दुसरी भाषा बाल्वयांतच सुलभतेने शिकतात असा द्विभाषिक प्रदेशांतील अनुभव आहे. तात्पर्य, या बाबतींत वरील मताचा फारसा बाऊ करण्याचें कारण नाही. सध्या ५ व्या इयत्तेंत इंग्रजी व हिंदी या दोन भाषांच्या अध्ययनास सुरुवात होते. तेथेहि मातृभाषेवर पुरेसें प्रभुत्व मिळालेलें असतें असें म्हणतां यावयाचें नाही. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन डोंगरकेरी समितीने (Committee on the Medium of Instruction—Maharashtra Govt.) इ. ३ री पासूनच हिंदी-भाषेचा अभ्यास सुरु करावा अशी शिफारस केली आहे.

## माध्यमिक शिक्षणांतील भाषाध्ययन :

इ. ५ ते ७ या इयत्तांना उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक अवस्था म्हणतात आणि इयत्ता ८ ते ११ यांना उच्च माध्यमिक अवस्था समजतात. या दोन्ही पातळीवर सर्वसामान्यपणें जें भाषाविषयक धोरण अवलंबिण्यांत येतें त्याला आजकाल त्रिभाषा सूत्र ( Three Language formula ) असें म्हटलें जातें. माध्यमिक शिक्षणांत एकूण किती भाषा अभ्यासाव्यात व महत्त्वानुसार त्यांचा क्रम कोणता याचा विचार या सूत्रांत केलेला आहे. माध्यमिक अवस्थेंत प्रादेशिक भाषा हेंच माध्यम असावें ही गोष्ट गृहीत धरण्यांत आली आहे व तें उचितच आहे.

## त्रिभाषा–सूत्र :

स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण-मंत्री मौ. आझाद यांनी मध्यवर्ती शिक्षण-सल्लागार-मंडळाच्या जानेवारी १९५७ मध्ये भरलेल्या २४ व्या बैठकींत भाषण करतांना या त्रिभाषासूत्राचा प्रथम उपन्यास केला. ते म्हणाले, "माध्यमिक शिक्षणक्रमांत प्रत्येक विद्यार्थ्याने तीन भाषांचा अभ्यास अनिवार्य स्वरूपांत करणें राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे अशी माझी खात्री पटली आहे. त्याने आपल्या राज्याची भाषा प्रथम क्रमांकाने, नंतर हिंदी (जर ती राज्य-भाषा नसेल तर) आणि तिसऱ्या क्रमांकाने इंग्रजी भाषा अभ्यासावी. जर हिंदी ही त्याची राज्यभाषा असेल तर त्याने दुसऱ्या एखाद्या आधुनिक भारतीय भाषेचा अभ्यास केला पाहिजे. माझ्या मतें माध्यमिक शाळेंतील प्रत्येक विद्यार्थ्याने दोन आधुनिक भारतीय भाषांचा अभ्यास केलाच पाहिजे. त्यायोगें संमिश्र संस्कृतीची गुंतागुंत व संपन्नता कळण्याची दृष्टि त्याला लागेल. त्याचप्रमाणे त्याने इंग्रजीचाहि अभ्यास केला पाहिजे. आधुनिक विचारप्रवाह व पाश्चिमात्य जगाची महान् वैज्ञानिक प्रगति यांच्याशीं सतत संबंध ठेवण्याच्या दृष्टीने हें अवश्य आहे. शिक्षणाच्या प्राथमिक अवस्थेपलीकडे अध्ययन करूं इच्छिणाऱ्या प्रत्येक हिंदी नागरिकाला आधुनिक काळाच्या गरजा लक्षांत घेतां इंग्रजी, हिंदी व आणखी एक भारतीय भाषा अवगत असणें अवश्य आहे. हें जर आपण नाकारलें, तर आपण सत्याकडे व प्रचलित परिस्थितीकडे डोळेझाक केली असें होईल.' या भाषणांत मौ. आझादांनी उल्लेखिलेलें त्रिभाषासूत्र कायदेशीर परिभाषेंत खालीलप्रमाणें आहे:—

(अ) [१] मातृभाषा, किंवा [२] प्रादेशिक भाषा, किंवा [३] मातृभाषा आणि प्रादेशिक भाषा यांचा संमिश्र (Composite) अभ्यासक्रम, किंवा [४] मातृभाषा आणि पुरातन अभिजात भाषा यांचा संमिश्र अभ्यासक्रम, किंवा [५] प्रादेशिक भाषा आणि पुरातन अभिजात भाषा यांचा संमिश्र अभ्यासक्रम;

(ब) इंग्रजी किंवा दुसरी आधुनिक युरोपीय भाषा;

(क) हिंदी (अहिंदी प्रदेशांकरिता), किंवा दुसरी आधुनिक भारतीय भाषा (हिंदीभाषिक प्रदेशासाठी).

इ. स. १९६१ च्या ऑगस्ट महिन्यांत सर्व राज्यांच्या मुख्य मंत्र्यांच्या परिषदेंत या सूत्रावर चर्चा झाली व त्यांत खालील सुटसुटीत सूत्र एकमताने मान्य करण्यांत आलें:—

(अ) प्रादेशिक भाषा व जेथें ती मातृभाषेहून भिन्न असेल तेथें मातृभाषा;

(आ) हिंदी किंवा हिंदी भाषिक प्रांतांत दुसरी भारतीय भाषा;

(इ) इंग्रजी किंवा दुसरी कोणतीहि आधुनिक युरोपीय भाषा.

राष्ट्रीय एकात्मता परिषदेनें हें सूत्र मान्य केलें. हिंदी व इंग्रजी या भाषांचा अभ्यास शिक्षणक्रमांत शक्य तितक्या लवकर सुरू करण्यांत यावा एवढ्या एकाच सूचनेची भर त्यांत घालण्यांत आली.

## महाराष्ट्र राज्यांत :

मराठवाडा वगळून महाराष्ट्र राज्यांतील इतर सर्व भागांत माध्यमिक शाळांतील इ. ५ वी पासून इंग्रजी व हिंदी या भाषा शिकविण्यांत येतात मराठवाड्यांत मात्र हिंदी प्राथमिक शाळेंतील तिसऱ्या इयत्तेपासून व इंग्रजी ५ व्या इयत्तेपासून सुरुं करण्यांत येतें. ही पद्धतीच जास्त उपयुक्त व सोयीची समजली पाहिजे. कारण एक तर असें की ५ व्या इयत्तेंत एकाच वेळीं दोन नव्या भाषांच्या अभ्यासाचा बोजा लहान मुलांवर टाकणें इष्ट नव्हे. हिंदी ही मराठीला पुष्कळच जवळची आहे म्हणून ती तिसरींत सुरुं करावी व इंग्रजीची सुरुवात ५ वींत व्हावी आणि अशा रीतीने सर्व महाराष्ट्रभर एकसूत्रता आणावी असा अभिप्राय शैक्षणिक माध्यमविषयक समितीने प्रकट केला आहे

तात्पर्य, माध्यमिक शाळेंत सर्व विद्यार्थ्यांना अनिवार्य म्हणून तीन भाषांचा अभ्यास करावा लागेल. इ. ७ वी पर्यंत मातृभाषेच्या अध्ययनाला सर्वप्रथम महत्त्व अपरिहार्य आहे. या अभ्यासक्रमांत हिंदीला दुय्यम भाषा म्हणून महत्त्व दिलें जावें हें उचित आहे. राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचाच स्वीकार केला जावा याबद्दल फारसें दुमत होण्याचें कारण नाही. तितकें महत्त्व इंग्रजीला कदापि प्राप्त होणार नाही. लोकसंख्येपैकीं फक्त १·०६ टक्के लोक इंग्रजी जाणतात. अर्थात् लोकशाही निष्ठा अंगीकृत केलेल्या आपल्या राष्ट्राची राष्ट्रभाषा ती कधींच होऊं शकणार नाही हें उघड आहे. विद्यापीठीय उच्च शिक्षणासाठी इंग्रजीच्या ज्ञानाची आवश्यकता आहे हें कोणालाहि मान्य करावेंच लागेल. पण माध्यमिक शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी फक्त ३० टक्केच उच्च शिक्षण घेतात. उरलेल्या ७० टक्के विद्यार्थ्यांचे शिक्षण या स्तरावरच संपते व संपावेंहि. उच्च शिक्षण घेण्याची पायता नसलेल्यांची भाऊगर्दी विद्यापीठ शिक्षणाचा दर्जा खालावण्यास प्रामुख्याने कारणीभूत आहे हें कटु असलें तरी सत्य आहे. तेव्हा या

Page 26, Report of the Medium of Instruction (Universities) Committee, 1961—Maharashtra Govt. Publication.

७० टक्के लोकांवर नाहक इंग्रजीचा बोजा लादणें उचित होणार नाही. दुय्यम वा माध्यमिक शिक्षण ही एक स्वयंपूर्ण अवस्था आहे. तिचे स्वरूप विश्वविद्यालयांत शिक्षणाची पूर्वतयारी एवढेंच नाहीं; तर उच्च शिक्षण न घेणाऱ्या पण समाजाचें दुय्यम दर्जाचें नेतृत्व करणाऱ्यांना सुशिक्षित नागरिक बनविणें हें या अवस्थेचें एक प्रधान उद्दिष्ट आहे. हें मान्य केल्यावर माध्यमिक शाळांना परीक्षा इंग्रजी विषय घेऊन किंवा ती वगळून उत्तीर्ण होण्याची सवलत मिळणें सयुक्तिक ठरतें. म्हणून इंग्रजीचा अभ्यास दुसरी भाषा म्हणून इ. ५ ते १० वी पर्यंत अनिवार्य म्हणून व इ.११ वींत हा वैकल्पिक असावा ही सूचना ग्राह्य आहे.

## अभिजात ( Classical ) भाषांचा अभ्यास :

जुन्या अभिजात भाषांचा अंतर्भाव सध्यां वैकल्पिक अभ्यासांत केला जातो आणि तें उचितच आहे संस्कृत, पाली, अर्धमागधी, फारसी, अरबी इत्यादि भाषांचा प्राथमिक स्वरूपाचा अभ्यास विद्यार्थ्याला आवडीप्रमाणे करतां यावा. एस्. एस्. सी. बोर्डानें अशी व्यवस्था शालान्त परीक्षेच्या बाबतींत केलेली आहे व सामान्यतः भारतभर हीच योजना करण्यांत आली आहे. पण कांहीं विद्वान् मंडळींचा संस्कृत ही भाषा अनिवार्य स्वरूपांत अभ्यासिली जावी असा आग्रह आहे. तेव्हा या मुद्याबद्दल थोडेसें विवेचन करणें अवश्य आहे.

## संस्कृत–अनिवार्य अभ्यास ?

संस्कृत भाषा ही बहुतेक भारतीय भाषांची जननी आहे द्राविड भाषा गटावरहि संस्कृतचा फार मोठा प्रभाव दिसून येतो श्री न. वि. गाडगीळ यांनी नुकतेंच एका भाषणांत सांगितल्याप्रमाणे संस्कृत ही इतर भारतीय भाषांची रिझर्व्ह बँक आहे शब्द संपत्तीच्या, विशेषतः नव्या शब्दांच्या निर्मितीच्या दृष्टीनें हें म्हणणें खरेंच आहे. भारतीय संस्कृतीचा ठेवा संस्कृत भाषेच्याद्वारें आपणांस उपलब्ध होतो. या कारणामुळे संस्कृतचा अभ्यास आधुनिक भारतीय भाषांच्या अभ्यासाला पोषक ठरतो असें बऱ्याच जणांचें मत आहे. संस्कृत भाषेच्या या महत्त्वामुळे तिचा अभ्यास माध्यमिक शिक्षणात अनिवार्य असावा असें कांहीं विचारवंत प्रतिपादितात. संस्कृतचे खास अभिमानी लोक तर संस्कृत ही राष्ट्रभाषा असावी असेंहि आग्रहपूर्वक सांगतात. डॉ. काटजू, डॉ. अणे यांच्यासारखे राजकारणी विद्वान या मताचे पुरस्कर्ते आहेत. परंतु संस्कृत ही भाषा अनिवार्य विषय करतां येणार नाही किंवा ती राष्ट्रभाषाहि होऊं शकणार नाही. कारण तिचें सांस्कृतिक महत्त्व मान्य करूनहि ती प्रचलित बोलली जाणारी भाषा नव्हे हें मान्य केलेंच पाहिजे. ज्या कारणांसाठी इंग्रजीचा अभ्यास अनिवार्य

करतां येणार नाही असें वर म्हटलें आहे, त्याच कारणामुळे संस्कृतहि सक्तीच्या अभ्यासाचा विषय होऊं शकत नाही. संस्कृतच्या ज्ञानाशिवाय आधुनिक भारतीय भाषा शुद्ध रीतीने लिहितां किंवा बोलतांच येणार नाहीत असा प्रत्यक्ष अनुभव नाही. इंग्रजी भाषा केवळ १ टक्का लोक जाणतात यामुळे तिला राष्ट्रभाषेचें स्थान कदापि मिळणार नाही असा युक्तिवाद करणारे लोक संस्कृतला तें स्थान द्यावें असें कसें म्हणू शकतील? १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणें केवळ ५५५ लोकांनीं (एकूण लोकसंख्येपैकीं शें. ०·०००१६) संस्कृत ही मातृभाषा म्हणून नोंदविली आहे. सर्वसाधारण जनसमुदायाला सर्वस्वी अपरिचित व केवळ जुन्या ग्रंथांतच आढळणारी संस्कृत भाषा राष्ट्रभाषा तर कधीच होऊं शकणार नाही पण माध्यमिक शिक्षणक्रमांत तिला अनिवार्य भाषा म्हणूनहि स्थान देणें म्हणजे विद्यार्थ्यांवर अकारण एक बोजा लादल्यासारखें होईल. विश्वविद्यालयांत संस्कृतचा उच्च अभ्यास करूं इच्छिणाऱ्या कांही मोजक्या विद्यार्थ्यांना संस्कृतच्या प्राथमिक अभ्यासाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी माध्यमिक शिक्षणांत त्या भाषेला ऐच्छिक विषय म्हणून स्थान मिळणें इष्ट आहे. जगांतील इतर देशांत सामान्यपणें हेंच धोरण अभिजात जुन्या भाषांच्या बाबतींत अवलंबिलें जातें.

## हिंदीचा अभ्यास अनिवार्य कां ?

त्रिभाषा-सूत्रांत महत्त्वाच्या दृष्टीने हिंदीचा अनुक्रम मातृभाषेच्या खालोखाल लागतो. हिंदीला हें महत्त्व प्राप्त होण्याचें कारण म्हणजे घटनेने तिला केंद्र सरकारच्या कारभार–भाषेचा व इंग्रजीऐवजीं पर्यायी भाषेचा दर्जा दिला आहे हें होय. यासंबंधी कितीहि मतभेद असला तरी दोन गोष्टी स्पष्टपणें निर्विवाद आहेत. पहिली म्हणजे इंग्रजी ही कधीहि राष्ट्रभाषा होऊं शकणार नाही ही होय. कोणत्यातरी आधुनिक भारतीय भाषेचा राष्ट्रभाषा या नात्याने स्वीकार करणें भाग आहे व अशी भाषा म्हणजे हिंदी हीच होय असें बहुसंख्य विचारवंतांचें मत आहे. लोकसंख्येच्या फार मोठ्या विभागाकडून ती बोलली जाते. १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणे हिंदी भाषिकांची संख्या ( उर्दु, हिंदुस्तानी, पंजाबी मिळून ) लोकसंख्येच्या ४२·०१ टक्के या प्रमाणांत आहे. दुसरें म्हणजे भारताच्या बहुतेक सर्व भागांत ती समजते. सांस्कृतिक एकजिनसीपणा, धर्म, यात्रा व इतर दळणवळण इत्यादि कारणांमुळे अहिंदी प्रांतांतील लोकहि ती भाषा थोडीफार समजूं शकतात. इंग्रजीचे कट्टर पुरस्कर्ते डॉ. डी. डी. कर्वे यांनीहि एका लेखांत हिंदीला भावी काळांत हें स्थान मिळणार ही गोष्ट मान्य केलेली आहे. ते म्हणतातः—"Naturally the next question that arises is, which is this All India langu-

age in which All India activities are to be carried on ? Well, for the present it is English and it will continue to be that for some time to time....But it may be possible to replace it by Hindi which is spoken by the largest member of people in India.... It is necessary for the Hindi-speaking people to recognise that their language has no special claim to be an All India language on the basis of literary merit or any other special quality. It is solely on account of number that it may eventually become an All India language" ( The Times of India—19-1-1962 ).

हिंदीला राष्ट्रभाषेचें स्थान देण्यास कांही विद्वानांचा विशेषत: दाक्षिणात्यांचा विरोध आहे. त्यांच्यातर्फे खाली खालील युक्तिवाद करण्यांत येतो :--

(१) हिंदी ही राष्ट्रभाषा होण्याइतकी समृद्ध नाही. बंगाली, तामिल किंवा मराठी या भाषा तितक्याच किंवा कांकणभर जास्तच प्रगत आणि संपन्न आहेत.

(२) एखादी भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या अधिक असणें हीच ह्या भाषेला राष्ट्रभाषेचा दर्जा मिळण्याची एकमेव कसोटी नव्हे. शब्दसमृद्धि, उच्च प्रकारचें वाङ्मय, नव्या शब्दाची निर्मिति करण्याची क्षमता इत्यादि गोष्टी लक्षांत घेतल्या पाहिजेत.

(३) बंगाली, तामिल, मल्याळी, कानडी, गुजराती, पंजाबी वगैरे भाषा बोलणाऱ्या प्रांतात देवनागरी लिपि नव्याने शिकावी लागेल. परिणामत: या राज्यांत इ ५ वी पासून निदान तीन भाषा व तीन लिप्या शिकाव्या लागतील.

(४) अहिंदी प्रांतांतील लोकांपेक्षा हिंदी भाषिकांना केंद्रीय सरकार, अखिल भारतीय नोकऱ्या व राजकारण, तसेंच अ. भा. व्यवसाय वगैरे क्षेत्रांत विनासायास वरचढपणा लाभेल व हा इतरांच्यावर अन्याय होईल.

घटनेच्या ८ व्या परिशिष्टानुसार १४ भाषांना राष्ट्रभाषा म्हणून मान्य करण्यांत आलें आहे पण राष्ट्रभाषा (liuqua franca) या शब्दाच्या रूढ अर्थानें नव्हे. या चौदा भाषांपैकीं कोणत्याहि भाषेला हा दर्जा देताना हेच आक्षेप

येणार. म्हणून जास्तींत जास्त लोकांना समजणारी व जास्तींत जास्त लोकांकडून बोलली जाणारी हीच एकमेव कसोटी या बाबतींत ग्राह्य धरणें भाग आहे. शिवाय, राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचें जें स्वरूप अभिप्रेत आहे तें उत्तर प्रदेशांत विशिष्ट विभागांत बोलली जाणारी प्रादेशिक भाषा असें नाही. त्या भाषेवर इतर भाषाभगिनींचा परिचय झाल्यावर त्यांचा जो प्रभाव पडेल त्यामुळे उत्क्रान्त झालेलें तिचें नवें स्वरूप राष्ट्रभाषा म्हणून अभिप्रेत आहे लिपीविषयीची तक्रारहि तितकीशी युक्त नव्हे. इंग्रजीच्या अध्ययनासाठी तरी रोमन लिपीची एक दोन स्वरूपें शिकावीच लागतात. परकी इंग्रजी भाषा व लिपि यांत असाधारण प्राविण्य संपादन करण्याऱ्या दाक्षिणात्यांना आपल्याच सांस्कृतिक जीवनाचा एक प्रमुख भाग असलेली भाषा व लिपि शिकणें दुर्घट कां व्हावें ? मध्यवर्ति शिक्षण सल्लागार मंडळाच्या १४ व्या बैठकीचें उद्‌घाटन करतांना पं. नेहरूंनी हाच प्रश्न विचारला होता.* यामागे शैक्षणिक वा भाषिक अडचणीपेक्षा राजकीय व इतर कारणांचा प्रभाव आहे व म्हणून आपणांस त्याचा विचार करण्याचें कारण नाही.

तात्पर्य माध्यमिक शिक्षणांत त्रिभाषा-सूत्राचा अंगिकार करणें हेंच हितावह आहे. हैद्राबाद येथील सेंट्रल इन्स्टिटयूट ऑफ इंग्लिश या संस्थेंत भाषण करतांना पंतप्रधान नेहरूंनी आजच्या परिस्थितींत भाषिक प्रश्न सोडविण्याचा समाधानकारक मार्ग म्हणजे त्रिभाषासूत्रच आहे असें प्रतिपादन केलें. ×××

## विद्यापीठांतील माध्यमाचा यक्षप्रश्न :

आता आपणांस या प्रश्नांतील खऱ्या विवाद्य मुद्याकडे वळलें पाहिजे. उच्च शिक्षणांत माध्यम म्हणून कोणत्या भाषेचा वापर करावा हा मोठा

---

* "......I put it to you if only till recently a Madrasi or a Punjabi or a Bengali felt no difficulty in receiving education through a foreign language, why should he be handicapped if he were to be educated through one of the Indian languages ? We shall certainly be able to retain the same intellectual unity which was created for us by the English language—Page 32, Report of the Medium of Instruction ( Universities ) Committee, 1961.

x x x "........While the regional languages should have their primary position in the educational system, the three language formula met most of the present day requirements. There was no contradiction involved in adopting the three-language formula."—Report in the Times of India—21-7-63.

कठिण प्रश्न आहे. इंग्रजीची जागा कोणत्या भाषेने घ्यावी. हिंदी की प्रादेशिक? जानेवारी १९४८ मध्ये भरलेल्या मध्यवर्ति शिक्षण सल्लागार मंडळाच्या १४ व्या बैठकींत या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक समिति नेमण्यांत आली. राधाकृष्णन् आयोगाच्या नेमणुकीमुळे या समितीचा अहवाल विचारांत घेतला गला नाही. परंतु मंडळाने एक महत्त्वाचा ठराव केला इंग्रजीची जागा कमीत-कमी वेळांत एखाद्या देशी भाषेने घ्यावी हें माध्यम म्हणून सर्व विद्यापीठांचें उद्दिष्ट असावें, विशेषतः शास्त्रीय व तांत्रिक विषयांत शिक्षणाचा दर्जा आणि कार्यक्षमता कायम राहावी व आवश्यक पुस्तकें त्या त्या भाषांत उपलब्ध व्हावीत अशी काळजी घेतली जावी असा त्या ठरावाचा आशय होता. राधाकृष्णन् आयोगाने एका स्वतंत्र प्रकरणांत या प्रश्नाचा काळजीपूर्वक विचार केला आहे. संघराज्याची भाषा म्हणून इंग्रजीला हिंदीशिवाय दुसरा पर्याय नाही. आणि केंद्रीय कारभार, आंतरराज्य व्यवहार आणि एकता यासाठी सुशिक्षित भारतीयाला निदान द्विभाषिक तरी बनलें पाहिजे असें आयोगाचें मत झालें. विद्यापीठांतील माध्यम म्हणून प्रादेशिक भाषांना पर्याय या स्वरूपांत कांही किंवा सर्व विषयांसाठी हिंदी भाषेचा वापर करणें ही गोष्ट त्या त्या विद्यापीठावर सोंपवावी अशी त्या आयोगाने शिफारस केली.

राधाकृष्णन् आयोगाच्या शिफारसींचा विचार करण्यासाठी आंतर-विद्यापीठ मंडळाची ( Inter-university Board ) एक बैठक १९५० च्या ऑगस्टमध्ये भरली होती. त्या बैठकींत पुढील ठराव मंजूर करण्यांत आलाः--

"The subject of the medium of instruction is beset with difficulties. There is need for the universities to have a common language to enable unigration of students and teachers and to continue inter-university contacts. Educational standards and methods must not be seriously interfered with. Even where regional languages are considered suitable for adoption as media of instruction, there is the difficulty of finding suitable text-books and teachers capable of teaching in the language. The difficulties are enhanced in multisingual ares. English will have to be retained until the national language can be substituted. The Universities should financed by the

Indian Government and State Governments to enable students to learn the language of the Union at a higher level. The universitities which are willing to impart education in the national language should be allowed to do so."

या ठरावांत इंग्रजी माध्यम बदलण्यामुळे येणाऱ्या अडचणींची दखल घेण्यांत आली आहे इंग्रजी माध्यम बदलल्यास खालील अडचणी येतील :—(१) शिक्षक व विद्यार्थी यांना एका विद्यापीठांतून दुसऱ्या विद्यापीठांत जाऊन सहजपणें अध्ययन–अध्यापन करतां येणार नाहीं. (२) विद्यापीठांचा परस्परांशीं व्यवहार इंग्रजींतून होतो. प्रत्येक विद्यापीठाने प्रादेशिक भाषा स्वीकारण्यास अडचण होईल. (३) संशोधनविषयक प्रबंधांची देवाणघेवाण करणें व त्यासंबंधी पूर्ण माहिती मिळविणें दुर्घट होईल. सध्या तरी बहुतेक प्रबंध इंग्रजींतूनच लिहिले जातात. (४) इंग्रजी माध्यम नाहींसें केल्यास शिक्षणाचा दर्जा खालावेल. (५) प्रादेशिक किंवा हिंदी भाषेंतून शिक्षण देण्यासाठी तज्ज्ञ व कार्यक्षम शिक्षक आणि पाठपुस्तकें यांचा तुटवडा बऱ्याच काळपर्यंत भासेल. (६) बहुभाषिक विभागांत अनेक माध्यमांतून शिक्षण द्यावें लागेल व ते परवडणार नाही. उदाहरणार्थ, मुंबई शहरात मराठी, गुजराती, हिंदी व इंग्रजी या चारहि भाषा माध्यम म्हणून वापराव्या लागतील.

आंतरविद्यापीठ मंडळाने आपल्या नागपूरच्या बैठकींत माध्यम बदलण्याच्या प्रश्नांत घाई न करता आधुनिक भारतीय भाषांची हळूहळू व विचारपूर्वक प्रगति करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. भारतांत दिसून येणाऱ्या फुटीर प्रवृत्तीवर उपाय म्हणून विद्यापीठांनी एकच भाषेचा स्वीकार करण्याबद्दल व घाईने माध्यम बदलण्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालवण्याच्या धोक्याबद्दल इशारा दिला. म्हैसूर येथें १९५३ सालीं भरलेल्या भारतीय विद्यापीठांच्या पंचवार्षिक परिषदेंत माध्यमाच्या प्रश्नाचा यथासांग विचार करण्यांत आला नागपूरच्या ठरावावर शिक्कामोर्तब करण्यांत आलें व खालील ठराव करण्यांत आला :—

"This conference, while reiterating the resolution passed at Nagpur, on this subject, is of the opinion that it is necessary to encourage the study of Hindi and English at the university stage to enable the products of the university to have con-

tact with all Indin universities, and also to have an opportunity, of contract with the international universities."

या ठरावांच्या अनुरोधाने निरनिराळचा विद्यापीठांनी जीं धोरणें आंखली व जीं कार्ये केलीं त्यांचा आढावा घेतल्यानंतर सन १९६० मध्ये पुढील परिस्थिति आढळून आली. एकंदर ४० विद्यापीठांपैकीं २१ विद्यापीठांत इंग्रजी हीच माध्यम म्हणून चालू ठेवण्यांत आली होती. १२ विद्यापीठांत इंग्रजीऐवजी हिंदीचा माध्यम म्हणून स्वीकार करण्यांत आला. तीन विद्यापीठांत प्रादेशिक भाषेला माध्यम बनविण्यांत आले. त्यांपैकीं नागपूर विद्यापीठ व सरदार वल्लभभाई विद्यापीठ यांमध्ये हिंदी भाषेचें वैकल्पिक माध्यमहि स्वीकृत झालें आहे. हिंदी माध्यम स्वीकारणारीं विद्यापीठें बहुतेक हिंदी प्रादेशिक भाषा असलेल्या प्रांतांतील-उत्तर प्रदेश व मध्यप्रदेश–आहेत. अहिंदी राज्यांतील विद्यापीठांपैकीं एक दोन विद्यापीठांनीच हिंदी माध्यमाचा स्वीकार केला आहे. श्री. ना. दा. ठा. महिला विद्यापीठांत मराठी व गुजराथी माध्यम आहे. त्या विद्यापीठांत पहिल्यापासूनच इंग्रजीला माध्यम म्हणून स्थान नव्हतें.

अशा परिस्थितींत माध्यमविषयक बदल योजनाबद्ध व विचारपूर्वक व्हावा या हेतूने युनिव्हर्सिटी ग्रँट्स् कमिशनने एक कार्यकारी गट नेमला. निरनिराळया विद्यापीठांना, केंद्रीय शिक्षणखात्याला व शास्त्रीय संशोधनखात्याला या गटांत प्रतिनिधित्व देण्यांत आलें होतें. शिक्षणाचा दर्जा न घटू देतां माध्यमविषयक बदल कोणता व कसा घडवून आणावा यासंबंधीं विद्यापीठांना सल्ला देण्याच्या दृष्टीने अहवाल सादर करण्याचें काम या गटाकडे सोपविलें होतें. त्यांनीं काढलेले निष्कर्ष व केलेल्या शिफारसी अत्यंत महत्त्वाच्या असल्याने त्या खाली सारांशरूपाने दिल्या आहेत :—

(१) इंग्रजीऐवजीं प्रादेशिक भाषांना माध्यम म्हणून स्थान देतांना घाईने हा बदल करूं नये.

(२) माध्यम बदलल्यास अभ्यासाच विषय म्हणून इंग्रजीचें स्थान कायम ठेवण्याची दक्षता घ्यावी व इंग्रजीचें ज्ञान सुधारण्यासाठी खास उपाययोजना करावी.

(३) शैक्षणिक दर्जा न खालावतां विद्यापीठांतील माध्यम कसें बदलावें याची पूर्ण कल्पना विद्यापीठांनाच असल्याने त्यासंबंधी कोणतीहि योजना विद्यापीठांनीच करावी; कायदेमंडळांनीं या बाबतींत ढवळाढवळ न करणें हेंच इष्ट आहे.

(४) ग्रंथांचा अभ्यास मुख्यत: स्वावलंबनाने व अध्यापकांच्या मार्गदर्शनाखालीं करणें हें उच्चशिक्षणाचें स्वरूप आहे. ह्यामुळे पुरेशीं पाठ्यपुस्तकें व इतर संदर्भग्रंथ उपलब्ध झाल्याशिवाय माध्यमांत बदल करणें धोक्याचें आहे. एखाद्या विशिष्ट विषयांतील पदवी परीक्षेपर्यंत लागणारीं पुस्तकें-क्रमिक, संदर्भ व इतर-पुरेशा प्रमाणांत उपलब्ध झाल्याशिवाय त्या विषयाच्या बाबतींत माध्यमविषयक बदल अंमलांत आणूं नये.

(५) माध्यम-बदल करतांना आंतरराष्ट्रीय इंग्रजी पारिभाषिक संज्ञा जशाच्या तशा स्वीकारण्यामुळे पुढील फायदे होतील :—

[अ] नव्या संज्ञा तयार करण्याचे श्रम व वेळ पुष्कळ प्राणाणांत वांचेल;

[आ] सर्व देशभर एकच प्रकारच्या संज्ञा वापरल्या जातील;

[इ] नवी परिभाषा आत्मसात् करण्याचे विद्यार्थ्यांचे श्रम वांचतील.

[ई] शास्त्रीय व तांत्रिक विषयांसाठी भारतीय भाषांत नवे शब्द तयार करणें व त्यांचा उपयोग करणें अत्यंत कठिण होईल.

[उ] आंतरराष्ट्रीय शास्त्रीय परिभाषा आत्मसात् केल्यास विद्यार्थ्यांना अधिक ज्ञानासाठी इंग्रजी, फ्रेंच, जर्मन इत्यादि भाषांतील नियतकालिकें व अद्ययावत् ग्रंथ वाचणें सुलभ होईल.

(६) तज्ज्ञ व अनुभवी विद्वानांकडून क्रमिक पुस्तकें व इतर सामान्य वाचनासाठी पुस्तकें लिहवून घेणें, तसेंच निवडक व्यक्तींकडून प्रमाणित ग्रंथांची भाषांतरें करवून घेणें यासाठी विद्यापीठांनी जरूर तर स्वतंत्र विभाग सुरूं करावेत व मंडळें नेमावींत.

(७) विद्यापीठांनी विविध विषयांना वाहिलेली व नव्या माध्यमांत प्रसिद्ध होणारीं नियतकालिकें सुरूं करावींत व त्यांत विशेषेकरून संशोधनविषयक प्रबंधांचे सारांश प्रसिद्ध करावेत.

(८) माध्यमविषयक बदल सर्व विषयांत व सर्व पातळ्यांवर एकदमच करूं नये. भाषिक अल्पसंख्यांकांच्या सोयीसाठी इंग्रजी माध्यमहि चालू ठेवावें, किंवा हिंदी माध्यम वैकल्पिक म्हणून स्वीकारावें.

(९) संलग्न महाविद्यालयांना माध्यम निवडीचें स्वातंत्र्य असावें.

(१०) नव्या माध्यमांतून शिकविणारे प्राध्यापक तयार करण्यासाठी उपाययोजना करावी. पुरेशीं नव्या माध्यमांतील पुस्तकें उपलब्ध झाल्यावर प्राध्यापकांना तयारीसाठी निदान एक वर्षाचा कालावधि देण्यांत यावा.

(११) आंतर-विद्यापीठ संबंधासासाठी इंग्रजीचाच उपयोग करावा.

(१२) कांही विषय नव्या माध्यमांतून व कांही इंग्रजींतून शिकविण्याच्या द्विभाषिक-पद्धतीला हरकत असूं नये.

(१३) माध्यमाचा बदल सुरवातीस इंटरमीजिएट अभ्यासक्रम व अ-व्यावसायिक ( non-professional ) अभ्यासक्रम यांपुरताच मर्यादित ठेवावा.

(१४) अभ्यासाचा एक विषय म्हणून इंग्रजीचें अध्यापन सुधारण्याच्या दृष्टीने ते जास्तींत जास्त काळ शिकविलें जावें. यासाठीं माध्यमिक शाळांत नव्या सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब करण्यांत यावा व हें कार्य योग्य अशा प्रशिक्षित शिक्षकांच्या हातीं सोंपवावें.

(१५) व्यावसायिक व पदव्युत्तर अभ्यासक्रमांत (तूर्त) इंग्रजी हेंच माध्यम असावें. त्यामुळे बाहेरचे परीक्षक नेमतां येतील व परीक्षांचा दर्जा कायम व समान राहील. वैद्यकीय व कायदाविषयक शिक्षणक्रमांत माध्यमविषयक बदल करतांना इंडियन मेडिकल कौन्सिल, ऑल इंडिया बार कौन्सिल इ. तज्ज्ञ व संबंधित संस्थांचा सल्ला घ्यावा.

या शिफारसी प्रत्यक्ष विद्यापीठ क्षेत्रांत कार्य करणाऱ्या तज्ज्ञांनी विचार-पूर्वक केलेल्या आहेत व त्याबद्दल मतभेद होण्याचें कारण दिसत नाहीं वरीलपैकीं एक दोन सूचनांबद्दल थोडा खुलासा करणें जरुर आहे.

## परिभाषा :

शास्त्रीय व तांत्रिक विषयांसाठी आंतरराष्ट्रीय इंग्रजी परिभाषा स्वीकारावी अशी सूचना वर केलेली आहे. राधाकृष्णन् समितीनेहि अशीच सूचना केलेली होती. हें कांही जणांना खटकण्यासारखें आहे व तें देशाभिमानी वृत्तीला घातक आहे असाहि कित्येकांचा अभिप्राय असेल. पण हें मत अतिरेकी आहे व वास्तवाला धरून नाही. शिवाय त्यांतील अव्यवहार्यता तें कार्य केवढें प्रचंड आहे याची कल्पना असेल तरच लक्षांत येईल. शास्त्रीय विषयांच्या अभ्यासासाठी सुमारें २० ते ३० लाख पारिभाषिक संज्ञा लागतील असा अंदाज आहे. एकट्या वनस्पतिशास्त्रांत वनस्पतींची १० लक्षांहून अधिक नांवें आहेत. जीवशास्त्रांतहि एवढ्याच संज्ञांची जरूरी आहे. केवळ कीटकांचीं नांवेंच साडेपांच लक्ष भरतील. रसायनशास्त्र, गणित, पदार्थविज्ञानशास्त्र, भूगर्भशास्त्र, खनिजविषयकशास्त्र, वैद्यक, स्थापत्यशास्त्र, यंत्रविद्या इत्यादि विविध शास्त्रें व त्यांच्या आधुनिक

शाखोपशाखा यांतील परिभाषा केवढी प्रचंड व विविध स्वरूपाची असेल याची कल्पनाच केलेली बरी. हे सर्व शब्द आधुनिक भारतीय भाषांत नव्यानेच तयार करावयाचे म्हणजे परिश्रम, वेळ व पैसा केवढ्या प्रचंड प्रमाणांत खर्ची घालावा लागेल ! म्हणून या बाबतींत देशाभिमान व व्यवहार्यता यांत सुबुद्धपणें तडजोडच करावी लागेल. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादि विषयांत लागणारी परिभाषा सामान्यपणें आपल्या भाषांत उपलब्ध होऊं शकेल. म्हणून येथे देशी परिभाषा व इतर शास्त्रीय व तांत्रिक विषयांत आंतरराष्ट्रीय परिभाषा स्वीकारणें हितावह व शहाणपणाचें होणार आहे. याच दृष्टीने भारताच्या राष्ट्रपतींनी एक आदेश काढून परिभाषेसंबंधीच्या या वादाचा समाधानकारकपणें शेवट केला आहे. ते आपल्या आदेशांत म्हणतात :–– "That in the field of science and technology the terms in inter-national use should be adopted with the minium change, i. e. the basic words should be those at present in use in inter-national terminology, although the derivatives may be indeanised to the extent necessary." या आदेशामुळे माध्यमाच्या बदलांतील एक अडसर दूर झाला आहे.

## एक दुष्टचक्र :

क्रमिक व इतर पुस्तकांविषयीं विचार करतांना वरील कार्यकारी गटाने एक शिफारस केलेली आहे. पदवी परीक्षेपर्यंत लागणारीं सर्व पुस्तकें पुरेशा प्रमाणांत उपलब्ध झाल्याशिवाय माध्यम बदलण्यांत येऊं नये असा अभिप्राय त्या गटाने व्यक्त केलेला आहे. या मागील हेतु असा की शिक्षकांची व विद्यार्थ्यांची कुचंबणा होऊं नये. शिवाय एखादेंच क्रमिक पुस्तक उपलब्ध झाल्यास विद्यार्थ्यांत व्यापक दृष्टिकोन व ज्ञानाची खोली आढळणार नाही, चिकित्सक वृत्तीहि दिसून येणार नाही. पण विद्यापीठांत निदान परीक्षेंतील उत्तरें तरी प्रादेशिक किंवा हिंदी भाषेंत देण्याची सवलत नसेल तर लेखक–प्रकाशक त्या भाषांत पुस्तकें कशी प्रसिद्ध करणार ? पुस्तकें असल्याशिवाय माध्यम नाही व माध्यम ठरल्याशिवाय पुस्तकें नाहींत असें हें दुष्टचक्र आहे. त्यासाठी प्रथम पायरी म्हणून उत्तरें त्या भाषेंत लिहिण्याची परवानगी, नंतर पर्यायी किंवा वैकल्पिक माध्यम, द्विभाषिक अध्यापन पद्धति व नंतर भारतीय भाषेचें संपूर्ण माध्यम अशा क्रमाने सुरवात करून हें दुष्टचक्र तोडलें पाहिजे.

## माध्यमाच्या बदलाचा क्रम :

आतापर्यंत केलेल्या विवेचनावरुन एक गोष्ट स्पष्ट झालीच असेल की जरी तूर्त कांही विषयांत व कांही पातळींवर इंग्रजी माध्यम अवश्य असलें, तरी ही कांही कायमपणें पत्करलेली थिति नव्हे. तिची जागा प्रथम क्रमाने प्रादेशिक भाषांना व विकल्पाने हिंदी भाषेला देणें भाग आहे. या बदलाचा उपक्रम घाईने मात्र करतां येणार नाही. परिभाषेच्या प्रश्नावर तोडगा सांपडला तरी पुस्तकें व नव्या माध्यमातून शिकविणारे प्राध्यापक यांचा प्रश्न अजून सुटलेला नाही. अर्थात एखाद्या मंगल प्रभातीं 'आता सर्व तयारी आहे. आजपासून नवें माध्यम सुरुं' अशी घोषणा कांही करतां येणार नाहीं. परिभाषा रूढ व्हाव्या लागतील, पुस्तकें प्रमाणित म्हणून ठरावी लागतील, नव्या माध्यमांतून शिकविण्याचीं प्राध्यापकांची तयारी व्हावी लागेल. हें सर्व होईपर्यंतच्या संक्रमणावस्थेंत थांबून चालणार नाहीं शक्य त्या मार्गानें व शक्य त्या बाबतींत माध्यम बदलण्याची सुरवात होणें जरुर आहे. कित्येक वेळा त्यांतील अडचणींचें पर्वतीकरण होण्याचा संभव असतो. नागपूर, हैद्राबाद व ना. दा. ठाकरसी महिला या विद्यापीठांनी धैर्यानें पुढचें पाऊल टाकलें व त्यामुळें फार मोठे नुकसान झाल्याचें दिसलें नाही. म्हणून महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या डोंगरकेरी समितीने या बदलाचा विद्यापीठांतील शाखानिहाय क्रम खालीलप्रमाणे सुचविला आहे :— "We would, therefore, definitely recommend that the change to Marathi and Hindi as optional and parallel media of instruction be phased as follows:-(1) arts. (2) the social sciences and commerce. (3) the natural sciences. (4) agriculture. (5) medicine. (6) engineering and other branches of technology; the change to be made only after the university considered satisfies itself that there is a sufficient body of literature in the language concerned, for teaching up to the first degree level"— Page 48, Report of the Medium of Instruction Committee. या क्रमानें जो बदल घडवावयाचा तो केवळ एकच प्रादेशिक भाषा स्वीकृत करून नव्हे. भारतांतील विशिष्ट परिस्थितीला अनुसरून हिंदी किंवा दुसऱ्या एखाद्या भारतीय भाषेच्या माध्यमाचा पर्यायी किंवा जादा माध्यमाचा (Parallel media) म्हणून स्वीकार करणें कसें जरूर आहे हें डोंगरकेरी

समितीने आपल्या अहवालांत दिलेल्या खालील आंकड्यांवरून स्पष्ट होईल : सन १९६०-६१ मधील माहिती.

| विद्यापीठ | एकूण विद्यार्थी | मराठी न जाणणारे विद्यार्थी | मराठी न जाणणाऱ्या विद्यार्थ्यांचे शें. प्रमाण |
|---|---|---|---|
| मुंबई | ४९२८५ | ३१६४६ | ६४·२ |
| पुणें | २७४४४ | २९९६ | १०.९ |
| मराठवाडा | ६१६८ | २९७ | ४·८ |

ना. दा. ठा. महिला विद्यापीठांत गुजराथी व नागपूर विद्यापीठांत हिंदी ही वैकल्पिक माध्यमें असल्याने तेथील आंकडे दिलेले नाहीत. ही महाराष्ट्रांतील विद्यापीठांसंबंधींची आंकडेवारी असली, तरी भारतांत इतरत्र यापेक्षा निराळें चित्र दिसेल असें नाही. त्यामुळे शक्य तेथे प्रादेशिक भाषा व तिच्या जोडीस हिंदी अशा दोन माध्यमांना मान्यता देणें उचित आहे.

बदलाचा हा क्रम अंमलांत आणतांना सुरवात म्हणून वर एके ठिकाणीं उल्लेखिल्याप्रमाणे माध्यम जरी इंग्रजी असलें तरी परीक्षेंत प्रश्नांचीं उत्तरें प्रादेशिक किंवा हिंदी भाषेंत देण्याची परवानगी देण्यांत यावी. याचा परिणाम त्या त्या भाषेंतून पुस्तकें प्रसिद्ध होण्यांत दिसून येईल. याशिवाय आणखी तीन मार्ग अवलंबितां येतील. (१) द्विभाषिक शिक्षणपद्धति, (२) इंग्रजीच्या अध्यापनांत सुधारणा. (३) टयुटोरियल वर्गांतून इंग्रजीच्या खास अध्यापनाची सोय. पहिल्यासंबंधी चर्चा वर केलेलीच आहे. माध्यम बदललें तरी इंग्रजी भाषेंतून अद्ययावत् ज्ञान मिळविण्याची आवश्यकता सदैव राहणारच. म्हणून इंग्रजी भाषेच्या ज्ञानाचा दर्जा कोणत्याहि परिस्थितींत कमी होऊं देतां कामा नये. यासाठी दुसऱ्या व तिसऱ्या उपायांची आवश्यकता आहे. विद्यापीठांतहि त्रिभाषा-सूत्र कसोशीने लागू करण्यांत आलें पाहिजे. इंग्रजीचा अभ्यास अनिवार्य व उच्च दर्जाचा, निदान पुरेसा झालाच पाहिजे. नाहींतर प्रादेशिक भाषेंतील हाताच्या बोटावर मोजण्याइतकी पुस्तकें वाचून (विशेषतः मार्गदर्शकांच्या जोरावर) उत्तीर्ण होणारा पदवीधर ज्ञानाच्या बाबतींत कूपमंडुक वृत्तीचा व पोकळ बनेल. दुसरें असें की दर आठवड्यास इंग्रजींतून प्रसिद्ध होणाऱ्या हजारों पुस्तकांचीं भाषांतरें आधुनिक भारतीय भाषांपैकीं प्रत्येक भाषेंत होणें कधींतरी शक्य आहे काय ?

## पदव्युत्तर शिक्षणाचें माध्यम :

माध्यमविषयक बदल हा बऱ्याच काळपर्यंत पदवी–परीक्षेपर्यंतच्या शिक्षणापुरताच मर्यादित राहील हें उघड आहे. एका विद्यापीठांतून दुसऱ्या विद्यापीठांत शिक्षणासाठी व अध्यापनासाठी जाणें, आंतर-विद्यापीठ व्यवहार, संशोधनविषयक प्रबंध सर्व भारतभर उपलब्ध होणें, परदेशी विद्यापीठांशीं संबंध, संदर्भ ग्रंथांची सोय इत्यादि कारणांमुळे हें अपरिहार्य आहे. महत्त्वाचें आणखी एक कारण म्हणजे राष्ट्रभाषा म्हणून वापरली जाण्याइतकी संपन्नता हिंदीला किंवा अन्य भारतीय भाषेला प्राप्त झाल्याशिवाय इंग्रजीचें या पातळीवरून माध्यम या स्वरूपांत उच्चाटन होणें अशक्य आहे. शिवाय संघराज्याचा सर्व कारभार, कायदेकानूनची भाषा, न्यायालयांची व केंद्रीय कायदेमंडळांची भाषा एकच ठरणें अवश्य आहे. इंग्रजीचें संपूर्ण उच्चाटन तरी कशासाठी करावयाचें ? इतर देशांनी इंग्रजीचें जास्तींत जास्त अध्ययन सुरू ठेविलें आहे हें आपण वर पाहिलेंच आहे. मुख्यमंत्र्यांच्या परिषदेनंतर त्यांनी संयुक्तपणें काढलेल्या पत्रकाच्या १८ व्या परिच्छेदांत त्यांनी या बाबतींत योग्य मार्गदर्शन केलें आहे. या प्रकरणाचा समारोप त्यांच्याच खाली दिलेल्या शब्दांत करणें योग्य होईल. ते म्हणतात—“The change-over to Hindi and generally to a regional language as a medium of education will only be effective when such language has adequately developed for the purpose of modern education and more especially for scientific and technical subjects. Every effort should be made to develop Hindi and the other languages for this purpose. Till such time as this happens, English may be continued.”

•

⚜ ⚜ ⚜

-: संदर्भ ग्रंथ :-

1) Report of the University Education Commission.

2) Report of the Secondary Education Commission.

3) History of Education in India by Nurullah and Naik.

4) Statement issued by the National Integration Conference ( Sept.-Oct. 1961 ).

5) Statement issued by the Meeting of the Chief Ministers of States and Central Ministers 1961.

6) Report of the Medium of Instruction ( Universities ) Committee.

7) Report on Medium of Instruction issued by the University grants Commission in 1961.

8) सरकारी भाषामंडळाचा अहवाल.

# जीवन शिक्षण :११:

## ऐतिहासिक पार्श्वभूमि :

राष्ट्रपिता महात्मा गांधींची 'जीवन शिक्षण' ही एक देणगी आहे. गांधीजींना असें दिसून आलें होतें की प्रचलित शिक्षणपद्धति ही केवळ पुस्तकी आहे, इंग्रजी भाषेला त्यांत अवास्तव महत्त्व दिलें आहे व तिचा खर्च जास्त असल्याने समाजांतील फारच थोडया लोकांना तिचा लाभ मिळूं शकतो. दीडशें वर्षांच्या ब्रिटिश राजवटींत साक्षरतेचें प्रमाण फक्त बारा टक्क्यांपर्यंत जाऊं शकलें होतें. शिवाय ब्रिटिश राज्यकर्त्यांनी अबकारी उत्पन्नांतून शिक्षणाचा खर्च चालविण्याची प्रथा ठेविली होती. म्हणजे जनता व्यसनी असेल तरच शिक्षणाचा प्रसार होणार? देशांतील सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळाल्याशिवाय देशाचा खरा उद्धार होऊं शकणार नाही हें ओळखून गांधीजी आपल्या देशाला उपयुक्त ठरणाऱ्या, कमी खर्चाच्या व केवळ पुस्तकी किडे न बनविणाऱ्या शिक्षणाविषयी विचार करूं लागली. शिक्षणपद्धतींतील वरील दोष दूर करण्यासाठी ३१ जुलै १९३७ च्या हरिजनमध्ये गांधीजींनी एक शिक्षणविषयक योजना देशापुढे मांडली. त्याच वर्षी सप्टेंबरमध्ये वर्धा येथे एक अखिल भारतीय शिक्षण परिषद भरली व त्यांत या योजनेची सर्वांगीण चर्चा झाली. गांधीजींनी मांडलेली शिक्षणयोजना सर्वसामान्यपणें या परिषदेत पास झाली म्हणूनच प्रथम या योजनेला 'वर्धा शिक्षण पद्धति' असें म्हणत असत. या योजनेचा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी श्री. झकिर हुसेन यांच्या अध्यक्षतेखाली याच परिषदेंत एक समिति नेमण्यांत आली. या समितीने आपला अहवाल इ. स. १९३७ च्या डिसेंबरमध्ये सादर केला. हिंदुस्थान सरकारच्या मध्यवर्ति सल्लागार समितीने श्री. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली वरील योजनेचा अभ्यास करण्यासाठी एक समिति नेमली. या समितीने आपला अहवाल ऑक्टोबर १९३९ मध्ये सादर केला. या अहवालावर आधारलेला मध्यवर्ति सल्लागार मंडळाचा अहवाल जानेवारी १९४४ मध्ये बाहेर पडला तात्विकदृष्टया मंडळाने या पद्धतीस मान्यता दिली. दरम्यान इ. स. १९३८ च्या फेब्रुवारी महिन्यांत हरिपुरा येथे अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस भरली व तिने वरील योजनेस 'राष्ट्रीय शिक्षण योजना' म्हणून मान्यता दिली. ही योजना

प्रत्यक्षांत आणण्यासाठी एप्रिल १९३८ मध्ये हिंदुस्थानी तालिमी संघाची स्थापना केली गेली. या मंडळाच्या देखरेखीखाली वर्धा येथे वरील योजनेनुसार शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी पहिली संस्था उघडण्यांत आली. इ. स. १९३८-३९ च्या कलांत मध्यप्रांत, संयुक्तप्रांत, बिहार, ओरिसा व मुंबई या प्रांतांत वरील शिक्षण-पद्धतीचे प्रयोग सुरूं करण्यांत आले. तसेच जामिया, मिलिया, आंध्र जातीय कलाशाळा, गुजराथ विद्यापीठ व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ या संस्थांनी या योजनेचा स्वीकार करून त्याबाबतचे प्रयोग सुरूं केले. परंतु इ. स. १९३९ च्या ऑक्टोबर महिन्यांत कॉंग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामे दिले. त्याणव कलमी राजवटीने या मत्रिमंडळाने सुरूं केलेलीं कामें स्थगित केली. स्वाभाविकच वर्धा शिक्षण योजनेची प्रगति त्यामुळे होऊं शकली नाही. मात्र मध्यर्वति सल्लागार शिक्षण मंडळाच्या तात्विक पाठिंब्यामुळे कांही ठिकाणीं सुरूं केलेले प्रयोग या प्रतिकूल परिस्थितींतहि टिकून राहिले. प्रतिकूल परिस्थितीचे हें पर्व १५ ऑगस्ट १९४७ रोजीं संपलें. स्वतंत्र भारताने या योजनेचा राष्ट्रीय शिक्षणपद्धति म्हणून स्वीकार केला.

## योजनेचीं प्रमुख वैशिष्ठचें :

महात्मा गांधींनी जी शिक्षणयोजना देशापुढे मांडली तिची प्रमुख वैशिष्टचें पुढीलप्रमाणे होती.--

(१) सात वर्षांचें मोफत व सक्तीचें शिक्षण.

(२) मातृभाषा हेच शिक्षणाचे माध्यम. इंग्रजीला या शिक्षणक्रमांत स्थान नाही.

(३) कोणती तरी उत्पादक हस्तकला मध्यबिंदू समजून अभ्यासक्रमाची आखणी.

(४) हें शिक्षण स्वाश्रयी असावें, निदान शिक्षकांचा पगार उत्पादनाच्या पैशांतून भागावा.

आता आपण या वैशिष्टचांचा व त्याबाबतच्या आजच्या परिस्थितीचा विचार करूं.

(१) ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सर्व भारतीय समाजाला सुशिक्षित करणें ही आपली जबाबदारी आहे असे कधी मानलेच नाही. आपल्या औद्योगिक संस्कृतीने व इंग्रजी शिक्षणाने समाजातील वरचा वर्ग पाश्चात्य विचारसरणीचा बनवून त्याच्यामार्फत आपली पकड घट्ट करावयाची असे त्याचे सर्वसाधारण

धोरण होते. या धोरणामुळे प्राथमिक शिक्षणाऐवजी माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षणावर भर दिला गेला. याचाच परिणाम म्हणजे त्यावेळच्या भारतीय समाजाचा ऐंशी टक्क्याहून अधिक भाग अज्ञानांतच चाचपडत राहिला. भारताचे स्वातंत्र्य व सामाजिक पुनरुस्थान यासाठी अविरत चिंतन व परिश्रम करणाऱ्या महात्माजींना ही वरील गोष्ट खटकल्याशिवाय कशी राहील ? समाजांतील सर्वसाधारण नागरिक जितका शिक्षित व सुजाण असेल तितकी राष्ट्राची उन्नति भराभर होते हे जाणून कमीतकमी सात वर्षांच्या सार्वत्रिक व मोफत शिक्षणाचा आग्रह महात्माजींनी धरला.

आज भारतांत सहा ते अकरा या वयोमर्यादेच्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याची सोय झाली आहे. याशिवाय आर्थिकदृष्टचा अथवा सामाजिक दृष्टचा (जातीच्या दृष्टीने ) मागासलेल्या लोकांना इतरहि शैक्षणिक सवलती मिळतात. महाराष्ट्र सरकारने तर ज्यांच्या पालकांचे उत्पन्न वार्षिक रु.१२००च्या आंत असेल त्यांना कोणतेहि शिक्षण मोफत मिळण्याची सोय केली आहे. सार्वत्रिक मोफत शिक्षणाची कालमर्यादा निदान चौदा वर्षांपर्यंत वाढवावी अशी तीव्र इच्छा असूनहि आर्थिक अडचणीमुळे भारत सरकारला ती गोष्ट करणें शक्य झालेलें नाही. अर्थात् महात्माजींच्या योजनेत सांगितलेलें मोफत शिक्षण व आज मिळणारें मोफत शिक्षण यांत फार फरक आहे. जो मूलोद्योग शाळेंत चालू असेल त्याच्या उत्पन्नांतूनच शाळेचा खर्च चालावा अशी गांधीजीची कल्पना होती. त्याबद्दलचे विवेचन नंतर येणारच आहे. आज सरकार मुलांना मोफत शिक्षण देते. हा फरक मान्य केला तरी शिक्षणाचा जास्तीत जास्त प्रसार करून सर्व-सामान्य नागरिकाला शिक्षित करण्याचा महात्माजींच्या हेतूची आज बव्हंशी पूर्ति झाली आहे असे म्हणावयास हरकत नाही.

(२) देशाचा सर्वसाधारण नागरिक सुजाण व सुबद्ध व्हावा अशी इच्छा असेल तर उच्च विचार व भावना यांचे लोण समाजांतील खालच्या थरापर्यंत पोचवावे लागते. ही गोष्ट साध्य करण्यासाठी मातृभाषेसारखे दुसरे साधन नाही. तसेंच व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचे एक प्रमुख साधनहि मातृभाषाच असते. स्वदेशाइतकेच स्वभाषेलाहि महत्त्व आहे. परंतु ब्रिटिश राजवटींत इंग्रजीचें प्रस्थ फार वाढलें व मातृभाषेला अत्यंत कमी दर्जाचें स्थान मिळालें. परकीय भाषेचा बडिवार फार माजविल्याने शिक्षण म्हणजे इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व असे एक समीकरण जनमानसात तयार झाले. त्यामुळे सर्वसाधारण विद्यार्थ्यांची शक्ति बहुतांशी भाषा आत्मसात करण्यातच खर्च होत असे. पोपटपंचीचा जो दोष आपल्या विद्यार्थ्यांत दिसतो त्याचें कारणहि हेच आहे. आपले विचार, भावना

अगर माहिती आपण इंग्रजी भाषेंत व्यवस्थितपणें मांडू शकूं याची सक्ति नसल्याने सर्वसाधारण विद्यार्थी केवळ घोकमपट्टी करीत असत. त्यामुळे विद्यार्थी पदवीधर झाले तरी त्यांची विद्यार्थी अविकसितच राही.

या गोष्टी लक्षांत घेऊनच गांधीजींनी वर्धा शिक्षण योजनेंत मातृभाषा हेंच शिक्षणाचें माध्यम ठेवण्याचें ठरविलें. त्यांनी असें सांगितलें की आमचें सात वर्षांचें शिक्षण इंग्रजी वजा करतां मॅट्रिकच्या तोडीचें होईल. विद्यार्थ्यांची किती शक्ति परकीय भाषेच्या अभ्यासांत खर्च होत होती हें गांधीजींच्या वरील विधानावरून दिसून येईल. परंतु एकेकाळी वादग्रस्त ठरलेला हा भाषेच्या माध्यमाचा प्रश्न माध्यमिक स्तरापर्यंत तर निर्विवादपणें सुटला आहे. येवढेंच नव्हे तर विज्ञान महाविद्यालयें व पॉलिटेक्निकसारख्या संस्था वगळल्या तर इतर उच्च शिक्षणाच्या संस्थांत मातृभाषेंतून उत्तरपत्रिका लिहिण्याची सवलत मिळालेली आहे.

(३) ब्रिटिश लोकांनी जी शिक्षणपद्धति येथे सुरू केली तिचा जीवनाशी कोणत्याहि प्रकारें संबंध येणार नाही अशी त्यांनी खबरदारी घेतली. केवळ पुस्तकी पंडित बनणारा तरुणवर्ग त्यामुळे कारकुनी पेशाची नोकरी करण्या-व्यतिरिक्त कांहीहि करूं शकत नसे. शिवाय प्रत्यक्ष जीवनाचा संबंध शिक्षण-क्रमांत कोठेहि न आल्याने विद्यार्थी कल्पनाविश्वांत रममाण होत. असे हे विद्यार्थी जेव्हा शिक्षण संपवून प्रत्यक्ष जीवनांत पदार्पण करीत त्यावेळी ते जीवनकलहाच्या दृश्याने बावरून जात ज्यांना नोकरी मिळत नसे ते निराश बनत. कोणत्याहि धंद्याचें शिक्षण नाही व अंगीं बाणलेली पोषाखीवृत्ति शरीरश्रमाकडे वळूंहि देत नाही आणि नोकरी तर मिळत नाही अशा चक्रांत हो तथाकथित सुशिक्षित मंडळी सापडत. याचा परिणाम म्हणजे जातिजमातींच्या भेदांनी आधीच शतखंड झालेल्या आमच्या देशांत बुद्धिजीवी व श्रमजीवी अशी एक नवी जात निर्माण झाली. परंतु देशाची आर्थिक भरभराट व्हावयाची असेल तर विविध उद्योगांना शिक्षणक्रमांत स्थान मिळालें पाहिजे, श्रमप्रतिष्ठेचें तत्व समाजाला पटलें पाहिजे या गोष्टी लक्षांत घेऊंन कोणतीतरी उत्पादक हस्तकला हा अभ्यासक्रमाचा मध्यबिंदू असला पाहिजे असें गांधीजींनी सांगितलें. मानसशास्त्रीय दृष्टयाहि महात्माजींचें हें तत्व योग्यच होतें. मुलें कृतिप्रिय असतात. या त्यांच्या प्रवृत्तीस वर्धा शिक्षण योजनेंत पूर्ण वाव आहे. 'नव्या परिस्थितिशी समायोजन करता येणें' (The capacity to adjust to new enviornment) हीच बुद्धीची खूण असें मानतात. कृति करीत असतां मुलांना अनेक लहानमोठ्या प्रश्नांचीं उत्तरें शोधावीं लागतात. हीं उत्तरें शोधतांना मुलांची बुद्धि विकसित

होते. आपण करीत असलेली वस्तू पूर्ण करण्यासाठी योग्य ती योजना, विचार जुळवाजुळव करावी लागते. शिवाय हस्तकलेंतील प्रत्येक कृति सहेतुक असल्याने मुलांची स्वयंप्रेरणा काम करीत असते. 'हात हें बुद्धि व भावना यांना जागृत करणारें प्रभावी साधन आहे' हें स्टॅन्लेटॉल या प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञाच्या वचनाची सत्यता या संदर्भांत पटते. एकाग्रता, कलात्मक दृष्टि, आत्मविश्वास हे गुणहि हस्तकलेच्या शिक्षणाने वाढीस लागतात.

हस्तकलांचा अगर विविध उद्योगांचा अभ्यासक्रमांत समावेश असावा हें महात्माजींनी प्रतिपादिलेलें तत्त्व इतकें भक्कम पायावर आधारित आहे की त्याबद्दल कोणाचेंच दुमत नाही. अभ्यासक्रमांतील सर्व विषय मूलोद्योगाद्वारेंच शिकविले जावेत याबद्दल मात्र अनेकांचा विरोध आहे. वर्धा परिषदेंत गांधीजी म्हणाले होते, "माझा ज्या गोष्टीवर खास भर आहे ती उद्योग नव्हे, पण उद्योगद्वारा शिक्षण ही होय. अक्षरज्ञान, इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान वगैरे विषयांचें ज्ञान उद्योगशिक्षणाच्या द्वारे दिलें पाहिजे." याचाच अर्थ असा की ज्या उद्योगाची निवड शाळेने केली असेल तो प्रमुख–मूल–मानून त्या उद्योगांतूनच सर्व विषयांचें ज्ञान दिलें गेले पाहिजे. म्हणूनच या शिक्षणास मूलोद्योगी शिक्षण असें म्हणतात. उदाहरणार्थ कापूस तयार कोठे होतो, कापसाला हवा कशा प्रकारची लागते जमीन कशी असावी, आदिमानवाचें कपडे व त्यांत झालेली उत्क्रांति, निरनिराळ्या देशांतील स्त्री-पुरुषांची पोशाखपद्धति, कपड्यांची स्वच्छता, कापसाचें झाड–फूल–बोंड यांच्या आकृति, कातण्याशी संबंध असलेली लोकगीतें आणि पिकाच्या हंगामांतील गाणी अशा अनेकविध विषयांची माहिती मूलोद्योगांतून द्यावी असा आग्रह धरला तर अनेकदा तो विषय व उद्योग यांचा समवाय कृत्रिम होतो. असा ओढूनताणून समवाय साधण्यापेक्षा तो प्रयत्न न करणें बरें असा विचारप्रवाह आज दिसतो. श्री. दुसाने याबाबत लिहितात की, "कांही लोक अमुक अमुक विषयांचा समवाय हातीं असलेल्या व्यवसायाशी आणलाच पाहिजे असा कांहींसा नियमच करून टाकतात. असें करणें चूक आहे... तसेंच पक्ष्यांप्रमाणे एका विषयावरून दुसऱ्या विषयावर व दुसऱ्यावरून तिसऱ्यावर असें विषयांतर करूं नये. विषयांतर म्हणजे समवाय नाही."* हा कृत्रिमतेचा दोष वगळला तरी वरील तत्त्वाप्रमाणे केवळ उद्योगाशी समवाय साधून सर्व विषयांचें ज्ञान देणारा शिक्षक हा अत्यंत प्रतिभावान, व्युत्पन्न व प्रज्ञावंत असला पाहिजे; सर्वसाधारण शिक्षकाला तें पेलणार नाही. या गोष्टीपासून व याबाबतच्या पूर्वानुभवापासून योग्य तो धडा घेऊन आज फक्त उद्योगाशी समवाय साधण्याचा आग्रह धरला जात नाही. जीवनांत ज्या विविध

* नवी देणगी अर्थात् जीवन शिक्षण—गो. सो. दुसाने–पृ. ११७.

क्रिया अगर व्यवसाय आपण करतों त्यापैकी कोणत्याहि क्रियेशीं समवाय साधावा असें मत आज मांडलें जातें; आणि त्यामुळेच पूर्वी वर्धा शिक्षण पद्धति अगर मूलोद्योगी शिक्षणपद्धति म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीस आज जीवन शिक्षण पद्धति असें म्हणतात. समवायाबाबतची भूमिका डॉ. चित्तरमने यांनी स्पष्टपणें मांडली आहे. " जीवनाच्या द्वारें शिक्षण देणें हें जीवनशिक्षणाचें ध्येय आहे. जीवनशिक्षणांत मुलांच्या जीवनाचे तीन प्रमुख घटक कल्पिले आहेत. ते म्हणजे नैसर्गिक वातावरण, सामाजिक वातावरण व उपजीविकेसाठी चालविले जाणारे मूलोद्योग हे होत. मुलांच्या जीवनांतील तीनहि केंद्रांतील व्यवसायांचें वर्गीकरण पुढे दर्शविलेल्या पांच विभागांत केलें आहे. (१) दैनंदिन व्यवसाय प्रार्थना, सफाई, बातम्या सांगणें, पाणी भरणें इत्यादि (२) सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम—सण, उत्सव, जयंत्या, पुण्यतिथ्या इत्यादि (३) नैसर्गिक वातावरणाशी संबंधित व्यवसाय-सहली, निरीक्षणात्मक भेटी, बागकाम, शेती इत्यादि (४) मूलोद्योगांतील व्यवसाय—कताई व विणकाम, कागदकाम व लाकूडकाम, बागकाम व शेती (५) खेळ व करमणूकप्रधान व्यवसाय. "* या पांच केंद्रांचा उपयोग करून ज्ञान देणें केवळ मूलोद्योगांतून ज्ञान देण्यापेक्षा कितीतरी सुलभ झालें आहे. याशिवाय समवाय पद्धतीचें विवेचन करणारें साहित्यहि आज उपलब्ध असल्याने सामान्य शिक्षकाला त्याचें मार्गदर्शन मिळते.

कृतींतून शिक्षण हें तत्व शैक्षणिकदृष्टचा सर्वमान्य आहेच तसेच ज्ञानाचे विविध तुकडे करून तें देण्यापेक्षा जीवनाशी त्याचा समवाय शक्यतों साधावा ही कल्पनाहि योग्यच आहे. या तत्त्वांचा अवलंब केल्याने आपल्या शिक्षणांतील एकांगीपणा व पुस्तकीपणा नाहींसा होण्यास मदत होईल. आज प्राथमिक शाळांत कोणता ना कोणता हस्तोद्योग असतोच व जीवनाशी ज्ञानाचा समवाय साधण्याचा प्रयत्न कृतिपाठ व ज्ञानपाठांतून केला जातो.

(४) जीवनशिक्षण स्वाश्रयी असलें पाहिजे ही कल्पनाहि बरीच वादग्रस्त ठरली. गांधीजींनी ही कल्पना पुढें मांडण्याचें कारण त्यावेळच्या परिस्थितींत सापडेल. अबकारी उत्पन्नांतून त्यावेळी शिक्षणाचा खर्च होत असे म्हणजेच अप्रत्यक्षरीत्यां शिक्षणाचा प्रसार व्यसनाधीनतेवर अवलंबून होता. शिक्षण व व्यसनाधीनता यांची ही सांगड तोडणें सामाजिकदृष्टचा महात्माजींना आवश्यक वाटलें नसतें तरच नवल! शिवाय शक्य तितक्या कमी कालावधींत सात वर्षाचें शिक्षण सार्वत्रिक अंमलांत आणावयाचें झालें तर आपल्यासारख्या गरीब देशांत शाळांतील मूलोद्योग जास्तीत जास्त उत्पादक कसा होईल हें पाहणें जरूरच होतें.

* समवाय दर्शिका—श्री. द. वि. चिक्करमने—पृ. १-३.

म्हणूनच निदान शिक्षकाच्या पगाराचा खर्च मूलोद्योगाच्या उत्पन्नांतून व्हावा अशी गांधीजींची मूळ योजना होती. परंतु शिक्षकाचें वेतन विद्यार्थ्यांच्या उत्पादनावर अवलंबून ठेविल्यास शिक्षक विद्यार्थ्यांस अधिक श्रम करावयास लागतील अशी शंका घेण्यात आली. या शंकेचें निराकरण झकीर हुसेन समितीनें आपल्या अहवालांत केलें आहे. शिक्षकांचा पगार सरकारी तिजोरींतून दिला जाईल असें त्यांनी आपल्या अहवालांत स्पष्टपणें नमूद केलें आहे. शिवाय चांगल्या कच्च्या मालाच्या पुरवठ्याचा अभाव, लहान मुलांकडून होणारी मालाची नासधूस, मूलोद्योगासाठी लागणाऱ्या साहित्याचा अभाव अथवा कमी पुरवठा यांसारख्या कारणांमुळे महात्माजीची शिक्षण स्वाश्रयी बनविण्याची योजना व्यवहारांत फारशी यशस्वी होईना. इ. स. १९४८–४९ मध्ये मुंबई राज्यांतील जीवन शिक्षण शाळांच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी एक समिति नेमली गेली होती. त्यावेळी त्या समितीला असें आढळून आलें की 'जीवन शिक्षणाच्या आर्थिक बाजूबद्दल ज्या अपेक्षा होत्या त्या प्रत्यक्ष व्यवहारांत सफल होत नाहीत. शिक्षण स्वाश्रयी बनविण्याची गोष्ट सोडली तरी शाळेच्या खर्चाचा कांही भागसुद्धा मूलोद्योगाच्या उत्पन्नांतून निघत नाही. येवढेच नव्हे तर सर्वसाधारण प्राथमिक शाळेपेक्षा जीवन शिक्षण शाळांचा खर्च जास्त असतो'* हस्त-व्यवसायाच्या कामाकडे आर्थिक व शैक्षणिक या दोन दृष्टिकोनातून पाहता येते. आज त्यांच्या शैक्षणिक मूल्यांवर अधिक भर दिला जातो. मूलोद्योगाच्या साधनांशी केवळ खेळ करून मुलांत विचारपूर्ण नियोजन, एकाग्रता, सातत्य हे गुण बाणविता येणार नाहीत. आपण बनवीत असलेली वस्तू उत्तम प्रतीचीच करूं अशी जिद्द विद्यार्थ्यांत निर्माण करणें व त्यांच्यांत उत्पादक कार्यक्षमता निर्माण करणें हाहि शैक्षणिक मूल्यांचाच एक भाग आहे. तेव्हा उत्पादकता आणि शैक्षणिक मूल्यें या गोष्टी अगदी वेगवेगळ्या नाहीत. मूलोद्योगांचें शैक्षणिक महत्त्व मान्य करूनहि आपणांस असें म्हणावें लागते की 'जीवन शिक्षण शाळांतून आज दिसणारे उत्पादनाबाबतचें दृश्य अत्यंत निराशाजनक आहे. जीवन शिक्षणाच्या प्रसारांत शाळेंतील उत्पादनाचा आर्थिकदृष्ट्या उपयोग व्हावा अशी इच्छा असेल तर बरेच मूलगामी बदल करावे लागतील.' †

---

*A review of Education in the Bombay state—Published by the Govt. of Bombay. P. 148.

† 'The over all Picture of Productivity is depressing.... the whole situation has to be radically corrected before Productivity as an economic factor can become significant in the development of Basic Education'—Report of the Assessment committee on Basic Education—1957—Published by the Ministry of Education—P. 51.

## स्वातंत्र्योत्तर कालांतील जीवन शिक्षणाची मुंबई राज्यांतील वाटचाल :

स्वतंत्र भारताने प्राथमिक शिक्षणासाठी जीवन शिक्षण पद्धतीचा स्वीकार केला. परंतु सर्व प्राथमिक शाळांच्या शिक्षकांसाठी जीं प्रशिक्षण केंद्रें होतीं त्यांचे बुनियादी प्रशिक्षण केंद्रांत रुपांतर केल्याविना प्राथमिक स्तरावर याप्रकारें शिक्षण देणारे शिक्षक कसे मिळणार ? म्हणून इ. स. १९४७ मध्ये बेळगांवच्या बी. टी. कॉलेजमध्येच पदवीधर विद्यार्थ्यांच्या जीवन शिक्षणविषयक शिक्षणाची सोय करण्यासाठी एक वर्ग उघडला. मात्र या वर्गांत माध्यम म्हणून इंग्रजीचा उपयोग केला जाई. पुढे इ. स. १९४८ मध्ये बोर्डी, अहमदाबाद व धारवाड येथे अशी प्रादेशिक भाषेंतून शिक्षण देणारी तीन महाविद्यालयें निघाली. यानंतरच्या कालांत पुष्कळ खासगी संस्थांनीहि अशी महाविद्यालयें उघडलीं. शिवाय अमरावती व धुळें येथे अशा प्रकारचीं सरकारी महाविद्यालयेंहि आहेत. इ. स. १९५३–५४ मध्ये या प्रशिक्षणाला बी. टी. अगर बी. ईड. च्या बरोबरीचें स्थान देण्यांत आलें व हें शिक्षण घेणाऱ्यांना बुनियादी प्रशिक्षण विद्यालयांच्या अध्यापकवर्गावर नेमले जावें अशीहि शिफारस करण्यांत आली. अशा प्रकारे बुनियादी प्रशिक्षण विद्यालयांसाठी पुरेसा अध्यापकवर्ग मिळण्याची खात्री झाल्यावर सरकारने इ. स. १९५४–५५ मध्ये प्राथमिक शिक्षकांच्या सर्व प्रशिक्षण संस्थांचें रुपांतर बुनियादी प्रशिक्षण विद्यालयांत केलें. बोर्डाच्या शाळांतील प्रशिक्षित शिक्षकांचें प्रमाण पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ५६ टक्के होतें. खासगी बुनियादी प्रशिक्षण विद्यालयांच्या स्थापनेस अधिक उत्तेजन देऊन हें प्रमाण दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ७५ टक्क्यापर्यंत आणण्याचें ठरविलें होते. खासगी संस्थांनी प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षण क्षेत्रांत अधिक काम करावें म्हणून सरकारने इ. स. १९५५-५६ मध्ये त्यांचें अनुदान ६६⅔ टक्क्यांपर्यंत वाढविलें व प्रशिक्षणासाठी पाठविलेल्या (deputed) दर शिक्षकामागें ६० रुपयांऐवजी ७० रुपये प्रशिक्षण खर्च देण्याचें ठरविलें.

उत्तर बुनियादी शाळांची संख्या जसजशी वाढूं लागली तसतशा अधिक चांगल्या प्रकारें प्रशिक्षित असलेल्या शिक्षकांची गरज भासूं लागली. यासाठी इ. स. १९४९ मध्ये पूर्वीचा एक वर्षाचा प्रशिक्षणकाल दोन वर्षांचा केला. शिवाय इ. स. १९५४ सालीं जीवनशिक्षणाचा विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या शिफारशीनुसार उत्तर बुनियादी शाळांना अधिक चांगले शिक्षक मिळावे म्हणून एस. एस. सी. विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाची सोय करण्यांत आली.

सर्व प्राथमिक शाळांचे रूपांतर जीवनशिक्षण शाळांत करण्याची सरकारची तीव्र इच्छा असली तरी आर्थिक अडचणीमुळे हें काम टप्याटप्याने करणें भाग आहे. परंतु सर्वसामान्य प्राथमिक शाळा व जीवनशिक्षण शाळा यांच्या अभ्यासक्रमांतील फरक कमी केल्यास त्यांचें जीवनशिक्षण शाळांत रूपांतर करणें सोपें जाईल हें ओळखून सरकारने त्या दिशेने प्रयत्न केले. इ. स. १९५५ मध्ये नवीन अभ्यासक्रम तयार करण्यांत आला. या अभ्यासक्रमानुसार फक्त हस्तकलेचा (Craft work) अभ्यासक्रम वगळून सर्वसामान्य प्राथमिक शाळा व जीवनशिक्षण प्राथमिक शाळा यांचा अभ्यासक्रम एकच प्रकारचा करण्यांत आला. सामुदायिक जीवन व इतर कार्यक्रम यांचाहि एकच अभ्यासक्रम दोन्ही प्रकारच्या शाळांना लागू केला.

प्राथमिक स्तरावर सरकारने जीवनशिक्षण पद्धतीचा संपूर्ण स्वीकार केला असून त्यांत असलेल्या अडचणींचा विचार करून त्यांचें निराकरण करण्याचा सरकारचा अटोकाट प्रयत्न चालूं आहे.

⚜ ⚜ ⚜

### -: संदर्भ ग्रंथांची यादी :-

1) Handbook for teachers of basic schools—Ministry of Education—1956.

2) जीवनशिक्षण अर्थात् वर्धा योजना—संपादक स. ज. भागवत.

3) आपलें मूलोद्योगी राष्ट्रीय शिक्षण—सेवलेकर-चौधरी.

4) नवी देणगी अर्थात् जीवन शिक्षण—दुसाने.

5) Report of the Assessment committee on basic Education—1957.

6) Difficulties of basic school teachers—Published by the National Institute of Basic Education—1960.

7) Report of the progress of basic education 1956-57—Published by the Govt. of Bombay.

8) The Wardha Scheme of Education— Exposition and Examination—C. J. Varkey.

9) A review of Education in the Bombay State 1855-1955—Published of the Govt. of Bombay.

# समाजशिक्षण : १२ :

## शिक्षण : राष्ट्राची पहिली गरज

प्लेटोने एके ठिकाणी म्हटलें आहे—"States are not made from rocks and trees, but from the character of their citizens which turn the scale and draw everything after them." राष्ट्र म्हणजे एखाद्या विशिष्ट भूप्रदेशांत आढळणारी भौगोलिक अथवा नैसर्गिक परिस्थिति नव्हे. राष्ट्राचा मोठेपणा त्यांतील नागरिकांच्या सुसंस्कृततेवर अवलंबून आहे. 'राष्ट्राची संस्कृति म्हणजे तेथील लोकसंख्या किंवा मोठमोठीं शहरें नव्हेत, किंवा त्यांतील नैसर्गिक साधनसंपत्तीहि नव्हे; तर त्या राष्ट्रांत निर्माण होणाऱ्या सुबुद्ध व सुसंस्कृत नागरिकांचें वर्तन हा संस्कृतीचा केंद्रबिंदु आहे' असें इमर्सनने म्हटलें आहे.* या विधानांतील सत्य आधुनिक सुधारलेल्या जगतांत सर्वाधिक महत्त्वाचें समजलें जातें. त्यानुसार प्रचलित परिस्थितींत सुधारणा घडवून आणण्याची पराकाष्टा प्रगतीच्या शिखरावर पोहोचलेली महान् राष्ट्रेंहि करीत आहेत. राष्ट्राचें भौतिक ऐश्वर्य हें बऱ्याच अंशीं त्या राष्ट्रांत शिक्षणाचा प्रसार कितपत झाला आहे यावर अवलंबून असते. हे आपण प्राथमिक शिक्षणाबद्दल चर्चा करतांना पाहिलेच आहे. आपल्या राष्ट्राकडे नजर टाकल्यास शिक्षणाच्या बाबतींत खेदजनक परिस्थिति असल्याचे आपणांस दिसून येईल. राजकीय स्वातंत्र्य मिळालें एवढ्यामुळेच राष्ट्राला भयानक दारिद्र्य आणि अज्ञान यांतून वर खेचून काढतां येईल अशी भाबडी आशा बाळगणें व्यर्थ आहे. राजकीय स्वातंत्र्यामुळे योग्य दिशेने प्रयत्न करण्याची संधि मिळाली एवढाच त्याचा खरा फायदा आहे. राष्ट्राच्या आजच्या परिस्थितींत दारिद्र्य, अनारोग्य, शारीरिक आणि सांस्कृतिक सुख-

---

*"Our true test of civilization is not the census or the size of cities, nor crops but the kind of man a country turns out". Quoted from Adult Education for a New Democracy—Dev Indar Lall—Page 3 (1954).

सोयींचा अभाव इत्यादि अनेक बाबी अग्रक्रम देण्याच्या दृष्टीने निरक्षरतेच्या निर्मूलनाच्या कार्यापेक्षा अधिक महत्त्वाच्या ठरतील; पण हीं सर्व उद्दिष्टें जनतेच्या हार्दिक सहकार्याशिवाय साध्य होणें अशक्य आहे. जनतेला साक्षरता आणि किमान 'समाजशिक्षण' प्राप्त झाल्याशिवाय हें सहकार्य पुरेशा प्रमाणांत मिळणार नाही. स्वातंत्र्य मिळविणें व मिळालेलें स्वातंत्र्य टिकविणें या दोन्ही गोष्टी पुष्कळ अंशी शिक्षणावरच अवलंबून आहेत. शिक्षणाच्या अभावी मागासलेलें राष्ट्र आणखीच मागे राहणार यांत काय संशय? पंजाब केसरी लाला लजपतराय यांनी अशिक्षित राष्ट्राच्या स्थितीचें वर्णन मोठ्या मार्मिकपणें केलेलें आहे.—"The efficiency of an illiterate people in competion with an educated nation is as the crooked stick against the speedy plough, the sickle against the reaper; the bullock-cart against aeroplane; the pony messenger against..the wireless..Take away from one generation all education, and society must revert to the stick plough, the ox-cart and such primitive means."*

## निरक्षरतेचा शाप :

राष्ट्राला जरूर असणारें हें शिक्षण म्हणजे केवळ सही करता येण्यापुरती साक्षरता नव्हे; तथापि फक्त साक्षरतेच्या दृष्टीनेहि आपली नवजात लोकशाही किती अस्थिर पायावर उभी आहे व ब्रिटश सत्तेचा केवढा लज्जास्पद वारसा आपणांस मिळाला आहे हें साक्षरांच्या संख्येबाबतच्या खालील कोष्टकावरून दिसेल :--

| खानेसुमारीचें वर्ष | साक्षरांचें शें. प्रमाण | |
|---|---|---|
| १८८१ | ३·५ | (संस्थानें वगळून फक्त ब्रिटिश अंमलाखालील भारतापुरते आंकडे) |
| १८९१ | ४·६ | |
| १९०१ | ५·३ | |
| १९११ | ५·९ | |
| १९२१ | ७·३ | |
| १९३१ | ८·० | |
| १९४१ | १२·५ | |
| १९५१ | १६·६ | |
| १९६१ | २३·७ | (पुरुष ३३·९ व स्त्रिया १२·८) |

* Lajpat Rai: The Problem of National Education in India —Page 216.

जगांतील सर्वांत जुन्या संस्कृतीचे वारसदार म्हणून आपण मोठा अभिमान बाळगतो; पण ही स्थिति पाहून कोणालाहि आपली मान लाजेने खाली घालावी लागेल. विशेष म्हणजे अशी स्थिति इतकी वर्षे—स्वातंत्र्य प्राप्तीनंतर एक तप उलटले तरीहि--कायम आहे ही स्थिति चीड येण्यासारखी आहे. असें श्री. सय्यद्दिन यांनी म्हटलें आहे. ते म्हणतात :

"If some one were to prepare a literacy map of the world and colour the illiterate areas of the earth black, India will, to our shame, look rather like a dark continent! This is a state of affairs which makes one feel both ashamed and indignant ashamed that a country which prides itself on one of the oldest cultural traditions in the world, should have come to this pass; indignant because we have been content to put up with this blot on our reputation for so long!"*

वर दिलेल्या साक्षरतेसंबंधींच्या आंकड्यांवरून एक गोष्ट दिसून येते ती अशी की गेल्या ऐंशी वर्षात कमीं प्रमाणांत का होईना, पण प्रगतीची वाटचाल सुरु आहे. परंतु स्वातंत्र्यपूर्व काळांतील आंकडे अखंड भारताबद्दलचे आहेत व संस्थानी प्रदेश त्यांतून वगळलेला आहे. बडोदें, औंध, त्रावणकोर वगैरे थोडे अपवाद वगळल्यास संस्थानांतील परिस्थिति या बाबतींत अधिकच वाईट होती. शिवाय भारतांतील लोकसंख्येच्या वाढीचा व होणाऱ्या साक्षरांच्या प्रमाणाचा मेळ कधीच बसलेला नाही. उदाहरणार्थ, १९४१ साली साक्षरांचे शेकडा प्रमाण १२·५ होते हे १९३१ सालापेक्षा शे. ४·५ ते जास्त होते अर्थात् याला प्रगति म्हणतां येईल; परंतु सन १९३१ पेक्षा सन १९४१ मध्ये लोकसंख्येंत शे. १४·८ इतकी वाढ झाली. अर्थात् साक्षरतेंत झालेल्या वाढीपेक्षा निरक्षरतेंतील वाढ अधिक आहे व या दृष्टीने ही प्रगति फसवी आहे.

## देशोदेशींची साक्षरता :

साक्षरतेच्या बाबतींत इतर राष्ट्रांच्या तुलनेने आपण किती मागासलेले आहोंत हें खालील आंकड्यांवरून स्पष्ट होईल :-- †

---

* K. G. Saiyidain—Problems of Educational Reconstruction, Page 196-197 (1962).

† हे आंकडे 'साक्षरता आणि साक्षरता प्रसाराच्या पद्धती' या पुस्तकांतून घेतले आहेत--पृ. २०.

| देशाचें नांव | साक्षरतेचें शें. प्रमाण | देशाचें नांव | साक्षरतेचें शें. प्रमाण |
|---|---|---|---|
| डेन्मार्क | १०० | स्वीडन | १०० |
| न्यूझिलंड | १०० | ब्रिटन · | ९९ |
| फिनलंड | ९९ | फ्रान्स | ९८ |
| ऑस्ट्रेलिया | ९८ | अमेरिका | ९७ |
| झेकोस्लोव्हाकिया | ९५ | कॅनडा | ९५ |
| इटली | ८० | स्पेन | ७० |
| सिलोन | ६० | ब्रम्हदेश | ५६ |
| चीन | ५० | मेक्सिको | ५० |
| भारत | २३ | | |

रशियांतील साक्षरतेचें प्रमाण १०० टक्के आहे असा त्या राष्ट्राचा दावा आहे. वरील राष्ट्रांनीं अत्यंत पद्धतशीरपणे निरक्षरतेचा नायनाट केलेला आहे. विशेषत: डेन्मार्क, स्वीडन, रशिया, तुर्कस्तान, कॅनडा या देशांनी केलेले प्रयत्न विशेष उल्लेखनीय आणि बोधप्रद आहेत.*

## मतदार सुसंस्कृत हवा !

आपलें राष्ट्र लोकशाहीवर आधारलेलें गणराज्य असल्यामुळे आपल्या राष्ट्राला तर शिक्षणाची विशेषच गरज आहे. जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मार्फत आपल्या राष्ट्राचा राज्यशकट हांकला जातो. धर्म, जाति, लिंग वगैरे कोणताहि भेदभाव न करतां घटनेने प्रत्येक प्रौढाला मताधिकार दिलेला आहे. भारतांतील मतदारांची संख्या जवळजवळ २० कोटी आहे व मतदारांची एवढी मोठी संख्या असलेली लोकशाही जगांत भारताखेरीज दुसरी नाही. पण लोकशाही सुस्थिर होण्यासाठी मतदार सुबुद्ध, सुसंस्कृत व स्वतंत्रपणें आपलें मत बनवितां येणारा असावा लागतो. 'शिक्षणामुळे जनतेला मार्गदर्शन करणें सुलभ होतें; पण सुशिक्षित लोकांना जबरदस्तीने एखाद्या विशिष्ट मार्गानेच जाण्यास भाग पाडणें अशक्य आहे. सुशिक्षित जनतेवर सत्ता गाजविणें एका दृष्टीने सोपें आहे, पण त्यांना गुलाम बनविणें मात्र अशक्य असतें. (Education makes people easy to lead, but impossible to

* तपशीलवार माहितीसाठी पाहा : 'Teacher's Handbook of Social Education, Appendix I.' तसेंच, 'Adult Education for a New Democracy' Chap. IV.

be driven; easy to govern, but impossible to be enslaved Dev Indar Lall—'Adult Education for a New Democracy', Page 5.) घाना–मोरोक्कोपासून फिलिपाइन्सपर्यंत अनेक आफ्रो–आशियायी राष्ट्रें दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालीं. या नवोदित राष्ट्रांपैकीं अनेकांनीं लोकशाहीचा प्रयोग करून पाहिला, पण मतदार अडाणी व असंस्कृत असल्यामुळे आज भारताचा एकमेव अपवाद वगळतां सर्वत्र लष्करी स्वरुपाची हुकुमशाही आढळून येत आहे. लोकशाही मूल्यांची पद्धतशीर गळचेपी कित्येक राष्ट्रांत करण्यांत येत आहे. म्हणून मतदार जाणता व चांगल्यावाईटाचा निर्णय करूं शकणारा असणें जरुर आहे व त्यासाठी शिक्षण हाच एक उपाय आहे.

सुमारें ६०–७० वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर व काही अंशी आंतरराष्ट्रीय अनुकूल परिस्थितींच्या दडपणामुळे आपणांस स्वातंत्र्य मिळालें. पण या स्वातंत्र्याच्या स्वागताला व जपणुकीला अवश्य असणारी मानसिक व नैतिक तयारी मात्र आपणांजवळ नव्हती. स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्या पेलण्याच्या पात्रतेचा आमच्याजवळ अभाव होता. तेथवरच्या लढ्यांत जनतेला व तिच्या पुढाऱ्यांना असलेल्या व्यवस्थेचें विध्वंसन, मोडतोड कशी करावी याचाच सराव होता. स्वातंत्र्यानंतर कराव्या लागणाऱ्या नवनिर्मितीची, रचनात्मक कार्याची कल्पनाच आम्हांला नव्हती.* राष्ट्राचा नव्याने घडण करावयाची असल्यास आपणांस स्वार्थत्याग, सेवा, परिश्रम इत्यादि सद्‌गुणांची कांस धरावी लागते हें अजूनहि आम्हांला पुरेशा प्रमाणांत पटलेलें नाहीं. या सद्‌गुणांची जोपासना होण्यासाठी देशांत योग्य असें बौद्धिक व शैक्षणिक वातावरण निर्माण व्हावयास हवें. उचित अशा सामाजिक व नैतिक प्रवृत्ति संवर्धित झाल्या पाहिजेत. यासाठी शिक्षण देणें हाच एकमेव मार्ग नव्हे काय ? हे सद्‌गुण जनता

* "This freedom, however, finds us unprepared, morally and mentally to shoulder the great new responsibilities which it has brought in its train. We did gain a great deal of political education through our political activities, but it was primarily a training in the technique of fighting even though the fighting was mainly non-violent. But this transfer of power to the people and the challenge to construct what is good and socially desirable instead of merely criticizing what was bad and reactionary and socially unjust, bring up new needs and problems and call for new qualities and attitudes"—K. G. Saiyidain, Problems of Educational Reconstruction, Page 212 (1962).

व तिचे नेते यांच्यामध्ये निर्माण झाले नाहीत तर ' मुकीं बिचारीं कुणिहि हांका, अशीं मेंढरे ' बनण्याची पाळी जनतेवर येणार यांत काय संशय ? स्वार्थी व कारस्थानी लोक आपल्या कुटिल डावपेंचांनी जनतेला भुलवितील, माथेफिरूपणा व पूर्वग्रह यांचे बिकट थैमान सर्वत्र माजेल आणि शांतता, सुरक्षितता व सुख यांना असल्या लोकशाहीमुळे सर्वांत अधिक हानि पोहोचेल. लोकशाहीचे मर्मस्थान कोणतें हें ओळखून आपण सुबुद्ध व जाणता मतदार कसा निर्माण होईल याविषयी सतत जागरूक राहिलें पाहिजे. श्री. सैय्यद्दिन यांनी हीच गोष्ट मोठ्या प्रभावीपणें खालील शब्दांत सांगितली आहे :—

"An uneducated democracy, swayed by random justs of fanaticism and prejudice and invitingly responsive to the machinations of self-seeking demogogues, can be even a greater menace to peace, security and happiness than any other form of Government. To say so is not to decry democracy, but to safeguard it against the corruption of its social, moral and intellectual content."*

अधिक स्पष्टपणें लिहावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल की लोकशाहीतील शिक्षणाचा उद्देश मुख्यत: दोन प्रकारच्या धोक्यापासून बचाव करणें हा असतो. कोणत्याहि तऱ्हेचा प्रचार योग्य चिकित्सा किंवा पारख न करतां सत्य म्हणून जशाचा तसा स्वीकारणें हा एक धोका अशिक्षित मतदारांच्या बाबतींत संभवतो. दुसरी अपप्रवृत्ति म्हणजे जातीय, धार्मिक किंवा भौगोलिक भेदामुळे व स्वार्थी हितसंबंधांतून उम्दवणाऱ्या संघर्षामुळे निर्माण होणारी फुटीर प्रवृत्ती ही होय. हिच्यामुळे सामाजिक एकात्मता नष्ट होते व राष्ट्रभावनेला कीड लागते. आपण लोकशाहीचा स्वीकार केला असल्यानें साहाजिकच लोकांना, बहुजन समाजाला महत्त्व प्राप्त झालें. निवडून येऊं इच्छिणाऱ्या उमेदवाराला आपली योग्यता मतदारांना पटवून देणें भाग आहे. मतदारांची खात्री पटविण्याचे दोन मार्ग आहेत एक मार्ग डोंगरावरील चढणीच्या मार्गाप्रमाणे कष्टाचा व खडतर आहे. उच्चतर नैतिक व आत्मिक बळ ज्यांच्याजवळ आहे, सेवेच्या रूपाने ज्यांनी समाजाला कांहींतरी दिलेलें आहे, ज्यांना समाजाकडून कांहींतरी लुटून घेण्याची इच्छा नाहीं अशा समर्थ नरवीरांचा हा मार्ग आहे. तो मार्ग सेवेचा, कष्टाचा आहे. म्हणून तें

* K. G. Saiyidain-Problems of Educational Reconstruction, Page 213-214. (1962).

येरागबाळ्याचें काम नव्हे. दुसरा मार्ग उतरणीचा, नैतिक अध:पाताचा व म्हणूनच सोपा आहे. स्वार्थ साधण्यासाठी लोकांच्या अज्ञानाचा, रूढींचा, श्रद्धेचा फायदा घेऊन राजकीय सत्ता बळकावण्याचा तो सुलभ मार्ग आहे. पहिल्या मार्गांत लोकांचें हित हें अंतिमध्येय मानलें जातें; तर दुसऱ्यांत स्वार्थ व सत्ता हीं उद्दिष्टें प्राप्त करून घेण्याचें साधन या दृष्टीने जनतेकडे पाहिलें जाते. हे धोके टाळावयाचे असतील तर मतदाराच्या अंगीं खऱ्याखोटयाची पारख करण्याची पात्रता आली पाहिजे व यासाठी त्याला सुशिक्षित केला पाहिजे.

## संपन्न जीवनाचें उद्दिष्ट :

तथापि केवळ राजकीयदृष्टचा मतदार जागृत झाला की सर्व काम भागलें असें नव्हे. राजकारण हें मानवी जीवनाचें एक अंग आहे. मनुष्याचें जीवन समृद्ध होण्यासाठी माणसाला रसिकता प्राप्त झाली पाहिजे, त्याला चांगल्या वाइटाचा, सत्यासत्याचा निर्णय करतां आला पाहिजे. तसेंच, त्याच्या सामाजिक प्रवृत्तीचा योग्य विकास झाला पाहिजे.* हें उद्दिष्ट जादा महत्त्वाकांक्षी स्वरूपाचें वाटेल विशेषत: अद्यापि साधें साक्षरतेचें उद्दिष्ट पदरांत पडलेलें नाही ही गोष्ट लक्षांत घेतां वरील सर्वांगीण विकासाचें उद्दिष्ट म्हणने मृगजळाची हांव धरण्यासारखें होईल. पण समाजशिक्षणाची अर्वाचीन कल्पना साक्षरतेपुरतीच संकुचित नाही. शिवाय हें ध्येय अशक्य कोटीचें आहे असें म्हणतां येणार नाही. रशिया अमेरिकेंत असें शिक्षण आजहि यशस्वीरीत्या दिलें जातें.

## प्राथमिक शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्व :

प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व्हावे, सक्तीचें व्हावें, यासाठी केवढे भगीरथ प्रयत्न करावयास हवेत याचे दिग्दर्शन मागे एका स्वतंत्र प्रकरणांत केलेंच आहे. प्राथमिक शिक्षणाची योजना जर यशस्वी व्हावयाची असेल, तर पालक सुशिक्षित निदान शिक्षणाचें महत्त्व पटलेला असला पाहिजे. स्वत: झळ सोसून मुलाला किंवा मुलीला शिक्षण देण्याची त्याची तयारी हवी. त्यासाठी त्याला प्रचलित परिस्थितीची जाणीव असली पाहिजे. हे त्याला मिळणाऱ्या शिक्षणावर अवलंबून

* "We have to contribute to the development of peoples appreciation, their critical faculties and their social sense that they may distinguish between the superior and the inferior in the realm of art, the true and false in the realm of knowledge and the good and bad in the realm of conduct' —K. G. Saiyidain— Problems of Educational Reconstructions, Page 221.

आहे. भारतांतील बहुसंख्य पालक निरक्षर आहेत. शिवाय सक्तीच्या वयोमर्यादेपलीकडे गेलेला ( ११ वर्षांवरील ) प्रौढ जरी चार अक्षरें शिकलेला असला तरी थोडयाच दिवसांत तो पुनः निरक्षर बनतो आणि समाजाची एकूण स्थिति ' जैसे थे ' अशीच राहाते. म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी, शिकलेल्या प्रौढांची साक्षरता टिकविण्यासाठी व सर्वसामान्य प्रौढाला प्रचलित परिस्थितीची जाणीव होण्यासाठी तरी प्रौढ शिक्षणाची खास जरूरी आहे.

तात्पर्य, देशाच्या भौतिक, राजकीय, सामाजिक उत्कर्षासाठी, लोकशाहीच्या यशस्वितेसाठी, निरक्षरतेच्या निर्मूलनासाठी व प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारासाठी, व्यक्तीचें जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी, नागरिकाच्या व्यावसायिक उत्कर्षासाठी व्यापक स्वरूपाचें समाजशिक्षण प्रत्येक प्रौढाला देणें देशाच्या आजच्या परिस्थितींत आवश्यक ठरलें आहे. एवढेंच नव्हे, तर जगाच्या शांततेसाठी व भल्यासाठीहि अशा शिक्षणाची जरूरी आहे. युनेस्कोने प्रसिद्ध केलेल्या "Men against Ignorance" या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. "अज्ञानाच्या विरुद्ध आपण जो लढा उभारला आहे, ती आजच्या काळांतील अत्यंत महत्त्वाची अशी घटना आहे. आज जगांतील सर्व माणसांना ही गोष्ट पटूं लागली आहे की जगांत शांतता प्रस्थापन करण्यासाठी कोणतीहि यंत्रणा आज जर उभी केली तरी जोपर्यंत जगांतील अर्धे लोक अज्ञानांत व दारिद्र्यांत खितपत पडले आहेत तोपर्यंत ही यंत्रणा केव्हाहि यशस्वी होणार नाही."*

## समाजशिक्षणाची आधुनिक कल्पना :

वरील विवेचनावरून ही गोष्ट स्पष्ट झाली असेल की आधुनिक काळांत प्रौढसाक्षरतेची पूर्वीची कल्पना पुरेशी ठरणार नाही. ज्यांना प्राथमिक शिक्षण घेतां आलेलें नाहीं किंवा घेऊनहि तें पुरेसें नसल्यामुळें जे पुनः निरक्षर बनले आहेत अशा अशिक्षित लोकांना साक्षर करणें आजहि अत्यावश्यक आहे यांत शंका नाही. पण हें प्रौढशिक्षणाचें केवळ एक अंग होय. पाश्चात्य देशांतून साक्षरताप्रसाराचें ध्येय जवळजवळ पूर्णपणें साध्य झालें; म्हणून तेथील प्रौढशिक्षणान्नें कार्य संपलें असें त्या देशांनीं मानलें नाहीं. त्यांनी प्रौढशिक्षणाला समाजशिक्षणाचें व्यापक स्वरूप दिलें. या नव्या कल्पनेनुसार साक्षरतेबरोबरच व्यक्तीची बौद्धिक, सामाजिक, आर्थिक व नैतिक उन्नति करणें हें या शिक्षणाचें ध्येय बनलें. सन १९४९ मध्ये मध्यवर्ति शिक्षण सल्लागार मंडळाच्या बैठकीपुढे

* साक्षरता व साक्षरता प्रसाराच्या पद्धति—मलपृष्ठ ३

भाषण करतांना भारताचे शिक्षणमंत्री मौ० आझाद म्हणाले : "प्रौढ शिक्षणाचें उद्दिष्ट फक्त प्रौढांना साक्षर करणें एवढेंच असतां कामा नये. गणतंत्रीय समाजांतील आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी नागरिकांना प्रौढशिक्षणामुळे मदत झाली पाहिजे. दृष्टिकोनाच्या या व्यापकतेमुळेच प्रौढशिक्षणाचें समाज-शिक्षणांत रुपांतर करण्यांत आलें आहे." समाजशिक्षणाची कल्पना स्पष्ट करतांना प्रो० हुमायुन कबीर यांनी म्हटलें आहे :* "समाजशिक्षणांतील अभ्यासक्रमामुळे जनतेंत नागरिकत्वाच्या भावनेचा उदय झाला पाहिजे व समाजाच्या एकतेंत वाढ झाली पाहिजे. समाजशिक्षण प्रौढ निरक्षरांना साक्षर बनविण्यांतच समाधान मानीत नाही, तर सर्वसामान्य जनतेला सुशिक्षित करणें हा त्याचा उद्देश आहे." "समाजशिक्षणांत आम्हांला पूर्ण मानवाचें शिक्षण अभिप्रेत आहे. जगाच्या बाबतींत त्याला ज्ञान प्राप्त व्हावें यासाठी त्याला साक्षर करावयाचें. आपल्या सभोंवतीचें वातावरण स्वतःला अनुकूल कसें बनवावें, ज्या नैसर्गिक परिस्थतींत आपण राहतो तिचा सदुपयोग कसा करावा यासंबंधींचें शिक्षण मनुष्याला मिळावें. स्वतःची आर्थिक स्थिति सुधारणें, व्यक्तीची व समाजाची वैयक्तिक स्वच्छता ठेवणें, घरगुती जीवन आरोग्यसंपन्न बनविणें, प्रत्येक व्यक्तीला उत्तम नागरिक बनवून जागतिक प्रश्नांशीं त्याची ओळख करून देणें आणि राष्ट्राच्या प्रगतीला साहाय्यभूत होतील असे निर्णय घेण्याची त्याची पात्रता बनविणें इत्यादि गोष्टी समाजशिक्षणामुळे शक्य व्हाव्यात" अशी अपेक्षा मौलाना आझादांनी व्यक्त केली होती. (Address to the Unesco Seminar on Rural Education in 1951) या दृष्टिकोनाला अनुसरून सध्या समाजशिक्षणांत कला, कौशल्य, व्यावसायिक उत्पादन वाढविण्याच्या नव्या पद्धति, वैयक्तिक स्वच्छता, सामाजिक व वैयक्तिक जीवन समृद्ध करण्याची कला, नागरिकत्व इत्यादि विषयांचा अंतर्भाव करण्यांत येतो.

## समाजशिक्षणाचीं उद्दिष्टें :

समाजशिक्षणाच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी सन १९४९ मध्ये श्री. मोहनलाल सक्सेना यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति नेमण्यांत आली होती. या समितीने आपल्या अहवालांत समाजशिक्षणाचीं खालील उद्दिष्टें नमूद केलीं आहेत--

१. नागरिकांमध्ये त्यांचे अधिकार व कर्तव्यें यांची जाणीव निर्माण करणें व समाजसेवेच्या भावनेचा विकास घडवून आणणें;

* Humayun Kabir—Education in New India, Page 83.

२. नागरिकांना लोकशाहीतील राज्यशासनासंबंधी ज्ञान देणें;

३. देश व जग यांच्यापुढे असलेल्या प्रचलित प्रश्नांची माहिती देणें;

४. नागरिकांच्या मनांत भारतीय संस्कृतीविषयी प्रेमभाव निर्माण करणें;

५. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या द्वारें नागरिकांना चांगल्या प्रकारें मनोरंजन करून घेण्याची संधि उपलब्ध करणें;

६. नागरिकांना नैतिक व शीलविषयक मूल्यांची माहिती देणें;

७. लेखन, वाचन व सोपें गणित यांचें ज्ञान देणें;

८. उपयुक्त आणि इतर कला व कौशल्य यांचे ज्ञान देऊन रिकाम्या वेळेचा सदुपयोग करण्याची व त्यांच्या द्वारें शक्यतर आर्थिक स्थितीची सुधारणा घडवून आणण्याची संधि नागरिकांना उपलब्ध करून देणें;

९. वाचनालयें, पुस्तकालयें, शिक्षणसमित्या, जनता–महाविद्यालयें यांच्या द्वारें मिळालेलें शिक्षण कायम राहील व शिक्षणांत सातत्य राहील अशी दक्षता घेणें;

१०. नागरिकांमध्ये परस्पर सहकार्याच्या भावनेचा विकास घडविणें;

या व्यापक उद्दिष्टांत व्यक्तीच्या व समाजाच्या हिताकडे लक्ष देण्यांत आलें आहे व त्यांतहि योग्य समतोल साधला गेला आहे. शिक्षणाच्या द्वारें व्यक्तीचा बौद्धिक विकास तर साधेलच, पण शेती, स्थापत्य, घरगुती उद्योग-धंदे यासंबंधीच्या माहितीमुळे व्यक्तीची व्यावसायिक क्षमताहि वाढेल. आरोग्य-विषयक माहिती, सामान्य रोगांची उपचारपद्धति, चौरस आहार यांच्या ज्ञानामुळे व्यक्तीचा शारीरिक विकास होण्यास मदत होईल. सहकार्य व सामाजिकता यांच्या द्वारें सामाजिक जीवन जगण्याची कला व्यक्तीला आत्मसात् करतां येईल. तसेंच नृत्य, संगीत, नाट्य, लोकगीतें वगैरे सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे व्यक्तीचा सांस्कृतिक विकासहि घडून येईल. समाजाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचें जे उद्दिष्ट आहे तें म्हणजे व्यक्ति व समाज यांमध्ये असणाऱ्या फुटीर प्रवृत्तींचा अंत करून एक समान संस्कृति व सामाजिक एकात्मता यांची निर्मिति हें होय. निसर्गाने दिलेल्या साधनसंपत्तीचें संरक्षण व विकास करणें, सहकारी व इतर सामाजिक संस्थांचा प्रपंच व्यवस्थित चालविणें व व्यक्तीच्या हितापेक्षा समाजाच्या किंवा राष्ट्राच्या हिताला प्राधान्य देणें या सर्व उद्दिष्टांच्या मागे समाजहित साधणें हाच हेतु आहे.

## समाजशिक्षणाचा सरकारी कार्यक्रम :

वरील उद्दिष्टांच्या संदर्भाने भारत सरकारने पुढील कार्यक्रमांचा स्वीकार अधिकृतरीत्या केला आहे-(१) साक्षरता प्रसार (२) आरोग्यविषयक नियमांचें ज्ञान देणें (३) प्रौढांची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठी त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणें (४) नागरिकत्वाच्या भावनेचा विकास करणें व स्वतःच्या हक्कासंबंधी आणि जबाबदाऱ्यासंबंधी जाणीव निर्माण करणें (५) व्यक्तीच्या आणि समाजाच्या गरजा लक्षांत घऊन शारीरिक व मानसिक आरोग्याला पोषक होतील अशा वरच्या दर्जाच्या मनोरंजनाच्या कार्यक्रमांचें आयोजन करणें.

इ. स. १९३७ पर्यंत सरकारी व खाजगी प्रयत्नांनी प्रौढशिक्षणाचें तुरळक स्वरुपाचें कार्य केलें जात होतें. या सर्व कार्यांत एकसूत्रता येण्याच्या दृटीने अखिल भारतीय प्रौढशिक्षण मंडळाची ( All India Adult Education Association ) स्थापना इ. स. १९३७ मध्ये करण्यांत आली. सन १९४४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या सार्जंट योजनेंत ( Post-war Educational Development ) प्रौढशिक्षणाचा एक २५ वर्षांचा व दरसाल सुमारें तीन कोट रुपये खर्चाचा कार्यक्रम सुचविण्यांत आला. खेडयांत प्रौढशिक्षण केन्द्रें व शहरांतून रात्रीच्या शाळा सुरुं करण्याची सूचनाहि करण्यांत आली. तथापि या सर्व प्रयत्नानंतर स्वातंत्र्याच्या उषःकाळीं एकंदर या बाबतींतील प्रगति समाधानकारक असल्याचें दिसलें नाही. सन १९४७ सालीं देशांत प्रौढशिक्षण देणाऱ्या एकूण ५६१७ संस्था होत्या व त्यांमध्ये १५७९१८ प्रौढांना शिक्षण दिलें जात होतें.

स्वातंत्र्यानंतर प्रौढशिक्षणाच्या कल्पनेंत महत्त्वाचा बदल घडून आला आणि वर दिलेली समाजशिक्षणाची नवी कल्पना उदय पावली. साक्षरतेबरोबरच नागरिकत्वाचें आणि जीवन सुखी करण्याचें शिक्षण देण्याचें ठरलें. मध्यवर्ति शिक्षणखात्याने समाजशिक्षणाच्या प्रसारासाठी एक मार्गदर्शक योजना ( Guide Plan ) तयार केली. इ. सन १९४९ मध्ये भरलेल्या राज्यशिक्षण मंत्र्यांच्या परिषदेने ही योजना स्वीकारली. या तपशीलवार योजनेनुसार आता शिक्षणाच्या दृक्–श्राव्य साधनांचा उपयोग, समाजशिक्षण कार्यकर्त्यांचीं शिबिरें, कार्यकर्त्यांना प्रशिक्षण, साक्षरतेनंतरच्या शिक्षणाच्या सोयींचा विस्तार, ग्रामीण पुस्तकालयांची योजना इत्यादि कार्यें सुरुं करण्यांत आलीं आहेत. सन १९५१ मध्ये अलीपूर येथे पहिल्या जनता महाविद्यालयाची स्थापना करण्यांत आली. समाजशिक्षण कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणारें केन्द्र असें त्याचें स्वरूप आहे. सरकार व अन्य

सामाजिक संस्था यांच्यामार्फत आता प्रौढांना उपयुक्त असें वाङ्मय निर्माण करण्यांत येते. प्रथितयश लेखकांचें सहकार्य मिळवून अशा वाङ्मयाच्या निर्मितीसाठी खास शिबिरें (Literary workshops) भरविण्यांत येतात. महाराष्ट्रांत पन्हाळा, भोर वगैरे ठिकाणीं अशीं शिबिरें भरविण्यांत आलीं होतीं. प्रौढशिक्षणाला उपयुक्त ठरणाऱ्या, नवसाक्षरांसाठींच लिहिलेल्या उत्कृष्ट दर्जाच्या पुस्तकांना केंद्रीय व राज्य सरकारांकडून बक्षिसें देण्यांत येतात. भारत सरकारने स्थापन केलेल्या 'समाजशिक्षण-साहित्य समिती' मार्फत मार्गदर्शक पुस्तकें, नियतकालिकें व इतर पत्रकें, पाठ्यपुस्तकें, तक्ते व प्रचारपत्रकें ( Posters ) प्रसिद्ध करण्यांत येतात. युनेस्को या जागतिक संघटनेकडून या बाबतींत भारत-सरकारला अनेक प्रकारचीं मदत देण्यांत येतें. साक्षरताप्रसाराच्या वर्गांबरोबर सर्व देशभर खालील प्रकारच्या संस्था स्थापन करण्यावर भर देण्यांत येत आहे :-

## १ सामुदायिक केंद्रे ( Community Centres ) :

विकासखंड योजनांपैकी कांही निवडक ठिकाणी अशी सामुदायिक केंद्रें स्थापन करण्यांत येतात. या केन्द्राचें कार्य मुख्यतः सांस्कृतिक स्वरूपाचें असतें. शिक्षणाबरोबरच सामाजिक व मनोरंजनाचे कार्यक्रमहि अशा केन्द्रांत करण्यांत येतात. भजन, गाणे, नाट्य, इत्यादि गोष्टींना लागणारी साधनेहि पुरविण्यांत येतात. या केंद्रासंबंधी विस्तृत माहिती पुढे दिली आहे.

## २ पुस्तकालय योजना :

साक्षरता टिकविण्यासाठी अशा पुस्तकालयांची फार जरूरी भासते. प्रौढ साक्षर झाल्यावर वाचनासाठी जर त्याला मनोरंजक व उपयुक्त साहित्य मिळूं शकलें नाही तर तो पुनः निरक्षर बनेल व समाजशिक्षणाचा मूळ हेतूच विफल होईल म्हणून जेथे सामुदायिक केंद्रें असतील तेथे त्यांचा एक विभाग म्हणून व इतरत्र स्वतंत्ररीत्या वाचनालये स्थापन करण्यांत येतात. महाराष्ट्रांत ग्रामीण वाचनालयांची योजना बरीच यशस्वी झाली आहे. गावांतील लोकांनी वाचनालयासाठी केलेल्या खर्चावर ७५ रुपयापर्यंत अनुदान देण्याची योजना अंमलांत आलेली आहे.

## ३ जनता महाविद्यालयें :

समाजशिक्षण कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणासाठी हीं महाविद्यालयें प्रत्येक राज्यात स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. ग्रामसेवकांच्या शिक्षणाच्या या केंद्रांतून

शेती, हस्तव्यवसाय, पशुपालन, आरोग्य व स्वच्छता, सहकारी चळवळ, पंचायत व इतर स्थानिक स्वराज्य-संस्था वगैरे विषयांबाबत ज्ञान देण्यांत येतें. (तपशीलवार माहिती पुढे दिलेली आहे).

पहिल्या पंचवार्षिक योजनेत कांही प्राथमिक शाळांचें रूपांतर सामुदायिक केंद्रांत करण्याचा प्रयत्न करण्यांत आला. त्या मुदतींत शहरांतील साक्षरतेचें प्रमाण शें. ३४·६ होते तर खेड्यांत तें फक्त १२·१ होते. म्हणून द्वितीय पंचवार्षिक योजनेत यावर भर देण्यांत आला व या कार्यासाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली. कै. बा. गं. खेर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने या खर्चाच्या बाबतींत अशी सूचना केली होती की राज्यसरकारांनी लोकसंख्येच्या प्रमाणांत माणसी एक आणा खर्च करावा व केंद्रीय सरकारने तेवढीच रकम अनुदान म्हणून द्यावी. अशी रकमहि वार्षिक साडेचार कोट रुपयांच्या घरांत जाते. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत या कार्यासाठी सुमारें पंचवीस कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. युनेस्कोच्या मदतीने दिल्लींत 'मौलिक शिक्षण केंद्र' (Fundamental education centre) स्थापन करण्यांत आलें आहे.

## समाजशिक्षण देणारी यंत्रणा :

समाजशिक्षणाची देशव्यापी व्यवस्था व आयोजन करण्यासाठी केंद्रीय शिक्षणखात्यांत एक स्वतंत्र विभाग उघडण्यांत आला आहे. या विभागाचें मुख्य कार्य म्हणजे समाजशिक्षणाच्या बाबतींत मार्गदर्शन करणें, निरनिराळ्या संस्थांच्या कार्यांत एकसूत्रता आणणें व त्यांना जरूर तें आणि शक्यतें आर्थिक साहाय्य देणें हें होय. सन १९५३ मध्ये 'मध्यवर्ति समाज कल्याण मंडळाची' (Central Social welfare Board) स्थापना करण्यांत आली व समाजशिक्षण कार्याला सर्वतोपरि उत्तेजन देणें हें कार्य त्या मंडळाकडे प्रामुख्याने सोपविण्यांत आलें आहे. शिक्षणखात्याखेरीज मजूरखातें व समाजकल्याण खातें यांचेहि सहकार्य या कार्यांत मिळत असते.

प्रत्येक राज्यांत समाजशिक्षणासाठी खास अधिकारी नेमलें जातात. राज्यसरकारला या बाबतींत सल्लामसलत देण्यासाठी राज्य, जिल्हा व शहरें या पातळ्यांवर निरनिराळ्या समित्या नेमण्यांत येतात. खेडेगावांतील समाजशिक्षणाची जबाबदारी विकास खंडावर व विस्तार-विकास योजनांवर सोपविण्यांत आली आहे. ग्रामसेवक, प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षक, इतर सामाजिक कार्यकर्ते वगैरे प्रत्यक्ष शिक्षणाचें कार्य करतात. प्रौढांची परीक्षा घेण्याचें व

साक्षरता वर्गावर देखरेख करण्याचें कार्य शिक्षणखात्याचे अधिकारीहि करतात. महाराष्ट्रात जिल्हा परिषद शिक्षणाधिकाऱ्याला साहाय्यक म्हणून खास समाजशिक्षणकार्यासाठी एक दुसऱ्या श्रेणीचा अधिकारी प्रत्येक जिल्ह्यांत नेमण्याची योजना नुकतीच मंजूर करण्यांत आली आहे. सुमारे १०० गावांच्या प्रत्येक गटासाठी एक समाजशिक्षण संघटक ( Social education organiser ) नेमला जातो. साक्षरतेचे वर्ग सुरू करणें व वर्गांना साहित्य पुरविणें, ग्रामीण पुस्तकालयांची स्थापना व व्यवस्था करणें, सांस्कृतिक व मनोरंजनाच्या कार्यक्रमांचें आयोजन, लोककल्याणाचें व ग्रामरक्षक दलाचें कार्य सुरू करणें हीं कार्यें त्याच्याकडे असतात.

समाजशिक्षणाच्या कार्यांत सामान्यत: खालील कार्यक्रमांचे परिस्थितीप्रमाणे आयोजन करण्यांत येतें :

**शैक्षणिक कार्य :** साक्षरता पुस्तकालय, वाचनालय, वादविवाद, वार्ताकथन व वर्तमानपत्र वाचन, चित्रप्रदर्शन, रेडिओ कार्यक्रम (नभोवाणी शेतकरी मंडळाचे कार्यक्रम, गांवकरीफड, बाजारभाव वगैरे).

**सांस्कृतिक व मनोरंजनाचें कार्य :** सिनेमा फिल्म दाखविणें, नाटकें, लोकगीतें, लोकनृत्यें, कविसंमलनें, बैठे व मैदानी खेळ, भजनें, कीर्तनें इ०इ०

**कलाकौशल्य :** कापड कापून शिवणें, विणकाम, भरतकाम, सूत कांतणें व विणणें, स्थानिक स्वरुपाचे उद्योग; इ०

**सामाजिक सेवा-कार्य :** सामुदायिक स्वच्छता, गलिच्छ वस्त्यांची सुधारणा, साक्षरता व जनजागृतीची चळवळ वगैरे.

## समाजशिक्षण देणाऱ्या संस्था ( Agencies ) :

प्रौढांच्या अनेकविध गरजा भागविण्यासाठी उपयुक्त ठरेल असें वरील प्रकारचें समाजशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था असतात. त्यांचे दोन प्रकार आहेत— सविधिक (Formal) आणि अविधिक ( Informal ). सविधिक प्रकारांत शिक्षक, सरकारी नोकर किंवा स्वयंसेवक वगैरे प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या व्यक्तींचे गट, शाळा, कॉलेजें, विद्यापीठें वगैरे प्रत्यक्ष शिक्षण देणाऱ्या संस्था, वाचनालयें व पुस्तकालयें, संग्रहालयें, पत्रव्यवहाराने शिक्षण देणाऱ्या संस्था, ग्रामीण किंवा जनता महाविद्यालयें, सामुदायिक केन्द्रें, शेती-विस्तार गट, कामगार-शिक्षण मंडळें इत्यादींचा समावेश होतो. अभ्यासमंडळें, चर्चामंडळें, वादविवाद सभा, नभोवाणी मंडळें, शिबिरें, मेळावे, यात्रा, क्लब, नाटकें, सिनेमा वगैरेंना अविधिक शिक्षण संस्था म्हणतात, कारण त्यांमधून मिळणारें शिक्षण अप्रत्यक्षपणें मिळत

असतें. ज्यांचें मुख्य कार्य शिक्षण देणें हें नव्हे अशा कांही इतर संस्थांचा अंतर्भावहि या दुसऱ्या प्रकारांत होतो. उदा० धार्मिक संस्था, सैन्य, पालक-संघ, सहकारी सोसायटचा, शिक्षणाव्यतिरिक्त इतर सरकारी खातीं, इ० या सर्व संस्थांपैकीं परदेशांत यशस्वी ठरलेल्या, नव्या स्वरूपाच्या व आपल्या देशांत नव्याने सुरू करण्यांत येत असलेल्या दोन संस्थांची–सामुदायिक केंद्रें व जनता महाविद्यालयें–माहिती थोडक्यांत खाली दिली आहे:—

## सामुदायिक केन्द्रें :

खेडयांतील सर्व लोक ज्या ठिकाणीं सहजपणें एकत्र येऊं शकतील अशा जागेंत सामुदायिक केन्द्रांची स्थापना करण्यांत येते. बहुधा अशी जागा म्हणजे खेडयांतील प्राथमिक शाळा होय. खेडयांतील देवळांत सर्वजण मुक्तपणें प्रवेश करूं शकतीलच असें नाही. म्हणूनहि शाळा अशा कार्यासाठी जास्त उपयुक्त ठरते. शिवाय तेथे फळा, इतर फर्निचर, तक्ते वगैरे शैक्षणिक साधनेंहि असतात. जर स्वतंत्र, सोईस्कर इमारत असेल तर फारच चांगलें, परंतु एरवीं शाळेलाच असें सामुदायिक केन्द्र बनविणें कमी खर्चाचें व इतर सर्व दृष्टींनी सोईस्कर ठरतें. अशा शाळेंतील एक मोठी खोली या कारणासाठी वापरण्यांत यावी. सार्वजनिक व्याख्यानें, वाचनालय, गावांतील सहकारी मंडळाच्या सभा व बैठकी, इतर सार्वजनिक समारंभ, फिरत्या सिनेमाचे कार्यक्रम व प्रदर्शनें, नभोवाणी मंडळाचे रेडिओ इत्यादि सर्व गोष्टींसाठी ही खोली वापरण्यांत येते. या केंद्रांत दिवसाच्या निरनिराळचा वेळीं मुलें, प्रौढ, स्त्रिया, अधिकारी व बिगर-अधिकारी कार्यकर्ते यांना जमता यावे व निरनिराळचा प्रकारचे शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व मनोरंजनात्मक कार्यक्रम तेथे चालू राहावेत अशी अपेक्षा आहे.

## कार्यपद्धति :

अशा केंद्रांतून विविध प्रकारचीं कार्यें स्थानिक परिस्थितीप्रमाणे करतां येतील. सर्व देशांत एकाच ठराविक प्रकारचीं सामुदायिक केंद्रें असावींत अशीहि अपेक्षा नाही. केंद्रांना कोणत्या प्रकारचीं कार्यें करतां येतील यासंबंधी सूचना, सार स्वरूपांत खाली दिलेल्या आहेत. तथापि केंद्र संचालक व इतर कार्यकर्त्यांना योग्य असे फेरबदल केव्हाहि करतां येतात.

ज्या लोकांच्या उपयोगासाठी केन्द्र स्थापन करावयाचें असेल त्यांच्या राहण्याच्या ठिकाणापासून तें शक्यतो जवळ असावें. ती इमारत किंवा एखादी खोली विशेष लक्षपूर्वक सजवून आकर्षक करावी. त्यासाठी चित्रें, व्यंगचित्रें, तक्ते, आलेख, प्रसिद्धी चित्रें, स्थानिक कलाकौशल्याच्या वस्तु इत्यादि सुव्यवस्थित रीतीने

मांडून ठेवाव्यात. त्यामध्ये गावांतील साक्षर-निरक्षरांची संख्या, शाळेंत जाणाऱ्या व न जाणाऱ्या मुलांची संख्या, आर्थिक स्थिति, गावांतील कुटीरोद्योगांची संख्या व स्थिति, धार्मिक, शैक्षणिक व सामाजिक संस्थांची माहिती इत्यादि संबंधी आकर्षक तक्ते असावेत. वर्तमानपत्रांतील कात्रणें काढून व चिकटवून दैनिक किंवा साप्ताहिक भित्तिपत्रकें तयार करावींत. महत्त्वाच्या प्रचलित समस्यांविषयी किंवा घटनांविषयी खास अंक तयार करावेत व वाचनासाठी ठेवावेत. दुपारीं किंवा संध्याकाळीं ठराविक वेळीं महत्त्वाच्या बातम्यासंबंधीं भाषणें व्हावींत. त्या व्याख्यानांतून चित्रें, नकाशे, तक्ते यांचा उपयोग करण्यांत यावा. वाचनालयांतून ठराविक दिवशीं व ठराविक वेळीं वाचकांना घरीं नेण्यासाठी पुस्तकें देण्यांत यावीत. प्रौढ, स्त्रिया व मुलें यांना उपयुक्त ठरतील अशा योग्य पुस्तकांची निवड करून तीं वाचनालयांत ठेवण्यांत यावीत. साक्षरता, साक्षरोत्तर-शिक्षण, धार्मिक कर्तव्यें, प्राथमिक अंकगणित, जमाखर्च व हिशोब, निरनिराळे छंद व कलाकौशल्य, व्यवसायांसंबंधीं शास्त्रीय ज्ञान, प्रथमोचार इत्यादींपैकी जे विषय शिकवावयाचे असतील त्या प्रत्येकासाठी १० ते १५ प्रौढांचे आटोपशीर गट करण्यांत यावेत. वरील सर्वच विषय एखाद्या केंद्रांत शिकविणें बहुत्रा शक्य असत नाही. साधनें व संधि उपलब्ध होण्याची शक्यता लक्षांत घेऊनच अशा विषयांची निवड केली पाहिजे. तसेंच त्यांचा अभ्यास ठरलेल्या वेळांत पूर्ण केला पाहिजे. ह्यामुळे निरनिराळया तज्ज्ञ व संबंधित लोकांकडे तो विषय शिकविण्याचें कार्य सोपवितां येईल. थोडया अवधींत हें कार्य संपणार आहे अशी खात्री असेल तरच ते असली जबाबदारी खुषीने स्वीकारतील. शैक्षणिक प्रसिद्धिचित्रें व पत्रकें यांच्या साहाय्याने केन्द्राच्या कार्याची त्याच्या क्षेत्रांत तरी पुरेशी प्रसिद्धी करणें जरूर असतें. एका गटांतील सर्व लोकांना एकदमच शिक्षण देण्यासाठी विविध कार्यक्रम आखावेत. यासाठी विद्वान् व प्रसिद्ध लोकांचीं भाषणें, चर्चा, वादविवाद इत्यादि आयोजित करावेत; नाटकें, संवाद, मूकनाटयें, कविसंमेलनें, मुशायरे वगैरे कार्यक्रम अधूनमधून करावेत; फिरत्या प्रचारात्मक सिनेमा फिल्म्स् दाखवाव्यात; किंवा सणासमारंभाच्या निमित्ताने खास कार्यक्रम ठेवावेत. केंद्रांच्या विद्यमाने मुलांचे विविध कार्यक्रम--गाणीं, कवितापठण, शर्यती, खेळ, स्पर्धा--करतां येतील. तसेंच मेळे, प्रदर्शनें, आरोग्यसप्ताह, शिक्षणप्रसारसप्ताह, केन्द्राच्या मदतीसाठी खास सप्ताह साजरे करणें इष्ट आहे. निरनिराळया धंद्यांतील मंडळींचे गट (guilds) बनवून साक्षर होण्यास व त्या त्या धंद्याचें तांत्रिक ज्ञान घेण्यास त्यांना उत्तेजन द्यावें. सहली, पाळक ( Social Evenings ), बैठे व मैदानी खेळ, आखाडे इत्यादींची व्यवस्था अधूनमधून करतां यावी. हे सर्व कार्यक्रम वर्षभर चालू राहतील अशा रीतीने त्यांचें योजनाबद्ध आयोजन करावें. सुगीच्या दिवसांत खूप काम पडतें, म्हणून त्या दिवसांत मुख्यत: मनोरंजनात्मक कार्यक्रम ठेवावेत व रिकामपणाच्या

दिवसांत शैक्षणिक व सामाजिक कार्य जास्त करण्यांत यावें. केन्द्र शाळेंत असण्यास शालेय कार्याला त्यामुळे कोणत्याहि प्रकारे बाध येता कामा नये. दोन्ही संस्थांचे कार्य एकमेकास पूरक व्हावयास हवे. सामुदायिक केन्द्राला कांही अनुदान सरकारकडून मिळणार असलें तरी स्थानिक जनतेने त्यांत रस घेऊन आर्थिक जबाबदारी कांही अंशी उचलणें भाग आहे केन्द्र पंचायत किंवा तिच्या एका उपसमितीमार्फत चालविलें जावें. स्त्रियांसाठी होणाऱ्या कार्यक्रमांसाठी स्वतंत्र वेळ ठेवावी व त्यांचें आयोजन स्त्रियांच्याच एका समितीमार्फत व्हावे हें उचित होय. स्थानिक जनतेच्या सामाजिक, आर्थिक, बौद्धिक व सांस्कृतिक पातळीला अनुसरून अशा केन्द्रांतील कार्यक्रमांची योजना केली पाहिजे. वरील सूचना सर्वसाधारण स्वरूपाच्या आहेत. त्या सर्व प्रत्येक केन्द्रांत अंमलात आणणें शक्य नाही. त्यांच्या योग्य निवडीवर व केंद्रसंचालकाच्या संघटणचातुर्यावर बऱ्याच प्रमाणांत त्या केंद्राचें यश अवलंबून आहे.

## जनता महाविद्यालयें (Janata Colleges) :

आपल्या देशांत मोठमोठ्या योजनांची व प्रकल्पांची आखणी व उभारणी चालू आहे. जनतेची आर्थिक व सामाजिक उन्नति हें त्यांचें मुख्य ध्येय आहे व तें साध्य होण्यासाठी जनतेचें त्या कार्यांत हार्दिक सहकार्य मिळणें अवश्य आहे. हें नवचैतन्य सर्वसामान्य जनतेंत निर्माण करण्याचें कार्य फक्त स्थानिक स्वरुपाचें नेतृत्वच परिणामकारकपणें करूं शकेल. लोकांमध्यें आवश्यक अशी मनोवृत्ति व उत्साह निर्माण करण्याची कुवत असलेलें स्थानिक नेतृत्व आज आपणांस हवें. त्यासाठी 'जनता महाविद्यालय' या संस्थेची स्थापना करण्यांत येते. या संस्थेचीं प्रमुख उद्दिष्टें खालीलप्रमाणे आहेत :

(१) निरनिराळ्या प्रश्नांबाबत योग्य असा सामाजिक दृष्टिकोन व वृत्ति प्रशिक्षणार्थ्यांमध्ये निर्माण करणें;

(२) समाजकल्याणप्रकल्प व राष्ट्रीय विस्तार योजना यांच्या क्षेत्रांत स्थापन होणाऱ्या सामुदायिक केन्द्रासाठी ग्रामीण समाजांतूनच सांस्कृतिक नेतृत्व निर्माण करणें;

(३) भारतीय घटनेला आधारभूत असलेलीं आर्थिक व सामाजिक ध्येयें साध्य होण्याच्या दृष्टीने विविध कार्यांत गुंतलेल्या लोकसमूहामध्ये जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित करणें;

(४) लोकांमध्ये राष्ट्रीय निष्ठा व राष्ट्रविषयक जबाबदाऱ्यांची जाणीव निर्माण करणें व त्यांचें मनोधैर्य सदैव कायम ठेवणें;

(५) देशांतील लक्षावधि निरक्षरांमध्ये एक बौद्धिक जिज्ञासा किंवा तळमळ निर्माण करणें.

प्राचीन भारतांतील विहार किंवा आश्रमाप्रमाणे हीं महाविद्यालयें वसतिगृहयुक्त असतात. अभ्यासाच्या विषयांमध्ये भारताचा इतिहास, भारतीय घटना, भारतीय वाङ्मयाची ओळख, सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्न, आपलें राजकीय धोरण वगैरे विषयांचा अंतर्भाव होतो. प्रत्यक्ष कृतीच्या स्वरूपाचा जो अभ्यासक्रम आंखण्यांत आला आहे तो प्रशिक्षणांच्या काळांतील जीवनाशींच संबंधित आहे. समाजकार्यकर्त्याला पुढे ज्या तऱ्हेचें कष्टमय जीवन जगावें लागेल त्याच प्रकारचें परिश्रमाचें, सेवामय जीवन त्याला या संस्थेंतच अनुभवावें लागतें. महाविद्यालयांतील छोट्याशा समाजाची आवश्यक स्वरूपाची सेवा ( स्वयंपाक, बागकाम इ. ) करावी लागते. सामूहिक स्वरूपांत कार्य करून संवयींच्या द्वारें विविध प्रकारचीं कौशल्यें संपादणें हा महत्त्वाचा उद्देश या कार्यक्रमांमागे आहे. समूहगीतें सामूहिक भावनेच्या जोपासनेसाठीं फारच उपयुक्त ठरतात. दैनिक परिपाठ व इतर कार्यक्रम त्या त्या महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून ठरविलें जातात. वर्तमानपत्रें व नियतकालिकें चालविणें, भारतीय अभिजात वाङ्मयांतील उताऱ्यांचा विशेष अभ्यास, एखाद्या सामाजिक प्रश्नाच्या सोडवणुकीचा सखोल विचार, नाटकें व इतर करमणुकीच्या कार्यक्रमांचें आयोजन वगैरे विशेष कार्यक्रम प्राचार्यांच्या अनुमतीने सुरू करण्यांत येतात. या संस्थेंत व्यावसायिक शिक्षण मात्र दिलें जात नाहीं. असें शिक्षण व्यावसायिक–शिक्षण–संस्थाकडेच सोपवावें असा आधुनिक विचारप्रवाह आहे. सामुदायिक केन्द्र हें या संस्थेंतील एक महत्त्वाचें कार्य आहे. प्राचार्य, एकदोन साहाय्यक अध्यापक, गृह–व्यवस्थापिका ( House-Keeper ) व एक मेट्रन एवढे कर्मचारी या संस्थेचें संचालन करतात. एकंदर वातावरण कौटुंबिक स्वरूपाचें, पूर्वीच्या आश्रम पद्धतीचें राहावें अशी अपेक्षा असते. म्हणून गृह–व्यवस्थापिका किंवा मेट्रन म्हणून अध्यापकांच्या घरच्या स्त्रियांचीच नेमणूक करण्यात येते. या संस्थांचा बहुतेक खर्च सरकारकडून केला जातो. या संस्थेच्या स्वरूपावरून एक गोष्ट स्पष्ट दिसेल. ती हीच की या प्रकारच्या संस्थेचें यश मुख्यतः तेथील प्राचार्यांवर अवलंबून आहे. म्हणून त्या संस्थेच्या प्रमुखाची निवड काळजीपूर्वक होणें अगत्याचें आहे. ही विद्यालयें डेन्मार्क आणि स्वीडनमध्ये अत्यंत यशस्वी ठरलेल्या लोकशाळांच्या ( Folk-Schools ) धर्तीवर सुरू करण्यात आलीं आहेत.*

* अधिक माहितीसाठीं पाहा : 'Teachers' Handbook of Social Education, Part III, chap. II, page 72, Ministry of Education, Govt. of India.

## समाजशिक्षणांतील ग्यानबाची मेख !

समाजशिक्षणाची जरुरी, उद्दिष्टें, कार्यक्रम, संस्था यांसंबंधी वर केलेल्या विवेचनावरून या प्रश्नाची रूपरेषा स्थूलमानाने लक्षांत येईल. तथापि यांत विशेष मतभेद होण्यासारखा एकहि विचार नाही. कोटयवधि लोकांना सुसंस्कृत करण्याचा हा प्रश्न प्रचंड तर आहेच. या बाबतींत आपणास पुरेसे तर राहोच, पण थोडेसें देखील समाधान लाभण्याइतकी यशस्विता प्राप्त झालेली नाही. वरील तात्त्विक विवेचन ठीक आहे, पण प्रत्यक्ष अनुभव मात्र वेगळा आहे. त्यांत येणाऱ्या अडचणींचा व त्यांवरील उपाययोजनेचा आपण अजून विचार केलेला नाही. म्हणून या अत्यंत महत्त्वाच्या, पण तुलनेने अतिशय दुर्लक्षित प्रश्नांतील खरी ग्यानबाची मेख कुठे आहे तें पाहणें जरूर आहे.

### (१) समाजशिक्षणविषयक धोरण :

आपल्या देशाची लोकसंख्या प्रचंड आहे. त्यांपैकी जवळजवळ १०-११ कोटि लोकांना साक्षर करावयाचें आहे व त्यासाठी लागणारा पैसा व साधनें मात्र फारच कमी आहेत. हा खरा प्रश्न आहे. त्यावर एकमेव उपाय म्हणजे उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा सर्व शक्तीनिशीं उपयोग करणें हा होय. जास्तींतजास्त यश लवकर प्राप्त करण्यासाठी परिणामकारक ठरेल असें धोरण आंखून तें निश्चयाने अंमलांत आणणें जरूर आहे. समाजशिक्षणाची मुख्य जबाबदारी राज्यसरकारांची आहे. तथापि केवळ राज्यसरकारें आपल्या तोकडया सामर्थ्याच्या जोरावर फारशी प्रगति करूं शकणार नाहीत. म्हणून केन्द्र सरकार, राज्य सरकारें, स्थानिकस्वराज्य संस्था, अन्य सामाजिक-सेवा-संस्था या सर्वांनी मिळून सहकार्याने व आपली सर्व शक्ति पणाला लावून युद्धपातळीवर या प्रश्नाला हात घातला पाहिजे. अर्धवट प्रयत्न निष्फळ ठरतात असें आपल्या आजवरच्या अनुभवाचें सार आहे. केलेलें कार्य त्यामुळे वाया जातें; कारण कसेबसे साक्षर झालेले लोक पुनः थोडयाच काळांत निरक्षर बनतात. समाजशिक्षणाचा प्रसार मुख्यतः तीन गोष्टींवर अवलंबून आहे. लहान मुलांपासून ते प्रौढांपर्यंत सर्वांना शिक्षण देण्यासाठी निर्माण केलेल्या राष्ट्रीय शिक्षण पद्धतीचा एक भाग म्हणून समाज शिक्षणाचें कार्य हातीं घेतलें गेलें पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे सर्व समाज आणि विशेषतः प्रौढ यांना या कार्यांत रस वाटला पाहिजे. आज खेडेगावांतून सरकारी अधिकाऱ्यांच्या दडपणामुळे प्रौढ-शिक्षणवर्गाची स्थापना होते; परंतु हळूहळू त्यांना गळती लागून लवकरच वर्ग बंद पडतात. प्रौढ स्त्रीपुरुषांना शिकण्याची इच्छाच असत नाही. किंवा जरूरीहि भासत नाही. याला अनेक कारणें आहेत. लहान मुलांना उपयुक्त ठरणारी शिक्षण-पद्धति प्रौढांच्या बाबतींत निरुपयोगी ठरते. यासाठी प्रौढांच्या मानसशास्त्राचें

थोडेंबहुत ज्ञान कार्यकर्त्याला असणें अवश्य आहे. दिवसभरच्या परिश्रमानंतर ग म भ न हीं अक्षरें अत्यंत रुक्ष पद्धतीने शिकण्यासाठी साक्षरता वर्गांत जाण्याचा उत्साह कोणत्या प्रौढ माणसाजवळ उरणार ? शिवाय त्या शिकण्याचा उपयोग काय ? आर्थिक स्थिति सुधारण्यासाठी त्या शिक्षणाचा कांही उपयोग नाही किंवा ग्रामीण जनतेच्या जीवनाशी त्याचा विशेष संबंधहि नसतो. म्हणून समाज-शिक्षणाच्या नव्या आशयाची ( Content ) जरूरी आहे. तिसरी गोष्ट म्हणजे समाजशिक्षणांतहि वैयक्तिक भिन्नता व आवडीनिवडी लक्षांत घेऊन जरूर तें वैचित्र्य आणलें पाहिजे व आवश्यकतेनुसार विविध कार्यक्रम अंमलांत आणले पाहिजेत.

## (२) आर्थिक तंगी :

आपला देश गरीब आहे. प्रचंड खर्चाच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतहि य कार्यासाठी आपण पुरेसा पैसा खर्च करूं शकत नाही. ही परिस्थिति युद्धजन्य परिस्थितीने अधिकच बिकट व ओढाताणीची केली आहे. तरीहि देशाची निकृष्टावस्था दूर करण्याचा प्राथमिक व मूलभूत उपाय म्हणून समाजशिक्षणाची आवश्यकता जोंपर्यंत नाकारतां येत नाही. तोंपर्यंत कोठून का होईना, पण आवश्यक पैशाची जोडणी केलीच पाहिजे. सामान्यपणें दरवर्षी किमान ४॥ कोटी रुपयांची या कार्यासाठी आवश्यकता आहे असा खेर समितीचा अंदाज होता. या कार्याचें महत्त्व जाणून खर्चाच्या दृष्टीने त्याला अग्रक्रम देणें उचित आहे.

## (३) व्यापकता आणि गति :

समाजशिक्षण वर दिलेल्या नव्या कल्पनेनुसार व्यापक आणि जीवनस्पर्शी केल्याशिवाय प्रौढांना त्यांत रुचि निर्माण होण्याची सुतराम् शक्यता नाही. म्हणून व्यावसायिक व इतर कौशल्य, कला, नागरिकत्व, सांस्कृतिक विकास इत्यादींचें शिक्षण देणें अवश्य आहे. परंतु वर दिलेल्या उद्दिष्टांनुसार ज्ञान देणें साक्षरतेशिवाय अशक्यच आहे. म्हणून या कार्याला गति येण्याचा पहिला मार्ग म्हणजे नव्या व मनोरंजक पद्धतीने प्रौढांना लवकरांत लवकर, कमी वेळांत साक्षर करणें हा होय. यासाठी आधुनिक दृक्‌श्राव्य साधनांचा कौशल्यानें उपयोग केला तर मार्ग बराच सुकर होण्याची शक्यता आहे.

डॉ. लोबॉक नांवाच्या ख्रिस्ती मिशनऱ्याने फिलिपाईन्समध्ये स्वतः शोधून काढलेल्या नव्या पद्धतीने तीन वर्षांत ४१००० निरक्षरांना साक्षर बनविलें. त्यांचा

हा विशाल अनुभव लक्षांत घेऊन पंजाब सरकारच्या शिक्षणखात्याने सल्ला देण्यासाठी व या कार्याला चालना देण्यासाठी त्यांना बोलाविलें होतें; पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत (Frank C. Lauback –India shall be Literete, 1940) हिंदुस्थानांतील निरक्षरतेचें पांच वर्षांत उच्चाटन करण्याची एक योजना त्यांनी मांडली होती. त्यांच्या योजनेचे सूत्र म्हणजे 'प्रत्येक्ष साक्षराने एका निरक्षराला साक्षर करावें' हें होतें. ('Each one teach one' or 'the enlightened to enlighten') प्रत्येक साक्षर स्त्रीने व पुरुषाने एक एक व्यक्ति एका वर्षांत साक्षर करावी म्हणजे पांच वर्षांत सर्व लोकसंख्या साक्षर झालेली दिसेल अशी ही योजना होती. खरें बोलावयाचें म्हणजे एका अवघड प्रश्नाच्या सोडवणुकीचें हें विडंबनच म्हणावें लागेल. कारण ती अव्यवहार्य होती. उत्कृष्ट, संघटित सामाजिक जीवन, शिकण्याची व शिकविण्याची तीव्र इच्छा, लोकोपयोगी कार्य करण्याची तळमळ, भारताच्या सर्व भागांत योग्य प्रमाणांत साक्षर या कामासाठी उपलब्ध होण्याची शक्यता इत्यादि नसलेल्या गोष्टी गृहीत धरण्यांत आल्या. त्यामुळे ही योजना पैसाफंडाच्या योजनेप्रमाणेच असफल झाली यांत नवल नाही.

## (४) अभ्यासक्रमाचा प्रश्न :

ज्या प्रकारचा अभ्यासक्रम मुलांसाठी उपयुक्त ठरेल त्या प्रकारचाच अभ्यासक्रम प्रौढांना देतां येणार नाही हें उघड आहे. मुलांच्या व प्रौढांच्या अवडीनिवडी, गरजा, जिज्ञासा या सर्व गोष्टींत महदंतर आहे. त्याचप्रमाणे सर्व प्रौढांनाहि एकच एक अभ्यासक्रम देणें योग्य होणार नाही. कारण समाजशिक्षासाठी मान्य झालेली प्रौढांची वयोमर्यादा १२ ते ५० अशी आहे. अर्थात् १२ ते १८ वर्षांच्या पोरवयांतील प्रौढांच्या रुचि, वृत्ति, गरजा अधिक वयाच्या प्रौढांहून फारच भिन्न असणार हें स्पष्ट आहे. म्हणून प्रौढांतहि वयानुसार गट करणें अवश्य आहे. उदाहरणार्थ (१) १२ ते १८ वर्षे. (२) १९ ते ३५ वर्षें व (३) ३५ ते ५० वर्षें असे वयोमानानुसार गट करून त्यांच्यासाठी वेगवेगळे अभ्यासक्रम नियुक्त करणें हितावह ठरेल. अर्थात् हें मुख्यतः साक्षरता, खेळ, नाटय इ. बाबतींतच विशेष लागू पडेल. महाराष्ट्र सरकारने सध्या चालू ठेवलेला पहिल्या व दुसऱ्या कसोटीचा अभ्यासक्रम या दृष्टीने पुरेसा व सर्वंकष आहे. प्रश्न तो अंमलांत आणण्याचा आहे. सही करण्यापुरतीं अक्षरें अत्यंत रटाळ व गचाळ पद्धतीने शिकविली जातात व तेथेच सर्व काम आटोपतें. शिकविणारा शिक्षक जर उत्साही, सहृदय आणि जरूर ती दृष्टि असलेला असा असेल तर वर दिलेली समाजशिक्षणाची नवी कल्पना या अभ्यासक्रमाच्या द्वारेंहि प्रत्यक्षांत उतरण्यास हरकत नाही.

## (५) शिक्षणपद्धति :

पाठ्यक्रम कोणता का असेना, त्याचें अपेक्षित यश पदरांत पडण्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते. पहिली गोष्ट म्हणजे उचित अशी शिक्षणपद्धति व दुसरी या शिक्षणपद्धतीचा कौशल्याने उपयोग करणारा शिक्षक ही होय. सामान्यतः खेड्यांत चालणारे साक्षरतेचे वर्ग अयशस्वी होतात याचें प्रमुख कारण म्हणजे चुकीची शिक्षणपद्धति हें होय. प्राथमिक शिक्षक किंवा ग्रामसेवक वर्गांत आलेल्या प्रत्येक प्रौढाला पहिल्याच दिवशीं मुळाक्षरें शिकविण्यास प्रारंभ करतात. त्या प्रौढाच्या जीवनांत लिहिणें व वाचणें या गोष्टींना तोपर्यंत कांहीच स्थान व अर्थ नसतो. अर्थातच त्याला यांत कांहीच रस वाटत नाही. प्रथम गप्पा, नंतर बातम्या, वर्तमानपत्रांचें वाचन, भजन-कीर्तन, गायन इत्यादि कार्यक्रमांच्या आकर्षणामुळे प्रौढ मोठ्या संख्येने रोज हजर राहूं लागले म्हणजे स्वतः शिकून वाचण्याची गरज त्यांना हळूहळू, पण आपोआपच वाटूं लागेल. त्यांतच रेडिओ, सिनेमा, ग्रामोफोन वगैरे साधनांचा उपयोग करतां आल्यास ही आवड लवकर व अधिक तीव्रतेने निर्माण होईल. एवढें झाल्यानंतर त्यांना जरूर त्या पाट्या, पुस्तकें व इतर साधनें पुरविणें अवश्य आहे. प्रौढ जमा करणें व त्यांना या कार्यांत आवड निर्माण होणें हें मोठें बिकट काम आहे व तें फार कौशल्याने साधावें लागतें. प्रौढांच्या बुद्धीची वाढ पूर्ण झालेली असते. त्यांची ग्रहणशक्ति विकसित असते. त्यांच्या संवयी व वृत्ति कायम झालेल्या असतात. मुलांप्रमाणे कावळ्याचिमण्यांच्या गोष्टींत त्यांना स्वारस्य वाटत नाही. प्रगति न झाल्यास त्यांची कानउघडणी करतां येत नाही किंवा त्यांना नाउमेद करून भागत नाही. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच पुढील कार्याची दिशा, स्वरूप आणि वेग ठरवावा लागतो. म्हणूनच वर्गपद्धतीपेक्षा वैयक्तिकरीत्या प्रत्येक प्रौढाला शिकविणें हितावह ठरेल. अक्षरें शिकविण्याच्या अनेक पद्धति प्रचलित आहेत. प्रौढांना रुचि निर्माण झाली तर सर्व मूळाक्षरें दोन दिवसांत शिकविणेंहि शक्य होते असा अनुभव आहे. वाक्यपद्धति, तक्ते व चित्रें यांचा उपयोग करून वाक्यें शिकविण्याची लोबॉक पद्धति, कथापद्धति, सरसशब्दपद्धति, चित्रपद्धति वगैरेंचा उपयोग परिस्थितीला अनुसरून करावा लागेल. *

## (६) शिक्षकांचा प्रश्न :

पद्धति कितीहि योग्य असली तरी शिकविणाऱ्याच्या कौशल्यावर बऱ्याच ोष्टी अवलंबून आहेत. तज्ज्ञ व कुशल शिक्षक पुरेशा संख्येने उपलब्ध होणें हीं

* निरनिराळ्या पद्धतींसंबंधीं अधिक माहितीसाठी पाहा : 'साक्षरता आणि साक्षरता प्रसाराच्या पद्धती, ले. कर्णिक आणि शुक्ल, महाराष्ट्र प्रादेशिक लोक-शिक्षण समिति, पुणें २.'

मोठी कठिण गोष्ट आहे. सार्जंट योजनेने (१९४४) केलेल्या अंदाजानुसार देशांतील सुमारे ९ कोटींपेक्षा अधिक प्रौढांना शिक्षण द्यावें लागेल व त्यासाठी सुमारे ६२०००० शिक्षकांची जरूर पडेल. हें कार्य पूर्ण होण्यास २५ वर्षें लागतील व त्यासाठी दरवर्षी सुमारे तीन कोटी रुपये खर्च करावे लागतील असा सार्जंट कमिटीचा अभिप्राय होता. एवढ्या प्रचंड प्रमाणावर शिक्षक नेमणें आजहि शक्य होईल काय याबद्दल शंकाच आहे. तथापि किमान १० लक्ष शिक्षकांनी हें कार्य अंगावर घेणें भाग आहे. इतक्या शिक्षकांना योग्य तें प्रशिक्षण देणें, त्यांच्या मेहेनतान्याची व इतर खर्चाची सोय करणें, पुस्तकें, पाट्या व इतर साधनें पुरविणें इत्यादि बाबींचा विचार केला म्हणजे हा प्रश्न किती अवाढव्य स्वरूपाचा आणि बिकट आहे व यांत अपेक्षित प्रगति कां होत नाही याचा उलगडा होईल. सर्व प्राथमिक शिक्षक व कॉलेजांचे सर्व विद्यार्थी यांना सक्तीने हें कार्य समाजसेवा या स्वरूपांत करावयास लावावें असा एक उपाय सुचविला जातो. पण समाजशिक्षणाची जी नवी कल्पना वर दिलेली आहे ती लक्षांत घेतां असा शिक्षक हा खराखुरा सामाजिक कार्यकर्ताच असला पाहिजे ही गोष्ट पटेल. शिवाय प्रौढ माणसांना मार्गदर्शन करावयासाठी अपक्व बुद्धीच्या तरुणांना जबरदस्तीने कामाला जुंपलें तर अपेक्षित फळ कितपत पदरांत पडेल याची शंकाच आहे. प्रौढांशीं वागण्याची कला ज्यांना साधली आहे, समाजशिक्षणाचें पथ्य, प्रौढांचें मानसशास्त्र, ग्रामीण उद्योगधंद्यांचें अर्थशास्त्र व परिस्थिति, शिक्षणाचीं साधनें वापरणें इत्यादींची माहिती व जरूर तें प्रशिक्षण ज्यांना मिळालें आहे, असेच शिक्षक यशस्वीपणें कार्य करूं शकतील. हें प्रशिक्षण प्राथमिक शिक्षकांची प्रशिक्षण विद्यालयें, माध्यमिक प्रशिक्षण विद्यालयें, जनता महाविद्यालयें आणि तत्सम संस्थांतून देण्यांत यावें. प्राथमिक शिक्षकांच्या अभ्यासक्रमांत या प्रशिक्षणाचाहि अंतर्भाव करण्यांत आला पाहिजे.

## (७) साक्षरोत्तर शिक्षण :

तीन किंवा चार महिन्यांच्या साक्षरता वर्गांतील शिक्षणानंतर प्रौढांची परीक्षा घेण्यांत येते. या परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्याचा पुनः लिहिण्यावाचण्याशी फारसा संबंध राहात नाही. कारण खेड्यापाड्यांतील परिस्थिति त्या दृष्टीने अनुकूल असत नाही. म्हणून सामु ायिक केन्द्रें, वाचनालयें व पुस्तकालयें यांची सोय असणें विशेष जरूर आहे. यासंबंधी पुरेशी माहिती वर दिलेलीच आहे. महाराष्ट्र राज्यांत कांही निवडक क्षेत्रांत फिरत्या वाचनालयांची सोय करण्यांत आलेली आहे. मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश वगैरे इतर कांही राज्यांतहि या योजनेचा अंमल चालू आहे. समाजशिक्षण हें कांही साक्षरतेपुरतेंच मर्यादित

नाही. तें जीवनव्यापी आहे. त्या दृष्टीने जीवन सुखमय व समृद्ध करण्यासाठी प्रौढांना मिळालेलें साधन—लिहिणें, वाचणें इ.—त्यांच्याजवळ कायम राहील अशी दक्षता घेणें जरूर आहे.

## (८) तीव्र मानसिक खळबळ हवी :

इतक्या कालावधीनंतरहि आपल्या उपरनिर्दिष्ट सर्व प्रयत्नांना म्हणावें तसें यश लाभलेलें नाही. तुर्कस्तानांत केमाल पाशाने अत्यंत थोड्या अवधींत निरक्षरतेचें उच्चाटन केलें. रशियाने केवळ वीस वर्षांत आपल्या अफाट व विस्तृत प्रदेशांत निरक्षरतेचें नांवनिशाणहि उरूं दिलें नाही. ज्या ठिकाणीं साध्या प्राथमिक शाळाहि नव्हत्या अशा कझागिस्तान, तार्तरी वगैरे भागांतून आज विद्यापीठांचें संशोधनकार्य धूमधडाक्याने चालू आहे. स्थानिक बोलीभाषा व प्रादेशिक भाषा यामध्ये लक्षावधि पुस्तकांचें प्रकाशन करण्यांत येत आहे.... आणि आपली समाजशिक्षणांतील प्रगति गोगलगायीच्या गतीने होत आहे ! रशियाच्या यशाचें रहस्य एका लेखकाने पुढील शब्दांत वर्णन केलें आहे—

"A psychological ferment has been started that already has profoundly disturbed and transformed the mentality of a population of one hundered and sixty milions people have been taught to read; men and women have been told to hope; ideas have been disseminated on an unprecedented scale; forces have been released that can never be controlled."*

जनमानसांत अशा प्रकारची झंझावती खळबळ, ज्ञानाची आणि प्रगतीची तीव्र लालसा झाल्याखेरीज आपल्याहि कार्याला गति येणार नाही. या दृष्टीने महाराष्ट्रांतील ग्रामसाक्षरता मोहीम हें योग्य दिशेने उचललेलें पाऊल आहे. परंतु केवळ शिक्षक, कार्यकर्ते किंवा शिक्षणखातें यांच्याच तळमळीने भागणार नाही. देशाच्या अगदी वरच्या श्रेणीपासून शेवटच्या श्रेणींतील लहानथोर सर्व समाजनेत्यांनी पराकाष्ठा करून जनतेच्या मनांत ही खळबळ, ही जिज्ञासा तीव्रतेने निर्माण केली, तर यश कांही फार लांब नाही असें प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ श्री. आर्. व्ही. परुळेकर यांनी म्हटलें आहे :

* Quoted by Dev Indar Lall, Page 90, Adult Education for a New Democracy.

"It is true that Russian methods cannot be initiated in India, but even if a fraction of the 'psychological ferment' that Russia was able to start into the mass-mind is made available to the Indian masses, substantial results will follow." *

राजकीय प्रश्नाबाबत जरी तो तात्कालिक महत्त्वाचा असला तरी आपले नेते आंदोलनाच्या प्रचंड लाटा निर्माण करूं शकतात, मग या मूलभूत महत्त्वाच्या प्रश्नाबाबत उदासीनता का असावी ?

## संबंधित प्रश्नांचा साकल्याने विचार :

वरील सर्व विवेचनावरून समाजशिक्षणाच्या प्रश्नाचें बिकट व प्रचंड स्वरूप ध्यानीं येईल. हा प्रश्न प्रामुख्याने खेडचांतील जनतेच्या बाबतींत अधिक कठिण स्वरूपाचा बनला आहे. याचें एक महत्त्वाचें कारण असें आहे की ग्रामीण शिक्षणासंबंधीचा कोणताहि प्रश्न ग्रामसुधारणेशी संबंधित आहे. खेडचांच्या आर्थिक उन्नतीशीं त्याची गुंतागुंतीची सांगड बसलेली आहे. म्हणून या प्रश्नाचा सुटा, स्वतंत्रपणें विचार करतां येत नाही. खेडचांची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक सुधारणा कशी करावी हा प्रश्न आपल्या प्रस्तुत विषयाच्या कक्षेपलीकडील आहे. ज्या प्रमाणांत ही ग्रामसुधारणा होईल, त्या प्रमाणांत वरील समाजशिक्षण योजनाहि फलद्रूप होईल. त्या सुधारणेच्या अभावी समाजशिक्षण योजना कितीहि व्यापक केली तरी मिळणारें फळ अर्धवट, अपुरेंच राहाणार हे सांगण्यास कोणा ज्योतिषाची जरूरी नाही. हा दृष्टिकोन आपल्या नियोजनांत अंगिकारला गेला आहे व विकास योजनांतून तो प्रत्यक्ष कार्यवाहीत आणला जात आहे ही गोष्ट समाधानकारक आहे. भारतसरकारचे शैक्षणिक सल्लागार व प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री.जे. पी. नाईक यांनी हा विचार एके ठिकाणीं स्पष्टपणें मांडला आहे. त्यांच्याच शब्दांत या प्रकरणाचा समारोप करणें उचित होईल. ते म्हणतात :—

"ग्रामसुधारणा व ग्रामीणशिक्षण यांचा साकल्याने विचार होत नाही ही एक सद्य:स्थितींतील मोठी उणीव आहे. पूर्वी यांपैकी कोणत्याच गोष्टीचा व कांहीच विचार होत नव्हता. त्या दृष्टीने पाहातां आज खेडचांचें आर्थिक नियोजन, खेडचांची सुधारणा व खेडचांचें शिक्षण या सर्व गोष्टींचा थोडाथोडा विचार होत आहे ही फार समाधानाची गोष्ट आहे. पण या तीनहि गोष्टींचा विचार वेगवेगळचा

* Ibid—Page 90.

पद्धतीने होत आहे व त्यामुळे आपल्या पदरांत जसा फायदा पडावा तसा पडत नाही. जर या तीनहि बाबींचा साकल्याने विचार झाला, शोषणनिर्मूलन, स्वावलंबन व विकेंद्रीकरण या तत्त्वांवर खेड्यांच्या आर्थिक जीवनाची उभारणी केली गेली, त्या धोरणाशीं सुसंगत असा ग्रामसुधारणेचा कार्यक्रम आखून तो शाळांच्या सभोंवती गुंफिला गेला व ग्रामीण शिक्षणाची ग्रामीण सुधारणेचें एक अत्यंत प्रभावी शस्त्र म्हणून जर पुनर्घटना केली गेली, तर आपली प्रगति फारच झपाट्याने होईल यांत शंका नाही."*

* * *

## संदर्भ ग्रंथ


1. Teacher's Handbook of Social Education ( 1955 )-Ministry of Education, Govt. of India.
2. K. G. Saiyidin – Problems of Educational Reconstruction.
3. Humayun Kabir – Education in New India.
4. Dev Inder Lall – Adult Education for a Now Democracy.
5. Proceedings of the Different Meetings of the C. A. B. of Education in India – Pamphlet No. 63 ( 1949 ).
6. भारतीय शिक्षा का विकास एवं समस्याएँ – कृष्ण गोपाल रस्तोगी.
7. साक्षरता आणि साक्षरता प्रसाराच्या पद्धति-कर्णिक, शुक्ल, महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समिति, पुणें २


* पृ. १४, ग्रामीणशिक्षण–मे १९५६, अंक तिसरा, श्री. मौनी विद्यापीठ–गारगोटी ( कोल्हापूर )

## आणि इतर प्रश्न :१३:

### (अ) सैनिकी शाळा

आज भारतांत एकूण अकरा सैनिकी शाळा आहेत. कपूरथाला (पंजाब) कुंजपुरा (पंजाब), चितोडगड (राजस्थान), जामनगर (गुजरात), सातारा (महाराष्ट्र), कोरुकौडा (आंध्र प्रदेश), भुवनेश्वर (ओरिसा), पानचेत टेकडी (पश्चिम बंगाल), त्रिवेंद्रम (केरळ), रेवा (मध्यप्रदेश) व अमरावतीनगर (मद्रास) येथे या शाळा आहेत. राष्ट्रीय संरक्षण दलांत भरती होण्यासाठी योग्य असे तरुण निर्माण करणें हेंच या शाळांचें प्रमुख ध्येय आहे. देशभक्ति, चारित्र्य, ध्येयाला वाहून घेण्याची वृत्ति व सहकारभाव विद्यार्थ्यांत निर्माण करण्याचा उद्देश या शाळांनी ठेवलेला आहे. विद्यार्थ्यांत नेतेपणाचे गुण यावे व त्यांच्यांत शिस्तबद्धता बाणावी यासाठी या शाळांतून विशेष प्रयत्न केले जातात. राष्ट्रीय संरक्षण मंडळाची (National Defence Academy) जी परीक्षा केंद्रीय लोकसेवा मंडळातर्फे (Union Public Service Commission) घेतली जाते त्यासाठी अगर केंब्रिज विद्यापीठाच्या स्थानिक परीक्षा मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या इंडियन स्कूल सर्टिफिकेट परीक्षेसाठी जरूर ती तयारी या शाळांत करून घेतली जाते.

सैनिकी शाळेंत प्रवेश मिळविण्यासाठी राष्ट्रीय संरक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षेला बसावें लागतें. ही परीक्षा बहुधा ऑक्टोबरमध्ये घेतली जाते. सामान्यज्ञान व गणित या विषयांची प्रत्येकी शंभर गुणांची लेखी परीक्षा घेतली जाते. लेखी परीक्षेंत चांगले गुण मिळविणाऱ्यांची मुलाखतवजा तोंडी परीक्षा घेतली जाते. या परीक्षेसहि शंभर गुण असतात. या दोन्ही परीक्षेंत उत्तीर्ण होणाऱ्या नऊ ते पंधरा वर्षांच्या कुमारांना पाचवी ते दहावी या इयत्तांत प्रवेश दिला जातो. या शाळेंत मुलींना प्रवेश नाही. शाळांची वार्षिक फी एकोणीसशे रुपये आहे. परंतु छत्तीसशेच्या खाली वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना निःशुल्क शिक्षण दिलें जातें. यामुळे सामान्य पालकांच्या बुद्धिमान मुलांना उत्तम शिक्षण मिळण्याची सोय झाली आहे हें कबूल करावें लागेल. सैनिकी

शाळांत शिक्षण घेण्याचें माध्यम जरी इंग्रजी असलें तरी इयत्ता पाचवी व सहावी मध्ये प्रादेशिक भाषेचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची मुभा आहे. हिंदी हा आवश्यक विषय आहे. याशिवाय इंग्रजी वाङमय, गणित, भौतिकशास्त्र, रसायन-शास्त्र, सामाजिक अध्ययन, सामान्य विज्ञान व संस्कृत हेहि विषय अभ्यासक्रमांत अंतर्भूत आहेत. पोहणें, घोड्यावर बसणें, मुष्टियुद्ध, हॉकी, क्रिकेट, व्हॉलीबॉल, फूटबॉल आदि अनेक गोष्टींचें शास्त्रशुद्ध शिक्षण या शाळांत दिलें जातें. तसेंच विद्यार्थ्यांच्या विविध छंदांना प्रोत्साहन देऊन त्याबाबत प्रगति करण्यास त्यांना मदत केली जाते. अभ्यासाइतकेंच अभ्यासपूरक कार्यक्रमांना महत्त्व देऊन व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न हें या शाळांचें खास वैशिष्टय आहे.

ज्या उद्देशांच्या पूर्तीसाठी सैनिकी शाळा निघाल्या आहेत ते उद्देश कितपत सफल होतात हें भविष्यकाळच सांगू शकेल. कारण देशांतील पहिली सैनिकी शाळा २६ जून १९६१ सालीं सातारा येथे निघाली. सैनिकी शाळांची स्थापना हा स्वतंत्र भारताचा शैक्षणिक इतिहासांतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या शाळांतून भारताला चांगले सैन्याधिका ी व कुशल प्रशासक मिळतील अशी अपेक्षा आहे. ही अपेक्षा पूर्णतया फलद्रूप होण्याच्या दृष्टीने या शाळांतील विद्यार्थ्यांना लोकजीवनाचें जवळून निरीक्षण करून त्यांत सहभागी होण्याची अधिक संधि दिली व जेवणाची पद्धति आणि अध्यापकांचा व विद्यार्थ्यांचा पेहराव यावर दिसून येणारा पश्चिमेचा प्रभाव थोडा कमी केला तर बरें होईल असें वाटतें.

## (आ) राष्ट्रीय अनुशासन योजना
## (National Discipline Scheme)

आज ही योजना जरी विद्यार्थीवर्गांत शिस्त निर्माण करण्यासाठी राबविली जात असली तरी या योजनेचा जन्म फार वेगळ्या प्रकारें झाला आहे. या योजनेचा पहिला प्रयोग दिल्ली येथील कस्तुरबा निकेतनमधील एका निर्वासितांच्या छावणीसाठी इ. स. १९५४ मध्ये करण्यांत आला. या योजनेचें उद्‌गाते जनरल जगन्नाथराव भोसले हे त्यावेळीं पुनर्वसन ( rehabilitation ) खात्याचे मंत्री होते. निर्वासितांच्या छावण्यांतून हिंडतांना त्यांना दिसून आलें की छावणींतील कुमार व तरुण सूडभावनेने धगधगत होते. या तरुणांना रचनात्मक कार्याकडे वळविलें नाही तर त्यांच्या सूडाच्या भावना तीव्र होतील हे ओळखून जनरल भोसल्यांनी त्यांना 'जगा व जगू द्या' हा सहिष्णुतेचा मंत्र शिकविण्याचें ठरविलें, आणि त्यासाठी प्रयोगात्मक भूमि म्हणून त्यांनी 'कस्तुरबा निकेतन'ची निवड

केली. जनरल भोसल्यांच्या या प्रयोगाला अपेक्षेपेक्षा अधिक यश आल्याचें पाहून ही योजना केवळ निर्वासित व निराश झालेल्या तरुणांसाठी मर्यादित न ठवता तिचें क्षेत्र वाढविण्याचें ठरलें. देशाची तरुण पिढी शिस्तबद्ध बनून योग्य त्या मूल्यांनी भारली गेली तर देशाचा उज्ज्वल भविष्यकाळ दूर राहणार नाही हें ओळखून त्या दिशेने टाकलेलें एक पाऊल म्हणजे राष्ट्रीय अनुशासन योजना होय– "केवळ देशाच्या कल्याणासाठीच नव्हें तर भावी नेतृत्व निर्माण होण्यासाठी तरुणांचें स्वयंकर्तृत्व व धाडस मार्गी लावणें हेंच आपलें ध्येय असलें पाहिजे" * या शब्दांत जनरल भोसल्यांनी या योजनेचा उद्देश स्पष्ट केला आहे. हें ध्येय साध्य करण्यासाठी खालील प्रकरचा शैक्षणिक कार्यक्रम आखला गेला आहे:––

(१) शारीरिक शिक्षण :—खेळ व शारीरिक शिक्षणांतून संघवृत्ति व नेतेपणाचे गुण बाणविले जातात.

(२) मानसिक शिक्षण :—आपल्या देशाचा सांस्कृतिक वारसा व परंपरा लक्षांत घेऊन विद्यार्थ्यांनी आपलें व्यक्तिमत्व व चारित्र्य घडवावें यासाठी विविध विषयांवर माहितीपूर्ण भाषणें दिलीं जातात.

(३) सांस्कृतिक विकास :—आपण एका संमिश्र संस्कृतीचे घटक आहोंत ही भावना जागृत करून ती जागती ठेवण्याचे प्रयत्न केले जातात.

(४) संघटनात्मक दृष्टी :––सुव्यवस्थित नियोजन कसें करावें व कुशलपणें संघटनात्मक कार्य कसें करावें याचा सराव व्हावा या दृष्टीने शिक्षण दिलें जातें.

हा शैक्षणिक कार्यक्रम व विशेषत: मानसिक विकासासाठी या योजनेंत तयार केलेला अभ्यासक्रम योग्य प्रकारें कार्यवाहींत आणल्यास त्याचा योग्य परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. मात्र विद्यार्थ्यांचा फक्त एस्. एस्. सी. पास झालेल्या एन्. डी. एस्. शिक्षकांना मानसिक विकास साधता येईल का अशी एक शंका मनाला चाटून जाते ! ह्यासाठी अशा प्रकारच्या शिक्षकांना ठराविक विषयांवर छोटी पण परिणामकारक भाषणें देण्याचें शिक्षण देणें तसेंच सुविद्य व प्रशिक्षित अशा इतर शिक्षकांना भाषणें देण्याची विनंती करणें हे उपाय यावर योजता येतील.

* Our aim must not be destroy the initiative and enterprise of the youth of the country but to channelise their force not only for the welfare of the country but for the building of future leadership" —Seminar on M. D. S. — 1961 p. 3. — Published by the Ministry of Education.

इ. स. १९५४ पासून या योजनेने बरीच प्रगति केली आहे. इ. स. १९६० मधे ही योजना एकूण १,९०० शाळांत कार्यवाहीत होती आणि ५,६५,४३८ विद्यार्थी या योजनेच्या कक्षेंत होते. तसेच इ. स. १९६० पासून अल्वारजवळ सारिस्का येथे याबाबतचें एक मध्यवर्ति प्रशिक्षण केंद्र स्थापन झालें आहे. शिवाय तृतीय योजनेंत अशा आणखी तीन प्रशिक्षण संस्था निघणार आहेत. त्या सर्व संस्था कार्य करूं लागल्यावर नोकरींत असलेले ११,००० शारीरिक शिक्षक, निवडलेले तरुण असे नवीन ११,००० शिक्षक व ५,००० नवीन उमेदवार यांच्या शिक्षणाची सोय होईल.

विद्यार्थ्यांत शिस्त निर्माण होण्यासाठी निश्चित कार्यक्रम द्यावा लागतो. राष्ट्रीय अनुशासन योजनेने असा कार्यक्रम दिला आहे. मात्र कोणत्याहि योजनेचें यश हें ती राबविणाऱ्या व्यक्तींच्या मगदुरावर अवलंबून असतें. मंत्रापेक्षा तंत्रांवर भर देणें सुलभ असतें. परंतु त्यामुळे योजनेचा प्राण नाहीसा होऊन नुसता सांगाडा राहतो. हा धोका ओळखून राष्ट्रीय अनुशासन योजनेच्या शिक्षकांनी केवळ बाह्य शिस्तीवर भर न देतां विद्यार्थ्यांत विशिष्ट वृत्ति व जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे.

## (इ) शाळेंतील मधल्या वेळचा आहार :

सुधारलेल्या पाश्चात्य देशांत, विशेषतः दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपासून मधल्या वेळच्या जेवणाची सोय ही शालेय जीवनाचा एक आवश्यक भागच बनली आहे. तत्पूर्वीहि ही सोय कांही काळ होतीच; पण ती फक्त गरजू विद्यार्थ्यां-पुरतीच मर्यादित होती. शाळांशाळांतून असा आहार पुरविण्याची गरज भिन्नभिन्न प्रमाणांत आढळून येई युद्धकाळांत शिधापद्धति सुरुं झाली व त्यामुळे मुलांना पुरेसा पौष्टिक आहार मधल्या वेळीं मिळणें दुरापास्त झालें. तसेंच पुरुषवर्ग युद्ध-विषयक प्रत्यक्ष कामकाजांत गुंतल्यामुळे शाळांतून पूर्ण वेळ काम करणाऱ्या स्त्रियांच्या नेमणुका करणें अपरिहार्य झालें. या दोन कारणांमुळे परिस्थितींत खूपच पालट झाला व मधल्या वेळचें जेवण मुलांना शाळेंत पुरविण्याची गरज तीव्रतेने भासूं लागली. या सोयीचा परिणाम मुलांच्या विकासावर व विशेषतः आरोग्यावर फारच अनुकूल झाल्याचें आढळून आलें. ज्यांना दुपारचें जेवण घरींच मिळण्याची सोय उपलब्ध नव्हती त्यांना तर अशा योजनेचा फारच फायदा झाल्याचें दिसून आलें. म्हणून आता पाश्चात्य देशांत मुलांना दुपारचें जेवण मोफत किंवा अल्प किंमतींत पुरविणें हें शाळेच्या कार्याचेंच एक अंग समजण्यांत येतें. ही सोय करण्याबाबत इंग्लंडसारख्या देशांत केवढी दक्षता घेण्यांत येते हें

पाहण्यासारखें आहे.* इ.स. १९६१–६२ मध्ये सरकारी शाळांत(Maintained Schools) दुपारचे जेवण पुरविण्यासाठी सुमारे ७५ दशलक्ष पौंड (९७॥ कोटि रुपये) खर्च झाले व त्यांतील देखरेखीचा खर्चच २·८ टक्के म्हणजे सुमारे २१ लक्ष पौंड होता. देखरेख करणाऱ्या कॅन्टीन सुपरवायझरला वार्षिक ४५० ते ५०० पौंड (सुमारे ६५०० रु.) पगार मिळतो. एकटचा ग्लासगो शहरांत रोज ७५००० मुलांना जेवण पुरविलें जातें. त्यासाठी शहरांत निरनिराळचा ठिकाणीं १०५ स्वयंपाकगृहें व ४०२ जेवणाचे हॉल्स तयार करण्यांत आले आहेत. या ७५००० मुलांपैकी सुमारें २६००० मुलांना मोफत जेवण मिळतें. शाळेतील मुलें जेथें सहलीला जातात तेथे पूर्वसूचना दिल्यास जेवण्याची सोय या योजनेमार्फत करण्यांत येते. हर्टफोर्डशायर परगण्यांत शाळेंतील मुलांपैकीं सुमारें ६६% मुलांना दुपारचें जेवण व ७८·८० टक्के मुलांना दूध देण्यांत येतें. हे सर्व आंकडे तिकडील परिस्थितीची सर्वसाधारण कल्पना येण्यासाठी नमुन्यादाखल दिले आहेत. (अधिक माहितीसाठी पाहा. Education–1st June 1963).

आपल्या देशांतील शहरें व नागरी विभागांतील गांवे यांचा प्रश्न या आहाराच्या दृष्टीने ग्रामीण विभागापेक्षा बराच वेगळा आहे. ग्रामीण भागांतील बहुतेक प्राथमिक शाळा दुवक्त–सकाळी व दुपारीं–भरतात. कांही पूर्ण प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा जागेच्या अभावामुळे दुवक्त पद्धतीने (Shift system) भरविण्यांत येतात. सकाळदुपार भरणाऱ्या शाळेंतील मुलें दुपारचें जेवण घरीं करूं शकतात. उलट ११ ते ५ या वेळांत भरणाऱ्या शाळेंतील मुलें सकाळीं गडबडीने न्याहारीवजा जेवण करून जातात. कांही थोडीं मुलें डबे आणून मधल्या वेळीं खातात, पण बऱ्याच मुलांना तें शक्य होत नाही. हीं मुलें घरीं जेवत असली तरी त्यांना पौष्टिक आहार पुरेशा प्रमाणांत मिळतोच असें नाही. शहरांतील मुलें १० वाजतां घाईघाईने कसेंतरी जेवण करून शाळेंत जातात; हॉटेलांतील कसलेतरी पदार्थ खाऊन भूक भागवितात. शरीरपोषणास असा आहार विघातकच ठरतो. शहरांतील इतर परिस्थितीहि आरोग्याला पोषक असत नाही.

* "The whole purpose of the School Meals Service has changed over the last few years. It has always been associated with poverty and need; but now these have been banished. School meals have to be seen in terms of the Beveridge Report–as part of the structure of the Social Services."––G. H. Sylvester, Chief Education Officer, Bristol in his address to the IMA (Institutional Management Association) Conference, 1963 (Education––12th April 1963).

तात्पर्य, आपल्या देशांत स्थानपरत्वें परिस्थिति भिन्नभिन्न असली तरी सर्वत्र दुपारच्या जेवण्याची किंवा मधल्या वेळच्या खाण्याची सोय कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत असणें आवश्यक आहे. आहार पुरेसा व पौष्टिक न मिळण्याचें कारण विशेषत: ग्रामीण विभागांत तरी दारिद्र्य हेंच आहे. ही सोय करण्यांत आली तर मुलांची एक प्रमुख गरज भागते व शाळेंतील उपस्थिति समाधानकारक राहूं शकते असा अनुभव आहे. अमेरिकेकडून मदतीदाखल मिळालेल्या दुधाच्या पावडरीचा पुरवठा ज्या ग्रामीण शाळांना करण्यांत आला होता तेथे शाळेच्या हजरींत वाढ झाली व मुलांच्या प्रकृतींतहि इष्ट सुधारणा घडून आल्याचें दिसून आलें.

## पौष्टिक आहार :

पौष्टिक आहार कोणता याचें संशोधन भारतांतील विशिष्ट परिस्थितीला अनुसरून झालें पाहिजे. इंग्लंडमधील शिक्षणखात्याने एक हजार कॅलरी उष्णतेचा पुरवठा होऊं शकेल एवढ्या पोषणमूल्यांनी युक्त असा आहार मधल्या वेळीं मुलांना द्यावा असा फतवा काढला आहे. त्यासाठी २० ते २५ ग्रॅम प्राणिजन्य पदार्थांचा व सुमारें ३० ग्रॅम स्निग्ध पदार्थांचा समावेश असलेले अन्नपदार्थ द्यावेत अशी त्यांची सूचना आहे. हें आपणांस सध्यातरी जवळजवळ अशक्यच आहे. कारण एवढें सत्त्वयुक्त अन्न बहुसंख्य भारतीयांनाच मिळत नाही. म्हणून भारताच्या विशिष्ट परिस्थितीला अनुसरून आहारविषयक संशोधन व्हावयास हवें. हा आहाराचा प्रश्न भारतांत फारच महत्त्वाचा असण्याचें कारण आपल्या देशाची एकूण अन्नविषयक परिस्थिति फार असमाधानकारक आहे हें होय. शिधानियंत्रणें, वाढती महागाई, आर्थिक दुरवस्था, यामुळे मुलांना सदोष आहार मिळतो व मुलांच्या वाढीवर त्याचा वाईट परिणाम होतो. मुलांची शारीरिक वाढ मुख्यत: दोन गोष्टींवर अवलंबून असते. पहिली बाब आनुवंशिकता ही होय. मूल ज्या तऱ्हेचा वारसा घेऊन आलेलें असतें त्यापेक्षा जास्त सुधारणा अनेक प्रयत्न करूनहि होऊं शकत नाही. आनुवंशिकतेमुळे शारीरिक वाढीच्या मर्यादा ठरतात. दुसरी गोष्ट परिस्थिती. तिच्यामुळे ठरलेल्या मर्यादेंत अनुरूप प्रगति घडून येते. परिस्थिति अनुकूल असेल तर आनुवंशिकतेने ठरविलेली मर्यादा गाठतां येते; नसेल तर विकासाची शक्यता असूनहि तितकी प्रगति होत नाही. परिस्थितीमुळे होणाऱ्या प्रगतींत आहाराचा वांटा प्रमुख आहे. भारतांतील व पाश्चात्य देशांतील मुलें जन्मत: सारखींच असतात. त्यांच्या शारीरिक विकासांत नंतर मिळणाऱ्या अन्नामुळे फरक पडत जातो. सदोष आहारामुळेच वयाच्या १० व्या वर्षांपर्यंत अयोग्य वाढ होत जाते. दांत, डोळे, मज्जासंस्था, मानसिक शक्ति या सर्वांवर त्यांचा प्रतिकूल परिणाम होत जातो. रोगांचा प्रतिकार

करण्याची मुलांची शक्ति कमी होते व नंतर सबंध जन्मभर मुलांच्या आरोग्याचें हें मान कायम राहतें. भारतांत बरेच लोक अर्धपोटी राहतात व इतरांपैकी बहुसंख्य जेमतेम भूक भागण्याइतपतच आहार घेऊं शकतात. समाधानकारक जेवण म्हणजे पोट भरणें, किंवा कशीबशी भूक भागणें नव्हे.* आपल्या जेवणांत पिष्टमय पदार्थांचें प्रमाण खूपच असतें, पण इतर आवश्यक असे नत्रयुक्त, स्निग्ध व क्षारयुक्त पदार्थ कमी असतात. बिहारमध्ये डॉ. लाल यांनी साठ हजार मुलामुलींची या दृष्टीने वैद्यकीय पाहाणी केली. त्यावरून शें. ४३·१ मुलगे व शें. ३८·९ मुली सदोष आहार किंवा तज्जन्य रोग यामुळे पीडित असलेल्या आढळल्या. कलकत्ता विश्वविद्यालयांतील सन १९६१ सालच्या पाहाणीवरून शें. ८० विद्यार्थी सदोष आहार घेतात व त्यामुळे अनारोग्य आढळतें असें दिसून आलें. या भयानक प्रमाणावरून मधल्या वेळच्या पौष्टिक आहाराचें केंवढें महत्त्व आहे हें दिसून येईल. चांगल्या सवयी लागणें, बौद्धिक, शारीरिक, भावनिक व मानसिक अशी सर्वांगीण उन्नति होणें हें बऱ्याच अंशी पुरेसा व पौष्टिक आहार मिळण्यावर अवलंबून आहे. रिकाम्या पोटीं अभ्यास वा दुसरें कोणतेंहि कार्य होणें प्रायः असंभवनीय आहे. 'बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते' हें अगदी खरें आहे. पोटभर अन्न न मिळणें किंवा मिळूनहि तें योग्य प्रकारचें नसणें परिणामीं एकच आहे. म्हणून गीतेंतहि ‡युक्ताहाराचें माहात्म्य स्पष्टपणें सांगण्यांत आलें आहे. या महत्त्वामुळेच इंग्लंडसारख्या देशांत यासंबंधी कायदेच करण्यांत आले आहेत व ती जबाबदारी तेथील शासनाने स्वीकारली आहे. आपल्या देशांतील सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजनेला हा पूरक आहाराचा प्रश्न उपकारक ठरणार आहे असें कांही ठिकाणच्या अनुभवावरून दिसून आलें आहे.

## पूरक आहाराचा महाराष्ट्रांतील प्रयोग :

मधल्या वेळेच्या जेवण्याऐवजी पूरक आहार असा शब्दप्रयोग आपल्या दृष्टीने अधिक योग्य ठरेल. कारण जरी पोटभर अन्न मिळालें तरी तें वरील

---

* The satisfaction of hunger is not the only criterion of a satisfactory meal. The main meal of the day must also provide a high first-class protein and fat value and must supply an adequate vitamin and salt content. This is the responsibility of School Meals Organisers"—Page 6, the Practical Infant Teacher Vol. I—Editor; P. B. Ballard.

‡ 'युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।।
युक्त स्वप्नाव बोधस्य योगो भवति दुःखहा' ।। भ. गी. ६/१७

व्याख्येनुसार समाधानकारक नव्हे. आपल्या देशांत सर्व शाळकरी मुलांना संपूर्ण जेवण दुपारी सार्वत्रिकरित्या देणें आर्थिक टंचाईमुळे सध्यातरी शक्य होणार नाही. म्हणून हॉफकिन् इन्स्टिटयूट, आहारसंशोधन केंद्र कुन्नूर, इत्यादि संस्थांत पूरक आहाराची चिकित्सा करून तो ठरविण्यांत आला. भारताचें हवामान, संस्कृति, राहणी यांचा विचार करून व उपलब्ध असणाऱ्या स्वस्त पण पौष्टिक अन्नपदार्थांचें पृथक्करण करून कमीतकमी खर्चाच्या पूरक आहाराची एक चांचणी योजना आखण्यांत आली. तिचा शास्त्रशुद्ध प्रयोग ठाणें जिल्ह्यांत करण्यांत आला. अन्नपदार्थ स्वस्त, सत्त्वयुक्त व जवळपास उपलब्ध होण्यासारखे असे निवडण्यांत आले व अशा पूरक आहाराची रोजची किंमत फक्त एक आणा ठरविण्यांत आली. एवढ्या किंमतींत दोन ग्लास नीरा किंवा २॥ औंस नीरेचा गुळ, एक ग्लास पावडरचें दूध किंवा दोन केळी देण्यांत आलीं. या प्रत्येक प्रकारासाठी स्वतंत्र गट करण्यांत आले होते व त्याची शास्त्रशुद्ध आकडेवारी ठेवण्यांत आली होती. कांही गटांना कोणत्याहि प्रकारचा पूरक आहार न देता त्यांची सहा महिन्यांतील नैसर्गिक वाढ मोजण्यांत आली व वरील आहारामुळे कितपत वाढ झाली याचा आढावा घेण्यांत आला. पाहाणीसाठी आकडेशास्त्राच्या कसोटया व त्याचप्रमाणे वजन, उंची वगैरे शारीरिक कसोटचाहि दिल्या होत्या. यावरून निघालेला महत्त्वाचा निष्कर्ष असा निघाला की एक आण्याच्या पूरक आहारांत सर्व शारीरिक कमतरता दूर करतां आली नाही. तथापि कांही प्रमाणांत निश्चित प्रगति दिसून आली. (सविस्तर माहितीसाठी पाहा : Health Bulletin No. 23, Indian Council of Medical Research.)

## सर्वारंभास्तंडुला : प्रस्थमूला :

पण अशा चांगल्या हितावह योजना कार्यवाहीत आणण्यामध्ये पहिली अडचण आर्थिक टंचाईची आहे. ही जबाबदारी सरकारची आहे असें म्हणून सध्याच्या परिस्थितींत तरी सुटका नाही. द्रव्यसाहाय्य व अन्य सामुग्री पुरविणें ही जबाबदारी मुख्यत: जनतेची आहे. खेडोपाडीं बालकांनी सार्वजनिक कार्यासाठी श्रमदान करावें. उलटपक्षीं, ग्रामपंचायती, सहकारी सोसायटचा व गावांतील धनिक यांनी ही जबाबदारी गांवकऱ्यांच्या सहकार्याने स्वीकारावी. तालुकापंचायती, जिल्हापरिषदा, नगरपालिका वगैरे स्थानिकस्वराज्यसंस्थांनी त्यांना मदत करावी यासाठी त्यांना कायदेशीर सवलती मिळणें जरूर आहे. जनता पूर्वीदेखील ही जबाबदारी स्वीकारीत होतीच. माधुकरी, वार लावणें या मार्गाने विद्यार्थ्याला व भिक्षुकीच्या द्वारें गुरूला मदत करण्याचा सर्रास प्रघात भारतांत आर्वाचीन कालापर्यंत होता. त्यासाठी त्याला धार्मिक भावनेची जोड समाजधुरीणांनी दिलेली

होती. आता त्या मदतीचें स्वरूप फक्त पालटलें ही गोष्ट लक्षांत घेऊन जनतेने ही जबाबदारी प्रामुख्याने उचलणें जरूर आहे.

## मद्रास महापालिकेचा आदर्श :

या बाबतींत मद्रास शहराने आघाडी मारून प्रशंसनीय कार्य केलें आहे. मद्रास म्यु. कार्पोरेशनच्या हद्दींत सुमारें सव्वा लक्ष मुलें ६ ते १२ वयोमर्यादेतील आहेत. यांतील गरजू अशा सुमारें तीस हजार विद्यार्थ्यांना दुपारचें जेवण महानगरपालिकेतर्फे पुरविण्यांत येतें. सुमारें ३०० शाळांतून हा प्रयोग करण्यांत आला व अजून तो चालू आहे. रोज दुपारीं १२ ते २ या अवधींत आठवड्यांतील सहा दिवस जेवण देण्यांत येतें. रविवारीं शाळा बंद असतात. रोज आलटून पालटून सांबारभात, दहीभात, सारभात, खिचडी वगैरे पदार्थ देण्यात येतात.

महाराष्ट्रांतहि जुन्नर तालुक्यांतील ७२ गावांत ही योजना सुरु करण्यांत आली आहे. राजुरी या गावीं सन १९६१ पासून ही योजना अंमलांत आली. गावांतील १५०० मुलांपैकीं अंदाजें ९०० विद्यार्थ्यांना जेवण पुरविण्यांत येतें. एका दिवसाचा खर्च सरासरी २० रुपये येतो. या खर्चाची जबाबदारी ग्रामस्थांनी उचलली आहे व ग्रामपंचायतीने पाणीपुरवठ्याची जबाबदारी स्वीकारली आहे. तालुक्यांतील ७२ गावांतून सुमारें ९००० विद्यार्थ्यांची सोय करण्यांत आली आहे. कांही गावांत दोन पासून पांच दिवस किंवा सहा दिवस पूरक अन्न पुरविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. नुकतीच मुंबई शहरांत प्राथमिक शाळांतील मुलांना दुपारच्या जेवण्याची सोय करण्याची एक भव्य योजना अमेरिकन मदतीच्या आधारावर सुरु करण्यांत आली व हजारों मजूर व इतर गरीब कामकरी यांच्या मुलांना त्याचा फायदा मिळूं लागला आहे.

भारतांत तेवीस महानगरपालिका, शेकडो नगरपालिका व हजारों ग्रामपंचायती आहेत. महाराष्ट्रांत व इतरत्र विकेंद्रीकरणाचा महान प्रयोग चालू आहे. याचा फायदा घेऊन खेडोपाडीं सुगीच्या वेळीं वर्गणीरूपाने धान्य गोळा करण्यांत यावें व त्या त्या गावांत शाळेंतील मुलांसाठी जेवणाची योजना सुरु करावी. सरकार, अन्य स्थानिक-स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, धार्मिक व इतर सामाजिक संस्था यांच्याकडून आवश्यक तें अन्य साहाय्य द्रव्य व इतर रूपाने मिळवावें. त्यांनीहि हें राष्ट्रीय जबाबदारीचा भाग म्हणून द्यावें, दानधर्म या स्वरूपांत नव्हे. पुरविले जाणारे अन्नपदार्थ जीवनसत्त्वयुक्त, स्वच्छ व आवश्यक अन्नघटकांनी युक्त असावेत.

मधल्या वेळच्या आहाराची ही योजना अनेक कारणांसाठी अत्यंत जरूरीची आहे. तिच्यामुळे शिक्षणाचा प्रसार तर अधिक होईलच पण शिक्षणाचे इतर फायदेहि पदरांत पडतील. चांगल्या सवयी, आरोग्य, चारित्र्यसंवर्धन इत्यादि महत्त्वाच्या गोष्टी त्यामुळे साधतील. समाजासाठी स्थानिक नेतृत्वाची निर्मिति त्यामुळे सुलभ होईल. अर्थात् या योजनेंत अडचणी कांही कमी नाहीत. भारताच्या एका शेजारी राष्ट्रांत अमेरिकेकडून मुलांसाठी मिळालेली लाखों पौंड दुधाची भुकटी बंदरांतच काळचा बाजारांत विकण्यांत आली अशी अमेरिकन वकिलाने जाहीर तक्रार केली होती. भारतीयांची दानत इतक्या खालच्या थरापर्यंत गेलेली दिसत नाही; तरीहि भ्रष्टाचार आणि अप्रामाणिकपणा यांचें लोण कित्येकदां सरस्वतीच्या पवित्र मंदिरापर्यंत भिडल्याचीं उदाहरणें कांही कमी नाहीत. म्हणून अशा योजनेवर ग्रामस्थांची व शासनयंत्रणेची सक्त देखरेख हवी यांत शंकाच नाही. नाहीतर मुलांसाठी असलेल्या या योजनेचा फायदा त्यांच्याऐवजी भलत्याच्याच पदरांत पडेल. पण असले धोके संभवतात म्हणून ही योजना त्याज्य ठरवितां येणार नाही. व्यवस्थेंत व यंत्रणेंत जरूर ती सुधारणा केली पाहिजे व मुख्य म्हणजे यासाठी जरूर असलेला प्रचार करून जनतेला योजनेची जरूरी व त्याबाबतची तिची जबाबदारी पटविली पाहिजे. भ्रष्टाचार होईल म्हणून योजना विचारांत न घेणें गैर होईल. कविवर्य मोरोपंतांनी म्हटलेंच आहे– "कां न सदन बांधावें कीं त्यांत पुढे बिळें करिल घूस ?"

## (ई) कांही शैक्षणिक प्रयोग :

कोणत्याहि शिक्षणपद्धतींत, किंबहुना कोणत्याहि मानवनिर्मित संस्थेंत किंवा कार्यांत काहीना काही दोष, अपूर्णता आढळणारच ! आजपर्यंत आपल्या देशांतील शिक्षणपद्धतीवर खूपच टीका झालेली आहे व आजहि होत आहे. ती सदोष व अपूर्ण आहे यांत शंकाच नाही व आतापर्यंतच्या विवेचनात त्यांची भरपूर चर्चा आपण केलेलीच आहे. शिक्षणपद्धतीबद्दल वाटणाऱ्या असमाधानांतच आपल्या शैक्षणिक प्रगतीचीं पावलें लपलेली आहेत असे म्हटल्यास वावगें होणार नाही इंग्रजी अंमलातील कारकून बनविणाऱ्या बाह्यतः हिंदी पण आतून इंग्रज बनविणाऱ्या इंग्रजी शिक्षणपद्धतीबद्दल चिपळूणकर टिळकांपासून सर्वांनाच असमाधान वाटत होते. त्या शिक्षणांत सुधारणा करण्यासाठी अनेकविध प्रयत्न करण्यांत आले. अनेक ठिकाणी 'राष्ट्रीय शाळा' आणि 'राष्ट्रीय विद्यालयें' स्थापन झाली. भारतात गुरुकुलें, शांतिनिकेतन, महिला विद्यापीठ, टिळक विद्यापीठ, प्राज्ञपाठशाळा वगैरे

अनेक महत्त्वाचे प्रयोग करण्यांत आले व आजहि कांही चालू आहेत. हे शैक्षणिक प्रयोग म्हणजे राष्ट्राच्या जिवंतपणाचें लक्षणच आहे. त्यांच्याद्वारे शिक्षणाचें पाऊल थोडें का होईना, पुढेंच पडलेलें आहे व त्यांच्यामुळे राष्ट्राची मान ताठ झालेली आहे. त्या सर्वांची थोडीथोडी माहिती देणें अशक्य आहे. पण कांही महत्त्वाच्या शैक्षणिक प्रयोगांची माहिती खाली वानगीदाखल दिलेली आहे.

## गुरुकुल (कांगडी) :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस भारतीय स्वातंत्र्य चळवळीला एक विशेष धार प्राप्त झाली होती. लो. टिळकांसारख्या कांही भारतीय नेत्यांच्या मतें तरुण पिढींत प्रखर राष्ट्रीय भावना निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय स्वरूपाचें शिक्षण देणें अवश्य होतें. इंग्रजी अंमलामुळे व इंग्रजांनी केलेल्या सुधारणांमुळे प्रभावित झालेल्या कांही आंग्ल-विद्या-विभूषित मंडळींना इंग्रजी अंमल हें एक परमेश्वरी वरदानच वाटत होतें. या गुलामी मनोवृत्तीवर उपाय म्हणून भारताच्या प्राचीन संस्कृतीविषयी प्रेमाची व आदराची भावना जागृत करणें राष्ट्रोन्नतीसाठी आवश्यक आहे असें भारतीय नेत्यांनी ठरविलें. या दृष्टीने पहिलें पाऊल टाकण्याचें महत्कार्य भारताचे एक थोर सुपुत्र स्वामी दयानंद सरस्वती यांनी केलें. स्वामीजी भारतीय संस्कृतीचे आणि विशेषतः आर्यधर्माचे कट्टर अभिमानी होते आणि म्हणून त्यांनी इंग्रजी शिक्षणपद्धतीवर फार कडक टीका केली. इंग्रजी शिक्षणामुळे आपले प्राचीन आदर्श, परंपरा आणि संकेत विसरले जातात; एवढेंच नव्हे, तर त्यामुळे भारतीयांचे देशप्रेमहि नाहींसें होत चाललें आहे व भारतीयांचा अधःपात होत आहे असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. ‘ वेदांकडे परत चला ’ अशी घोषणा करून त्यांनी प्राचीन वैदिक आदर्शावर आधारलेल्या राष्ट्रीय स्वरूपाच्या शिक्षणाची मागणी केली. अशा स्वरूपाचें शिक्षण देणाऱ्या गुरुकुलांच्या स्थापनेची चळवळ त्यांनी मोठ्या जोमाने सुरू केली.

गुरुकुलांतील शिक्षण प्राचीन भारतीय ध्येयें व मूल्यें यांच्या आधारावर देण्यांत येतें. विद्यार्थी एखाद्या आश्रमांत आपल्या गुरुच्या समवेत राहातात. निसर्गांतील एखाद्या शांत व रमणीय स्थानीं, जगाच्या बजबजपुरीपासून दूर अशा ठिकाणीं आश्रम असतात व तेथे निसर्गाच्या सहवासांत गुरुच्या पायाजवळ बसून विद्यार्थी जीवनविषयक विविध प्रश्नांचा अभ्यास करतात. विद्यार्थ्यांच्या शीलसंवर्धनावर मुख्य भर दिला जातो. उच्च आध्यात्मिक व नैतिक सद्‌गुण असलेल्या चारित्र्यसंपन्न व्यक्ति अध्यापनकार्य करतात व त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्याबद्दल नितान्त आदर वाटतो. अभ्यासक्रमांत धार्मिक शिक्षणाचा, तसेंच

वाङ्मयाचा आणि सांस्कृतिक विषयांचा अंतर्भाव केलेला असतो. विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडे विशेष लक्ष दिलें जातें. शिक्षण पूर्णपणें मोफत असतें. प्राचीन भारतीय संस्कृति हाच या गुरुकुल शिक्षणपद्धतीचा मुख्य आधार होय. अर्थातच ऐहिक उत्कर्षाबरोबरच पारमार्थिक कल्याण हें मानवी जीवनाचें अंतिम ध्येय मानलें जातें. म्हणून गुरुकुलांतील विद्यार्थ्याला संयमी व शिस्तबद्ध जीवन आचरावें लागतें. प्राचीन भारतीय संस्कृतीचें व आदर्शाचें पुनरुज्जीवन करण्याच्या दृष्टीने शिक्षणक्षेत्रांत जे प्रयोग करण्यांत आले त्यांपैकी कांगडीचें गुरुकुल हा पहिला व महत्त्वाचा प्रयोग आहे.

स्वामी दयानंदांनी गुरुकुलें स्थापन करण्याविषयी खूप प्रचार केला. परंतु ते इ. स. १८८३ मध्ये समाधिस्थ झाले व त्यांचे अपुरें कार्य स्वामी श्रद्धानंद यांनी हातांत घेतलें. प्रचार करून त्यांनीं पुरेसे पैसे गोळा केले व हरिद्वारजवळ गंगाकिनारीं कांगडी नांवाच्या गावीं सन १९०२ मध्ये सुप्रसिद्ध कांगडी गुरुकुलाची स्थापना केली. सुरुवातीस ही संस्था अगदीच लहान होती पण २० वर्षानंतर तिला विश्वविद्यालयाचें स्वरूप प्राप्त झालें. आर्य प्रतिनिधि सभा, पंजाब या संस्थेमार्फत गुरुकुलाची सर्व व्यवस्था होते. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे इंग्रजी अंमलांत परकी सरकारकडून या गुरुकुलाने ४७ वर्षांच्या कालावधींत कोणत्याहि प्रकारचें अनुदान घेतलें नाही.

## गुरुकुलाचीं ध्येयें :

(१) विद्यार्थ्याचें ब्रम्हचर्यपालन व शीलसंवर्धन यावर भर देणें;

(२) प्राचीन भारतीय संस्कृतीबद्दल त्यांच्या मनांत प्रेमभावना निर्माण करणें;

(३) गुरु आणि शिष्य यांच्यामध्ये जिव्हाळ्याचा, व्यक्तिगत व आदर्श संबंध निर्माण करणें;

(४) वैदिक वङ्मय व संस्कृत भाषा यांच्या अध्ययनाला विशेष महत्त्व देणें व त्याचबरोबर इंग्रजी भाषेचेंहि शिक्षण देणें;

(५) शिक्षणाचें माध्यम म्हणून हिंदी भाषेचा वापर करणें;

(६) शिक्षण मोफत देण्याची सोय करणें;

(७) भारतीय तत्त्वज्ञान, वाङ्मय, विज्ञान आणि इतिहास या विषयांत संशोधन करण्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणें.

या ध्येयांना अनुसरून कांगडीच्या गुरुकुलाने आपलीं खास वैशिष्टयें निर्माण केलीं आहेत. सद्वर्तनी व पूज्य गुरुजनांच्या प्रेमळ छत्राखाली विद्यार्थ्यांना ठेवण्यांत येते. गुरुकुलांतील वातावरण शांत व पवित्र राहील अशी दक्षता सदैव घेतली जाते. विद्यार्थ्यांच्या खाण्यापिण्याची सर्व व्यवस्था गुरुकुलामार्फतच होते. कोणत्याहि प्रकारचा भेदभाव न करतां त्यांना समान वागणूक दिली जाते. सर्व विद्यार्थ्यांना वसतिगृहांतच राहावें लागतें. येथे सहशिक्षण मात्र मंजूर नाही. तसेंच धूम्रपान, मद्य किंवा मांसाचें सेवन वगैरे गोष्टींना सक्त मनाई आहे. शीलसंवर्धन, आरोग्य, नियमित व्यायाम या गोष्टींकडे विशेष लक्ष पुरविलें जातें. बौद्धिकविकासासाठी पौर्वात्य आणि पाश्चात्य ज्ञान-विज्ञानाचें शिक्षण मुलांना दिलें जातें. नियमितपणें धार्मिक शिक्षणहि मिळतें व त्याच्या द्वारें मुलांच्या आध्यात्मिक विकासाकडे योग्य लक्ष पुरविलें जातें.

## शिक्षणाची व्यवस्था :

गुरुकुलांत ६ ते १० वर्षांच्या बालकांना प्रवेश दिला जातो. शिक्षणक्रम १४ वर्षांचा आहे. यापैकी १० वर्षें शालेय शिक्षणाचीं व ४ वर्षें उच्च शिक्षणाची आहेत. १४ वर्षांचा अभ्यासक्रम यशस्वीपणें पूर्ण केल्यावर विद्यार्थी स्नातक ( Graduate ) बनतो. त्यानंतर आणखी दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास विद्यार्थ्याला ' वाचस्पति ' ( M. A. ) ही पदवी मिळू शकते. या विद्यापीठांत चार महाविद्यालयें आहेत : वेदमहाविद्यालय, कलामहाविद्यालय, शास्त्र ( Science ) महाविद्यालय व आयुर्वेद महाविद्यालय. आयुर्वेदाचा अभ्यासक्रम पांच वर्षांचा आहे. १५ ते १९ वयाच्या विद्यार्थ्यांना त्यांत प्रवेश मिळतो. आयुर्वेद आणि अॅलोपथी या दोन्ही प्रकारच्या चिकित्सापद्धतींचा संमिश्र अभ्यासक्रम नियुक्त करण्यांत आला आहे व तो पूर्ण झाल्यावर आयुर्वेदालंकार (B. I. M. S.) ही पदवी मिळते. विद्यार्थ्यांच्या आश्रमीय दिनचर्येंत संध्या-हवन, शिक्षण, स्वाध्याय, व्यायाम, खेळ वगैरेंचा समावेश असतो. त्यांना पहाटे ४-३० वाजतां उठावें लागतें व रात्रीं ९ च्या पुढे जागरण करतां येत नाही.

## गुरुकुल-प्रयोगाचें महत्त्व :

वर सांगितल्याप्रमाणे प्राचीन भारतीय संस्कृति व आदर्श यांचें पुनरुज्जीवन करण्याचा व त्यांच्या आधारावर शिक्षण देण्याचा हा एक यशस्वी प्रयोग आहे. गुरुकुल हें केवळ शिक्षणकेंद्रच नव्हे, तर तें भारताचें एक सांस्कृतिक केंद्रहि आहे. राष्ट्रभावनेचा परिपोष, हिंदीचा विकास, शीलसंवर्धन, धार्मिक शिक्षण वगैरे कार्य

या संस्थेकडून होत असल्याने तिला आगळें वैशिष्टच प्राप्त झालेलें आहे. केवळ भारतांतीलच नव्हे तर आशिया व आफ्रिका खंडांतील कांही देशांचे विद्यार्थी आज तेथे शिक्षण घेत आहेत यावरून या प्रयोगाचें महत्त्व लक्षांत येईल. इंग्लंड-मधील ग्रामरस्कूल आणि पब्लिकस्कूल या दोन्ही प्रकारच्या संस्थांचीं उचित वैशिष्टयें गुरुकुलाने आत्मसात् केलेलीं आहेत व तरीहि आपलें भारतीयत्व शाबुत ठेविलें आहे. इंग्रजी भाषा, अर्वाचीन विज्ञान, वैद्यक, शल्यविद्या इ. विषयांचें शिक्षण तेथे दिलें जातें हें विशेष उल्लेखनीय आहे. या गुरुकुलाच्या धर्तीवर अन्य गुरुकुलें स्थापन करण्यांत आलीं आहेत. त्यांपैकीं वृंदावन येथील गुरुकुल प्रसिद्ध आहे. तसेंच मुलींच्यासाठी स्वतंत्र गुरुकुलें डेहराडून, सासनी (अलीगढ), जालंदर, बडोदा वगैरे ठिकाणीं स्थापन झालेलीं आहेत व त्यांत वर दिलेलीं सर्व वैशिष्टयें कायम ठेवण्याची दक्षता घेण्यांत यते.

## विश्व-भारती :

शांतिनिकेतन किंवा विश्वभारती हीं नांवें उच्चारल्याबरोबर डॉ. टागोरांचें स्मरण होतें. भारताला, किंबहुना सर्व जगाला त्यांनी आपल्याला विविध कलाकृतींबरोबरच विश्वभारती ही एक मोलाची देणगी दिलेली आहे. शिक्षण-क्षेत्रांत त्यांनी आपल्या अलौकिक प्रतिभेच्या व बुद्धिमत्तेच्या जोरावर जे अनुभव मिळविले व त्यांच्या आधारावर जे प्रयोग केले, त्यांचा अंतिम परिपाक म्हणजेच विश्व-भारती ही महान् संस्था होय. त्यांचे स्वतःचें शिक्षण परंपरागत स्वरूपाच्या शाळेंत होऊंच शकलें नाही. तेथील वातावरण त्यांना रुक्ष, संकुचित व कैदखान्या-सारखें वाटत होतें. स्वतः घेतलेल्या अनभवांतून, चिंतनांतून आणि जगभर केलेल्या प्रवासांत मिळविलेल्या ज्ञानांतून जन्म पावलेल्या आपल्या शिक्षणविषयक विचारांना त्यांनी विश्वभारती या संस्थेच्या स्वरूपांत साकार केलें.

## रवींद्रनाथांचे शिक्षणविषयक विचार :

रवींद्रांना प्रचलित शिक्षणपद्धति अत्यंत असमाधानकारक व हानिकारक वाटत होती. आपला स्वतःचा संपूर्ण विकास करून घेण्याचें पूर्ण स्वतंत्र्य बालकांना असलेंच पाहिजे असें त्यांचें मत होतें. कसल्याहि प्रकारचीं नियंत्रणें, जबरदस्ती किंवा सक्ती विकासाला बाधक आहे. आत्माभिव्यक्तीची जास्तीत जास्त संधि मुलाला उपलब्ध करून देणें हें शिक्षणाचें पहिलें व प्रमुख कर्तव्य आहे. म्हणून शिक्षणसंस्थेंत कोणत्याहि प्रकारचें कृत्रिम वातावरण असतां कामा नये. मुलांच्या चुकांबद्दलहि त्यांना शिक्षा करतां कामा नये असा त्यांचा कटाक्ष होता.

खरें शिक्षण म्हणजे विश्वाच्या बाबतींत विविध अनुभव घेणें हें होय. हे अनुभव मोठमोठ्या इमारती, कारखाने किंवा यंत्रालयें यांत मिळणार नाहीत. ते नैसर्गिक सौंदर्याच्या सान्निध्यांतच मिळूं शकतील. म्हणून मुलांना तशा वातावरणांत स्वच्छंदपणें वावरतां आले पाहिजे. निसर्गसान्निध्याचा आनंद मुलांना मिळावा यासाठी शिक्षणसंस्था जंगलांत, वनांत स्थापन केल्या पाहिजेत. शहरांच्या कोलाहलापासून दूर, वनांतील वृक्षलतांच्या व कुंजांच्या छायेंत, खुल्या आकाशाच्या विशाल छत्राखाली आदर्श विद्यालयांची स्थापना केली पाहिजे.

इंग्रजी शिक्षणपद्धति टागोरांच्या मतें अपूर्ण होती. कारण ती फक्त भौतिक ज्ञानापुरतीच मर्यादित होती. शिवाय परक्या भाषेंतून ज्ञान देण्याची ती पद्धति असल्यामुळे शक्तीचा व काळाचा अपव्यय होतो. म्हणून आध्यात्मिक विकासासाठी शिक्षणपद्धतीचा आधार भारतीय संस्कृति हाच असला पाहिजे. रवींद्रांच्या शिक्षणविषयक विचारांचें महत्त्वाचें वैशिष्टय म्हणजे त्यांनी संगीत व इतर कला यांच्या उपासनेला दिलेलें महत्त्व हें होय. शब्द हे अभिव्यक्तीचें एकमेव साधन नव्हे; नृत्य, नाटय, चित्र वगैरे कलांच्या द्वारेंहि ती करतां येते. मनुष्याचा भावनिक विकास होण्यासाठी कलांची, विशेषत: संगीताची अत्यंत आवश्यकता असते. मुलांच्या वर्तनांत व आवडीनिवडींत इष्ट बदल घडविण्यासाठी संगीत हा एक प्रभावी उपाय आहे हें अनुभवाने सिद्ध झालेले आहे. शिक्षणाची सर्व आंखणी मुलांच्या स्वभावाला अनुसरून, त्यांच्या अंतर्मनाच्या प्रक्रियांचा विचार करून व्हावयास हवी असें त्यांचें मत होतें. भारतांतील विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भांत शिक्षणाने ग्रामसुधारणेच्या कार्याला मदत केली पाहिजे असेंहि त्यांना वाटत होतें. या दृष्टीने साक्षरताप्रसार, आरोग्य आणि स्वच्छता याबद्दलचें ज्ञान, सहकारी संस्था व त्यांची कार्यपद्धति इ. कार्यक्रमांचा अंतर्भाव त्यांनी आपल्या शिक्षणयोजनेंत केलेला आहे.

रवींद्रनाथांचे पिताजी महर्षि देवेन्द्रनाथ यांनी आध्यात्मिक साधना करण्याच्या दृष्टीने कलकत्त्यापासून सुमारे १०० मैलांवर एक शांत व रम्य ठिकाण निवडून तेथे आपला 'शांतिनिकेतन' आश्रम स्थापन केला होता. रवींद्रांना तेथील सृष्टिसौंदर्य इतकें आवडलें की त्यांनी इ. स. १९०१ मध्ये केवळ पांच विद्यार्थी घेऊन आपला आश्रम सुरू केला. नैसर्गिक सौंदर्याची तेथे रेलचेल होती. झाडाखाली त्यांचे वर्ग चालत. विद्यार्थ्यांवर कोणत्याहि प्रकारचें परीक्षेचें दडपण नव्हतें. गुरु आणि शिष्य एकाच तऱ्हेचें जीवन एकत्र व्यतीत करीत असत. हळूहळू संस्थेची वाढ झाली. वाङ्मय, संगीत, नृत्य, चित्रकला, अभिनय वगैरे कलांचें शिक्षण सुरू करण्यांत आलें. मुलांना खेळांत व शारीरिक विकासाच्या इतर कार्यं-

क्रमांत भाग घेण्यास उत्तेजन देण्यांत येत असे. सकाळीं व संध्याकाळीं मूक प्रार्थना होऊन निराकार ब्रह्माची उपासना करण्यांत येई.

रवीन्द्रांना एवढ्यावरच समाधान नव्हतें. पूर्वपश्चिमेचा संगम होईल अशा प्रकारचें शिक्षणकेंद्र स्थापन करण्याचा त्यांचा विचार ठरला होता. जाति, वंश, वर्ण, भौगोलिक परिस्थिति वगरेवर आधारलेले सर्व भेदभाव अशा केंद्रांत नाहीसे होतील. "स्वदेशाच्या अतिरेकी अभिमानाची बंधनें तोडून टाकणें व अखिल मानवजातीच्या विजयाची पताका फडकविणें हेंच माझ्या उरलेल्या आयुष्याचें एकमेव कार्य आहे" असें त्यांनी सन १९१६ मध्ये लिहिलें होतें. या उद्देशाने त्यांनी शांतिनिकेतनांत सन १९२१ मध्ये विश्वभारती या आंतरराष्ट्रीय विद्यापीठाची स्थापना केली. सन १९५१ मध्ये लोकसभेने त्याला केंद्रीय विद्यापीठाचा कायदेशीर दर्जा दिलेला आहे. हें विश्वविद्यालय वसतिगृहयुक्त आहे. भारताच्या विविध भागांतून अध्यापक व विद्यार्थी येथे येतात व त्यांच्यांत घनिष्ठ संबंध प्रस्थापित होतात. एकदा एका विभागांत प्रवेश मिळाल्यावर विद्यार्थ्याला कोणतीहि जादा फी न देतां दुसऱ्या विभागांत शिक्षण घेतां येतें. या संस्थेंत परदेशीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो व त्यांना बंगाली, हिंदी, संस्कृत, पाली, चिनी व तिबेटी या भाषा, प्राचीन भारतीय तत्वज्ञान, प्राचीन भारताचा इतिहास इत्यादि विषयांचें शिक्षण दिलें जातें. या विश्वविद्यालयांत पाठभवन (हायस्कूल), शिक्षा-भवन (इन्टरमीजिएट कॉलेज), विद्या-भवन (३ वर्षांचा पदवीअभ्यासक्रम), विनय-भवन (बी. एड्. (कॉलेज), कला-भवन, संगीत-भवन, चीन-भवन, हिन्दी-भवन, हिंदी-तिबेटी शिक्षालय, श्री-निकेतन, शिक्षा-सत्र (ग्रामीण मुलांच्या माध्यमिक शिक्षणाचें केंद्र), शिल्प-सदन (घरगुती उद्योगांचें शिक्षण केंद्र), शिक्षा-चर्चा (बेसिक अध्यापक प्रशिक्षण विद्यालय) वगैरे अनेक संस्था कार्य करीत आहेत.

## विश्वभारतीचें महत्त्व :

ही संस्था भारतीय विद्यापीठांपैकी एक अग्रगण्य संस्था असून तिला खास आंतरराष्ट्रीय महत्त्वहि प्राप्त झालें आहे. अनेक देशांतील विद्यार्थी येथे एकत्र राहतात व शिकतात. म्हणून अनेक संस्कृतींच्या संगमाचें केंद्र या दृष्टीने विश्वभारतीला आगळें महत्त्व प्राप्त झालेलें आहे. गुरुकुलाप्रमाणेच गुरुशिष्यांचे घनिष्ठ संबंध, आदर, प्रेम, सौहार्द या भावनांवर आधारलेला जिव्हाळा हें या विद्यापीठाचें खास वैशिष्टय आहे. नैसर्गिक, मोकळ्या व रमणीय वातवरणांत सर्वजण राहतात व शिक्षण घेतात. त्यामुळे तेथील वातावरण नहमीच काव्यमय असतें. विविध कलांची अविरत उपासना चालूच असते. समाजसेवेच्या भावनेची जोपासनाहि प्रयत्नपूर्वक करण्यांत येते. रवींद्रनाथ आज नाहीत; पण पौर्वात्य व

पाश्चिमात्य संस्कृतींचें मीलन, भारतीय शैक्षणिक परंपरेचें जतन, काव्यमय व कलात्मक वातावरण, स्वातंत्र्य आणि कोणत्याहि प्रकारच्या दडपणाचा अभाव वगैरेमुळे त्यांच्या विचारांची छाप येथील कार्यावर अजूनहि स्पष्टपणें दिसून येते. इतर कांही विद्यापीठांप्रमाणे फक्त पदवीदान करणारी यांत्रिक संस्था न बनतां विश्वबंधुत्वाचा संदेश देणारें व विभिन्न संस्कृतींचा संगम साधणारें महान् केन्द्र हें त्याचें स्वरूप विलोभनीय नव्हे काय ? तें तसेंच चिरकाल राहो हीच प्रत्येकाची इच्छा असणार हें उघड आहे.

## वनस्थली विद्यापीठ :

गुरुकुल आणि विश्वभारतीप्रमाणेच इंग्रजी शिक्षणपद्धतीविषयींच्या असमाधानांतून वनस्थली विद्यापीठाचा जन्म झाला आहे. इ. स. १९३० पर्यंत झालेल्या राजकीय आंदोलनांमुळे जनता जागृत झाली होती. तिला आपल्या सामाजिक दोषांची जाणीव होऊं लागली होती. समाजहिताच्या दृष्टीने स्त्री-शिक्षणाला अतिशय महत्त्व आहे ही गोष्ट महर्षि डॉ. कर्व्यांसारख्या समाज-धुरीणांच्या प्रयत्नामुळे सर्वसामान्य जनतेला हळूहळू पटूं लागली होती. प ंतु इंग्रजी शिक्षणपद्धति ही भारतीय स्त्रीच्या दृष्टीने अगदी निरुपयोगी आहे असें सर्वसाधारण लोकांचें मत बनलें होतें. म्हणून भारतीय स्त्रीच्या परंपरागत प्राचीन ध्येयांना अनुसरून तिचें कार्यक्षेत्र, तिच्या गरजा व तिचा सर्वांगीण विकास ज्या तऱ्हेच्या शिक्षणामुळे विचारांत घेतला जाईल असें शिक्षण देणाऱ्या संस्थांची स्थापना करणें निकडीचें वाटूं लागलें होतें. याच भावनेंतून वनस्थली विद्यापीठ जन्म पावलें.

जयपूरपासून सुमारें ४५ मैलांवर वनस्थळी नांवाचें एक गांव आहे. राजस्थानांत महात्मा गांधीजींचा विधायक कार्यक्रम लोकप्रिय करण्यासाठी पंडित हिरालाल शास्त्री यांनी सन १९२९ मध्ये 'जीवन–कुटीर' नांवाच्या आश्रमाची तेथे स्थापना केली होती. शांतीबाई नांवाच्या त्यांच्या मुलीची लहान बालकां-करिता एक विद्यालय स्थापन करण्याची इच्छा होती. दुर्दैवाने सन १९३५ मध्ये शांतीबाई अचानक दिवंगत झाल्या. आपल्या एकुलत्या एक मुलीची अपुरी इच्छा पूर्ण करण्यासाठी हिरालालजींनी वनस्थळीमध्ये फक्त ५–६ मुली घेऊन 'शिक्षा–कुटीर' या संस्थेची स्थापना केली. इ. स. १९३७ मध्ये संस्थेचें हें नांव बदलून 'राजस्थान बालिका विद्यालय' असें नांव ठेवण्यांत आलें व सन १९४२ च्या आंदोलनाच्या वेळीं तेंहि नांव बदलून 'वनस्थळी विद्यापीठ' असें या संस्थेचें नामाभिदान करण्यांत आलें.

## विद्यापीठाचें ध्येय :

(१) भारतीय संस्कृति व ज्ञान यांचा पाश्चात्य विज्ञानाशीं समन्वय करणें. (२) मुलींच्या सर्वांगीण विकासाच्या शिक्षणाची व्यवस्था करणें. (३) मुलींना आदर्श नागरिक, यशस्वी गृहिणी, आणि यशस्वी माता होण्याचें शिक्षण देणें. (४) त्यांना सरळ व साध्या जीवनाची सवय लावणें. (५) श्रमप्रतिष्ठेचें सक्रिय शिक्षण देणें.

विद्यापीठाच्या एका अहवालांत ध्येयासंबंधी असें म्हटलें आहे. " भारतीय संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर आणि तत्त्वज्ञान व विज्ञान यांच्या समन्वयाच्या आधारावर व्यक्तीचा शारीरिक, नैतिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक असा सर्वांगीण विकास घडवून आणणारें प्रभावशाली शिक्षण देण्याची व्यवस्था करणें हा विद्यापीठाचा उद्देश आहे. " यामुळे प्रचलित गतिशील जीवनाला अनुसरून सुसंस्कृत, सुयोग्य आणि कार्यकुशल असे नागरिक निर्माण व्हावेत अशी अपेक्षा आहे. विद्यार्थिनींना यशस्वी नागरिक, गृहिणी आणि माता बनविण्याच्या दृष्टीने परिपूर्ण शिक्षण देण्याची एक पंचमुखी योजना विद्यापीठाने कार्यवाहीत आणली आहे. तिचें स्वरूप थोडक्यांत पुढीलप्रमाणे आहे—

(१) **शारीरिक शिक्षण** – यामध्ये कवायत, लाठी, लेझीम, निरनिराळे वैयक्तिक व सांघिक खेळ, आसनें, पोहणें, घोड्यावर बसणें, वगैरे कार्यक्रमांचा अंतर्भाव होतो. हें शिक्षण सर्वांना सक्तीचें आहे.

(२) **व्यावहारिक शिक्षण** – यामध्ये सर्व प्रकारच्यें प्रापंचिक कार्याचें व उद्योगांचें शिक्षण दिलें जातें. शिवाय विद्यार्थिनींना आपल्या कपड्यांची व भांड्यांची सफाई स्वतःच करावी लागते.

(३) **ललितकलांचें शिक्षण**: इ. १ ते ५ पर्यंत संगीत व चित्रकला या दोन्ही कला शिकविल्या जातात. त्यानंतर त्यांपैकीं कोणत्याहि एका कलेचें शिक्षण दिलें जातें. ८ व्या इयत्तेपर्यंत शिकणाऱ्या मुलींना नृत्यकला शिकविण्याचीहि सोय आहे.

(४) **नैतिक शिक्षण** : व्यक्तित्वाचा विकास आणि सर्व धर्मांविषयी समभाव हे हेतु साध्य होण्यासाठी नैतिक शिक्षण दिलें जातें. सामुदायिक प्रार्थना, साप्ताहिक चर्चा, गीता, रामायण वगैरेंचे पाठ, विद्यार्थिनींच्या पंचायती, वसतिगृहांतील सामुदायिक एकत्र जीवन वगैरे कार्यक्रमांच्या द्वारें हें शिक्षण दिलें जातें.

(५) **बौद्धिक शिक्षण** : निरनिराळ्या विषयांचें शिक्षण परिणामकारक होण्यासाठी आधुनिक शास्त्रशुद्ध पद्धतींचा उपयोग केला जातो. पहिल्या दोन

वर्गांत कोणत्याहि प्रकारचें पाठयपुस्तक नसतें. निसर्गशास्त्रें व समाजशास्त्रें (Nature and Social Sciences) यांचें शिक्षण सुरुवातीपासून देतात. सहाव्या इयत्तेपासून इंग्रजी शिकविण्यांत येतें. भारतीय धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृति यांच्याविषयी भरपूर माहिती देण्यांत येते. परीक्षापद्धतींत वर्षभर केलेल्या कामालाहि योग्य स्थान व महत्त्व मिळतें. पहिल्या चार वर्गांत प्रचलित स्वरूपाच्या परीक्षांचें संपूर्ण उच्चाटण करण्यांत आलें आहे. अभ्यासक्रमबाह्य कार्यक्रमालाहि पुरेसें महत्त्व देण्यांत येतें. या विद्यापीठांत खालील शैक्षणिक विभाग आहेत :–

(१) **संस्कृता विभाग** : सुरुवातीपासून आठव्या वर्गापर्यंतच्या शिक्षणाची ही स्वतंत्र अवस्था (stage) आहे. हें शिक्षण पूर्ण करून विद्यार्थिनी 'संस्कृता' परीक्षेला बसतात व उत्तीर्ण झाल्यास त्यांना प्रमाणपत्र मिळतें. या अभ्यासांत नेहमींच्या विषयाखेरीज संगीत, चित्रकला, भरतकाम, कताई आणि गृहविज्ञान या विषयांचें शिक्षणहि दिलें जातें.

(२) **उच्च माध्यमिक शिक्षण** : हें शिक्षण इ. ९ वी ते ११ वी पर्यंत चालतें व त्यानंतर विद्यार्थिनी राजस्थान सेकंडरी एज्युकेशन बोर्डाच्या हायर सेकंडरी परीक्षेला बसूं शकतात. अभ्यासक्रमांतील वैकल्पिक विषय वाङ्मय, विज्ञान, ललित कला आणि गृहविज्ञान अशा विविध गटांत विभागून त्यांचें शिक्षण दिलें जातें.

(३) **प्री-युनिव्हर्सिटी शिक्षण** : हायस्कूल व मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थिनींसाठी हा शिक्षणक्रम आहे. तो पूर्ण झाल्यावर राजस्थान विद्यापीठाच्या प्री-युनिव्हर्सिटी परीक्षेला बसतां येतें.

(४) **युनिव्हर्सिटी शिक्षण** : इंटर पास झालेल्यांसाठी दोन वर्षांचा आणि हायर सेकंडरी किंवा प्री-युनिव्हर्सिटी पास झालेल्या मुलींसाठी तीन वर्षांचा बी. ए. पदवीचा अभ्यासक्रम पुरा करण्याची व्यवस्था या विभागांत आहे. सन १९६२ पासून बी. एड्. परीक्षेचा अभ्यासक्रमहि सुरू करण्यांत आलेला आहे.

(५) **विद्यापीठाचे डिप्लोमा विभाग** : विद्यापीठामार्फत अनेक शिक्षणक्रम चालविण्यांत येतात व परीक्षा घेतल्या जातात. हायर सेकंडरी परीक्षेनंतर संगीताचा तीन वर्षांचा शिक्षणक्रम आहे. हायस्कूल परीक्षेनंतरच्या पांच वर्षांच्या शिक्षणानंतर चित्रकलेचा डिप्लोमा मिळूं शकतो. तसेंच दोन वर्षांच्या शिक्षणानंतर शारीरिक शिक्षणाचा डिप्लोमाहि मिळूं शकतो.

### वनस्थळी विद्यापीठांचीं वैशिष्टचें :

अध्यापक आणि विद्यार्थिनी यांचें जीवन अत्यंत साधें व सरळ असतें. सर्वांना खादी वापरावी लागते. विद्यापीठांत शिक्षणशुल्क कांहीहि द्यावें लागत

नाही. वसतिगृहांत राहण्याचा व जेवण्याचा खर्च मात्र द्यावा लागतो. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासाकडे खास लक्ष दिलें जातें व स्वतंत्रपणें विचार करण्यास त्यांना उत्तेजन व स्वातंत्र्य दिलें जातें. मुलींना वैयक्तिक स्वातंत्र्य आहे, पण त्याचबरोबर त्यांना सामाजिक जबाबदाऱ्याहि पार पाडाव्या लागतात. त्या आपलीं स्वतःचीं व घरगुती कामें स्वतःच करतात. वसतिगृहांत कोणत्याहि तऱ्हेचा भेदभाव केला जात नाही. शारीरिक शिक्षणाची विशेष व्यवस्था करण्यांत आलेली आहे. दरवर्षी पालक–संमेलन भरवून मुलींच्या पालकांशीं प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्यांत येतो. परीक्षा, अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकें यांचा सासुरवास शक्यतों कमी करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.

हें विद्यापीठ स्त्रीशिक्षणाचें अखिल भारतीय केंद्र आहे. अनेक राज्यांतील मुली येथे शिक्षण घेतात. त्या अनेक जातींच्या व समाजाच्या विविध थरांतील असतात. डॉ. कर्व्यांच्या ना. दा. ठा. महिला विद्यापीठाप्रमाणे एक स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण महिला विश्वविद्यालय बनण्याचें उद्दिष्ट या विद्यापीठापुढे आहे. विद्यार्थिनी सध्या राजस्थान बोर्डाच्या व राजस्थान विश्वविद्यालयाच्या परीक्षांना बसतात. त्यामुळे साहाजिकच विद्यापीठाच्या कार्याला थोड्याफार मर्यादा पडतात. बहुतेक सर्व अध्यापक पुरुषच आहेत ही गोष्टहि थोडीशी खटकणारी आहे. शिक्षणाच्या क्षेत्रांत स्त्रिया अधिक कर्तबगार ठरतात असा इतरत्र अनुभव असतांना येथे ही परिस्थिति कां असावी हा प्रश्नच आहे! इ० १ ते ८ या शैक्षणिक टप्प्यासाठी स्वतंत्र अभ्यासक्रम आंखून या विद्यापीठाने नवी वाटचाल सुरूं केलेलीच आहे. ती तशीच पुढे चालू राहून या विद्यापीठाला एका आगळ्या वैशिष्ट्याच्या स्वतंत्र महिला विद्यापीठाचा दर्जा प्राप्त व्हावा अशीच अपेक्षा कोणीहि व्यक्त करील.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ना. क्र. 930
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम
विभाग
क्रमांक
ना. दि.

REFBK-0013098